THE BOOK WAS DRENCHED

TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY
OU_196049
UNIVERSAL
LIBRARY

ॐतत्सत् ।

धर्म.



स्वधर्म विरक्ति स्वधर्म ते भक्ति । स्वधर्में विश्रांती परलोकीं ॥ १ ॥
ऐसें वर्म कोणी जाणे भाग्यवंत । तेथेंचि अच्युत वास करी ॥ २ ॥
स्वधर्म तो श्रेष्ठ स्वधर्म वरिष्ठ । स्वधर्म उद्भट साधनासी ॥ ३ ॥
स्वधर्मी महती स्वधर्मी सद्भक्ती । स्वधर्में ते होती पुण्यश्लोक ॥ ४ ॥
तुका म्हणे राहे स्वधर्मासी तर । तेथें तो श्रीधर तिष्ठतसे ॥ ५ ॥



रचणार,

दिनकर सीताराम सांखळकर.



आवृत्ति पहिली.

(प्रती ३०००.)



मुंबई.



शके १८४५. सन १९२३.

किंमत दीड रुपया.

मुद्रकः—रा. रा. **चिंतामण सखाराम देवळे**, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हेट्स् ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँडहर्स्ट रोड, गिरगांव-मुंबई.

प्रकाशकः—रा. रा. **शंकर विष्णु कावतकर**, कानजी खेतसी भाटिया चाळ, कांदेवाडी, **मुंबई** नं. ४.

सोल् एजंट्स्—मेसर्स **डी. पी. कलवारी आणि कंपनी**, गिरगांव बँक रोड, **मुंबई**.

(ग्रन्थकर्त्यानें सर्व हक्क राखून ठेविले आहेत.)

धर्मेच्छुनरनारीभ्यः प्रेमपानीयपूर्वकम् ।
समर्पये धर्ममिमं स्वल्पसेवेति सादरम् ॥ १ ॥

प्रस्तावना.

धर्माचें पाळण । करणें पाखांड खंडण ॥ १ ॥
हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ॥ १ ॥

—तुकाराम.

साधुसंतांच्या निवडक धर्मपर वचनांचा ज्यांत संग्रह केला आहे अशीं वरींच पुस्तकें उपलब्ध असतां हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें प्रयोजन काय असें सकृद्दर्शनीं वाटणें साहजिक आहे. पण ज्याप्रमाणें एकाच मजकुराची जाहिरात लोकांचें लक्ष वेधण्याकरितां, एकाच ठिकाणीं, एकास एक लागून पंधरा-वीस वेळ सुद्धां लाविलेत, त्याप्रमाणें समान मजकुराचीं, पण संपादकाच्या नांवानें, मजकुराच्या आगेमागेपणानें, निराळ्या आकारानें, नवीन नांवानें, फार कशाला ? भिन्न रंगाच्या पुठ्ठ्यानें कां होईना, पण जनतेचें लक्ष वेधून घेणारीं जितकीं धर्मपर पुस्तकें निघतील तितकीं हवींच आहेत. शिवाय धर्मपर वचनांचा ज्यांत संग्रह केला आहे अशा कोणत्याहि उपलब्ध पुस्तकापेक्षां प्रस्तुत पुस्तकांतील संग्रह बराच मोठा असून, विशेषतः विषयाची मांडणी नवीन व स्वतंत्र आहे हें भराभर पानें परतणाऱ्याच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे.

जेव्हां जेव्हां मन प्रक्षुब्ध, संत्रस्त, उद्विग्न किंवा खिन्न होई तेव्हां मनाचें समाधान करून, धैर्य व उत्साह उत्पन्न करणारा व चित्तवृत्तीच्या ठायीं शांति उत्पन्न करून, आपणास कर्तव्योन्मुख करणारा असा एखादा थोर पुरुषांच्या वचनांचा संग्रह नेहमीं आपल्या सन्निध पाहिजे असें आम्हांस सहा-सात वर्षांपूर्वीपासून वाटत असे. या इच्छेनुसार सुमारें तीन वर्षांपूर्वी स्वतःच्या उपयोगासाठीं साधुसंतांचीं वचनें एकत्र लिहून काढीत असतां तीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावीं अशी कल्पना सुचली. प्रस्तुत पुस्तक हें त्याच कल्पनेचें दृश्य फल होय.

साधुसंतांच्या स्वैरालापांचें वर्गीकरण करणें किती कठिण आहे हें सांगावयास नकोच. कितीहि कुशल मनुष्य असला तरी रुपये-आणे-पै किंवा खंडी-मण-पायली याप्रमाणें त्यांच्या वचनांचें कोष्टकवार वर्गीकरण करणें अशक्य असल्यामुळें, एका ठिकाणचें पद्य दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं युक्ततेनें घालतां येईल हें उघड आहे. तरी पण रचना होतां होईतों व्यवस्थित करण्याविषयीं यथामति प्रयत्न केला आहे. व

पद्यांचा क्रम ठरवितांनाहि काळजी घेतली आहे. मात्र विचारांच्या सांखळीचे दुवे विलग दिसूं नयेत म्हणून दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं अधिक शोभणारें पद्य अन्य ठिकाणीं घातलें आहे. प्रकरणांचा, त्यांतील भाग-विभागांचा व पद्यांचा क्रम कोणत्या तत्त्वानुसार ठेवला आहे हें सांगण्याची जरूरी आहे असें नाहीं व तें आम्हांस नीटसें सांगतांहि यावयाचें नाहीं. परंतु लक्षपूर्वक पहाणारास, आमच्या स्वतःच्या बिलकुल लक्षांत न आलेल्या अशा सौम्य धोरणानें विषयाची मांडणी झाली आहे असें एका मार्मिक गृहस्थाच्या चटकन् लक्ष्यांत आलें त्याप्रमाणें, विषयाच्या मांडणींत कांहीं तरी सुसंगतता असल्याचें आढळून येईल असें वाटतें. मनाचे श्लोक व हरिपाठाचे श्लोक एकत्र ठेवणें बरें असें वाटल्यावरून एकाच ठिकाणीं दिले आहेत. पण त्यांचा क्रम बदलला असतां कांहीं फायदा होईल असें वाटल्यावरून तो कोठेंकोठें बदलला आहे. त्याचप्रमाणें ज्ञानेश्वरी व दासबोध या ग्रंथांतील ओंव्याचाहि क्रम क्वचित् बदलला आहे व कोठेंकोठें पद्याचा एखादा दुसरा चरण अनावश्यक, अस्थानीं, निःसत्व किंवा अश्लील दिसल्यामुळें गाळला आहे.

ज्या अभंगांचे प्रारंभीचे चरण पुस्तकांत दिले आहेत असे अभंग त्या त्या गाथांत सहज मिळण्याजोगे असल्यामुळें, गाथांतील त्यांचा अनुक्रमांक न देतां फक्त ते कोणाचे आहेत एवढेंच सांगितलें आहे. 'लवकर आतां...' (पृ. ३२७), 'मनुज जगामधिं...' (पृ. ३२७) 'मनुज नित्य...' (पृ. ३२९) व 'धर्मी जडो...' ही प्रस्तावनेच्या शेवटीं दिलेली ओळ, हीं वचनें स्वतः ग्रंथकर्त्यांचीं आहेत. ज्या पद्यांचे मूळ ग्रंथांतील उल्लेख पुस्तकांत दिलेले नाहींत अशांपैकीं ज्यांचे मूळ उल्लेख मिळण्यासारखे आहेत, त्यांचे उल्लेख शेवटीं वर्णानुक्रमणिकेंत दिले आहेत. तथापि कांहीं थोडे उल्लेख देण्याचें राहिलें आहे. तसेंच छापखान्याविषयींच्या आमच्या अननुभविकपणामुळें छपाईचे कांहीं दोष राहिले आहेत. या व इतर न्यूनांबद्दल क्षमा करावी व या पुस्तकांतील दोष आम्हांस कळविण्याची कृपा करावी अशी वाचकांस विनंति आहे.

संस्कृत श्लोकांच्या व इंग्रजी वचनांच्या भाषांतरामुळें उगीच ग्रन्थ मात्र वाढला आहे असें कदाचित् कांहीं जणांस वाटेल. पण निव्वळ मराठी जाणणाऱ्या वाचकालाहि पुस्तकांतील वचनांची गोडी थोडीबहुत तरी चाखतां यावी म्हणून आम्हीं प्रायः

प्रत्येक संस्कृत व इंग्रेजी वचनाचें भाषांतर दिलें आहे. जेथें जेथें दुसऱ्यांनीं केलेल्या भाषांतराचा फायदा घेतां आला तेथें तेथें तो आम्ही घेतला आहे. गीतारहस्यांत आलेल्या श्लोकांचें भाषांतर गीतारहस्याप्रमाणें व गीतांजली-तील उताऱ्यांचें भाषांतर कै. हरि नारायण आपटे यांनीं केलेल्या भाषांतराप्रमाणें प्रायः दिलें आहे. तसेंच भर्तृहरीच्या शक्य तेवढ्या श्लोकांचें भाषांतर हिंद एज-न्सीनें प्रसिद्ध केलेल्या शतकत्रयांतील भाषांतराप्रमाणें व 'सत्यं वद' इत्यादि धर्मानु-शासनाचें भाषांतर 'कै. न्या. मू. रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें,' या पुस्तकांतील भाषांतरानुसार दिलें आहे. मात्र क्वचित्प्रसंगीं शब्दशः भाषांतराच्या दृष्टीनें किंवा सुगमतेसाठीं अल्पस्वल्प फरक केला आहे. या केलेल्या फरकामुळें भाषांतरांत दोष आला असल्यास तो सर्वस्वी आमचा आहे हें निराळें सांगावयास नकोच. तुको-बांच्या अभंगांचा अर्थ देण्याच्या कामीं हरिभक्तिपरायण विष्णुबुवा जोग यांच्या गाथेचा विशेष उपयोग झाला. या सर्व ग्रंथांच्या कर्त्यांचे, त्याचप्रमाणें इतर ज्या ज्या ग्रंथांचा उपयोग कोणत्याहि प्रकारें 'धर्मास' झाला आहे त्या सर्व ग्रंथांच्या कर्त्यांचे आम्ही फार आभारी आहों.

या ग्रन्थांत कांहीं इंग्रेज ग्रंथकारांच्या वचनांचा व विशेषतः ख्रिस्ती धर्मपुस्तकां-तील वचनांचा क्वचित् समावेश करण्यांत आलेला आहे हा गोष्ट आमच्या कांहीं हिंदुधर्मीय बांधवांस पसंत पडणार नाहीं अशी आम्हांस बरीच शंका होती व पुढें कांहीं दिवसांनीं कै. गडकरीकृत 'एकच प्याला' या नाटकांतील तुलनेसाठीं आम्ही टीपेंत दिलेलें एक उत्कृष्ट तात्विक वाक्य, तें दारूमय नाटकांतील असल्यामुळें, काढून टाकण्याविषयीं एका गृहस्थानें आम्हांस जेव्हां सूचना केली, तेव्हां तर आमची सदरील शंका दुणावली व आमच्या धर्मग्रंथांतील वचनांखेरीज सर्व वचनें काढून टाकावीं किंवा कसें हा प्रश्न आमच्यापुढें तीव्रतेनें उभा राहिला. तथापि विचार करितां तसें करण्याची जरूरी नाहीं, इतकेंच नव्हे तर तें अयुक्त होईल, अशी आमची बालंबाल खात्री झाली. तेव्हां त्यासंबंधानें थोडेसें लिहिणें जरूर वाटतें. प्रथम आम्ही नम्रपणें असें सांगतों कीं, कोणाहि कट्टया हिंदुधर्माभिमानी इसमापेक्षां आम्हांस हिंदुधर्माविषयीं रेंसभरहि कमी अभिमान नाहीं. पण त्यामुळें स्वधर्मेतर गोष्टींचा विटाळ मानणें मात्र केव्हांहि युक्त होणार नाहीं. कारण कोठलाहि धर्म झाला तरी त्यांत मनुष्यानें या जगांत कसें वागलें पाहिजे हें शोधून काढण्या-

चाच प्रयत्न केलेला असल्यामुळें सर्व धर्मांचें परस्परांशीं बंधुत्वाचें नातें असून तें ज्यानें ओळखिलें त्याला इतर धर्माविषयीं आदर व सहानुभूति वाटणें हेंच साहजिक आहे—

यद्यद् विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥

'जी जी वस्तु वैभव, लक्ष्मी किंवा प्रभाव यांनीं युक्त असेल ती ती माझ्या तेजाच्या अंशापासून झाली असेंच तूं समज' असें भगवान् श्रीकृष्ण गीतेंत स्वमुखानें सांगत आहेत (गी. १०.४१). अर्थात् परधर्मांत किंवा परधर्मीय ग्रन्थकारांच्या लेखांत जें 'श्रीमत्' किंवा 'ऊर्जित' असेल तें स्वधर्माविरोधानें म्हणजे आपल्या विशिष्ट धार्मिक भावनांस धक्का न लावितां, आपण अवश्यमेव ग्रहण केलें पाहिजे असें होतें. स्वामी विवेकानन्द सांगतात—"ख्रिस्तधर्मीयानें आपला धर्म सोडून हिंदु किंवा बौद्ध व्हावें अगर हिंदु किंवा बौद्धधर्मीयानें आपल्या धर्माचा त्याग करून ख्रिस्ती व्हावें अशी आम्ही इच्छा करीत नाहीं. **प्रत्येकानें आपला स्वतःचा धर्म पाळावा.** परंतु इतर धर्मांतील सत्वांशहि आत्मसात्करावा आणि कोणीहि स्वतःचें वैशिष्ट्य न गमावतां आपली उन्नति करून घ्यावी अशी आमची इच्छा आहे (मं. वि. पृ. ९४). "बाह्य विधि कडकपणें पाळण्यांत मनुष्यानें मुसलमान व्हावें आणि सर्व प्राणिमात्रांविषयीं भूतदया बाळगण्यांत हिंदु व्हावें" (रा. बो. व. ३९३), या श्रीरामकृष्ण परमहंसांच्या वचनांतहि प्रायः तोच बोध सांठविलेला आहे. तसेंच—

विषादप्यमृतं ग्राह्यं बालादपि सुभाषितम् ।
अमित्रादपि सद्वृत्तममेध्यादपि काञ्चनम् ॥

'प्रत्यक्ष विषांत जरी अमृत सांपडलें तरी त्याचें ग्रहण करावें, लहानाच्याहि तोंडचें सुभाषित घ्यावें, शत्रूपासून सुद्धां सद्वर्तन शिकावें व घाणेरड्या पदार्थांत सोनें मिळालें तरी त्याचा स्वीकार करावा' असें मनूचें सांगणें असून (म. स्मृ. २.२३९), तुकोबांचा उपदेशहि तसाच आहे—

आपणा लागे काम वाण्याघरीं गूळ । त्याचें यातिकूळ काय कीजे ॥१॥
उकरड्यावरी वाढली तुळसी । टाकावी ते कैसी ठाया गुणें ॥ २ ॥
गाईचा जो भक्ष अमंगळ खाय । तिचें दुध काय सेवूं नये ॥ ३ ॥
तुका म्हणे काय सलपटासी काज । फणसांतील बीज काढनि घ्यावें॥४

स्वामी रामतीर्थ स्वधर्मेतर 'श्रीमत्' किंवा 'ऊर्जित' तत्त्वांचें तत्परतेनें ग्रहण करीत असत हें प्रसिद्धच आहे. त्याचप्रमाणें कै. नरकेसरी बाळ गंगाधर टिळक यांनींहि ख्रिस्ती धर्मांतील तत्त्वांस, ख्रिस्तधर्मीय ग्रन्थकारांच्या तत्वांस किंवा नाटकांतील वचनांस आपल्या लोकमान्य गीतारहस्य नामक धर्मग्रंथांतून बहिष्कृत केलें आहे असें नाहीं. तेव्हां धर्माच्या बाबतींत 'लोकमान्य' झालेलें जें हें धोरण आम्ही प्रस्तुत पुस्तकांत अनुसरलें आहे तें आमच्या हिंदुधर्मीय वाचकांसहि मान्य होईल, व स्वामी विवेकानन्दांनीं अधिकारयुक्त वाणीनें सांगितल्याप्रमाणें, स्वधर्मेतर ग्रंथांतील प्रस्तुत पुस्तकांत घेतलेला सत्वांश, वाचक स्वधर्माविरोधानें स्वोन्नत्यर्थ आनंदानें आत्मसात् करतील असा आम्हांस भरंवसा आहे.

या पुस्तकांत आमचें स्वतःचें असें कांहीं नाहीं असें म्हटलें तरी चालेल. 'सुख-दुःखविवेक' या भागांतील उत्तरार्ध एवढाच काय तो म्हटला तर आमचा असा आहे. इतर भागांप्रमाणें त्या भागांतहि तद्विषयक पद्यें क्रमवार जुळवून द्यावीं व पुस्तकांत स्वतःचें असें कांहीं देऊं नये असाच प्रथम आमचा विचार होता. पण तें नीट जमेना. तेव्हां पद्यांची रचना कशी करावी याविषयीं विचार करीत असतां, विचारांचे दुवे जुळण्यापुरता गद्य मजकूर लिहावा अशी कल्पना आम्हांस सुचली. त्याप्रमाणें वेडेवांकडे चार शब्द—ते सुद्धां होतां होईं तों थोर पुरुषांच्या वचनांच्या किंवा लेखांच्या आधारें—आम्हीं लिहिले आहेत. तरी वाचक ते गोड करून घेतील अशी आशा आहे.

श्रीयुत कृष्णाजी गोविंद किनरे म्हणतात त्याप्रमाणें, कारागीर लोकांनीं आपलें अलौकिक कौशल्य खर्च करून नाना तऱ्हेचे मोहक पदार्थ तयार करावे व त्याचें प्रदर्शन तिसऱ्यानेंच करावें तसाच कांहींसा प्रकार उताऱ्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत होत असतो. पण प्रदर्शन करण्याचेंहि श्रेय प्रस्तुत पुस्तकासंबंधीं फारसें आमच्या वांट्यास येत नाहीं. कारण कित्येक रसिक लोकांनीं निरनिराळ्या परड्यांतून जमवून ठेवलेल्या अनेक प्रकारच्या निवडक पुष्पांतून फुलें घेऊन, बुद्धि झाली त्याप्रमाणें आम्हीं तीं एकत्र गुंफिलीं मात्र आहेत. तेव्हां 'भक्तिमार्गप्रदीप,' 'श्रीहरिभजनामृत,' 'सुबोध अभंगमाला,' 'भजनसार,' 'रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें,' 'दासबोधांतील उपदेशपाठ,' 'नवनीत,' 'नित्यपाठभजनमाला,' 'प्रेमळ भजनसुधा,' 'सुभाषितरत्नमाला' इत्यादि पुस्तकांच्या कर्त्यांचे आम्ही

अत्यंत आभारी आहों. शिवाय भक्तिमार्गप्रदीपाच्या प्रकाशामुळें पहिल्या खंडांतील मांडणी व मजकूर असा उभयविध मार्ग आक्रमण्यास पुष्कळ मदत झाली असल्यानें 'धर्म' 'प्रदीपाचा' विशेष ऋणी आहे. त्याचप्रमाणें 'गीतारहस्य' 'गीतांजलि' 'श्रीरामकृष्णांचीं बोधवचनें' इत्यादि ज्या आधुनिक ग्रन्थांतून 'धर्मांत' अवतरणें घेतलीं आहेत, त्या पुस्तकांच्या कर्त्यांचे व मालकांचे आम्ही फार आभारी आहों.

या पुस्तकाची हस्तलिखित प्रत सुमारें दोन वर्षांपूर्वीच तयार झाली होती, पण कोणी प्रकाशक मंडळी ती प्रकाशित करण्यास कबूल न झाल्यामुळें व आमच्यापाशीं छपाईस लागणारें द्रव्य नसल्यामुळें ती आमच्यापाशीं पडून होती. मनुष्याचें हित कशांत आहे हें ज्याला यथार्थपणें कळतें व मनुष्यास कितीहि वाईट वाटलें तरी त्याचें खरें हित तेंच घडवून आणावयाचें अशी ज्याची दया निष्ठुर असत्ये त्या कृपाघन प्रभूच्या योजनेनेंच असें झालें असलें पाहिजे. कारण या मुदतींत अगदीं अखेरपर्यंत, त्यानें बुद्धि दिली त्याप्रमाणें हस्तलिखित प्रतींत वेळोवेळीं बरीच सुधारणा केली आहे. पण स्वतःच्या द्रव्यानें ती मुद्रित करण्याखेरीज अन्य मार्ग नसता तर 'धर्मास' चोपड्यांच्या गोधडीच्या आच्छादनांत व खोलींतील कोंडलेल्या हवेंत आणखी किती काळ कंठावा लागला असता कोणास ठाऊक! म्हणून वैद्य व्यंकटराव सिनकर, श्री. शंकर विष्णु कावतकर, श्री. दत्तात्रेय श्रीधर कलवारी, श्री जगन्नाथ परशुराम तेंडुलकर, श्री. वासुदेव पांडुरंग तेंडुलकर यांचे, या पुस्तकाच्या प्रकाशनास द्रव्यसाहाय्य केल्याबद्दल आम्ही फार फार आभारी आहों. पुढें पुस्तक छापखान्यांत देण्यापासून प्रुफें तपासणें, पुस्तक लवकर पण व्यवस्थित करविण्यासाठीं छापखान्यांत खेटे घालणें वगैरे बहुतेक काम आमचे स्नेही रा. रा. नरसिंह विठ्ठल बागाव यांनीं मोठ्या हौसेनें केलें आहे. अर्थात् पुस्तकाच्या शुद्धपणाचें व सुबकपणाचें सर्व श्रेय त्यांनाच आहे. प्रारंभीं टाइप, प्रुफें तपासणें वगैरे विषयीं आम्हांस कांहींच माहिती नसल्यामुळें, श्री. बागाव यांच्या मदतीशिवाय हें काम आमच्यानें कसें पार पडलें असतें याची कल्पनाच होत नाहीं. त्यानीं क्वचित् दुरुस्त्याहि सुचवून पुस्तकाचें सौंदर्य वाढविलें आहे. पण हें सर्व त्यांनीं इतक्या आपलेपणानें केलें आहे कीं, त्याबद्दल त्यांचे आभार मानणें, स्वतःचे आभार मानण्या-

प्रमाणेंच हास्यास्पद होईल. त्यांचा अकृत्रिम स्नेह आभारांच्या मापांत मावण्या-इतका आकुंचित नसल्यामुळें आम्ही फक्त त्याचा निर्देश करूनच थांबतों. पद्यांची वर्णानुक्रमणिका व कठिण शब्दांचा कोश तयार करण्याचें बहुतेक काम श्री. शंकरराव कावतकर यांनीं केलें आहे. शिवाय आम्हांस पुस्तकाकडे नीट लक्ष पुरवितां यावें म्हणून आमचीं इतर कामें आम्हीं न सांगतां दक्षतेनें करून, त्यांनीं या पुस्तकास जी मदत केली ती अप्रत्यक्ष असली तरी तिचें मोल प्रत्यक्ष मदतीपेक्षां अणुमात्र कमी नाहीं. तसेंच पाठ निश्चित करण्यासाठीं, निरनिराळ्या गाथांतून अभंग काढून देण्याचे कामीं श्री. भगवंत गणेश सांखळकर व श्री. राजाराम दामोदर किनरे यांनीं जी मनापासून मदत केली ती त्यांना जरी पुष्कळ अशी वाटली नाहीं तरी, फाजील ओझ्यानें दमून गेलेल्या माणसास त्याचें थोडेसें ओझें वाहून नेण्याच्या कामीं प्रेमपूर्वक केलेल्या साह्याप्रमाणें, तिचीहि किंमत आमच्या दृष्टीनें विशेष आहे. श्रीयुत कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, गुरुवर्य प्रो. हरि दामोदर वेलणकर व श्रीयुत कृष्णाजी गोविंद किनरे यांनीं हस्तलिखित प्रत पहाण्याची तसदी घेऊन, अभिप्राय देऊन 'धर्माच्या' प्रकाशनास मोठीच मदत केली आहे. शिवाय गुरुवर्य प्रो. वेलणकर यांची आम्हांस इतर अनेक तऱ्हेनें मदत झाली आहे. तसेंच श्री. खाडिलकर यांनीं प्रस्तावनेसंबंधीं ज्या मार्मिक सूचना केल्या त्यांचा आम्हांस चांगला उपयोग झाला. या सर्व गृहस्थांचे व इतरहि ज्यांचें ज्यांचें या प्रस्तुकास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष साहाय्य झालें आहे त्या सर्वांचे आम्ही मनःपुर्वक आभार मानतों. मुंबई वैभव छापखान्याचे चालक श्री. भास्कर महादेव सिद्धये यांचे आभार अर्थात् मानलेच पाहिजेत. कारण त्यांच्या मदतीनेंच छपाईच्या पेहरावानें सजून वाचकांच्या करकमलांमध्यें मिरवण्याचा सुखसोहळा 'धर्मास' आज लाभत आहे. शेवटीं आमचे चुलत बंधु श्री. चिंतामणि गणेश सांखळकर यांच्या अकालीं निधनाचा एथें उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. त्यांनीं 'धर्मास' हरएक प्रकारें प्रोत्साहन दिलें होतें. छपाईच्या साजानें नटलेल्या या स्वरूपांत हें पुस्तक पाहण्यास ते वांचले नाहींत ही दुःखाची गोष्ट होय. ईश्वरी इच्छा ! ! 'धर्म' हें नांव आम्हांस सुचंण्यापूर्वी त्यांनीं या पुस्तकास 'साध्यसाधन' हें नांव सुचविलें होतें.

आतां धर्म म्हणजे काय याचा थोडासा विचार करूं. धर्माची सर्वमान्य अशी व्याख्या करणें जरी कठिण असलें, तरी धर्माच्या स्वरूपाचें दिग्दर्शन करणें

फारसें अवघड नाहीं. " ज्याच्या योगानें जगांत कसें वागावें हें. समजतें, ज्याच्या योगानें उत्कर्षाच्या समयींहि मनुष्य बेताल होत नाहीं, ज्याच्या योगानें काळजीच्या व संकटाच्या प्रसंगीं चित्ताचें समाधान होतें, ज्याच्या योगानें मनाची शांति व समता कायम रहाते, तोच धर्माचा मुख्य भाग होय " (जी. क. पृ. ३५७). यतोऽभ्युदयनिश्रेयसः सिद्धिः स धर्मः ।—' ज्याच्या योगानें ऐहिक व पारलौकिक उन्नति होत्ये तो धर्म ' अशी धर्माची व्याख्या आहे. अर्थात् " उत्कट भक्ति आणि त्याबरोबरच आमरणान्त ईश्वरार्पणपूर्वक निष्काम कर्म असें जें प्रवृत्तिपर भागवत धर्माचें लक्षण " (गी. र. पृ. ४३५), तेंच ' धर्मास ' मान्य आहे. " परलोकप्राप्तीकरितां आपण संसाराचा त्याग केला पाहिजे असें धर्माचें सांगणें नाहीं. इतकेंच नाहीं, तर ह्या जगांत राहून निरपेक्षबुद्धीनें आपलें नेमलेलें कर्तव्य करणें यालाच कर्मयोग असें नांव दिलें आहे; व इहलोकीं आणि परलोकीं सुख प्राप्त करून घेण्याचा हा उत्तम मार्ग आहे म्हणून भगवद्गीतेंत सांगितलें आहे " (जी. क. पृ. ३६४). कर्माचा पूर्ण त्याग करणें कधींहि शक्य नसल्यामुळें (गी. ३. ५.), "आपणांस शास्त्रतः प्राप्त झालेलीं कर्में केलींच पाहिजेत; पण तीं ' स्वतःचीं म्हणून न करितां परमेश्वराला स्मरून त्यानें निर्मिलेल्या जगाच्या संग्रहार्थ त्याचींच हीं कर्में होत या निर्मम बुद्धीनें करावीं, म्हणजे...या कर्मांनींच परमेश्वराची सेवा भक्ति किंवा उपासना घडून त्याचें पापपुण्य आपणास न लागतां अखेर पूर्ण सद्गति मिळत्ये ' " (गी. र. पृ. ४३५), हा गीतेचा सिद्धान्त ' धर्मास ' संमत आहे. कर्मफलाच्या ठायीं आसक्ति न ठेवतां, प्राप्त कार्यें केवळ कर्तव्य म्हणून ईश्वरार्पणबुद्धिनें करा या गीतेच्या उपदेशानुसारच तुकोबांचीहि शिकवण आहे. 'भोगांत गुंतूं नका म्हणजे आसक्त होऊं नका व त्यागांच्याहि भरीस पडूं नका'—मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि (गी. २. ४७), तर सर्व कांहीं ईश्वरास अर्पण करून मोकळे व्हा असेंच तुकोबांचेंहि सांगणें आहे (पृ. ६५)—

नको सांडूं अन्न नको सेवूं वन । चित्तीं नारायण सर्व भोगीं ॥ १ ॥
नको गुंतों भोगीं नको पडों त्यागीं । लावुनि सरें अंगीं देवाचिया ॥२॥

भागवत धर्माचें मुख्य तत्व म्हणजे आपल्या सर्व व्यवहारांस भगवंताचें अधिष्ठान असणें किंवा, दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर, आपले सर्व व्यवहार भगवदर्पणपूर्वक करणें हें होय. व तें अगदीं युक्तिसिद्धहि आहे. कारण ईश्वर हाच एक फक्त

सत्याचा सांठा असल्यामुळें, सत्याचा उगम ईश्वराव्यतिरिक्त अन्य कोठूनहि होणें शक्य नाहीं. अर्थात् आपल्या हातून सत्याचरण घडण्याचा मार्ग म्हणजे आपलीं सर्व कर्में ईश्वराला अर्पण करून निर्मम बुद्धीनें करणें हाच होय. स्वच्छ पाण्याच्या हौदांतून येणारें पाणी, मधली नळी निर्मळ असल्यास, जरी स्वच्छच असतें, त्याप्रमाणें भगवदर्पणपूर्वक निर्मम बुद्धीनें वागणाऱ्या मनुष्याच्या हातून घडणाऱ्या क्रिया भगवंताच्या क्रियांप्रमाणेंच सत्यस्वरूप असतात. कारण ' **भक्त भगवंतीं अनन्य : त्यासी बुद्धि देतो आपण** ' ॥ अशी स्थिति असल्यामुळें (दा. बो. १०. ७. ३०), **अनन्यभावानें** भगवंतास शरण जाऊन, तदर्पणपूर्वक सर्व क्रिया करणाऱ्या मनुष्याच्या मनांत होणारें स्फुरण भगवंतापासूनच उगम पावलेलें असतें; आणि भगवान् सत्यमय असल्यामुळें, भक्ताच्या मनांत उदित होणारें स्फुरण सत्य असेंच असणार. म्हणून आपल्या हातून सत्याचें आचरण होण्यासाठीं, सर्व कर्में ईश्वरार्पणबुद्धिनें केली पाहिजेत हें उघड आहे. या करितांच—

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥ १ ॥

' आपलें कर्तव्य कर्म फलाचे ठायीं आसक्ति न ठेवितां—म्हणजेच ईश्वरार्पणपूर्वक—नेहमीं करीत जा. कारण आसक्ति सोडून कर्म करीत असणाऱ्या पुरुषाला परमगति मिळत्ये ' असें गीतेंत सांगितलें असून (गी. ३.१९),

म्हणौनि जें जें उचित । आणि अवसरेंकरूनि प्राप्त ॥
तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ॥ ९ ॥

असा ज्ञानोबांचा उपदेश आहे (ज्ञा. ३.७८). त्याचप्रमाणें

उबगू न मनूनि अंतरीं । माझ्या प्रीतीं सर्व कर्मांतें करी ॥
जो फळाशेतें कंहीं न धरी । भक्तीचा अधिकारी तो जाणा ॥ १ ॥
सद्भावें करितां माझी भक्ती । तेणें ज्ञानखड्गाची होय प्राप्ती ॥
छेदोनि संसारआसक्ती । सायुज्यमुक्ती मद्भक्तां ॥ २ ॥
मजमाजीं रंगली चित्तवृत्ती । यालागीं विसरला गृहासक्ती ॥
त्यासी गृहाश्रमीं माझी प्राप्ती । सुखसंपत्ती निजबोधू ॥ ३ ॥

या ओव्यांत (ए. भा. ११. ६५६, १४. २६ व १७. ४३१), एकनाथमहाराजांनीं ' सर्व कर्में व कंटाळतां व फलाशा न धरतां प्रेमपुरःसर ईश्वरास अर्पण करून करतो

तोच भक्तोत्तम होय व अशा प्रकारें अनासक्तबुद्धीनें कर्में करीत असतांच मुक्ति प्राप्त होत्ये ' असें स्वच्छ सांगितलें असून, श्रीसमर्थांनींहि

रघुनाथ स्मरोनि कार्य करावें । तें तत्काळचि सिद्धी पावे ॥
कर्ता राम हें असावें । अभ्यांतरी ॥ १ ॥
कर्ता राम मी नव्हें आपण । ऐसें सगुणनिवेदन ॥
निर्गुणीं तें अनन्य । निर्गुणचि होइजे ॥ २ ॥

या ओंव्यांत (दा. बो. ६.७ ३३–३४), अन्य शब्दांत तोच उपदेश केला आहे. त्याचप्रमाणें 'प्राप्त कार्यें करीत असतां मन नेहमीं ईश्वराकडे ठेवा; सर्व कर्में त्याचींच असून आपण त्याच्याकरितां केवळ निमित्तमात्र आहों असा दृढ भाव अंतःकरणांत नेहमीं पूर्णपणें जागृत ठेवा; " सर्वस्वें आपुला भार त्याच्या माथां घालोनियां " काय करणें असेल तें करा ' असा तुकोबाप्रभृति संतांनीं सर्वांस उपदेश केला आहे (प्रपंचांत कसें वागावें ? पृ. २५९–६२). तसेंच

असशि तूं मम सन्निध सर्वदा । स्मरुनि वर्तन ठेविन हें सदा ॥
धरिन जो पथ मी करिं जी क्रिया । तवचि कारणिं ती नच माझिया ॥ १ ॥

या अमेरिकन संत थोरो याच्या वचनांत त्याच उपदेशाचा अनुवाद असून (जी. क. पृ. ३६७), श्री रामकृष्ण परमहंस यांनींहि तेंच सांगितलें आहे—" आयुष्य-नौकेंतील मनोरूपी होकायंत्राचा कांटा एकसारखा, न हालतां परब्रह्माकडे लागलेला असला म्हणजे त्याला कोणतेंहि भय नाहीं (रा. बो. व. ६१९). सारांश ' उचित आणि अवसरेंकरूनि प्राप्त ' अशीं कार्यें निःसंग किंवा निर्मम बुद्धीनें, ईश्वरार्पणपूर्वक, न कंटाळतां, धैर्यानें करीत राहणें, हाच मोक्षदृष्ट्या संसारांत वागण्याचा मार्ग असून, हा भक्तिपर कर्मयोगच या जगांतील मनुष्याच्या आचरणाचा सर्वांत श्रेष्ठ मार्ग असल्याचें भगवद्गीतेंत सांगितलें आहे (गी. ३.७; ५.२ व ६.४६). म्हणून आपल्या हातून याप्रयाणें आचरण घडण्यासाठीं आपण सदैव मनःपूर्वक प्रयत्न करीत राहिलें पाहिजे. जसजशी अहंकारवृत्ति किंवा ममत्व कमी होत जाईल व कर्मफलासक्ति सुटत जाईल, तसतशी या कर्मयोगाची माधुरी अधिकाधिक वाढत जात्ये, व कर्तव्य करण्यास उत्साह व जोम प्राप्त होऊन, मनास खरें सुख व खरी शान्ति यांचा लाभ होतो.

आतां धर्माची आवश्यकता, उपयोग व अभ्यास यांविषयीं थोडेसें लिहून पुरें करूं. पत्याच्या डावांत खेळण्यांत जर एखाद्याची चूक झाली तर मार्मिक खेळणारांस

त्याबद्दल मनस्वी संताप येतो. कारण डाव जिंकल्यामुळें कांहीं लाभ होत नाहीं किंवा हरल्यामुळें पदरचें कांहीं जात नाहीं हें जरी खरें, तरी पण खेळण्यांत चूक होतां नये. ज्याच्या अनकूल-प्रतिकूल परिणामावर आपली ऐहिक किंवा पारलौकिक उन्नति यत्किंचितहि अवलंबून नाहीं अशा पत्त्याच्या खेळांत चूक न होऊं देणें जर इतकें महत्त्वाचें आहे—इतकें कीं पत्ते कसे खेळावे या विषयावर ग्रंथ लिहिले गेले आहेत—तर लक्षचौऱ्यायशीं योनी हिंडतां हिंडतां अत्यंत दुर्मिळ अशा या मानवदेहाचा सुदैवानें लाभ झाला असतां,

मनुष्यदेहींचेनि ज्ञानें । साच्चिदानंदपदवी घेणें ॥

या एकनाथमहाराजाच्या सांगण्याप्रमाणें (ए. भा. ९.३३०), किंवा

याचि जन्में येणेंचि काळें । संसारीं होइंजे निराळें ॥
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ १ ॥

या श्रीसमर्थांच्या उपदेशाप्रमाणें (दा. बो. ६.९.२९), मनुष्यजन्माचें आत्यंतिक साध्य प्राप्त करून घेण्यासाठीं, जीवितामध्यें बिलकूल चूक न होऊं देतां सत्याचें आचरण करणें किती आवश्यक आहे बरें ? पण हें सत्य कळणार कसें ? व कळलें तरी त्याप्रमाणें आचरण व्हावें कसें ? या दोन्ही प्रश्नांस ' धर्मास मनोभावानें शरण गेल्यानें ' असें एकच उत्तर आहे. म्हणून धर्माचीं तत्त्वें हृदयांत पूर्णपणें बिंबवून घेणें हें प्रत्येक मनुष्याचें या जगांतील अत्यंत श्रेष्ठ व अत्यंत पवित्र असें कर्तव्य आहे. कारण हे धर्मसिद्धांत ' बुद्धींत उतरल्यावर मनांत बिंबून, हृदयांत ठसून हाडामासांत खिळून जातील ' (गी. र. पृ. २४५), तेव्हांच सर्व ठिकाणीं व सर्व स्थितींत आपल्या हातून तदनुसार अचूक वर्तन होईल. याकरितां धर्मवचनांचा नेहमीं **श्रद्धापूर्वक** पाठ, मनन व निदिध्यास असणें जरूर आहे. आध्यात्मिक पूर्णावस्थेस पोंचलेले तुकाराममहाराज यांनींहि हाच मार्ग चोखाळला होता असें

कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरेंकरूनियां ॥

या त्यांच्या आत्मचरित्रपर वचनावरून स्पष्ट होतें. पण एखाद्याच्या अंतःकरणांत श्रद्धा कमी असल्यामुळें गोडी लागत नाहीं म्हणून त्यानें धर्माचा मार्ग सोडून देण्याचें कारण नाहीं. कारण धर्मवचनांच्या नित्यसंघर्षणानें मनुष्याच्या हृदयांत श्रद्धेची ठिणगी पडून, मनन व निदिध्यास यांच्या वाऱ्यानें तींतून जाज्वल्य भक्तीची धगधगीत ज्योत उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. ज्यांच्या अंतःकरणांत

अशा प्रकारें एकनिष्ठ भाव बाणला ते धन्य धन्य त्रिवार धन्य होत ! ! त्यांनींच जन्मास आल्याचें सार्थक केलें. कारण त्यांच्या मनाची तळमळ शांत होऊन त्यांस खऱ्या खऱ्या सुखाचा लाभ होतो. ईश्वरावर ज्याचा एकनिष्ठ भाव आहे अशा मनुष्यास जें धैर्य,-जी निर्भयता, जो विश्वास व जी शांति प्राप्त होत्ये ती स्वानुभवानेंच जाणावी. ती सांगून कळवावयाची नाहीं. पण ही स्थिति प्राप्त होणें न होणें हें सर्वस्वी धर्मवचनांचा अभ्यास ज्या पद्धतीनें केला जाईल त्यावर अवलंबून राहील. सदर स्थिति प्राप्त व्हावयास पाहिजे असेल तर **मन एकाग्र करून,** वचनांतील सगळा अर्थ मनांत भरेल अशा तऱ्हेनें सावकाश घोळून घोळून, **सभक्त अंतःकरणानें** पठण झालें पाहिजे.

ठाव देईं चित्ता राखें पायांपाशीं । सकळ वृत्तीशीं अखंडित ॥

हें (पृ. ११४, ५.३) वाचतांना आपलें चित्त सकळ वृत्तींसह, एका क्षणाचाहि खंड मध्यें न पडतां, सदोदित देवाच्या पायांशीं बांधलें जावें अशी अत्युत्कट भावना रोमारोमांतून आत्यंतिक जोरानें सळसळली पाहिजे. त्याचप्रमाणें

उपासासेवटीं अन्नासवें भेटी । तैसी माझी मिठी पडो पायीं ॥ १ ॥
बहुत दिवस पुत्रा मातेसवें भेटी । तैसा दाटो पोटीं प्रीतीउभड ॥ २ ॥

हा अभंग (पृ. ११३, २), किंवा

न्यावयासी मूळ पाठवील कधीं । मज कृपानिधी पांडुरंग ॥ १ ॥
प्राण फुटे माझा त्याचिया वियोगें । घडी जाय युगें येकीयेकी ॥ २ ॥

ही तुकोबांची हृदयोक्ति (पृ. १०९, १३), अथवा

प्रेमसूत्र दोरी । नेतो तिकडे जातों हरी ॥
मना सहित वाचा काया । अवघें दिलें पंढरीराया ॥

हें वचन (पृ. १७७,४), वाचीत असतां त्यांत वर्णिल्याप्रमाणें अगदीं आपली स्थिति होऊन गेली पाहिजे. नाहीं तर, ' प्रेम सर्वांगाचे ठायीं । ' (पृ.१५२.३५.२), असें तोंडानें नुसतें म्हणावयाचें, पण हृदय बिलकूल हालावयाचें नाहीं, तें मुक्या गवतापेक्षांहि शुष्क असावयाचें; मग तोंडातून निघणाऱ्या आवाजांचा उपयोग काय ? अशा रीतीनें तोंडास श्रम देण्यापेक्षां फोनोग्राफ लावून ठेवणें काय वाईट ? तात्पर्य, धर्मवचनें—किंवा कोठलेंहि खरें काव्य—वाचीत असतां त्या त्या कवींच्या त्यावेळच्या हृदयस्थितीप्रमाणें आपल्या हृदयाची स्थिति झाली पाहिजे. या पद्धतीनें

संतवचनांचें नित्य नेमानें पठण करून, तीं आपल्या आचरणांत उतरविण्याचा म्हणजे तदनुसार वागण्याचा नेहमीं मनापासून प्रयत्न करीत असलें पाहिजे. 'कृपावंत किती। दीन बहु आवडती'। हें तुकोबांच्या अभंग-वाणींतून निघालेलें अभंग सत्य (पृ. १६२,२), जीवितामध्यें आपणांस नेहमीं ध्रुव ताऱ्याप्रमाणें असलें पाहिजे. तसेंच 'हेचि थोर भक्ति आवडते देवा' एथपासून 'देवभक्तपण। तुका म्हणे नाहीं भिन्न' एथपर्यंतचे अकरा अभंग (पृ. १७६-१७९) म्हणजे अकरा पायऱ्यांचा अभंग मोक्षसोपान आहे. ह्या पायऱ्या क्रमशः चढून जाऊन—त्यांतील भाव हृदयांत पूर्णपणें बाणून घेऊन—शेवटीं देवाशीं पूर्णपणें समरस होण्याचा मुमुक्षूनें नेहमीं प्रयत्न ठेविला पाहिजे. तसेंच—

१ जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती। चालविसी करीं धरूनियां॥
२ नामा म्हणे होसी भक्तीचा वल्लभ। मागें पुढें उभा सांभाळिसी॥
३ तुका म्हणे तया भार घातलिया। उपेक्षीना दयासिंधु माझा॥
४ तुका म्हणे हित कोणिये जातीचें। तुज ठावें साचें मायबापा॥
५ देवाचें जें मनोगत। तेंचि आपुलें हित निश्चित॥

यांसारख्या वचनांत (पृ. १६३, ५; १७६, ६; १६८, ९; ११३, १; व. पृ. ५८) ओतप्रोत भरलेला एकनिष्ठ दृढ भाव आपल्या अंगीं बाणण्यासाठीं व त्यांवर अंतःकरणाचा **पक्का** विश्वास बसून, विषयांच्या उसळणाऱ्या लाटांतून व सुखदुःखांच्या गरगर फिरणाऱ्या भोंवऱ्यांतून, जीवितार्चे सुकाणूं तदनुसार धरतां येण्यासाठीं मनास **खरीखुरी** तळमळ लागून राहिली पाहिजे. अशी तळमळ लागल्यावर भाव अंगीं बाणण्यास काय उशीर लागणार? इच्छाशक्तीची तीव्रता तितकी वाढली कीं फलप्राप्ति **तत्क्षणींच** झाली पाहिजे. परमेश्वर आपणास भेटत नाहीं यार्चे कारण झालें तरी त्याच्या प्राप्तीची आपणास **खरी** तळमळ लागलेली नसत्ये हेंच होय. आकंठ भोजन करून पोट जडावल्या वेळीं, जांभया देत देत, अर्धवट गुंगींत भक्तीच्या गोष्टी बोलून परमेश्वरप्राप्ति कशी व्हावी? यःकश्चित् लहानसहान गोष्ट साध्य करून घ्यावयाची असल्यास मन लावून किती श्रम करावे लागतात! मग जीवितांतील हा आत्यंतिक लाभ सहजासहजीं कसा प्राप्त व्हावा? तो जर व्हावयास पाहिजे असेल तर लौकिकाची लाज-भय-चिंता सोडून, कांहीं होवो—देह जावो अथवा राहो—मी भगवत्प्राप्ति करून घेणारच असा मनाचा अढळ निर्धार झाला पाहिजे. असा निर्धार झाला कीं त्या क्षणींच—अगदीं त्या **त्याच** क्षणीं—परमेश्वर पुढें उभा आहे म्हणून समजावे. मनाचा असा **खराखुरा** निर्धार मात्र, झाला पाहिजे. अस्तु. हृदयांत दृढ भाव

*

बाणें यापरता या जगांत लाभ नाहीं. म्हणूनच—

जळो ते जाणीव जळो ते शाहाणीव। राहो माझा भाव विठ्ठलपायीं ॥१॥
जळो तो आचार जळो तो विचार। राहो मन स्थिर विठ्ठलपायीं ॥ २ ॥

असें तुकोबांनीं भगवंताशीं सर्वज्ञानविज्ञानपरित्यागपूर्वक अखेरचें मागणें मागितलें आहे. (पृ. ८०, १२).

' धर्मनिष्ठ लोक कांहीं तरी अद्वितीय सत्य सुखाचा उपभोग घेत असतात; तें सुख जगाच्या क्षणभंगुर वैभवांत व पोकळ भपक्यांत कधींहि मिळणें शक्य नाहीं ' असें एका इंग्रज ग्रन्थकारानें म्हटलें असून, या अनुपम सुखाची यथार्थ कल्पना प्रत्यक्ष अनुभवाशिवाय येणें शक्य नाहीं असें कित्येक धर्मनिष्ठ अधिकारी पुरुष स्वानुभवपूर्वक सांगत आहेत. ' धर्माखेरीज सुखशांती नाहीं, म्हणून कांहीं झालें तरी धर्म सोडूं नये, ' हा सिद्धान्त आमच्या शास्त्रकारांनींहि अनेक ठिकाणीं सांगितला आहे. वाग्भट म्हणतो—

सुखार्थाः सर्वभूतानां मताः सर्वाः प्रवृत्तयः।
सुखं च न विना धर्मात्तस्माद्धर्मपरोभवेत् ॥

' सुखासाठींच मनुष्यमात्राची धडपड चालू असत्ये; आणि सुख तर धर्माव्यतिरिक्त कोठेंच नाहीं; म्हणून मनुष्यानें धर्मपरायण बनावें ' (सूत्रस्थान २.२०). तसेंच—

न जातु कामान्न भयान्न लोभाद्धर्मं त्यजेज्जीवितस्यापि हेतोः।

' कामामुळें, भयामुळें किंवा लोभामुळें–फार काय ? प्रत्यक्ष जिवितासाठीं देखील धर्म सोडूं नये ' (म. भा. उद्योग. ४०.१२), ही सर्वश्रेष्ठ अशी पुण्यकारक गोष्ट असल्याचें विदुरानें धर्ममूढ झालेल्या धृतराष्ट्रास सांगितलें असून,—

नाहं कामान्न संरम्भान्न द्वेषान्नार्थकारणात्।
न हेतुवादाल्लोभाद्वा धर्मं जह्यां कथंचन ॥ १ ॥

या श्रीकृष्णांच्या वचनांत (उद्योग. ९१.२५), त्याचाच अनुवाद सणसणीतपणें केलेला आहे. उलट पक्षीं ' आपल्यास कितीहि दुःख झालें तरी धर्मोकरितां प्राणांहूनहि प्रिय वस्तूचा त्याग केला पाहिजे ' (श्रीरामचरित्र पृ. २७१), या सत्याचा, आपली प्रिय पत्नी सीता इचा व शेवटीं प्रिय बंधु लक्ष्मण याचा त्याग करून, प्रभु रामचंद्रांनीं स्वोदाहरणपूर्वक सर्व जगास बोध केला आहे (रामायण, उत्तरकांड अ. ४५ व १०६) त्याप्रमाणें धर्माची सर्वश्रेष्ठता सांगतांना—

कामार्थौ लिप्समानस्तु धर्ममेवादितश्चरेत्।
न हि धर्मादपेत्यर्थः कामो वाऽपि कदाचन ॥

'अर्थ किंवा काम यांची ज्यास इच्छा असेल त्यानें प्रथमतः धर्माचेंच आचरण करावें; कारण अर्थ झाला किंवा काम झाला तरी तो धर्मास सोडून कधींच असत नाहीं' (म. भा. उद्योग. १२४.३७), असा श्रीकृष्णांनीं शिष्टाईच्या वेळीं दुर्योधनास उपदेश केला असून,—

धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः किं न सेव्यते ।

'धर्मापासूनच अर्थ व काम यांची प्राप्ति होते; (तर) असला धर्म तुम्हीं कां आचरीत नाहीं ? ' असा महाभारताच्या शेवटीं व्यासांनीं धर्माविषयीं उदासीन असणाऱ्या जगास प्रश्न टाकून, धर्माचरण करण्याविषयीं मोठ्या कळकळीनें सांगितलें आहे (स्वर्गारोहण ५.७५). उलट पक्षीं—

परित्यजेदर्थकामौ यौ स्यातां धर्मवर्जितौ ।

'अर्थ आणि काम हे जर धर्मविरुद्ध असतील तर त्यांचा त्याग करावा ' असें मनुस्मृतींत म्हटलें आहे (म. स्मृ. ४.१७६).

मोक्षाकरितां किंवा परमार्थाकरितांच केवळ धर्माचरण अवश्य आहे असें नसून, इहलोकीं सुख व यश मिळण्यासाठीं आपलें प्रत्येक कृत्य धर्मास अनुसरून असलें पाहिजे; कारण **'यतो धर्मस्ततो जयः'**—जिकडे धर्म तिकडे जय हें ठरलेलेंच असून, सगळ्या महाभारताचें हेंच सार आहे. कारण आपल्या ऐहिक व्यवहारांस धर्माचें अधिष्ठान असेल तरच ते करण्यास लागणारा उत्साह, धैर्य व जोम हीं आपणांस प्राप्त होतील व आपलीं कार्यें यशस्वीपणें शेवटास नेतां येतील. सारांश, धर्म ही कामधंदा, करून फुरसतीच्या वेळीं करमणुकीसाठीं चाळण्याची, किंवा संसार करून वृद्धपणीं लक्ष देण्याची गोष्ट नव्हे. तर चालणें-बोलणें, उद्योगधंदा करणें इत्यादि आपल्या सर्व व्यापारांत धर्म असला पाहिजे. " धर्माचरण ही आपल्या इतर व्यवसायांपासून अलग अशी एक स्वतंत्र गोष्ट आहे, व नियमित वेळीं तिची कवाइत केली म्हणजे आपलें कर्तव्य झालें असें समजूं नये. धर्माचा आमच्या सर्व व्यवसायांशीं निकट संबंध आहे. आपल्या प्रत्येक आचाराच्या व विचाराच्या मूळाशीं धर्म असला पाहिजे व त्यापासून त्यास इष्ट प्रेरणा आणि वळण हीं मिळालीं पाहिजेत " (जी. क. पृ. ३५७-३५८).

जीवितामध्यें पहिली आवश्यक गोष्ट—जीविताचें केवळ जीवित अशी म्हटली म्हणजे धर्म हीच होय. भवसागरांतील तुफानी वादळाच्या भोंवऱ्यांत सांपडून मनुष्य वारंवार दिङ्मूढ होतो, तेव्हां जीविताचें सुकाणूं कोणत्या दिशेला धरावें हें कळण्यास धर्मतत्त्वें हेंच एक होकायंत्र आहे. म्हणून ज्याला या भरलेल्या पुरांतून सुर-

क्षितपणें मार्ग आक्रमण करून पर तीर गांठणें असेल, त्यानें धर्माचीच कांस धरली पाहिजे. याच कारणास्तव बिभीषणाच्या तपानें ब्रह्मदेव प्रसन्न होऊन त्यास 'वर माग' असें म्हणाले, तेव्हां आपला भाऊ दशग्रीव याच्याप्रमाणें अमरत्व वगैरे कांहीं न मागतां—

परमापद्गतस्यापि धर्मे मम मतिर्भवेत् ॥ १ ॥
या या मे जायते बुद्धिर्येषु येष्वाश्रमेषु च ।
सा सा भवतु धर्मिष्ठा तं तु धर्मं च पालये ॥ २
एष मे परमोदारः वरः परमको मतः ।

' माझ्यावर केवढेंहि संकट कोसळलें तरी माझी बुद्धि धर्मापासून ढळूं नये; मला होणारी प्रत्येक वासना धर्मिष्ठ म्हणजे धर्मानुसार असावी व तदनुसार माझ्याहातून **आचरण घडावें**; यापेक्षां मला कांहीं नको,' असें त्यानें मागणें मागितलें (रामायण, उत्तरकांड १०.३१-३३). म्हणून आमच्या शास्त्रकारांनीं सांगितल्याप्रमाणें मृत्यूनें शेंडीस हात घातला आहे असें समजून, आत्महितेच्छु मनुष्यानें क्षणाचाहि विलंब न करितां, ताबडतोब धर्माचरण करण्यास सुरुवात केली पाहिजे. सर्व मनुष्यें धर्मपरायण बनणें यापलीकडे या जगाविषयीं कोणाची झाली तरी अधिक अपेक्षा ती काय असणार ? कारण सर्व मनुष्यांचीं मनें धर्मनिष्ठ झालीं म्हणजे—

कर्मणा मनसा वाचा यत्नाद्धर्मं समाचरेत् ।

कृति, मन व वाणी यांहींकरून प्रयत्नपूर्वक धर्माचें आचरण करीत असावें, ' असें जें याज्ञवल्क्यस्मृतींत सांगितलें आहे (या. स्मृ. १.१५६), तें धर्माचरण अयत्नतःच होऊन जिकडे तिकडे धर्माचें पूर्ण साम्राज्य होईल व ' चतुष्पात्सकलो धर्मः ' असें सत्ययुग (म. स्मृ. १.८१) प्रस्थापित होईल. म्हणून ज्या सर्वसत्ताधीश प्रभूच्या आज्ञेशिवाय या सृष्टींतील एक पानहि हालत नाहीं त्याची—

धर्मीं जडो मति सदा सकलां जनांची ।

अशी प्रार्थना करून व—

...न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें ॥
करूनि घ्यावें हें तुमतें । विनवीत असें ॥ १ ॥

एवढें (ज्ञा. १.८०) शेवटीं वाचकांपाशीं मागून ही बरीच लांबलेली प्रस्तावना पुरी करतों.

कानजी खेतसी भाटिया चाळ;
कांदेवाडी, मुंबई नं. ४.
गुढी पाडवा शके १८४५.

दिनकर सीताराम सांखळकर.

विषयानुक्रमणिका.

खंड १ ला.

विषय.					पृष्ठें.
१ प्रातःस्मरण.	...	...	...	...	१
२ भूपाळ्या.	...	...	...	...	३
३ स्तोत्रें.	...	...	...	...	१२
४ विविध मंत्र.	...	...	...	...	१७
५ पाळणे.	...	...	...	...	१८
६ आरत्या.	...	...	...	...	२०
७ भजनें.	...	...	...	...	३३

खंड २ रा.

प्रकरण १ लें—देव.	...	...	...	३५–५७.
भाग १ ला—ईशस्तवन.	...	...	...	३५
भाग २ रा—देव कसा आहे?	...	...	...	३९
भाग ३ रा—देव कोठें आहे?	...	...	...	४४
भाग ४ था—देवच कर्ता करविता.		...	...	४७
भाग ५ वा—कोणत्या देवाची भक्ति करावी?			...	५०
भाग ६ वा—भक्ति कशी करावी?		...	...	५४
प्रकरण २ रें—भक्ति.	...	...	...	५८–१८१.
भाग १ ला—ईश्वर करतो तेंच आपल्या हिताचें असतें.				५८
भाग २ रा—भक्तिच सर्वश्रेष्ठ.		...	...	६२
भाग ३ रा—भाव.	...	...	...	७८
भाग ४ था—प्रेम.	...	...	...	९६
भाग ५ वा—देव भेटण्याकरितां तळमळ.		...	...	१०५
भाग ६ वा—भाव बाणण्याकरितां तळमळ.		...	...	११३
भाग ७ वा—करुणा.	...	...	...	१२१
भाग ८ वा—देववेडेपणा.	...	...	...	१४१

विषय.	पृष्ठें.
भाग ९ वा—देव भेटल्यानंतर किंवा भाव बाणल्यानंतर. ...	१४४
भाग १० वा—भक्तसामर्थ्य.	१५६
भाग ११ वा—भक्तसांभाळ.	१६०
भाग १२ वा—भक्ताची काळजी देवास.	१६२
भाग १३ वा—देव-भक्त-संबंध.	१७१
प्रकरण ३ रें—नामसंकीर्तन.	१८२–२०४.
भाग १ ला—नाममाहात्म्य.	१८२
भाग २ रा—नामसामर्थ्य.	१९३
भाग ३ रा—नाम केव्हां ध्यावें ?	१९९
भाग ४ था—नाम हेंच सर्वस्व.	२०१
भाग ५ वा—ध्यानप्रकर्ष.	२०३
प्रकरण ४ थें—संत.	२०५–२५५.
भाग १ ला—संतलक्षण.	२०५
भाग २ रा—संतमाहात्म्य.	२३८
भाग ३ रा—संतपूजा.	२४३
भाग ४ था—संतनिंदा.	२४८
भाग ५ वा—गुरु.	२४९
प्रकरण ५ वें—प्रपंच आणि परमार्थ.	२५६–३५६.
भाग १ ला—प्रपंच.	२५६
भाग २ रा—इन्द्रियें.	२९७
भाग ३ रा—सुखदुःखविवेक.	३११
भाग ४ था—प्रपंचवर्णन आणि परमार्थसाधन. ...	३४२
मागणें.	३५७
विज्ञप्ति.	३६२
प्रार्थना.	३६३

या पुस्तकांतील संक्षिप्त चिह्नांचा खुलासा.

सूचना—बृहदारण्यक, छांदोग्य, मुंडक, ईशावास्य, श्वेताश्वतर इत्यादि उपनिषदांच्या नांवाचे, प्रारंभींच्या एक किंवा दोन अक्षरांनीं लिहिलेले संक्षेप, तसेंच अध्याय, पृष्ठ इत्यादिकांचे संक्षेप सहज लक्ष्यांत येण्यासारखे असल्यामुळें, खालील यादींत दिले नाहींत. ग्रंथांच्या नांवांनंतरचे आंकडे—अध्याय, खंड, मंत्र; किंवा, वल्ली, अनुवाक, मंत्र; स्कंध, अध्याय, श्लोक; अध्याय, श्लोक; अभंग, चरण; अंक, प्रवेश इत्यादि, ग्रंथांच्या भाग-पोटभागांचे आहेत.

ए. भा.–एकनाथी भागवत.
केका–मोरोपंतकृत केकावली.
गा.–तुकोबांची गाथा. निर्णयसागर प्रत सन १९१२. निर्णयसागरच्या इतर प्रतींत 'धर्मांत' निर्दिष्ट केलेले अभंग जरा मागेंपुढें सांपडतील.
गी.–गीता.
गी. अं.–रवीन्द्रनाथ टागोरकृत गीतांजलि.
गी. र.–गीतारहस्य.
जी. क.–द. ना. नाबरकृत जीवितकर्तव्य.
जै. अ.–श्रीधरकृत जैमिनि अश्वमेध.
जो. गा.–विष्णुबुवा जोगकृत तुकोबांची गाथा.
तु.–तुकाराम.
दा. बो.–दासबोध.
न.–नवनीत
ना. सु.–वामनपंडितकृत नामसुधा.
प्रदीप.–पांगारकरकृत भक्तिमार्गप्रदीप.
भर्तृ.–भर्तृहरि. २=नीतिशतक. ३=वैराग्यशतक.
भ. वि.–महीपतीकृत भक्तिविजय.
भाग.–भागवत.
म. भा.–महाभारत. निरनिराळ्या पर्वांचे संक्षेप सहज समजण्यासारखे आहेत.
मं. वि.–मंडलीककृत विवेकानंद.
म. स्मृ.–मनुस्मृति.
रा. ती.–फडके-बर्वेकृत रामतीर्थ.
रा. बो. व.–गुणाजीकृत श्रीरामकृष्णांचीं बोधवचनें.
वा.–वामन.
वे. सू.–वेदान्त सूत्रें.
ज्ञा.–ज्ञानेश्वरी.

वाचकांस विनंति.

मिराबाई एका पदांत म्हणते, "पाण्यांत उभें राहून मुक्ति मिळत असती, तर जलचरांना ती मिळाली असती; फलाहारानें मुक्ति प्राप्त होती, तर ती माकडांना मिळती; तृण भक्षून मोक्ष मिळता, तर मृगादिकांस मिळाला असता; पण हें सर्व खोटें आहे; देवाची निष्ठापूर्वक भक्ति हेंच मुक्तीचें साधन होय !"

हें पद कोणास मिळाल्यास आम्हांस लिहून पाठविण्याची कृपा करावी.

शुद्धिपत्र.

छापतांना कांहीं ठिकाणीं काना, मात्रा, वेलांटी, अनुस्त्रार वगैरे चिह्नें नीट उठलीं नाहींत, मोडलीं किंवा बाजूस सरकलीं आहेत. अशा प्रकारचीं अशुद्धें सर्वच प्रतींत सारखीं होत नसल्यामुळें, व तीं सहज लक्ष्यांत येण्यासारखीं असल्यामुळें, त्यांचा खालील यादींत समावेश केला नाहीं. तसेंच छापतांना कांहीं अक्षरांवर (उदाहरणार्थ, गुंण, पृ.२२१, ओळ ३) अनुस्त्रारासारखी पण गोलट खूण उठत्ये, तो अनुस्त्रार नव्हे हें सहज लक्ष्यांत येईल. त्याचप्रमाणें कांहीं ठिकाणची अवतरणनिदर्शक रेघ चुकीनें काढून टाकली गेली आहे. उदाहरणार्थ, 'श्रीसमर्थांनीं ' (पृ. ३२०, ओळ २) हें 'श्रीसमर्थांनी—' असें पाहिजे. ह्या सर्व व आमच्या नजरेस न आलेल्या इतर चुका पुस्तक उपयोगण्यापूर्वी दुरुस्त करून घ्याव्या अशी विनंति आहे.

पृष्ठ.	ओळ	अशुद्ध.	शुद्ध.
६५	२६	२१८	२९८
७२	१६	आत्मास्थिति भाव	आत्मस्थितिभाव
९६	६	नये	न ये
१३४	९	भज	मज
१३५	२१	अम्ही	आम्ही
१६३	१८	दासीं नारायणा	दासां नारायण
१६३	२०	दासीं	दासां
१८४	२०	नामापुरतें	नामापरतें
१८८	६	नाम महिमा	नाममहिमा
१९५	१०	कामरी	कामारी
१९९	१३	माध्यानकाळीं	माध्यानकाळीं
२१९	२०	२८ वा	२७ वा
२२१	२५	दुऱ्यासच्या	दुसऱ्याच्या
२२५	४	४७	४६
२३१	२५	पोटासाठीं अवघें	अवघें पोटासाठीं
२४३	२४	संतमारगीं	संत मारगीं
२६९	२७	११ वा	८ वा
३१४	१९	' विद्याय... ' (इशा.	' विद्यया... ' (ईशा.
३३०	७	एको	निःस्वो.

कोणाचें मनोगत (पृ. २९०, ३२) या ओंवीचा मूळ उल्लेख—दा.बो.१९.४.४.

ॐ तत्सत् ।

धर्म.

खंड १ ला.

श्रीगणेशाय नमः ।

१ प्रातःस्मरण.

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटिसमप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥ १ ॥
गणनाथ-सरस्वती-रवि-शुक्र-बृहस्पतीन् ।
पंचैतान्संस्मरेन्नित्यं वेदवाणीप्रवृत्तये ॥ २ ॥
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात्परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ३ ॥
या कुंदेन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वंदिता
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥ ४ ॥
यं ब्रह्मा वरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवै–
र्वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ।
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो
यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥ ५ ॥
शांताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगं ।

लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं
वंदे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥ ६ ॥
मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिं ।
यत्कृपा तमहं वंदे परमानंद-माधवम् ॥ ७ ॥
हे जिह्वे रससारज्ञे सर्वदा मधुरप्रिये ।
नारायणाख्यपीयूषं पिब जिह्वे निरंतरम् ॥ ८ ॥
पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः ।
पुण्यश्लोको विदेहश्च पुण्यश्लोको जनार्दनः ॥ ९ ॥
कर्कोटकस्य नागस्य दमयन्त्या नलस्य च ।
ऋतुपर्णस्य राजर्षेः कीर्तनं कलिनाशनम् ॥ १० ॥
अश्वत्थामा बलिर्व्यासो हनूमांश्च बिभीषणः ।
कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः ॥ ११ ॥
सप्तैतान्संस्मरेन्नित्यं मार्कण्डेयं तथाष्टमम् ।
जीवेद्वर्षशतं साग्रमपमृत्युविवर्जितः ॥ १२ ॥
बलिर्विभीषणो भीष्मः प्रह्लादो नारदो ध्रुवः ।
षडेते वैष्णवास्तेषां स्मरणं पापनाशनम् ॥ १३ ॥
अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा ।
पंचकं ना स्मरेन्नित्यं महापातकनाशनम् ॥ १४ ॥
अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ॥ १५ ॥
अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेतवाहनः ।
बीभत्सुर्विजयी कृष्णः सव्यसाची धनंजयः ॥ १६ ॥
नमो ब्रह्मण्यदेवाय गोब्राह्मणहिताय च ।
जगद्धिताय कृष्णाय गोविन्दाय नमो नमः ॥ १७ ॥

कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने ।
प्रणतक्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः ॥ १८ ॥
वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥ १९ ॥
पृथ्वी सगंधा सरसास्तथापः स्पर्शी च वायुर्ज्वलनः सतेजाः ।
नभः सशब्दं महता सहैते कुर्वन्तु सर्वे मम सुप्रभातम् ॥ २० ॥
ब्रह्मा मुरारिस्त्रिपुरांतकारी भानुः शशी भूमिसुतो बुधश्च ।
गुरुश्च शुक्रः शनिराहुकेतवः कुर्वन्तु सर्वे मम सुप्रभातम् ॥ २१ ॥
उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविन्द उत्तिष्ठ गरुडध्वज ।
उत्तिष्ठ कमलाकांत उत्तिष्ठ मंगलं कुरु ॥ २२ ॥
पलायध्वं पलायध्वं रे रे दानवराक्षसाः ।
धर्मसंस्थापनार्थाय रथारूढो स्वयं हरिः ॥ २३ ॥

---

२ भूपाळ्या.

१ भूपाळी गणपतीची.

उठा उठा हो सकळिक वाचे स्मरा गजमुख ।
ऋद्धिसिद्धींचा नायक सुखदायक सकळांसी ॥ ध्रु० ॥
अंगीं शेंदुराची उटी, माथां शोभतसे कीरिटी ।
केशरकस्तूरी लल्लाटीं, कंठीं हार साजिरा ॥ १ ॥
कानीं कुंडलांची प्रभा, चंद्र सूर्य जैसी नभा ।
माजीं नागबंदी शोभा, स्मरतां उभा जवळी तो ॥ २ ॥
कांसे पितांबराची धटी, हातीं मोदकाची वाटी ।
रामानंद स्मरतां कंठीं, तो संकटीं पावतो ॥ ३ ॥

२ भूपाळी गणपतीची.

उठा उठा सकळ जन । वाचे स्मरा गजानन ।
गौरीहराचा नंदन । गजवदन गणपती ॥ ध्रु० ॥
ध्यानीं आणोनी सुखमूर्ती । स्तवन करा एके चित्तीं ।
तो देईल ज्ञानमूर्ती । मोक्षसुख सोज्वळ ॥ १ ॥
जो निजभक्तांचा दाता । वंद्य सुरवरां समस्तां ।
त्यासी ध्यातां भवभयचिंता । विघ्नवार्ता निवारी ॥ २ ॥
तो हा सुखाचा सागर । श्रीगणराज मोरेश्वर ।
भावें विनवीतो गिरिधर । भक्त त्याचा होऊनी ॥ ३ ॥

३ भूपाळी रामाची.

उठोनियां प्रातःकाळीं । जपा रामनामावळी ।
स्वयें ध्यातो चंद्रमौळी । शैलबाळीसमवेत ॥ ध्रु० ॥
राम योग्यांचें मंडन । राम भक्तांचें भूषण ।
राम धर्माचें रक्षण । संरक्षण दासाचें ॥ १ ॥
रामें ताटिका मारिली । रामें शिळा उद्धरिली ।
रामें जानकी पर्णिली । गणिका केली ते मुक्त ॥ २ ॥
रामें पाषाण तारिले । रामें दैत्य संहारिले ।
रामें बंदी सोडविले । मुक्त केले सुरवर ॥ ३ ॥
रामें रक्षिलें भक्तांसी । रामें सोडविलें देवांसी ।
राम दासाचे मानसीं । रामदासीं आनंद ॥ ४ ॥

४ प्रभाती रामाची.

जागिये रघुनाथकुंवर । पक्षी बन बोले ॥ टेक ॥
चंद्रकिरण शीतल भई । चकई पियमिलन गई ।
त्रिविध मंद चलत पवनी । पल्लव-द्रुम डोले ॥ १ ॥

प्रातभानु प्रकट भयो । रजनीको तिमिर गयो ।
भृंग करित गुंजगान । कमलवदन खोले ॥ २ ॥
ब्रह्मादिक धरत ध्यान । सुरनर मुनि करत गान ।
जागनकी बेर भई । नयनपलक खोले ॥ ३ ॥
तुलसिदास अतिअनंद । निरखि कै मुखारविंद ।
दीननको देत दान । भूषण बहु मोले ॥ ४ ॥

५ प्रभाती रामाची.

जागिये कृपानिधान ग्यानराय रामचंद
जननि कहे बार बार भोर भयो प्यारे ॥
रांजिवलोचन विशाल पीत-वापिका-मराल
ललित वदनकमल उपर मदन कोटि वारे ॥
अरुण उदित विगतं शर्वरी शशांककिरन हीन दीन ।
दीपज्योति मलिन द्युतिसमूह तारे ॥
मनोज्ञान घनप्रकाश बीते सब भवविलास
आश त्रास तिमिर तोष तरनि तेज जारे ॥
बोलत खगनिकर मुखर मधुर कर प्रतीत सुनो
श्रवण प्राण जीवन धन मेरे तुम बारे ॥
मनोवेद बंदी मुनिवृंद सूतमागधादि
विरद वदत जयजयजय जयति कैटभारे ॥
विकसित कमलावली चले प्रपुंज चंचरीक
गुंजत कल मोकल धुनि त्याग कंजन्यारे ॥
मनोविराग पाय सकल शोककूप गृह विहाय
भृत्य प्रेममत्त फिरत गुणत गुण तिहारे ॥

सुनत बचन प्रिय रसाल जागे अतिशय दयाल
भागे जंजाल विपुल दुःखकदंब टारे ॥
तुलसिदास अति आनंद देखके मुखारविंद ।
छूटे भ्रम फंद परम मंद द्वंद्वभारे ॥ १ ॥

६ भूपाळी कृष्णाची.

जाग रे जाग बापा । विश्वपालका कृष्णा ।
दीन आम्ही उभे द्वारीं । आमची बोळवीं तृष्णा ॥ ध्रु० ॥
त्रासलों प्रपंचीं या । बहु कष्टलों भारी ।
म्हणउनि शरण आलों । विभो तुझिया द्वारीं ॥ १ ॥
सांग बा न्यून काय । हरि तुझिया भांडारीं ।
याचक भीक मागे । प्रेम देईं झडकरी ॥ २ ॥
गुरुकृपे उदयो झाला । हरि उदया आला ।
सुख तें काय सांगूं । जिवलग भेटला ॥ ३ ॥
श्रीगुरुनाथराय । कृपासिंधु गोविंदा ।
देवनाथ प्रार्थिताहे । प्रभुपदारविंदा ॥ ४ ॥

७ भूपाळी कृष्णाची.

ऊठिं गोपालजी जाय धेनूंकडे । पाहती सौंगडे वाट तूझी ॥ ध्रु० ॥
लोपली हे निशी मंद झाला शशी । मुनिजन मानसीं ध्याति तुजला॥१॥
भानु-उदयाचळीं तेज पुंजाळलें । विकसती कमळें जळामाजीं ॥ २ ॥
धेनुवत्सें तुला बाहती माधवा । ऊठिंगा यादवा उशिर झाला ॥ ३ ॥
ऊठ पुरुषोत्तमा वाट पाहे रमा । दाविं मुखचंद्रमा सकळिकांसी ॥ ४ ॥
कनकपात्रांतरीं दीपरत्नें बरीं । ओंवाळिती सुंदरी तूजलागीं ॥ ५ ॥
जन्मजन्मांतरीं दास होऊं हरी । बोलती वैखरी भक्त तूझे ॥ ६ ॥
कृष्ण केशव करीं चरणांबुज धरी । ऊठ गा श्रीहरी मायबापा ॥ ७ ॥

भूपाळी कृष्णाची.

घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला ।
उठिं लवकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ ध्रु० ॥
सायंकाळीं एके मेळीं द्विजगण अवघे वृक्षीं ॥
अरुणोदय होतांचि उडाले चरावया पक्षी ॥
अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरणदक्षी ।
प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी ॥
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं ।
यमुनाजळासी जाति मुकुंदा दध्योदन भक्षीं ॥
चाल ॥ मुक्तता होऊं पाहे । कमळिणीपासुनियां भ्रमरा ।
पूर्वदिशे मुख धुतलें होतसे नाश तिमिरा ॥
उठिं लवकरि गोविंदा सांवळ्या नंदकुमरा ॥
मुखप्रक्षालन करीं अंगिकारीं भाकरकाला ॥ १ ॥

घरोघरीं दीप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती ।
गीत गाती सप्रेमें गोपी सदना येती जाती ॥
प्रवर्तोनि गृहकामीं रंगावळि घालूं पाहती ।
आनंदकंदा प्रभात झाली उठ सरली राती ॥
काढीं धार क्षीरपात्रें घेउनी धेनू हंबरती ।
दारीं उभे गोपाळ तुजला हांक मारुनि बाहती ॥
हे सुमनहार कंठीं । घालिं या गुंजमाळा ।
हातीं वेत्रकाष्ठ बरवें । कांबळा घेइं काळा ॥
ममात्मजा मधुसूदना । हृषीकेशि जगत्पाळा ।
लक्षितांति वासरें हरी धेनुस्तनपानाला ॥ २ ॥

प्रातःस्नानें करुनि गोपिका अलंकार नटती ।
कुंकुमादि चर्चुनी मंथनालागिं आरंभिती ॥
प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावळि गाती ।
अर्घ्यदान देउनियां द्विजजन देवार्चन करिती ॥
नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णुपूजा समर्पिती ॥
स्मार्त शिवार्चनसक्त शक्तितें शाक्त आराधिती ।
ऋषिगण आश्रमवासी । जे निरंजनीं धाले ।
अरुणोदयकालीं आपुलाले । ध्यानिं मग्न झाले ॥
पंचपंचउषःकाळीं । रविचक्र निघों आलें ।
एवढा वेळ निजलासि म्हणुनि हरि कळेल नंदाला ॥ ३ ॥
विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपार्यीं ।
अध्यापन गुरु करिति शिष्यही अध्ययना उदयीं ॥
याज्ञिक जन कुंडांत आहुती टाकिताति पाहीं ।
रविप्रभा पडुनियां उजळल्या शुद्ध दिशा दाही ॥
हे माझे पाडसे सांवळे उठिं कृष्णाबाई ।
सिद्ध सर्वे बळिराम घेउनी गोधनें वना जाईं ॥
मुनिजनमानसहंसा । गोपीमनःकमलभृंगा ।
मुरहर पंकजपाणी । पद्मनाभ श्रीरंगा ।
शकटांतक सर्वेशा । हे हरि प्रतापतुंगा ।
कोटिरवींहुनि तेज आगळें तुझिया वदनाला ।
होनाजी–बाळा नित्य ध्यातसे हृदयिं नाममाळा ॥ ४ ॥

९ भूपाळी श्रीविठ्ठलाची.

उठिं उठिं बा पुरुषोत्तमा । भक्तकामकल्पद्रुमा ।
आत्मारामा निजसुखधामा । मेघश्यामा श्रीकृष्णा॥ ध्रु० ॥

---

१ होनाजी गवळी व बाळा शिंपी या दोघांनीं मिळून ही भूपाळी रचली आहे.

भक्तमंडळी महाद्वारीं । उभी तिष्ठत श्रीहरी ।
जोडोनियां दोन्ही करीं । तुज मुरारी पहावया ॥ १ ॥

संत सनकादिक नारद । व्यास वाल्मिक ध्रुव प्रह्लाद ।
पार्थ पराशर रुक्मांगद । हनुमान अंगद बळिराज ॥ २ ॥

झाला प्रातःकाळ पूर्ण । करीं पंचांगश्रवण ।
आला मुद्गलमट ब्राह्मण । आशीर्वचन घे त्याचें ॥ ३ ॥

तुझा नामदेव शिंपी । घेउनि आला आंगी टोपी ।
आतां जाऊं नको बा झोंपीं । दर्शन देईं निजभक्तां ॥ ४ ॥

नानापरीचे अळंकार । घेऊनि आला नरहरीसोनार ।
आला रोहिदास चांभार । जोडा घेउनि तुजलागीं ॥ ५ ॥

सुगंधसुमनें पुष्पांजुळी । घेउनि आला सांवतामाळी ।
म्हणे श्रीहरिपदकमळीं । अनन्यभावें समर्पूं ॥ ६ ॥

कान्हूपात्रा नृत्य करी । टाळछंदें साक्षात्कारी ।
सेना न्हावी दर्पण करीं । घेउनि उभा राहिला ॥ ७ ॥

लिंबुर-हुरडा घेउनि आला । तो हा माणकोजी बोधला ।
दर्शन द्यावें बा त्याजला । भक्त भोळा म्हणऊनी ॥ ८ ॥

मिराबाई तुझेसाठीं । दूध-तुपें भरुनी वाटी ।
तुझे लावावया ओंठीं । लक्ष लावुनि बैसली ॥ ९ ॥

नामदेवाची जनी दासी । घेउनि आली तेलतुपासी ।
तुज न्हाऊं घालण्यासी । उभी ठेली महाद्वारीं ॥ १० ॥

गुळखोबरें भरुनी गोणी । घेउनि आला तुकया वाणी ।
वह्या राखिल्या कोरड्या पाणीं । भिजों दिल्या नाहीं त्वां ॥ ११ ॥

आला चोखामेळा महार । स्वामी करीतसे जोहार ।
त्याचा करोनियां उद्धार । संतमेळीं स्थापिला ॥ १२ ॥

हरिभजनाविण वायां गेले । ते नरदेहीं बैल झाले ।
गोऱ्याकुंभारें आणिले । खेळावयातुजलागीं ॥ १३
गरुडपारीं हरिरंगणीं । टाळमृदंगाचा ध्वनी ।
महाद्वारीं हरिकीर्तनीं ॥ तल्लिन कान्हा हरिदास ॥ १४ ॥
निजानंदें रंगे पूर्ण । सर्वही कर्मे कृष्णार्पण ।
श्रीरंगा निजतनु अर्पण चरणसेवा करीतसे ॥ १५ ॥

१० भूपाळी पंढरीची.

उठा उठा हो वेगेंसी । चला जाऊं पंढरिसी ।
भेटों विठ्ठल रखुमाईसी । त्रिविधताप हरतील ॥ ध्रु० ॥
चंद्रभागे करूं स्नान । घेऊं पुंडलिकाचें दर्शन ।
तेथें भेटति संतजन । तेणें मन निवेल ॥ १ ॥
गंगा यमुना सरस्वती । कृष्णा वेण्या भागीरथी ।
तुंगभद्रा भोगावती । येती श्रीपतिदर्शना ॥ २ ॥
तापी नर्मदा कावेरी । पंचगंगा गोदावरी ।
स्नानें केलिया बोहरीं । महादोष हरतील ॥ ३ ॥
रामानंदाचें माहेर । क्षेत्र नाम पंढरपूर ।
माता पिता विश्वंभर पैल पार तरतील ॥ ४ ॥

११ भूपाळी गंगेची.

उठोनियां प्रातःकाळीं । वदनीं वदा चंद्रमौळी ।
श्रीबिंदुमाधवाजवळी । स्नान करा गंगेचें ॥ ध्रु० ॥
स्नानदान जया अंतरीं । घडेल भागीरथीच्या तीरीं ।
हरि कृपा करिल त्यावरी । ऐसें माहात्म्य गंगेचें ॥ १ ॥
भागिरथिचें स्नान करा । हृदयीं स्मरोनि गंगाधरा ।
चुकेल चौऱ्यायशींचा फेरा । ऐसें माहात्म्य गंगेचें ॥ २ ॥

गंगा आहे स्वर्गावरतीं । पाताळीं ते भोगावती ।
मृत्युलोकीं हे विख्याती । ऐसें माहात्म्य गंगेचें ॥ ३ ॥
कृष्णा वेण्या तुंगभद्रा । शरयू कालिंदी नर्मदा ।
भीमा भागा मुख्य गोदा । करा स्नान गंगेचें ॥ ४ ॥
व्यास वाल्मीकि नारदमुनी । अत्री वसिष्ठ आणि जैमिनी ।
गुरु दत्त येति माध्याह्नीं । ऐसें माहात्म्य गंगेचें ॥ ५ ॥
आली आषाढि एकादशी । चला जाऊं पंढरिसी ।
पांडुरंगचरणापाशीं । दावी माहात्म्य गंगेचें ॥ ६ ॥

१२ भूपाळी गोपाळाची.

उठिं रे गोपाळा । उघडीं स्वरूपलोचनां[1]
सरली अविद्यारातीं । उदयो आला रविकिरणा ॥
इंद्रियगोधनें[2] नेईं निर्गुणकानना ।
सुटलीं मानसवत्सें । तुजविण नाकळती कोणा ॥ ध्रु ॥
प्रबोध-पहांट झाली सरलें तिमिर-तम-रज ।
गुरुकृपेचा अरुण दावी सुरंगसम तेज ॥
आत्मादिनकर पाठीं प्रगटे तात्काळिक सहज ।
जिवचंद्राचें मंडळ तेणें झालें निस्तेज[3] ॥ १ ॥
दृश्यभास चांदणिया असते ठायिंच लोपलिया ।
लिंगदेह कमळींचे मधुकर सुटले आपसया ॥
बुद्धिबोधचक्रवाकें मिनलीं आपणियां ।
देहबुद्धिकुमुदिनी सुकोनि गेलीसे विलया ॥ २ ॥

---

१ ही संबंध भूपाळी एक रूपक आहे. २ इंद्रियेंरूपी ओढाळ गुरें. ३ गुरुकृपेचा अरुणोदय झाला कीं आत्मबोधरूपी सूर्योदय पाठोपाठ व्हावयाचाच; व हा आत्म-साक्षात्कार झाला—मी ब्रम्ह आहें हा अनुभव आला—कीं, जीवबुद्धि पार मावळलीच!

योगविद्येच्या पंथें साधकवृंदें चालियलीं ।
उपनिषद्वाथार्थ शब्द केला कोकिळीं ॥
वाग्वादाचे उलूक रिघती मौनाचे ढोलीं ।
विकल्पअटवी साही चोरीं सांडियली ॥ ३ ॥

विरागरश्मीजवळी धरितां चित्तरविकांत ।
आत्मावह्नि प्रगटे विषयवन हें जाळित ॥
तृष्णेच्या श्वापदावरी प्रळय अद्भुत ।
विश्व हें लटिकें मूढा मृगजळवत ॥ ४ ॥

जार-व्यसनीं जीव हा झाला उदमी सुविचार ।
वासना कुंटिणिचा सहजें खुंटला व्यापार ॥
लीलाविश्वंभरस्वामी उठिला सत्वर ।
चाले मुक्तेश्वर संगीं धरूनियां कर ॥ ५ ॥

---

३ स्तोत्रें.

गणपतिस्तोत्र.

प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम् ।
भक्तावासं स्मरेन्नित्यमायुः-कामार्थसिद्धये ॥ १ ॥

प्रथमं वक्रतुंडं च एकदंतं द्वितीयकम् ।
तृतीयं कृष्णपिंगाक्षं गजवक्त्रं चतुर्थकम् ॥ २ ॥

उपनिषदांनीं गाइलेला 'अहं ब्रह्मास्मि' हा आत्मबोध होतांच वाग्वादरूपी दिवाभीतें एकदम मौनाच्या ढोलींत दडी मारतात. (म्ह० वाचानिवृत्ति होते; 'शब्दा आली निःशब्दता.')

लंबोदरं पंचमं च षष्ठं विकटमेव च ।
सप्तमं विघ्नराजं च धूम्रवर्णं तथाष्टमम् ॥ ३ ॥
नवमं भालचंद्रं च दशमं तु विनायकम् ।
एकादशं गणपतिं द्वादशं तु गजाननम् ॥ ४ ॥
द्वादशैतानि नामानि त्रिसंध्यं यः पठेन्नरः ।
न च विघ्नभयं तस्य सर्वसिद्धिकरं परम् ॥ ५ ॥
विद्यार्थी लभते विद्यां धनार्थी लभते धनम् ।
पुत्रार्थी लभते पुत्रान्मोक्षार्थी लभते गतिम् ॥ ६ ॥
जपेद्गणपतिस्तोत्रं षड्भिर्मासैः फलं लभेत् ।
संवत्सरेण सिद्धिंच लभते नात्र संशयः ॥ ७ ॥
अष्टानां ब्राह्मणानां च लिखित्वा यः समर्पयेत् ॥
तस्य विद्या भवेत्सर्वा गणेशस्य प्रसादतः ॥ ८ ॥
इति श्रीनारदपुराणे संकटनाशनं नाम गणेशस्तोत्रं संपूर्णम् ॥

२ रामरक्षास्तोत्र.

श्रीगणेशाय नमः ॥ अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमंत्रस्य बुधकौशिक ऋषिः ॥ श्रीसीतारामचंद्रो देवता ॥ अनुष्टुप् छंदः ॥ सीता शक्तिः ॥ श्रीमद्धनूमान् कीलकम् ॥ श्रीरामचंद्रप्रीत्यर्थे रामरक्षास्तोत्रजपे विनियोगः ॥ अथ ध्यानम् ॥ ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुषं बद्धपद्मासनस्थं । पीतं वासो वसानं नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नं ॥ वामांकारूढसीतामुखकमलमिलल्लोचनं नीरदाभं नानाऽलंकारदीप्तं दधतमुरुजटामंडनं रामचंद्रम् ॥ १ ॥ इति ध्यानम् ॥ चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम् । एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ॥ १ ॥ ध्यात्वा नीलोत्पलश्यामं रामं राजीवलोचनम् । जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमंडितम् ॥ २ ॥ सासितूणधनुर्बाणपाणिं नक्तंचरांतकम् । स्वलीलया जगत्त्रातुमाविर्भूतमजं विभुम् ॥ ३ ॥ रामरक्षां पठेत्प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम् । शिरो मे राघवः पातु भालं

दशरथात्मजः ॥ ४ ॥ कौसल्येयो दृशौ पातु विश्वामित्रप्रियः श्रुती । घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ॥ ५ ॥ जिह्वां विद्यानिधिः पातु कंठं भरतवंदितः । स्कन्धौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ॥ ६ ॥ करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजित् । मध्यं पातु खरध्वंसी नाभिं जांबवदाश्रयः ॥ ७ ॥ सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः । ऊरू रघूत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ॥ ८ ॥ जानुनी सेतुकृत्पातु जंघे दशमुखांतकः । पादौ बिभीषणश्रीदः पातु रामोऽखिलं वपुः ॥ ९ ॥ एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत् । स चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत् ॥ १० ॥ पातालभूतलव्योमचारिणश्छद्मचारिणः । न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः ॥ ११ ॥ रामेति रामभद्रेति रामचंद्रेति वा स्मरन् । नरो न लिप्यते पापैर्भुक्तिं मुक्तिं च विंदति ॥१२॥ जगज्जैत्रैकमंत्रेण रामनाम्नाऽभिरक्षितम् । यः कंठे धारयेत्तस्य करस्थाः सर्वसिद्धयः ॥ १३ ॥ वज्रपंजरनामेदं यो रामकवचं स्मरेत् । अव्याहताज्ञः सर्वत्र लभते जयमंगलम् ॥ १४ ॥ आदिष्टवान्यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः । तथा लिखितवान्प्रातः प्रबुद्धो बुधकौशिकः ॥ १५ ॥ आरामः कल्पवृक्षाणां विरामः सकलापदाम् । अभिरामस्त्रिलोकानां रामः श्रीमान्स नः प्रभुः ॥ १६ ॥ तरुणौ रूपसंपन्नौ सुकुमारौ महाबलौ । पुंडरीकविशालाक्षौ चीरकृष्णाजिनांबरौ ॥ १७ ॥ फलमूलाशिनौ दांतौ तापसौ ब्रह्मचारिणौ । पुत्रौ दशरथस्यैतौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥ १८ ॥ शरण्यौ सर्वसत्वानां श्रेष्ठौ सर्वधनुष्मताम् । रक्षःकुलनिहंतारौ त्रायेतां नो रघूत्तमौ ॥ १९ ॥ आत्तसज्जधनुषाविषुस्पृशावक्षयाशुगनिषंगसंगिनौ । रक्षणाय मम रामलक्ष्मणावग्रतः पथि सदैव गच्छताम् ॥ २० ॥ सन्नद्धः कवची खड्गी चापबाणधरो युवा । गच्छन्मनोरथोऽस्माकं रामः पातु सलक्ष्मणः ॥ २१ ॥ रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली । काकुत्स्थः पुरुषः पूर्णः कौसल्येयो रघूत्तमः ॥ २२ ॥ वेदांतवेद्यो यज्ञेशः पुराणपुरुषोत्तमः । जानकीवल्लभः श्रीमानप्रमेयपराक्रमः ॥ २३ ॥ इत्येतानि जपेन्नित्यं मद्भक्तः श्रद्धयाऽन्वितः ।

अश्वमेधायुतं पुण्यं संप्राप्नोति न संशयः ॥ २४ ॥ रामं दूर्वा-दलश्यामं पद्माक्षं पीतवाससम् । स्तुवन्ति नामभिर्दिव्यैर्न ते संसा-रिणो नराः ॥ २५ ॥ रामं लक्ष्मणपूर्वजं रघुपतिं सीतापतिं सुंदरम् । काकुत्स्थं करुणार्णवं गुणानिधिं विप्रप्रियं धार्मिकम् ॥ राजेंद्रं सत्यसंधं दश-रथतनयं श्यामलं शांतमूर्तिं वंदे लोकाभिरामं रघुकुलतिलकं राघवं राव-णारिम् ॥ २६ ॥ रामाय रामभद्राय रामचंद्राय वेधसे । रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः ॥ २७ ॥ श्रीराम राम रघुनंदन राम राम श्रीराम राम भरताग्रज राम राम ॥ श्रीराम राम रणकर्कश राम राम ॥ श्रीराम राम शरणं भव राम राम ॥ २८ ॥ श्रीरामचंद्रचरणौ मनसा स्मरामि । श्रीराम-चंद्रचरणौ वचसा गृणामि ॥ श्रीरामचंद्रचरणौ शिरसा नमामि । श्रीराम-चंद्रचरणौ शरणं प्रपद्ये ॥ २९ ॥ माता रामो मत्पिता रामचंद्रः स्वामी रामो मत्सखा रामचंद्रः ॥ सर्वस्वं मे रामचंद्रो दयालुर्नान्यं जाने नैव जाने न जाने ॥ ३० ॥ दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे तु जनकात्मजा । पुरतो मारुतिर्यस्य तं वंदे रघुनंदनम् ॥ ३१ ॥ लोकाभिरामं रणरंगधीरं राजीवनेत्रं रघुवंशनाथम् । कारुण्यरूपं करु-णाकरं तं श्रीरामचंद्रं शरणं प्रपद्ये ॥ ३२ ॥ मनोजवं मारुततुल्यवेगं । जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् । वातात्मजं वानरयूथमुख्यं । श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥ ३३ ॥ कूजंतं राम रामेति मधुरं मधुराक्षरम् । आरुह्य कविता-शाखां वंदे वाल्मीकिकोकिलम् ॥ ३४ ॥ आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदां । लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥ ३५ ॥ भर्जनं भवबीजानामर्जनं सुखसंपदाम् । तर्जनं यमदूतानां राम रामेति गर्जनम् ॥ ३६ ॥ रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे । रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः ॥ रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहं । रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर ॥ ३७ ॥ राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे । सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने ॥ ३८ ॥ इति श्रीबुधकौशिकविरचितं श्रीरामरक्षास्तोत्रं संपूर्णम् ॥

३ मारुतीस्तोत्र.

श्रीगणेशाय नमः ॥ भीमरूपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती ॥ वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना ॥ १ ॥ महाबळी प्राणदाता सकळां उठवी बळें ॥ सौख्यकारी दुःखहारी दूत वैष्णवगायका ॥ २ ॥ दिननाथा हरीरूपा सुंदरा जगदांतरा ॥ पातालदेवताहंता भव्यसिंदूरलेपना ॥ ३ ॥ लोकनाथा जगन्नाथा प्राणनाथा पुरातना ॥ पुण्यवंता पुण्यशीला पावना परितोषका ॥ ४ ॥ ध्वजाग्रीं उचली बाहू आवेशें लोटला पुढें ॥ काळाग्नी काळरुद्राग्नी देखतां कांपती भयें ॥ ५ ॥ ब्रह्मांड माइलें नेणों आवाळें दंतपंगती ॥ नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा भृकूटी त्राहाटिल्या बळें ॥ ६ ॥ पुच्छ तें मुरडिलें माथां किरिटकुंडलें बरीं ॥ सुवर्ण कटिकांसोटी घंटा किंकिणी नागरा ॥ ७ ॥ ठकारे पर्वताऐसा नेटका सडपातळ ॥ चपळांग पाहतां मोठें महाविद्युल्लतेपरी ॥ ८ ॥ कोटिच्या कोटि उड्डाणें झेंपावें उत्तरेकडे ॥ मंदाद्रिसारखा द्रोण क्रोधें उत्पाटिला बळें ॥ ९ ॥ आणिला मागुती नेला आला गेला मनोगती ॥ मनासि टाकिलें मागें गतीस तुळणा नसे ॥ १० ॥ अणूपासूनि ब्रह्मांडाएवढा होत जात असे । तयासि तुळणा कैंची मेरुमांदार धाकुटे ॥ ११ ॥ ब्रह्मांडाभोंवते वेढे वज्रपुच्छें करूं शके ॥ तयासि उपमा द्याया ब्रह्मांडीं पाहतां नसे ॥ १२ ॥ आरक्त पाहतां डोळां ग्रासिलें सूर्यमंडळ ॥ भूत प्रेत समंधाधि रोग व्याधी समस्तही ॥ १३ ॥ धनधान्य पशुवृद्धि पुत्रपौत्र समस्तही ॥ पावती रूपविद्यादि स्तोत्रपाठें करोनियां ॥ १४ ॥ ऐसें हें स्तोत्रमाहात्म्य पठती जपती सदा ॥ मारुतीच्या प्रसादानें भुक्ति मुक्ति सदा वसे ॥ १५ ॥ नासती तुटती चिंता आनंदें भीमदर्शनें ॥ ही धरा पंधरा श्लोकीं लाधली शोभली बरी ॥ १६ ॥ दृढदेही न संदेही संख्या चंद्रकळागुणें ॥ रामदासीं अग्रगण्य कपिकूळासि मंडण ॥ १७ ॥ रामरूपी अंतरात्मा दर्शनें दोष नासती ॥ इति श्रीरामदासकृतं संकटनिरसनं मारुतीस्तोत्रं संपूर्णम् ॥

४ विविध मंत्र.

१ करदर्शन.

कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती ।
करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम् ॥ १ ॥

२ भूमिस्पर्श.

समुद्रवसने देवि पर्वतस्तनमंडले ।
विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे ॥ १ ॥

३ स्नान.

पापोऽहं पापकर्मात्मा पापात्मा पापसंभव ।
त्राहि मां कृपया गंगे सर्वपापहरा भव ॥ १ ॥

४ तीर्थप्राशन.

अकालमृत्युहरणं सर्वव्याधिविनाशनम् ।
विष्णुपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहम् ॥ १ ॥
शरीरे जर्जरीभूते व्याधिग्रस्ते कलेवरे ।
औषधी जाह्नवीतोयं वैद्यो नारायणो हरिः ॥ २ ॥

५ भोजन.

हरिर्दाता हरिर्भोक्ता हरिरन्नं प्रजापतिः ।
हरिर्विप्रशरीरस्तु भुंक्ते भोजयते हरिः ॥ १ ॥

६ औषधसेवन.

अच्युतानंद-गोविन्द-नामोच्चारणभेषजात् ।
नश्यन्ति सकला रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहम् ॥ १ ॥

७ दीपनमस्कार.

शुभं करोति कल्याणमारोग्यं धनसंपदाम् ।
शत्रुबुद्धिविनाशाय दीपज्योति नमोऽस्तु ते ॥ १ ॥

५ पाळणे.

१ पाळणा रामाचा.

जो जो जो जोरे कुळभुषणा । दशरथनंदना ॥
निद्रा करिं बाळा मनमोहना । रामा लक्षुमणा ॥ जो जो० ॥ ध्रु० ॥
पाळणा लांबविला अयोध्येसी । दशरथाचे वंशीं ॥
पुत्र जन्मले हृषिकेशी । कौसल्येच्या कुशी ॥ बाळा जो० ॥ १ ॥
रत्नजडित पालख । झळके अमोलिक ॥
वरते पहुडले कुळदीपक । त्रिभुवन-नायक ॥ २ ॥
हालवी कौसल्या सुंदरी । धरुन ज्ञानदोरी ॥
पुष्पें वर्षिलीं सुरवरीं । गर्जति जयजयकारीं ॥ ३ ॥
विश्वव्यापका रघुराया । निद्रा करिं बा सखया ।
तुजवर कुरवंडी करुनियां । सांडिन आपुली काया ॥ ४ ॥
येउनि वसिष्ठ सत्वर । सांगे जन्मांतर ।
राम परब्रह्म साचार । सातवा अवतार ॥ ५ ॥
याग रक्षुनियां अवधारा । मारुति निशाचरां ॥
जाइल सीतेच्या स्वयंवरा । उद्धरि गौतमदारा ॥ ६ ॥
पर्णिल जानकी सुरूपा । भंगुनियां शिवचापा ।
रावण लज्जित महाकोपा । नव्हे पण हा सोपा ॥ ७ ॥
सिंधुजलडोहीं अवलीळा । नामें तरती शिळा ।
त्यावरि उतरुनियां दयाळा । नेशी वानरमेळा ॥ ८ ॥
समूळ मर्दूनी रावण । स्थापिला बिभीषण ।
देव सोडविले संपूर्ण । आनंदलें त्रिभुवन ॥ ९ ॥
ऐशीं चरित्रें अपार । करील मनोहर ।
इतुकें ऐकोनी उत्तर । हांसले रघुवीर ॥ १० ॥
राम भावाचा भुकेला । भक्ता आधिन झाला ।
दास विठ्ठलें ऐकिला । पाळणा गाईला ॥ ११ ॥

२ पाळणा दशावताराचा.

जो जो जो जो रे मधुसुदना । बाळा जगजीवना ।
हालवी यशोदा पाळणा । निज बा नारायणा ॥ ध्रु० ॥

प्रथम अवतारीं क्षीराब्धी । स्तवन करितां विधी ।
करुणा परिसूनी गुणनीधी । शंखासुरासी वधी जो जो० ॥ १ ॥

द्वितीय संकटीं इंद्रासी । कूर्मरूप तूं होसी ।
सिंधू मंथुनियां श्रमलासी । सौख्य सकळां देसी ॥ २ ॥

तिसरा वराह हिरण्याक्षी । धरणी घालुनि कुक्षी ।
पळतां धरियेला अनुलक्षी । फोडुनि त्याच्या कुक्षी ॥ ३ ॥

चतुर्थ नरसिंह विशाळ । अग्नीचा कल्होळ ।
निवटुनि असुरांसी समूळ । काढी अंतरमाळ ॥ ४ ॥

पंचम वामन सुंदर । खुजट द्विजवर ।
तेजें भुलवीला दिनकर । हरिला दानासुर ॥ ५ ॥

षड्रिपु भार्गवविंदानीं । पिता तो जमदग्नी ।
पृथ्वी निःक्षत्री तिहीं बाणीं । दिधली विप्रां दानीं ॥ ६ ॥

सप्तम अयोध्यापुरवासी । राजाराम होसी ।
पितृवचनातें पाळीसी । राहुनियां वनवासी ॥ ७ ॥

अष्टम अवतारीं गोकुळीं । झालासी वनमाळी ।
चाणुरकंसाची मंडळी । निवटुनि केली होळी ॥ ८ ॥

पूतना कपटार्थी कुटमंत्री । शोधुनि पाहे धरित्री ।
प्रचंड मेघांत दशसूत्रीं । लक्षुनि धरिली धात्री ॥ ९ ॥

बौद्ध कलंकी होणार । पुढील युगांतर ।
करुं नये अव्हेर दातार । दासा चरणीं थार ॥ १ ॥

३ पाळणा दत्ताचा.

जो जो जो जो रे जो जो जो । तूं मी ऐसें उमजो ॥ ध्रु० ॥
प्रेम पालख देवत्रया । हालविती अनुसूया ॥
बोधुनि निजरूप समजाया । भवभ्रम हा उडवाया ॥ जो जो०॥१॥
रजोगुणी तूं ब्रह्मया । श्रमलासी तान्हया ॥
सुखें निज आतां सखया । धरिं रे स्वरूपीं लया ॥ २ ॥
तमोरूपें तूं सदाशिवा । विश्रांतिये घे तूं देवा ॥
धरिं रे स्वरूपीं तूं भावा । संहारितां विश्वा ॥ ३ ॥
विष्णु सात्विक तूं अहंकार । दैत्यांचा संहार ॥
करितां श्रमलासी अपार । आतां समजें सार ॥ ४ ॥
ऐसा आनंदें पाळणा । मालो गातसे जाणा ॥
सद्गुरुकृपेनें आपणा । दत्ता निरंजना ॥ जो जो० ॥ ५ ॥

आरत्या.

उठा सकळ जन उठले नारायण । आनंदले मुनिजन तिन्हीं लोक ॥ १ ॥
करा जय जयकार वाद्यांचा गजर । मृदंग विणे अपार टाळ घोळ ॥ २ ॥
जोडोनियां कर मुख पहा सादर । पायांवरी शीर ठेवोनियां ॥ ३ ॥
तुका म्हणे काय पडियंतें मागा । आपुलालें सांगा दुःख सकळ ॥ ४ ॥

१ कांकड आरती.

उठा उठा हो साधक साधा आपुलालें हित । गेला गेला हा नरदेह मग कैंचा भगवंत ॥ १ ॥ उठा उठा हो वेगेंसी चला जाऊं राउळासी । झडतिल पातकांच्या राशी कांकडआरती पाहोनी ॥ २ ॥ जागे करा रुक्मिणीवरा देव आहे निदसुरा । वेगें निंबलोण करा दृष्ट होईल म्हणउनियां ॥ ३ ॥ उठोनियां हो पांहटे पहा विठ्ठल उभा विटे । चरण तयाचे गोमटे अमृतदृष्टी अवलोका ॥ ४ ॥ पुढें वाजंत्रीं वाजती ढोल दमामे गर्जती । होती कांकडआरती माझ्या पंढरिरायाची ॥ ५ ॥ सिंह-

नाद शंख भेरी गजर होतो महाद्वारीं । केशवराज विटेवरी नामा चरण वंदीतो ॥ ६ ॥

१ कांकड आरती.

भक्तीचीये पोटीं बोधकांकडा ज्योती । पंचप्राण जीवें भावें ओंवाळूं आरती ॥ १ ॥ ओंवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा । दोन्ही कर जोडूनि चरणीं ठेविला माथा ॥ ध्रु० ॥ काय महिमा वर्णू आतां सांगणें तें किती । कोटी ब्रह्महत्या मुख पाहतां जाती ॥ २ ॥ राही रखुमाई उभ्या दोन्ही दों बाहीं । मयूर पिच्छचामरें ढाळिती ठाईच्या ठाईं ॥ ३ ॥ विटेसहित पाय म्हणूनी भावें ओंवाळूं । कोटि रविशशि दिव्य उगवले हळूं ॥ ४ ॥ तुका म्हणे दीप घेउनी उन्मनीतशोभा । विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ॥ ५ ॥

२ आरती गणपतीची.



सुखकता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी, पुरवी प्रेम कृपा जयाची । सर्वांगीं सुंदर उटी शेंदुराची । कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥ १ ॥ जय देव जय देव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रें मनःकामना पुरती ॥ ध्रु० ॥ रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुंकुमकेशरा । हिरेजडित मुगुट शोभतो बरा । रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ॥ २ ॥ लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना । दास रामाचा वाट पाहे सदना । संकटीं पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना ॥ ३ ॥

४ आरती गणपतीची.

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको । दोंदिल लाल बिराजे सुंत गौरीहरको । हाथ लिये गुडलड्डू साँई सुरवरको । महिमा कहे न जाय लागत हूं पदको ॥ १ ॥ जय जय जी गणराज विद्यासुखदाता । धन्य तुमारा दर्शन मेरा मन रमता ॥ ध्रु० ॥ अष्टौ सिद्धी दासी संकटको बैरी । बिघनबिनाशन मंगलमूरत अधिकारी । कोटीसुरजप्रकाश ऐशी छब तेरी । गंडस्थलमदमस्तक झूले शशिबहारी ॥ २ ॥ भावभगतसें कोई शरणागत आवे । संतत संपत सबही भरपूर पावे । ऐसे तुम महाराज मोको अति भावे । गोसावीनंदन निशिदिन गुण गावे ॥ जय० ॥ ३ ॥

५ आरती कृष्णाची.



येउन मानवदेहा भुललों संसारीं । धन सुत माया माझीं म्हणुनियां सारीं । नाहीं स्मरलों तुजला क्षणही कंसारी । वारीं भवदुःखातें शरणागत तारीं ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय राधारमणा । चुकवीं लक्ष योनी चौऱ्यायशीं भ्रमणा ॥ ध्रु० ॥ जाणत जाणत अपुलें केलें अनहीत । स्वेच्छें रतलों विषयीं त्यजुनियां विहित । गेला जन्म सज्जनसंगाविरहित । त्वत्पदकमळीं मिनलें नाहीं हें चित्त ॥ जय० ॥ २ ॥ केलें अगणित पातक आतां तुज पायीं । आलों शरणागत लक्षीं लवलाहीं । करुणादृष्टीं पूर्ण दीनाकडे पाहीं । विनवी कृष्णदास मनीं रेऊन राहीं ॥ जय० ॥ ३ ॥

६ आरती कृष्णाची.

ओंवाळूं आरती मदनगोपाळा । श्यामसुंदर गळां वैजयंती माळा ॥ ध्रु० ॥ चरणकमल ज्याचें अतिसुकुमार। ध्वजवज्रांकुश बीदांचे तोडर ॥१॥ नाभिकमळीं ज्याचे ब्रह्मयाचें स्थान । हृदयीं पदक शोभे श्रीवत्सलांछन ॥ २ ॥ मुखकमळ पाहतां सूर्याच्या कोटी । मोहियेलें मानस कोंदियेली दृष्टि ॥ ३ ॥ जडित मुगुट ज्याचा देदीप्यमान। तेणें तेजें कोंदलें अवघें त्रिभुवन ॥ ४ ॥ एका जनार्दनीं देखियेलें रूप । रूप पाहतां अवघें झालें तद्रूप ॥ ओंवाळूं० ॥ ५ ॥

७ आरती रामाची.

ऐक बा रामराया तुझ्या वंदितों पाया । आवरीं आपुली हे विश्व-मोहिनी माया ॥ ध्रु० ॥ मी मूढ हीन दीन सर्वसत्क्रियाहीन । तूं क्षमाशील देवा शुद्धचरित निजाधीन ॥ १ ॥ घडो सदा साधुसंग नसो विषयप्रसंग। सप्रेम भक्ति द्यावी सत्व वैराग्य अभंग ॥ २ ॥ वाटतें नित्य भावें तुझे साधुगुण गावे । मन हें आवरेना सांग काय म्यां करावें ॥ ३ ॥ करितां संसारकाम मुखीं असो तुझें नाम । दयाघना भक्त मोर । याचा पुरविसी काम ॥ ४ ॥

८ आरती रामाची.

उत्कट साधुनि शिळासेतू बांधोनी । लिंगदेहलंकापुर विध्वंसूंनी । कामक्रोधादिक राक्षस मर्दूनी । देहअहंभाव रावण निवटूनी ॥ १ ॥ जय देव जय देव निजबोधा रामा । परमार्थें आरती सद्भावें आरती परिपूर्णकामा ॥ ध्रु० ॥ प्रथम सीताशुद्धी हनुमंत गेला । लंकादहन करुनी अक्षया मारीला । मारीला जंबूमाळी भुवनीं त्राहाटिला । आनंदाची गूढी घेउनियां आला ॥ २ ॥ निजबळें निजशक्ती सोडविली सीता । म्हणुनी येणें झालें अयोध्ये रघुनाथा । आनंदें वोसंडे वैराग्य

भरता । आरति घेउनि आली कौसल्यामाता ॥ ज० ॥ ३ ॥ अनुहत-ध्वनी गर्जति अपार । अठरा पद्मे वानर करिती भुभुःकार । अयोध्येसी आले दशरथकुमर । नगरीं होत आहे आनंद थोर ॥ ज० ॥ ४ ॥ सहज सिंहासनीं राजा रघुवीर । सोहंभावें तया पूजा उपचार । सहजाची आरती वाद्यांचा गजर । माधवदासस्वामी आठव ना विसर ॥ जय० ॥ ५ ॥

९ आरती रामाची.

काय करूं गे माय आतां कवणा ओंवाळूं । जिकडे पाहें तिकडे राजाराम कृपाळू ॥ ध्रु० ॥ ओंवाळूं गे माय निजमूर्ति रामा । राम-रूपीं दुजेपण न दिसे आम्हां ॥ १ ॥ सुरवर नर वानर अवघा राम सकळ । दैत्य निशाचर तेही राम केवळ ॥ २ ॥ त्रैलोक्यस्वरूपें राम संचरला एक । सद्गुरुकृपें केशवराजीं आनंद देख ॥ ३ ॥

१० आरती मारुतीची.



सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं । करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं । कडाडिलें ब्रह्मांड धोका त्रिभुवनीं । सुरवरनर निशाचर त्या जाल्या पळणी ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय हनूमंता । तुमचेनि प्रतापें न भीं कृतांता ॥ ध्रु० ॥ दुमदुमलीं पाताळें उठिला प्रतिशब्द । थरथरिला धरणीधर मानीला खेद । कडकडिले पर्वत उद्गण उच्छेद । रामीरामदासा शक्तीचा बोध ॥ जय देव जय० ॥ २ ॥

११ आरती नृसिंहाची.



कडकडिला स्तंभ गडगडिलें गगन । अवनी होत आहे कंपायमान । तडतडलीं नक्षत्रें पडताती जाण । उग्ररूपें प्रगटे तो सिंहवदन ॥ १ ॥ जय देव जय देव जय नरहरिराया । आरती ओंवाळूं तुज महाराजया ॥ ध्रु० ॥ एकविस स्वर्गमाळा डळमळली कैसी ब्रह्मयाच्या वाटे अभिनव चित्तासी । चंद्रसूर्य दोनी लोपति प्रकाशीं कैलासीं शंकर दचके मानसीं ॥ जय० ॥ २ ॥ थरथरति त्या जटा जिव्हा लळलळित । तीक्ष्ण नखीं तो दैत्य विदारीत । अर्धांगीं कमळजा शिरिं छाया धरित । माधवदासा स्वामी नरहरी शोभत ॥ ज० ॥ ३ ॥

११ आरती शंकराची.



लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा । वीषें कंठ काळा त्रीनेत्रीं ज्वाळा । लावण्य सुंदर मस्तकीं बाळा । तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझूळां ॥ १ ॥ जय देव जय देव जय श्रीशंकरा । आरती ओंवाळूं तुज कर्पुरगौरा ॥ ध्रु० ॥

कर्पुरगौरभोळा नयनीं विशाळा । अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा । विभूतीचें उधळण शितिकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उमा वेल्हाळा ॥ ॥ जय० ॥२॥ देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें त्यामाजीं अवाचित हळहळ जें उठलें । तें त्वां असुरपणें प्राशन केलें । नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें ॥ जय० ॥ ३ ॥ व्याघ्रांबर-फणिवरधर सुंदर मदनारी । पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी । शतकोटीचें बीज[1] वाचे उच्चारी । रघुकुळ टिळक रामदासा अंतरीं ॥ ज० ॥ ४ ॥

१३ आरती देवीची.



दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं । अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं । वारीं वारीं जन्ममरणातें वारीं । हारीं पडलों आतां संकट निवारीं ॥ १ ॥ जयदेवी जयदेवी जय महिषासुरमथिनी । सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ ध्रु० ॥ त्रिभुवन भुवनीं पाहतां तुज ऐशी नाहीं । चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं । साही विवाद करितां पडिले प्रवाहीं । ते तूं भक्तालागीं पावसि लवलाहीं ॥ ज० ॥ २ ॥ प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासां । क्लेशापासुनि सोडीं तोडीं भवपाशा । अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा । नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ ३ ॥

---

१ शतकोटी रामायणाचें सार म्ह० 'राम' हीं दोन अक्षरें.

१४ आरती विठ्ठलाची.



आरती अनंतभूजा । विठो पंढरीराजा । न चलती उपचार । मनें सारिली पूजा ॥ धु० ॥ परेस पार नाहीं । न पडे निगमां ठायीं भुलला भक्तिभावें । लाहो घेतला देहीं ॥ आ० ॥ १ ॥ अनिर्वाच्य शुद्ध बुद्ध । उभा राहिला नीट । रामाजनार्दनीं । पायीं जोडली वीट ॥ आर० ॥२॥

१५ आरती विठ्ठलाची.

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा । पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा । चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥ जय देव जय देव जय पांडुरंगा । रखुमाईवल्लभा, राईच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ धु० ॥ तुळसीमाळा गळां कर ठेउनि कटीं । कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं । देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनूमंत पुढें उभे रहाती ॥ ज० ॥ २ ॥ धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा । सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां । राई रखुमाबाई राणीया सकळा । ओंवाळीती राजा विठोबा सांवळा ॥ ज० ॥ ३ ॥ ओंवाळूं आरत्या कुर्वंड्या येती । चंद्रभागेमाजीं सोडुनियां देती । दिंड्या पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ज० ॥ ४ ॥ आषाढी कार्तिकी भक्तजन येती । चंद्रभागेतीरीं स्नानें जे करिती । दर्शनहेळामात्रें तयां होय मुक्ती । केशवासी नामदेव भावें ओंवाळी ती ॥ जय० ॥ ५ ॥

१६ आरती विठ्ठलाची.

येई हो विठ्ठले माझे माऊली ये । निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहें ॥ ध्रु० ॥ आलिया गेलिया हातीं धाडी निरोप । पंढरपुरीं आहे माझा मायबाप ॥ येई० ॥ १ ॥ पिंवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला । गरुडावरि बैसून माझा कैवारी आला ॥ येई० ॥ २ ॥ विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिपवाळी । विष्णुदास नामा जीवें भावें ओंवाळी ॥ येई० ॥३॥

१७ आरती विष्णूची.



आवडी गंगाजळें देवा न्हाणीलें । भक्तीचें भूषण प्रेम-सुगंध अर्पिलें । अहं हा धूप जाळूं श्रीहरीपुढें । जंव जंव धूप जळे तंव तंव देवा आवडे । रमावल्लभदासें सोऽहं धूप जाळिला । एका आरतीचा मग प्रारंभ केला । सोऽहं हा दीप ओंवाळूं गोविंदा । समाधी लागली पाहतां मुखारविंदा । हरिखें हरिख होतो मुख पाहतां । प्रकटल्या ह्या नारी सर्वहि अवस्था । सद्भावालागीं बहु हा देव भूकेला । रमावल्लभदासें अहं-नैवेद्य अर्पिला । फल तांबूल दक्षिणा अर्पिली । तया उपर निरांजनें मांडीलीं । पंचप्राण पंचज्योति आरति उजळीली । विश्व हें लोपलें तया प्रकाशातळीं ॥ १ ॥ आरती आरती करूं गोपाळा मीतूंपण सांडोनि वेळोवेळां ॥ ध्रु० ॥ आरती-प्रकाशें चंद्रसूर्य लोपले । सुरवर नभीं तेथें तटस्थ ठेले । देवभक्तपण न दिसे कांहीं ऐशापरी दास रमावल्लभापायीं ॥ २ ॥

१८ आरती दत्ताची.



त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा । त्रिगुणी अवतार त्रैलोक्याराणा ॥ नेति नेति शब्दें नये अनुमाना । सुरवरमुनिजनयोगिसमाधि न ये ध्याना ॥ जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता । आरति ओंवाळीतां हरली भवचिंता ॥ ध्रु० ॥ सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त । अभाग्यासी कैंची कळे ही मात । पराही परतली तेथें कैंचा हेत । जन्ममरणाचाही पुरलासे अंत ॥ जय० ॥ २ ॥ दत्त येऊनियां उभा ठाकला । भावें साष्टांगेंसी प्रणिपात केला । प्रसन्न होऊनी आशिर्वाद दिधला । जन्ममरणाचा फेरा चुकवीला ॥ ज० ॥ ३ ॥ दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान । हारपलें मन झालें उन्मन । मीतूंपणाची झाली बोळवण ॥ एकाजनार्दनीं श्रीदत्तध्यान ॥ज०॥४॥

१९ आरती गुरूची.

फळलें भाग्य माझें । धन्य झालों संसारीं ॥ सद्गुरू भेटला हो । तेणें धरियेलें करीं ॥ पश्चिमेसि चालवीलें । आत्मस्थिति निर्धारीं ॥ त्रिकूटावरि नांदे । देखियेली पंढरी ॥ १ ॥ तें सुख काय सांगों । वाचे बोलतां नये ॥ आरतीचेनि गूणें । गेलें मीपण माझें ॥ ध्रु० ॥ राउळामाजीं जातां । राहे देहअवस्था ॥ मन हें उन्मन झालें । नसे बद्धतेची वार्ता ॥ हेतु हा मावळला । शब्दा आली निःशब्दता ॥ तटस्थ होउनि ठेलें । निजरूप पाहतां ॥ २ ॥ आनंदसागरांत । प्रेमें बुडी दीधली ॥ लाधलें सौख्य मोठें ।

---

१ सत्वगुणाचा विष्णु, रजोगुणाचा ब्रह्मदेव व तमोगुणाचा शंकर ह्या तीन देवता दत्तांत एकवटलेल्या आहेत.

नये बोलतां बोली ॥ सद्गुरूचेनि संगें । ऐसी आरती केली ॥ निवृत्ति आनंदानें । तेथें प्रवृत्ति निमाली ॥ ३ ॥

१० आरती गुरूची.

धन्य धन्य हे प्रदक्षिणा सद्गुरुरायाची । झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ॥ ध्रु० ॥ गुरुभजनाचा महिमा न कळे आगमानिगमांसी । अनुभवि ते जाणती जे गुरुपदिंचे रहिवासी ॥ १ ॥ पदोपदीं झाल्या अपार पुण्याच्या राशी । सर्वहि तीर्थें घडलीं आम्हां आदिकरुनि काशी ॥ २ ॥ मृदंग टाळ घोळीं भक्त भावार्थें गाती । नामसंकीर्तनें नित्यानंदें नाचताती ॥ धन्य० ॥ ३ ॥ कोटी ब्रह्म-हत्या हरती करितां दंडवत । लोटांगण घालितां मोक्ष लागे पायांत ॥ ध० ॥ ४ ॥ प्रदक्षिणा करुनी देहभाव हरविला । श्रीरंगात्मज विठ्ठल पुढें उभा राहिला ॥ ध० ॥ ५ ॥

११ विडा श्रीकृष्णाचा.

विडा घ्याहो नारायणा । कृष्णा जगत्रजीवना । विनविते रखुमाई । दासी होईन मी कान्हा ॥ ध्रु० ॥ शांति हे नागवेली । पान घेऊनियां करीं । मीपणा जाळूनीयां । चुना लाविला वरी ॥ विडा० ॥ १ ॥ वासना फोडुनियां । चूर्ण केली सुपारी । भावार्थकापुरानें । घोळियेली निर्धारीं ॥ विडा० ॥ २ ॥ विवेककातरंग । रंगीं रंगला सुरंग । वैराग्य-जायफळ । मिळविलें अभंग ॥ विडा० ॥ ३ ॥ दया ही जायपत्री । क्षमा-लवंगा आणील्या । सुबुद्धि-वेलदोडे । शिवरामीं अर्पियेले ॥ विडा० ॥ ४ ॥

१२ विडा श्रीदत्ताचा.

विडा घ्याहो सद्गुरुराया । धरुनी मानवाची काया । यतिवेष घेउनियां । वससी दीनासी ताराया ॥ ध्रु० ॥ ज्ञान हें पूगीफळ । भक्ति नागवल्लीदल । वैराग्य चूर्ण विमल । लवंगा सत्क्रिया सकळ ॥ विडा० ॥ १ ॥ प्रेमरंगीं जैसा कात । वेळा अष्टभावसहित । जायफळ क्रोधरहित । पत्री सर्वभूतहीत ॥ विडा घ्याहो० ॥ २ ॥ खोबरें हेंचि क्षमा । फोडुनी द्वैताच्या बदामा । मनोजयाचा वर्ख हेमा । कापूर हा शांति नामा ॥ विडा० ॥ ३ ॥ कस्तुरी-

निरहंकार। कोठें न मिळती हे उपचार। भीमापुत्र यास्तव फार। प्रेमें विनवी वारंवार ॥ विडा० ॥ ४ ॥

२३ विडा श्रीरामाचा.

विडा घ्यांहो रामराया। महाराज राजया ॥ ध्रु० ॥ रत्नजडित पानदान। आली जानकी घेवोन। विडा देत करुनीयां। दीनबंधो रामराया॥ विडा० ॥ १ ॥ सुगंध गंगेरी पानें। मुक्त मोतियाचा चूना। सुपारी कातगोळ्या भक्तिभावें मेळविल्या ॥ वि० ॥ २ ॥ जायपत्री जायफळ। विडा जाहला सुफळ। सीता रामालागीं देत। केशरकस्तुरीयुक्त ॥ वि० ॥ ३ ॥ सीताराम विडा घेतां। ऐक्यभावें एकात्मता। रंगली ऐक्यरंगीं। रामदास पायां लागीं ॥ विडा० ॥ ४ ॥

२४ नीरांजन आरती.

जय देव जय देव जय नीरांजन साँई। नीरांजन ओंवाळूं भावें तव पायीं ॥ ध्रु० ॥ पंचतत्वांचें हें केलें नीरांजन। पंचप्राणवाती बरव्या घालून। मोहस्नेहें तेची करुनी परिपूर्ण। दीपज्योती ज्ञानतेजें पाजळून ॥ १ ॥ सच्चिदानंद तूं आनंदमूर्ती। तुझ्या प्रतापाची सर्वही दीप्ती। तुझिया चरणीं जडो माझी ही भक्ति। विष्णुदासा नसे अन्यत्र प्रीति ॥ २ ॥

२५ शेजारती विठ्ठलाची.

करोनी विनवणी चरणीं ठेवितों माथा। परिसावी विनंती माझी पंढरीनाथा ॥ १ ॥ अखंडित असावें ऐसें वाटतें पायीं। साहोनी संकोच ठाव थोडासा देईं ॥ २ ॥ असो नसो भाव आलों तुमच्या ठाया। कृपादृष्टी पाहें मचवरी पंढरीराया ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हीं तुझीं वेडीं बागडीं। नामें भवपाश हातें आपुल्या तोडीं ॥ ४ ॥

२६ शेजारती विठ्ठलाची.

पावला प्रसाद आतां विठो निजावें। आपला तो श्रम कळो येतसे भावें ॥ १ ॥ आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा। पुरले मनोरथ जातों आपुलिया स्थळा ॥ २ ॥ तुम्हांसी जागविलें आम्ही आपुलिया चाडा।

शुभाशुभकर्मे दोष हरावया पीडा ॥ ३ ॥ तुका म्हणे दिलें उच्छिष्टाचें भोजन । नाहीं निवडिलें आम्हां आपुलिया भिन्न ॥ ४ ॥

२७ शेजारती वृत्ताची.

आतां स्वामी सुखें निद्रा करा अवधूता । करा अवधूता । चिन्मय सुखधामा जाउनि पहुडा एकांता ॥ ध्रु० ॥ वैराग्याचा कुंचा घेउनि चौक झाडीला । स्वामी चौक झाडीला । तयावरी सुप्रेमाचा शिडकावा दिधला ॥ आतां० ॥ १ ॥ पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ति । स्वामी नवविधा भक्ती । ज्ञानाच्या समया उजळुनि लावियल्या ज्योती ॥ आतां० ॥ २ ॥ आशा तृष्णा कल्पनांचा सांडुनि गलबला । क्षमा दया शांती दासी उभ्या सेवेला ॥ आतां० ॥ ३ ॥ द्वैताचें कपाट लाउनि एकत्र केलें । स्वामी एकत्र केलें ॥ दुर्बुद्धीच्या गांठी सोडुनि पडदे सोडीले ॥ आतां० ॥ ४ ॥ भावार्थाचा मंचक हृदयाकाशीं टांगीला । हृदयाकाशीं टांगीला ॥ मनाची सुमनें जोडुनी केलें शेजेला ॥ आतां० ॥ ५ ॥ अलक्ष्य उन्मनि घेउनि नाजुक दूशेला । स्वामी नाजुक दूशेला ॥ निरंजनीं सद्गुरु माझा नीजीं निजेला ॥ आतां स्वामी० ॥ ६ ॥

प्रार्थना.

घालिन लोटांगण वंदिन चरण डोळ्यांनिं पाहिन रूप तुझें ॥ प्रेमें आलिंगिन आनंदें पूजिन । भावें ओवाळिन म्हणे नामा ॥ १ ॥ त्वमेव माता पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव । त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देवदेव ॥ २ ॥ कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात्। करोमि यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि ॥ ३ ॥ अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम् । श्रीधरं माधवं गोपिकावल्लभ जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥ ४ ॥ हरे राम हरे राम राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥ ५ ॥

पुंडलिकवरदे हरिविठ्ठल ॥ सीताकांतस्मरण जय जय राम ॥

नमः पार्वती पते हर हर महादेव ॥ श्रीगुरु देव दत्त ॥

मंत्रपुष्पांजली.


ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥ ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वै श्रवणाय कुर्महे । स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु । कुबेराय वै श्रवणाय महाराजाय नमः । ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं । समंतपर्या ईस्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात् । पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति । तदप्येषश्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्या वसन् गृहे । आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ॥

भजनें.

१ राम राम राम राम । हरे राम हरे राम ॥
२ रघुपति राघव राजाराम । पतितपावन सीताराम ॥
३ राम लक्ष्मण जानकी । जय बोलो हनुमानकी ॥
४ मारुति राया बलभीमा । शरण आलों मज द्या प्रेमा ॥
५ जय जय राम कृष्ण हरी । सांवळ्या राम कृष्ण हरी ॥
६ लक्ष्मी शारंगधर सीतापति रघुवीर राधा गोविंद ॥
रखुमाई पांडुरंग ॥
७ राधाकृष्ण जय कुंजविहारी । मुरलीधर गोवर्धनधारी ॥
८ राधारमणा कंसारी । तारीं दुस्तर संसारीं ॥
९ राधारमणा सांवाळिया । चित्तचोरट्या गोंवळिया ॥
१० सांवळिया राधारमणा । कां नये दिनाची करुणा ॥

११ देवकिनंदन गिरिधरलाल । करुणासागर दीनदयाळ ॥
१२ गोविंद राधे गोविंद । जय गोपाल राधे गोविंद ॥
१३ नारायण हरी । जय जय नारायण हरी ॥
१४ जय हरी विठ्ठल । जय जय विठ्ठल ॥
१५ विटेवरी उभा । कटिवरी हात । काय मौजेचा पंढरिनाथ ॥
१६ बुडतों भवसागरीं । विठोबा तारीं रे महाराजा ॥
१७ राम सीता कृष्ण । राधा विठ्ठले रखुमाई ॥
१८ नारायण विधि अत्रिनाथ । दत्त जनार्दन एकनाथ ॥
१९ पावना दत्ता । पतितपावना दत्ता ॥
२० पावना दत्ता दयाळा । पावना दत्ता ॥
२१ दत्ता दिगंबरा ये रे । सांवळ्या मला भेट दे रे ॥
२२ गुरु महाराज गुरु । जय जय परब्रह्म सद्गुरु ॥
२३ निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई । एकनाथ नामदेव तुकाराम ॥
२४ नारायण विधि वसिष्ठ राम । रामदास कल्याणधाम ॥
२५ रामदास गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ॥

खंड १ ला समाप्त.



धर्म.

खंड २ रा.

प्रकरण १ लें.

भाग १ ला.

ईश-स्तवन.

दिक्कालाद्यनवच्छिन्नानन्तचिन्मात्रमूर्तये ।
स्वानुभूत्येकसाराय नमः शान्ताय तेजसे ॥ १ ॥ *

१ श्लोक.

अतर्क्य महिमा तुझा, गुणहि फार बा हे विधी[१] ।
श्रुतिज्ञांहि म्हणे सदा स्तविल आमची केविं धी ॥
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती † ॥ १ ॥

२ अभंग.

वर्णूं महिमा ऐसी मज नाहीं वाचा । न बोलवे साचा पार तुझा ॥ १ ॥
ठायींची ही काया ठेविली चरणीं । आतां ओंवाळुनी काय सांडूं ॥ २ ॥

---

* जो दिशा, काल इत्यादिकांनीं परिच्छेदरहित म्हणजे अमक्या प्रदेशांत अमुक कालीं होता, आहे किंवा असेल इत्यादि व्यवहार ज्याचे ठायीं संभवत नाहीं, निरवधि ज्ञान हेंच आहे स्वरूप ज्याचें, आणि स्वकीय अनुभवच आहे मुख्य तत्व ज्याचें असा जो शांत तेजोरूपी परमेश्वर त्यास नमस्कार असो.—भर्तृ. २·१.

१ वेद जाणणारा ब्रह्मदेव.

† तुज वर्णी ऐसा तुजविण नाहीं । दुजा कोणी तिहीं त्रिभुवनीं ॥—गा. ३४७९.

नाहीं भाव ऐसा करूं तुझी सेवा । जीव वाहूं देवा तोही तुझा ॥ ३ ॥
मज माझें कांहीं न दिसे पाहतां । जें तुज अनंता समर्पावें ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां नाहीं मज थार । तुझे उपकार फेडावया ॥ ५ ॥

३ अभंग.

तुझी नाहीं केली सेवा । दुःख वाटतसे जीवा ॥ १ ॥
नष्ट पापीण मी हीन । नाहीं केलें तुझें ध्यान ॥ २ ॥
जें जें दुःख झालें मला । तें तूं सोशिलें विठ्ठला ॥ ३ ॥
क्षमा करीं देवराया । दासी जनी लागे पाया ॥ ४ ॥

४ श्लोक.

वाचा निर्मलया सुधामधुरया यां नाथ शिक्षामदा-
स्तां स्वप्नेऽपि न संस्मराम्यहरहः पापावृतो निस्त्रपः ।
इत्यागःशतशालिनं पुनरपि स्वीयेषु मां बिभ्रत-
स्त्वत्तो नास्ति दयानिधिर्यदुपते मत्तो न मत्तोऽपरः ॥ १ ॥*

५ श्लोक.

सदैव अपराध हे रचितसें असे कोटि गा ।
स्वयेंहि कथितों नसे तिळहि लाज मी कोटिगा ।
अजांडशतकोटि ज्या उदरिं सर्वदा नांदवा ।
न त्यांत अवकाश या, स्थळ दिलें तदा कां दवा ॥ १ ॥

---

* अमृताप्रमाणें मधुर आणि निर्मल अशा वाणीनें, हे प्रभो ! तूं मला जी शिकवण दिलीस तिचें मी स्वप्नांतदेखील स्मरण करीत नाहीं; दिवसेंदिवस मी असा पापी, निर्लज्ज बनत चाललों आहे; असे शतशः अपराध करणाऱ्या माझी तूं पुनः स्वकीयांतच गणना करतोस ! तेव्हां, हे श्रीकृष्णा, तुझ्यापेक्षां कोणी दयाळु नाहीं, आणि माझ्यापेक्षां कोणी उन्मत्त नाहीं !

—जगन्नाथ पंडित (भामिनी विलास ४।५.)

१ वणव्यास. एकदां गोकुळास आग लागली असतां, कृष्णानें तो अग्नि गिळून टाकून गोकुळाचें रक्षण केलें.

६ श्लोक.

क्षणहि तुमची देवा सेवा मसे घडली मला ।
मलिन बहु मी झालों त्यालों अघांबुधिच्या मला ॥
परि न नरकीं रंका टाका सदा ममता धरा ।
शरण नर जो आला त्याला तुम्ही प्रभु उद्धरा ॥ १ ॥

७ श्लोक.

प्रभो प्रणतवत्सला बहुत पातकी दीन मी ।
निराश्रित अजाणता तुज सदैव चित्तीं नमीं ॥
चुकें तर पदोपदीं पण न भीं नसें घाबरा ।
क्षमाच करशील तूं भरंवसा मला हा बरा ॥ १ ॥

८ श्लोक.

नेणें बा विश्वकर्त्या तव गुण अथवा नामरूपादि कांहीं ।
नेणें मी कोण, कोठें, जग उदित कसें, स्वामि हें गूढ कांहीं ॥
नेणें कर्तव्यकर्मा; म्हणुन विनवितों भ्रांति माझी हरावी ।
अज्ञानें मी दयाळा, किति जरि चुकलों, तत्क्षमा त्वां करावी ॥ १ ॥

९ श्लोक.

भजें मी विश्वेशा बहुत अपराधी जरि खरा ।
तुपेक्षावें मातें पडनत अनाथा प्रभुवरा ।
ढिया ओढे नाले मिळति समभावें जलधिला ।
असाधू वा साधू शरण रिघतां पावति तुला ॥ १ ॥

१० श्लोक.

दयाब्द वळशील तूं तरि न चातकां सेवकां ।
उणें किमपि भाविकां उचगशील तूं देव कां ॥
अनन्यगतिका जना निरखितांचि सोपद्रवा ।
तुझींचि करुणार्णवा मन धरी उमोप द्रवा ॥ १ ॥

११ श्लोक.

भवाब्धिपतिता मला प्रभु तुझी कृपा-नाव दे ।
दुजा सदय कोण कीं मज ' न भीं ' असें जो वदे ॥
असें जड अनाथ मी, तरि सहाय हो तूं मला ।
कसा द्रव नये तुला, प्रभु, दयानिधे, कोमला ॥ १ ॥

१२ श्लोक.

असंख्य दिसती नभीं रुचिर गोल जे प्रत्यहीं ।
तुझें यश कथावया उदित दैवतें सत्य हीं ॥
दिलीस गति ज्यांस जी सतत तीच संभाळिती ।
सुबोध करण्यास त्यां स्वनियमां न जे पाळिती ॥ १ ॥

१३ श्लोक.

समुद्र, सरिता, गिरी, तरु जिवांस तूं निर्मिलें ।
विचित्र रचना तुझी, बुधहि वर्णितां शर्मिले ॥
अनादि सकलज्ञ जो मुदित नित्य त्या मी नमीं ।
असो, प्रभु, दयार्णवीं पतित एक हा मीन मी ॥ १ ॥

१४ श्लोक.

नाना जीव वनस्पती जड तसे निर्मून लक्षावधी ।
स्वेच्छेनें जग हें विचित्र सजवी, तीनेंच त्याला वधी ॥
जो कोणी असला समर्थ भगवान् त्या मी नमीं मंदधी ।
सर्वाधार दयालु आटविल तो संसारदुःखोदधी ॥ १ ॥

१५ श्लोक.

नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी ।
हरी जो तापातें उचलुनि कृपासिंधुलहरी ॥
हरी[1] वाटे काळा-करिस विपती[2] मृत्युभुजगा ।
जगाचा तूं ऐसा धणि कवण तो पाव मज गा ॥ १ ॥

---

१ यमरूप हत्तीस हरि म्ह० सिंहच. २ मृत्युरूप सर्पास विपति म्ह०पक्ष्यांचा नायक गरूडच.

१६ अभंग

यथार्थवादें तुज न वर्णवे कदा । बोलतों ते निंदा करितों तुझी ॥ १ ॥
वेदश्रुति तुज नेणती कोणी । चोविस ठेंगणीं धांडोळितां ॥ २ ॥
आतां मज क्षमा करावें तें देवा । सलगी ते केशवा बोलियेलों ॥ ३ ॥
सगुण कीं साकार निर्गुण कीं निराकार । न कळे हा पार वेदश्रुति ॥४॥
तो आम्हीं भावें केलासे लहान । ठेवूनियां नांवें पाचारितों ॥ ५ ॥
सहस्रमुखें शेष सीणला स्तवितां । पार न कळतां ब्रह्मा ठेला ॥ ६ ॥
तेथें माझी देहबुद्धि ते काई । थोर मी अन्यायी तुका म्हणे ॥ ७ ॥

भाग २ रा.

देव कसा आहे ?

१ ओंव्या.

देव कोणासी म्हणावें । कैसें तयासी जाणावें ॥
तेंचि बोलणें स्वभावें । बोलिजेल ॥ १ ॥
जेणें केलें चराचर । केले सृष्ट्यादि व्यापार ॥
सकळकर्ता निरंतर । नाम ज्याचें ॥ २ ॥
तेणें केल्या मेघमाळा । चंद्रबिंबीं अमृतकळा
तेज दिधलें रविमंडळा । जया देवें ॥ ३ ॥
ज्याची मर्यादा सागरा । जेणें स्थापिलें फणिवरा ॥
जयाचेनि गुणें तारा । अंतरिक्ष ॥ ४ ॥
च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यासि लक्ष जीवयोनी ॥
जेणें निर्मिले लोक तिनी । तया नांव देव ॥ ५ ॥

ब्रह्मा विष्णु आणि हर । हे जयाचे अवतार ॥
तोचि देव हा निर्धार । निश्चयेंसीं ॥ ६ ॥
सर्वकर्ता तोचि देव । पाहों जातां निरावेव ॥
ज्याची कळा लीळा लाघव । मेणती ब्रह्मादिक ॥ ७ ॥
जो सृष्टिनिर्माणकर्ता । तो ये सृष्टीपूर्वी होता ॥
मग हे तयाची सत्ता । निर्माण जाली ॥ ८ ॥
अबघी सृष्टि जो कर्ता । तो ते सृष्टीहूनि पर्ता ॥
तेथें संशयाची वार्ता । कादूंची मये ॥ ९ ॥
जन्ममरणाची वार्ता । देवास लागेना सर्वथा ॥
देव अमर ज्याची सत्ता । त्यासी मृत्य कैसेनी ॥ १० ॥

१ अभंग.

सकळ गुणें संपन्न । एक देवाचें लक्षण ॥ १ ॥
वरकड कोठें कांहीं । एक आहे एक नाहीं ॥ २ ॥
षड्गुणैश्वर्यसंपन्न । एक भगवंतीं जाण ॥ ३ ॥
तुका म्हणे जें जें बोला । तैं तैं साजे या विठ्ठला ॥ ४ ॥

१ अभंग.

माउलीसी सांगे कोण । प्रेम वाढवी ताम्हें ॥ १ ॥
अंतरींचा कळवळा । करीतसे प्रतिपाळा ॥ २ ॥
मायबापाची उपमा । तुज देऊं मेघश्यामा ॥ ३ ॥
तेही साजेना पाहतां । जीवलगा पंढरिनाथा ॥ ४ ॥
माय पाळी संसारीं । परलोकीं राहे दूरी ॥ ५ ॥
तैसा नव्हेसी अनंता । काळावरी तुझी सत्ता ॥ ६ ॥
तुका म्हणे नारायणा । तुम्हां बहुत करुणा ॥ ७ ॥

---

१ ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः । ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा ॥ या सहा गुणांना 'भग' अशी संज्ञा आहे; अर्थात् हें 'भग' ज्याला आहे तो 'भगवान्.'

४ अभंग.

तूं माउलीहून मवाळ । चंद्राहूनी शीतळ ॥
पाणियाहूनी पातळ । कल्लोळ प्रेमाचा † ॥ १ ॥
देऊं काशाची उपमा । दुजी तुज पुरुषोत्तमा ।
ओंबाळुनी नामा । तुझ्यावरुनी टाकितों ॥ २ ॥
तुवां केलें रे अमृता । गोड त्याही तूं परता ।
पांचा तत्वांचा जनिता । सकळ सत्ता-नायक ॥ ३ ॥
कांहीं न बोलोनी आतां । उगाच चरणीं ठेवितों माथा ।
तुका म्हणे पंढरिनाथा । क्षमा करीं अपराध ॥ ४ ॥

५ अभंग.

भागल्याचें तारूं सिणल्याची साउली । भुकेलिया घाली प्रेमपान्हा ॥ १ ॥
ऐसी हे कृपाळू अनाथाची वेशी । सुखाचीच राशी पांडुरंग ॥ २ ॥
सकळां सन्मुख कृपेच्चिया दृष्टी । पाहे बहु भेटी उतावीळां ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें आतां उरला कैंचा । अनंता जन्मींचा शीणभाग ॥ ४ ।

६ अभंग.

जो भक्तांचा विसांवा । उभा पाचारितो धांवा ॥ १ ॥
हातीं प्रेमाचें भातुकें । मुखीं घाली कवतुकें ॥ २ ॥
भवसिंधु सुखें । उतरी कांसे लावुनी ॥ ३ ॥
थोर भक्तांची आस । पाहे भोंवताली वास †† ॥ ४ ॥
तुका म्हणे कृपादानी । फेडी आवडीची धणी ॥ ५ ॥

---

† *Cf.* God is love. ईश्वर प्रेममय आहे.—बायबल्. जॉन पत्र १ लें ४·८.

†† *Cf.* If I call not thee in my prayers, if I keep not thee in my heart, thy love for me still waits for my love.

प्रार्थना करून तुला जरी आळविलें नाहीं, तुला मीं आपल्या हृदयांत साठवून ठेवलें नाहीं, तरी तुझें मजविषयींचें प्रेम माझ्या प्रेमाची उत्कंठेनें वाट पहातच राहतें !—गी. अं. ३१.

७ अभंग

ऐशी विठाई माउली । अनाथां कृपेची साउली ॥ १ ॥
उभी असे निरंतर । ठेवूनियां कटीं कर ॥ २ ॥
देउनी प्रेमाचें भातुकें । दासा अवलोकी कौतुकें ॥ ३ ॥
निळा म्हणे महिमा इचा । वर्णितां कुंठित वेदवाचा ॥ ४ ॥

८ अभंग.

सरलें आतां नाहीं । न म्हणे वेळकाळ कांहीं ॥ १ ॥
विठ्ठल कृपाळु माउली । सदा प्रेमें पान्हायेली ॥ २ ॥
सीण विचारी भाग । नव्हे निष्ठुर नाहीं राग ॥ ३ ॥
भेदाभेद नाहीं । तुका म्हणे तिच्या ठायीं ॥ ४ ॥

९ अभंग.

देव आमचा देव आमचा । जीव सकळ जीवांचा ॥ १ ॥
देव आहे देव आहे । जवळी आम्हां अंतर बाहे ॥ २ ॥
देव गोड देव गोड । पुरवी कोडाचेंही कोड ॥ ३ ॥
देव आम्हां राखे राखे । घाली कळिकाळासी काखे ॥ ४ ॥
देव दयाळ देव दयाळ । करी तुक्याचा सांभाळ ॥ ५ ॥

१० अभंग.

आडलिया जना होसी साहाकारी । आंधळिया करीं काठी तूंचि ॥ १ ॥
आडिले गांजिले पीडिले संसारीं । त्यांचा तूं कैवारी नारायणा † ॥२॥
प्रल्हाद महासंकटीं रक्षिला । तुम्हीं आपंगिला नाना परी ॥ ३ ॥

---

† *Cf.* To a closeshorn sheep, God gives wind by measure.
—George Herbert.

(२) आंधळ्याच्या गाई देव राखितो.

(3) Here is thy foot stool and there rest thy feet where live the poorest, and lowliest and lost.

'हें तुझें पादपीठ; ज्या ठिकाणीं अत्यंत दीन, अत्यंत हीन आणि पतित असे

आपुलेंची अंग तुम्ही वोडविलें । त्याचें निवारलें महादुःख ॥ ४ ॥
तुका म्हणे तुझे कृपे पार नाहीं । माझे विठाबाई जननीये ॥ ५ ॥

११ अभंग.

दीननाथा तुझीं ब्रिदें चराचर । घेसील कैवार शरणागता ॥ १ ॥
आपुल्या दासांचें न साहासी उणें । उभा त्याकारणें राहिलासी ॥ २ ॥
चक्र-गदा हातीं आयुधें अपारें । न्यून तेथें पुरें करूं धावे ॥ ३ ॥
तुका म्हणे तुज भक्तीचें कारण । करावया पूर्ण अवतार ॥ ४ ॥

१२ पद.

प्रभुविण संकट कोण निवारी ध्रु० ॥
दीनसखा तरी कोण असा कीं । दुःख हरी भयवारी ॥ प्रभु० ॥ १ ॥
संकटसमयीं शरण रिघावें । कोण दुजा कैवारी ॥ प्रभु० ॥ २ ॥
कोण असा कीं षड्रिपु यांची । हटविल थोर सवारी ॥ प्रभु० ॥ ३ ॥

१३ अभंग.

आपुलिया बळें नाहीं बोलवत । सखा कृपावंत वाचा त्याची ॥ १ ॥
साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ॥ २ ॥
काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याचो कोण जाण कळा । चालवी पांगुळा पायाविण ॥ ४ ॥

लोक राहतात, तेथें (हे परमेश्वरा !) तुझे चरण असतात.' —गी. अं. १०.

He is there where the tiller is tilling the hard ground and where the pathmaker is breaking stones. He is with them in sun and in shower, and his garment is covered with dust. 'जेथें नांगऱ्या कठिण अशी जमीन नांगरतो आहे, जेथें रस्ते करणारा मजूर खडी फोडीत बसला आहे, तेथें तो (ईश्वर) आहे. कडक ऊन पडलेलें असो, कीं पावसाची धार लागलेली असो, त्यांच्याजवळ तो आहे. त्याचीं वस्त्रें सगळीं धुळीनें भरलेलीं आहेत.'—गी. अं. ११.

भाग ३ रा.

देव कोठें आहे ? (अ)

१ अभंग.

मागें पुढें ब्रह्म दाटे । म्हणती देव आहे कोठें ॥ १ ॥
जयामध्यें येती जाती । तया कोणी नोळखती ॥ २ ॥
मृगनाभीचा परिमळ । परि तो हिंडे रानोमाळ ॥ ३ ॥
जळामध्यें मीन राहे । पाणी प्याया बाहेर जाहे ॥ ४ ॥
ऐसी भ्रांति जाइल केव्हां । गुरुकृपा होइल तेव्हां ॥ ५ ॥
गुरुकृपा झाल्यावरी । ब्रह्म सृष्टी दिसे सारी ॥ ६ ॥
तुका म्हणे ऐसी भ्रांति । देव असतां नाहीं म्हणती ॥ ७ ॥

२ अभंग.

देहीं असोनियां देव । वृथा फिरतो निर्दैव † ॥ १ ॥
देव आहे अंतर्यामीं । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ॥ २ ॥
नाभीं मृगाचे कस्तूरी । व्यर्थ हिंडे वनांतरीं ॥ ३ ॥
साखरेचें मूळ ऊंस । तैसा देहीं देव दिसे ॥ ४ ॥
दुधीं असतां नवनीत । नेणें तयाचें मथित ॥ ५ ॥
तुका सांगे मूढ जनां । देहीं देव कां पाहाना ॥ ६ ॥

---

† तैसा हृदयामध्यें मी राम । असतां सर्व सुखाचा आराम । कां भ्रांतासी काम । विषयांवरी ॥ १ ॥ —ज्ञानेश्वरी ९·६०

Cf. Every man is God playing the fool.—Emerson.

'प्रत्येक मनुष्य ईश्वरच आहे, फक्त त्यानें बाह्यतः वेडगळपणाचें सोंग घेतलें आहे.'—रा. ती. भा. ४ पृ. २.

३ आर्या.

देहींच देव असुनी कां फिरसी रे उगा मृगावाणी ।
नाभींच गंध असुनी, कस्तूरीमृग फिरे जसा रानीं ॥ १ ॥

४ अभंग.

मृगाचिये अंगीं कस्तूरीचा वास । असे ज्याचा त्यास नसे ठावा ॥ १ ॥
भाग्यवंत घेती वेंचूनियां मोलें । भारवाही मेले वाहतां ओझें ॥ २ ॥
चंद्रामृतें तृप्ति पारणें चकोरा । भ्रमरासी चारा सुगंधाचा ॥ ३ ॥
अधिकारी येथें घेती हातवटी । परीक्षावंता दृष्टीं रत्न जैसें[1] ॥ ४ ॥
तुका म्हणे काय अंधळीया हातीं । दिलें जैसें मोतीं वांयां जाय ॥ ५ ॥

५ अभंग.

फिरवीली पळी पायसांत पूर्ण । राहिली आपण उपवासी ॥ १ ॥
भक्षुनियां गेले इतर सकळ । दर्वीस तें फळ काय होय ॥ २ ॥
तयेपरी भूतां अंतर्बाह्य हरी । असोनी भिकारी न पाहती ॥ ३ ॥
तुका म्हणे भोक्ते हरिदास होती । इतर जल्पती अभिमानें ॥ ४ ॥

६ अभंग.

देव जवळी अंतरीं । भेटी नाहीं जन्मवरी ॥ १ ॥
मूर्ती त्रैलोक्यीं संचली । दृष्टि विश्वाची चुकली ॥ २ ॥
भाग्य आलें संतजन । झालें देवाचें दर्शन ॥ ३ ॥
रामदासीं योग झाला । देहीं देव प्रगटला ॥ ४ ॥

देव कोठें आहे ? (आ)

१ आर्या.

भूजल-तेज-समीर-ख-रवि-शशि-काष्ठादिकीं असे भरला ।
स्थिरचर व्यापुनि अवघें जो जगदात्मा दशांगुलें उरला ॥ १ ॥

---

१ रत्नपारख्याच्या दृष्टीस रत्न पडलें असतां जशी त्याची खरी पारख होते, त्याप्रमाणें यौग्य मनुष्य (अधिकारी) असेल तोच कोणत्याही गोष्टीचें मर्म जाणतो.—न.

२ अभंग.

अणुमाजीं राम रेणुमाजीं राम । तृण-काष्ठीं राम वर्ततांहे ॥ १ ॥
बाहीजु भीतरीं राम चराचरीं । विश्वीं विश्वाकारीं व्यापलासे ॥ २ ॥
रामेंविण स्थळ रितेंचि पैं नाहीं । वर्ते सर्वा ठायीं राम राम ॥ ३ ॥
परिसाभागवत काया-वाचा-मनें । श्रीरामावांचून आन नेणें ॥ ४ ॥

३ पद.

गुरुकृपा-अंजन पायो मेरे भाई । रामबिना कछु देखत नाहीं ॥ ध्रु० ॥
अंदर राम बाहेर राम । जहां देखे वहां पूर नहीं कामा ॥ १ ॥
जागत राम सोवत राम । सपनोंमें देखत राजाही राम ॥ २ ॥
कहत कबीरा अनुभव निका । जहां देखे वहां राम सरीखा ॥ ३ ॥

४ भूपाळी.

राम आकाशीं पाताळीं । राम नांदे भूमंडळीं ॥
राम योगियांचे मेळीं । सर्व काळीं तिष्ठत ॥ १ ॥
राम नित्यनिरंतरीं । राम सबाह्य अंतरीं ॥
राम विवेकाचे घरीं । भक्तीवरी सांपडे ॥ २ ॥
राम भावें ठायीं पडे । राम भक्तीशीं आतुडे ॥
राम ऐक्यरूपीं जोडे । मौन पडे श्रुतीसी ॥ ३ ॥
राम योग्यांचें मंडण । राम भक्तांचें भूषण ॥
राम आनंदाचा घन । करी रक्षण दासाचें ॥ ४ ॥

५ अभंग.

देव सर्वा ठायीं वसे । परि न दिसे अभाविकां ॥ १ ॥
जळीं स्थळीं पाषाणीं भरला । रिता ठाव कोठें उरला ॥ २ ॥
जिकडे पाहे तिकडे देव । अभाविकां दिसे वाव ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं नाहीं भाव । तंव तया न दिसे देव ॥ ४ ॥

६ अभंग.

हरि असे देहीं सर्व काळ संपन्न । म्हणोनी चिंतन निरंतर ॥ १ ॥

हरिविण नाहीं हरिविण नाहीं । दिशाद्रुम पाहीं बिंबलासे ॥ २ ॥
हरिविण देवो नाहीं अन्य भावो । हरि असे सर्व देह-भावीं ॥ ३ ॥
सोपान सांगतु हरि सर्वत्रीं वसे । भाग्यवंता दिसे सर्वकाळ ॥ ४ ॥

७ अभंग.

देव अंतरींच राहे । प्रेमळासी भेटताहे ॥ १ ॥
तारूं केला गुरुराज । सांडियेली सर्व लाज ॥ २ ॥
गुरुगम्य धरियेलें । असार तें मोकलिलें ॥ ३ ॥
तुका म्हणे भावबळें । तया भेटलें सांवळें ॥ ४ ॥

भाग ४ था.

देवच कर्ता करविता (अ)

कर्ता करवीता देता देववीता । नेता नेववीता देव एक ॥

१ अभंग.

जिव्हा रस चाखी अवलोकी नेत्र । प्रेरक पवित्र आत्माराम ॥ १ ॥
बोलतसे मुख त्वचे कळे स्पर्श । प्रेरक परेश आत्माराम ॥ २ ॥
सुखदुःख ज्ञान होतसे पैं चित्ता । प्रेरक पंढरीनाथाविण नाहीं ॥ ३ ॥
घ्राणा परिमळ ऐकती श्रवण । प्रेरक नारायण सर्वसाक्षी ॥ ४ ॥
हस्तें देणें घेणें चरणीं गमन । प्रेरक ईशान आत्माराम ॥ ५ ॥
ज्याच्या सत्ताबळें हाले वृक्षपान । प्रेरक भगवान सर्वांचा तो ॥ ६ ॥
एकाजनार्दनीं पाय हे धरावे । ध्यान हें करावें हृदयीं त्याचें ॥ ७ ॥

२ अभंग.

कर्ता एक देव तेणें केलें सर्व । तयापासीं गर्व कामा नये ॥ १ ॥
देह तें देवाचें वित्त कुबेराचें । तेथें या जिवाचें काय आहे ॥ २ ॥

कर्ता करवीता देता देववीता । नेता नेववीता देव एक ॥ ३ ॥
निमित्ताचा धनी केला असे प्राणी । पाहातां निर्वाणीं देव एक ॥ ४ ॥
लक्ष्मी ही देवाची सर्व सत्ता त्याची । तेथें या जिवाची उर्मी नाहीं ॥५॥
दास म्हणे मना सावध असावें । दुश्चित नसावें सर्व काळ ॥ ६ ॥

३ अभंग.

चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवीतें हरीविण ॥ १ ॥
देखवी ऐकवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ॥ २ ॥
मानसाची देव चालवी अहंता । मीचि एक कर्ता म्हणोनियां ॥ ३ ॥
वृक्षार्चेहि पान हाले त्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ॥ ४ ॥
तुका म्हणे विठो भरला सबाहीं । तया उणें कांहीं चराचरीं ॥ ५ ॥

४ अभंग.

तुझिया सत्तेनें वेदासी बोलणें । सूर्यासी चालणें तुझिया बळें ॥ १ ॥
ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धनी । वर्म तें जाणुनी शरण आलों ॥ २ ॥
मेघांनीं वर्षावें, पर्वतीं बैसावें । वायूनें विचरावें सत्ते तुझे ॥ ३ ॥
नामा म्हणे कांहीं न हाले साचार । प्रभू तूं निर्धार पांडुरंगा ॥ ४ ॥

५ अभंग.

तुझे पाय माझे राहियेले चित्तीं । ते मज दावितीं वर्म देवा ॥ १ ॥
आम्हां अंधां तुझ्या पायांचा आधार । जाणसी विचार चालवितां ॥२॥
मन स्थिर ठेलें इंद्रियें निश्चळ । हें तों माझें बळ नव्हे देवा ॥ ३ ॥
पाप-पुण्य-भेद नासिलें तिमिर । त्रिगुण शरीर सांडियेलें ॥ ४ ॥
तुका म्हणे तुझा प्रताप हा खरा । मी जाणें दातारा शरणागत ॥ ५ ॥

६ पद.

प्रभूविण कोण कोणाचा वाली ॥ ध्रु० ॥
कोण कोणाचा चाकर मालक । व्यर्थचि भाषण खाली ॥ प्र० ॥ १ ॥
कर्ता हर्ता तो करवीता । मिथ्या जन हे बोली ॥ प्र० ॥ २ ॥
माणिकप्रभु म्हणे मातेचे उदरीं । नवमास रक्षुनि खाली ॥ प्र० ॥ ३ ॥

देवच कर्ता करविता. (आ)

एका परमेश्वराशिवाय कांहीं नाहीं. परमेश्वरालाच फक्त सामर्थ्य आहे. त्यानेंच आपणास उत्पन्न केलें व तोच आपला नाश करण्यास किंवा आपणास जिवंत राखण्यास समर्थ आहे. *

१ पद.

मर्जी देवाची देवाची । मिथ्या धांव मनाची† ॥ ध्रु० ॥
मनांत येतें हत्ती घोडे पालखींत बैसावें ।
देवाजीच्या मनांत याला पायीं चालवावें ॥ मर्जी० ॥ १ ॥
लोड तिवासा नरम बिछाना सुंदर कांता व्हावी ।
देवाजीचे मनांत पाठी कर्कशा लावावी ॥ मर्जी० ॥ २ ॥
महालमुलुखमें पूर्ण खजीना घरांत पैका व्हावा ।
देवाजीचे मनांत याला दरिद्री ठेवावा ॥ मर्जी० ॥ ३ ॥
बलुव म्हणे मनांत येतें कांहीं न करावें ।
अहोरात्र सोडून धंदा देवा आळवावें ॥ मर्जी० ॥ ४ ॥

२ अभंग.

आलें देवाचीया मना । तेथें कोणाचें चालेना ॥ १ ॥
हरिश्चंद्र तारा राणी । डोंबा घरीं वाहे पाणी ॥ २ ॥
पांडवांचा साहाकारी । राज्यावरोनि केले दुरी ॥ ३ ॥
तुका म्हणे उगेचि राहा । होईल तें सहज पाहा ॥ ४ ॥

---

* God alone is; God alone has power; He made us, He can kill us and keep us alive.–Carlyle (Heroes II.)

† *Cf.* Man proposes and God disposes.
मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्तु चिंतयेत् ।

भाग ५ वा.

कोणत्या देवाची भक्ति करावी ? (अ)

एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति* ।

—ऋग्वेद १. १६४.४६.

१ श्लोक.

आकाशांत्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेवनमस्कारः केशवं प्रतिगच्छति+ ॥ १ ॥

२ श्लोक.

येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः ।
तेऽपि मामेव कौंतेय यजन्त्यविधिपूर्वकम् ‡॥ १ ॥

३ अभंग.

शिव आणि विष्णू एकचि प्रतिमा । ऐसा ज्याचा प्रेमा सदोदित ॥१॥
धन्य ते संसारीं नर आणि नारी । वाचे हरहरि उच्चारित ॥ २ ॥
नाहीं पैं भेद अवघा मनीं अभेद । द्वेषाद्वेष संबंध उरी नुरे ॥ ३ ॥
सोनार नरहरि न देखे द्वैत । अवघा मूर्तिमंत एकरूप ॥ ४ ॥

४ अभंग.

हरिहरां भेद । नाहीं; करूं नये वाद ॥ १ ॥
एक एकाचे हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ॥ २ ॥

---

* जें मूळांत एक व नित्य (सत्) त्यालाच ज्ञाते निरनिराळीं नांवें देतात.

+ आकाशांतून पडलेलें पाणी ज्याप्रमाणें (एका) सागरासच मिळतें त्याप्रमाणें कोणत्याहि देवाला नमस्कार केला तरी तो केशवाला (परमेश्वराला) पोंचतो.

‡ श्रद्धेनें युक्त होत्साते दुसऱ्या देवतांचे भक्त बनून जे यजन करितात, त्यांचा विधि म्हणजे बाह्योपचार किंवा साधन भिन्न असलें तरी, हे कुंतीपुत्र अर्जुना, ते (पर्यायानें) माझेंच यजन करितात. —गी. ९.२३.

भेदकासी नाड । एक वेलांटीच ओड ॥ ३ ॥
उजवें वाम भाग । तुका म्हणे एक अंग ॥ ४ ॥

५ अभंग.

दोघे सारिखे सारिखे । विश्वनाथ विठ्ठल सखे ॥ १ ॥
एका शोभे भस्मउटी । एका कस्तूरी ललाटीं ॥ २ ॥
एका शोभे व्याघ्रांबर । एका कांसे पितांबर ॥ ३ ॥
एका शोभे रुंडमाळा । एका वैजयंती गळां ॥ ४ ॥
एका शोभे पारवती । एक लक्षुमीचा पति ॥ ५ ॥
एका शोभे नंदी वाहन । एक गरुडस्कंदीं जाण ॥ ६ ॥
तुका म्हणे चराचरा । भेद नाहीं हरिहरां ॥ ७ ॥

कोणत्या देवाची भक्ति करावी ? (आ)

देव आणि प्रतीक. †

१ अभंग.

केला मातीचा पशुपती । परी मातीसि काय महंती ॥
शिवपूजा शिवासी पावे ††। माती मातीमाजी सामावे ॥ १ ॥

---

१ हर या शब्दांतील 'र'ला एक वेलांटी दिली कीं 'हर' याचा 'हरि' झाला !

†† किरात आपणास आटपत नाहीं असें पाहून, अर्जुनानें मातीचें शिवलिंग करून विजयप्राप्त्यर्थ त्याला फुलें वाहिलीं तीं, तो किरात म्हणजे श्रीशंकरच असल्यामुळें, त्या किरताच्या डोक्यावर दिसूं लागलीं या वनपर्वातील गोष्टीचें तात्पर्यहि हेंच आहे.

† उपास्य परब्रह्माचें चिह्न, खूण, अवतार, अंश किंवा प्रतिनिधि म्हणून उपासनेसाठीं जरूर लागणाऱ्या नामरूपात्मक वस्तूस वेदांतशास्त्रांत प्रतीक असें म्हणतात. प्रतीक (प्रति + इक) म्हणजे आपल्याकडे (प्रति) वळलेला असा धात्वर्थ असून, एखाद्या वस्तूची जी बाजू प्रथम आपणास गोचर होऊन तीमुळें पुढें सदर वस्तूचें ज्ञान होतें त्या बाजूस किंवा भागास प्रतीक असें म्हणतात. या न्यायानें

तैसे पूजिती आम्हां संत । पूजा घेतो भगवंत ॥
आम्ही किंकर संतांचे दास । संत पदवी नको आम्हांस ॥ २ ॥
केला पाषाणाचा विष्णु । परि पाषाण नव्हे विष्णु ॥
विष्णुपूजा विष्णुसि अर्पे । पाषाण राहे पाषाणरूपें ॥ ३ ॥

सर्वव्यापी परमेश्वराचें ज्ञान होण्यास त्याची कोणतीहि प्रत्यक्ष बाजू, भाग किंवा अंशरूप विभूति प्रतीक होऊं शकते. जगांतील प्रत्येक वस्तु अंशतः परमेश्वराचेंच रूप असल्यामुळें, परमेश्वराचें सर्वव्यापी रूप ज्यांच्या एकदम लक्षांत भरत नाहीं त्यांनीं हें अव्यक्त व शुद्ध रूप ओळखण्याचें साधन किंवा प्रतीक म्हणून जगांतील अनेक वस्तूंपैकीं कोणतीहि वस्तु प्रथमतः उपासनेसाठीं घेण्यास हरकत नाहीं. कोणी मनाची उपासना करतील, तर कोणी द्रव्ययज्ञ अगर जपयज्ञ करितील. कोणी गरुडाची भक्ति करितील तर कोणी ॐ या मंत्राक्षराचाच जप करीत बसतील. कोणी विष्णूचें तर कोणी शिवाचें, आणि कोणी गणपतीचें तर कोणी भवानीचें भजन करील. कोणी मातापितरांचे ठायीं परमेश्वरबुद्धि ठेवून त्यांची सेवा करील, तर कोणी त्याहून व्यापक अशा सर्वभूतात्मक विराटपुरुषाची उपासना पसंत करील. कोणी म्हणेल सूर्याला भजा, तर कोणी म्हणेल कीं सूर्यापेक्षां कृष्ण किंवा रामचंद्र श्रेष्ठ. पण सर्व विभूति मूळांत एकच होत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. तसेंच हीं प्रतीकें म्हणजे सर्वव्यापी परमेश्वराची ओळख पटण्यासाठीं घेतलेलीं केवळ साधनें होत हेंहि विसरतां कामा नये. मन घ्या, आकाश घ्या, किंवा व्यक्तोपासनामार्गाप्रमाणें शालग्राम घ्या, शिवलिंग घ्या, श्रीकृष्णाची किंवा साधुपुरुषाची व्यक्त मूर्ति मनांत आणा, अथवा शिलामय अगर धातुमय देवाची मूर्ति असलेलें देवालय, किंवा बिनमूर्तीचें मंदिर अगर मशीद घ्या, हीं सर्व लहान पोराच्या पांगुळगाड्याप्रमाणें मन स्थिर करण्याचीं म्हणजे चित्ताची प्रवृत्ति परमेश्वराकडे वळविण्याचीं साधनें होत. ज्याच्या त्याच्या हौसेप्रमाणें घेतलेल्या साध्या, रंगीत, चंदनी किंवा डफ अगर घागऱ्या लाविलेल्या पांगुळगाड्याप्रमाणें अधिकारानुरूप उपासनेसाठीं घेतलेलीं हीं प्रतीकें किती जरी आवडतीं असलीं तरी खरा परमेश्वर या " प्रतीकांत नाहीं "— " न प्रतीके न हि सः " (वे सू. ४.१.४.)—त्यापलीकडे आहे, हें अखेर ओळखिलें पाहिजे. प्रतीक म्हणजे एक प्रकारचें साधन असून खरा सर्वव्यापी व

केली कांशाची जगदंबा । परी कांसें नव्हे अंबा ॥
पूजा अंबेची अंबेला घेणें । कांसें राहे कांसेपणें ॥ ४ ॥

नित्य परमेश्वर कोणत्याहि प्रतीकांत असूं शकत नाहीं असें वेदान्तसूत्राप्रमाणें (वे. सू. ४.१.४.) गीतेंतहि स्पष्ट सांगितलें आहे. फार काय सांगावें ? नामरुपात्मक व्यक्त म्हणजे सगुण अशी कोणतीहि वस्तु घेतली तरी ती मायाच असून खरा परमेश्वर ज्याला पहावयाचा असेल त्यानें आपली दृष्टि अखेर असल्या सगुण रूपापलीकडे पोंचविली पाहिजे. भक्तिमार्गांत मनुष्याला तारण्याची जी शक्ति आहे ती सजीव अगर निर्जीव मूर्तींत किंवा दगडाच्या इमारतींत नसून, या प्रतीकापेक्षां श्रेष्ठ अशी जी ईश्वरभावना सदर प्रतीकाचे ठायीं उपासक आपल्या सोयीसाठीं ठेवीत असतो तीच खरी तारक होय. प्रतीक दगडाचें, धातूचें, किंवा दुसरें कसलेंहि असो प्रतीकापेक्षां त्याची योग्यता कधींहि अधिक होऊं शकत नाहीं. प्रतीकाचे ठिकाणीं जशी तुमची भावना असेल तसें तुमच्या भक्तीचें फल परमेश्वर तुम्हांला देत असतो. खुद्द प्रतीक इच्छित फल कधींहि देऊं शकत नाहीं. कारण कोणतीहि वासना मनांत धरून तुम्ही कोणत्याहि देवतेची आराधना करा, सदर आराधनेचें फल देण्याचें काम सर्वव्यापी परमेश्वराचें आहे, देवतांचें नव्हे, असा अध्यात्मशास्त्राचा कायम सिद्धान्त आहे (वे.सू. ३·२·३८–४१ व गी. ७·२२). शालग्राम हा एक दगड आहे. त्याच्या ठिकाणीं विष्णूचा भाव ठेवाल तर विष्णुलोकाला जाल; आणि त्याच प्रतीकाचे ठिकाणीं यक्षराक्षसादि भूतांची भावना ठेवून त्याला भजाल तर त्या त्या यक्षराक्षसादि भूतांचाच लोक तुम्हांस प्राप्त होईल (गी. ९·२५ व दा. बो. ९·१०·१०–११). फल तुमच्या भावाचें आहे, प्रतीकाचें नाहीं; आणि व्यवहारांतहि मूर्तीची पूजा करण्यापूर्वी तिची प्राणप्रतिष्ठा करण्याचा जो प्रघात आहे त्यांतील मर्म हेंच होय. ज्या देवतेच्या भावनेनें मूर्तीची पूजा करावयाची त्या देवतेची प्राणप्रतिष्ठा तींत करीत असतात. मूर्तीच्या ठायीं परमेश्वराची भावना न ठेवितां मूर्ति म्हणजे कांहीं विशिष्ट प्रकारच्या आकाराची माती, दगड अगर धातु समजून तिची कोणी पूजा करीत नाहीं, आणि केली तर गीतेंतील व दासबोधांतील वरील सिद्धान्ताप्रमाणें त्याला मातीची किंवा दगडाचीच गति प्राप्त होईल हें निर्विवाद आहे. प्रतीक आणि प्रतीकांत ठेविलेला भाव यांचा याप्रमाणें भेद केल्यावर, प्रतीक कोणतेंहि असलें तरी त्याबद्दल तंटा करण्याचें कारणच उरत नाहीं. कारण, प्रतीक म्हण-

ब्रह्मानंद पूर्णामाजी । तुका म्हणे केली कांजी ॥
ज्याचि पूजा तेणेंचि घेणें । आम्हीं पाषाणरूप राहणें ॥ ५ ॥

भाग ६ वा.

भक्ति कशी करावी?

१ अभंग.

अंतरींचें ध्यान । मुख्य या नांवें पूजन ॥ १ ॥
उपाधि तों अवघें पाप । गोड निरसतां संकल्प ॥ २ ॥
आज्ञा पाळावी हा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥ ३ ॥
तुका म्हणे वृत्ति । अविट हे सहज स्थिति ॥ ४ ॥

२ अभंग.

मनोमय पूजा । हेचि पढिये केशीराजा ॥ १ ॥
घेतो कल्पनेचा भोग । न मानेची बाह्य रंग ॥ २ ॥

जेच देव, ही बुद्धि आतां रहात नाहीं. सर्वकामाचें फल देणाऱ्या सर्वसाक्षी परमेश्वराची दृष्टि भक्तांच्या भावाकडे असत्ये. म्हणून "देव भावाचा भुकेला" प्रतीकाचा नव्हे, असें तुकोबांनींहि म्हटलें आहे. भक्तिमार्गाचें हें तत्व ज्याला कळलें त्याच्या मनांत, "मी ज्याची उपासना करितों तेंच ईश्वरस्वरूप किंवा प्रतीक खरें असून इतर प्रतीकें खोटीं" हा दुराग्रह न रहातां, कोणाचें प्रतीक कसेंहि असो, तद्द्वारा परमेश्वराचें भजन करणारे एका परमेश्वरालाच पोंचतात अशी उदार बुद्धि उत्पन्न होत्ये आणि मग "विधि म्हणजे बाह्योपचार किंवा साधन जरी शास्त्रोक्त नसलें तरी इतर देवतांचें श्रद्धेनें (म्हणजे त्यांत शुद्ध परमेश्वराचा भाव ठेवून) भजन करणारे लोक (पर्यायानें) माझेंच यजन करितात" (गी. ९·२३) असें जें भगवंतांनीं म्हटलें आहे त्याचा त्यास प्रत्यय येऊं लागतो.

—गी. र. पृ. ४१४–४२१ वरून.

अंतरींचें जाणे । आदि वर्तमान खुणे ॥ ३ ॥
तुका म्हणे कुडें । कोठें सरे त्याच्यापुढें ॥ ४ ॥

३ अभंग.

नलगे देशकाळ । मंत्रविधानें सकळ ॥
मनेंचि निश्चळ । करूनि करुणा ॥ १ ॥
येतो बैसलिया ठाया । आसनें व्यापी देवराया ॥
निर्मळ ते काया । अधिष्ठान तयाचें ॥ २ ॥
कल्पनेचा साक्षी । तरि आदरेंची लक्षी ॥
आवडीनें भक्षी । कोरडें धान्य मटमटां ॥ ३ ॥
घेणें तरि भाव । लक्षी दासांचा उपाव ॥
तुका म्हणे जीवं । जीवीं मेळविल अनंत ॥ ४ ॥

४ अभंग.

नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥ १ ॥
नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल । येईल तैसा बोल रामकृष्ण ॥ २ ॥
देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंशीं प्रीती भाव-बळें ॥ ३ ॥
तुका म्हणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ॥ ४ ॥

५ अभंग.

प्रीतिचिया बोला नाहीं पेचपाड । भलतेंसें गोड करुनी घेई ॥ १ ॥
तैसें विठ्ठलराया तुज मज आहे । आवडीनें गायें नाम तुझें ॥ २ ॥
वेडे वांकडे बाळकाचे बोल । करिती नवल मायबाप ॥ ३ ॥
तुका म्हणे तुज येवो माझी दया । जीवींच्या सखया जीवलगा ॥ ४ ॥

६ अभंग.

बाळ बापा म्हंणे काका । तरि कां निरपराध पारिखा ॥ १ ॥
जैसा तैसा भाव गोड । पुरवि क्रोड विठ्ठल ॥ २ ॥

साखरेसी म्हणतां धोंडा । तरि कां न तोंडा रुचे † ॥ ३ ॥
तुका म्हणे आरुष बोल । नव्हे खोल आहाच ॥ ४ ॥

७ अभंग.

करावी ते पूजा मनेंची उत्तम । लौकिकाचें काम काय असे । १ ॥
कळावें तयासी कळे अंतरींचें । कारण तें साचें साचा अंगीं ॥ २ ॥
अतिशया अंतीं लाभ किंवा घात । फळ देतें चित्त बीजा ऐसें ॥ ३ ॥
तुका म्हणे जेणें राहे समाधान । ऐसें तें भजन पार पावी ॥ ४ ॥

८ अभंग.

कळेल हें तैसें गाईन मी तुज । जनासवें काय काज माझें ॥ १ ॥
करीन मी स्तुति आपुले आवडी । जैसी माझ्या गोडी वाटे जीवा ॥ २ ॥
होऊनि निर्भर नाचेन मी छंदें । आपुल्या आनंदें करोनियां ॥ ३ ॥
काय करूं कळा युक्ती या कुसरी । जाणिवेच्या परी सकळिका ॥ ४ ॥
तुका म्हणे माझें जया सवें काज । भोळा तो सहज पांडुरंग ॥ ५ ॥

९ अभंग.

नलगे पाहावें अबद्ध वांकडें । उच्चारावें कोडें नाम तुझें ॥ १ ॥
नाहीं वेळ, नाहीं पंडितांचा धाक । होत कां वाचक वेदवक्ते ॥ २ ॥
पुराणींहि कोठें न मिळे पाहतां । तैशीं या अनंता ठेवूं नामें ॥ ३ ॥
आपुलिया मना उपजे आनंद । तैसे करूं छंद कथाकाळीं ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही आनंदचि धालों । आनंदचि ल्यालों अळंकार ॥ ५ ॥

---

† *Cf.* What's in a name? that which we call a rose,
By any other name would smell as sweet.

'नांवांत काय आहे? ज्याला आपण गुलाब म्हणतों त्याला दुसरें कोणतेंहि नांव दिलें तरी त्याचा सुगंध अणुमात्रहि कमी होणार नाहीं.

—शेक्स्पिअर (रोमिओ अॅन्ड ज्युलिएट २·२.

१० अभंग.

नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर । घालूं तुज भार पांडुरंगा ॥ १ ॥
नेणें राग वेळ काळ घात मात । तुझे पायीं चित्त ठेवीं देवा ॥ २ ॥
तुका म्हणे मज चाड नाहीं जना । तुज नारायणा वांचूनियां ॥ ३ ॥

११ अभंग.

गाऊं नेणें कळा कुसरी । कान धरोनि म्हणे हरी ॥ १ ॥
माझ्या बोबडीया बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला ॥ २ ॥
मज हंसतील लोक । परि मी गाईन निःशंक ॥ ३ ॥
तुझे नामीं मी निर्लज्ज । काय जनासवें काज ॥ ४ ॥
तुका म्हणे माझी विनंति । तुम्ही परिसा कमळापती ॥ ५ ॥

१२ अभंग.

माझ्या बोबडीया बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला ॥ १ ॥
तुझ्या नामाची न लाज । जनासंगें काय काज ॥ २ ॥
जन हांसतील लोक । पण मी गाईन निःशंक ॥ ३ ॥
वेडें वांकडें गाईन । परी तुझाची म्हणवीन ॥ ४ ॥
नामा म्हणे कमळापती । माझी परिसावी विनंती ॥ ५ ॥

प्रकरण २ रें.

भक्ति.

कर्तव्य कर्म पहिलें ईश्वरभक्ती मनांत बाणावी ॥

भाग १ ला.

ईश्वर करतो तेंच आपल्या हिताचें असतें.

तुका म्हणे हित कोणिये जातीचें । तुज ठावें सावें मायबापा ।
देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें हित निश्चित ॥

—दा. बो. ४·८·२२.

१ गद्य. (भाषांतर.)*

आम्ही ईश्वरी इच्छा **शिरसामान्य** केली पाहिजे. ऐहिक बाबतींत काय किंवा पारलौकिक बाबतींत काय परमेश्वर वाटेल तें करो, त्याच्यावर पूर्ण हवाला ठेवून राहणें यांतच आमचें सारें सामर्थ्य आहे. तो

---

* We must submit to God. Our whole strength lies in resigned submission to Him, whatsoever He do to us. For this world and for the other. The thing He sends to us, were it death and worse than death, shall be good, shall be best; we resign ourselves to God. It has ever been held the highest wisdom for a man not merely to submit to Necessity—Necessity will make him submit—but to know and believe well that the stern thing which Necessity had ordered was the wisest, the best, the thing wanted there. —Carlyle (Heroes II.)

आम्हांस कोणत्याहि स्थितींत ठेवो—मग तो प्रत्यक्ष मृत्यु असो किंवा मृत्यू-हूनहि वाईट असो—त्यांतच आमचें कल्याण आहे. म्हणून मनुष्यानें आपला जीव सर्वस्वीं परमेश्वराच्या हवालीं करावा. मनुष्याचा ज्ञातेपणा दुर्निवार दैवगतीपुढें मान वांकविण्यांत नसून—कारण दैवगति मनुष्याची शेंडी धरून त्याची मान खालीं वांकवील—दैवानें योजिलेली तीव्रतर स्थिति हींच शहाणपणाची व अत्युत्तम असून, तिचीच त्या ठिकाणीं जरूरी होती हें उमजणें व अंतःकरणाची तशी पक्की, अढळ भावना ठेवणें यांतच खरा ज्ञातेपणा आहे.

२ गद्य (भाषांतर)*

तुमच्या आयुष्यांत घडून येणारी प्रत्येक गोष्ट—प्राप्त होणारी प्रत्येक स्थिती ही सर्वज्ञानी परमेश्वरानें तुमच्या नैतिक उन्नतीसाठीं योजिलेली असत्ये; आणि जो जगच्चालक प्रभु यःकश्चित् चिमणीवरसुद्धां आपली नजर ठेवितो व धान्याचा कण कोठें मिळेल हें तिला शिकवितो—तोच दयाघन प्रभु तुमच्या परिस्थितींतील सर्व गोष्टींचीं सूत्रें हालवित असतो; आणि प्रत्येक गोष्ट तुमच्या नैतिक उन्नतीस साहाय्यक व्हावी अशीच त्याची योजना असत्ये.

---

* Every thing, every circumstance in our condition is designed by Infinite Wisdom as a part of our moral discipline; and He who watches the sparrow when she alights, and directs her how and where to find a grain of food—He directs all things relating to your situation; and He designs to have every thing contribute to your moral improvement.—Todd (Student's Manual ch. IX.)

३ गद्य (भाषांतर)*

आपल्या दुःस्थितीबद्दल मनुष्य परमेश्वरास दोष देत असतो. पण ही केवढी चूक आहे ! कारण मनुष्याचें श्रेय कशांत आहे हें त्यालाच यथार्थपणें कळतें. आणि ज्या मनुष्याला ज्या वस्तूंचा अगदीं योग्य रीतीनें उपयोग करतां येईल त्यालाच तो त्या वस्तू देत असतो. कारण ज्याची मनुष्याला अतिशय आवड त्यांतच त्याचें कल्याण असतें असें मुळींच नाहीं; तसेंच जी वस्तु दृष्टीससुद्धां नकोशी वाटत्ये ती अगदीं टाकाऊ असत्ये असेंहि नाहीं. तर ईश्वरानें ज्याला जें दिलें आहे त्यांतच त्यानें संतुष्ट असणें हेंच युक्त होय.

४ अभंग.

बरें झालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ॥ १ ॥
अनुतापें तुझें राहिलें चिंतन । झाला हा वमन संवसार ॥ २ ॥
बरें झालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्यें ॥ ३ ॥
बरें झालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरें गुरें * ॥ ४ ॥

---

* In vain do men

The Heavens of their fortune's fault accuse,
Sith[1] they[2] know best what is the best for them[3];
For they[2] to each such fortune do diffuse
As they[2] do know each can most aptly use.
For not that which men covet most is best,
Nor that thing worst which men do most refuse;
But fittest is, that all conetnted rest,
With that they hold.

—*Edmund Spenser.*

* *Cf.* Blessed be ye poor; for yours is the kingdom of God.
—Luke VI. 20.

---

1 Since. 2 the Heavens. 3 Men.

बरें झालें नाहीं धरिली लोकलाज । बरा आलों तुज शरण देवा ॥ ५ ॥
बरें झालें तुझें केलें देवाईल । लेंकरें बाईल उपेक्षिलीं ॥ ६ ॥
तुका म्हणे बरें व्रत एकादशी । केलें उपवासी जागरण ॥ ७ ॥

५ अभंग.

बरा देवा कुणबी झालों । नाहीं तरि दंभें असतों मेलों ॥ १ ॥
भलें केलें देवराया । नाचे तुका लागे पाया ॥ २ ॥
विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ॥ ३ ॥
सेवा चुकतों संतांची । नागवण हे फुकाची ॥ ४ ॥
गर्व होता ताठा । जातों यमपंथें वाटा ॥ ५ ॥
तुका म्हणे थोरपणें ॥ नरक होती अभिमानें ॥ ६ ॥

६ अभंग.

बाप मेला न कळतां । नव्हती संसाराची चिंता ॥ १ ॥
विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ॥ २ ॥
बाईल मेली मुक्त झाली । देवें माया सोडवीली ॥ ३ ॥
पोरें मेलीं बरें झालें । देवें मायाविरहित केलें ॥ ४ ॥
माता मेली मजदेखतां । तुका म्हणे हरली चिंता ॥ ५ ॥

७ अभंग.

देव भक्तालागीं करूं नेदी संसार । अंगें वारावार करीतसे ॥ १ ॥
भाग्य द्यावें तरी अंगीं भरे ताठा । म्हणोनि करंटा करोनि ठेवी ॥ २ ॥
स्त्री द्यावी गुणवंती नसती गुंते आशा । यालागीं कर्कशा पाठी लावी ॥ ३ ॥
तुका म्हणे मज प्रचित आली देखा । आणिक या लोकां काय सांगों † ॥ ४ ॥

---

† *Cf.* Heaven is not always angry when He strikes
But most chastises those whom most He likes.
—John Pomfret.

भाग २ रा.

भक्तिच सर्वश्रेष्ठ. §

अ. भागवत धर्माचें लक्षण.

जें जें जेथें पावे । तें तें समर्पावें सेवे ॥ १ ॥
सहज पूजा याचि नांवें । गळित अभिमानें व्हावें ॥ २ ॥

१ ओंव्या.

हैतुक अथवा अहैतुक । वैदिक लौकिक स्वाभाविक ।
भगवंतीं अर्पे सकळिक । या नांव देख भागवतधर्म ॥ १ ॥
जंव दृष्टी देखे दृश्यातें । तंव देवोचि देखे तेथें ।
यापरी दर्शनातें । अर्पी भजनसत्ते दृष्टीचा विषयो ॥ २ ॥
श्रवणेंचि यापरी श्रवण । करितां उठिलें ब्रह्मार्पण ।
हेतुरहित भगवद्भजन । स्वभावें जाण स्वयें होतें ॥ ३ ॥
जो सुमना सुमनपण जोडी । तो घ्राणाचें घ्राण होय आवडी ।
मग नाना सुवास परवडी । ब्रह्मार्पण मोडी निजभोग अर्पी ॥ ४ ॥
रसना रस घेऊं जाये । तंव रसास्वाद देवाचि होये ।
मग रसनेमाजी येऊनि राहे । ब्रह्मार्पण पाहे रसभोगवृत्ती ॥ ५ ॥

---

§ या भागांत दिलेल्या एकनाथी भागवतांतील ओंव्यावर कै. न्या. मू. रानडे यांनीं आपल्या धर्मपर व्याख्यनांत केलेलें उत्कृष्ट विवरण ('न्या. मू. रानडे यांची धर्मपर व्याख्यानें' या पुस्तकांतील पहिलीं ५ व्याख्यानें पहा) अवश्य वाचावें. या ओंव्या प्रायः त्या पुस्तकनुसारच घेतल्या असून भक्तिमार्गाची इतर मार्गांशीं तुलना व तो सुलभ असल्यामुळें त्याची श्रेष्ठता एथें दाखविण्याची कल्पनाहि त्याच पुस्तकावरून आम्हांस सुचली.

स्पर्श घेइजे निजदेहीं । तंव देहींच प्रगटे विदेही ।
मग स्पर्शी जें जें कांहीं । तो तो भोगूं पाही ब्रह्मार्पणें उठी † ॥ ६ ॥
जेउतें जेउतें चालवी पाये । तों तों मार्गु देवोचि होये ।
मंग पाउलापाउलीं पाहे । निजभजन होय ब्रह्मार्पणेंशीं ॥ ७ ॥

२ श्लोक.

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् ।
करोति यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् * ॥ १ ॥

३ श्लोक.

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोसि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ** ॥ १ ॥

४ अभंग.

राम म्हणे ग्रासोग्रासीं । तोचि जेविला उपवासी †† ॥ १ ॥
धन्य धन्य तें शरीर । तीर्थव्रतांचें माहेर ॥ २ ॥
राम म्हणे करितां धंदा । सुखसमाधि त्या सदा ॥ ३ ॥

---

† *Cf.* No, I will never shut the doors of my senses. The delights of sight and hearing and touch will bear thy delight.

छे ! मीं आपलीं इन्द्रियद्वारें कधींहि बंद करणार नाहीं. माझे चक्षु, श्रवण, व स्पर्श यांच्या द्वारें (हे परमेश्वरा !) मला तुझाच आनंद लाभत आहे.—गी. अं. ७३.

*काया, वाचा, मन, इंद्रियें, बुद्धि अगर आत्मा यांच्या प्रवृत्तीनें किंवा स्वभावानुसार जें कांहीं आपण करितों तें सर्व परात्पर नारायणाला समर्पण करावें. —भागवत. ११·२·३६·

** तूं जें करितोस, जें खातोस, जें हवन करितोस, जें दान करितोस तें सर्व, हे कौंतेया ! मला अर्पण करीत जा. —गी. ९·२७.

†† भगवद्भक्त आपल्या खाण्यापिण्याचेहि व्यवहार कृष्णार्पणबुद्धीनेंच करीत असतात. भक्तिमार्गातील लोक भोजनाचे वेळीं घांस घेतांना ' गोविंद ' ' गोविंद ' असें जें म्हणतात त्यांतील बीजहि कृष्णार्पणबुद्धिच होय. —गी. र. पृ. ४३०.

राम म्हणे वाट चाली । यज्ञ पाउलापाउलीं ॥ ४ ॥
राम म्हणे भोगीं त्यागीं । कर्म न लिंपे त्या अंगीं ॥ ५ ॥
ऐसा राम जपे नित्य । तुका म्हणे तो जीवन्मुक्त ॥ ६ ॥

५ श्लोक.

वदनिं कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचें ।
सहज हवन होतें नाम घेतां फुकाचें ॥
जिवन करि जिवित्वा अन्न हें पूर्ण ब्रह्म ।
उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ॥ १ ॥

आ. भक्तिमार्ग आणि इतरमार्ग.

भक्तिमार्ग आणि योगमार्ग.

१ ओंव्या.

इंद्रियें कोंडितां न कोंडती । विषय सांडतां न सांडती ।
पुढत पुढतीं बाधों येती । यालागीं हरिभक्ति द्योतिली वेदें † ॥ १ ॥
इंद्रियें कोंडावीं न लागती । सहज राहे विषयासक्ति ।
एवढें सामर्थ्य हरिभक्तीं । जाण निश्चितीं नृपवर्या ॥ २ ॥

---

† काम, क्रोध इत्यादि मनुष्याचे षड्रिपु कधीं नाश पावतील ? असा प्रश्न केला असतां भगवान् म्हणाले " जोंपर्यंत त्यांचा रोंख जग आणि जगांतील वस्तु यांच्याकडेच असतो, तोंपर्यंत ते शत्रु असतात; परंतु तोच ईश्वराकडे वळला, कीं, ते मनुष्याचे उत्तम मित्र होतात. कारण नंतर ते त्याला ईश्वराप्रत नेतात. ऐहिक वस्तूकरितां काम असतो तो ईश्वरभजनीं काम व्हावा; जातिबांधवांविषयीं राग असतो तो ईश्वरावें दर्शन लवकर होत नाहीं म्हणून ईश्वराकडे लावावा. याप्रमाणें सारे मनोविकार ईश्वराकडे लावावेत. हे मनोविकार समूळ नाहींसे करितां येत नाहींत; त्यांना योग्य वळण मात्र देतां येईल. —रा. बो. व. ४४१.

योगी इन्द्रियें कोंडिती । ते भक्त लाविती भगवद्भक्तीं ।
योगी विषय जे त्यागिती । ते भक्त अर्पिती भगवंतीं ॥ ३ ॥
योगी विषय त्यागिती । त्यागितां देहदुःखी होती ।
भक्त भगवंतीं अर्पिती । तेणें होती नित्यमुक्त ॥ ४ ॥
दारा सुत गृह प्राण । करावे भगवंतासी अर्पण † ।
हे भागवतधर्म पूर्ण । मुख्यत्वें भजन या नांव ॥ ५ ॥

२ अभंग.

नको सांडूं अन्न नको सेवूं वन । चिंतीं नारायण सर्व भोगीं ॥ १ ॥
मातेचिया खांदीं बाळ नेणे सीण । भावना त्या भिन्न मुंडाविया ॥ २ ॥
नको गुंतों भोगीं नको पडों त्यागीं । लावुनि सरें अंगीं देवाचिया ॥३॥
तुका म्हणे नको पुसों वेळोवेळां । उपदेश वेगळा उरला नाहीं ॥ ४ ॥

भक्तिमार्ग आणि ज्ञानमार्ग.

३ ओंव्या. (१)

न करितां वेदशास्त्रव्युत्पत्ति । ऐशिया अज्ञाना निजात्मप्राप्ति ।
सुगम जोडे ब्रह्मस्थिति । यालागीं हरिभक्ति प्रकाशिली देवें ॥ १ ॥
तें हें राया भागवत जाण । मुख्यत्वें भक्ति प्रमाण ।
भावें करितां भगवद्भजन । अज्ञान जन उद्धरती ॥ २ ॥
स्त्री-शूद्रादि अवघे । घालूनियां ये नावे ।
एकेच खेपे स्वयें न्यावे । भजनभावें परतीरा ॥ ३ ॥
येथें पोहणे याविण उतरणें । प्रयासेंविण प्राप्ति घेणें ।
सुखापायें ब्रह्म पावणें । यालागीं नारायणें प्रकाशिली भक्ति ॥ ४ ॥

---

† कुटुंबांतील सर्व खटलीं आपलीं नव्हेत, तीं ईश्वराचीं आहेत, आपण त्याचे सेवक आहों, आणि त्याची आज्ञा पाळण्यासाठीं येथें आलों आहों, असा विचार नेहमीं मनांत बाळगा. ही भावना मनुष्याच्या मनांत चांगली बिंबली म्हणजे 'माझें' असें त्याचें कांहींच उरत नाहीं. —रा. बो. व. २१८.

४ अभंग. (२)

ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठी लागे ॥ १ ॥
म्हणोनियां ऐसे सांडिले उपाय । धरियेले पाय दृढ तुझे ॥ २ ॥
वेदपरायण पंडित वाचक । न मिळती एक एकामधीं ॥ ३ ॥
पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें देखें चेष्टा विपरीत ॥ ४ ॥
आपुलिया नाहीं निवाले जे अंगें । योगी करिती रागें गुरूगुरू ॥ ५ ॥
तुका म्हणे मज कोणाचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ॥६॥

५ अभंग. (३)

भक्तिप्रेमाविण ज्ञान नको देवा । अभिमान नित्य नवा तयामाजीं ॥ १ ॥
प्रेमसुख देईं प्रेमसुख देईं । प्रेमेंवीण नाहीं समाधान ॥ २ ॥
रांडवेनें जेविं शृंगारू पैं केला । प्रेमेंविण झाला ज्ञानी तैसा † ॥ ३ ॥
एका जनार्दनीं प्रेम अति गोड । अनुभवी सुखाड जाणतील ॥ ४ ॥

६ अभंग. (४)

गोड नांवें क्षीर । परी साकरेचा धीर ॥ १ ॥
तैसें जाणा ब्रह्मज्ञान । बापुडें तें भक्तीविण ॥ २ ॥
रुची नेदी अन्न । त्यांत नसतां लवण ॥ ३ ॥
आंधळ्यांचे श्रम । सीकविल्याचेची नाम ॥ ४ ॥
तुका म्हणे वीणा । तारांवीण व्यर्थ जाणा ॥ ५ ॥

---

† जरी झाला वेदशास्त्रसंपन्न । जयासी न कळे भक्तिमहिमान । तो जाणावा चांडाळासमान । कीं त्याहून तो अधिक ॥१॥ —श्रीधरकृत जै. अ. १७-२१२.

१ अन्वय—आंधळ्यांचे शिकविल्याचे श्रम नामची–म्हणजे त्यांला शिकविलें तर फक्त शिकविलें इतकेंच म्हणतां येईल. म्हणजे शब्द मात्र ते उच्चारतील, त्यांला रूप प्रत्यक्ष नसल्यामुळें शिकल्यापासून खरें सुख अथवा खरें ज्ञान होणार नाहीं. —न.

भक्तिमार्ग आणि कर्ममार्ग.

७ ओंव्या. (१)

जो श्रुति स्मृति नेणता । भावें भजे भगवत्पथा ।
त्यासि विधि-निषेध-बाधकता । स्वप्नींही सर्वथा प्रमाद न घडे ॥ १ ॥
श्रुति स्मृति हे दोनी डोळे । तेणेंवीण जे आंधळे ।
तेही हरिभजनीं धांवतां भावबळें । पडे ना अडखुळे सप्रेमयोगें ॥२॥
ऐसे आचरितां भागवतधर्म । बाधूं न शके कर्माकर्म ।
कर्मासी ज्याची आज्ञा नेम । तो पुरुषोत्तम भजनामाजी ॥ ३ ॥
एवं भागवतधर्मे जे सेवक । स्वधर्मकर्म त्यांचे रंक ।
तें राहों न शके त्यांसम्मुख । मा केविं बाधक हों शंकेल ॥ ४ ॥

८ श्लोक. (२)

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते ।
ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोकमश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥ १ ॥
ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।
एंव त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते ॥ २ ॥ *

---

१ भक्तिप्रेमामुळें न पडतां, न अडखळतां धांवतात !

२ विधिनिषेध हे भगवद्भक्ताचे दासानुदास असतात. ते त्यांजपुढें नुसते उभे-देखील राहूं शकत नाहींत; मग (मा) बाधा करण्याची गोष्ट कशाला ?

* (१) त्रैविद्य म्हणजे ऋक्, यजु व साम या तीन वेदांतील कर्मे करणारे जे सोमपी म्ह०सोमयाजी व निष्पाप (पुरुष) माझें यज्ञानें पूजन करून स्वर्गलोक-प्राप्तीची इच्छा करितात, ते इंद्राच्या पुण्यलोकास पोंचून स्वर्गात देवांचे अनेक दिव्य भोग उपभोगितात. (२) आणि त्या विशाल स्वर्गलोकाचा उपभोग घेऊन पुण्याचा क्षय झाल्यावर ते (पुनः जन्म घेऊन) मृत्युलोकीं येतात. अशा प्रकारें त्रयीधर्म म्हणजे तीन वेदांतील यज्ञयागादि श्रौतधर्म पाळणाऱ्या व काम्य उपभोगची इच्छा ठेवणाऱ्या लोकांस (स्वर्गाच्या) येरझाऱ्या प्राप्त होतात. — गी. ९-२०-२१.

९ पद. (३)

रामनाम तुम भजले प्यारे, कायकूं मगरुरी करता है ।
कची मटीका बंगला तेरा पाव पलकमों ढलता है ॥ ध्रु० ॥
ब्रम्मन होकर पुरान बाचे, स्नान तर्पन करता है ।
सर्व काल सुचिल रहे तो, यौं क्या साहेब मिलता है ॥ राम० ॥ १ ॥
जोंगी होकर जटा बढावे, हालमस्तमें रहता है ।
उप्पर धरकर हात सुकावे, यौं क्या साहेब मिलता है ॥ रा० ॥ २ ॥
मानभान पेहने काले कपरे, दाढी मुछी मुंडता है ।
उलटी लकरी हात पकडकर, यौं क्या साहेब मिलता है ॥ रा० ॥ ३ ॥
मुलना होकर बांग पुकारे, वो क्या साहेब बहिरा है ।
मुंगी पावका आवाज बाजे, ओबी अल्ला सुनता है ॥ रा० ॥ ४ ॥
जंगम होकर लिंग बंधावे, घर घर लेकर फिरता है ॥
शंख बजाकर भिक्षा मागे, यौं क्या साहेब मिलता है ॥ रा० ॥ ५ ॥
कहत कबीरा सुन भाई साधु, मनकी माला जपता है ।
भावभगतिसें ध्यान धरत है, उनकूं साहेब मिलता है ॥ राम० ॥ ६ ॥

१० अभंग (४)

जप तप कर्म क्रिया धर्म साधन । वाउगें बंधन उपाधीचें ॥ १ ॥
येणें काय घडे साधन सर्वथा । वाउगाचि शीण व्यथा होत आहे ॥२॥
सांवता म्हणे सार कंठीं धरा नाम । नको दुजा नेम वाउगाची ॥ ३ ॥

११ अभंग. (५)

वेदाध्ययन करिसी तरी वैदिकचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥
पुराण सांगसी तरी पुराणिकचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥
गायन करिसी तरी गुणीजन होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥
यज्ञ करिसी तरी याज्ञिकचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥
कर्म आचरसी तरी कर्मठचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥
तीर्थ करिसी तरी कापडिच होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥
नामा म्हणे नाम केशवाचें घेसी । तरीच वैष्णव होसी अरे जना ॥ ७ ॥

१२ अभंग. (६)

वर्णाश्रम करिसी चोख । तरि तूं पावसी उत्तम लोक ॥ १ ॥
परि तें तुज नाहीं ठावें । जेणें अंगें ब्रह्म व्हावें ॥ २ ॥
जरि तूं जालासी पंडित । करिसी शब्दांचें पांडित्य ॥ ३ ॥
गासी तान मान बन्ध । हाव भाव गीत छंद ॥ ४ ॥
जाणसील तूं स्वतंत्र । आगमोक्त पूजायंत्र ॥ ५ ॥
साधनाच्या ओढी । डोळियांच्या मोडामोडी ॥ ६ ॥
तुका म्हणे देही । संत जाहाले विदेही ॥ ७ ॥

१३ अभंग. (७)

मन-वाचातीत तुझें हें स्वरूप । म्हणोनियां माप भक्ति केलें ॥ १ ॥
भक्तीचिया मापें मोजितों अनंता । इतरानें तत्वतां न मोजवे ॥ २ ॥
योग-याग-तपें देहाचिया योगें । ज्ञानाचिया लागें न सांपडसी ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही भोळ्या भावें सेवा । ध्यावी जी केशवा करितों ऐसी ॥४॥

इ. भक्तिच सर्वश्रेष्ठ.

१ अभंग.

घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्ता आत्मस्थिति सांडवीन ॥ १ ॥
ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देवा ऐसा ॥ २ ॥
तीर्थभ्रामकासी आणीन आळस । कडु स्वर्गवास करीन भोग ॥ ३ ॥
सांडवीन तपोनिधा अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ॥ ४ ॥
भक्ति-भाग्य-प्रेमा साधीन पुरुषार्थ । ब्रह्मींचा जो अर्थ निज ठेवा ॥ ५ ॥
धन्य म्हणवीन इहलोकीं लोकां । भाग्य आम्ही तुका देखियेला ॥ ६ ॥

२ अभंग.

सोन्याचे पर्वत करवती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरु ॥ १ ॥
परि या दुर्लभ विठोबाचे पाय । तेंथें हे उपाय न सरती ॥ २ ॥

अमृतें सागर भरवती गंगा । म्हणवेल उगा राहें काळा ॥ ३ ॥
भूत भविष्य कळों येईल वर्तमान । करवती प्रसन्न ऋद्धिसिद्धि ॥ ४ ॥
स्थानमान कळों येती योगमुद्रा । नेववेल वारा ब्रह्मांडासी ॥ ५ ॥
तुका म्हणे मोक्ष राहे ऐलीकडे । इतर बापुडें काय तेथें ॥ ६ ॥

३ अभंग.

मोक्षाचें आम्हांस नाहीं अवघड । तो असे उघड गांठोळीस ॥ १ ॥
भक्तीचे सोहाळे होतील जीवासी । नवल तेविशीं पुरवितां ॥ २ ॥
ज्याचें त्यासी देणें कोणतें उचित । मानूनियां हित घेतों सुखें ॥ ३ ॥
तुका म्हणे सुखें देई संवसार । आवडीसी थार करीं माझे ॥ ४ ॥

४ अभंग.

साकरेचें नाम घेतां कळे गोडी । तैसी आम्हां जोडी वैष्णवांची ॥ १ ॥
मोक्ष गांठी असे ठेविला बांधोनी । सोस तो भजनीं आवडीचा ॥ २ ॥
भोजनाची चिंता माय वाहे बाळा । आम्हां तरी खेळावरी चित्त ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हीं देहउपकारें । गाऊं निरंतर नाचों लागों ॥ ४ ॥

५ अभंग.

मोक्षपदें तुच्छ केलीं या कारणें । आम्हां जन्म घेणें युगायुगीं ॥ १ ॥
विटेऐसें सुख नव्हे भक्तिरस । पुढतपुढती आस सेवावें हें ॥ २ ॥
देवाहातीं रूप धरवूं आकार । नेदूं निराकार होऊं त्यासी ॥ ३ ॥
तुका म्हणे चित्त निवांत राहिलें । ध्याईं तीं पाउलें विटेवरी ॥ ४ ॥

६ अभंग.

हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥
नलगे मुक्ती धनसंपदा । संतसंग दे गा सदा ॥ ३ ॥
तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥ ४ ॥

७ श्लोक.

स्वकर्मफलानिर्दिष्टां यां यां योनिं व्रजाम्यहम् ।
तस्यां तस्यां हृषीकेश ! त्वयि भक्तिर्दृढाऽस्तुमे ॥ १ ॥ *

८ श्लोक.

या प्रीतिरविवेकानां विषयेष्वनपायिनी ।
त्वामनुस्मरतः सा मे हृदयान्माऽपसर्पतु † ॥ १ ॥ **

९ पद.

देईं प्रेम मजला ॥ गुरुजी ॥ देईं प्रेम मजला ॥ ध्रु० ॥
नलगे विरंति नलगे मुक्ति । भक्ति दे मजला ॥ गु० ॥ १ ॥
अंतर्बाह्य तूंचि नांदसी । कोठें पाहूं तुजला ॥ गु० ॥ २ ॥
प्रेमामृतें तृप्त होउनी । दृत्त भजनीं रमला ॥ गु० ॥ ३ ॥

१० पद.

जाणों हरिचे पाय । आम्ही जाणों हरिचे पाय ॥ ध्रु० ॥
नेम न जाणों यमहि न जाणों । नेणों अन्य उपाय ॥ आम्ही० ॥ १ ॥
परिसा देउनी सोनें घेणें । जळों त्याचा व्यवसाय ॥ आ० ॥ २ ॥
कृष्णाचें पद सोडुनि आम्हीं । मुक्ति वरूं हायहाय ॥ आ० ॥ ३ ॥

११ अभंग.

दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो नारायणा ॥ १ ॥
आतां मज ऐसें करीं । तुझे पाय चित्तीं धरीं ॥ २ ॥

---

* स्वकर्मफलानुसार ज्या ज्या योनीमध्यें माझा जन्म होईल त्या त्या योनीमध्यें हे हृषीकेशा ! माझी तुझ्या ठायीं दृढ भक्ति राहो.

** अविवेकी पुरुषांची विषयांच्या ठिकाणीं जी अढळ प्रीति असत्ये तशी प्रीति तुझें स्मरण करीत असतांना माझ्या हृदयांतून दूर न होवो.

† जैशी अभिरुचि विषयीं तैशी परमेश्वरीं जडेल जरी । मग त्या ईशकृपेनें चारी पुरुषार्थ राबतील घरीं ॥ १ ॥ —मोरोपंत.

उपजला भावो । तुमचे कृपे सिद्धि जावो ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां । लाभ नाहीं यापरता ॥ ४ ॥

१२ अभंग.

न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ॥ १ ॥
ऐसी माझी वाणी मज उपदेशी । आणिकां लोकांसी हेंचि सांगे ॥ २ ॥
विटंबो शरीर होत कां विपत्ति । परि राहो चित्तीं नारायण ॥ ३ ॥
तुका म्हणे नाशिवंत हें सकळ । आठवे गोपाळ तेंचि हित ॥ ४ ॥

१३ अभंग.

पोटापुरतें काम । परि अगत्य तो राम ॥ १ ॥
कारण तें हेंचि करीं । चित्तीं पांडुरंग धरीं ॥ २ ॥
प्रारब्धीं हेवा । जोडीं देवाची ते सेवा ॥ ३
तुका म्हणे बळ । बुद्धि वेंचूनि सकळ ॥ ४ ॥

ई. देवा, भक्तिसुख दे.

१ अभंग.

नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिति भाव । मी भक्त तूं देव ऐसें करीं ॥ १ ॥
दावीं रूप मज गोपिकारमणा । ठेवीन चरणावरी माथा ॥ २ ॥
पाहीन श्रीमुख देईन आलिंगन । जीवें निंबलोण उतरीन ॥ ३ ॥
पुसतां सांगेन हितगुज मात । बैसोनि एकांत सुखगोष्टी ॥ ४ ॥
तुका म्हणे यासी न लावीं उशीर । माझें अभ्यंतर जाणोनियां ॥ ५ ॥

२ अभंग.

आत्मस्थिती मज नको हा विचार । देई निरंतर चरणसेवा ॥ १ ॥
जन्मोजन्मीं तुझा दास पुरुषोत्तमा । हेचि गोडी माझ्या देई जीवा ॥ २ ॥
काय सायुज्यता मुक्ति होचि गोड । देव-भक्त-कोड तेथें नाहीं ॥ ३ ॥
काय ते निर्गुण पाहों कैशा परी । वर्णूं तुझी हरि कीर्ती कैसी ॥ ४ ॥

गोड चरणसेवा देवभक्तपणें । मज देवा झणें दुराविसी ॥ ५ ॥
जाणिवेपासुनी सोडविं माझ्या जीवा । देई चरणसेवा निरंतर ॥ ६ ॥
तुका म्हणे गोडा गोड नलगे प्रीति । सेवेविण चित्तीं सार नाहीं ॥ ७ ॥

३ अभंग.

पांडुरंगा कांहीं आइकावी मात । न करावें मुक्त आतां मज ॥ १ ॥
जन्मांतरें मज तैसीं देई देवा । जेणें चरणसेवा घडे तुझी ॥ २ ॥
वाखाणीन कीर्ती आपुलिया मुखें । नाचेन मी सुखें तुज पुढें ॥ ३ ॥
करूनि कामारी दास दीनाहुनी । आपुल्या अंगणीं ठाव मज ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही मृत्युलोकीं भले । तुझेचि अंकिले पांडुरंगा ॥ ५ ॥

४ अभंग.

कोटी जन्म घेइन देवा । करीन सेवा तुमचीच ॥ १ ॥
भुक्ति मुक्ति नका आड । घालूं सांकडें मज वाटे ॥ २ ॥
काय करूं ते आत्मस्थिति । खंडन करिती भजनाचें ॥ ३ ॥
निळा म्हणे राहों ठायीं । विश्वास पायीं तुमचिये ॥ ४ ॥

५ अभंग.

नको तुझें ज्ञान नको तुझा मान । माझें आहे मन वेगळेंचि ॥ १ ॥
नको तुझी भुक्ति नको तुझी मुक्ति । मज आहे विश्रांति वेगळीच ॥ २ ॥
चरणीं ठेवुनि माथा विनवितो सांवता । ऐका पंढरिनाथा करीन पूजा ॥ ३ ॥

६ अभंग.

तुज मागणें तें देवा । आम्हां तुझी चरण-सेवा ॥ १ ॥
आन नेघों देसी तरी । ऋद्धि सिद्धि मुक्ति चारी ॥ २ ॥
संतसंगती सर्व काळ । थोर प्रेमाचा सुकाळ ॥ ३ ॥
तुका म्हणे नाम । तेणें पुरे माझें काम ॥ ४ ॥

७ अभंग.

शांति आणि क्षमा हे तुमचे उपाय । दंभ प्रपंच-भय निवारावें ॥ १ ॥

ज्ञान-वैराग्य-श्रद्धायुक्त हें भजन । मज होंचि प्रमाण देईं देवा ॥ २ ॥
विनवी पात्रा कान्हो अहो दीननाथा । चरणीं असो माथा सर्वकाळ ॥३॥

८ अभंग.

मोक्ष तुमचा देवा । तुम्ही दुर्लभ तो ठेवा ॥ १ ॥
मज भक्तीची आवडी । नाहीं अंतरीं ते गोडी ॥ २ ॥
आपुल्या प्रकारा । करा जतन दातारा ॥ ३ ॥
तुका म्हणे भेटी । पुरे एकचि शेवटीं ॥ ४ ॥

९ अभंग.

भक्तिप्रेमसुख नेणवे आणिकां । पंडित वाचकां ज्ञानियांसी † ॥ १ ॥
आत्मनिष्ठ जरी झाले जीवन्मुक्त । तरी भक्तिसुख दुर्लभ त्यां ॥ २ ॥
तुका म्हणे कृपा करिल नारायण । तरिच हें वर्म पडे ठायीं ॥ ३ ॥

१० अभंग.

जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ॥ १ ॥
आणिक नये माझ्या मना । हो कां पंडित शाहाणा ॥ २ ॥
नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ॥ ३ ॥
तुका म्हणे नवविध । भक्ति § जाणे तोचि शुद्ध ॥ ४ ॥

११ अभंग.

काय करावे ते संपत्तीचे लोक । जानकीनायक जेथें नाहीं †† ॥ १ ॥

---

† जयांचा ईश्वरीं जिव्हाळा । ते भोगिती स्वानंदसोहळा । जयांचा जनावेगळा । ठेवा अक्षयी ॥ १ ॥ —दा. बो. ३.१०.३१.

§ श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ १ ॥ —भाग. ७.५.२३.

†† *Cf.* As my days pass in the crowded market of this world and my hands grow full with the daily profits, let me ever feel that I have gained nothing—let me not forget for a moment,

जेथें नाहीं माझा श्रीरामसमर्थ । त्याचें जिणें व्यर्थ कोटी गुणें ॥ २ ॥
कोटी गुणें व्यर्थ जिणें त्या नराचें । जानकीवराचें नांव नाहीं ॥ ३ ॥
नाम नाहीं मनीं नाहीं जो कीर्तनीं । तया कां जननी प्रसवली ॥ ४ ॥
प्रसवली परी झाला भूमीभार । दुस्तर संसार उलंघेना ॥ ५ ॥
उलंघेना एक रामनामेंविण । रामदास खूण सांगतसे ॥ ६ ॥

१२ अभंग.

आगी लागो तया सुखा ॥ जेणें हरि नये मुखा ॥ १ ॥
मज होत कां विपत्ती । पांडुरंग राहो चित्तीं ॥ २ ॥
जळो तें समूळ । धन संपत्ति उत्तम कूळ ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । जेणें घडे तुझी सेवा ॥ ४ ॥

१३ अभंग.

वेद अनंत बोलिला । अर्थ इतुकाचि साधला ॥ १ ॥
विठोबासी शरण जावें । निजनिष्ठा नाम ध्यावें ॥ २ ॥
सकळ शास्त्रांचा विचार । अंतीं इतुकाचि निर्धार ॥ ३ ॥
अठरा पुराणें सिद्धान्त । तुका म्हणे हाचि हेत ॥ ४ ॥

१४ अभंग.

नरदेहा यावें हरिदास व्हावें । तेणें चुकवावें गर्भवासा ॥ १ ॥
नाहीं तरी वायां शिणविली माय । नरकासी जाय जन्मोजन्मीं ॥ २ ॥

---

let me carry the pangs of this sorrow (*viz.* of not meeting thee) in my dreams and in my wakeful hours.

' या गजबजलेल्या दुनियाबाजारांत मी आपले दिवस काढीत असतां व त्यांत मिळविलेल्या संपत्तीनें माझे हात भारावले असतां, " मला खरी प्राप्ति (तुझ्या दर्शनाचा लाभ होण्याची) कांहीं सुद्धां झाली नाहीं " असें सदासर्वदा वाटत राहूं दे. माझ्या जागृतींत, माझ्या स्वप्नांत या दुःखमय विचारांच्या वेदनांचा भार मला सारखा वाहूं दे. ' —गी. अं. ७९.

तीर्थ व्रत दान देवाचें पूजन । ऐसें हें साधन सकळांचें ॥ ३ ॥
तुका म्हणे मुखीं नित्य म्हणे हरी । तया सुखा सरी नाहीं पार ॥ ४ ॥

१५ अभंग.

तरिच जन्मा यावें । दास ईश्वराचें व्हावें ॥ १ ॥
नाहीं तरी काय थोडीं । श्वान-सूकरें बापुडीं ॥ २ ॥
जन्मा आलियाचें फळ । आंगीं लागों नेदीं मळ ॥ ३ ॥
तुका म्हणे भले । ज्यांच्या नांवें मानवले ॥ ४ ॥

१६ अभंग.

भाग्यवंत म्हणों तया । शरण गेले पंढरिराया ॥ १ ॥
तरले तरले हा भरंवसा । नामधारकाचा उसा ॥ २ ॥
भुक्ति मुक्तीचें तें स्थळ । भोळें भाविकां निर्मळ ॥ ३ ॥
गाईलें पुराणीं । तुका म्हणे वेदवाणी ॥ ४ ॥

१७ अभंग.

अवघे ते दैवाचे विठ्ठल म्हणती वाचे । अवघें कूळ त्यांचें पुण्यवंत ॥ १ ॥
अवघेची संसारीं जाणवे ते धन्य । ज्यांचें प्रेम पूर्ण पांडुरंगीं ॥ २ ॥
अवघा विठ्ठल भोगिती दिनराती । वोळगे किंकरवृत्ती मामा त्यांतें ॥ ३ ॥

१८ अभंग.

हरिभक्ति करी धन्य ते संसारीं । जयाचा कैवारी देवराणा ॥ १ ॥
देवराणा सदा सर्वदा मस्तकीं । तयासीं या लोकीं चाड नाहीं ॥ २ ॥
चाड नाहीं जना राघवाचा दास । सार्थक वयस रामदासीं ॥ ३ ॥

उ. देव आणि इतर

आई किंवा बाप, मुलगा किंवा मुलगी यांना जो माझ्यापेक्षां अधिक समजतो तो माझा खरा भक्तच नव्हे !*

भरत अपनी जननी तजी । पिता तजे प्रल्हाद ।
बिभीछन अपना भाई तजे । श्रीरामके काज ॥ १ ॥ —कबीर

१ अभंग.

जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥ १ ॥
येर प्रिया पुत्र कोण असे लेखा । करीती ते दुःखा पात्र शत्रू ॥ २ ॥
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधू । राज्य माता निंदु भरतें केली ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥ ४ ॥

१ अभंग.

न मनावें तैसें गुरूचें वचन । जेणें नारायण अंतरे तें ॥ १ ॥
आड आला म्हणून फोडियेला डोळा । बळिनें आंधळा शुक्र केला ॥ २ ॥
करी देव तरी काय नव्हे एक †। कां तुम्ही पृथक सिणा वायां ॥ ३ ॥
उलंघुनियां भ्रताराची आज्ञा । अन्न ऋषिपत्न्या घेउनि गेल्या ॥ ४ ॥
अवघेंचि त्यांचें देवें केलें काज । धर्म आणि लाज राखियेली ॥ ५ ॥
पितयासी पुत्रें केला वैराकार । प्रल्हादें असुर मारविला ॥ ६ ॥
बहुत विघ्नें केलीं तया आड । परि नाहीं कैवाड सांडियेला ॥ ७ ॥
देव जोडे ते करावे अधर्म । अंतरे तें कर्म नाचरावें ॥ ८ ॥
तुका म्हणे हा जाणतो कळवळा । म्हणोनि अजामेळा उद्धरिलें ॥ ९ ॥

---

* 'He that loveth father or mother more than me is not worthy of me and he that loveth son or daughter more than me is not worthy of me.' —Matthew X.37.

† तुज करितां नोहे ऐसें कांहीं नाहीं । डोंगराची राई रंक राणा ॥ १ ॥
अशुभाचें शुभ करितां तुज कांहीं । अवघड नाहीं पांडुरंगा ॥ २ ॥'

भाग ३ रा.

भाव (अ)

नाहीं काष्ठाचा गुमान । गोवी भ्रमरा सुमन ॥ १ ॥
प्रेम प्रीतीचें बांधलें । तें न सुटे कांहीं केलें ॥ २ ॥
पदरीं घाली पिळा । बाप निर्बळ साटी[1] बाळा ॥ ३ ॥
तुका म्हणे भावें । भेणें[2] देवें आकारावें ॥ ४ ॥

पाषाण देव पाषाण पायरी । पूजा एकावरी पाय ठेवी ॥ १ ॥
सार तो भाव सार तो भाव । अनुभवीं देव तेचि जाले ॥ २ ॥
उदका भिन्न पालट काई । गंगा गोड येरां चवी काय नाहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे हें भाविकांचें वर्म । येरीं धर्माधर्म विचारावे ॥ ४ ॥

१ अभंग.

भाव तोचि देव भाव तोचि देव । ये अर्थीं संदेह धरूं नका ॥ १ ॥
भावें भक्ति फळे भावें देव मिळे । निजभावें सोहळे स्वानंदाचे ॥ २ ॥
भावाचि कारण भावाचि कारण । या परतें साधन नाहीं नाहीं ॥ ३ ॥
एका जनार्दनीं भावाच्या आवडी । मनोरथ कोडी पुरती तेणें ॥ ५ ॥

२ अभंग.

भाव देवाचें उचित । भाव तोचि भगवंत ॥ १ ॥
धन्य धन्य शुद्ध जाती । संदेह कैंचा तेथें चित्तीं † ॥ २ ॥
बहुत बराडी । देवावरी ते आवडी ॥ ३ ॥
तुका म्हणें हें रोकडें । लाभा अधिकारी चोखडें ॥ ४ ॥

---

१ बाळासाठीं. २ भक्तिप्रेमाच्या भयानें (भेणें) देवास साकार रूप धारण करावें लागतें !

† *Cf.* There is no fear in love, but perfect love casteth out fear, because fear hath torment. He that feareth, is not made perfect in love. —John, First Epistle 4. 18.

३ अभंग.

सत्य संकल्पाचा दाता भगवान । सर्व करी पूर्ण मनोरथ † ॥ १ ॥
येथें अळंकार शोभती सकळ । भावबळें फळ इच्छेचें तें ॥ २ ॥
अंतरींचें बीज जाणे कळवळा । व्यापक सकळां ब्रह्मांडांचा ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं चालत तांतडी । प्राप्तकाळ घडी आल्याविण ॥ ४ ॥

४ अभंग.

भक्तांसमागमें सर्वभावें हरी । सर्व काम करी न सांगतां ॥ १ ॥
सांठवला राहे हृदयसंपुष्टी । बाहेर धाकुटी मूर्ति उभा ॥ २ ॥
मागण्याची आस पाहे मुखाकडे । चिंतिल्या रोकडे मनोरथ ॥ ३ ॥
तुका म्हणे जीवभाव देवापायीं । ठेवूनि ते कांहीं न मागती ॥ ४ ॥

५ अभंग.

निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म । निर्धार हें वर्म चुकों नये ॥ १ ॥
निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास । पाहों नये वास आणिकांची ॥ २ ॥
तुका म्हणे ऐसा कोण उपेक्षिला । नाहीं आयकिला ऐसा कोणी ॥ ३ ॥

६ अभंग.

मधुरा उत्तरासवें नाहीं चाड । अंतरंगीं वाड भाव असो ॥ १ ॥
प्राणावेगळा न करी नारायण । मग नसो ज्ञान मूर्ख बरा ॥ २ ॥
जन-निंदा होय तो बरा विचार । थोरवीचा भार कामा नये ॥ ३ ॥
तुका म्हणे चित्तीं भाव निष्ठावंत । दया क्षमा शांत सर्वांभूतीं ॥ ४ ॥

७ अभंग.

थोर ती पाहिजे गळाली अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥ १ ॥
व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरी अंतर शुद्ध नाहीं ॥ २ ॥
घोडें काय थोडें वागवितें ओझें । भावाविण वांझें पाठांतर ॥ ३ ॥
तुका म्हणे धरा निष्ठावंत भाव । जरी पंढरीराव पाहिजे तो ॥ ४ ॥

---

† काय न करी विश्वंभर । सत्य करितां निर्धार ॥ —गा. २६६१.४.

८ अभंग.

कामिनीसी जैसा आवडे भ्रतार । इच्छित चकोर चंद्र जैसा ॥ १ ॥
तैसी ही आवडी विठ्ठलाचे पायीं । लागलिया नाहीं गर्भवास ॥ २ ॥
दुष्काळें पीडिल्या आवडे भोजन । आणिक जीवन तृषाक्रांता ॥ ३ ॥
कामातुर जैसा भय लज्जा सांडोनि । आवडे कामिनी सर्वभावें ॥ ४ ॥
तुका म्हणे तैसी राहिली आवडी । पांडुरंग थडी पाववील ॥ ५ ॥

९ अभंग.

सांडूनियां सर्व लौकीकाची लाज । आळवा यदुराज भक्तिभावें ॥ १ ॥
पाहूनियां झाडें वरबडूनि पाला । खाऊनि विठ्ठला आळवावें ॥ २ ॥
वेंचुनियां चिंध्या भरूनियां धागा । गुंडाळुनी ढुंगा आळवावें ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें मांडिल्या निर्वाण । तया नारायण उपेक्षीना ॥ ४ ॥

१० अभंग.

सातां दिवसांचा जरी झाला उपवासी । तरी कीर्तनासी टाकूं नये ॥ १ ॥
फुटो हा मस्तक तुटो हें शरीर । परी नामाचा गजर सोडूं नये ॥ २ ॥
शरीराचे होत दोनी तेही भाग । परि कीर्तनाचा रंग सांडों नये ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसा नामीं झाला निर्धार । तेथें निरंतर देव वसे ॥ ४ ॥

११ अभंग.

माझें मन पाहें कसून । चित्त न ढळे तुजपासून ॥ १ ॥
कापूनि देईन शिर । पहा कृपण कीं उदार ॥ २ ॥
मजवरीं घालीं घण । परी मी न सोडीं चरण ॥ ३ ॥
तुका म्हणे अंतीं । तुजवांचुनि नाहीं गति ॥ ४ ॥

१२ अभंग.

जळो ते जाणीव जळो ते शाहाणीव । राहो माझा भाव विठ्ठलपायीं ॥१॥
जळो तो आचार जळो तो विचार । राहो मन स्थिर विठ्ठलपायीं ॥ २ ॥

जळो हा लौकिक जळो दंभ मान । लागो जीवा ध्यान विठ्ठलाचें †॥ ३ ॥
जळो हें शरीर जळो हा संबंध । राहो परमानंद माझ्या कंठीं ॥ ४ ॥
तुका म्हणे येथें अवघेंचि होय । धरीं मना सोय विठोबाची ॥ ५ ॥

१३ अभंग.

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥ १ ॥
चरण न सोडीं सर्वथा । आण तुझी पंढरीनाथा ॥ २ ॥
वदनीं तुझें मंगळ नाम । हृदयीं अखंडित प्रेम ॥ ३ ॥
नामा म्हणे केशवराजा । केला पण चालवीं माझा ॥ ४ ॥

१४ अभंग.

पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्या देवासी आठवीती ॥ १ ॥
प्रल्हादासी पिता करितो जाचणी । परि तो स्मरे मनीं नारायण ॥ २ ॥
सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । नाहीं विसरला पांडुरंगा ॥ ३ ॥
तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर झाले तरी ॥ ४ ॥

आ. एकविध भाव.

नारायण जोडे एकविध भावें । तुका म्हणे जीवें जाणें लागे ॥

—गा. ८८.३.

१ अभंग.

आतां माझ्या भावा । अंतराय नको देवा ॥ १ ॥
आलें भागा तें करितों । तुझें नाम उच्चारितों ॥ २ ॥

---

† *Cf.* That I want thee, only thee—let my heart repeat without end. All desires that distract me, day and night, are false and empty to the core.

"देवा मला तूं पाहिजेस, केवळ तूंच पाहिजेस !" या जपाचा मला सतत निदिध्यास लागूं दे. ज्या वासनांनीं माझें अंतःकरण व्यग्र होतें, त्या सर्व अगदीं मिथ्या आहेत. अगदींच पोकळ आहेत. —गी. अं. ३८.

दृढ माझें मन । येथें राखावें बांधोन ॥ ३
तुका म्हणे वाटे । नको फुटों देऊं फांटे ॥ ४ ॥

१ अभंग.

रामकृष्ण हे गोविंद । वाचे लागो हाचि छंद ॥ १ ॥
चित्त मन बुद्धि वृत्ति । ध्यानीं लावीं रमापती ॥ २ ॥
हस्त पाद इंद्रियांसी । पूजा देईं हृषीकेशी ॥ ३ ॥
तुका म्हणे तुजविण । नको दुसरें चिंतन †॥ ४ ॥

२ अभंग.

धीर तो कारण एकविध भाव । पतिव्रते नाहो सर्व भावें ॥ १ ॥
चातक हे जळ न पाहती दृष्टी । वाट पाहे कंठीं प्राण मेघा ॥ २ ॥
सूर्यविकासिनी नेघे चंद्रामृता । वाट पाहे अस्तउदयाची ॥ ३ ॥
धेनु येऊं नेदी जवळी आणिकां । आपुल्या बाळकाविण वत्सा ॥४॥
तुका म्हणे नेम प्राणासवें साटी । तरीच या गोष्टी विठोबाची ॥५॥

४ अभंग.

पतिव्रता नेणे आणिकांची स्तुति । सर्व भावें पति ध्यानीं मनीं ॥ १ ॥
तैसें माझें मन एकविध झालें । नावडे विठ्ठलेविण दुजें ॥ २ ॥
सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा । गाय ते कोकिळा वसंतेसी ॥ ३ ॥
तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे । बोल आणिकांचे नावडती ॥ ४ ॥

---

† *Cf.* If it is not my portion to meet thee in this my life then let me ever feel that I have missed thy sight—let me not forget for a moment, let me carry the pangs of this sorrow in my dreams and in my wakeful hours.

माझ्या या जन्मीं जर तुझी माझी भेट होणार नसेल, तर तुझें दर्शन मला घडलेलें नाहीं ही जाणीव तरी मला एक सारखी राहूं दे. मला एक क्षणभरही त्याचा विसर पडूं देऊं नको. माझ्या जागृतींत, माझ्या स्वप्नांत या दुःखमय विचाराच्या वेदनांचा भार मला सारखा वाहूं दे. —गी. अं. ७९.

५ अभंग.

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हां नारायण तैशापरी ॥ १ ॥
सर्व भावें लोभ्या आवडे हें धन । आम्हां नारायण तैशापरी ॥ २ ॥
तुका म्हणे एकविध झालें मन । विठ्ठलावांचून नेणें दुजें ॥ ३ ॥

६ अभंग.

आणीक दुसरें नाहीं मज आतां । नेमिलें या चित्तापासूनियां ॥ १ ॥
पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ २ ॥
पडिलें वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं दुजा ॥ ३ ॥
तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ तें ध्यान विटेवरी ॥ ४ ॥

७ अभंग.

बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल । करावा विठ्ठल जीवभाव ॥ १ ॥
येणें सोसें मन झालें हांवभरी । परती माघारी घेत नाहीं ॥ २ ॥
बंधनापासूनी उकलली गांठी । देतां आली मिठी सावकाशें[1] ॥ ३ ॥
तुका म्हणे देह भरिला विठ्ठल । काम क्रोधें केलें घर रितें ॥ ४ ॥

८ अभंग.

जन्मोजन्मीं आम्हीं बहु पुण्य केलें । मग या विठ्ठलें कृपा केली ॥ १ ॥
जन्मोनी संसारीं झालों त्याचा दास । माझा तो विश्वास पांडुरंगीं ॥ २ ॥
भ्रमर सुवासीं, मधावरी मासी । तैसें या देवासी मन माझें ॥ ३ ॥
आणिकां देवासीं नेघे माझें चित्त । गोड गातां गीत विठोबाचें ॥ ४ ॥
एका जनार्दनीं मज तेथें न्यावें । हाडसोनी द्यावें संतांपायीं ॥ ५ ॥

९ अभंग.

एकविध आम्ही न धरूं पालट । न संडूं ते वाट सांपडली ॥ १ ॥
म्हणवूनि केला पाहिजे सांभाळ । माझें बुद्धीबळ पाय तुझे ॥ २ ॥

---

१ " संसारबंधनाच्या गांठी सुटल्यामुळें मोकळा झालों व त्यायोगानें हरीला स्वस्थपणें मिठी मारतां आली. " —जोग गा. ३९४२.

बहुत बोलतां न कळे प्रकार । अंतरा अंतर साक्ष असे ॥ ३ ॥
तुका म्हणे अगा जीवींच्या जीवना । तूंचि नारायणा साक्षी माझा ॥४॥

१० अभंग.

ऐसा सर्व भाव तुज निरोपिला । तूं मज एकला सर्व भावें ॥ १ ॥
अंतरींची कां हे नेणसील गोष्टी । परी सुखासाठीं बोलवीसी ॥ २ ॥
सर्व माझा भार तुज चालवणें । तेथें म्यां बोलणें काय एक ॥ ३ ॥
स्वभावें स्वहित हिताचें कारण । कौतुक करून निवडीसी ॥ ४ ॥
तुका म्हणे तूं हें जाणसी गा देवा । आमुच्या स्वभावा अंतरींच्या ॥ ५ ॥

इ. देव भावाचा भुकेला.

१ अभंग.

अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची ॥ १ ॥
देव सोयरा देव सोयरा । देव सोयरा दीनाचा ॥ २ ॥
आपुल्याच वैभवें । शृंगारावें निर्मळ ॥ ३ ॥
तुका म्हणें जेवी सवें । प्रेम द्यावें प्रीतीचें ॥ ४ ॥

२ अभंग.

वर्णावे ते किती । केले पवाडे श्रीपति ॥ १ ॥
विश्वासिया घडे लाभ । देईल तरी पद्मनाभ ॥ २ ॥
भाव शुद्ध तरी । सांगितलें काम करी । ॥ ३ ॥
तुका म्हणे भोळा देव । परि हा नागवी संदेह ॥ ४ ॥

३ अभंग.

देव भावाचा लंपट । सोडुनि आला वैकुंठ ॥ १ ॥
पुंडलिकापुढें उभा । सम चरणांची शोभा ॥ २ ॥
उभा बैसेना सर्वथा । पाई विट पंढरिनाथा ॥ ३ ॥
सर्व सुखाचा सागर । जनी म्हणे सारंगधर ॥ ४ ॥

४ अभंग.

भावाविण माझा विठ्ठल नाकळे । धनविद्याबळें दुरावत ॥ १ ॥
धनवंताकडे न जाय श्रीहरी । धुंडीत भिकारी प्रेमळासी ॥ २ ॥
दिनांसी दयाळ अभक्तांसी काळ । हृद्गत सकळ जाणे हरी ॥ ३ ॥
तुका म्हणे दंभ न चाले विठ्ठलीं । बहुत शिणलीं वेदशास्त्रें ॥ ४ ॥

५ अभंग.

तुज ऐसा कोण उदाराचा रासी । आपुलेंचि देसी पद दासा ॥ १ ॥
शुद्ध हीन कांहीं न पाहासी कुळ । करिसी निर्मळ वास देहीं ॥ २ ॥
भावें हें कदान्न खासी त्याचे घरीं । अभक्ताच्या परी नावडती ॥ ३ ॥
नव जासी जेथें दूरी दवाडितां । न येसी जो चित्ता योगियांच्या ॥ ४ ॥
तुका म्हणे ऐसीं ब्रीदें तुझीं खरीं । बोलतील चारी वेद मुखें ॥ ५ ॥

६ पद.

अर्जुना इतर मज कांहीं । भक्तीविण आवडत नाहीं ॥ जिवलगा ॥ ध्रु० ॥
अर्पि जरि कवण्या भक्तीनें । मज तोय पुष्प फल पानें † ॥ जिव० ॥
नच म्हणत अल्प बहु दानें । घेइन मी संतोषानें ॥ जिवलगा ॥

जरि कुडे बहुत आवडे अमृत, त्यापुढें तृणापरि तेंही ।
मज केवळ तुच्छचि होई ॥ जिव० ॥ अर्जुना० ॥ १ ॥

जेवढें कर्म तूं करिसी । जे म्हणुनि विषय भोगीसी ॥ जिवलगा ॥
बहुविधी हवन जें यजिसी । जें करिसी तप, जें देसी ॥ जिव० ॥

तूं मनीं संग टाकुनी, सर्व अर्पुनी, माझिया ठायीं ।
मग असंग होउनि राहीं ॥ जिवलगा ॥ अर्जुना० ॥ २ ॥

---

† पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति । तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ १ ॥ " एखादें पान, फुल, फळ किंवा (यथाशक्ति) थोडें पाणीहि जो मला भक्तीनें अर्पण करितो, त्या शुद्धात्म्या मनुष्याची ती भक्तीची भेट मी (आनंदानें) सेवन करितों. " —गी. ९.२६.

अर्पितां शुभाशुभ सकलां । कर्मीतें सखया मजला ॥ जिवलगा ॥
ज्या परी दग्ध बीजाला । अंकुर कधिं नाहीं आला ॥ जिवलगा ॥
त्यापरी, व्यक्त मजवरी, कर्म तुज करी, मुक्त लवलाही ॥
मग सुटसी जन्म-मरणाही ॥ जिवलगा ॥ अर्जुना० ॥ ३ ॥

७ अभंग.

मनीं भाव असे कांहीं । तेथें देव येती पाहीं ॥ १ ॥
पाहा जनाई सुंदरी । तेथें देव पाणी भरी ॥ २ ॥
शुद्ध पाहोनियां भाव । त्याचे हृदयीं वसे देव ॥ ३ ॥
तुका म्हणे विठोबासी । ठाव देईं चरणापासीं ॥ ४ ॥

८ पद.

कळों आली माव रे । भक्तीपाशीं देव रे ।
न पाहेची याती, कूळ, । कर्म; मूळ भाव रे ॥ ध्रु० ॥
कोण पुण्यश्लोक रे । गोकुळींचे लोक रे ।
गोपवेषें जया घरीं । ब्रह्मांडनायक रे ॥ १ ॥
दुर्लभ ब्रह्मादिकां । त्यासी गोपी बायका ।
हर्षें नाचवीती । वाजवूनी करतालिका ॥ २ ॥
प्राणाच्या निरोधनें । नव्हे साध्य साधनें ।
लीलारूप विग्रही तो । चारिताहे गोधनें ॥ ३ ॥
भाविकांचा बंध रे । तोडी जगद्वंद्य रे ।
यशोदेनें उखळीं तो । बांधिला गोविंद रे ॥ ४ ॥
ज्याचा जैसा हेत रे । तया तैसा होत रे † ।
निजानंदीं पूर्ण रंगी । रंगला अनंत रे ॥ ५ ॥

९ ओंव्या.

भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला ।
संकटीं पावे भाविकाला । रक्षितसे ॥ १ ॥

---

† रूप नाम घेसी आपुल्या स्वइच्छा । होसी भाव तैसा त्याकारणें ॥ —गा. ३४७९.

जयास भगवंत आवडे । तयाचें देवासी सांकडें ॥
संसारदुःख सकळ उडे । निज दासाचें ॥ २ ॥
जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे ॥
धन्य तेचि दैवाचे । भाविक जन ॥ ३ ॥
जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी ॥
जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणीमात्रांचा ॥ ४ ॥
जरी भाव असिला माईक । तरी देव होये माहा ठक ॥
नवल तयाचें कौतुक । जैशास तैसा ॥ ५ ॥
जैसें जयाचें भजन । तैसेंचि दे समाधान ॥
भाव होतां किंचित न्यून । आपणहि दुरावे ॥ ६ ॥
दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैस्यास तैसें भासे ॥
तयाचें सूत्र असे । आपणाचपासीं ॥ ७ ॥
जैसें आपण करावें । तैसेंचि तेणें व्हावें ॥
जरी डोळे पसरूनि पाहावें । तरी तेंहि टवकारे ॥ ८ ॥
भृकुटीस घालून मिठी । पाहातां क्रोधें तेंहि उठी ॥
आपण हास्य करितां पोटीं । तेंहि आनंदे ॥ ९ ॥
जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव जाला ॥
जो जैसें भजे त्याला । तैसाचि वोळे ॥ १० ॥

१० अभंग.

भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ ॥ १ ॥
धांवे जातीपाशीं जाती । खुण येरयेरां चित्तीं ॥ २ ॥
हिरा[1] हिरकणी । काढी आंतुनि अहिरणी[1] ॥ ३ ॥
तुका म्हणे केलें । मन शुद्ध हें चांगलें ॥ ४ ॥

---

१ **अन्वय**—हिरकणी अहिरणीआंतुनि हिऱ्याला काढी. " खरा हिरा ऐरणीवर ठेवून, त्याच्यावर हातोड्याचा घाव जरी घातला, तरी तो न फुटतां, जशाचा तसाच ऐरणींत शिरतो व हिरकणी दाखविल्याबरोबर तो बाहेर येतो. "
—जो गा ३६४.

११ अभंग.

उंच नीच कांहीं नेणे भगवंत । तिष्ठे भाव भक्ति देखोनियां ॥ १ ॥
दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्या घरीं रक्षी प्रल्हादासी ॥ २ ॥
चर्म रंगूं लागे रोहिदासासंगीं । कबिराचे मागीं विणी शेले ॥ ३ ॥
सजन कसाया विकूं लागे मांस । मळा सांवत्यास खुरपूं लागे ॥ ४ ॥
नरहरि सोनारा घडों फुंकूं लागे । चोख्यामेळ्यासंगें ढोरें ओढी ॥ ५ ॥
नामयाची जनीसवें वेंची शेणी । धर्माघरीं पाणी वाहे झाडी ॥ ६ ॥
नाम्यासवें जेवी नव्हे संकोचित । ज्ञानियाची भिंत अंगीं ओढी ॥ ७ ॥
अर्जुनाचे रथीं होय हा सारथी । भक्षी पोहे प्रीती सुदाम्याचे ॥ ८ ॥
गौळियांचे घरीं गाई अंगें वळी । द्वारपाळ बळीद्वारीं झाला ॥ ९ ॥
यंकोबाचे ऋण फेडी हृषीकेशी । आंबऋषीचे सोशी गर्भवास ॥ १० ॥
मिराबाईसाठीं घेतो विषप्याला । दामाजीचा झाला पाडेवार ॥ ११ ॥
घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी मेहत्याची अंगें भरी ॥ १२ ॥
पुंडलिकासाठीं अझूनि तिष्ठत । तुका म्हणे मात धन्य त्याची ॥ १३ ॥

१२ अभंग.

भक्तासाठीं रूपें धरी । त्यांचें काम अंगें करी ॥ १ ॥
आला पुंडलीकासाठीं । अकस्मात जगजेठी ॥ २ ॥
अनंत ब्रह्मांडें रचिलीं । नानापरी क्रीडा केली ॥ ३ ॥
हें तंव न कळे कोणासी । जगमित्रनागा ध्याय मानसीं ॥ ४ ॥

१३ पद.

भक्तासाठीं तो जगजेठी बसोनि माळ्यावर । पाखरें उडवी शारंगधर ॥ध्रु०॥
भक्तांमध्यें भक्ति पहा त्या बोधल्यानें केली । थोट्या ताटांनां कणसें आलीं ॥
ऐसा तो देव अनंत विठ्ठल अनंत रूपें ख्याली । कशी देव भक्तांची माउली ॥
त्याचे चरणापाशीं विनंति । जोडुनियां कर ॥ पाखरें उड० ॥ १ ॥

नामदेवाशीं म्हणती ब्राह्मण जात तुझी ओंगळ। निघ बाहेर करिशी विटाळ ॥
तेव्हां तो गेला देउळामागें केले दगडाचे टाळ। हरीनें फिरविलें देऊळ ॥
अगाध लीला त्याची द्वारका। एके खांबावर ॥ पाखरें उड० ॥ २ ॥
जनाबाईच्या घरीं भरल्या देवें पाण्याच्या घागरी। चौंहातानें रांजण भरी ॥
दळण कांडण धुणें धुवोनी पाटी डोईवरी। गवऱ्या वेंचुनि आणी घरीं ॥
प्रल्हादाला तेव्हां तारिलें जळत्या अग्नीवर। पाखरें० ॥ ३ ॥ चोख्या-
मेळ्याच्या घरीं देवानें सोडिली द्वादशी। तेव्हां ते श्रुत झालें रायासी ॥
नेलें पाचारुनि रायें तेधवां शिक्षा दिधली त्यासी। देवा तूं मार त्याचा
खाशी ॥ अगाध तुझी माव कळेना। तुका जोडुनी कर ॥ पाखरें० ॥ ४ ॥

१४ पद.

भक्तांचीया काजासाठीं। साधूचिया प्रेमासाठीं।
सोडिली मीं लाज रे ॥ ध्रु० ॥
दुर्योधनसदनीं गेलों। विदुराच्या गृहा आलों।
आवडीनें कण्या प्यालों। जोंधळ्याची पेज रे ॥ भक्तां० ॥ १ ॥
धुतों अर्जुनाचे घोडे। सदा राहें मागें पुढें।
धर्मगृहीं काढी उच्छिष्टें। बांधूनियां माज रे ॥ भक्तां० ॥ २ ॥
शुद्ध निरंजनवासी। तो मी आलों आकारासी।
पडियलों प्रेमपाशीं। दशाकृति काज रे ॥ भक्तां० ॥ ३ ॥
वेडीं गौळियांचीं पोरें। त्यांचें ताक प्यालों बा रे।
खातां भिल्लीणीचीं बोरें। उच्छिष्टाची चोज रे ॥ भक्तां० ॥ ४ ॥
पूर्ण ब्रह्म म्हणती मातें। सर्व ब्रह्म मीच त्यातें।
ऐसियासी जाणिव ते। धरी अमृतराज रे ॥ भक्तां० ॥ ५ ॥

१५ अभंग.

ऐका महिमा आवडीचीं। बोरें खाय भिल्लटीचीं ॥ १ ॥
थोर प्रेमाचा भुकेला। हाचि दुष्काळ तयाला ॥ २ ॥

अष्टमा सिद्धींला । न मनीं क्षीरसागराला ॥ ३ ॥
पोहे सुदाम देवाचे । फके मारी कोरडेच ॥ ४ ॥
न म्हणे उच्छिष्ट अथवा थोडें । तुका म्हणे भक्तीपुढें ॥ ५ ॥

१६ अभंग.

जातिहीन चोखामेळा । त्याला भक्तिचा कळवळा ॥ १ ॥
त्याच्या झाला म्हणियारा । राहे घरीं धरी थारा ॥ २ ॥
देव जेवी तया घरा । त्याचा भक्तिभाव खरा ॥ ३ ॥
देव बाटवीला तेणें । हांसे जनी गाय गाणें ॥ ४ ॥

१७ अभंग.

भक्तिऋण घेतलें माझें । चरण गहाण आहेत तुझे ॥ १ ॥
प्रेमव्याज देईं हरी । माझा हिशेब लौकर करीं ॥ २ ॥
माझें मी न सोडीं धन । नित्य करितों कीर्तन ॥ ३ ॥
तुझें नाम आहे खत । सुखें करीं पंचाईत ॥ ४ ॥
तुका म्हणे गरुडध्वजा । यासी साक्ष श्रीगुरुराजा ॥ ५ ॥

१८ अभंग.

बैसलोंसे द्वारीं । धरणें कोंडोनि भिकारी ॥ १ ॥
आतां कोठें हालों नेदी । बरी सांपडली संदी ॥ २ ॥
किती वेरझारा । मागें घातलिया घरा ॥ ३ ॥
माझें मज नारायणा । देतां का रे न ये मना ॥ ४ ॥
भांडावें तें किती । बहु सोसिली फजिती ॥ ५ ॥
तुका म्हणे नाहीं । लाज तुझे अंगीं कांहीं ॥ ६ ॥

१९ पद.

भक्तीं आकळिला । दयाघन भक्तीं आकळिला ॥ ध्रु० ॥
पार्थरथीं सारथ्य करी जो । निजपद दे बळिला ॥ द० ॥ १ ॥
प्रल्हादास्तव प्रकटुनि स्तंभीं । दानव निर्दळिला ॥ द० ॥ २ ॥
रुक्मिणीनें एक्या तुलसिदलानें । गिरिधरप्रभु तुळिला ॥ द० ॥ ३ ॥

१० पद.

भाव धरारे । आपुलासा देव करा रे ॥ ध्रु० ॥
कोणी काय म्हणो यासाठीं । बळकट प्रेम असावें गांठीं ।
निंदास्तुतिवर लावुनि काठी । मी तूं हरा रे ॥ आपु० ॥ १ ॥
सकाम साधन सर्वहि सांडा । निष्कामें मुळ भजनीं भांडा ।
नाना कुतर्कवृत्तिसि दवडा । आलि जरा रे ॥ आपु० ॥ २ ॥
दुर्लभ नरदेहाची प्राप्ती । पुन्हा न मिळे हा कल्पांतीं ।
ऐसा विवेक आणुनि चित्तीं । गुरुसि वरा रे ॥ आपु० ॥ ३ ॥
केसरिनाथ गुरूचे पायीं । सृष्टी आजि बुडाली पाहीं ।
शिवादिनिं निश्चय दुसरा नाहीं । भक्तसखा रे ॥ आपु० ॥ ४ ॥

११ अभंग.

भोळे भक्त भाव धरिती मानसीं । त्यांसी हृषीकेशी जवळीच † ॥ १ ॥
भाव नाहीं मनीं अभाविक सदा । त्याचिया खेदा काय सांगों ॥ २ ॥
गणिकेसारिखीं नामें उद्धरिलीं । सज्ञानें पडिलीं खटाटोपीं ॥ ३ ॥
तुका म्हणे काय शुद्ध माझी जाती । थोर केली ख्याती हरिनामें ॥ ४ ॥

ई. भवसागरामध्यें भक्ति हीच नाव.

१ पद.

सांगड बांधा रे भक्तीची । रघुनाथनामाची ॥ ध्रु० ॥
संसार सागर सागर । भरला जातो पूर ॥ १ ॥
लाटा उसळती विषयांच्या । बहुत प्रपंचाच्या ॥ २ ॥
नरहरि बोधला बोधिला । हरिनामीं रंगला ॥ ३ ॥

---

† शुद्ध ज्याचा भाव । त्याशी दूर नाहीं देव ॥ —मुक्ताबाई.

१ पद.

अनन्य शरण रिघा । तारक तो जगदीश्वर जाणुनि ॥ अनन्य० ॥ ध्रु० ॥
आस धरा विश्वास तयाचा । देणार नाहीं दगा ॥ तारक० ॥ १ ॥
ठेवूनियां कर दोनि कटावरि । भक्तांचे भेटी उभा ॥ तारक० ॥ २ ॥
त्र्यंबक होऊनि साधन हें करि । एका जनार्दनीं गा ॥ तारक० ॥ ३ ॥

२ पद.

असा धरी छंद । जाय तुटोनियां भवबंध ॥ ध्रु० ॥
छंद लागला टिटवीला । तिनें समुद्रही शोषिला ।
मैनावतिनें कृतार्थ केला । गोपीचंद ॥ जाय० ॥ १ ॥
दुधाचा सागर उपमन्युला । अढळ पदावरि तो ध्रुव बसला ।
मार्कंडेयें यम हटवीला । झाला मंद ॥ जाय० ॥ २ ॥
झाले तीन देह भरताला । रावण रामरूप तो झाला ।
गोपी चढल्या गोलोकाला । यशोदानंद ॥ जाय० ॥ ३ ॥
आळीस भ्रमराचा अध्यास । होतां भ्रमरपणा ये तीस ।
तैसा सोडुनि जीवपणास । भोगी आनंद ॥ जाय० ॥ ५ ॥
छंदें असाध्यही साधिती । नर ते नारायणही होती † ।
दीनजन हरि आपुला करिती । जो सुखकंद ॥ जाय० ॥ ५ ॥

४ अभंग.

ज्ञानवैराग्य कावड खांदीं । शांति जीवन तयांमधीं ॥ १ ॥
शिवनाम तुम्ही ध्या रे । शिवस्मरणीं तुम्ही रहा रे ॥ २ ॥
हरिहर कावड घेतली खांदीं । भोंवतीं शोभे संतमांदी ॥ ३ ॥
एका जनार्दनीं कावड बरी । भक्ती फरारा तयावरी ॥ ४ ॥

---

† नर करनी करे तो नरका नारायन होय. .

५ पद.

भज भज भवजलधिमाजिं । मनुजा शिवाला ॥ भज० ॥ ध्रु० ॥
धरिशिल दृढ चरणकमल । घडिभरि तरि करुनि विमल ।
तरिच सकल पाप शमल । त्यज रे भवाला ॥ भज० ॥ १ ॥
सांडुनियां विषयवमन । झडकरि करिं षडरिदमन ।
पुजिं मन हें करुनि सुमन । गिरिजाधवाला ॥ भज० ॥ २ ॥
सावध हो करिसी काय । शंकर गुरु बाप माय ।
चिंतुनि कविराय पाय । हृदयीं निवाला ॥ भज० ॥ ३ ॥

६ अभंग.

सत्य आठवीतां देव । जातें भेव पळोनी ॥ १ ॥
नलगे कांहीं करणें चिंता । धरी सत्ता सर्व तो ॥ २ ॥
भावें भाव राहे पायीं । देव तैं सन्निध ॥ ३ ॥
तुका म्हणे कृष्णनामें । शीतल प्रेम सर्वांसी ॥ ४ ॥

उ. भावच तारक.

भावे हि विद्यते देवस्तस्माद्भावो हि कारणम् । *

१ अभंग.

अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक । तरि कां हे पाक घरोघरीं ॥ १ ॥
आपुलालें तुम्ही करा रे स्वहित । वाचे स्मरा नित्य राम राम ॥ २ ॥
देखोनि जीवन जरि जाय तान । तरि कां सांठवण घरोघरीं ॥ ३ ॥
देखोनियां छाया सुख न पाविजे । जंव न बैसीजे तयातळीं ॥ ४ ॥
सुख तरी होय गातां आइकतां । जरि राहे चित्ता दृढ भाव ॥ ५ ॥
तुका म्हणे होसी भावेंचि तूं मुक्त । काय करिसी युक्त जाणिवेचीं ॥ ६ ॥

---

*भावाच्या ठिकाणीं देव असतो; म्हणून भाव हेंच (मोक्षाचें) साधन होय.

२ अभंग.

भाग्य पुरुषाची देखिली संपदा । आपली आपदा जाईच ना ॥ १ ॥
कुणब्याचें शेत पाहे डोळेभरी । आपले ते घरीं अन्न नाहीं ॥ २ ॥
देहकष्टविना ज्ञानाचा अभाव । कैसी देवराव कृपा करी ॥ ३ ॥
ओळखीकारणें आर्जव करिती । तेव्हां याची रिती कळूं लागे ॥ ४ ॥
तुका म्हणे आशा दुराशा त्यजावी । युक्तीची पदवी पावतसे ॥ ५ ॥

३ अभंग.

ठेवा जाणीव गुंडून । येथें भावचि प्रमाण ॥ १ ॥
एका अनुसरल्या काज । अवघें जाणे पंढरिराज ॥ २ ॥
तर्कवितर्कासी । ठाव नलगे सायासीं ॥ ३ ॥
तुका म्हणे भावेंविण । अवघा बोलतीं तो सीण ॥ ४ ॥

ऊ. भावसामर्थ्य.

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः * ॥ १ ॥

—गी. ९.३०.

१ अभंग.

जरी असे दुराचारी । वाल्हा कोळी याचे परी ॥ १ ॥
भजे मज न आणिकां । शैव जैसा कीं त्र्यंबका ॥ २ ॥
तो तो साधुच मानावा । देव तेथें सांपडावा ॥ ३ ॥
तेथें निश्चयाचि देव । तुकया देखे जीव शिव ॥ ४ ॥

---

* मोठा दुराचारी कां असेना; मला जर तो अनन्य भावानें भजत आहे तर तो साधुच समजला पाहिजे. कारण त्याच्या बुद्धीचा निश्चय चांगला झालेला असतो.

२ अभंग.

अंगीकार ज्याचा केला नारायणें । निंद्य तेंहि तेणें वंद्य केलें † ॥ १ ॥
अजामेळ भिल्ली तारिली कुंटणी । प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥ २ ॥
ब्रह्महत्याराशी पातकें अपार । वाल्मीक किंकर वंद्य केला ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें भजन प्रमाण । काय थोरपण जाळावें तें ॥ ४ ॥

३ अभंग.

व्यभिचारिणी[1] गणिका असतां कुंटणी । विश्वास तिचे मनीं राघोबाचा[1] ॥१॥
ऐसी ही पापिणी वाहिली विमानीं । अचळ भुवनीं ठेवियेली ‡ ॥ २ ॥
पतितपावन तिहीं लोकीं ठसा । कृपाळू कोंवसा अनाथांचा ॥ ३ ॥
तुका म्हणे धरा विठोबाची सोय । आणिक उपाय नेणों किती ॥ ४ ॥

४ अभंग.

कथा हें भूषण जनामध्यें सार । तरले अपार बहु येणें ॥ १ ॥
नीचीये कुळींचा उंचा वंद्य होय । हरिचे जो गाय गुणवाद ॥ २ ॥
देव त्याची माथां वंदी पायधुळी । दीप जाला कुळीं वंशाचिये ॥ ३ ॥
त्याची निंदा करी त्याची कुष्ट वाणी । मुख संवदणी रजकाची ॥ ४ ॥
तुका म्हणे नाहीं चोरिचा व्यापार । विठ्ठलाचें सार नाम ध्यावें ॥ ५ ॥

---

† मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः । स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥ १ ॥ " कारण, हे पार्था ! माझा आश्रय करून स्त्रिया, वैश्य व शूद्र, किंवा (अंत्यजादि) जे पापयोनि असतील ते देखील परम गति पावतात. " —गी. ९.३२.

१ " गणिका नामक कुंटीण ही व्यभिचारी स्त्री होती. तिच्या मनामध्यें राघुपक्षाविषयींचा विश्वास होता. त्यामुळें तिनें मरणाच्या वेळेस ' राघोबा ' ! तुझें कसें होईल, अशा मिषानें देवाचें नाम घेतलें. " —जो. गा. ३२९३.

पण ' गणिका ' हें विशेष नाम मानण्यास आधार काय ?

‡ गीतारहस्य पृ. ४३७–४३८ पहा.

भाग ४ था.

प्रेम.

अ. प्रेमलक्षण.

१ अभंग.

प्रेम नये सांगतां बोलतां दावितां । अनुभव चित्ता चित्त जाणे ॥ १ ॥
कासवीचें बाळ वाढे कृपादृष्टी । दुधा नाहीं भेटी अंगसंगें ॥ २ ॥
पोटामध्यें कोणें सांगितलें सर्पा । उपजत लपा म्हणऊनी ॥ ३ ॥
बोलों नेणें परी जाणे गोड क्षार । अंतरीं विचार त्यासी ठावा ॥ ४ ॥
तुका म्हणें बरें विचारावें मनीं । आणिक भल्यांनीं पुसों नये ॥ ५ ॥

आ. प्रेमप्रकर्ष (प्रेमाचें भरतें.)

कथं विना रोमहर्ष द्रवता चेतसा विना ।
विनाऽऽनंदाश्रुकलया शुद्ध्येद्भक्त्या विनाशयः* ॥ १ ॥

१ अभंग.

भावभक्ती अंगीं उठे । प्रेमभरें कंठ दाटे ॥ १ ॥
दाटे प्रेमाश्रू लोचनीं । रोम राहे उभारूनी ॥ २ ॥
उठोनियां आलिंगाया । आतां जातां नये पाया ॥ ३ ॥
पायां पडुनि स्तवूं जरी । तरि शब्द नुमटे हरी ॥ ४ ॥
हरिलें त्वां देहभान । आतां कोणा करूं नमन ॥ ५ ॥
जन द्रवरूप होतां । वासुदेवा ये धन्यता ॥ ६ ॥

---

* भक्तिप्रेमानें अंगावर रोमांच उभे राहिल्याशिवाय, चित्त द्रवून गेल्याशिवाय व आनंदाचे अश्रू लोटल्याशिवाय अंतःकरण शुद्ध कसें होईल ?-भा. ११.१४.२३.

२ अभंग.

सद्गदीत कंठ दाटो । येणें फुटो हृदय ॥ १ ॥
चिंतनाचा एक लाहो । तुमच्या अहो विठ्ठला ॥ २ ॥
नेत्रीं जळ वाहे सदा । आनंदाचे रोमांच ॥ ३ ॥
तुका म्हणे कृपादान । इच्छी मन हे जोडी ॥ ४ ॥

३ अभंग.

हरि रे वाढवेळ झाला । कोण्या भक्तानें गोंविला ॥ १ ॥
झडकरी येई गा विठ्ठला । कंठ आळवितां शोषला ॥ २ ॥
प्राण केव्हां येईल माझा । आलिंगील चहूं भुजा ॥ ३ ॥
नामा गहिंवरें दाटला । पूर धरणीये लोटला ॥ ४ ॥

४ अभंग.

नाम आठवितां सद्गदित । प्रेम वाढे पोटीं ऐसें करीं ॥ १ ॥
रोमांच जीवन आनंदाश्र नेत्रीं । अष्टांगही गात्रीं प्रेम तुझें ॥ २ ॥
सर्वही शरीर वेंचो या कीर्तनीं । गाऊं निशीदिनीं नाम तुझें ॥ ३ ॥
तुका म्हणे दुजें न करीं कल्पांतीं । सर्वदा विश्रांति संतांपायीं ॥ ४ ॥

५ अभंग.

प्रेमअमृतें रसना ओलावली । मनाची राहिली वृत्ति ठायीं ॥ १ ॥
सकळही तेथें वोळलीं मंगळें । वृष्टि केली जळें आनंदाच्या ॥ २ ॥
सकळ इंद्रियें झालीं ब्रह्मरूप । ओतलें स्वरूप तयामाजीं ॥ ३ ॥
तुका म्हणे जेथें वसे भक्त राव । तेथें नांदे देव संदेह नाहीं † ॥ ४ ॥

---

† मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ।
माझे भक्त गाती जेथें । नारदा मी उभा तेथें ॥

इ. रूपप्रेम.

१ अभंग.

राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकळा लोपलीया ॥ १ ॥
कस्तूरीमळवट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ २ ॥
मुगुट कुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतिलें सकळही ॥ ३ ॥
कांसे सोनसळा पांधरे पाटोळा । घननीळ सांवळा बाईयांनों ॥ ४ ॥
सकळही तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥ ५ ॥

२ अभंग.

सुंदर तें ध्यान उभा विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥ १ ॥
गळां तुळसीहार कांसे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥
मकर कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें । ४ ॥

३ अभंग.

देखोनियां तुझ्या रूपाचा आकार । उभा कटीं कर ठेवूनियां ॥ १ ॥
तेणें माझ्या चित्ता होतें समाधान । वाटतें चरण न सोडावे । २ ॥
मुखें गातों गीत वाजवितों टाळी । नाचतों राउळीं प्रेमसुखें ॥ ३ ॥
तुका म्हणे मज तुझ्या नामापुढें । तुच्छ हें बापुडें सकळही ॥ ४ ॥

४ अभंग.

आवडे हें रूप साजिरें सगुण । पाहतां लोचन सुखावले ॥ १ ॥
आतां दृष्टीपुढें असाचि तूं राहें । जों मी तुज पाहें नारायणा ॥ २ ॥
लांचावलें मन लागलीसे गोडी । तें जीवभावें न सोडी ऐसें झालें ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हीं मागावें लडिवाळी । पुरवावी आळी मायबापें ॥ ४ ॥

५ अभंग.

रूप पाहतां लोचनीं । सुख झालें वो साजणी ॥ १ ॥
तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ॥ २ ॥

बहुत सुकृताची जोडी । म्हणोनि विठ्ठलीं आवडी ॥ ४ ॥
सर्व सुखाचें आगर । बापरखुमादेवीवर ॥ ३ ॥

६ अभंग.

झणिं दृष्टी लागे तुज केशवराजा । जेणें मना माझ्या बोध केला ॥ १ ॥
अनंत जन्मींचें विसरलों दुःख । पाहतां श्रीमुख विठ्ठलाचें ॥ २ ॥
योगियाचे ध्यानीं ध्यातां नातुडसी । तो तूं आम्हांपाशीं मागें पुढें ॥ ३ ॥
नामा म्हणे करूं जिवें निंबलोण । विठ्ठलचरण ओंवाळीन ॥ ४ ॥

७ अभंग.

रूपीं गुंतले लोचन । पायीं स्थिरावलें मन ॥ १ ॥
देहभाव हारपला । तुज पाहतां विठ्ठला ॥ २ ॥
कळों नये सुख दुःख । तान हारपली भूक ॥ ३ ॥
तुका म्हणे नव्हे परती । तुझ्या दर्शनें मागुती † ॥ ४ ॥

८ अभंग.

तुज पाहतां सामोरी । दृष्टि न फिरे माघारी ॥ १ ॥
माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडली पंढरिराया ॥ २ ॥
नव्हे सारितां निराळें । लवण मेळवितां जळें ॥ ३ ॥
तुका म्हणे बळी । जीव दिला पायांतळीं ॥ ४ ॥

---

† भगवान् श्रीकृष्णाच्या सहवासांत गौळणींचीहि अशाच स्थिति झाली होती—

तुका म्हणे पुन्हा न येती मागुत्या । कृष्णासी खेळतां दिवस गमे ॥ १ ॥
दिवसराती कांहीं नाठवे तयांसी । पाहतां मुखासी कृष्णाचिया ॥ २ ॥
याच्या मुखें नये डोळ्यांसी वीट । राहिले हे नीट ताटस्थचि ॥ ३ ॥
ताटस्थ राहिलें सकळ शरीर । इंद्रियें व्यापार विसरलीं ॥ ४ ॥
विसरल्या तानभूक घरदार । नाहीं हा विचार असों कोठें ॥ ५ ॥
कोठें असों कोण झाला वेळ काळ । नाठवे सकळ विसरल्या ॥ ६ ॥
विसरल्या आम्ही कोणिये जातीच्या । वर्णाही चहूंच्या एक जाल्या ॥ ७ ॥

ई. माहेर.

१ अभंग.

आपुल्या माहेरा जाईन मी आतां। निरोप या संतांहातीं आला ॥ १ ॥
सुखदुःख माझें आइकिलें कानीं । कळवळा मनीं करुणेचा ॥ २॥
करुनी सिद्ध मूळ साउलें भातुकें । येती दिसे एकें न्यावयासी ॥ ३ ॥
त्याचि पंथें माझें लागलेसें चित्त । वाट पाहे नित्य माहेराची ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां येतील न्यावया । अंगें आपुलिया मायबाप ॥ ५ ॥

२ अभंग.

विठोबाच्या गांवा जाईन धांवोनी । घालीन लोळणी चरणावरी ॥ १ ॥
शिणभाग द्रवाळिला तो म्हणेल । जीवींचें पुसेल जडभारी ॥ २ ॥
हरुषें लोळत जाईन महाद्वारा । भेटाया सामोरा येईल मज ॥ ३ ॥
उचलोनि शीर पुशिल आदरें । मुख पीतांबरें पुसील माझें ॥ ४ ॥
धरोनि हनुवटी उठवील हस्तकीं । ठेविल मस्तकीं अभय कर ॥ ५ ॥
राई रखुमाबाई माता सत्यभामा । कडे घेउनि नामा स्तनीं लावी ॥ ६ ॥

३ अभंग.

विठ्ठल सोयरा सज्जन विसांवा । जाइन त्याच्या गांवा भेटावया ॥ १ ॥
सीणभाग त्यास सांगेन आपुला । तो माझा बापुला सर्व जाणे ॥ २ ॥
माय माउलिया बंधुवर्ग जाणा । भाकीन करुणा सकळिकांसी ॥ ३ ॥
संत महंत सिद्ध महनुभाव मुनि । जीवभाव जावोनी सांगेन त्यां ॥ ४ ॥
माझिये माहेरीं सुखा काय उणें । नलगे येणें जाणें तुका म्हणे ॥ ५ ॥

४ अभंग.

पंढरिये माझें माहेर साजणी । ओंविये कांडणी गाऊं गीत ॥ १ ॥
राही रखुमाई सत्यभामा माता । पांडुरंग पिता माहियेर ॥ २ ॥
उद्धव अक्रूर व्यास अंबऋषि । भाई नारदासी गौरवीन ॥ ३ ॥
गरुड बंधु लडिवाळ पुंडलीक । याचें कवतुक वाटे मज ॥ ४ ॥

मज बहु गोत संत आणि महंत । नित्य आठवीत ओंवियेसी ॥ ५ ॥
निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ॥ ६ ॥
नागो जगमित्रा नरहरी सोनारा । रोहिदास कबीरा सोईरिया ॥ ७ ॥
परसा भागवत सुरदास सांवता । गाईन नेणतां सकळांसी ॥ ८ ॥
चोखामेळा संत जिवाचे सोईरे । न पडे विसर यांचा मज ॥ ९ ॥
जीवींच्या जीवना एका जनार्दना । पाटका कन्हया मिराबाई ॥ १० ॥
आणीकही संत महानुभाव मुनि । सकळां चरणीं जीव माझा ॥ ११ ॥
आनंदें ओंविया गाईन मी त्यांसी । जाती पंढरीसी वारकरी ॥ १२ ॥
तुका म्हणे माझा बळिया बाप माय । हर्षें नांदताहे घराचारी ॥ १३ ॥

५ अभंग.

अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तिन्ही लोक ॥ १ ॥
जाईन गे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलिया ॥ २ ॥
सर्व सुकृताचें फळ मी लाहीन । क्षेम मी देईन पांडुरंगीं ॥ ३ ॥
बापरखुमादेवीवरु विठ्ठलेंसी भेटी । आपुले संवसाटी करूनि ठेला ॥ ४ ॥

६ अभंग.

पंढरीस जावें जीवन्मुक्त व्हावें । विठ्ठला भेटावें जिवलगा ॥ १ ॥
काया वाचा मन चरणीं ठेवावें । प्रेमसुख घ्यावें सर्वकाळ ॥ २ ॥
सुखाचें साजिरें श्रीमुख पहावें । जीवें उतरावें निंबलोण ॥ ३ ॥
बाहेर भीतरीं कैवल्य अवघें । वाचे न बोलवे ब्रह्मानंदु ॥ ४ ॥
चिरंजीव नामा कंठीं धरी प्राण । करी तुझें ध्यान रात्रंदिवस ॥ ५ ॥

७ अभंग.

चला पंढरीस जाऊं । रखुमादेवीवर पाहूं ॥ १ ॥
डोळे निवतील कान । मना तेथें समाधान ॥ २ ॥
संतां महंतां होतील भेटी । आंनदें नाचों वाळवंटी ॥ ३ ॥
तें तीर्थीचें माहेर । सर्व सुखाचें भांडार ॥ ४ ॥
जन्म नाहीं रे आणीक । तुका म्हणे माझी भाक ॥ ५ ॥

८ अभंग.

जाऊं देवाचिया गांवा । देव देईल विसांवा ॥ १ ॥
देवा सांगों सुख दुःख । देव निवारील भूक ॥ २ ॥
घालूं देवासीच भार । देव सुखाचा सागर ॥ ३ ॥
राहों जवळी देवापाशीं । आतां जडोनि पायांसी ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही बाळें । या देवाचीं लडिवाळें ॥ ५ ॥

उ. प्रेमसामर्थ्य.

जो शुष्क काष्ठ स्वयें कोरी । तो कोंवळ्या कमळामाझारीं ॥
भ्रमर गुंतला प्रीतीवरी । केसर माझारीं कुचंबों नेदी ॥ १ ॥
तेवीं भक्तीचिया प्रेमप्रीतीं । हृदयीं कोंडिला श्रीपती ॥
तेथ खुंटल्या सामर्थ्यशक्ती । भावार्थाप्रती बळ न चले ॥ २ ॥
बाळ पालवीं घाली पिळा । तेणें बापु राहे थोकला ॥
तरी काय निर्बळ जाहला । न तो स्नेहें भुलला ढळेना ॥ ३ ॥
तेवीं निजभक्त लळेवाड । त्यांचें प्रेम अत्यंत गोड ॥
निघावयाची विसरोनि चाड । हृदयीं सुखाड हरि मानी ॥ ४ ॥

—ए. भा. २·७८२–८५.

१ अभंग.

कां वो रामराये दुरी मोकलिलें । कठिण कैसें जालें चित्त तुझें ॥ १ ॥
देउनि आलिंगन प्रीतीपडिभरें । कैं मुख पीतांबरें पुससील ॥ २ ॥
घेउनी कडिये धरुनी हनवटी । कैं गुज गोष्टी सांगसील ॥ ३ ॥
रामदास म्हणे केव्हां संबोखिसी । प्रेमपान्हा देशी जननीये ॥ ४ ॥

२ अभंग.

कवतुकवाणी बोलतसें लाडें । आरुष वांकडें करूनि मुख ॥ १ ॥
दुजेपणीं भाव नाहीं हे आशंका । जननीबाळकामध्यें भेद ॥ २ ॥

सलगी दुरूनी जवळी पाचारूं । धांवोनियां करूं अंगसंग ॥ ३ ॥
धरूनि पालव मागतों भातुकें । आवडीचें निकें प्रेमसुख ॥ ४ ॥
तुका म्हणे तुज आमचीच गोडी । ऐसी हे आवडी कळों आली ॥ ५ ॥

३ अभंग.

संतोषे माउली आरुषा वचनीं † । वोरसोनि स्तनीं लावी बाळा ॥ १ ॥
तैसें प्रेमळाचें अवघेंचि गोड । पुरवितो काड पांडुरंग ॥ २ ॥
सेवा करी साहे निष्ठुर उत्तरें । त्याचें वाहे बरें तेंची मनीं ॥ ३ ॥
तुका म्हणे इच्छावस खेळें खेळ । चिंता त सकळ कांहीं नेणें ॥ ४ ॥

४ अभंग.

युगाऐसें पळ तुजविण जाय । पहातोसी काय अंत माझा ॥ १ ॥
कोमल हृदय तुझें पंढरीच्या राया । कठीण सखया कैसें केलें ॥ २ ॥
विचारिलें चित्तीं दुर्लभ हरिहरां । कैसा जाऊं घरा रंकाचिया ॥ ३ ॥
अंगीकारावरी अव्हेराची पात । नव्हे हें उचित देवराया ॥ ४ ॥
मागें जे जे आळी केली वासुदेवा । उदारा केशवा पुरवीली ॥ ५ ॥
नुपेक्षिसी चित्तीं ऐसा हा भरंवसा । दिसोनी निराशा झाली आतां ॥ ६ ॥
वाचोनियां दुःख भोगावें रे किती । प्राणासी मूकतां तेंचि भलें ॥ ७ ॥
वर्णितां तो नामा झाला समाधिस्थ । जाहालें विदित पांडुरंगा ॥ ८ ॥

५ अभंग

त्वरें धांवोनियां आलासे गोविंद । सावध सावध नामदेवा ॥ १ ॥
रुसलासे नामा देवाशीं न बोले । करें कुरवाळिलें वदन तेव्हां ॥ २ ॥
समजावोनि देवें धरिला पोटाशीं । बोल रे मजसीं नामदेवा ॥ ३ ॥
नामा म्हणे देवा उशीर कां केला । किंवा माझा आला तुला राग ॥ ४ ॥

---

† जरि बोबडें पित्याचें तोषावें मन तथापि तोकानें ।
प्रभु साळ्या भोळ्यांची बहु वात्सल्यें कथा पितो कानें ॥ १ ॥ —मोरोपंत.

६ अभंग.

चाल घरा उभा राहें नारायणा । ठेवूं दे चरणावरी माथा ॥ १ ॥
वेळोवेळां देईं क्षेम आलिंगन । करीं अवलोकन कृपादृष्टीं ॥ २ ॥
प्रक्षाळूं दे पाय बैस माजघरीं । चित्त स्थिर करीं पांडुरंगा ॥ ३ ॥
आहे त्या सांचितें करवीन भोजन । काय न जेवून करिसी आतां ॥४॥
करुणाकरें नाहीं कळों दिलें मर्म । दूरी होतां भ्रम कोण वारी ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां आवडीच्या सत्ता । बोलिलों अनंता करवीन तें ॥६॥

७ अभंग.

काय तुमची यास वेंचते गांठोळी । माझी टाळाटाळी करितसां ॥ १ ॥
चतुराच्या राया अहो पांडुरंगा । ऐसें तरी सांगा निवडूनी ॥ २ ॥
कोण तुम्हां सुख असे या कौतुकें । भोगितां अनेक दुःखें आम्ही ॥३॥
तुका म्हणे काय झालासी निर्गुण । आम्हां येथें कोण सोडवील ॥ ४ ॥

८ पद.

पतीतपावन नाम ऐकुनी आलों मी दारा ।
पतीतपावन न होसि म्हणून जातों माघारा ॥ ध्रु० ॥
सोडीं देवा ब्रीद आतां न होसि अभिमानी ।
पतीतपावन नाम तुजला ठेवियलें कोणी ॥ १ ॥
घेसी तेव्हां देसी ऐसा अससी उदार ।
काय देवा रोधूं तुमचें कृपणाचें द्वार ॥ २ ॥
उच्छिष्टाचें शीत देवा न टाकिसी बाहेरी ।
कोणीं दिधली भगवंत तुला भूषणाची थोरी ॥ ३ ॥
हातीं घेऊनि झांगडझेंगा फिरेन त्रैलोक्यीं ।
पतीतपावन न होसी हरि तूं मोठा घातकी ॥ ४ ॥
नामा म्हणे बा नलगे तुमचें मज काय ।
प्रेम असों द्या हृदयीं तुमचे आठवीन पाय ॥ ५ ॥

९ अभंग.

काय तुझें वेंचे मज भेटी देतां । वचन बोलतां एक दोन ॥ १ ॥
काय तुझें रूप घेतों मी चोरोनी । त्याभेणें लपोनी राहिलासी ॥ २ ॥
काय तुझें आम्हां करावें वैकुंठ । भेवों नको, भेट आतां मज ॥ ३ ॥
तुका म्हणे तुझी नलगे दसोडी । परी आहे आवडी दर्शनाची ॥ ४ ॥

१० अभंग.

तुझें प्रेम माझ्या हृदयीं आवडी । चरण न सोडीं पांडुरंगा ॥ १ ॥
कासया सिणविसी थोरिवाकारणें । काय तुझें उणें होईल देवा ॥ २ ॥
चातकाची चिंता हरली जळधरें । काय त्याचें सरे थोरपण ॥ ३ ॥
चंद्र चकोरांचा पुरवी सोहळा । काय त्याची कळा न्यून होय ॥ ४ ॥
तुका म्हणे मज अनाथा सांभाळीं । हृदयकमळीं स्थिर राहें ॥ ५ ॥

भाग ५ वा.

देव भेटण्याकरितां तळमळ.

तुका म्हणे गाईवत्सा तडातोडी । तैसी जाते घडी एकी मज ॥

—गा. १७६२-५.

१ अभंग.

मातेविण बाळा । आणिक न माने सोहळा ॥ १ ॥
तैसें जालें माझ्या चित्ता । तुजविण पंढरिनाथा ॥ २ ॥
वाट पाहे मेघा बिंदु । नेघे चातक सरितासिंधु ॥ ३ ॥
सारसासी निशीं । ध्यान रवीच्या प्रकाशीं ॥ ४ ॥
जीवनाविण मत्स्य । जैसें धेनुलागीं वत्स ॥ ५ ॥

पतिव्रते जिणें । भ्ताराच्या वर्तमानें ॥ ६ ॥
कृपणाचें धन–। लोभालागीं जैसें मन ॥ ७ ॥
तुका म्हणे काय । तुजवीण प्राण राहे ॥ ८ ॥

२ अभंग

चक्रवाक पक्षी वियोगें बाहती । जालें मजप्रती तैसें आतां ॥ १ ॥
चुकलीया माय बाळकें रडती । जालें मजप्रति तैसें आतां ॥ २ ॥
वत्स न देखतां गाई हंबरती । जालें मजप्रती तैसें आतां ॥ ३ ॥
जीवनावेगळे मच्छ तळमळती । जालें मजप्रती तैसें आतां ॥ ४ ॥
नामा म्हणे मज वाटे ऐसे चित्तीं । करीतसें खंती फार तुझी ॥ ५ ॥

३ अभंग.

कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनी पाहे ॥ १ ॥
तैसें झालें माझ्या जीवा । केव्हां भेटसी केशवा ॥ २ ॥
चुकलिया माये । बाळ हुरूहुरू पाहे ॥ ३ ॥
जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥ ४ ॥

४ अभंग.

तुजलागीं झाला जीव माझा पिसा । अवलोकितों दिशा पांडुरंगा ॥ १ ॥
सांडिला व्यवहार माया लोकाचार । छंद निरंतर हाचि मना ॥ २ ॥
आइकिलें कानीं तें रूप लोचन । देखावया सीण करितातीं ॥ ३ ॥
प्राण हा विकळ होय कासाविस । जीवनाविण मत्स्य तयापरी ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां कोणता उपाव । करूं तुझे पाव आतुडे तो ॥ ५ ॥

५ अभंग.

भेटीलागीं जीवा लागलीसे आस । पाहें रात्रंदिवस वाट तुझी ॥ १ ॥
पूर्णिमेचा चंद्र चकोरा जीवन । तैसें माझें मन वाट पाहे ॥ २ ॥
दिवाळीच्या मुळा लेंकी आसावली । पाहतसे वाटुली पंढरीची ॥ ३ ॥

भुकेलिया बाळ अति शोक करी । वाट पाहे परी माउलीची ॥ ४ ॥
तुका म्हणे मज लागलीसे भूक । धांवूनी श्रीमुख दावीं देवा ॥ ५ ॥

६ अभंग.

नको विसरूं तूं येईं आतां वेगें । चरण दावीं गे रामाबाई ॥ १ ॥
चरणदर्शनासी लागलीसे क्षुधा । तेणें थोर बाधा पावतसें ॥ २ ॥
अंतरींचें दुःख सांगूं कोणापाशीं । तूं एक जाणसी रामराया ॥ ३ ॥
कोण या दुःखाची करील निवृत्ति । रामा रघुपति तुजविण ॥ ४ ॥
राघवा मी तुझ्या दर्शनावांचून । जालों फार दीन रामराया ॥ ५ ॥
दर्शन भाषण तुझें हें घडेल । तेव्हां तें होईल सुख मज ॥ ६ ॥
मासोळी ही जैशी जीवनावांचून । तैसा तुजवीण व्याकुळ मी ॥ ७ ॥
सत्य मिथ्या रामा जाणसी अंतरीं । व्यर्थ मी मुरारी काय बोलूं ॥ ८ ॥
तुजवीण मज अन्य प्रिय नाहीं । शपथ हे पाहीं वाहतसें ॥ ९ ॥
कोटी ब्रह्महत्या पातक घडेल । प्रिय हें असेल अन्य जरी ॥ १० ॥
आत्मया श्रीरामा तूंचि मला प्रिय । सर्वही अप्रिय तुजविण ॥ ११ ॥
तुझ्या दर्शनाची तृषा लागतसे । आणिक हें नसे प्रिय मज ॥ १२ ॥
आतां किती माझा पाहासील अंत । दयाळू बहुत राघवा तूं ॥ १३ ॥
मौनी म्हणे तुझें रूप हें सगुण । दाखवीं भाषण करीं मज ॥ १४ ॥

७ पद.

दाखविं तव दिव्य पाय दयानिधे रामा । दाखविं तव० ॥ ध्रु० ॥
हीन दीन आस तुझी कास पूर्ण आम्हां ।
धरावया पाहतसें अगा घनश्यामा ॥ दा० ॥ १ ॥
माय बाप बंधु गोत्र, मित्र तूंचि आम्हां ।
तुजवीण कोण असे सांग सख्या रामा ॥ दा० ॥ २ ॥
सखया आनंदतनय म्हणे गुणग्रामा ।
शीण भाग हरीं त्वरें पुसोनियां घामा ॥ दा० ३ ॥

८ पद.

धांव रे रामराया । किती अंत पाहसी ॥ धांव रे० ॥ ध्रु० ॥
प्राणांत मांडियेला । नये करुणा कैसी ।
पाहीन धणिभरी । चरण झाडीन केशीं ॥
नयन शिणले बा । आतां केधवां येसी ॥ धांव रे० ॥ १ ॥
मीपण अभिमानें । अंगिं भरला ताठा ॥
विषयकर्दमांत । लाज न वाटे लोळतां ॥
चिळस उपजेना । ऐसे झालें बा आतां ॥ धांव रे० ॥ २ ॥
मारुतीस्कंधभागीं । शीघ्र बैसोनि यावें ॥
राघवें वैद्यराजें । कृपाऔषध द्यावें ॥
दयेच्या पद्महस्तें । माझ्या शिरीं ठेवावें ॥ धांव रे० ॥ ३ ॥
या भवीं रामदास । थोर पावतो व्यथा ॥
कौतुक पाहतोसी । काय जानकीनाथा ॥
दयाळा दीनबंधो । भक्तवत्सला आतां ॥ धांव रे० ॥ ४ ॥

९ अभंग.

क्षुधार्थी अन्नें दुष्काळें पीडिलें । मिष्टान्न देखिलें तेणें जैसें ॥ १ ॥
तैसें तुझे पायीं लाचावलें मन । झुरे माझा प्राण भेटावया ॥ २ ॥
मांजरें देखिला लोणियाचा गोळा । लावुनियां डोळां बैसलेंसे ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां झडी घालूं पाहे । पांडुरंगे माये तुझे पायीं ॥ ४ ॥

देवा, धांव.

१० अभंग (१)

धांव घालीं आई । आतां पाहतेसी काई ॥ १ ॥
धीर नाहीं माझे पोटीं । झालों वियोगें हिंपुटी ॥ २ ॥
करावें सीतळ । बहु झाली हळहळ ॥ ३ ॥
तुका म्हणे डोई । कधीं ठेवीन हे पायीं ॥ ४ ॥

११ अभंग. (१)

धांव धांव गरुडध्वजा । आम्हां अनाथांच्या काजा ॥ १ ॥
बहु झालों कासावीस । म्हणोनि पाहें तुझी वास ॥ २ ॥
पाहे त्या मारगें । कोणी येतें माझ्या लागें ॥ ३ ॥
असोनियां ऐसा । तुजसारिखा कोंवसा ॥ ४ ॥
न लावावा उशीर । नेणों कांहो केला धीर ॥ ५ ॥
तुका म्हणे चाली । नको चालूं; धांव घालीं ॥ ६ ॥

१२ अभंग. (२)

क्षणक्षणां जीवा वाटतसे खंती । आठवती चित्तीं पाय देवा ॥ १ ॥
येई वो येई वो येई लवलाहीं । आलिंगूनि बाहीं क्षेम देई ॥ २ ॥
उताविळ मन पंथ अवलोकी । आठवे ते चुकी काय झाली ॥ ३ ॥
तुका म्हणे माझ्या जीवींच्या जीवना ॥ घाला नारायणा उडी वेगीं ॥ ४ ॥

१३ अभंग.

न्यावयासी मूळ पाठवील कधीं । मज कृपानिधि पांडुरंग ॥ १ ॥
प्राण फुटे माझा त्याचिया वियोगें । घडी जाय युगें येकीयेकी ॥ २ ॥
त्याचिये गांवीची आवड ती जीवा । जीव हा सांडवा ओंवाळूनी ॥ ३ ॥
दिनोदिन चिंता वाटत्ये बहुत । नावडे संचित करावेंसें ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां आहे तेंचि सरो । कोण करी भरोवरी मग ॥ ५ ॥

१४ अभंग.

न लगती मज शब्दब्रह्मज्ञान । तुझिया दर्शनावांचूनियां ॥ १ ॥
म्हणऊनि तुझें करितों चिंतन । नावडे वचन आणिकांचें ॥ २ ॥
काय ते महत्वीं करावी मान्यता । तुज न देखतां पांडुरंगा ॥ ३ ॥
तुका म्हणे तुज भेटल्यावांचून । न राहें त्याहूनि होइन वेडा ॥ ४ ॥

१५ अभंग.

भेटीची आवडी उताविळ मन । लागलेंसे ध्यान जीवीं जीवा ॥ १ ॥
आतां आवडीचा पुरवावा सोहळा । येउनि गोपाळा क्षेम देई ॥ २ ॥
नेत्र उन्मळित राहिले ताटस्त । गंगा अश्रुपात वहावली ॥ ३ ॥
तुका म्हणे तुम्ही करा साचपणा । मुळींच्या वचना आपुलिया ॥ ४ ॥

१६ अभंग.

भेटीलागीं पंढरिनाथा । जीवीं लागली तळमळ व्यथा ॥ १ ॥
कैं कृपा करिसी नेणें । मज दीनाचें धांवणें ॥ २ ॥
सीणलें माझें मन । वाट पाहतां लोचन ॥ ३ ॥
तुका म्हणे भूक । तुझें पाहावया मुख ॥ ४ ॥

१७ अभंग.

कीर्तन ऐकावया भुलले श्रवण । श्रीमुख लोचन देखावया ॥ १ ॥
उदित हें भाग्य होईल कोणे काळीं । चित्त तळमळी म्हणऊनी ॥ २ ॥
उतावीळ बाह्या भेटीलागीं दंड । लोटांगणीं धडे[1] जावयासी ॥ ३ ॥
तुका म्हणे माथा ठेवीन चरणीं । होतील पारणीं इंद्रियांची ॥ ४ ॥

१८ अभंग.

वाटुली पाहतां सीणले डोळुले । दाविसी पाउलें कैं वो डोळां ॥ १ ॥
तूं माय माउली कृपेची साउली ! निठले पाहिली वास तुझी ॥ २ ॥
कां बा मोकलिलें कवणा निरविलें । कठिण कैसें झालें हृदय तुझें ॥ ३ ॥
तुका म्हणे माझ्या आसावल्या बाह्या । तुज क्षेम द्याया पांडुरंगा ॥ ४ ॥

१९ अभंग.

पंढरीची वाट पाहें निरंतर । निढळावरी कर ठेवूनियां ॥ १ ॥
जातियां निरोप पाठवीं माहेरा । कां मज सासुरां सांडियेलें ॥ २ ॥

---

१ धड म्हणजे शरीर लोटांगणीं जावयासी उतावीळ झालें आहे.

पैल कोण दिसे गरुडाचें वारिकें । विठ्ठलासारिखें चतुर्भुज ॥ ३ ॥
तुका म्हणे धीर नाहीं माझ्या जीवा । भेटसी केधवां पांडुरंगा ॥ ४ ॥

२० अभंग.

वाट पाहें हरि कां न ये आजूनि । निष्ठुर कां मनीं धरियेलें ॥ १ ॥
काय करूं धीर होत नाहीं जीवा । काय आड ठेवा उभा ठेला ॥ २ ॥
बहुतां दिसांचें राहिलें भातुकें । नाहीं कवतुकें कुरवाळिलें ॥ ३ ॥
तुका म्हणे देईं एक वेळां भेटी । शीतळ हे पोटीं होईल मग ॥ ४ ॥

२१ अभंग.

दर्शनासी कां गा लाविला उशीर । धरवेना धीर आतां कांहीं ॥ १ ॥
पतित म्हणोनी न येसी दयाळा । नाम कां कृपाळा पतितोद्धार ॥ २ ॥
माता कोपे तरी पित्याकडे जावें । बाळा नाहीं ठावें अन्य कोणी ॥ ३ ॥
तूंचि माझी माता तूंचि माझा पिता । तूंचि निवारीता जाऊं कोठें ॥ ४ ॥
नको अंत पाहूं बाळा अतुर्बळी । दृत्त चरणकमळीं रतलासे ॥ ५ ॥

२२ अभंग.

कर कटावरी तुळसीच्या माळा । ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥ १ ॥
ठेविले चरण दोन्ही विटेवरी । ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ २ ॥
कटीं पितांबर कांस मिरविली । दाखवीं वहिली ऐसी मूर्ति ॥ ३ ॥
गरुडपारावरी उभा राहिलासी । आठवे मानसीं तेंचि रूप ॥ ४ ॥
झुरोनि पांजरा होउं पाहें आतां । येईं पंढरीनाथा भेटावया ॥ ५ ॥
तुका म्हणे माझी पुरवावी आस । विनंति उदास करूं नको ॥ ६ ॥

२३ अभंग.

हाचि माझा नेम धरिला हो धंदा । यावरी गोविंदा भेटी द्यावी ॥ १ ॥
हाचि माझा ध्यास सदा सर्वकाळ। न्यावयासी मूळ येसी कधीं ॥ २ ॥

ढोळियांची भूक पाहतां श्रीमूख । आलिंगनें सुख निवति भुजा ॥ ३ ॥
बहु चित्त ओढे तयाचिये सोई । पुरला हा कांहीं नवस नेणें ॥ ४ ॥
बहु बहु काळ झालों कासाविस । वाहिलें बहुवस कलेवर ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां पाडावें हें ओझें । पांडुरंगा माझें इयावरी ॥ ६ ॥

१४ अभंग.

तुजविण मज कोण वो सोयरें । आणीक दुसरें पांडुरंगे ॥ १ ॥
लागलीसे आस पाहें तुझी वास । रात्रीं वो दिवस लेखीं बोटीं ॥ २ ॥
काम गोड मज नलगे हा धंदा । तुका म्हणे सदा हेंचि ध्यान ॥ ३ ॥

२५ अभंग.

नाहीं सुख मज नलगे हा मान । न राहे हे जन काय करूं ॥ १ ॥
देहउपचारें पोळतसे अंग । विषातुल्य चांग मिष्टान्न तें ॥ २ ॥
नायकवे स्तुती वाणितां थोरीव †। होतो माझा जीव कासावीस ॥ ३ ॥
तुज पावें ऐसी सांग कांहीं कळा । नको मृगजळा गोवूं मज ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां करीं माझें हित । काढावें जळत आगींतुनी ॥ ५ ॥

१६ अभंग.

न लगे हें मज तुझें ब्रह्मज्ञान । गोजिरें सगूण रूप पुरे ॥ १ ॥
लागला उशीर पतितपावना । विसरोनि वचना गेलासी या ॥ २ ॥
जाळोनि संसार बैसलों अंगणीं । तुझे नाहीं मनीं मानसींही ॥ ३ ॥
तुका म्हणे नको रागेजूं विठ्ठला । उठीं देई मला भेटी आतां ॥ ४ ॥

---

† होईल थोरपणें जाणिवेचा भार । दुरावेनु दूर तुझ्या पायीं ॥—गा. १३९९.

भाग ६ वा.

भाव बाणण्याकरितां तळमळ. (अ)

माझ्या इच्छेचा तेवढाच सूक्ष्म अंश राहूं दे कीं, ज्याच्या योगानें दरक्षणीं माझें प्रेम मी तुला अर्पण करीन. —गीताजलि ३४.

१ अभंग.

आतां होईं माझे बुद्धीचा जनिता । आवरावें चित्ता पांडुरंगा ॥ १ ॥
येथुनियां कोठें न वजें बाहेरी । ऐसें मज धरीं सत्ताबळें ॥ २ ॥
अनावर गुण बहुतां जातीचें । न बोलावें वाचे ऐसें करी ॥ ३ ॥
तुका म्हणे हित कोणिये जातीचें । तुज ठावें साचें मायबापा ॥ ४ ॥

२ अभंग.

उपासासेवटीं अन्नासवें मेटी । तैसी माझी मिठी पडो पायीं ॥ १ ॥
बहु दिवस पुत्रा मातेसवें भेटी । तैसा दाटो पोटीं प्रीतिउभड ॥ २ ॥
तुका म्हणे धन कृपणा सोइरें । यापरि दुसरें नहो आतां ॥ ३ ॥

३ अभंग.

सांग पांडुरंगा मज हा उपाव । जेणें तुझे पाव आतुडती ॥ १ ॥
न कळे हा निर्धार ब्रह्मादिकां पार । कायसा विचार माझा तेथें ॥ २ ॥
तुका म्हणे आतां धरूनियां धीर । राहूं कोठवर मायबापा ॥ ३ ॥

४ अभंग.

न कळतां काय करावा उपाव । जेणें राहे भाव तुझ्या पायीं ॥ १ ॥
येऊनियां वास करिसी हृदयीं । ऐसें घडे कईं कासयानें ॥ २ ॥
साच भावें तुझें चिंतन मानसीं । राहे हें करिसी कैं गा देवा ॥ ३ ॥
लटिकें हें माझें करूनियां दुरी । साच तूं अंतरीं येउनि राहें ॥ ४ ॥
तुका म्हणे मज राखावें पतिता । आपुलिया सत्ता पांडुरंगा ॥ ५ ॥

५ अभंग.

आतां देवा ऐसा करीं उपकार । देहाचा विसर पडो माझ्या ॥ १ ॥
तरीच हा जीव सुख पावे माझा । वरवें केशवराजा कळों आलें ॥ २ ॥
ठाव देईं चित्ता राखें पायापाशीं । सकळ वृत्तीशीं अखंडित † ॥ ३ ॥
आस भय लाज चिंता काम क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा ॥ ४ ॥
मागणें हें देवा तुज एक आतां । नाम मुखीं संतसंग देईं ॥ ५ ॥
तुका म्हणे नको वरपांग देवा । घेईं माझी सेवा भावशुद्ध ॥ ६ ॥

६ अभंग

कईं ऐसी दशा येईल माझ्या अंगा । चित्त पांडुरंगा झुरतसे ॥ १ ॥
नाठवुनी देह पायांचें चिंतन । अवसान तें क्षण नाहीं मध्यें ॥ २ ॥
काय ऐसा पात्र होईन लाभासी । कईं हृषीकेशी तुष्टतील ॥ ३ ॥
तुका म्हणे धन्य मानीन संचित । घेईन नित्यानित्य प्रेमसुख ॥ ४ ॥

७ अभंग.

येईंगे विठ्ठले अनाथाचे नाथे । माझे कूळदैवते पंढरीचे ॥ १ ॥
पंचही प्राणाचा उजळोनि दीप । सुंदर श्रीमुख ओंवाळीन ॥ २ ॥
मनाचा प्रसाद तुजलागिं केला । रंग भोग आपुला घेऊनि राहें ॥ ३ ॥
आनंदाचा भोग घालीन आसनीं । वैकुंठवासिनी तुझ्या नांवें ॥ ४ ॥
आपुलें म्हणावें सनाथ करावें । भावें संचारावें हृदयघटीं ॥ ५ ॥
नामा म्हणे माझे पुरवीं मनोरथ । देईं सदोदित प्रेमकळा ॥ ६ ॥

८ अभंग.

सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरीया ॥ १ ॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्वकाळ ॥ २ ॥
विठो माउलिये हाचि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजीं ॥ ३ ॥
तुका म्हणे कांहीं न मागें आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ४ ॥

---

† तुका म्हणे सर्व भाव तुझे पायीं । राहे ऐसें देईं प्रेम देवा ॥ —गा. ८९८·६

९ अभंग.

माझें चित्त तुझे पायीं । राहे ऐसें करीं कांहीं ॥
धरूनियां बाही । भव हा तारीं दातारा ॥ १ ॥
करीं या तिमिराचा नाश । उदय होऊनि प्रकाश ॥
तोडीं आशापाश । करीं वास हृदयीं ॥ २ ॥
पाहें गुंतलों नेणतां । माझी असो तुम्हां चिंता ॥
तुका ठेवी माथा । पायीं; आतां राखावें ॥ ३ ॥

१० अभंग.

मागता भिकारी झालों तुझे द्वारीं । देईं मज हरी कृपादान ॥ १ ॥
प्रेमप्रीति नाम उचित करावें । भावें संचरावें हृदयामाजीं ॥ २ ॥
सर्वभावें शरण आलों पांडुरंगा । कृपाळु तूं जगामाजीं एक ॥ ३ ॥
तापत्रयें माझी तापविली काया । शीतळ व्हावया पाय तुझे ॥ ४ ॥
संबंधीं जनवाद पीडिलों परोपरी । अंतरलों दुरी तुजसी तेणें ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां तुझा शरणागत । करावें सनाथ मायबापा ॥ ६ ॥

११ अभंग.

मी अवगुणी अन्यायी । किती म्हणोन सांगों काई ॥
आतां मज पायीं । ठाव देईं विठ्ठले ॥ १ ॥
पुरे पुरे हा संसार । कर्म बळिवंत दुस्तर ॥
राहों नेदी स्थिर । एके ठायीं निश्चळ ॥ २ ॥
अनेक बुद्धीचे तरंग । क्षणक्षणां पालटती रंग ॥
धरूं जातां संग । तंव तो होतो बाधक ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां । अवघी तोडीं माझी चिंता ॥
येऊनी पंढरीनाथा । वास करीं हृदयीं ॥ ४ ॥

१२ अभंग.

तुझा विसर नको माझिया हो जीवा । क्षण एक केशवा मायबापा ॥ १ ॥
जावो राहो देह आतां येचि घडी । कायसी आवडी याची मज ॥ २ ॥

कुश्चिळ इंद्रियें आपुलिया गुणें । यांचिया पाळणें कोण हित ॥ ३ ॥
पुत्र पत्नी बंधु सोयरीं खाणोरीं । यांचा कोण धरी संग आतां ॥ ४ ॥
पिंड हा उसना आणिला पांचांचा । सेखीं लागे ज्याचा त्यासी देणें ॥५॥
तुका म्हणे नाहीं आणिक सोइरें । तुजविण दुसरें पांडुरंगा ॥ ६ ॥

१३ अभंग.

जेणें माझें चित्त राहे तुझ्या पायीं । अखंड तें देई प्रेमसुख ॥ १ ॥
देहभाव राखा दीन करूनियां । जनाचारी वायां जाय तैसा ॥ २ ॥
द्रव्य दारा नको मानाची आवडी । कवणेविशीं गोडी प्रपंचाची ॥ ३ ॥
तुझें नाम माझें धरूनियां चित्त । एकांत लोकांत सदा राहो ॥ ४ ॥
तुका म्हणे तुझे जडोनियां पायीं । झालों उतराई पांडुरंगा ॥ ५ ॥

१४ अभंग.

ऐसें भाग्य कईं लाहाता होईन । अवघें देखें जन ब्रह्मरूप ॥ १ ॥
मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥ २ ॥
शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ॥ ३ ॥
विवेकासहित वैराग्याचें बळ । धगधगितोज्वळ अग्नि जैसा ॥ ४ ॥
भक्ति नवविधा भाव-शुद्ध बरी । अळंकारावरि मुगुटमणि ॥ ५ ॥
तुका ह्मणे माझी पुरवी वासना । कोण नारायणा तुजविण ॥ ६ ॥

भाव बाणण्याकरितां तळमळ. (आ)

जोडोनियां कर । उभा राहिलों समोर ॥ १ ॥
हेंचि माझें भांडवल । जाणे कारण विठ्ठल ॥ २ ॥

१ पद.

उत्तम जन्मा येउनि रामा गेलों मी वायां ।
दुष्ट पातकी शरण मी आलों सत्वर तव पायां ॥ ध्रु० ॥
आधीं चुकलों मुकलों मी निजवेदस्वाध्याया ।

कर्मे श्रौत स्मार्त न घडलीं सद्गति साधाया।
पुराण परिसुनि सादर झालों यशहि न तव गाया।
स्वस्थपणें कधिं नाहिं फावलें तुजला पूजाया ॥ उत्तम० ॥ १ ॥
आर्जविलें बहु लवणभंजनें व्याह्या जांवया।
क्षुधित अतिथि कधिं नाहिं घेतला प्रेमें जेवाया।
उदार कर कधीं केला नाहीं पैसा एक द्याया।
नाम फुकटचें तेंहि न आलें स्वामी ! वदना या ॥ उत्तम० ॥ २ ॥
कपट करुनियां निपट भोंदिल्या बहुत आयाबाया।
केली धनगृहक्षेत्रस्त्रीपशुशिशुवर बहु माया।
नित्य सजविली वसनभूषणें निंद्या ही काया।
सिद्ध ठेविली सदाहि रसना सज्जन निंदाया ॥ उ० ॥ ३ ॥
वटवट निशिदिनिं केलि चहुंकडे मन हें रमवाया।
केलें स्नान न संध्या जपतप दुष्कृत शमवाया।
क्षणहि न केला साधुसमागम भवदव निववाया।
सद्यःकामुक झालों पाहुनि परधन परजाया ॥ उ० ॥ ४ ॥
नाहीं विद्या कला कुशलता तुजला रिझवाया।
शुद्ध मधुर वाणीही नाहीं तुजला विनवाया।
बुद्धिहि नाहीं न कळे कांहीं शरणागत व्हाया।
थकलि मजल सर्वथा दयाळा स्वहित आचराया ॥ उ० ॥ ५ ॥
' हरि कनवाळू करि दीनावरि करुणेची छाया। '
निगमनगारा गर्जे ऐसा निखिलां कळवाया।
यावरि विश्वासुनियां आलों जवळ तुझ्या पाया।
शुद्ध दगड हा पंतं विठ्ठल स्वामी रघुराया ॥ उ० ॥ ६ ॥

२ अभंग.

कैसी करूं तुझी सेवा। एसें सांगावें जी देवा ॥
कैसा आणूं अनुभवा। होसी ठावा कैशापरी ॥ १ ॥

कर्मभ्रष्ट माझें मन । नेणें जप तप अनुष्ठान ॥
नाहीं इंद्रियांसी दमन । नव्हे मन एकविध ॥ २ ॥
नेणें यातीचा आचार । नेणें भक्तीचा विचार ॥
मज नाहीं संतांचा आधार । नाहीं स्थिर बुद्धि माझी ॥ ३ ॥
न सुटे मायाजाळ । नाहीं वैराग्याचें बळ ॥
न जिंकवती सबळ । काम क्रोध शरीरीं ॥ ४ ॥
आतां राख कैसें तरी । मज नुपेक्षावें हरी ॥
तुझीं ब्रीदें चराचरीं । तैसीं साच करीं तुका म्हणे ॥ ५ ॥

३ अभंग.

कैसें करूं ध्यान कैसा पाहों तुज । वर्म दावीं मज याचकासी ॥ १ ॥
कैसी भक्ति करूं सांग तुझी सेवा । कोण्या भावें देवा आतुडसी ॥ २ ॥
कैसी कीर्ति वाणूं कैसा लक्षा आणूं । जाणूं हा कवणु कैसा तुज ॥ ३ ॥
कैसा गाऊं गीतीं कैसा ध्याऊं चित्तीं । कैसी स्थिती मति दावीं मज ॥ ४ ॥
तुका म्हणे जैसें दास केलें देवा । तैसें हें अनुभवा आणीं मज ॥ ५ ॥

४ अभंग.

न कळे जी भक्ती काय करूं सेवा । संकोचोनि देवा राहिलोंसे ॥ १ ॥
जोडोनियां कर राहिलों निवांत । पायांपाशीं चित्त ठेवूनियां ॥ २ ॥
दिशाभूलीं करीं स्थळीं प्रदक्षिणा । भ्रमें नारायणा कष्टविलें ॥ ३ ॥
तुका म्हणे झालों आज्ञेचा पाळक । जीवनासी एक ठाव केला ॥ ४ ॥

५ अभंग.

वायां जातों देवा । नेणें भक्ती करूं सेवा ॥ १ ॥
आतां जोडोनियां हात । उभा राहिलों निवांत ॥ २ ॥
करावें तें काय । नकळे अवलोकितों पाय ॥ ३ ॥
तुका म्हणे दान । दिलें पदरीं घेईन ॥ ४ ॥

६ अभंग.

आदि वर्तमान जाणसी भविष्य । मागें पुढें नीस संचिताचा ॥ १ ॥
आतां काय देऊं पायांपें परिहार । जाणा तो विचार करा देवा ॥ २ ॥
आपुलें तें येथें काय चाले केलें । जोडावे ते भले हात पुढें ॥ ३ ॥
तुका म्हणे फिके बोल माझे वारा । कराल दातारा होईल तें ॥ ४ ॥

७ अभंग.

विश्वास धरूनि राहिलों निवांत । ठेवूनियां चित्त तुझे पायीं ॥ १ ॥
तरावें बुडावें तुझिया वचनें । निर्धार हा मनें केला माझ्या ॥ २ ॥
न कळे हें मज साच चाळविलें । देसी तें उगलें घेइन देवा ॥ ३ ॥
मागणें तें सरे ऐसें करीं देवा । नाहीं तरी सेवा सांगा पुढें ॥ ४ ॥
करावें कांहीं कीं पाहावें उगलें । तुका म्हणे बोलें पांडुरंगा ॥ ५ ॥

८ अभंग.

तुज पाहावें हे धरितों वासना । परि आचरणा नाहीं ठाव ॥ १ ॥
करिसी कैवार आपुलिया सत्ता । तरिच देखता होईन पाय ॥ २ ॥
बाहिरल्या वेषें उत्तम दंडिलें । भीतरीं मुंडलें नाहीं तैसें ॥ ३ ॥
तुका ह्मणे वांयां गेलोंच मी आहें । जरी तुम्ही साहे न व्हा देवा ॥४॥

९ अभंग.

भाव नाहीं भक्ती नाहीं । प्रेम नाहीं तिळमात्र ॥ १ ॥
तुझ्या नांवें केलें सोंग । अंतरंग संपादी ॥ २ ॥
शांति नाहीं दया नाहीं । नाहीं नाहीं विरक्ति ॥ ३ ॥
म्हणे विष्णुदास विठा § । ब्रीद श्रेष्ठा सांभाळीं ॥ ४ ॥

---

§ नामदेवाच्या कुटुंबांतील सर्व माणसांचीं नांवें खालील अभंगांत आहेत.
गोणाई राजाई दोघी सासूसुना । दामा नामा जाणा बापलेक ॥ १ ॥
नारा ह्मादा गोंदा विठा चौघे पुत्र । जन्मले पवित्र त्याचे वंशीं ॥ २ ॥
लाडाई गोडाई येसाई साकराई । चौघि सुना पाहीं नामयाच्या ॥ ३ ॥
निंबाई ते लेकी नाउबाई बहिणी । वेडी पिशी जनी दासी त्याची ॥ ४ ॥
इतुक्याही जणीं अभंग आरंभिले१ देवें पूर्ण केले नामा म्हणे ॥ ५ ॥

१० अभंग.

ममता तुटेना मज केशीराजा । अंगीं भाव दुजा लागे पाठी ॥ १ ॥
शरीरीं तितिक्षा नाहीं क्षमा शांति । या लागीं श्रीपती वायां गेलों ॥ २ ॥
नामा म्हणे देवा तारिसी पतिता । म्हणोनियां सत्ता केली आम्हीं ॥ ३ ॥

११ अभंग.

कृपाळू म्हणोनि बोलती पुराणें । निर्धार वचनें यार्चीं मज ॥ १ ॥
आणीक उपाय नेणेंचि मी कांहीं । तुझें वर्म ठायीं पडे तैसें ॥ २ ॥
नये धड कांडीं बोलतां वचन । रिघालों शरण सर्व भावें ॥ ३ ॥
कृपा करिसी तरी थोडें तुज काम । माझा तरी श्रम बहु हरे ॥ ४ ॥
तुका म्हणे मज दाखवीं श्रीमुख । हरेल या भूक डोळियांची ॥ ५ ॥

१२ अभंग.

पतित-पावना अगा नारायणा । करुणावचना चित्त द्यावें ॥ १ ॥
तूं आमुचा स्वामी आम्ही तुझे रंक । आपुली ती भाक सांभाळावी ॥२॥
हीन दीन पापी न कळे आचरण । धरिले चरण दृढ जीवीं ॥ ३ ॥
साकराई विनवोनी घाली लोटांगण । वंदित चरण वारंवार ॥ ४ ॥

१३ अभंग.

लाज वाटे पुढें तोंड दाखवीतां । परि जाऊं आतां कोणापाशीं ॥ १ ॥
चुकलिया कामा मागतों मुशारा । लाज फजितखोरा नाहीं मज ॥ २ ॥
पाय सांडूनियां फिरतों वासर । स्वामि-सेवा-चोर होऊनियां ॥ ३ ॥
तुका म्हणे मज पाहिजे दंडिलें । पुढें हें घडलें न पाहिजे ॥ ४ ॥

भाग ७ वा.

करुणा (अ)

देव कैंचा तया दुरी । भाकी बरी करुणा ॥ १ ॥
आळविल्या नलगे घर । माय जाणे रे भातुकें ॥ २ ॥
माझे हातीं आहे करावें चिंतन । तुम्हीं कृपादान प्रेम द्यावें ॥ १ ॥
मागतियां भांडवल आळवण । नामाची जतन दातियासी ॥ २ ॥

१ अभंग.

येईगे विठ्ठले विश्वजीवनकळे । सुंदर घननीळे पांडुरंगे ॥ १ ॥
येईं गे विठ्ठले करुणाकल्लोळे । जीव कळवळे भेटावया ॥ २ ॥
न लगती गोड आणिक उत्तरें । तुझें प्रेम झुरें भेटावया ॥ ३ ॥
तुका म्हणे धांव घालीं कृष्णाबाई । क्षेम चहूं बाहीं देईं मज ॥ ४ ॥

२ अभंग.

कोण आम्हां पुसे सिणिलें भागलें । तुजविण उगलें पांडुरंगा ॥ १ ॥
कोणापाशीं आम्हीं सांगावें सुखदुःख । कोण तहानभूक निवारील ॥ २ ॥
कोण या तापाचा करिल परिहार । उतरील पार कोण दुजा ॥ ३ ॥
कोणापें इच्छेचें मागावें भातुकें । कोण कवतुकें बुझाविल ॥ ४ ॥
कोणावरी आम्ही करावी हे सत्ता । होईल साहाता कोण दुजा ॥ ५ ॥
तुका म्हणे अगा स्वामी सर्व जाणा । दंडवत चरणां तुमच्या देवा ॥ ६ ॥

३ अभंग.

एवढा संकोच तरि कां व्यालासी । आम्ही कोणापाशीं तोंड वासूं ॥ १ ॥
कोण मज पुसे सिणलें भागलें । जरी मोकलिलें तुम्हीं देवा ॥ २ ॥
कवणाची वाट पाहों कोणीकडे । कोण मज ओढे जीवलग ॥ ३ ॥
कोण जाणे माझे जीवींचें सांकडें । उगवील कोडें संकटाचें ॥ ४ ॥
तुका म्हणे तुम्हीं देखिली निश्चिंती । काय माझे चित्तीं पांडुरंगा ॥ ५ ॥

४ अभंग.

माझी कोण गती सांगा पंढरीनाथा । तारिसी अनाथा केव्हां मज ॥ १ ॥
मनापासूनियां सांगा मजप्रती । पुसें काकुळती जीवाचिया ॥ २ ॥
न बोलसि कांरे धरिला अबोला । कोणासी विठ्ठला शरण जाऊं ॥ ३ ॥
कोणाशी सांकडें घालावें हें सांग । नको धरूं राग दीनावरी ॥ ४ ॥
बाळकासी जैशी एकची ते माय । तैसे तुझे पाय मजलागीं ॥ ५ ॥
नामा म्हणे देवा अनाथाच्या नाथा । कृपाळुवा कांता रखुमाईच्या ॥ ६ ॥

५ अभंग.

संवसारतापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥
म्हणऊनी तुझे आठविले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ॥ २ ॥
बहुतां जन्मींचा झालों भारवाही । सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥ ३ ॥
वेढियेलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं । कवण न करी कोणी माझी ॥ ४ ॥
बहु पांगविलों बहु वागविलों । बहु दिवस झालों कासाविस ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां धांव घाली वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीनानाथा ॥ ६ ॥

६ अभंग.

भ्रमाचिये सर्पें डंखियेलें मज । धांव चतुर्भुज गारोडिया ॥ १ ॥
पहातोसी काय जीवहत्या शिरीं । पडेल निर्धारीं पांडुरंगा ॥ २ ॥
विषयवाघुरे[1] सांपडलें आंत । कामाग्निही तेथ साह्य झाला ॥ ३ ॥
बहेणि म्हणे व्याधें करुनि सिद्ध बाण । लाविला निर्वाण पाहूं नको ॥ ४ ॥

७ अभंग.

स्त्रीपुत्रादिकीं राहिला आदर । विषयीं पडिभर अतिशय ॥ १ ॥
आतां सोडवणें धांवा नारायणा । मज हे वासना अनावर ॥ २ ॥
येउनियां आड ठाके लोकलाज । तों हें दिसे काज अंतरलें † ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हां जेथें जेथें गोवा । तेथें तुम्हीं देवा सांभाळावें ॥ ४ ॥

---

१ विषयवाघुरे आंत, विषयांच्या जाळ्यांत.

† जरि हे आड येती लाज । कैसें काज साधतें ॥ —तुकाराम.

८ अभंग.

सर्वविशीं माझा त्रासलासे जीव । आतां कोण भाव निवडूं एक ॥ १ ॥
संसाराची मज न साहेचि वार्ता । आणीक म्हणतां माझें कोणी ॥ २ ॥
देहसुख कांहीं बोलिलें उपचार । विष तें आदर बंध वाटे ॥ ३ ॥
उपाधि दाटणी प्रतिष्ठा गौरव । होय माझा जीव कासावीस ॥ ४ ॥
तुका म्हणे कांहीं आणीक न साहे । आवडती पाय वैष्णवांचे ॥ ५ ॥

९ अभंग.

माझिये जातीचें मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया ॥ १ ॥
आवडे ज्या हरी अंतरापासूनी । ऐसियाचे मनीं आर्त माझें ॥ २ ॥
तयालागीं जीव होतो कासावीस । पाहतील वास नयन हे ॥ ३ ॥
सफळ हा जन्म होईल तेथून । देतां आलिंगन वैष्णवांसी ॥ ४ ॥
तुका म्हणे तोचि सुदिन सोहळा । गाऊं या गोपाळा धणीवरी ॥ ५ ॥

१० अभंग.

आळवितां कंठ शोषला भीतर । आयुष्य वेंचे धीर नाहीं मना ॥ १ ॥
अझून कां नये हें तुझ्या अंतरा । दिनाच्या माहेरा पांडुरंगा ॥ २ ॥
धन दिसे डोळां दगडाचे परी । भोग ते शरीरीं विष झाले ॥ ३ ॥
चुकलों काय तें मज क्षमा करीं । आलिंगूनि हरी प्रेम द्यावें ॥ ४ ॥
अवस्था राहिली रूपाची अंतरीं । बाहेर भीतरीं सर्वकाळ ॥ ५ ॥
तुका म्हणे माझे सकळ उपाय । पांडुरंगा पाय तुझे आतां ॥ ६ ॥

११ अभंग.

जे जे कांहीं मज होईल वासना । ते ते नारायणा व्हावें तुम्ही ॥ १ ॥
काय भाव एक निवडूं निराळा । जाणसी तूं कळा अंतरींची ॥ २ ॥
तुजवीण मज कोण आहे सखा । जें सांगों आणिकां जीवभाव ॥ ३ ॥
अवघें पिशुन झालें असे जन । आपपर कोण नाठवे हें ॥ ४ ॥
तुका म्हणे तूंचि जीवांचें जीवन । माझें समाधान तुझे हातीं ॥ ५ ॥

१२ अभंग.

तुजविण आम्हां कोण आहे देवा । धांव यादव-राया मायबापा ॥ १ ॥
पडिलोंसे डोहीं प्रपंचआवर्तीं । कोण करी शांति तुजविण ॥ २ ॥
जन्ममरणाचा पडलासे फेरा । सोडवीं दातारा मायबापा ॥ ३ ॥
एका जनार्दनीं धांवे लवलाहीं । येवोनियां हृदयीं ठाव देईं ॥ ४ ॥

१३ अभंग.

तुज म्हणतील कृपेचा सागर । तरि कां केला धीर पांडुरंगा ॥ १ ॥
अजुनी कां नये तुज माझी दया । काय देवराया पाहतोसी ॥ २ ॥
आळवितों जैसें पाडस कुरंगिणी । पीडिलिया वनीं तहानभूकें ॥ ३ ॥
प्रेमरसपान्हा पाजीं माझे आई । धांवे वो विठाई वोरसोनि ॥ ४ ॥
तुका म्हणे माझें कोण हरिल दुःख । तुजविण एक पांडुरंगा ॥ ५ ॥

१४ अभंग.

कुरंगी पाडस चुकलेंसे वनीं । फुटे दुःखेंकरोनि हृदय त्याचें ॥ १ ॥
तैसा परदेशी झालों तुजविण । नको हो निर्वाण पाहूं माझें ॥ २ ॥
अपराधाच्या कोटी घालीं सर्व पोटीं । नको या शेवटीं उपेक्षूं गा ॥ ३ ॥
तुका म्हणे असों द्यावी माझी चिंता । कृपाळु अनंता पांडुरंगा ॥ ४ ॥

१५ अभंग.

अगा करुणाकरा करीतसें धांवा । या मज सोडवा लवकरी ॥ १ ॥
ऐकोनियां माझीं करुणेचीं वचनें । व्हावें नारायणें उतावीळ ॥ २ ॥
मागें पुढें अवघा दिसे रिता ठाव । ठेऊनि पायीं भाव वाट पाहें ॥ ३ ॥
उशीर तो आतां न पाहिजे केला । अहो जी विठ्ठला मायबापा ॥ ४ ॥
उरलें तें एक हेंचि मज आतां । अवघें विचारितां शून्य झालें ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां करीं कृपादान । पाउलें समान दावीं डोळां ॥ ६ ॥

१६ अभंग.

उपेक्षितां माये कोठें जावें तान्हें । सांगावें गाऱ्हाणें कोणापाशीं ॥ १ ॥
पितयानें कन्या विकिली वृद्धासी । आडवा तयासी न ये कोणी ॥२॥

रायें लुटविलें आपुलें नगर । वर्जिता साचार नाहीं कोणी ॥ ३ ॥
तैसें देवा तुम्ही मोकलिल्यावरी । आमुचा कैवारी कोण आहे ॥ ४ ॥
महिपती म्हणे करीं वो विचार । सत्कीर्ती साचार वाढे जेणें ॥ ५ ॥

१७ अभंग.

काय माझा आतां पाहतोसी अंत । येईं बा धांवत देवराया ॥ १ ॥
तुजवीण होईल जीवासी आकांत । येईं बा धांवत देवराया ॥ २ ॥
असे जरी काम भेटोनियां जावें । धांवोनियां यावें देवराया ॥ ३ ॥
ये रे ये रे देवा नामा तुज बाहत । येईं बा धांवत देवराया ॥ ४ ॥

१८ अभंग.

क्षीरसाररांत अससी बैसला । धांवोनि मजला भेट देईं ॥ १ ॥
शेषावरी जरी अससी निजेला । धांवोनि मजला भेटी देईं ॥ २ ॥
कैलासीं शिव पूजितसे तुजला । धांवोनि मजला भेटी देईं ॥ ३ ॥
गहिंवरुनि नामा बाहतो विठ्ठला । धांवोनि मजला भेटी देईं ॥ ४ ॥

१९ अभंग.

कोठें गुंतलासी कोणाच्या धांवया । आलि देवराया निद्रा तुज ॥ १ ॥
कोठें गुंतलासी भक्तिप्रेमसुखें । न सुटती मुखें गोपिकांचीं ॥ २ ॥
काय पडलें तुज कोणाचें संकट । दुरी पंथ वाट न चालवे ॥ ३ ॥
काय माझे तुज गुणदोष दिसती । म्हणोनि श्रीपति कोपलासी ॥ ४ ॥
काय झालें सांग माझिया कपाळा । उरला जीव डोळां तुका म्हणे ॥ ५ ॥

२० अभंग.

कोठें गुंतलासी योगियांचे ध्यानीं । आनंदकीर्तनीं पंढरीच्या ॥ १ ॥
काय काज कोठें पढलीसे गुंती । कानीं न पडती बोल माझे ॥ २ ॥
काय शेषशयनीं सुखनिद्रा आली । सोय कां सांडिली तुम्ही देवा ॥ ३ ॥
तुका म्हणे कोठें गुंतलेती सांगा । किती पांडुरंगा वाट पाहूं ॥ ४ ॥

२१ अभंग.

काय पाहतोसी कृपेच्या सागरा । नराच्या नरेंद्रा पांडुरंगा ॥ १ ॥
नामाचा प्रताप ब्रिदाचा बडिवार । करावा साचार नारायणा ॥ २ ॥
कलीमाजीं देव बोध्यरूप झाला । जगाचीया बोला लागूं नका ॥ ३ ॥
माय पुत्रा काय मारूं पाहे कळी । जगाची टवाळी काय काज ॥ ४ ॥
तुका म्हणे याहो कृपेच्या सागरा । रुकमादेवीवरा मायबापा ॥ ५ ॥

२२ अभंग.

सर्व भावें आलों तुजचि शरण । कायावाचामनासहित देवा ॥ १ ॥
आणिक दूसरें नये माझ्या मना । राहिली वासना तुझ्या पायीं ॥ २ ॥
माझिये जीवींचें कांहीं जडभारी । तुजवीण वारी कोण देवा ॥ ३ ॥
तुझे आम्ही दास आमुचा तूं ऋणी । चालत दुरूनी आलों मागें ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां घेतलें धरणें । हिशोबाकारणें भेटी देईं ॥ ५ ॥

२३ अभंग.

तुझे दारींचा कुतरा । नको मोकलूं दातारा ॥ १ ॥
धरण घेतलें दारांत । नको धरून उठवूं हात ॥ २ ॥
बहु झालों लंड । पायीं घातली मुर्कुड ॥ ३ ॥
तुका म्हणे जगजीवना । ब्रीद राखीं नारायणा ॥ ४ ॥

२४ अभंग.

शरण शरण नारायणा । मज अंगिकारा दीना ॥ १ ॥
भावें आलों लोटांगणीं । रुळे तुमचे चरणीं ॥ २ ॥
सांडियेली काया । वरी[1] ओंवाळुनीं[1] पायां ॥ ३ ॥
तुका म्हणे शिर । ठेवियेलें पायांवर ॥ ४ ॥

२५ अभंग.

तूं माझी माउली तूं माझी साउली । पहातों वाटुली पांडुरंगे ॥ १ ॥
तूं मज एकला वडील धाकुला । तूं मज आपुला सोयरा जीव ॥ २ ॥
तुका म्हणे जीव तुजपाशीं असे । तुजवीण ओस सर्व दिशा ॥ ३ ॥

---

१ पायांवरी ओंवाळुनी.

१६ अभंग.

माझे मनोरथ पूर्ण कीजे देवा । केशवा माधवा नारायणा ॥ १ ॥
नाहीं नाहीं मज आणिक सोयरा । न करीं अव्हेरा पांडुरंगा ॥ २ ॥
अनाथाचा नाथ होसी तूं दयाळा । किती वेळोवेळां प्रार्थूं आतां ॥ ३ ॥
नामा म्हणे जीव होतो कासावीस । केली तुझी आस आतां तरी ॥४॥

१७ पद.

घडि घडि घडि चरण तुझे आठवती रामा ॥ ध्रु० ॥
हीन दीन आस तुझी पूर्णकाम आम्हां ॥ घडि० ॥ १ ॥
मात तात भ्रात नाथ तूंचि एक पाहीं ॥ घडि० ॥ २ ॥
केशव म्हणे करिं दया शरण तुझे पायीं ॥ घडि० ॥ ३ ॥

१८ अभंग.

न करीं उदास । माझी पुरवावी आस ॥ १ ॥
ऐका ऐका नारायणा । माझी परिसा विज्ञापना ॥ २ ॥
मायबाप बंधुजन । तूंचि सोयरा सज्जन ॥ ३ ॥
तुका म्हणे तुजविरहित । कोण करील माझें हित ॥ ४ ॥

१९ अभंग.

आणीक कोणापुढें वासूं मुख सांग । माझें अंतरंग कोण जाणे ॥ १ ॥
पाहें तुजकडे येऊनी जाऊनी । पांडुरंगा मनीं विचारावें ॥ २ ॥
भय चिंता अवघे उद्योग सांडिले । आठवुनी पाउलें असें तुझीं ॥ ३ ॥
नका विसरूं मज वैकुंठनायका । विनवीतसे तुका बंदीजन ॥ ४ ॥

२० अभंग.

येगा महाविष्णु अनंत भुजाच्या । आम्हां अनाथांच्या माहेरा ये ॥ १ ॥
भेटावया तुज ओढे माझा जीव । एक वेळां पाय दावीं डोळां ॥ २ ॥
आणिक हें आर्त नाहीं नारायणा । ओढे हें वासना भेटावया ॥ ३ ॥
वाटे चित्तीं काय करावा विचार । चरण सुंदर पहावया ॥ ४ ॥
तुका म्हणे माझे पुरवीं मनोरथ । येई गा संवरीत पांडुरंगा ॥ ५ ॥

३१ अभंग.

नको गा मोकलूं दीना पंढरीनाथा । तुजवीण आतां कोण धांवे ॥१॥
अपराधांच्या कोटी पाहूं नको कांहीं । येगे विठाबाई झडकरी ॥ २ ॥
माझ्या दोषांसाठीं पाठमोरीं होसी । पावन ब्रीदासी लागे बोल ॥ ३ ॥
नामा म्हणे जननी तूंचि चराचर । तारिले अपार जड जीव ॥ ४ ॥

३२ अभंग.

कां गा न येसी विठ्ठला । ऐसा कोण दोष मला ॥ १ ॥
मायबाप तूंचि धणी । मला सांभाळीं निर्वाणीं ॥ २ ॥
त्वां बा उद्धरिले थोर । तेथें कोण मी पामर ॥ ३ ॥
दीननाथ दीनबंधू । जनी म्हणे कृपासिंधू ॥ ४ ॥

३३ पद.

धांव पाव सांवळे विठाबाई कां मनिं धरिली अढी ।
अनाथ मी अपराधी स्मरतों उतरा पैलथडी ॥ ध्रु० ॥
एकनाथाघरिं पाणि वाहिलें गंगेच्या कावडी ।
कबिराचे ते शेले विणुनी त्यांची घालिसी घडी ॥ धांव० ॥ १ ॥
सांवता माळ्याची भाजी खुडुनी त्याची बांधिसी जुडी ।
नरसीमेहत्याची हुंडि पटवुनी त्याचा झालासी गडी ॥ २ ॥
जनाबाईचीं लुगडीं धुतलीं चंद्रभागेच्या थडी ।
सजन कसाई मांस विकीतो त्याचीं लाविसी धडीं ॥ ३ ॥
दामाजीपंताचे वेळीं झाला महार तांतडी ।
पायिं वहाणा हातीं कांठी खांद्यावर घोंगडी ॥ ४ ॥
चोखामेळ्याचे घरीं येउनी ओढिसी ढोरें तांतडी ।
त्याची स्त्री बहु हांका मारी कोठें दिधली दडी ॥ ५ ॥
गजेंद्राचा धांवा ऐकुनी वेगें घालिसी उडी ।
अर्जुनरथिं सारथ्य करूनी फेडि त्याचि सांकडीं ॥ ६ ॥

३४ पद.

तें मन निष्ठुर कां केलें । जें पूर्ण दयेनें भरलें ॥ ध्रु० ॥
गजेंद्राचे हांकेसरसें । धांवुनियां आलें ॥ १ ॥
प्रल्हादाच्या भावार्थासी । स्तंभीं गुरगुरलें ॥ २ ॥
पांचाळीच्या करुणावचनें । कळवळुनी आलें ॥ ३ ॥
एका जनार्दनीं पूर्ण कृपेनें । निशिदिनिं पदिं रमलें ॥ ४ ॥

३५ पद.

धांव विभो करुणाकर माधव । देव दयानिधे देवकिनंदन ॥ ध्रु० ॥
हे करुणाकर दीनजनोद्धर । हा भव दुस्तर यांतुनि उद्धर ॥ धां० ॥ १ ॥
काममदादिक गांजिति हे अति । धांव रमापति सेवकहितकर ॥ धां०॥२॥
जननमरणभय हरण करि त्वरें । चराणिं शरण दृढ केशव किंकर ॥ धां०॥३॥

करुणा. (आ.)

१ अभंग.

मी खरा पतित तूं खरा पावन । आतां अनुमान करूं नको ॥ १ ॥
आतां मज कांहीं माझी चिंता नसे । तुझें नाम कैसें वांचईल ॥ २ ॥
समर्थें घेतला नांवालागीं भार । मज उपकार कासयाचा ॥ ३ ॥
रामदास म्हणे तुझें तुज उणें । सोईरीं पिसुणें हांसतील ॥ ४ ॥

२ अभंग.

मी तों दीनाहूनि दीन । माझा तुज अभिमान ॥ १ ॥
मी तों आलों शरणांगत । माझें करावें स्वाहित ॥ २ ॥
दीनानाथा कृपाळुवा । सांभाळावें आपुल्या नांवा ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां । भलें नव्हे मोकलितां ॥ ४ ॥

३ अभंग.

तुझा शरणागत झालों मी अंकित । करीं माझें हित पांडुरंगा ॥ १ ॥
पतितपावन तुझी ब्रीदावळी । ते आतां सांभाळीं मायबापा ॥ २ ॥

अनाथाचा नाथ बोलतील संत । ऐकोनियां मात विश्वासलों ॥ ३ ॥
न करावी निरास न धरावें उदास । देईं याचकास कृपादान ॥ ४ ॥
तुका म्हणे मी तों पातकांची रासी । देईं पायांपासीं ठाव देवा ॥ ५ ॥

४ अभंग.

तुझा दास ऐसें म्हणती लोकपाळ । म्हणऊनि सांभाळ करीं माझा॥१॥
अनाथाचा नाथ पतितपावन । हें आतां जतन करीं नाम ॥ २ ॥
माझे गुणदोष पाहतां नलगे अंत । ऐसें माझें चित्त मज ग्वाही ॥ ३ ॥
नेणें तुझी कैसी करावी हे सेवा । जाणसी तूं देवा अंतरींचें ॥ ४ ॥
तुका म्हणे तूं या कृपेचा सिंधु । तोडीं भवबंधु माझा देवा ॥ ५ ॥

५ अभंग.

परि आतां माझी परिसावी विनंति । रखुमाईच्या पती पांडुरंगा ॥ १ ॥
चुकलिया बाळा न मारावें जीवें । हित तें करावें मायबापीं ॥ २ ॥
तुका म्हणे तुझा म्हणताती मज । आतां आहे लाज हेचि तुम्हां ॥३॥

६ अभंग.

समर्थाचें बाळ केंविलवाणें दिसे । तरि कोणा हांसे जन देवा ॥ १ ॥
अवगुणी जरी झालें तें ओंगळ । करावा सांभाळ लागे त्याचा ॥ २ ॥
तुका म्हणे तैसा मी एक पतित । परि मुद्रांकित झालों तुझा ॥ ३ ॥

७ अभंग.

पतितपावन ब्रीद बांधियेलें आधीं । तरी कां उपाधी भक्तापाठीं ॥ १ ॥
तुझा म्हणविल्या दुजा अंगसंग । उणेंपण सांग कोणाकडे ॥ २ ॥
सिंहाचें भातुकें जंबुकें नेतां । थोराचिये माथां लाज लागे ॥ ३ ॥
कान्होपात्रेचा देह तंव जाण । रक्षावा आपण ब्रीदासाठीं ॥ ४ ॥

८ अभंग.

तुझा दास मज म्हणती अंकित । अवघे सकळिक लहान थोर ॥ १ ॥
हेंचि आतां लागे करावें जतन । तुझें थोरपण तुज देवा ॥ २ ॥

होउनी निर्भर राहिलों निश्चिंत । पावनपतित नाम तुझें ॥ ३ ॥
करितां तुज होय डोंगराची राई । न लगतां कांहीं पात्या पातें ॥ ४ ॥
तुका म्हणे तुज काय ते आशंका । तारितां मशका मज दीना ॥ ५ ॥

९ अभंग.

अनाथाचा नाथ दीनाचा दयाळ । म्हणवोनी सांभाळ करीं माझा ॥ १ ॥
तुजऐसा देव नाहीं त्रिभुवनीं । म्हणवोनी चरणीं विनटलें ॥ २ ॥
बापा विठ्ठलराया करीं कृपादान । सांभाळीं वचन आपुलें तें ॥ ३ ॥
लाडाई म्हणे देवा भेट देईं वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीननाथा ॥ ४ ॥

१० अभंग.

जगत्रीजीवना अगा नारायणा । कां न ये करुणा दासाची हे ॥ १ ॥
अच्युता केशवा ये गा दीननाथा । सर्वज्ञा समर्था कृपामूर्ती ॥ २ ॥
चिद्घना चिद्रूपा विरंचीच्या बापा । करावी जी कृपा सर्वांभूतीं ॥ ३ ॥
तुझें म्हणविलें उपेक्षिसी जरी । नामा म्हणे हरी ब्रीद काय ॥ ४ ॥

११ अभंग.

येईं गा विठ्ठला येईं गा विठ्ठला । प्राण हा फुटला आळवितां ॥ १ ॥
पडियेलों वनीं थोर चिंतवनीं । उशीर कां अझूनि लावियेला ॥ २ ॥
काय तुज नाहीं लौकिकाची चिंता । आपुल्या बाळका मोकलितां ३
तुका म्हणे बहु खंती वाटे जीवा । धरियेलें देवा दुरी दिसे ॥ ४ ॥

१२ अभंग.

वेडें वांकडें गाईन । परि तुझाचि म्हणवीन ॥ १ ॥
मज तारीं दीनानाथा । ब्रीद साच करीं आतां ॥ २ ॥
केल्या अपराधाच्या राशी । म्हणउनि आलों तुजपाशीं ॥ ३ ॥
तुका म्हणे मज तारीं । सांडी ब्रीद नाहीं तरी ॥ ४ ॥

करुणा. (इ.)

१ अभंग.

तुझा म्हणवून तुज नेणें । ऐसें काय माझें जिणें ॥ १ ॥
तरि मज कवणाचा आधार । करोनियां राहों धीर ॥ २ ॥
काय शब्दचि ऐकिला । भेटी नव्हतां गा विठ्ठला ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां । अभय देईं पंढरिनाथा ॥ ४ ॥

२ अभंग.

कवणाशीं भांडों कोण माझें साहे । कोण माझें आहे तुजविण ॥ १ ॥
धरिलें उदास दुरदुरांतरें । सांडी एकसरें केली माझी ॥ २ ॥
आइकोन माझे नाइकसी बोल । देखोनियां खोळबुंथी घेसी ॥ ३ ॥
तुका म्हणे एके गांवीची वसती । म्हणऊनि खंती वाटे देवा ॥ ४ ॥

३ अभंग.

कां जी आम्हां होतें दोषांचें दर्शन । तुज समर्पून देहभाव ॥ १ ॥
पांडुरंगा कृपाळुवा दयावंता । धरिसील सत्ता सकळही ॥ २ ॥
कां जी आम्हांवरी आणिकांची सत्ता । तुम्हांसी असतां जवळिकें ॥ ३ ॥
तुका म्हणे पायीं केलें निवेदन । उचित तें ज्ञान करीं सत्ता ॥ ४ ॥

करुणा. (ई.)

१ अभंग.

माता कापी गळा । तेथें कोण राखी बाळा ॥ १ ॥
हें कां नेणा नारायणा । मज चाळवितां दीना ॥ २ ॥
नागवी धांवणें । तेथें साह्य व्हावें कोणें ॥ ३ ॥
राजा सर्व हरी । तेथें दुजा कोण वारी ॥ ४ ॥
तुझ्या केल्याविण । नव्हे स्थिर वश मन ॥ ५ ॥
तुका म्हणे हरी । सूत्र तुम्हां हातीं दोरी ॥ ६ ॥

२ अभंग.

गंगा गेली सिंधूपासीं । त्याणें अव्हेरिलें तिसी ॥ १ ॥
तरि तें सांगावें कोणाला । ऐसें बोलें बा विठ्ठला ॥ २ ॥
जळ कोपलें जळचरा । माता अव्हेरी कुमारा ॥ ३ ॥
जनी म्हणे शरण आले । पाहिजे ते उद्धरिले ॥ ४ ॥

३ अभंग.

मायें मोकलिलें कोठें जावें बाळें । आपुलिया बळें न वांचे तें ॥ १ ॥
रुसोनियां पळे सांडोनियां ताट । मागें पाहे वाट यावें ऐसी ॥ २ ॥
भांडवल आम्हां आळी करावी हे । आपणाचि माये धांवशील ॥ ३ ॥
तुका म्हणे आळी करूनियां निकी । देसील भातुकी बुझाऊनि ॥ ४ ॥

४ अभंग.

नित्य या मनासी करितों विचार । तों हें अनावर विषयलोभी ॥ १ ॥
आतां मज राखें आपुलिया बळें । न देखें हें जाळें उगवतां ॥ २ ॥
सांपडलों गळीं नाहीं त्याची सत्ता । उगळी मागुता घेतला तो ॥ ३ ॥
तुका म्हणे मी तों अज्ञानचि आहें । परि तुझी पाहें वाट देवा ॥ ४ ॥

५ अभंग.

मन माझें चपळ न राहे निश्चळ । घडी एकी पळ स्थिर नाहीं ॥ १ ॥
आतां तूं उदास नव्हें नारायणा । धांवें मज दीना गांजियेलें ॥ २ ॥
धांव घालीं पुढें इंद्रियांचे ओढी । केलें तडातोडी चित्त माझें ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा न चले सायास । राहिलों हे आस धरुनी तुझी ॥ ४ ॥

६ अभंग.

पतीतपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें ॥ १ ॥
मन हें चंचळ न राहे निश्चळ । निरूपणीं पळ स्थिरावेना ॥ २ ॥
सोडुनियां ध्यान, विषयचिंतन । करीतसे मन आवरेना ॥ ३ ॥
रामदास म्हणे कथानिरूपणें । मनाचीं लक्षणें जैसीं तैसीं ॥ ४ ॥

७ अभंग.

पतीतपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें ॥ १ ॥
मिथ्या शब्दज्ञानें तुज अंतरलों । संदेहीं पडलों मीपणाचे ॥ २ ॥
सदा खळबळ निगुर्णाची घडे । सगुण नावडे ज्ञान-गर्वें ॥ ३ ॥
रामदास म्हणे ऐसा हा पतित । मीपणें अनंत पाहों जातां ॥ ४ ॥

८ पद.

माझ्या कनवाळू क्षमानिधि । दीन मी आहें साधी ॥
मळलों दुरितमळें भज शोधीं । शरण तुला अपराधी ॥ ध्रु० ॥
जाणुनि आधीं करितों अनुचित तें । काय असें मज होतें ॥
न कळे हें स्वामी विश्वपते । आवरीं या चित्तातें ॥ १ ॥
विचार करुनीही निश्चय । करितां स्थिर न होय ॥
यासीं तव कृपेशिवाय । नाहीं अन्य उपाय ॥ २ ॥
समर्था घेतलें त्वां माझें । सर्व प्रकारें ओझें ॥
तैसें कर भजनीं मन रिझे । आदि खेदाग्नि विझे ॥ ३ ॥

९ पद.

रामकृष्ण नरहरे स्वामिन् रामकृष्ण नरहरे ॥
कधिं करिशिल बा दया दयाळा ! गर्भवास हा पुरे ॥ ध्रु० ॥
काय करूं मी बरें । सांगें । काय करूं मी बरें ॥
कळों येति मज माझे दोष गुण । चित्त परी नावरे ॥ राम० ॥ १ ॥
विषयीं मन नावरे । सदोदित । विषयीं मन नावरे ॥
काम क्रोध हे चोर लुटिती मज । उद्धरिं आपुल्या करें ॥ रा० ॥ २ ॥
धांव धांव धांव रे । सत्वर । धांव धांव धांव रे ॥
बुडतों भवसागरीं दीन हा । उद्धरिं आपुल्या करें ॥ रा० ॥ ३ ॥
विचार मज न स्फुरे । कांहीं । विचार मज न स्फुरे ॥
केविं गती होईल म्हणुनियां । जीव अंतरीं झुरे ॥ राम० ॥ ४ ॥

प्रार्थितसें आदरें । आतां एक । प्रार्थितसें आदरें ॥
असें करीं तव नाम निरंतर । पंत विठ्ठल स्मरे ॥ राम० ॥ ५ ॥

१० अभंग.

माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥ १ ॥
आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ॥ २ ॥
वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियांआधीन झालों देवा ॥ ३ ॥
तुका म्हणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ॥ ४ ॥

११ अभंग.

दुष्ट आचरण ग्वाही माझें मन । मज ठावे गुण दोष माझे ॥ १ ॥
आतां तुम्ही सर्व जाणा पांडुरंगा । पाहिजे प्रसंगाऐसें केलें ॥ २ ॥
व्याह्याजांवयाचे पंगती दुर्बळ । वंचिजे तो काळ नव्हे कांहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां झालों शरणागत । पुढील उचित तुम्हां हातीं ॥ ४ ॥

१२ अभंग.

तूं माझा मायबाप सकळ वित्त गोत । तूंचि माझें हितकरिता देवा ॥ १ ॥
तूंचि माझा देव तूंचि माझा जीव । तूंचि माझा भाव पांडुरंगा ॥ २ ॥
तूंचि माझा आचार तूंचि माझा विचार । तूंचि सर्व भार चालविसी ॥३॥
सर्व भावें मज तूं होसी प्रमाण । ऐसी तुझी आण वाहातसें ॥ ४ ॥
तुका म्हणे तुज विकला जीवभाव । कळे तो उपाव करीं आतां ॥ ५ ॥

१३ अभंग.

अम्ही पातकाची राशी । आलों तुझ्या पायांपाशीं ॥ १ ॥
मना येईल तें तूं करीं । आतां तारीं अथवा मारीं ॥ २ ॥
जनी म्हणे सृष्टीवरी । एक अससी तूं बा हरी ॥ ३ ॥

१४ अभंग.

आतां तुज कळेल तें करीं । तारिसी तरी तारीं मारीं ।
जवळी अथवा दुरी धरीं । घालीं संसारीं अथवा नको ॥ १ ॥

शरण आलों नेणतपणें । भाव आणि भक्ति कांहींच नेणें ।
मतिमंद सर्व ज्ञानें । बहु रंक उणें रंकाहुनी ॥ २ ॥
मन स्थिर नाहीं माझिये हातीं । इंद्रियें धांवतां नावरती ।
सकळ खुंटलिया युक्ती । शांति निवृत्ति जवळी नाहीं ॥ ३ ॥
सकळ निवेदिला भाव । तुझिये पायीं ठेविला जीव ।
आतां करीं कळे तो उपाव । तूंचि सर्व ठाव माझा देवा ॥ ४ ॥
राहिलों धरूनि विश्वास । आधार नेटी तुझी कास ॥
आणीक नेणें मी सायास । तुका म्हणे यास तुझें उचित ॥ ५ ॥

१५ अभंग.

अवघ्या पातकांची मी एक रासी । अवघा तूंचि होसी सर्वोत्तम ॥ १ ॥
जैसा तैसा लागे करणें अंगीकार । माझा सर्व भार चालवणें ॥ २ ॥
अवघेंचि मज गिळियेलें काळें । अवघींच बळें तुझे अंगीं ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां खुंटला उपाय । अवघेचि पाय तुझे मज ॥ ४ ॥

उ. करुणाष्टकें.

१

अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया ।
परम दिनदयाळा नीरसीं मोहमाया ॥
अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥ १ ॥
भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजनजनधनाचा वेर्थ म्यां स्वार्थ केला ॥
रघुपति मति माझी आपुलीसी करावी ।
सकळ त्यजुनि भावें कास तूझी धरावी ॥ २ ॥

विषयजनित सूखें सौख्य होणार नाहीं ।
तुजविण रघुनाथा वोखटें सर्व कांहीं ॥
रविकुळटिळका रे हीत माझें करावें ।
दुरित दुरि हरावें स्वस्वरूपीं भरावें ॥ ३ ॥
तनुमनुधनु माझें राघवा रूप तूझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें ॥
प्रचळित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचळ भजनलीला लागली आस तुझी ॥ ४ ॥
चपळपण मनाचें मोडितां मोडवेना ।
सकळ-स्वजन-माया तोडितां तोडवेना ॥
घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरींचा ।
म्हणउनि करुणा हे बोलतों दीनवाचा ॥ ५ ॥
जळत हृदय माझें जन्म कोट्यानकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं ॥
तळमळ निवर्वी रे राम कारुण्यसिंधु ।
षडरिपुकुळ माझें तोडिं याचा विरोधु ॥ ६ ॥
तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
सिणत सिणत पोटीं पाहिली वास तुझी ॥
झडकरि झड घालीं धांव पंचानना रे ।
तुजविण मज नेते जंबुकी वासना रे ॥ ७ ॥
सबळ जनक माझा राम लावण्यपेटी ।
म्हणउनि मज पोटीं लागली आस मोठी ॥
दिवस गणित बोटीं प्राण ठेऊनि कंठीं ।
अवचट मज भेटी होत घालीन मिठी ॥ ८ ॥

जननिजनकमाया लेंकरूं काय जाणे ।
पय न लगत मूखें हाणतां वछ नेणे ॥
जळधरकण आशा लागली चातकासी ।
हिमकर अवलोकी पक्षिया भूमिवासी ॥ ९ ॥
तुजविण मज तैसें जाहलें देवराया ।
विलगविषमकाळीं तूटली सर्व माया ॥
सकळजनसखा तूं स्वामि आणीक नाहीं ।
वमनवमन जैसें त्यागिलें सर्व कांहीं ॥ १० ॥
स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ॥
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि देती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥ ११ ॥
सकळ जन भवाचे आखिले वैभवाचे ।
जिवलग मग कैंचें चालतें हेंचि साचें ॥
विलग-विषम-काळीं सांडिती सर्व माळीं ।
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं ॥ १२ ॥
सुख सुख म्हणतां हें दुःख ठाकूनि आलें ।
भजन सकळ गेलें चीत दुश्चीत जालें ॥
भ्रमित मन कळेना हीत तें आकळेना ।
परम कठिण देहीं देहबुद्धी वळेना ॥ १३ ॥
उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं ।
सकळ भ्रमविरामीं राम विश्रामधामीं ॥
घडिघडि मन आतां रामरूपीं भरावें ।
रविकुळटिळका रे आपुलेंसें करावें ॥ १४ ॥

जळचर जळवासी नेणती त्या जळासी ।
निसिदिन तुजपासीं चूकलों गुणरासी ॥
भुमिधरनिगमासी वर्णवेना जयासी ।
सकळ भुवनवासी भेटि दे रामदासीं ॥ १५ ॥

२

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं । नसे प्रेम हें रामविश्राम नाहीं ।
असा दीन अज्ञान मी दास तुझा । समर्था जनीं घेतला भार माझा ॥ १ ॥
रघूनायका जन्मजन्मांतरींचा । अहंभाव छेदूनि टाकीं दिनाचा ।
जनीं बोलती दास या राघवाचा । परी अंतरीं लेश नाहीं तयाचा ॥ २ ॥
दिनाचें उणें दीसतां लाज कोण्हा । जनीं दास दीसे तुझा दैन्यवाणा ।
सिरीं स्वामि तूं राम पूर्णप्रतापी । तुझा दास पाहें सदा सीघ्रकोपी ॥ ३ ॥
रघूनायका दीन हातीं धरावें । अहंभाव छेदूनियां उद्धरावें ।
अगुणी तयालागीं गूणी करावें । समर्थें भवसागरीं उतरावें ॥ ४ ॥
किती भार घालूं रघूनायकाला । मजकारणें शीण होईल त्याला ।
दिनानाथ हा संकटीं धांव घाली । तयाचेन हे सर्व काया निवाली ॥ ५ ॥
मज कोंवसा राम कैवल्यदाता । तयाचेन हे फीटली सर्व चिंता ।
समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें । सदा सर्वदा नाम वाचे म्हणावें ॥ ६ ॥

३

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी । अती आदरें सर्व सेवा करावी ।
सदा प्रीति लागो तुझे गूण गातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ १ ॥
तुझें रूपडें लोचनीं म्यां पहावें । तुझे गूण गातां मनासी रहावें ।
उठो आवडी भक्तिपंथेंचि जातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ २ ॥
मनीं वासना भक्ति तुझी करावी । कृपाळूपणें राघवा पूरवावी ।
वसावें मजअंतरीं नाम घेतां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ३ ॥

सदा सर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा ।
नुपेक्षीं मज गुणवंता अनंता । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ४ ॥
नको द्रव्यद्वारा नको येरझारा । नको मानसीं ज्ञानगर्वें फुगारा ।
सगुणीं मज लाविं रे भक्तिपंथा । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ५ ॥
भवें व्यापलों प्रीतिछ्याया करावी । कृपासागरें सर्व चिंता हरावी ।
मज संकटीं सोडवावें समर्था । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ६ ॥
मनीं कामना कल्पना ते नसावी । कुबुद्धी कुडी वासना नीरसावी ।
नको संशयो तोडिं संसारवेथा । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ७ ॥
समर्थापुढें काय मागों कळेना । दुराशा मनीं बैसली हे ढळेना ।
पुढें संशयो नीरसीं सर्व चिंता । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ८ ॥
ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें । म्हणे दास भक्तांसि रे उद्धरावें ।
सुटो ब्रीद आह्मांसि सांडूनि जातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ९ ॥

४

समाधान साधूजनाचेनि योगें । परी मागुतें दुःख होतें वियोगें ।
घडीनें घडी सीण अत्यंत वाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ १ ॥
घरें सुंदरें सौख्य नाना परीचें । परी कोण जाणेल तें अंतरींचें ।
मनीं आठवीतांचि तो कंठ दाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ २ ॥
बळें लावितां चित्त कोठें जडेना । समाधान तें कांहिं केल्या घडेना ।
नव्हे धीर नैनीं सदा नीर लोटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ३ ॥
अवस्था मनीं लागली काय सांगों । गुणीं गुंतला हेत कोण्हासि मागों ।
बहुसाल भेटावया प्राण फूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ४ ॥
कृपाळूपणें भेट रे रामराया । वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया ।
जनामाजिं लौकीक हाही न सुटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ५ ॥
आहा रे विधी त्वां असें काय केलें । पराधीनता पाप माझें उदेलें ।
बहुतांमधें चूकतां तूक तुटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ६ ॥

समर्था मनीं सांडि माझी नसावी । सदा सर्वदा भक्तचिंता असावी ।
घडेना तुझा योग हा प्राप्त[1] खोटें । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ७ ॥
अखंडीत हे सांग सेवा घडावी । न होतां तुझी भेटि काया पडावी ।
दिसेंदीस आयुष्य हें व्यर्थ आटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ८ ॥
भजों काय सर्वांपरी हीण देवा । करूं काय रे सर्व माझाचि ठेवा ।
म्हणों काय मी कर्मरेखा न लोटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ९ ॥
म्हणे दास मी वास पाहें दयाळा । रघूनायका भक्तपाळा भुपाळा ।
पहावें तुला हें जिवीं आर्त मोठें । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥१०॥

भाग ८ वा.

देववेडेपणा.

पर पुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनि करीं ध्यावें सीस ॥ १ ॥
संवसारा आगी आपुलेनी हातें । लावूनी मागुतें पाहूं नये ॥ २ ॥
तुका म्हणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नीट दीपावरी ॥ ३ ॥

१ अभंग.

वाळो जन मज म्हणोत शिंदळी । परि हा वनमाळी न विसंबें ॥ १ ॥
सांडूनी लौकिक झालियें उदास । नाहीं भय आस जीवित्वाची ॥ २ ॥
नाइकें वचन बोलतां या लोकां । म्हणे झालों तुका हरिरता ॥ ३ ॥

१ अभंग.

याति कूळ माझें गेलें हरपोनी । श्रीरंगावांचुनी आनु नेणें ॥ १ ॥
किति शिकवाल मज वेळोवेळां । मी तया गोवळा रातलियें ॥ २ ॥
अष्ट भोग भोगणें मातें नाहीं घाड । भक्तिप्रेम गोड लेइलें गे माये ॥ ३ ॥
बापरखुमादेवीवरु जीवींचा जिव्हाळा । कांहीं केल्या वेगळा नव्हे गे माये ॥ ४ ॥

---

१ घडेना तुझी प्राप्ति हें कर्म खोटें । असा पाठ मढेंबाडांत आहे. २ प्राक्तन.

३ अभंग.

आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा । म्हणोनि व्यभिचारा टेंकलियें ॥ १ ॥
रात्रंदिवस मज पाहिजे जवळी । क्षण त्या निराळी न गमे घडी ॥ २ ॥
नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां । रातलें अनंता तुका म्हणे ॥ ३ ॥

४ अभंग.

आजिवरी तुम्हां आम्हां नेणपणें । कौतुकें खेळणें संग होता ॥ १ ॥
आतां अनावर झालों अवगुणाची । करूं नये तेंचि करीं सुखें ॥ २ ॥
तुका म्हणे आतां बुडविलीं दोन्ही । कुळें; एक मनीं नारायण ॥ ३ ॥

५ अभंग.

न देखें न बोलें नाइके आणिक । बैसला हा एक हरि चित्तीं ॥ १ ॥
सासुरें माहेर मज नाहीं कोणी । एक केलें दोन्ही मिळोनियां ॥ २ ॥
आळ आला होता आम्ही भांडखोरी । तुका म्हणे खरी केली मात ॥ ३ ॥

६ अभंग.

विसरलें कुळ आपुला आचार । पति भावे दीर घर सोय ॥ १ ॥
सांडिला लौकिक लाज भय चिंता । रातलें अनंता चित्त माझें ॥ २ ॥
मज आतां कोणी आळवाल झणीं । तुका ह्मणे कानीं बहिरी झालें ॥ ३ ॥

७ अभंग.

न राहे रसना बोलतां आवडी । पायीं दिली बुडी माझ्या मनें ॥ १ ॥
मानेल त्या तुम्ही आइका स्वभावें । मी तों माझ्या भावें अनुसरलें ॥ २ ॥
तुका म्हणे तुम्ही फिरावें बहुतीं । माझी तों हे गति जाली आतां ॥ ३ ॥

८ अभंग.

बहुतांच्या आम्ही न मिळो मतासी । कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥ १ ॥
विचार करितां वायां जाय काळ । लटिकेंचि मूळ फजितीचें ॥ २ ॥
तुका म्हणे तुम्ही करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचिया ॥ ३ ॥

९ अभंग.

न बोलतां तुम्हां कळों नये गुज । म्हणऊनि लाज सांडियेली ॥ १ ॥
आतां तुम्हांपुढें जोडीतसें हात । नका कोणी अंत पाहों माझा ॥ २ ॥

तुका म्हणे आम्ही बैसलों शेजारीं । करील तें हरि पाहों आतां ॥ ३ ॥

१० अभंग.

हाचि नेम आतां न फिरें माघारी । बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥ १ ॥
घररिघी जालें पट्टराणी बळें । वरिलें सांवळें परब्रह्म ॥ २ ॥
बळियाचा अंगसंग जाला आतां । नाहीं भय चिंता तुका म्हणे † ॥ ३ ॥

११ अभंग.

दुजा ऐसा कोण बळी आहे आतां । हरि या अनंतापासूनियां ॥ १ ॥
बळियाच्या आम्ही झालों बाळिवंता । करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥ २ ॥
तुका म्हणे आम्ही जिवाच्या उदारा । जालों प्रीतिकरा गोविंदासी †† ॥ ३ ॥

१२ अभंग.

हांसों रुसों आतां आपुले आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ॥ १ ॥
सेवा सुखें करूं विनोदवचन । आम्ही नारायण एकाएकीं ॥ २ ॥
तुका म्हणे आम्ही झालों उदासीन । आपुल्या आधीन केला पति ॥ ३ ॥

१३ अभंग.

एका जीवें आतां जिणें जालें दोहीं । वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥ १ ॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक । पुरविली हे भाक सांभाळिली ॥ २ ॥
तुका म्हणे जालें सायासाचें फळ । सरली ते वेळ काळ दोन्ही ॥ ३ ॥

१४ अभंग.

मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥ १ ॥
आतां तुम्ही पाहा आमुचें नवल । नका वेंचूं बोल वायांविण ॥ २ ॥
तुका म्हणे तुम्ही भयाभित नारी । कैसी संग सरी तुम्हां आम्हां ॥ ३ ॥

---

† *Cf.* From now there shall be no fear left for me in this world and thou shalt be victorious in all my strife.

यापुढें या जगांत मला भय म्हणून नाहीं. या संसारांत ज्या काय माझ्या झटापटी होतील त्या सर्वांत माझ्या रूपानें तूंच विजयी होशील. — गी. अं. ५२

†† तुका म्हणे व्हावें देहासी उदार । रुक्मादेवीवर जोडावया ॥ —गा. २५०८

८ अभंग.

योगियां दुर्लभ तो म्यां देखिला साजणी
पाहतां पाहतां मना न पुरे धणी ॥ १ ॥
देखिला देखिला गे माये देवाचा देव ।
फिटला संदेहो निमालें दुजेपण ॥ २ ॥
अनंतरूपें अनंतवेषें देखिलें म्यां त्यासी ।
बापरखुमादेवीवरु खूण बाणली कैसी ॥ ३ ॥

९ पद.

झाली संध्या संदेह माझा गेला । आत्माराम हृदयीं शेजे आला ॥ ध्रु० ॥
चित्तशुद्धि निर्मळ भागीरथी । दया क्षमा यमुना सरस्वती ॥
असि पदीं एकत्र जेथें होती । स्वानुभवस्थान हें गुप्तस्थिती ॥ झा० ॥ १ ॥
सद्बुद्धीचें घातलें शुद्धासन । वरि शांति सद्गुरुकृपा पूर्ण ।
शम दम आंगीं विभूतीउधळण । मुखें उच्चारि केशव नारायण ॥ झा० ॥ २ ॥
बोधपुत्र जन्मास आला जेव्हां । आशाम्हातारी मरोन गेली तेव्हां ।
भक्ति बहीण धांवोनी आली गांवा । आतां संध्या करूं मी कैंची केव्हां ॥ झा० ॥ ३
सर्व कर्मे तीं झालीं ब्रह्मार्पण । ऐसें ऐकतां निवती साधुजन ।
जन नव्हे अवघाची जनार्दन । एका जनार्दनीं लाधली हेचि खूण ॥ झा० ॥ ४

१० अभंग.

परतलें मन लागलेंसे वेड । दिसे चहुंकडे पांडुरंग ॥ १ ॥
नावडती आणिक संसाराच्या गोष्टी । आनंदली दृष्टी संतसंगें ॥ २ ॥
संतसंगें रंगें रंगला पंढरी । उभा विटेवरी पांडुरंग ॥ ३ ॥
तो माझे नयनीं भरोनियां गेला । तुक्यासी भासला पांडुरंग ॥ ४ ॥

११ अभंग.

पाहतां श्रीमुख सुखावलें सुख । डोळियांची भूक न वजे माझ्या ॥ १ ॥
जिव्हे गोड तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिकें पुढें ॥ २ ॥

श्रवणाची वाट चोखाळली शुद्ध । गेले भेदाभेद निवारोनी ॥ ३ ॥
महामळें मन होतें जें गादलें । शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसें ॥ ४ ॥
तुका म्हणे माझ्या जीवाचें जीवन । विठ्ठल निधान सांपडलें ॥ ५ ॥

१२ अभंग.

स्थिरावली वृत्ती पांगुळला प्राण । अंतरींची खूण पावूनियां ॥ १ ॥
पुंजाळले नेत्र जाले अर्धोन्मीळित । कंठ सद्गदित रोमांच आले ॥ २ ॥
चित्त चाकाटलें स्वरूपामाझारी । न निघे बाहेरी सुखावलों ॥ ३ ॥
सुनीळ प्रकाश उदेजला दीन । अमृताचें पान जीवनकळा ॥ ४ ॥
शशिसूर्या जाली जीवें ओंवाळणी । आनंदा दाटणी आनंदाची ॥ ५ ॥
तुका म्हणे सुखें प्रेमेंसी डुलत । विरालों निश्चित निश्चिर्तीनें ॥ ६ ॥

१३ अभंग.

याती मतिहीन रूपें लीन दीन । आणीक अवगुण जाणोनियां ॥ १ ॥
केला त्या विठ्ठलें माझा अंगीकार । ऐसा हा विचार जाणोनियां ॥ २ ॥
जें कांहीं करितों तें माझें स्वहित । आली हे प्रचित कळों चित्ता ॥ ३ ॥
जालें सुख चित्ता आनंद अपार । परमानंदें भार घेतला माझा ॥ ४ ॥
तुका म्हणे यासी नामाचा अभिमान । म्हणोनि शरण तारी बळें ॥ ५ ॥

१४ अभंग.

बहु उतावीळ भक्तीचिया काजा । होसी केशीराजा मायबापा ॥ १ ॥
तुझ्या पायीं माझा जालासे विश्वास । म्हणोनियां आस मोकलिली ॥ २ ॥
ऋषि मुनि सिद्ध साधक अपार । कळला विचार त्यांसी तुझा ॥ ३ ॥
नाहीं नास तें सुख दिलें तयांस । झाले जे उदास सर्वभावें ॥ ४ ॥
तुका म्हणे सुख न माये मानसीं । धरिले जीवेंसी पाय तुझे ॥ ५ ॥

१५ अभंग.

नाम घेतां मन निवे । जिव्हे अमृतचि स्रवे ॥
होतासी बरवे । ऐसे शकुन लाभाचे ॥ १ ॥

मन रंगलें रंगलें । तुझ्या चरणीं स्थिरावलें ॥
केलिया विठ्ठलें । ऐसी कृपा जाणावी ॥ २ ॥
जालें भोजनसें दिसे । चिरा पडोनि ठेला इच्छे ॥
धालियाच्या ऐसे । अंगा येती उद्गार ॥ ३ ॥
सुख भेटों आलें सुखा । निध सांपडला मुखा ॥
तुका म्हणे लेखा । आतां नाहीं आनंदा ॥ ४ ॥

१६ अभंग.

अवघेंचि त्रैलोक्य आनंदाचें आतां । चरणीं जगन्नाथा चित्त ठेलें ॥ १ ॥
माय जगन्नाथ बाप जगन्नाथ । अनाथाचा नाथ जनार्दन ॥ २ ॥
एका जनार्दनीं एकपणें उभा । चैतन्याचा गाभा शोभतसे ॥ ३ ॥

१७ अभंग.

जेथें देखें तेथें उभा । अवघ्या गगनाचा गाभा ॥ १ ॥
डोळां बैसलें बैसलें । ध्यान राहोनि संचलें ॥ २ ॥
सरसावलें मन । केले सोज्वळ लोचन ॥ ३ ॥
तुका म्हणे सवें । आतां असिजेत देवें ॥ ४ ॥

१८ अभंग.

आनंदाच्या कोटी । सांठवल्या आम्हां पोटीं ॥ १ ॥
प्रेम चालिला प्रवाहो । नामओघ लवलाहो ॥ २ ॥
अखंड खंडेना जीवन । राम कृष्ण नारायण ॥ ३ ॥
थडी आहिक्य परत्र । तुका म्हणे सम तीर ॥ ४ ॥

१९ अभंग.

काम क्रोध आम्हीं वाहिले विठ्ठलीं । आवडी धरिली पायांसवें ॥ १ ॥
आतां कोण पाहे मागें परतोनी । गेला हारपोनि देहभाव ॥ २ ॥
रिद्धिसिद्धि सुखें हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही विठोबाचे दास । करूनि ठेलों ग्रास ब्रह्मांडाचा ॥ ४ ॥

१० अभंग.

शास्त्रांचें जें सार वेदांची जो मूर्ति । तो माझा सांगाती प्राणसखा ॥ १ ॥
म्हणउनी नाहीं आणिकांचा पांग । सर्व झालें सांग नामें एका ॥ २ ॥
सगुण निर्गुण जयाचीं हीं अंगें । तोचि आम्हांसवें क्रीडा करी ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते । स्वयंभू आइते केले नव्हों ॥ ४ ॥

११ अभंग.

जालें पीक आम्हां अवघा सुकाळ । घेऊं अवघा काळ प्रेमसुख ॥ १ ॥
जाली आराणूक अवघियांपासून । अवघा गेला सीणभाग आतां ॥ २ ॥
अवघा झाला आम्हां एक पांडुरंग । आतां नाहीं जग माझें तुझें ॥ ३ ॥
अवघेचि आम्ही ल्यालों अळंकार । शोभलोंही फार अवघ्यांवरी ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही सदैवांचे दास । करणें नलगे आस आणिकांची ॥ ५ ॥

१२ अभंग.

केला अंगीकार पंढरीच्या देवें। आतां काय करितील काळ मशक मानवें ॥१॥
घातलीं बाहेर तीं भय होतें ज्यानें । बैसला आपण तेथें घालुनियां ठाणें॥२॥
लागों नेदी वारा दुजियाचा अंगासी । हा पुरता निर्धार कळों आला आह्मांसी ३
म्हणे तुकयाबंधु नलगे करावी चिंता । कोणेविशीं आतां बैसलों हस्तीवरी माथां ४

१३ अभंग.

आतां मी सर्वथा नव्हे गा दुर्बळ । यातिहीनकुळ दैन्यवाणा ॥ १ ॥
माय रखुमाई पांडुरंग पिता । शुद्ध उभयतां पक्ष दोन्ही ॥ २ ॥
बापुडा मी नव्हें दुर्बळ ठेंगणा । पांगिला हा कोणा आणिकासी ॥ ३ ॥
दुष्ट नव्हों आम्ही अभागी अनाथ । आमुचा समर्थ कैवारी हा ॥ ४ ॥
संवसार आम्हां सरला सकळ । लपोनियां काळ ठेला धाकें ॥ ५ ॥
तुका म्हणे झालों निर्भर मानसीं । जोडलिया रासी सुखाचिया ॥ ६ ॥

१४ अभंग.

जन्मा आलों त्याचें । आजि फळ जालें साचें ॥ १ ॥
तुम्हीं सांभाळिलें संतीं । भय निरसली खंती ॥ २ ॥

कृतकृत्य झालों । इच्छा केली ते पावलों ॥ ३ ॥
तुका म्हणे काळ । आतां करूं न शके बळ ॥ ४ ॥

१५ अभंग.

धन्य मी मानीन आपुलें संचित । राहिलीसे प्रीत तुझे नामीं ॥ १ ॥
धन्य झालों आतां यासि संदेह नाहीं । न पडों या बाहीं काळा हातीं ॥ २ ॥
ब्रह्मरस करूं भोजन पंगती । संतांचे संगतीं सर्वकाळ ॥ ३ ॥
तुका म्हणे पोट घालेंचि न धाये । खादलेंचि खायें आवडीनें ॥ ४ ॥

१६ अभंग.

नको ऐसें जालें अन्न । भूक ताहान ते गेली ॥ १ ॥
गोविंदाची आवडी जीवा । करिन सेवा धणीवरी ॥ २ ॥
राहिलें तें राहो काम । सकळ धर्म देहींचे ॥ ३ ॥
देह धरिला त्याचें फळ । आणिक काळ धन्य हा ॥ ४ ॥
जाऊं नेदीं करितां सोस । क्षमा दोष करवीन ॥ ५ ॥
तुका म्हणे याचे पाठी । आतां साटी जीवाची ॥ ६ ॥

१७ अभंग.

आतां नव्हे गोड करितां संसार । आणिक संचार झाला माजी ॥ १ ॥
ब्रह्मरसें गेलें भरूनियां अंग । आधील तो रंग पालटला ॥ २ ॥
रसनेचिये रुची कंठीं नारायण । बैसोनियां मन निवविलें ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां बैसलों ठाकणीं । इच्छेची ते धणी पुरईल ॥ ४ ॥

१८ अभंग.

हाचि परमानंद आळंगीन बाही । क्षेम देतां ठायीं द्वैत तुटे ॥ १ ॥
बोलायासी मात मन निवे; हर्षे चित्त । दुणी वाढे प्रीत प्रेमसुख ॥ २ ॥
जनांत भूषण वैकुंठीं सरता । फावलें स्वहिता सर्वभावें ॥ ३ ॥
तुटला वेव्हार माया लोकाचार । समूळ संसार पारुषला ॥ ४ ॥
तुका म्हणे तो हा विठ्ठलचि व्हावा । आणिक या जीवा चाड नाहीं ॥ ५ ॥

२९ अभंग.

जन्ममरणांची विसरलों चिंता । तूं माझा अनंता मायबाप ॥ १ ॥
होतील ते डोळां पाहेन प्रकार । भय आणि भार निरसलीं ॥ २ ॥
लिंगोडाचे मुळें होती पंचभूतें । त्यांचें त्यापुरतें विभांगिलें ॥ ३ ॥
तुका म्हणे झाला प्रपंच पारिखा । जिवासी तूं सखा पांडुरंग ॥ ४ ॥

३० अभंग.

आतां आम्हां भय नाहीं बा कोणाचें । बळ विठोबाचें जालें असे ॥ १ ॥
धीर दिला आम्हां येणें पांडुरंगें । न पांगों या पांगें संसाराच्या ॥ २ ॥
तुका म्हणे माझा कैवारी हा देव । नाहीं भय भेव त्याच्या संगें ॥ ३ ॥

३१ अभंग.

मनामागें मन लावूं । तेथें सर्व सुख पाहूं ॥ १ ॥
आतां आम्हां काय उणें । कृपा केली नारायणें ॥ २ ॥
जनी म्हणे मन । करूं देवाचे आधीन ॥ ३ ॥

३२ अभंग.

शरीर विनटलें सेवे तुझे । ध्यानीं रंगलें मन माझें ॥ १ ॥
शिर विकलें चरणासी । वाचा तुझिया नामासी ॥ २ ॥
ऐकें पंढरपुरवासी । नयन तुझिया रूपासी ॥ ३ ॥
परिचर्या दंडपाणी । देह लोटीये धरणीं ॥ ४ ॥
श्रवण कीर्तन गोविंदा । तुळसी घ्राण मकरंदा ॥ ५ ॥
चरणीं जेउतें चालणें । तेउती भेटी नारायणें ॥ ६ ॥
वत्सरा म्हणे संतसंगीं । कांहींच नुरे पापालागीं ॥ ७ ॥

३३ अभंग.

आतां आम्हां हेंचि काम । वाचे गाऊं तुझें नाम ॥
वाहुनियां टाळी प्रेम– । सुखें आनंदें नाचावें ॥ १ ॥

---

१ सर्व लचांडाचें मूळ पंचभूतात्मक देह होता त्या भूतांची आपापल्या महत्तत्वांचे ठिकाणीं मी वांटणी करून टाकली. —जो. गा. १८७३.

अवघी झाली आराणूक । मागें पुढें सकळिक ॥
त्रिपुटीचें दुःख । प्रारब्ध सारिलें ॥ २ ॥
गोदातटें निर्मळें । देवदेवांचीं देउळें ॥
संत महंत मेळें । दिवस जाय सुखाचा ॥ ३ ॥
तुका म्हणे पंढरिनाथा । आणिक नाहीं मज चिंता ॥
योगक्षेम माथां । भार तुझ्या घातला ॥ ४ ॥

१४ अभंग.

यारे नाचों अवघे जण । भावें प्रेमें परिपूर्ण ॥ १ ॥
गाऊं पंढरीचा राणा । क्षेम देउनि संतजनां ॥ २ ॥
सुख फुकासाठीं । साधे हरिनाम बोभाटीं ॥ ३ ॥
प्रेम वांटितो उदार । देतां नाहीं साना थोर ॥ ४ ॥
पापें पळालीं बापुडीं । काळ झाला देशधडी ॥ ५ ॥
तुका म्हणे धन्य काळ । आजि प्रेमाचा सुकाळ ॥ ६ ॥

१५ अभंग.

बोलूं ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल बोले ॥ १ ॥
प्रेम सर्वांगाचे ठायीं । वाचे विठ्ठल रखुमाई ॥ २ ॥
नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं ॥ ३ ॥
परेहूनि परतें घर । तेथें राहूं निरंतर ॥ ४ ॥
सर्व सत्ता आली हाता । नामयाचा खेचर दाता ॥ ५ ॥

१६ पद.

केला राम धणी । अगणित ज्याची करणी ॥ ध्रु० ॥
रामीं रतली वाणी । आतां सुखासि नाहीं हाणी ॥ के० ॥ १ ॥
रामावांचुनि कांहीं । आणिक साधन उरलें नाहीं ॥ के० ॥ २ ॥
कोकिळप्रभुसी ध्यातां । सहजचि निजपद आलें हाता ॥ के० ॥ ३ ॥

३७ अभंग.

सकळ देवांचा जनिता । त्रिगुणा सत्ता चाळविता ॥ १ ॥
शरण जातां त्याच्या पायां । सर्व हारपली माया ॥ २ ॥
भेदाभेद निवारले । सर्व स्वरूप कोंदलें ॥ ३ ॥
एका जनार्दना शिवें । जीवपणा मुकलों जीवें ॥ ४ ॥

३८ अभंग.

जीवाचा शिव जाहला प्राणनाथ । हा निश्चयाचा एकांत जाणे बापा॥१॥
मग शिवासी जीवाचें नाहीं पा स्मरण । तेथें जन्ममरण उरलें नसे ॥२॥
शिवमाया तनु जाहली पासवरी । केला उद्योग आवरी पंचभूतें ॥ ३ ॥
म्हणे मुक्ताबाई वेदोनारायण खुणे । ज्याचें त्यांनीं मनें आटोपिलें ॥४॥

३९ अभंग.

मी माझी कल्पना पळाली वासना । जनीं जनार्दना सेवितुसें ॥ १ ॥
तूं तंव संपन्न आमुचें हें धन । सांगितली खूण निवृत्तिदेवीं ॥ २ ॥
तुजमाजीं प्रेम गेलें सप्रेम । जप व्रत नेम हारपले ॥ ३ ॥
सोपान सगळा न दिसे इहीं डोळां । तूंचि बा गोपाळा आत्माराम ॥४॥

४० अभंग.

अंतरींचा भाव जाणुनियां गुज । तैसें केलें काज पांडुरंगा ॥ १ ॥
घातलें वचन न पडेचि खालीं । तूं आम्हां माउली अनाथांची ॥ २ ॥
मज याचकाची पुरविली आशा । पंढरीनिवासा मायबापा ॥ ३ ॥
नाशिली आशंका माझिया जीवाची । उरली भेदाची होती कांहीं॥४॥
तुका म्हणे आतां केलों मी निर्भर । गाईन अपार गुण तुझे ॥ ५ ॥

४१ अभंग.

एक धरिला चित्तीं । आम्ही रखुमाईचा पती ॥ १ ॥
तेणें जालें अवघें काम । निवारला भवभ्रम ॥ २ ॥
परद्रव्य परनारी । जाली विषाचिया परी ॥ ३ ॥
तुका म्हणे फार । नाहीं लागला व्यवहार ॥ ४ ॥

४१ अभंग.

भावाचिया बळें । आम्ही निर्भर दुर्बळें ॥ १ ॥
नाहीं आणिकांची सत्ता । सदा समाधान चित्ता ॥ २ ॥
तर्का नाहीं ठाव । येथें रिघावया वाव ॥ ३ ॥
एकछत्री राज । तुक्या पांडुरंगीं काज ॥ ४ ॥

४२ अभंग.

जाली होती काया । बहु मळिन देवराया ॥ १ ॥
तुझ्या उजळली नामें । चित्त प्रक्षाळिलें प्रेमें ॥ २ ॥
अनुतापें झाला झाडा । प्रारब्धांनीं केला तोडा ॥ ३ ॥
तुका म्हणे देह पायीं । ठेवुनि झालों उतराई ॥ ४ ॥

देव भेटल्यानंतर किंवा भाव बाणल्यानंतर. (आ.) §

१ अभंग.

याजसाठीं केला होता अट्टाहास । शेवटींचा दिस गोड व्हावा ॥ १ ॥
आतां निश्चिंतीनें पावलों विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ॥ २ ॥
कवतुक वाटे जालिया वेंचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥ ३ ॥
तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं ॥ ४ ॥

१ अभंग.

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो जाला सोहळा अनुपम ॥ १ ॥
आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग जाला ॥ २ ॥

---

§ ब्रह्मात्मैक्यस्थितीच्या अनुभवाचें हें वर्णन आहे. या स्थितींत द्वैती भावाचा म्हणजे देवाहून मी वेगळा या भावनेचा पुरा लोप होऊन, मिठाचा खडा पाण्यांत टाकला असतां पार विरघळून जसा तद्रूप होऊन जातो तसा ज्ञाता सर्वस्वीं परब्रह्मांत रंगून, लय पावून, निःशेष विरून, मुरून किंवा 'मरून' जातो. (गीतारहस्य पृ. २२९-२३० पहा.)

एकदेशी होतों अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें जाला सुकाळ हा ॥ ३ ॥
फिटलें सुतक जन्ममरणाचें । मी माझ्या संकोचें दुरी जालों ॥ ४ ॥
नारायणें दिला वसतीस ठाव । ठेवूनियां भाव ठेलों पायीं ॥ ५ ॥
तुका म्हणे दिलें उमटूनि जगीं । घेतलें तें अंगीं लावूनियां ॥ ६ ॥

३ अभंग.

झाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानींचा ॥ १ ॥
रडती रात्रंदिवस काम क्रोध माया । म्हणती हाय हाय यमधर्म ॥ २ ॥
वैराग्याच्या शेणी लागल्या शरीरा । ज्ञानाग्नि भरभरां जीवित्वेंसी ॥ ३ ॥
फिरविला घट फोडिला चरणीं । महावाक्य जनीं बोंब झाली ॥ ४ ॥
दिली तिळांजुळी कुळनामरूपासी । शरीर ज्याचें त्यासी समर्पिलें ॥ ५ ॥
तुका म्हणे रक्षा जाली आपींआप । उजळला दीप गुरुकृपा ॥ ६ ॥

४ अभंग.

आम्ही मेलों तेव्हां देह दिला देवा। आतां करूं सेवा कोणाची मी ॥ १ ॥
सूत्रधारी जैसा हालवितो कळा । तैसा तो पुतळा नाचे छंदें † ॥ २ ॥
बोलतसें जैसें बोलवितो देव । मज हा संदेह कासयाचा ॥ ३ ॥
पापपुण्य ज्याचें तोचि जाणे कांहीं । संबंध हा नाहीं आम्हांसवें ॥ ४ ॥
तुका म्हणे तुम्ही आइका हो मात । आम्ही या अतीत देवाहूनी ॥ ५ ॥

५ पद.

आनंदरस हा प्याला । भवताप शांताचि झाला ॥ ध्रु० ॥
अनंत कोटी कल्मषपाश । पावे एका समयिं विनाश ॥

---

† प्रत्येक गोष्ट ईश्वराच्या इच्छेप्रमाणें घडत आहे. आपण ईश्वराच्या हातांतील एक सूत्रबाहुली आहों अशी जर कोणाची दृढ भावना झाली, तर तो याच जन्मांत मुक्त होतो. असा मनुष्य असें म्हणत असतो कीं, "परमेश्वरा, मी करितों अशी केवळ अज्ञ लोकांची समजूत वृथा आहे; मी करितों असें लोक म्हणतात, पण वास्तविक पाहतां, हे भगवंता, तूंच सर्व करितोस." —रा. बो. व. ६००.

दृढ धरितां सद्गुरुची कास । निज गुज सांगुनि गेला ॥ भव० ॥ १ ॥
आतां मज हो कैंचें ध्यान । विसरुनि गेलें समुळीं भान ॥
श्रवण कराया नाहीं मज कान । संकल्पचि निमाला ॥ भव० ॥ २ ॥
मेली यद्यपि आहे माय । केला जीणें दृढ व्यवसाय ॥
रामसखा तो शोकेल काय । चिन्मय होउनि ठेला ॥ भव० ॥ ३ ॥

भाग १० वा.

भक्तसामर्थ्य.

समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥

१ अभंग.

भावापुढें बळ । नाहीं कोणाचें सबळ ॥ १ ॥
करी देवावरी सत्ता । कोण त्याहुनि परता ॥ २ ॥
बैसे तेथें येती । न पाचारितां सर्व शक्ति ॥ ३ ॥
तुका म्हणे राहे । तयाकडे कोण पाहे ॥ ४ ॥

२ अभंग.

बरी थोराची चाकरी । कोण हेळणा न करी ॥ १ ॥
श्रीसमर्थाचा शिक्का । धाक पडे ब्रह्मादिकां ॥ २ ॥
तुका म्हणे बरें झालें । थोर घर सांपडलें ॥ ३ ॥

३ अभंग.

वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ॥ १ ॥
करिती घोष जयजयकार । जळती दोषांचे डोंगर ॥ २ ॥
दया क्षमा शांति । बाण अभंग हे हातीं ॥ ३ ॥
तुका म्हणे बळी । तेचि एक भूमंडळीं ॥ ४ ॥

४ अभंग.

आम्ही हरिचे हरिचे । शूर कळिकाळा यमाचे ॥ १ ॥
नाम घोष बाण साचे । भाले तुळसीमंजीरीचे ॥ २ ॥
आम्ही हरिचे हरिचे दास । कळिकाळावरी घालूं कास ॥ ३ ॥
आम्ही हरिचे हरिचे दूत । पुढें पळती यमदूत ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्हांवरी । सुदर्शन घरटी करी ॥ ५ ॥

५ अभंग.

भक्तिसुखें जे मातले । ते कळिकाळा शूर झाले ॥ १ ॥
हातीं बाण हरिनामाचे । वीर गर्जती विठ्ठलाचे ॥ २ ॥
महा दोषां आला त्रास । जन्ममरणां केला नास ॥ ३ ॥
सहस्रनामाची आरोळी । एक एकाहूनि बळी ॥ ४ ॥
नाहीं आणीकांचा गुमान । ज्याचे अंकित त्यावांचून ॥ ५ ॥
तुका म्हणे त्यांच्या घरीं ॥ मोक्षसिद्धी या कामारी ॥ ६ ॥

६ अभंग.

बळियाचे अंकित । आम्ही जालों बळिवंत ॥ १ ॥
लाताळिला संसार । केला पडऊर्मींचा मार ॥ २ ॥
जन धन तन । केलें तृणाही समान ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां । आम्ही मुक्तिचिया माथां ॥ ४ ॥

७ अभंग.

आम्ही बळवंताच्या दासी । कोण गर्भवास सोसी ॥ १ ॥
करूं यमासी ताडण । आमुचा धनी नारायण ॥ २ ॥
जनी म्हणे हरी । पाप उरों नेदी उरी ॥ ३ ॥

८ अभंग.

हरिच्या दासां भये । ऐसें बोलों तेंही नये ॥ १ ॥
राहोनियां आड । उभा देव पुरवी कोड ॥ २ ॥

हरिच्या दासां चिंता । अघटित हे वार्ता ॥ ३ ॥
खावें ल्यावें द्यावें । तुका म्हणे पुरवावें ॥ ४ ॥

९ अभंग.

आम्हां हरिच्या दासां कांहीं । भय नाहीं त्रयलोकीं ॥ १ ॥
देव उभा मागें पुढें । उगवी कोडें संकट ॥ २ ॥
जैसा केला तैसा होय । धांवे सोय धरोनि ॥ ३ ॥
तुका म्हणे असों सुखें । गाऊं मुखें विठोबा ॥ ४ ॥

१० अभंग.

यमधर्म सांगे दूतां । तुम्हां नाहीं तेथें सत्ता ॥
जेथें होय हरिकथा । सदा घोष नामाचा ॥ १ ॥
नका जाऊं तया गांवां । नामधारकाच्या शिवां ॥
सुदर्शन यावा । घरटी फिरे भोंवतीं ॥ २ ॥
चक्र गदा घेउनि हरि । उभा असे त्यांचे द्वारीं ॥
लक्ष्मी कामारी । ऋद्धिसिद्धीसहित ॥ ३ ॥
ते बळिया शिरोमणी । हरिभक्त ये मेदिनी ॥
तुका म्हणे कानीं । यम सांगे दूतांचे ॥ ४ ॥

११ अभंग.

दासां सर्वकाळ । तेथें सुखाचे कल्लोळ ॥ १ ॥
जेथें वसती हरीचे दास । पुण्य पिके पापा नास ॥ २ ॥
फिरे सुदर्शन । घेऊनियां नारायण ॥ ३ ॥
तुका म्हणे घरीं । होय म्हणियारा कामारी ॥ ४ ॥

१२ अभंग.

करूं याची कथा नामाचा गजर । आम्हां संवसार काय करी ॥ १ ॥
म्हणवूं हरिचे दास लेऊं तीं भूषणें । कांपे तया भेणें कळिकाळ † ॥ २ ॥

† तेथें नाहीं रीघ कळिकाळासी येतां । दास म्हणवितां विठोबाचे ॥
—गा. ३५६.४५.

आशा भय लाज आड नये चिंता । ऐसी तया सत्ता समर्थाची ॥ ३ ॥
तुका म्हणे करूं ऐसियाचा संग । जेणें नव्हे भंग चिंतनाचा ॥ ४ ॥

१३ अभंग.

जन्ममरणांची कायसी चिंता । तुझ्या शरणागतां पंढरीराया ॥ १ ॥
वदनीं तुझें नाम अमृतसंजीवनी । असतां चक्रपाणी भय काय ॥ २ ॥
हृदयीं तुझें रूप बिंबलें साकार । तेथें कोण पार संसाराचा ॥ ३ ॥
तुका म्हणे तुझ्या चरणांची पाखर । असतां कळिकाळ पायांतळीं ॥ ४ ॥

१४ अभंग.

बळिवंत आम्ही समर्थाचे दास । घातली या कास कळिकाळासी ॥ १ ॥
तेथें माणसांचा कोण आला पाड । उल्लंघोनि जड गेलों आधीं ॥ २ ॥
संसाराचे बळी साधिलें निधान । मारिले दुर्जन षडवर्ग † ॥ ३ ॥
तुका म्हणे एक उरला धरिता ठाव । येर केले वाव तृणवत ॥ ४ ॥

१५ अभंग.

आम्हां भय धाक कोणाचा रे पाहें । काळ मशक; काय मानव हे ॥ १ ॥
आम्हांसी ते काय चिंता या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ॥ २ ॥
काय करावी हे कोणाची मान्यता । करितां अनंता कोण वारी ॥ ३ ॥
नाहीं शीण आम्हां झालें कवतुक । पुनीत हे लोक करावया ॥ ४ ॥
तुका म्हणे खातों आनंदाचे लाडू । नका चरफडूं घ्या रे तुम्ही ॥ ५ ॥

१६ अभंग.

हरिचिया भक्ता नाहीं भय चिंता । दुःख निवारिता नारायण ॥ १ ॥
नलगे वाहणें संसार उद्वेग । जडों नेदी पांग देवराव ॥ २ ॥
असों द्यावा धीर सदा समाधान । आहे नारायण जवळीच ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा सखा पांडुरंग । व्यापियेलें जग तेणें एकें ॥ ४ ॥

---

† काया-वाचा-मनें झाला विष्णुदास । काम क्रोध त्यास बाधीतना ॥—तुकाराम.

१७ अभंग.

तैसे नव्हों आम्ही विठ्ठलाचे दास । यावें आणिकांस काकुळती ॥ १ ॥
स्वामीचिये सत्ते ठेंगणें सकळ । आला कळिकाळ हाताखालीं ॥ २ ॥
अंकिताचा असे अभिमान देवा । समर्पूनि हेवा असों पायीं ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हां इच्छेचें खेळणें । कोड नारायणें पुरवावें ॥ ४ ॥

भाग ११ वा.

भक्तसांभाळ (अ.)

सत्य आठवितां देव । जातें भेव पळोनी ॥

१ अभंग.

संसारसोहळे भोगितां सकळ । भक्तां त्याचें बळ विठोबाचें ॥ १ ॥
भय चिंता धाक न मानिती मनीं । भक्तां चक्रपाणि सांभाळीत ॥ २ ॥
पापपुण्य त्यांचें धरूं न शके अंग । भक्तांसी श्रीरंग सर्व भावें ॥ ३ ॥
नव्हती ते मुक्त आवडे संसार । देव भक्तां भार सर्व वाहे ॥ ४ ॥
तुका म्हणे देव भक्तां वेळाईत । भक्त ते निश्चिंत त्याचियानें ॥ ५ ॥

२ अभंग.

आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनियां ॥ १ ॥
मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥ २ ॥
भवाचिया पोटीं दुःखाचिया राशी । शरण देवासी जातां भलें ॥ ३ ॥
तुका म्हणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥ ४ ॥

३ अभंग.

पडतां जड भारी । दासीं आठवावा हरी ॥ १ ॥
मग तो होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन ॥ २ ॥

नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ॥ ३ ॥
तुका म्हणे प्राण । करा देवासी अर्पण ॥ ४ ॥

४ अभंग.

हांकेसरिसी उडी । घालुनियां स्तंभ फोडी ॥ १ ॥
ऐसी कृपावंत कोण । माझे विठाईवांचून ॥ २ ॥
करितां आठव । धांवोनियां घाली कव ॥ ३ ॥
तुका म्हणे गीतीं गातां । नामें द्यावी सायुज्यता ॥ ४ ॥

५ अभंग.

आम्हांसाठीं अवतार । मत्स्यकूर्मादि सूकर ॥ १ ॥
मोहें धांवे घाली पान्हा । नांव घेतां पंढरीराणा ॥ २ ॥
कोठें न दिसे पाहतां । उडी घाली अवचिता ॥ ३ ॥
सुख ठेवी आम्हांसाठीं । दुःख आपणची घोंटी ॥ ४ ॥
आम्हां घाली पाठीकडे । आपण कळिकाळाशीं भिडे ॥ ५ ॥
तुका म्हणे कृपानिधी । आम्हां उतरी नावेमधीं ॥ ६ ॥

भक्तसांभाळ. (आ.)

देवाची जतन । तया बाधूं न शके अग्न ॥

१ अभंग.

अग्निकुंडामाजीं घातला प्रल्हाद । तरी तो गोविंद विसरेना ॥ १ ॥
पितयासी म्हणे व्यापक श्रीहरी । नांदतो मुरारी सर्वा ठायीं ॥ २ ॥
अग्निरूपें माझा सखा नारायण । प्रल्हाद गर्जून हांक मारी ॥ ३ ॥
तुका म्हणे अग्नि जाहाला शीतळ । प्रताप सबळ विठो तुझा ॥ ४ ॥

२ अभंग.

वाटीभर विष दिलें प्रल्हादासी । निर्भर मानसीं तुझ्या बळें ॥ १ ॥

भोक्ता नारायण केलें तें प्राशन । प्रतापें जीवन जालें तुझ्या† ॥ २ ॥
नामाच्या चिंतनें विषाचें तें आप । जाहलें देखत नारायणा ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसे तुझे बडिवार । सिणला फणिवर वर्णवेना ॥ ४ ॥

३ अभंग.

पर्वतावरूनी लोटिला प्रल्हाद । परी तो गोविंद विसरेना ॥ १ ॥
वरूनियां त्याणीं लोटियेल्या धोंडी । खचल्या दरडी पर्वताच्या ॥ २ ॥
पक्षी श्वापदासी वर्तला प्रलय । म्हणती हाय हाय जनलोक ॥ ३ ॥
पाहाती तो उभा जैसा तैसा आहे । चिंतितसे पाय गोविंदाचे ॥ ४ ॥
तुका म्हणे ज्याचे मुखीं नाम आहे । विघ्नाचें तें भय काय असे ॥ ५ ॥

भाग १२ वा.

भक्ताची काळजी देवास. (अ.)

निर्वाणीं गोविंद असे मागे पुढें । कांहींच सांकडें पडों नेदी ॥

१ श्लोक.

अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्* ॥ १ ॥

१ अभंग.

कृपावंत किती । दीन बहु आवडती ॥ १ ॥
त्यांचा भार वाहे माथां । करी योगक्षेमचिंता ॥ २ ॥

---

† विषमप्यमृतं क्वचिद्भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया । ईश्वराच्या इच्छनें विषाचेंहि कित्येक प्रसंगीं अमृत होतें आणि अमृताचेंहि विष होतें. —रघुवंश ८.४६.

* ' जे अनन्यनिष्ठ लोक माझें चिंतन करून मला भजतात त्या नित्य योगयुक्त पुरुषांचा योगक्षेम मी चालवीत असतों. —गी. ९.२२.

भुलों नेदी वाट । करीं धरूनि दावी नीट ॥ ३ ॥
तुका म्हणे जीवें । अनुसरतां एका भावें ॥ ४ ॥

३ अभंग.

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणाचि देव होय गुरु ॥ १ ॥
पढिये देहभावें पुरवितो वासना । अंतीं तें आपणापाशीं न्यावें ॥ २ ॥
मागें पुढें उभा राहे सांभाळीत । आलिया आघात निवारावे † ॥ ३ ॥
योगक्षेम त्याचें जाणे जड भारी । वाट दावी करीं धरूनियां ॥ ४ ॥
तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पाहावें पुराणीं विचारूनी ॥ ५ ॥

४ अभंग.

उदार कृपाळ अनाथांचा नाथ । ऐकसी मात शरणागतां ॥ १ ॥
सर्व भार माथां चालविसी त्यांचा । अनुसरले काया-वाचा-मनें ॥ २ ॥
पाचारितां उभा राहासी जवळी । पाहिजे तें काळीं पुरवावें ॥ ३ ॥
चालतांही पंथ सांभाळीसी वाटे । वारिसील कांटे खडे हातें ॥ ४ ॥
तुका म्हणे चिंता नाहीं तुझ्या दासां । तूं त्यांचा कोंवसा सर्व भावें ॥५॥

५ अभंग.

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी करीं धरूनियां †† ॥१॥

---

† १ नेदी दुःख देखों दासीं नारायणा । ठेवी निवारून आल्या आधीं ॥ १ ॥
आधीं पुढें शुद्ध करावा मारग । दासांमागें मग सुखरूप ॥ २ ॥ —तुकाराम.
२ दासीं दुःख देखों नेदी आपुलिया । निवारी आलिया न कळतां ॥ ३ ॥
—गा. ७८.३.

†† १ 'भगवंता, बालपणापासून माझा सर्व भरवंसा तुझ्यावर आहे हें तूं जाणतोसच. पर्वताच्या शिखरावर माझी वस्ती असो किंवा समुद्राच्या तळाशीं असो, उष्ण कटिबंधांत असो किंवा ध्रुवप्रदेशांत असो, तूं सदोदित माझा पाठिराखा आहेस याबद्दल मला शंका नाहीं.' —विवेकानंद. (मं. वि. पृ.१०७९.)

2 I am uneasy at heart when I have to leave my accustomed shelter; I forget that there abides the old in the new and that there also thou abidest.

माझी नेहमींची झोंपडी सोडून कुठें जायचें, म्हणजे माझें चित्त अस्वस्थ होतें;

चालों वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवें माझा ॥ २ ॥
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ॥ ३ ॥
अवघे जन मज झाले लोकपाळ । सोईरे सकळ प्राणसखे ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाहीं ॥ ५ ॥

६ अभंग.

भवसिंधूचें काय कोडें । दावी वाट चाले पुढें † ॥ १ ॥
तारूं भला पांडुरंग । पाय भिजों नेदी अंग ॥ २ ॥
मागें उतरिले बहुत । पैल तीरीं साधुसंत †† ॥ ३ ॥
तुका म्हणे लागवेगें । जाऊं तयाचिया मागें ॥ ४ ॥

७ अभंग.

पाळिलों पोसिलों जन्मजन्मांतरीं । वागविलों करीं धरोनियां ॥ १ ॥
आतां काय माझा घडेल अव्हेर । मागें बहु दूर वागविलें ॥ २ ॥
नेदी वारा अंगीं लागों आघाताचा । घेतला ठायींचा भार माथां ॥ ३ ॥
तुका म्हणे बोलें करितों आवडी । अविट तेचि गोडी अंतरींची ॥ ४ ॥

८ अभंग.

ज्याचा सखा हरी । त्यावरी विश्व कृपा करी ॥ १ ॥
उंणें पडों नेदी त्याचें । वारें सोसी आघाताचें ॥ २ ॥

नव्यांत जुनें असतेंच आणि तेथेंहि तूं आहेसच याचा मला विसर पडतो.
—गी. अं. ६३.

† मुखीं विठ्ठलाचें नाम । मग कैंचा भवभ्रम ॥ —तुकाराम.

†† संसार म्हणिजे महापूर । माजीं जलचरें अपार । डंखूं धांवती विखार । काळसर्प ॥ १ ॥ बहुतेक भावर्ती पडिले । प्राणी वाहतचि गेले । जिहीं भगवंतासि बोभाईलें । भावार्थबळें ॥ २ ॥ देवें आपण घालोनि उडी । तयांसि नेलें पैलथडी । येर तीं अभाविकें बापुडीं । वाहतचि गेलीं ॥ ३ ॥ —दा. बो ३. १०. १ व ८–९.

१ ज्या अविटासंबंधाची गोडी माझ्या अंतःकरणांत आहे, त्याच्याच विषयीं मी प्रीतीनें आपणांशीं बोलत आहें. —जो. गा. १४६०.

तयावीण क्षणभरी । कदा आपण नव्हे दूरी ॥ ३ ॥
अंग आपुलें वोढोनि । त्याला राखे जो निर्वाणीं ॥ ४ ॥
ऐसा अंकित भक्तांसी । म्हणे नामयाची दासी ॥ ५ ॥

९ अभंग.

देव सखा जरी । जग अवघें कृपा करी † ॥ १ ॥
ऐसा असोनि अनुभव । कासविस होती जीव ॥ २ ॥
देवाची जतन । तया बाधूं न शके अग्न ॥ ३ ॥
तुका म्हणे हरी । प्रल्हादासी यत्न करी ॥ ४ ॥

१० अभंग.

देव राखे तया मारील कोण । न मोडे कांटा हिंडतां वन ॥ १ ॥
न जळे न बुडे नव्हे कांहीं । विष तेंही अमृत पाहीं ॥ २ ॥
न चुके वाट न पडे फंदीं । नव्हे कधीं यमबाधा ॥ ३ ॥
तुका म्हणे नारायण । येतां गोळ्या वारी बाण ॥ ४ ॥

११ अभंग.

धीर तो कारण । साह्य होतो नारायण ॥
नेदी होऊं सीण । वाहों चिंता दासांसी ॥ १ ॥
सुखें करावें कीर्तन । हर्षे गावे हरिचे गुण ॥
वारी सुदर्शन । आपणचि कळिकाळ ॥ २ ॥
जीव वेंची माता । बाळा जडभारी होतां ॥
तो तों नव्हे दाता । प्राकृतां यांसारिखा ॥ ३ ॥
हें तों माझ्या अनुभवें । अनुभवा आलें जीवें ॥
तुका म्हणे सत्य व्हावें । आहाच नये कारणा ॥ ४ ॥

---

† १ तुका म्हणे आम्ही सदैवाचीं बाळें । झालों लडिवाळें सकळांचीं ॥
२ देव सखा आतां केलें नव्हे काई । येणें सकळही सोइरींच ॥ —तु.

भक्ताची काळजी देवास. (आ.)

तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहें त्या अनंता आठवूनि ॥

१ श्लोक.

भोजनाच्छादने चिंतां वृथा कुर्वंति वैष्णवाः ।
योऽसौ विश्वंभरो देवः स किं भक्तानुपेक्षते * ॥ १ ॥

२ अभंग.

न करावी चिंता । भय न धरावें सर्वथा ॥ १ ॥
दासां साहे नारायण । होय रक्षिता आपण ॥ २ ॥
न लगे परिहार । कांहीं योजावें उत्तर † ॥ ३ ॥
न धरावी शंका । नये बोलों म्हणे तुका ॥ ४ ॥

३ अभंग.

आवडीनें भावें हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥ १ ॥
नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा । पती लक्षुमीचा जाणताहे ॥ २ ॥
सकळ जीवांचा करितो सांभाळ । तुज मोकलील ऐसें नाहीं ॥ ३ ॥
जैसी स्थिति आहे तैशापरी राहे । कौतुक तूं पाहें संचिताचें ॥ ४ ॥
एका जनार्दनीं भोग प्रारब्धाचा । हरिकृपें त्याचा नाश आहे ॥ ५ ॥

४ अभंग.

बैसोनि निश्चळ करीं त्याचें ध्यान । देईल तो अन्नवस्त्र दाता ॥ १ ॥
काय आम्हां करणें अधिक सांचुनी । देव जाला ऋणी पुरविता ॥ २ ॥
दयाळ मायाळ जाणे कळवळा । शरणागतां लळा रात्रों जाणे ॥ ३ ॥
नलगे सांगणें मागणें तयासी । जाणे इच्छा तैसी पुरवी त्याची †† ॥ ४ ॥
तुका म्हणे लेई अळंकार अंगीं । विठ्ठल हा जगीं तूंचि होसी ॥ ५ ॥

---

* वैष्णव अन्नवस्त्राविषयीं निष्कारण चिंता वाहतात; कारण तो विश्वंभर प्रभु भक्तांची कधीं तरी उपेक्षा करील काय ?

† एक भाव चित्तीं । तरी नलगे कांहीं युक्ती ॥ —तुकाराम.

†† १ सांगणें नलगे सुखदुःख दासां । तुका म्हणे ऐसा कृपावंत ॥ —गा.६८.७.

Cf. Your Father knoweth what things ye have need of, before ye ask him. —Matthew VI. 8.

५ गद्य. *

आपणांस खाणेंपिणें अंथरूणपांघरूण कसें मिळेल याविषयीं चिंता करीत राहूं नका. 'आकाशांत उडणाऱ्या पक्ष्यांकडे पहा. ते कधीं पेरणी करीत नाहींत, कापणी करीत नाहींत किंवा धान्य सांठवीत नाहींत. तथापि परमेश्वर त्यांना अन्न देतो. तसेंच रानांतील फुलझाडांकडे पहा ! तीं विणीत नाहींत किंवा श्रम करीत नाहींत. पण त्यांना जो सुंदर पोषाख असतो तसा मोठ्या सार्वभौम राजासहि मिळत नसेल. जें आज आहे तर उद्यां चुलींत पडावयाचें, अशा रानांतील गवताला देखील जर परमेश्वर उंची पोषाख देतो, तर तो तुला वस्त्रें देणार नाहीं काय ? काय तुझी अश्रद्धा ही !' (जी. क. पृ. ३७१). म्हणून अन्नवस्त्राबद्दल चिंता करीत बसूं नका. कारण तुम्हांस या वस्तूंची जरूरी आहे हें परमेश्वरास ठाऊक आहे. तर तुम्ही ईश्वराप्रमाणें वागतां येण्यासाठीं मनःपूर्वक प्रयत्न करीत असा म्हणजे अन्नवस्त्रादि सर्व आवश्यक वस्तू तुम्हांस मिळत जातील.

६ अभंग.

अधीरा माझ्या मना ऐक एक मात । तूं कां रे दुश्चित निरंतर ॥ १
हेचि चिंता काय खावें म्हणऊनि । भले तुजहूनि पक्षिराज ॥ २ ॥
पाहा तें चातक नेघे भूमिजळा । वरुषे उन्हाळा मेघ तया ॥ ३ ॥
सकळ यातीमध्यें ठक हा सोनार । त्याघरीं व्यापार झारियाचा ॥ ४ ॥
तुका म्हणे जळीं वनीं जीव एक । तयापाशीं लेख काय असे ॥ ५ ॥

७ अभंग.

नित्य उठोनियां खावयाची चिंता । आपुल्या तूं हिता नाठवीसी ॥ १ ॥
जननीचे पोटीं उपजलासी जेव्हां । चिंता तेव्हां तुझी केली तेणें ॥ २ ॥
चातकांलागुनि मेघ नित्य वर्षे । तो तुज उदास करील केवीं ॥ ३ ॥
पक्षी वनचरें आहेत भूमीवरी । तयांलागीं हरि उपेक्षीना ॥ ४ ॥
तुका म्हणे भाव धरून राहे चित्तीं । तरि तो श्रीपति उपेक्षीना ॥ ५ ॥

---

* मॅथ्यु ६. २५-३४ वरून.

८ पद. §

आम्ही काय कुणाचें खातों रे । तो राम आम्हांला देतो रे ॥ ध्रु० ॥
बांधिले घुमट किल्ल्याचें तट । तयाला फुटती पिंपळवट ॥
तेथें कोण लावितो मोट । बुडाला पाणी लावितो ॥ १ ॥
खडक फोडतां सजिव रोडकी । पाहिली सर्वांनीं बेडकी ॥
सिंधु नसतां तियेचे मुखीं । पाणी कोण घालीतो ॥ २ ॥
पहारे पहा मातेचीये स्तनीं । चिंतितां रक्त-मांस-मल-खाणी ॥
तिथें विमल दुग्ध घालोनी । कोण पोसीतो ॥ ३ ॥
नसतां पाण्याचे बुडबुडे । सदा सर्वदा गगन कोरडें ।
दास म्हणे जीवन चहुंकडे । पाडुनी सडे पीक उगवीतो ॥ ४ ॥

९ अभंग.

त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं । आमुचें त्या काई असे ओझें ॥ १ ॥
पाषणाचे पोटीं बैसला दर्दुर । तया मुखीं चारा कोण घाली ॥ २ ॥
पक्षी अजगर न करी संचित । तयासी अनंत प्रतिपाळी ॥ ३ ॥
तुका म्हणे तया भार घातलिया । उपेक्षीना दयासिंधु माझा ॥ ४ ॥

१० अभंग.

पक्षीयांचे घरीं नाहीं सामुगरी । त्यांची चिंता करी नारायण ॥ १ ॥
अजगर जनावर वारुळांत राहे । त्याजकडे पाहे पांडुरंग ॥ २ ॥
चातक हा पक्षी ने घे भूमिजळ । त्यासाठीं घननीळ नित्य वर्षे ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही पिपीलिकांची जात । पुरवीं मनोरथ पांडुरंगा ॥ ४ ॥

११ पद.

चिंता सर्वांची हरिला, पक्ष्यापदरीं संचय कैसा, चारा पुरवी तयाला ॥ ध्रु० ॥
किडी मुंगी कांहीं मागत नाहीं, साखर देई तयाला ॥ चिंता० ॥ १ ॥
अमृत म्हणे हरिघरीं काय उणें, जें मागे देई तयाला ॥ चिंता० ॥ २ ॥

---

§ हें सुंदर पद 'मी समर्थांच्या मठांतले त्यांचे शिष्य पोसतों' असा शिवरायाला अहंकार झाला होता तो घालविण्याकरितां समर्थांनीं त्यांस रानांत नेऊन 'खडक फोडून सजीव बेडकी' दाखविली तेव्हां रचिलें आहे. —प्रदीप पृ. ६८.

१२ अभंग.

कांरे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जगासी एकला तो ॥ १ ॥
बाळा दुधा कोण करितें उत्पत्ती । वाढवी श्रीपति सवें दोन्ही ॥ २ ॥
फुटे तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥ ३ ॥
तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहें त्या अनंता आठवूनि ॥ ४ ॥
तुका म्हणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥ ५ ॥

१३ पद.

तूं माझा यजमान । रामा तूं० ॥ ध्रु० ॥
जननीजठरीं रक्षियलें त्वां । पोसुनि पंचहि प्राण ॥ रामा० ॥ १ ॥
बाहेर निघतां मातेचे स्तनीं । पय केलें निर्माण ॥ रामा० ॥ २ ॥
ऐसें असतां या पोटाची । कां करुं चिंता जाण ॥ रामा० ॥ ३ ॥
मध्वमुनीश्वर स्वामि रमापति । धरिं माझा अभिमान ॥ रामा० ॥४॥

१४ अभंग.

गर्भीं असतां बाळा । कोण पाळी त्याचा लळा ॥ १ ॥
कैसा लाघवी सूत्रधारी । कृपाळुवा माझा हरी ॥ २ ॥
सर्प पिलीं वितांची खाय । वांचलिया कोण माय ॥ ३ ॥
गगनीं लागला कोसेरा । कोण पुरवी तेथें चारा ॥ ४ ॥
पोटीं पाषाणांचे जीव । कवण जीव त्याचा भाव ॥ ५ ॥
तुका म्हणे निश्चळ राहें । होईल तें सहज पाहें ॥ ६ ॥

१५ श्लोक.

यो मे गर्भगतस्यापि वृत्तिं कल्पितवान् प्रभुः ।
शेषवृत्तिविधानाय स किं सुप्तोऽथवा मृतः* ॥ १ ॥

---

*मी मातेच्या उदरामध्यें असतांना देखील माझ्या खाण्यापिण्याची ज्या प्रभूनें तरतूद केली तो पुढें माझ्या उदरनिर्वाहाची सोय न करण्यास निजला आहे कीं मेला आहे?

१६ अभंग.

आमुचें उचित हेचि उपकार । आपुलाचि भार घालूं तुज ॥ १
भूक लागलिया भोजनाची आळी । पांघुरण काळीं शिताचिये ॥ २ ॥
जेणें काळें उठी मनाची आवडी । तेचि मागों घडी आवडे तें ॥ ३ ॥
दुःख येऊं नेदी आमचिया घरा । चक्र करी फेरा भोंवताला ॥ ४ ॥
तुका म्हणे नाहीं मुक्तीसवें चाड । हेंचि आम्हां गोड जन्म घेतां ॥ ५ ॥

१७ अभंग.

पढियंतें आम्हीं तुजपाशीं मागावें । जीवींचें सांगावें हितगुज ॥ १ ॥
पाळशील लळे दीन वो वत्सले । विठ्ठले कृपाळे जननिये ॥ २ ॥
जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं । तूंचि सर्वा ठायीं एक आम्हां ॥ ३ ॥
दुजियाचा संग लागों नेदीं वारा । नाहीं जात घरा आणिकाच्या ॥ ४ ॥
सर्वसत्ता एकी आहे तुजपाशीं । ठावें आहे देसी मागेन तें ॥ ५ ॥
म्हणउनि पुढें मांडियेली आळी । थिंकोनियां चोळी डोळे तुका ॥ ६ ॥

भाग १२ वा.

देवभक्तसंबंध. §

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्वतः ।
ततो मां तत्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम् ॥ १ ॥ *

देहबुद्धया तु दासोऽहं जीवबुद्धया त्वदंशकः ।
तत्वबुद्धया त्वमेवाहमिति मे निश्चिता मतिः ॥ १ ॥ **

अ. स्वामिसेवकभाव. (तस्यैवाहम् ।)

१ अभंग.

अद्वैतीं तों नाहीं माझें समाधान । गोड हे चरणसेवा तुझी ॥ १ ॥
करूनी उचित देई हेंचि दान । आवडे कीर्तन नाम तुझें ॥ २ ॥
देवभक्तपण सुखाचा सोहळा । ठेवूनि निराळा दावीं मज ॥ ३ ॥
तुका म्हणे आहे तुझें हें सकळ । कोण्या एका काळें देईं मज ॥ ४ ॥

---

§ या भागांत 'मला ब्रह्मात्मैक्य नको, तुझी चरणसेवा दे' असें देवास विनविणारा भक्त, भक्तीच्या वाढत्या अग्नीनें हळुहळु वितळून उत्तरोत्तर देवाशीं अधिकाधिक समरस होतां होतां, पाण्यांत टाकलेल्या मिठाच्या खड्याप्रमाणें, शेवटीं देवाशीं कसा पूर्णपणें तद्रूप होऊन जातो हें दाखविलें आहे. मी त्याचा (देवाचा) आहें, मी तुझा आहें व मी तूंच आहें अशा आध्यात्मिक उन्नतीच्या क्रमशः तीन पायऱ्या असून त्यांविषयीं स्वामी रामतीर्थ यांनीं केलेलें उत्कृष्ट काव्यपूर्ण विवरण जिज्ञासूंनीं अवश्य वाचावें. (रा. ती. भाग ८ वा, पहिलीं दोन व्याख्यानें पहा.)

* भक्तीनें मी म्हणजे परमेश्वर कोण व केवढा याचें तात्विक ज्ञान होतें आणि हें ज्ञान झाल्यानंतर (आधीं नव्हे) भक्त मला येऊन मिळतो. —गी. १८.५५.

** देहदृष्टया मी (ईश्वराचा) दास म्हणजे सेवक आहें; जीवदृष्टया मी तुझा अंश आहें आणि तात्विक दृष्टीनें पाहतां मी तूंच आहें असें माझें ठाम मत आहे.

१ अभंग.

जेणें तुज जालें रूप आणि नांव । पतित हें दैव तुझें आम्ही ॥ १ ॥
नाहीं तरी तुज कोण हो पुसतें । निराकारी तेथें एकाएकी ॥ २ ॥
अंधारें दीपातें आणियेली शोभा । माणिकासी प्रभा कोंदणाची ॥ ३ ॥
धन्वंतरी रोगें आणिला उजेडा । सुखी काय चाडा जाणावें त्या ॥ ४ ॥
अमृतासी मोल विषाचिये गुणें । पितळ तरी सोनें उंच नीच ॥ ५ ॥
तुका म्हणे आम्ही असोनियां जाण । तुज देवपण आणियेलें ॥ ६ ॥

२ अभंग.

देवासी अवतार भक्तांसी संसार । दोहींचा विचार एकपणें ॥ १ ॥
भक्तांसी सोहळे देवाचिया अंगें । देव त्यांच्यासंगें सुख भोगी ॥ २ ॥
देवें भक्तां रूप दिलासे आकार । भक्तीं त्यांचा पार वाखाणिला ॥ ३ ॥
एका अंगीं दोन्हीं जालीं हीं निर्माण । देवभक्तपण स्वामिसेवा ॥ ४ ॥
तुका म्हणे येथें नाहीं भिन्न भाव । भक्त तोचि देव, देव भक्त ॥ ५ ॥

४ अभंग.

गोविंदा तूं जळ मी तेथें कल्लोळ । असों सर्व काळ ऐक्यसुखें ॥ १ ॥
तूं बिंब मी तेज; तूं हेतु मी काज । व्यापक तूं पूज्य पूजक मी ॥ २ ॥
अणूचा वियोग नसे तुम्हां आम्हां । आजी मेघश्यामा सांडूं नको ॥ ३ ॥
तूं रस मी गोडी; तूं वृक्ष मी वाढी । तूं शक्ति मी प्रौढी सामर्थ्याची ॥ ४ ॥
दयार्णवस्वामी मी तुझा सेवक । वियोगाचें दुःख साहों नेणें ॥ ५ ॥

५ पद.

जो तुम तोडो पिया मैं नहिं तोडूं।तोरी प्रीत तोडी संग कोन कृष्ण जोडूं।ध्रु०॥
तुम भये तरुवर मैं भयि पखिया।तुम भये सरोवर मैं तेरी मछिया ॥ जो० ॥१
तुम भये गिरिवर मैं भयो चारा।तुम भये चंदा हम भये चकोरा ॥ जो० ॥२
तुम भयो मोती प्रभू हम भये धागा ।तुम भये सोना हम भये स्वागा ॥ जो०॥३
मीरा कहे प्रभु ब्रजके बाशी । तुम मेरे ठाकोर मैं तेरी दासी ॥ जो० ॥ ४

६ अभंग.

मी तुझ्या पायींचा रज ऐसा भावीं । तूं आमुचा गोसावी देवराया ॥ १ ॥
गोविंदा तूं गाय मी वत्स निर्धारें । तूं माय मी पोरें आळकीजे ॥ २ ॥
गोविंदा तूं पती आम्हीं पतिव्रता । गोविंदा तूं पिता पुत्र आम्ही ॥ ३ ॥
गोविंदा तूं सिंधु आम्ही सर्व गंगा । असों सर्व अंगा आलिंगुनी ॥ ४ ॥
गोविंदा तूं आत्मा आम्ही आत्मास्थिति । तूं रत्न मी दीप्ति गोपीनाथा ॥ ५ ॥
तुम्हीं दयार्णव आम्हीं तेथें दया । असों सोयरीया अभिन्नत्वें ॥ ६ ॥

आ. देवा, तूंच माझें सर्वस्व. (तवैवाहम् ।)

हृदयीं चिंतिता आत्माराम । तद्रूप जाहला हृदयींचा काम ॥
त्यासी सर्व कर्मी पुरुषोत्तम । देवदेवोत्तम तुष्टोनि प्रगटे ॥ १ ॥
तेथें ज्या ज्या वासना हृदयवासी । त्याही पडल्या हरिसुखासी ॥
एवं वासना जडल्या हरिरूपाशीं । हरि आश्रयो त्यासी दृढ जाहला ॥ २ ॥
तेथ जो जो भक्तांसी कामु । तो तो होय आत्मारामु ॥
वासनांचा निजसंभ्रमु । पुरुषोत्तमु स्वयें होये ॥ ३ ॥

—ए. भा. २. ६९२–९४.

१ श्लोक.

त्वमेव माता पिता त्वमेव त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव त्वमेव सर्वं मम देवदेव ॥ १ ॥

२ श्लोक.

माता रामो मत्पिता रामचंद्रः स्वामी रामो मत्सखा रामचंद्रः ।
सर्वस्वं मे रामचंद्रो दयालुर्नान्यं जाने नैव जाने न जाने ॥ १ ॥

३ अभंग.

दासाची संपत्ती राम सीतापती । जीवाचा सांगाती राम एक ॥ १ ॥
राम एक माता राम एक पिता । राम एक भ्राता सहोदर ॥ २ ॥
सहोदर विद्या वैभव कांचन । सर्व हा स्वजन राम एक ॥ ३ ॥

राम एक स्वामी राम हा कैवारी । लाभ या संसारीं राम एक ॥ ४ ॥
राम एक ज्ञान राम एक ध्यान । राम समाधान रामदासीं ॥ ५ ॥

४ अभंग.

कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । बहिणी बंधु चुलता कृष्ण माझा ॥ १ ॥
कृष्ण माझा गुरु कृष्ण माझें तारूं । उतरी पैलपारु भवनदीची ॥ २ ॥
कृष्ण माझें मन कृष्ण माझें जन । सोइरा सज्जन कृष्ण माझा ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा श्रीकृष्ण विसांवा । वाटे न करावा परता जीव ॥ ४ ॥

५ अभंग.

विठ्ठल आमचें जीवन । आगमनिगमांचें स्थान ।
विठ्ठल सिद्धीचें साधन । विठ्ठल ध्यान विसांवा ॥ १ ॥
विठ्ठल कुळींचें दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त ।
विठ्ठल पुण्य पुरुषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ॥ २ ॥
विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तही पाताळें भरूनी ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनि मानसीं ॥ ३ ॥
विठ्ठल जीवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा ।
विठ्ठल प्रेमाचा पुतळा । लावियेलें चाळा विश्व विठ्ठलें ॥ ४ ॥
विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता ।
विठ्ठलेंविण चाड नाहीं गोता । तुका म्हणे आतां नाहीं दुसरें ॥५॥

इ. माताबालकभाव. (तवैवाहम् ।)

बाळ काय जाणे जीवन उपाय । वाहे बापमाय सर्व चिंता ॥ १ ॥
आइतें भोजन खेळणें अंतरीं । अंकिताचे शिरीं भार नाहीं ॥ २ ॥
आपुलें शरीर रक्षितां न कळे । सांभाळूनि लळे पाळी माय ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा विठ्ठल जनिता । आमुची ते सत्ता तयावरी ॥ ४ ॥

१ अभंग.

नलगे मायेसी बाळ निरवावें । आपुल्या स्वभावें ओढे त्यासी ॥ १ ॥

मज कां लागला करणें विचार । ज्याचा कारभार त्याचे माथां ॥ २ ॥
गोड धड त्यासी ठेवी न मागतां । समाधान खातां नेदी मना ॥ ३ ॥
खेळतां गुंतलें उमगूनी आणी । बैसोनियां स्तनीं लावी बळें ॥ ४ ॥
त्याच्या दुःखें पीडे आपण खापरीं । लाही तळीं वरी होय जैसी ॥ ५ ॥
तुका म्हणे देह विसरे आपुला । आघात तीं त्याला लागों नेदी ॥ ६ ॥

२ अभंग.

जैसें तैसें राहे देवाचें हें देणें । यत्न करितां तेणें काय नव्हे ॥ १ ॥
दसां कृपासिंधु नुपेक्षी सर्वथा । अंतरींची व्यथा कळे त्यासी ॥ २ ॥
मागों नेणे परी माय जाणे वर्म । बाळा नेदी श्रम पावों कांहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे मज अनुभव अंगें । वचन वाउगें मानेना हें ॥ ४ ॥

३ अभंग.

अज्ञान बाळक कोमाईलें जनीं । जाणते जननी तान भूक ॥ १ ॥
तैसें मजलागीं होऊनि कृपाळ । करीं गा सांभाळ अनाथाचा ॥ २ ॥
वत्सालागीं धेनु येतसे वोरसें । पान्हा स्तनीं जैसे वोसंडती ॥ ३ ॥
नामा म्हणे तुज हे न साहे उपमा । मी कुडी तूं आत्मा केशवराजा ॥ ४ ॥

४ अभंग.

माझी विठ्ठल माउली । प्रेमपान्हा पान्हाइली ॥ १ ॥
कुर्वाळुनि लावी स्तनीं । न वजे दुरी जवळूनी ॥ २ ॥
केली पुरवी आळी । नव्हे निष्ठुर कोंवळी ॥ ३ ॥
तुका म्हणे घांस । मुखीं घाली ब्रह्मरस ॥ ४ ॥

५ अभंग.

शीतळ साउली आम्रुची माउली । विठाई वोळली प्रेमपान्हा ॥ १ ॥
जाउनि वोसंगा रिघेन वोरस । लागेल तें इच्छे पीइन वरी ॥ २ ॥
कृपा तनु माझी सांभाळी दुभोनि । अमृतसंजीवनी लोटलीसे ॥ ३ ॥
आनंदाचा ठाव नाहीं माझे चित्तीं । सागर तो किती उपमेसी ॥ ४ ॥

सैर जाय पडे तयेसी सांकडें । सांभाळीत पुढें मागें असे ॥ ५ ॥
तुका म्हणे चिंता कैसी ते मी नेणें । लडिवाळ तान्हें विठाईचें ॥ ६ ॥

६ अभंग.

तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा । पाजीं प्रेमपान्हा पांडुरंगे ॥ १ ॥
तूं माझी गाउली मी तुझें वासरूं । नको पान्हा चोरूं पांडुरंगे ॥ २ ॥
तूं माझी हरिणी मी तुझें पाडस । तोडीं भवपाश पांडुरंगा ॥ ३ ॥
तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज । चारा घालीं मज पांडुरंगा ॥ ४ ॥
नामा म्हणे होसी भक्तीचा वल्लभ । मागें पुढें उभा सांभाळिसी ॥ ५ ॥

७ अभंग.

बाळक जाणेना मातेसी । तिचें चित्त बाळापासीं ॥ १ ॥ ॥
तैसा देव हा कृपाळू । करी भक्ताचा सांभाळू ॥ २ ॥
धेनु वत्साचेनि लागे । धांवे त्याच्या मागेंमागें ॥ ३ ॥
पक्षी घेतसे गगन । पिलांपाशीं त्याचें मन ॥ ४ ॥
मत्स्य आठवितां पाळी । कूर्म दृष्टीनें सांभाळी ॥ ५ ॥
रामीरामदास म्हणे । मायाजाळाचीं लक्षणें ॥ ६ ॥

ई. अद्वैत. (त्वमेवाहम् ।)

काया वाचा मन । करूं देवा हें अर्पण ॥

—माथा. १८६१.३.

१ अभंग.

हेचि थोर भक्ति आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ॥ १ ॥
ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ॥ २ ॥
वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥ ३ ॥
तुका म्हणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवापायीं † ॥ ४ ॥

---

१. मत्स्यी स्मरणानें व कांसवी दृष्टीनें आपल्या पोरांना पाळते —प्रदीप पृ. ६३.

† संसाराचें ओझें वाहता वाहविता । तुजविण अनंता नाहीं कोणी ॥ —तु.

२ अभंग.

देहभाव आम्ही राहिलों ठेवूनि । निवांत चरणीं विठोबाच्या ॥ १ ॥
आमुच्या हिताचा जाणोनि उपाव । तोचि पुढें देव करीतसे ॥ २ ॥
म्हणउनी नाहीं सुख दुःख मनीं । ऐकिलिया कानीं वचनाचें ॥ ३ ॥
जालों मी निःसंग निवांत एकला । भार त्या विठ्ठला घालूनियां ॥ ४ ॥
तुका म्हणे जालों जयाचे अंकित । तोचि माझें हित सर्व जाणे ॥ ५ ॥

३ अभंग.

जननी हे जाणे बाळकाचें वर्म । सुख दुःख धर्म जें जें कांहीं ॥ १ ॥
अंधापुढें जेणें दिधला आधार । त्याचा हा विचार तोचि जाणे ॥ २ ॥
शरणागता जेणें घातलें पाठीशीं । तो जाणे तेविशीं राखों तया ॥ ३ ॥
कासे लागे तया न लगती सायास । पोहणार त्यासी पार पावी ॥ ४ ॥
तुका म्हणे जीव विठ्ठलाचे हातीं । दिला त्याची गति तोचि जाणे ॥ ५

४ अभंग.

प्रेमसूत्र दोरी । नेतो तिकडे जातों हरी ॥ १ ॥
मनेंसहित वाचा काया । अवघें दिलें पंढरीराया ॥ २ ॥
सत्ता सकळ तया हातीं । माझी कींव काकुळती ॥ ३ ॥
तुका म्हणे ठेवी तैसें । आम्ही राहों त्याचे इच्छे ॥ ४ ॥

५ अभंग.

माझा घात पात अथवा हित फार । अवघा विचार तुझ्या हातीं ॥ १ ॥
ठेवुनि जीवभाव तुझ्या ठायीं चित्त । राहिलों निवांत पांडुरंगा ॥ २ ॥
चित्ताचा चाळक बुद्धीचा जनिता । काय नाहीं सत्ता तुझे हातीं ॥ ३ ॥
तुका म्हणे काय करिसी तें पाहीन । ठेविसी राहीन सुखें तेथें ॥ ४ ॥

६ अभंग.

कोणी निंदा कोणी वंदा । आम्हां स्वहिताचा धंदा ॥ १ ॥
काय तुम्हांसी गरज । आम्ही भजूं पंढरीराज ॥ २ ॥

तुम्हांसारिखें चालावें । तेव्हां स्वहिता मुकावें ॥ ३ ॥
तुका म्हणे हो कां कांहीं । गळ दिला विठ्ठलपायीं ॥ ४ ॥

७ अभंग.

श्रमपरिहारा । मूळ हे जालें दातारा ॥ १ ॥
देह निवेदूनि पायीं । जालों निष्काम उतराई ॥ २ ॥
आपली ते सत्ता । येथें असों नेदीं आतां ॥ ३ ॥
राहिला निराळा । तुका कटकटेवेगळा ॥ ४ ॥

८ अभंग.

दिला जीवभाव । तेव्हा सांडिला म्यां ठाव ॥ १ ॥
आतां वर्ते तुझी सत्ता । येथें सकळ अनंता ॥ २ ॥
माझिया मरणें । तुम्ही बैसविलें ठाणें ॥ ३ ॥
तुका म्हणे कांहीं । मी हें माझें येथें नाहीं † ॥ ४ ॥

९ अभंग.

संकल्पिला तूज सकळही भाव । कोण एक ठाव उरला तेथें ॥ १ ॥
इंद्रियव्यापार जें जें कांहीं कर्म । करितों ते धर्म सकळ तुझे ॥ २ ॥
माझें हित फार लागला विचार । तुज सर्व भार चालवणें ॥ ३ ॥
जो कांहीं लौकिक करिसी तो तुझा । अपमान पूजा कांहीं तरी ॥ ४ ॥
तुका म्हणे मी तों राहिलों निश्चिंत । तुज कळे हित तैसें करीं ॥ ५ ॥

---

† " मुक्ति होगी कब ? । अहंकार दूर हो जब । जब दूर हो अहंकार । तब होवे निस्तार ॥ " ' मी, माझें ' हें अज्ञान आहे. ' तूं तुझें ' हें खरें ज्ञान आहे. खरा भक्त नेहमीं म्हणतो, " हे परमेश्वरा, तूं कर्ता आहेस, तूं सर्व कांहीं करितोस. मी नुसतें एक यंत्र आहें तूं जें करावयास लाविशील तें मी करितों. हें सर्व वैभव तुझें आहे. हें घर आणि हें कुटुंब तुझें आहे, माझें नव्हे. तूं आज्ञा करिशील त्याप्रमाणें वागण्याचा माझा हक्क आहे; किंवा तूं प्रेरणा करशील तसेंच वर्तन माझ्या हातून होणार. " —रा. बो. व. ६०६.

१० अभंग.

निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ॥ १ ॥
मज हेंही तेंही नाहीं । वेगळा दोहींपासूनी ॥ २ ॥
देह भोग भोगें घडे । जें जें जोडे तें बरें ॥ ३ ॥
अवघें पावे नारायणीं । जनार्दनीं तुकयाचें ॥ ४ ॥

११ अभंग.

प्रारब्ध क्रियमाण । भक्तां संचित नाहीं जाण ॥ १ ॥
अवघा देवाचिं जाला पाहीं । भरोनियां अंतर्बाहीं ॥ २ ॥
सत्व-रज-तम-बाधा । नव्हे हरिभक्तांसी कदा ॥ ३ ॥
खाय बोले करी । अवघा त्यांच्या अंगें हरी ॥ ४ ॥
देवभक्तपण । तुका म्हणे नाहीं भिन्न ॥ ५ ॥

उ. ब्रह्मात्मैक्य. (त्वमेवाहम् ।)

पय दधि घृत आणि नवनीत । तैसें दृश्यजात एकपणें ॥ १ ॥
कनकाचे पाहीं अलंकार केले । कनकत्वा आले एकपणें ॥ २ ॥
मृत्तिकेचे घट झाले नानापरी । मृत्तिका अवधारीं एकपणें ॥ ३ ॥
तुका म्हणे एक एक ते अनेक । अनेकत्वीं एक एकपणा ॥ ४ ॥

१ अभंग.

एकपणें पाहतां सृष्टी । भरला दृष्टी विठ्ठल ॥ १ ॥
नाहीं द्वैताची भावना । बैसला ध्याना विठ्ठल ॥ २ ॥
मीतूंपणा वोस ठाव । भरला सर्व विठ्ठल ॥ ३ ॥
ध्यानीं विठ्ठल मनीं विठ्ठल । एका जनार्दनीं अवघा विठ्ठल ॥ ४ ॥

२ अभंग.

हरि होउनि हरिगुण गावे । तेणें आपण उद्धरावें ॥ १ ॥
अवघा बोले चाले हरी । ज्याची कथा तोचि करी ॥ २ ॥

होऊनियां श्रोता वक्ता । करी आपुली आपण कथा ॥ ३ ॥
विश्वव्यापक परिपूर्ण । अवघा एकचि नारायण ॥ ४ ॥
कैंचा रमावल्लभदास । अवघा हरीचा उल्हास † ॥ ५ ॥

३ अभंग.

गातो एक ध्यातो एका । अंतर बाहिर पाहतो एका ॥ १ ॥
अगुणी एका सगुणी एका । गुणातीत देखो एका ॥ २ ॥
जनीं एका वनीं एका । निरंजनीं देखो एका ॥ ३ ॥
संत जनां पढिये एका । जनार्दना कडिये एका ॥ ४ ॥

४ अभंग.

येथुनि पाहे तेथवरी । तंव तंव अवघा दिसे हरी ॥ १ ॥
आतां जाउनि कोठें पाहूं । जेथें पाहूं तेथें देवू ॥ २ ॥
गिरिकपाटीं कंदरीं । जिकडे पाहे तिकडे हरी ॥ ३ ॥
एका बैसला निरंजनीं । जनार्दन जनीं वनीं ॥ ४ ॥

५ अभंग.

मागें पुढें नाहीं । दुजें यावेगळें कांहीं ॥ १ ॥
नाहीं उरलें आणीक । केला झाडा सकळिक ॥ २ ॥
विश्वावांचून । नांवें दुजियाचें शून्य ॥ ३ ॥
देवाविण कांहीं । तुका म्हणे उरी नाहीं ॥ ४ ॥

६ अभंग.

तुज मज नाहीं भेद । केला सहज विनोद ॥ १ ॥
तूं माझा आकार । मी तो तूंच निर्धार ॥ २ ॥

---

† तूं ज्याप्रमाणें करविशील त्याप्रमणें मी करितों, तूं बोलविशील त्याप्रमाणें मी बोलतों, तूं वागविशील त्याप्रमाणें मी वागतों. मी नव्हें, मी नव्हें, सर्व कांहीं तूंच आहेस ! ! —रा. बो. व. ६४२.

मी तुजमाजी देवा । घेसी माझ्या अंगें सेवा ॥ ३ ॥
मी तुजमाजी अचळ । मजमाजी तूं सबळ ॥ ४ ॥
तूं बोलसी माझ्या मुखें । मी तों तुजमाजी सुखें ॥ ५ ॥
तुका ह्मणे देवा । विपरीत ठायीं नांवा ॥ ६ ॥

७ अभंग.

गोडपणें जैसा गुळ । तैसा देव झाला सकळ ॥ १ ॥
आतां भजों कवणे परी । देव सबाह्य अंतरीं† ॥ २ ॥
उदकावेगळा । नव्हे तरंग निराळा ॥ ३ ॥
हेम अळंकार नामीं । तुका ह्मणे तैसे आम्ही ॥ ४ ॥


८ अभंग.

लवण मेळवितां जळें । काय उरलें निराळें ॥ १ ॥
तैसा समरस जालों । तुजमाजी हरपलों ॥ २ ॥
अग्निकर्पूराच्या मेळीं । काय उरली काजळी ॥ ३ ॥
तुका ह्मणे होती । तुझी माझी एक ज्योती ॥ ४ ॥

---

† देवपूजे ठेवितां भावो । तों स्त्रयेंचि जाहलों देवो ॥ १ ॥
आतां कैसेनी पूजूं देवा । माझी मज होते सेवा ॥ २ ॥ — एकनाथ.

प्रकरण ३ रें.



नामसंकीर्तन.

कल्याणानां निधानं कलिमलमथनं पावनं पावनानाम्
पाथेयं यन्मुमुक्षोः सपदि परपदप्राप्तये प्रस्थितस्य ।
विश्रामस्थानमेकं कविवरवचसां जीवनं सज्जनानाम्
बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवतां भूतये रामनाम ॥ १ ॥

भाग १ ला.



नाममाहात्म्य. (अ.)

१ अभंग.

नामाचा प्रताप न वर्णवे मज । सांग गरुडध्वज राहे तेथें ॥ १ ॥
मज वाचा किती परतल्या श्रुति । वेदमुखें स्मृति मौन्य ठेलें ॥ २ ॥
वर्णूं नेणे शेष नामाचा पवाडा । चिरलिया रांडा जिव्हा त्यांच्या ॥ ३ ॥
अनुसरली रमा वर्णिला श्रीहरी । पायाची किंकरी होऊनि ठेली ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्हीं मानव किंकर । वर्णावया पार न कळे तुझा ॥ ५ ॥

२ श्लोक.

आकाशअंत न कळूनिहि अंतरिक्षीं । आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ।
नामप्रतापहि यथामति याच रीती । सीमा न पावति तथापि मुनींद्र गाती ॥ १ ॥

३ अभंग.

नाम गोड नाम गोड । पुरे कोड सकळही ॥ १ ॥
रसना येरां रसां विटे । घेतां घोट अधिक हें ॥ २ ॥

आणिकां रसें मरण गांठी । येणें तुटी संसार ॥ ३ ॥
तुका म्हणे आहार झाला । हा विठ्ठल आम्हांसी ॥ ४ ॥

४ अभंग.

आंबे-केळ-द्राक्ष-घडू । अवघें नामापुढें कडू ॥ १ ॥
नाम गोड नाम गोड । हरि म्हणतां पुरे कोड ॥ २ ॥
गुळ साखर कायसी निकी । अमृताची चव झाली फिकी ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं पडली मिठी । चव घेतलिया कधींच न तुटी ॥४॥

५ अभंग.

आमुचें हें धन विठ्ठलाचें नाम । चांगलें उत्तम नलगे मोल ॥ १ ॥
कदा हें सरेना न नेती तस्कर । अथवा राजे थोर नेईतना ॥ २ ॥
वाऱ्यानें उडेना न बुडे पाण्यांत । न जळे अद्भूत अग्नीमाजीं ॥ ३ ॥
नव्हे डाकलग कोटी सूर्यप्रभा । त्रिभुवनींचा गाभा देवराव ॥ ४ ॥
तुका म्हणे त्याचें नाम हिरेज्योती । सदा तुम्हीं हातीं घेत जावें ॥ ५ ॥

६ पद.

निरधनको धन राम । हमारो निरधनको० ॥ ध्रु० ॥
खात न खरचत चोर न लुटत । सातें आवत काम ॥ हमारो० ॥ १ ॥
दिन दिन होत सवाई दिढी । खरचतको नहि दाम ॥ हमारो०॥ २ ॥
सुरदास प्रभू मुखमों आवत । औरसको नहि काम ॥ हमारो० ॥ ३ ॥

७ अभंग.

नामाची आवडी तोचि जाणा देव । न धरीं संदेह कांहीं मनीं ॥ १ ॥
ऐसें मी हें नाहीं बोलत नेणतां । आणोनि संमता संतांचिया ॥ २ ॥
नाम म्हणे तया आणीक साधन । ऐसें हें वचन बोलों नये ॥ ३ ॥
तुका म्हणे सुख पावे या वचनीं । ज्याचीं शुद्ध दोन्हीं मायबापें ॥ ४ ॥

८ अभंग.

ऐका ऐका वचन माझें । तुम्ही वदा विठ्ठल वाचे ॥ १ ॥
नामापरतें साधन नाहीं । वेद शास्त्रें देती ग्वाही ॥ २ ॥
चार वेद सहा शास्त्र । अवघा नामाचा पसर ॥ ३ ॥
अठरा पुराणांचे पोटीं । नामेंविण नाहीं गोष्टी ॥ ४ ॥
नामें तारिले पातकी । मुक्त झाले इहलोकीं ॥ ५ ॥
अजामेळ तारिला । वाला कोळी ऋषी केला ॥ ६ ॥
गणिका नेली निजपदा । रामनाम वदे एकदा ॥ ७ ॥
ऐसी नामाची ती थोरी । पूतना तारिली निर्धारीं ॥ ८ ॥
आवडीनें नाम गाय । एका जनार्दनीं वंदी पाय ॥ ९ ॥

९ अभंग.

भवरोगासी वोखद । रामनाम हेंचि शुद्ध ॥ १ ॥
येणें तुटे रोगव्यथा । भुक्ति मुक्ति वंदिती माथां ॥ २ ॥
नलगे आणिकाचें काम । वाचे वदे रामनाम ॥ ३ ॥
पथ्य एक शुद्ध क्रिया । एका जनार्दनीं लागे पायां ॥ ४ ॥

१० अभंग.

नाम घेतां उठाउठी । होय संसारासी तुटी ॥ १ ॥
ऐसा लाभ बांधा गांठीं । विठ्ठलपायीं पडे मिठी ॥ २ ॥
नामापुरतें साधन नाहीं । जें तूं करिसी आणिक कांहीं ॥ ३ ॥
हाकारोनी सांगे तुका । नाम घेतां राहों नका ॥ ४ ॥

११ अभंग.

साधनांचें सार गुह्यांचें भांडार । राम निरंतर गात जावा ॥ १ ॥
नामाविण थोर आणिक नसे कांहीं । त्रैलोक्य हें पाहीं धुंडाळितां ॥ २ ॥
जप तप कोण काबाड वाहे ओझें । रामनाम गुज धरा वेगीं ॥ ३ ॥
मुद्गल म्हणे करा आपुलें स्वहित । नामाविण मुक्त नाहीं नाहीं ॥ ४ ॥

१२ अभंग.

नाम साराचेंही सार । शरणागत यम किंकर ॥ १ ॥
नाम उत्तम उत्तम । वाचे बोला पुरुषोत्तम ॥ २ ॥
नाम जपतां चंद्रमौळी । नामें तरला वाल्हा कोळी ॥ ३ ॥
तुका म्हणे वर्णूं काय । तारक विठोबाचे पाय ॥ ४ ॥

१३ अभंग.

सकळ भूषणांचें भूषण । कंठीं धरा नारायण ॥ १ ॥
तेणें तुटती यातना । चुकसी यमाच्या पतना ॥ २ ॥
शिव मस्तकीं धरिला । भेद भक्तांचा काढिला ॥ ३ ॥
अवघ्या देवांचें हें ध्यान । जगमित्रनागा वंदी चरण ॥ ४ ॥

१४ अभंग.

हेंचि सर्व सुख जपावा विठ्ठल । न दवडावा पळ क्षण वायां ॥ १ ॥
हेंचि एक सर्व साधनांचें मूळ । आतुडे गोपाळ येणें पंथें ॥ २ ॥
न लगती कांहीं तपांचिया रासी । करणें वाराणसी नाना तीर्थें ॥ ३ ॥
कल्पना हे तिळ देहीं अभिमान । नये नारायण जवळी त्यांच्या ॥ ४ ॥
तुका म्हणे नामें देव नेदी भेटी । म्हणे त्याचे होटीं कुष्ठ होय ॥ ५ ॥

१५ अभंग.

सर्व सुखा अधिकारी । मुखें उच्चारि हरिनाम ॥ १ ॥
सर्वांगें तो सर्वोत्तम । मुखीं नाम हरीचें ॥ २ ॥
ऐसी उभारिली बाहे । वेदीं पाहें पुराणीं ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें कांहीं । संदेह नाहीं भरंवसा ॥ ४ ॥

१६ अभंग.

काय नव्हे केलें । एका चिंतितां विठ्ठलें ॥ १ ॥
सर्व साधनांचें सार । भवसिंधु उतरी पार ॥ २ ॥
योगयागतपें । केलीं तयानें अमुपें ॥ ३ ॥
तुका म्हणे जपा । मंत्र[1] तीअक्षरी सोपा ॥ ४ ॥

---

१ 'विठ्ठल' हा तीन अक्षरांचा मंत्र.

१७ अभंग.

निजल्यानें गातां उभा नारायण । बैसेल्या कीर्तन करितां डोले ॥ १ ॥
उभा राहोनियां मुखीं नाम वदे । नाचे हा गोविंद नाना छंदें ॥ २ ॥
मारगीं चालतां मुखीं नाम वाणी । उभा चक्रपाणी मागें पुढें ॥ ३ ॥
तुका म्हणे यासी कीर्तनाची गोडी । प्रेमें घाली उडी नामासाठीं ॥ ४ ॥

१८ अभंग.

सेवा ते आवडी उच्चारावें नाम । भेदाभेद काम निवारूनि ॥ १ ॥
नलगे हालावें चालावें बाहेरी । अवघेंचि घरीं बैसलिया ॥ २ ॥
देवाचींच नामें देवाचिया शिरीं । सर्व अळंकारीं समर्पावीं ॥ ३ ॥
तुका म्हणे होय भावेंचि संतोषी । वसे नामापाशीं आपुलिया ॥ ४ ॥

१९ अभंग.

सोपें वर्म आम्हां सांगितलें संतीं । टाळ दिंडी हातीं घेउनि नाचा ॥ १ ॥
समाधीचें सुख सांडा ओंवाळूनी । ऐसा या कीर्तनीं ब्रह्मरस ॥ २ ॥
पुढती घडे चढतें सेवन आगळें । भक्तिभाग्यबळें निर्भरता ॥ ३ ॥
उपजोंचि नये संदेह चित्तासी । मुक्ति चारी दासी हरिदासांच्या ॥ ४ ॥
तुका म्हणे मन पावोनि विश्रांति । त्रिविध नासती ताप क्षणें † ॥ ५ ॥

२० पद.

हरिगुण गावत नाचुंगी ॥ ध्रु० ॥
आपने मंदिरमो बैठा बेठेकर । गीता भागवत वाचुंगी ॥ हरिगुण० ॥ १ ॥
ग्यान ध्यानकी गठडी बांधकर । हरिहर संगमें लागुंगी ॥ हरिगु० ॥ २ ॥
मिरा कहे प्रभू गिरिधर नागर । सदा प्रेमरस चाखुंगी ॥ हरिगु० ॥ ३ ॥

२१ अभंग.

गायनाचे रंगीं । शक्ति अद्भुत हे अंगीं ॥ १ ॥
हें तों देणें तुमचें देवा । ध्यावी अखंडित सेवा ॥ २ ॥

---

† गावोनियां मधुर हें हरिनाम नाचा । पाहों मग भ्रम कसा हरिना मनाचा ॥—वा.

अंगीं प्रेमाचें भरतें । नाहीं उतार; चढतें ॥ ३ ॥
तुका म्हणे वाणी । नाम अमृताची खाणी ॥ ४ ॥

२२ अभंग.

नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरिंचीं ॥ १ ॥
नलगे सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥ २ ॥
ठायींच बैसोनी करा एकचित्त । आवडीं अनंत आळवावा ॥ ३ ॥
रामकृष्ण हरि विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥ ४ ॥
याविण असतां आणीक साधन । वाहातसें आण विठोबाची ॥ ५ ॥
तुका म्हणे आहे सोपें सर्वांहूनि । शाहाणा तो धणी घेतो येथें ॥ ६ ॥

२३ अभंग.

यालागीं आवडी म्हणा रामकृष्ण । जोडा नारायण सर्वकाळ ॥ १ ॥
सोपें हें साधन लाभ येतो घरा । वाचेसी उच्चारा राम हरि ॥ २ ॥
न लगती कष्ट नलगे सायास । करावा अभ्यास विठ्ठलाचा ॥ ३ ॥
नलगे तप तीर्थ करणें महादान । केल्या एक मन जोडे हरि ॥ ४ ॥
तुका म्हणे कांहीं न वेंचितां धन । जोडे नारायण नामासाठीं ॥ ५ ॥

२४ अभंग.

सुखाचिये पेठे घातलें दुकान । मांडियेलें केणें हरिनाम ॥ १ ॥
सुखाचें फुकाचें सार सकळांचें । तारक भवसिंधूचें हरिनाम ॥ २ ॥
मागें मागें झाले थोर सावकार । त्यांणींच हा फार सांठा केला ॥ ३ ॥
तुका म्हणे हाचि उदिम केला । जोडिलें विठ्ठला जन्मोजन्मीं ॥ ४ ॥

२५ अभंग.

नाम फुकाचें फुकाचें । देवा पंढरीरायाचें ॥ १ ॥
नाम अमृत हें सार । हृदयीं जपा निरंतर ॥ २ ॥
नाम संतांचें माहेर । प्रेमसुखाचें आगर ॥ ३ ॥
नाम सर्वांमध्यें सार । जपे नरहरि सोनार ॥ ४ ॥

१६ अभंग.

नाम फुकट चोखट । नाम घेतां नये वीट ॥ १ ॥
जड शिळा ज्या सागरीं । आत्माराम नामें तारी ॥ २
पुत्रभावें स्मरण केलें । तया वैकुंठासी नेलें ॥ ३ ॥
नाम महिमा जनी म्हणे । ध्यातां विठ्ठलची होणें ॥ ४ ॥

१७ अभंग.

संध्या कर्म ध्यान जप तप अनुष्ठान । अवघें घडे नाम उच्चारितां ॥
न वेंचे मोल कांहीं लगती न सायास । तरि कां आळस करिसी झणी ॥१॥
ऐसें हें सार कां न घेसी फुकाचें । काय तुझें वेंचे मोल तया ॥ २ ॥
पुत्रस्नेहें शोक करी अजामेळ । तंव तो कृपाळ जवळी उभा ॥
अनाथांच्या नाथें घातला विमानीं । नेला उचलोनि परलोका † ॥ ३ ॥
अंतकाळीं गणिका पक्षियांच्या छंदें । राम राम पदें उच्चारिलें ॥
तंव त्या दीनानाथा कृपा आली कैसी । त्यानें तियेसी वैकुंठा नेलें † ॥ ४ ॥
अवचिता नाम आलीया हे गती । चिंतितां चित्तीं जवळी असे ॥
तुका म्हणे भावें स्मरा रामराम । कोण जाणे तये दशे ॥ ५ ॥

१८ अभंग.

नाम घेतां नलगे मोल । नाममंत्र नाहीं खोल ॥ १ ॥
दोंचि अक्षरांचें काम । उच्चारावें राम राम ॥ २ ॥
नाहीं वर्ण धर्म याती । नामीं अवघींचि सरती ॥ ३ ॥
तुका म्हणे नाम । चैतन्य निज धाम ॥ ४ ॥

१९ अभंग.

नामधारक हो कां भलता । त्याचे चरणीं ठेविन माथा ॥ १ ॥
न म्हणे उत्तम अधम । मुखीं जपतां रामनाम ॥ २ ॥

---

† न कळतां पद अग्निवरी पडे । न करि दाह असें न कधीं घडे ॥ अजितनाम वदो भलत्या मिसें । सकळ पातक भस्म करीतसे ॥१॥—वामन. (ना. सु. १.१.३४.)

यातिकुळाचें कारण । नाहीं नाहीं नामाविण ॥ ३ ॥
नाम जपे तोचि श्रेष्ठ । एका जनार्दनीं वरिष्ठ ॥ ४ ॥

३० अभंग.

हो कां दुराचारी । वाचे नाम जो उच्चारी ॥ १ ॥
त्याचा दास मी अंकित । काया-वाचा-मनें सहित ॥ २ ॥
नसो भाव चित्तीं । हरिचे गुण गातां गीतीं ॥ ३ ॥
करो अनाचार । वाचे हरिनामउच्चार ॥ ४ ॥
हो कां भलतें कुळ । शुचि अथवा चांडाळ ॥ ५ ॥
म्हणवी हरिचा दास । तुका म्हणे धन्य त्यास ॥ ६ ॥

३१ अभंग.

हो कां नर अथवा नारी । ज्याचा आवडता हरि ॥ १ ॥
ते मज विठोबासमान । नमूं आवडी ते जन ॥ २ ॥
ज्याचें अंतर निर्मळ । त्याचें सबाह्य कोमळ ॥ ३ ॥
त्यांचा संग सर्वकाळ । घडो मज हे मंगळ ॥ ४ ॥
तुका म्हणे प्राण । काया कुरवंडी करीन ॥ ५ ॥

३२ अभंग.

नाम दूषी त्याचें नको दरुषण । विष तें वचन वाटे मज ॥ १ ॥
अमंगळ वाणी नाइकवे कानीं । निंदेची पोहणी उठे तेथें ॥ २ ॥
काय साच लाभ त्याचिये वचनीं । कोणत्या पुराणीं दिली ग्वाही ॥ ३ ॥
काय आड लावूं त्याचिया तोंडासी । आतां या जिभेसी काय करूं ॥ ४ ॥
तुका ह्मणे संत न मानिती त्यास । घेऊं पाहे ग्रास यमदूत ॥ ५ ॥

३३ अभंग.

विठ्ठल नामाचा नाहीं ज्या विश्वास । तो वसे उदास नरकामध्यें ॥ १ ॥
तयासी बोलतां होईल विटाळ । नव जाय तो जळस्नान करितां ॥ २ ॥
विठ्ठल नामाची नाहीं ज्या आवडी । त्याची काळ घडी लेखिताहे ॥ ३ ॥
तुका म्हणे मज विठोबाची आण । जरी प्रतिवचन करिन त्यासी ॥ ४ ॥

३४ अभंग.

वाचे विठ्ठल नाहीं । तोचि प्रेतरूप पाहीं ॥ १ ॥
धिग् त्याचें ज्यालेपण । भार न साहे मेदिन ॥ २ ॥
न बैसे कीर्तनीं । गुण नाइके जो कानीं ॥ ३ ॥
जातां कंटाळे देउळा । तोचि सुना मुखकाळा ॥ ४ ॥
हरिभक्तिविण । त्याचें जळो शहाणपण ॥ ५ ॥
तुका म्हणे तेणें । वंशा आणियेलें उणें ॥ ६ ॥

३५ अभंग.

धन्य धन्य तोचि प्राणी । रामनाम जपे वाणी ॥ १ ॥
तोचि एक भाग्यवंत । तयापाशीं रघुनाथ ॥ २ ॥
तेणें तारियेलें कुळा । तोचि दैवानें आगळा ॥ ३ ॥
तुका म्हणे धन्य धन्य । त्याचे भेटी थोर पुण्य † ॥ ४ ॥

३६ अभंग.

धन्य धन्य तें नगर । जेथें कथा निरंतर ॥ १ ॥
गुण गाती भगवंताचे । तेचि मानावे दैवाचे ॥ २ ॥
स्वयें बोले जगजीवन । थोर कलियुगीं कीर्तन ॥ ३ ॥
रामदास म्हणे भले । हरिभक्तीं उद्धरले ॥ ४ ॥

३७ अभंग.

विठ्ठलाचें नाम ध्यावें । पुढें पाऊल टाकावें ॥ १ ॥
अवघा मुहूर्त शकून । हृदयीं विठ्ठलाचें ध्यान ॥ २ ॥
ऐसा पाहिजे हा योग । लाभा उणें काय मग ॥ ३ ॥
तुका म्हणे हरिच्या दासा । शुभ काळ सर्व दिशा ॥ ४ ॥

---

† विठोबाचें नाम ज्याचे मुखीं नित्य । त्या देखिल्या पतित उद्धरती ॥—तुकाराम.

नाममाहात्म्य. (आ.)

१ अभंग.

जन्मा येऊनि कांरे निदसुरा । जायें भेटी वरा रखुमाईच्या ॥ १ ॥
पाप ताप दैन्य जाईल सकळ । पावसी अढळ उत्तम तें ॥ २ ॥
संतमहंतसिद्धहरिदासदाटणी । फिटती पारणीं इंद्रियांचीं ॥ ३ ॥
तुका म्हणे तेथें नामाचा गजर । फुकाची अपार लुटी घेई ॥ ४ ॥

२ अभंग.

नाशवंत देह नासेल हा जाणा । कांरे उच्चाराना वाचे नाम ॥ १ ॥
नामेंचि तारिले कोट्यान हे कोटि । नामें हे वैकुंठीं बैसविले ॥ २ ॥
नामापरतें सार नाहीं त्रिभुवनीं । तें कां तुम्हीं मनीं आठवाना ॥ ३ ॥
तुका म्हणे नाम वेदांसी आगळें । तें दिलें गोपाळें फुकासाठीं ॥ ४ ॥

३ अभंग.

लागोनियां पायां विनवितों तुम्हांला । करें टाळी बोला मुखें नाम ॥ १ ॥
विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळां । हा सुखसोहळा स्वर्गीं नाहीं ॥ २ ॥
कृष्ण विष्णु हरि गोविंद गोपाळ । मार्ग हा प्रांजळ वैकुंठींचा ॥ ३ ॥
सकळांसी येथें आहे अधिकार । कलियुगीं उद्धार हरिनामें ॥ ४ ॥
तुका म्हणे नामापाशीं चारी मुक्ति । ऐसें बहुतां ग्रंथीं बोलियेलें ॥ ५ ॥

४ अभंग.

आम्हीं गावें तुम्हीं कोणीं कांहीं न म्हणावें ।
ऐसें तंव आम्हां सांगितलें नाहीं देवें ॥ १ ॥
म्हणा राम राम टाळी वाजवा हातें ।
नाचा डोला प्रेमें आपुलिया स्वहितें ॥ २ ॥
सहज घडे तया आळस करणें तें काई ।
अग्नीचें[1] भातुकें हात पाळितां कां पायीं ॥ ३ ॥

---

१ हात, पाय हे केवळ अग्नीचेंच खाजें (खाद्य) आहे. याकरितां हरिभजनाला सोडून यांचें पोषण कां करितां ? —जो. गा. ६०६.

येथें नाहीं लाज भक्तिभाव लौकिक ।
हांसे तया घडे ब्रह्महत्यापातक ॥ ४ ॥
जया जैसा भाव निरोपण करावा ।
येथें नाहीं चाड ताल विताल या देवा ॥ ५ ॥
सदैव ज्या कथाकाळीं घडे श्रवण ।
तुका म्हणे येर जन्मा आले ते पाषाण ॥ ६ ॥

नाममाहात्म्य. (इ.)

१ अभंग.

कुमुदिनी काय जाणे तो परिमळ । भ्रमर सकळ भोगीतसे ॥ १ ॥
तैसे तुज ठावें नाहीं तुझें नाम । आम्हींच तें प्रेमसुख जाणों ॥ २ ॥
माते तृण बाळा दुधाची ते गोडी । ज्याची न ये जोडी त्यासी कामा ॥ ३ ॥
तुका म्हणे मुक्ताफळ शिंपीपोटीं । नाहीं[1] त्याची भेटी भोग तिये[1] ॥ ४ ॥

२ अभंग.

देवा ऐकें हे विनंती । मज नको रे हे मुक्ति ॥
तया इच्छा गति । हेंचि सुख आगळें ॥ १ ॥
या या वैष्णवांचे घरीं । प्रेमसुख इच्छा करी ॥
ऋद्धिसिद्धि द्वारीं । कर जोडूनि तिष्ठती ॥ २ ॥
नको वैकुंठींचा वास । असे तया सुखा नास ॥
अद्भुत हा रस । कथाकाळीं नामाचा ॥ ३ ॥
तुझ्या नामाचा महिमा । तुज न कळे मेघश्यामा ॥
तुका म्हणे आम्हां । जन्म गोड यासाठीं ॥ ४ ॥

---

१ मोतीं एकदां शिंपींतून काढिलें म्हणजे मग त्याचा तिला उपभोग व भेटी होत नाहीं; तीं दुसऱ्यास होतात. —नवनीत.

भाग २ रा.

नामसामर्थ्य.

अंतरशुद्धीचें कारण । मुख्यत्वें हरिकीर्तन ॥
नामापरतें साधन । सर्वथा आन असेना ॥ १ ॥
कीर्तनीं हरीची आवडी कैशी । वत्सालागीं धेनु जैशी ॥
कां न विसंबे जेवीं माशी । मोहळासी क्षणार्ध ॥ २ ॥
तेवीं नाम स्मरतया भक्ता । अतिशयें आवडी अच्युता ॥
दासांची अणुमात्र अवस्था । निजांगें सर्वथा निवारी स्वयें ॥ ३ ॥
—ए. भा. ५.३५३–५५.

१ ओंव्या.

स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ॥
नामस्मरणें पावावें । समाधान ॥ १ ॥
भूत पिशाच्य नाना छंद । ब्रह्मगिऱ्हो ब्राह्मणसमंध ॥
मंत्रचळ नाना खेद । नामनिष्ठें नासती ॥ २ ॥
नामें विषबाधा हरती । नामें चेडें चेटकें नासती ॥
नामें होये उत्तम गती । अंतकाळीं ॥ ३ ॥
नामें संकटें नासती । नामें विघ्नें निवारती ॥
नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ॥ ४ ॥
हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातांपासून सुटला ॥
नारायेणनामें पावन जाला । अजामेळ ॥ ५ ॥
उफराट्या नामासाठीं । वाल्मिक तरला उठाउठी ॥
भविष्य वदला शतकोटी । चरित्र रघुनाथाचें ॥ ६ ॥
नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले ॥
महापापी तेचि जाले । परम पवित्र ॥ ७ ॥

कांहींच न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी ॥
तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागीं सांभाळी ॥ ८ ॥
नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्य शरीर ॥
महादोषांचे गिरिवर । रामनामें नासती ॥ ९ ॥
अगाध महिमा न वचे वदला । नामें बहुत जन उद्धरला ॥
हळहळापासून सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी ॥ १० ॥
चहुं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर ॥
जड मूढ पैल पार । पावती नामें ॥ ११ ॥

१ अभंग.

बुद्धीचा जनिता लक्षुमीचा पति । आठवितां चित्तीं काय नव्हे ॥ १ ॥
आणिकां उपायां कोण वांटी मन । सुखाचें निधान पांडुरंग ॥ २ ॥
गीतीं गावों नाचों छंदें वाहों टाळी । वैष्णवांचे मेळीं सुखरूप ॥ ३ ॥
अनंत ब्रह्मांडें एके रोमावळी । आम्हीं केला भोळीं भावें उभा ॥ ४ ॥
लटिका हा केला संवसारसिंधु । मोक्षें करा बंधु नाहीं पुढें[1] ॥ ५ ॥
तुका ह्मणे ज्याच्या नामाचे अंकित । राहिलों निश्चिंत त्याच्या बळें ॥ ६ ॥

२ अभंग.

नामाचिया बळें न भिऊं सर्वथा । कळिकाळाच्या माथां सोटे मारूं ॥ १ ॥
वैकुंठींचा देव आणूं या कीर्तनीं । विठ्ठल गाऊनि नाचों रंगीं ॥ २ ॥
सुखाचा सोहोळा करूनि दिवाळी । प्रेमें वनमाळी चित्तीं धरूं ॥ ३ ॥
सांवता ह्मणे ऐसा भक्तिमार्ग धरा । तेणें मुक्ति द्वारां वोळंगती ॥ ४ ॥

४ अभंग.

नाम मुखीं सदा तोचि पैं भाग्याचा । तयासी यमाचा धाक नाहीं ॥ १ ॥
रामनाम हरी सर्वकाळ वसे । तेथेंचि निवासे वसे हरी ॥ २ ॥
हरि ध्यान वसे अखंड पैं सर्वदा । न पवे तो आपदा इये जनीं ॥ ३ ॥
निवृत्ति समता हरिभजन करी । सर्वत्र कामारी ऋद्धिसिद्धि ॥ ४ ॥

---

१ यापुढें मोक्षास बंधनकारक असें आम्हांमध्यें कांहीं उरलें नाहीं.

५ अभंग.

कथा सुख करी कथा मुक्त करी । कथा याची बरी विठोबाची ॥ १ ॥
कथा पाप नासी उद्धरिले दोषी । समाधि कथेसी मूढ जनां ॥ २ ॥
कथा तप ध्यान कथा अनुष्ठान । अमृत हे पान हरिकथा ॥ ३ ॥
कथा मंत्रजप कथा हरि ताप । कथाकाळीं कांप कळिकाळासी ॥ ४ ॥
तुका म्हणे कथा देवाचेंही ध्यान । समाधि लागोन उभा कथे ॥ ५ ॥

६ अभंग.

स्मरण करितां रामनाम ध्वनी । ऐकतांचि कर्णीं पळे यम ॥ १ ॥
नाम पाठ करी रामकृष्ण हरी । होतील कामरी ऋद्धिसिद्धि ॥ २ ॥
साध्य तेंचि साधी न करी उपाधी । जन्मांतरिंच्या व्याधी हरती नामें ॥३॥
नामा म्हणे सर्व राम हाचि भाव । नाहीं आणिक देव रामेंवीण ॥ ४ ॥

७ अभंग.

ज्याचे गर्जतां पवाडे । कळिकाळ पायां पडे ॥ १ ॥
तो हा पंढरीचा राणा । पुसा सहा चौं अठरा जणां ॥ २ ॥
चिंतितां जयासी । भुक्तिमुक्ति कामारी दासी ॥ ३ ॥
वैकुंठासी जावें । तुका म्हणे ज्याच्या नांवें ॥ ४ ॥

८ अभंग.

हरि म्हणतां गति पातकें नासती । कळिकाळ कांपती हरि म्हणतां ॥ १ ॥
हरि म्हणतां भुक्ति हरि म्हणतां मुक्ति । चुके यातायाती हरि म्हणतां ॥२॥
तपें अनुष्ठानें न लागती साधनें । तुटती बंधनें हरि म्हणतां ॥ ३ ॥
तुका म्हणे भावें जपा हरिचें नाम । मग काळयम शरण तुम्हां ॥ ४ ॥

९ अभंग.

राम म्हणतां तरे जाणता नेणता । हो का याति भलता कुळहीन ॥ १ ॥
राम म्हणतां न लगे आणीक सायास । केले महादोष तेही जळती ॥२॥
राम म्हणे तयाजवळ न ये भूत । कैंचा यमदूत म्हणतां राम ॥ ३ ॥

राम म्हणतां तरे भवसिंधुपार । चुके येरझार म्हणतां राम ॥ ४ ॥
तुका म्हणे हेंचि सुखाचें साधन । सेवीं अमृतपान एका भावें ॥ ५ ॥

१० अभंग.

अखंड वाचे नाम । तया न बाधी क्रोध काम ॥ १ ॥
राम नाम वदतां वाचे । ब्रह्मसुख तेथें नाचे ॥ २ ॥
रामनामें वाजे टाळी । महादोषां होय होळी ॥ ३ ॥
दोन अक्षरां पैं साठीं । ब्रह्म धांवे पाठोपाठीं ॥ ४ ॥
एका जनार्दनीं नाम । सहज चैतन्य निष्काम ॥ ५ ॥

११ अभंग.

नाम उच्चारितां कंठीं । पुढें उभा जगजेठी ॥ १ ॥
ऐसें धरोनियां ध्यान । मनें करावें चिंतन ॥ २ ॥
ब्रह्मादिकां ध्यान नये । तो हा कीर्तनाचे सोये ॥ ३ ॥
तुका म्हणे सार ध्यावें । मनें हरिरूप पहावें ॥ ४ ॥

१२ अभंग.

तुटे भवरोग । संचित-क्रियमाण-भोग ॥ १ ॥
ऐसें विठोबाचें नाम । उच्चारितां खंडे जन्म ॥ २ ॥
वसों न सके पाप । जाय त्रिविध तो ताप ॥ ३ ॥
तुका म्हणे माया । होय दासी लागे पायां ॥ ४ ॥

१३ अभंग.

रामनाम वेदो वाणी । मना झाली समाधानी ॥ १ ॥
म्हणतां राम वेळोवेळां । जळती पापें अग्निज्वाळा ॥ २ ॥
रामनामाचा प्रताप । काय पुढें येइल पाप ॥ ३ ॥
शिवदास म्हणे नाम । आम्हीं होंचि केलें काम ॥ ४ ॥

१४ अभंग.

घेतां नाम विठोबाचें । पर्वत जळती पापाचे ॥ १ ॥
ऐसा नामाचा महिमा । वेद शिणला जाहली सीमा ॥ २ ॥
नामें तारिले अपार । महा पापी दुराचार ॥ ३ ॥
वाला कोळी ब्रह्महत्यारी । नामें तरला निर्धारीं ॥ ४ ॥
सेना बैसोनि निवांत । विठ्ठलनाम उच्चारित ॥ ५ ॥

१५ अभंग.

नामें दोष जळती । नामें पापी उद्धरती ॥ १ ॥
हें तों आलें अनुभवा । सत्य जीवा प्रत्यया ॥ २ ॥
नामें अपार तारिले । नामें जीवन्मुक्त केले ॥ ३ ॥
कान्हुपात्रा नाम घेतां । पायीं जडली तत्वतां ॥ ४ ॥

१६ अभंग.

नाम घेतां वांयां गेला । ऐसा कोणें आईकिला ॥ १ ॥
सांगा विनवितों तुम्हांसी । संत महंत सिद्ध ऋषी ॥ २ ॥
नामें तरला नाहीं कोण । ऐसा द्यावा निवडून ॥ ३ ॥
सलगीच्या उत्तरा । तुका म्हणे क्षमा करा ॥ ४ ॥

१७ अभंग.

गाऊं नाचूं परमानंदें । रामनामाचेनी छंदें ॥ १ ॥
म्हणा जयराम श्रीराम । भवसिंधुतारक नाम ॥ २ ॥
रामनामाची आवडी । काळ गेला देशोधडी ॥ ३ ॥
आवडीनें नाम घोका । म्हणे जनार्दन एका ॥ ४ ॥

१८ अभंग.

जडजीवातें उद्धरी । ऐशी नामामाजी थोरी ॥ १ ॥
तें नाम वाचे गातां । हरे जन्ममरणवार्ता ॥ २ ॥
नामें पाषाण तारले । गजेंद्रातें उद्धरिलें ॥ ३ ॥
ऐसा नामाचा पोवाडा । म्हणे नामयाचा गोंदा ॥ ४ ॥

१९ अभंग.

रामनामाचे पवाडे । अखंड ज्याची वाचा घडे ॥ १ ॥
धन्य तो एक संसारीं । रामनाम जो उच्चारी ॥ २ ॥
रामनाम गर्जे वाचा । काळ आज्ञाधारक त्याचा ॥ ३ ॥
तुका म्हणे रामनामीं । कृतकृत्य झालों आम्ही ॥ ४ ॥

२० अभंग.

राम म्हणतां कामक्रोधांचेंदहन । होय अभिमान देशधडी ॥ १ ॥
राम म्हणतां कर्म तुटेल भवबंधन । नये श्रम सीण स्वप्नासही ॥ २ ॥
राम म्हणतां जन्म नाहीं गर्भवास । नव्हे दारिद्रास पात्र कधीं ॥ ३ ॥
राम म्हणतां यम शरणागत बापुढें । अढळपद पुढें काय तेथें ॥ ४ ॥
राम म्हणतां धर्म घडती सकळ । तिमिरपडळ नासे हेळा ॥ ५ ॥
राम म्हणतां म्हणे तुकयाचा बंधु । तरिजेल भवसिंधु संदेह नाहीं ॥६॥

२१ अभंग.

नाम घेतां कंठ शीतळ शरीर । इंद्रियां व्यापार नाठवती ॥ १ ॥
गोड गोमटें हें अमृतासी वाड । केला कईवाड माझ्या चित्तें ॥ २ ॥
प्रेमरसें जाली पुष्ट अंगकांति । त्रिविध नासती ताप क्षणें ॥ ३ ॥
तुका म्हणे तेथें विकाराची मात । बोलों नये हित सकळांचें ॥ ४ ॥

२२अभंग.

नाम मुखीं गातां विषयाची वार्ता । नोहेची सर्वथा गातयासी ॥ १ ॥
नाम तें पावन नाम तें पावन । नामावांचून जाण श्रेष्ठ कोण ॥ २ ॥
एका जनार्दनीं नाम तें पावन । त्रिभुवनीं मंडन नाम सत्य ॥ ३ ॥

२३ अभंग.

स्वरूपाचे ठायीं चित्त तें बैसेना । जाणावी वासना गेली नाहीं ॥ १ ॥
काया वाचा चित्त जोडे भगवंतीं । तेव्हां होय शांति वासनेची ॥ २ ॥
तुका ह्मणे रामनामाचा हो घोष । तेणें वासनेस क्षय होय ॥ ३ ॥

२४ अभंग.

ज्यांनीं विठ्ठलमात्रा घ्यावी । त्यांनीं पथ्यें सांभाळावीं ॥ १ ॥
काम-क्रोध तिखट मिरची । ह्यांची घेऊं नये रुची ॥ २ ॥
आशा-मनीषा तेलकट । त्यांचा येऊं द्यावा वीट ॥ ३ ॥
राम-कृष्ण घ्यावा विडा । तेणें हरे सर्व पीडा ॥ ४ ॥
तुका ह्मणे घ्या औषध । ज्ञान जोडे ब्रह्मपद ॥ ५ ॥

भाग ३ रा.

नाम केव्हां घ्यावें ?

१ ओंव्या.

चिंतनासी नलगे वेळ । सर्व काळ करावें ॥ १ ॥
सदा वाचे नारायण । तें वदन मंगळ ॥ २ ॥

नित्यनेम प्रातःकाळीं । माध्यानकाळीं सायंकाळीं ॥
नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ॥ १ ॥
सुख दुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां ॥
नामस्मरणेंविण सर्वथा । राहोंच नये ॥ २ ॥
हरुषकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावकाळीं ॥
विश्रांतिकाळीं निद्राकाळीं । नामस्मरण करावें ॥ ३ ॥
कोडें सांकडें संकट । नाना संसार खटपट ॥
अवस्था लागतां चटपट । नामस्मरण करावें ॥ ४ ॥
संपत्ती अथवा विपत्ती । जैसी पडेल काळगती ॥
नामस्मरणाची स्थिती । सांडूंच नये ॥ ५ ॥
वैभव सामर्थ्य आणी सत्ता । नाना पदार्थ चालतां ॥
उत्कट भाग्यश्री भोगितां । नामस्मरण सांडूं नये ॥ ६ ॥

आधीं अवदसा मग दसा । अथवा दसेउपरी अवदसा ॥
प्रसंग असो भलतैसा । परंतु नाम सोडूं नये ॥ ७ ॥
चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां ॥
नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ॥ ८ ॥

१ अभंग.

असाल तेथें नामाचें चिंतन । याहूनि साधन आणिक नाहीं ॥ १ ॥
सोडवील माझा भक्तांचा कैवारी । प्रतिज्ञा निर्धारीं केली आम्हीं ॥ २ ॥
गुणदोषयाती न विचारी कांहीं । धांवे लवलाहीं भक्तकाजा ॥ ३ ॥
अवघे काळीं वाचे म्हणा नारायण । सेना म्हणे क्षण जाऊं न द्या ॥४ ॥

३ अभंग.

काळ वेळ नसे नामसंकीर्तनीं । उंच नीच योनी हेंही नसे ॥ १ ॥
धरा नाम कंठीं सदा सर्वकाळ । मग तो गोपाळ सांभाळील ॥ २ ॥
कृपाळु कोंवसा सुखाचा सागर । करील उद्धार भाविकांसी ॥ ३ ॥
नामा म्हणे फार सोपें हें साधन । वाचे नाम घेणें इतुकेंची ॥ ४ ॥


४ अभंग.

हरि बोला देतां हरि बोला घेतां । हांसतां खेळतां हरि बोला ॥ १ ॥
हरि बोला गातां हरि बोला खातां । सर्व कार्य करितां हरि बोला ॥ २ ॥
हरि बोला एकांतीं हरि बोला लोकांतीं । देह त्यागितां अंतीं हरि बोला ॥३॥
हरि बोला भांडतां हरि बोला कांडतां । उठतां बैसतां हरि बोला ॥ ४ ॥
हरि बोला जनीं हरि बोला विजनीं । एकाजनार्दनीं हरि बोला ॥ ५ ॥

५ श्लोक.

अहो येतां जातां उठत बसतां कार्य करितां ।
सदा देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळितां ॥
घरीं दारीं शय्येवरि रतिसुखाचे अवसरीं ।
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करीं ॥ १ ॥

भाग ४ था.



नाम हेंच सर्वस्व.

हित तेंचि एक राम कंठीं राहे । नाठविती देहभाव देही ॥ १ ॥
हाचि एक धर्म निज बीज वर्म । हेंचि जाळी कर्में केलीं महा ॥ २ ॥
चित्त राहे पायीं रूप बैसे डोळां । जीवें कळवळा आवडीचा ॥ ३ ॥
अखंड न खंडे अभंग न भंगे । तुका म्हणे गंगेमिळणी सिंधु ॥ ४ ॥

१ अभंग.

हेंचि माझें तप हेंचि माझें दान । हेंचि अनुष्ठान नाम तुझें ॥ १ ॥
हेंचि माझें तीर्थ हेंचि माझें व्रत । सत्य हें सुकृत नाम तुझें ॥ २ ॥
हाचि माझा धर्म हेंचि माझें कर्म । हाचि नित्य नेम नाम तुझें ॥ ३ ॥
हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ । हेंचि जप ध्यान नाम तुझें ॥४॥
हेंचि माझें ज्ञान श्रवण मनन । हेंचि निजध्यासन नाम तुझें ॥ ५ ॥
हाचि कुळाचार हाचि कुळधर्म । हाचि नित्य नेम नाम तुझें ॥ ६ ॥
हा माझा आचार हा माझा विचार । हा माझा निर्धार नाम तुझें ॥ ७ ॥
तुका म्हणे दुजें सांगायासी नाहीं । नामेंविण कांहीं धन वित्त ॥ ८ ॥

२ अभंग.

आतां सर्वभावें हा माझा निर्धार । न करीं विचार आणिकांसी ॥ १ ॥
सर्व भावें नाम गाईन आवडी । सर्व माझी जोडी पाय तुझे ॥ २ ॥
लोटांगण तुझ्या घालीन अंगणीं । पाहीन भरोनी डोळे मुख ॥ ३ ॥
निर्लज्ज होऊनि नाचेन रंगणीं । येऊं नेदीं मनीं शंका कांहीं † ॥ ४ ॥
अंकित अंकिला दास तुझा देवा । संकल्प हा जीवा तुका म्हणे ॥५॥

---

† भावहीना आड येतसे आशंका । उचितासी चुका घालावया ॥ –गा. २०३४.३

३ अभंग.

काय ते विरक्ति नकळेचि आम्हां । जाणों एका नामा विठोबाच्या ॥ १ ॥
नाचेन मी सुखें वैष्णवांचे मेळीं । दिंडी टाळ घोळी आनंदें या ॥ १ ॥
शांति क्षमा दया तें मी काय जाणें । विठ्ठलकीर्तनेंवांचूनियां ॥ २ ॥
कासया एकांत सेवूं तया वना । आनंदें या जनांमाजी असों ॥ ३ ॥
कासया उदास होऊं देहावरी । अमृतसागरीं बुडोनियां ॥ ४ ॥
तुका म्हणे मज असे भरंवसा । विठ्ठल सरसा चालतसे ॥ ५ ॥

४ अभंग.

जप तप ध्यान नलगे धारणा । विठ्ठल कीर्तनामाजी उभा ॥ १ ॥
राहें माझ्या मना दृढ या वचनीं । आणिक तें मनीं न धरावें ॥ २ ॥
कीर्तनीं समाधि सधान ते मुद्रा । राहतील थारा धरोनियां ॥ ३ ॥
तुका म्हणे मुक्ति हरिदासांच्या घरीं । ओळगती चारी ऋद्धिसिद्धी॥ ४ ॥

५ अभंग.

आम्हांसी तों नाहीं आणीक प्रमाण । नामासी कारण विठोबाच्या ॥ १ ॥
घालूनियां कास करितो कैवाड । वागों नेदी आड कळिकाळासी ॥ २ ॥
अबुद्ध वांकुडें जैसें तैशापरी । वाचे हरि हरि उच्चारावें ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हां सांपडलें निज । सकळ हें बीज पुराणांचें ॥ ४ ॥

६ अभंग.

तुझ्या नामाची आवडी । आम्ही विठो तुझीं वेडीं ॥ १ ॥
आतां न वजों आणिका ठाया । गाऊं गीत लागों पायां ॥ २ ॥
काय वैकुंठ बापुडें । तुझ्या प्रेमसुखापुढें ॥ ३ ॥
संतसमागम मेळें । प्रेमसुखाचा सुकाळ ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुझ्या पायीं । जन्ममरणा ठाव नाहीं ॥ ५ ॥

भाग ५ वा.

ध्यानप्रकर्ष.

काया वाचा आणि मन । पुरुषें एकाग्र करून ।
जे जे वस्तूचें करी ध्यान । तद्रूप जाण तो होय ॥
—ए. भा. ९·२३६.

१ अभंग.

न करी स्मरण त्याचें गाढवपण । जळो तें श्रवण मननाविणें ॥ १ ॥
श्रवण करावें स्मरणीं आदरावें । मननीं राखावें निजध्यासा ॥ २ ॥
निजध्यासीं होय सहज साक्षात्कार । तुटे येरझार जन्मखेपा ॥ ३ ॥
देवनाथ ह्मणे स्मरणाचें फळ । अभागी केवळ नेणे मूर्ख ॥ ४ ॥

२ अभंग.

चिंतन चित्ताला । लावी मनाचे मनाला ॥ १ ॥
उन्मनींच्या सुखांत । पांडुरंग भेटी देत ॥ २ ॥
ऐसें आहे श्रेष्ठाचार । वेदशास्त्रींचा निर्धार ॥ ३ ॥
कौटाळुनी पोटीं । सेना ह्मणे सांगूं गोष्टी ॥ ४ ॥

३ अभंग.

ज्याचें जया ध्यान । तेंचि होय त्याचें मन ॥ १ ॥
ह्मणऊनी अवघें सारा । पांडुरंग दृढ धरा ॥ २ ॥
सम खूण ज्याचे पाय । उभा व्यापक विटे ठाय ॥ ३ ॥
तुका ह्मणे नभा । परता अणूचाही गाभा ॥ ४ ॥

४ अभंग.

पृथ्वी ध्यासी तरी पृथ्वीचि होसी । केशव न होसी अरे मना ॥ १ ॥
आप ध्यासी तरी आपचि होसी । केशव न होसी अरे मना ॥ २ ॥
वायु ध्यासी तरी वायुचि होसी । परि केशव न होसी अरे मना ॥ ३ ॥
आकाश ध्यासी तरी आकाशाचि होसी । परि केशव न होसी अरे मना॥४॥
नामा म्हणे जरी केशवासी ध्यासी । तरि केशवचि होसी अरे मना॥ ५ ॥

५ अभंग.

गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥ १ ॥
मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥
आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥
तुका म्हणे ओळी । जेवीं नुरेचि वेगळी ॥ ४ ॥

६ अभंग.

राम म्हणतां रामचि होइजे । पदीं बैसोन पदवी घेइजे ॥ १ ॥
ऐसें सुख वचनीं आहे । विश्वासें अनुभव पाहें ॥ २ ॥
रामरसाचिया चवी । आन रस रुचती केवीं ॥ ३ ॥
तुका म्हणे चाखोनी सांगें । मज अनुभव आहे अंगें ॥ ४ ॥

७ अभंग.

कृष्ण गातां गीतीं कृष्ण ध्यातां चित्तीं । तेही कृष्ण होती कृष्णध्यानें ॥१॥
आसनीं शयनीं भोजनीं जेवितां । म्हणा रे हा भोक्ता नारायण ॥ २ ॥
ओंविये दळणीं गावा नारायण । कांडितां कांडण, करितां काम ॥ ३ ॥
नर नारी याति हो कोणी भलती । भावें एका प्रीतीं नारायण ॥ ४ ॥
तुका म्हणे एका भावें भजा हरी । कांति ते दुसरी रूप एक ॥ ५ ॥


८ अभंग.

विठ्ठल गीतीं विठ्ठल चित्तीं । विठ्ठल विश्रांति भोग जया ॥ १ ॥
विठ्ठल आसनीं विठ्ठल शयनीं । विठ्ठल भोजनीं ग्रासोग्रासीं ॥ २ ॥
विठ्ठल जागृतिस्वप्नसुषुप्तीं । आन दुजें नेणती विठ्ठलेंविण ॥ ३ ॥
भूषण अळंकार सुखाचा प्रकार । विठ्ठलीं निर्धार जयां नरां ॥ ४ ॥
तुका म्हणे तेही विठ्ठलचि जाले । संकल्प मुराले दुजेपणें ॥ ५ ॥

---

१ भिंगुरटी कीटकीतें धरी । कोंडी भितीमाजिले घरीं । ते मरणभयें ध्यान करी । निरंतरीं भ्रमरीचें ॥ १ ॥ तेणें तीव्र ध्यानें ती कीटी । होऊनि ठाके भिंगुरटी । गगना चढे उठाउठी । प्रत्यक्ष दृष्टीं देखिजे ॥ २ ॥ —ए. भा. ९.२३९–२४०.

प्रकरण ४ थें.



संत.

देव तोचि संत संत तोच देव ।

भाग १ ला.



संतलक्षण.

१ ओंव्या.

जो सर्वां भूतांचे ठायीं । द्वेषातें नेणेचि कंहीं ॥
आपपर नाहीं । चैतन्या जैसा ॥ १ ॥
उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे ॥
हें कांहींचि नेणिजे । वसुंधा जेवीं ॥ २ ॥
कीं रायाचें देह चाळूं । रंका पैरौतें गाळूं ॥
हें न म्हणेचि कृपाळू । प्राणु पैं गा ॥ ३ ॥
गाईची तृषा हरूं । कां व्याघ्रा विष होऊनि मारूं ॥
ऐसें नेणेचि गा करूं । तोयँ जैसें ॥ ४ ॥
तैसी आर्घवियांचि भूतमात्रीं । एकपणें जया मैत्री ॥
कृपेसी धात्री । आपण जो ॥ ५ ॥
आणि मी हे भावँ नेणे । माझें कांहींचि न म्हणे ॥
सुखदुःख जाणणें । नाहीं जया ॥ ६ ॥

---

१ स्वकीय परकीय. २ पृथ्वी. ३ अथवा. ४ चालवूं, हालवूं ५ एकीकडे, दूर. ६ टाकूं ७ पाणी. ८ अवघ्या, सर्व. ९ पृथ्वी (आधार). १० बोली, वार्ता.

तेवींचि क्षमेलागीं[1] । पृथ्वीसी पवाँड[2] आंगीं ॥
संतोषा उत्संगीं[3] । दिधलें घर ॥ ७ ॥
वाँर्षियेवीण[4] सागर । जैसा जळें नित्य निर्भरें[5] ॥
तैसा निरुपचाँर[6] । संतोषी जो ॥ ८ ॥
वाऊँनि[7] आपली आण । धरी जो अंतःकरण ॥
निश्चया साचपण । जयाचेनि ॥ ९ ॥
जीव परमात्मा दोनी । बैसोनियां ऐक्यासनीं ॥
जयाचां हृदयभुवनीं । विराजती ॥ १० ॥
ऐसा योगसमृद्धि । होऊनि जो निरवधि ॥
अर्पी मनोबुद्धि । माझां ठायीं ॥ ११ ॥
आंत बाहिरि योग । निर्वाळलेंयाही चांगं[8] ॥
तरी माझा अनुरागं[9] । सप्रेम जया ॥ १२ ॥
अर्जुना गा तो भक्त । तोचि योगी तोचि मुक्त ॥
तो वलभौ[10] मी कांत[11] । ऐसा पैंढिये[12] ॥ १३ ॥
तरी सिंधूचेनि माजें[13] । जळचरां भय नुपजे ॥
आणि जळचरीं नुबजे[14] । समुद्र जैसा ॥ १४ ॥
किंबहुना पांडवा । शरीर जेसें अवेवां[15] ॥
तैसा नुबगे जीवां । जीवपणें[16] जो ॥ १५ ॥
जगचि देह जालें । म्हणौनि प्रियाप्रिय गेलें ॥
हर्षामर्ष[17] ठेले । दुजेनेंविण[18] ॥ १६ ॥

---

१ सहिष्णुतेविषयीं. २ योग्यता, बरोबरी. ३ मांडीवर. ४ वृष्टीवांचून. ५ पूर्ण भरलेला. ६ साधनावांचून. ७ वाहूनि. ८ सिद्ध झाल्यानंतर सुद्धां. ९ चांगला. १० प्रेम. ११ आवडती स्त्री. १२ पति. १३ आवडता होय. १४ क्षोभानें, गाजण्यानें १५ न कंटाळे. १६ अवयवां. १७ आपण जीव आहों असें मानून. १८ आनंद व क्रोध. १९ द्वैत किंवा दुजेपणा नसल्यामुळें.

जयाचां ठायीं पांडवा । अपेक्षे[1] नाहीं रिगावा ॥
सुखासि चढावा[2] । जयाचें असणें ॥ १७ ॥
शुचिशुचि गंगा होये । आणि पाप तापही जाये ॥
परि तेथ आहे । बुडणें एक ॥ १८ ॥
खोलिये पारु नेणिजे । तरी भक्तीं न बुडिजे ॥
रोकडाचि लाहिजे । न मरतां मोक्ष ॥ १९ ॥
आंतुबाहेरि चोखाळ[3] । सूर्य तैसा उजाळ ॥
आणि तत्वार्थीचा पायाळ[4] । देखणा जो ॥ २० ॥
व्यापकु[5] आणि उदासु[6] । जैसें कां आकाश ॥
तैसें जयाचें मानस । सर्वत्र गा ॥ २१ ॥
आणि कर्मारंभालागीं । जया अहंकृति नाहीं आंगीं ॥
जैसा निरिंधनु[7] आगी । विझोनि जाय ॥ २२ ॥
जो आत्मलाभासारिखें[8] । गोमटें[9] कांहींचि नेदखे ॥
म्हणौनि भोगविशेखें[10] । हरिखेना[11] जो ॥ २३ ॥
आपणचि विश्व जाला । तरि भेदभाव सहजचि गेला ॥
म्हणौनि द्वैष ठेला[12] । जया पुरुषा ॥ २४ ॥
पैं आपुलें जें साचें । तें कल्पांतीहीं न वचे[13] ॥
हें जाणोनि गतांचें[14] । न शोची जो ॥ २५ ॥
आणि जयापरौतें[15] कांहीं नाहीं । तें आपणचि आपुलां ठायीं ॥
जाला यालागीं जो कांहीं । आकांक्षीना ॥ २६ ॥

---

१ इच्छेस. २ चढ, भरती. ३ चोख, शुद्ध. ४ तत्वरूपी धनाला पहाणारा पायाळू. ५ सर्वत्र भरून राहणारें. ६ निरपेक्ष, अलिप्त. ७ लाकडांवांचून ८ आत्मज्ञानाच्या प्राप्तीसारखें. ९ चांगलें. १० विशेष प्रकारच्या विषयांच्या उपभोगानें. ११ हर्षना, आनंद पावत नाहीं. १२ नाहींसा झाला. १३ जात नाहीं. १४ गेलेल्याविषयीं.

वोखटें[1] कां गोमटें । हें कांहींचि तया नुमटे[2] ॥
राति दिवो न घटे[3] । सूर्यासि जेवीं ॥ २७ ॥
पार्था जयाचिया ठायीं । वैषम्यांची[4] वार्ता नाहीं ॥
रिपुमित्रा दोहीं । सरिसां[5] पाडुं ॥ २८ ॥
कां घरींचियां उजेडु करावा । पारखियां[6] अंधारु पाडावा ॥
हें नेणोंचि गा पांडवा । दीपु जैसा ॥ २९ ॥
जो खांडावया[7] घावो घाली । कां लावणी जेणें केली ॥
दोघां एकीचि साउली । वृक्ष दे जैसा ॥ ३० ॥
नातरी कां इक्षुदंडु । पाळतिंया गोडु ॥
गाळितया[8] कडु । नव्हेचि जेवीं ॥ ३१ ॥
अरिमित्रीं तैसा । अर्जुना तया भाव ऐसा ॥
मानापमानीं सरिसा । होत जाये ॥ ३२ ॥
तिहीं ऋतूं[9] समान । जैसें कां गगन ॥
तैसें एकचि मान । शीतोष्णीं जया ॥ ३३ ॥
दक्षिण उत्तर मारुता । मेरु जैसा पांडुसुता ॥
तैसा सुखें[10] दुःख प्राप्तां[11] । मध्यस्थ जो ॥ ३४ ॥
माधुर्यें[12] चंद्रिका । सरिसी रायारंकां ॥
तैसा जो सकळिकां । भूतां सम ॥ ३५ ॥
आघवेया जगा एक । सेव्य जैसें उदक ॥
तैसे जयातें तीन्ही[13] लोकें[14] । आकांक्षिती[15] ॥ ३६ ॥

---

१ वाईट. २ उमटत नाहीं, वाटत नाहीं. ३ घडे. ४ विषमतेची, भेदबुद्धीची. ५ सारखी योग्यता. ६ परक्यांस. ७ तोडण्यासाठीं. ८ ऊंस. ९ राखणारांस. १० चरकांत घालून रस काढणाराला. ११ ऋतूंत १२ सुखदुःखें प्राप्त झाली असतां. १३ आल्हादकपणानें. १४ शत्रु, मित्र, उदासीन हे तीन किंवा स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ. १५ इच्छितात.

जो निंदेतें ने घे । स्तुति न श्लाघे ॥
आकाशा न लगे । लेप जैसा ॥ ३७ ॥
तैसें निंदे आणि स्तुति । मान करूनि एके पंक्तीं ॥
विचरे प्राणँवृत्ति । जनीं वनीं ॥ ३८ ॥
जो यथालाभाचेनि तोखे । अलाभें न पारुखे ॥
पाउसेंवीण न सुके । समुद्र जैसा ॥ ३९ ॥
आणि वायूसि एके ठायीं । बिढॉर जैसें नाहीं ॥
तैसा न धरीचि कँहीं । आश्रय जो ॥ ४० ॥
आघवांचि आकाशस्थितीं । जेविं वायूसि नित्य वस्ती ॥
तेविं जगचि विश्रांति–। स्थान जया ॥ ४१ ॥
हें विश्वचि माझें घर । ऐसी मति जयाची स्थिर ॥
किंबहुना चराचर । आपण जाला ॥ ४२ ॥
ऐसा बोधचि केवळ । जो होऊनि असे निष्कँळ ॥
त्याहीवरी भजनशीळ । माझां ठायीं ॥ ४३ ॥
तरि तयाऐसें दुसरें । आम्हां पँढियंतें सोयरें ॥
नाहीं गा साचोकारें । तुझी आण पांडवा ॥ ४४ ॥
तो पाहावा हे डोहळे । म्हणौनि अचक्षुसी मज डोळे ॥
हातींचेनि लीलाकमळें । पूजूं तयातें ॥ ४५ ॥
दोंवरी दोन्ही । भुजा आलों घेउनी ॥
आलिंगावयालागौनी । तयाचें आंग ॥ ४६ ॥
तयासंगाचेनि सुँखाडें । मज विदेहा देह धरणें घडे ॥
किंबहुना आवडे । निरुपम ॥ ४७ ॥

---

१ ओळीस. २ प्राण राहतील अशा प्रकारानें. ३ संतोष पावतो. ४ दुःखी होत नाहीं. ५ राहणें, वस्ती. ६ कोठें. ७ निष्कलंक, पूर्ण शुद्ध. ८ प्रिय, आवडतें. ९ खरेपणानें, खरोखर. १० सुखाकरितां.

१ पद.

ते मज निरवधि आवडती । भक्त महा सुकृति ॥
कायावाचामानस अर्पुनि जे मजला भजती ॥ ध्रु० ॥
ज्यांच्या पादरजें गा अद्भुत ब्रह्मांड विरजें ॥
व्हावीं, यास्तव त्यांमागें मी चालें पादगती ॥ ते० ॥ १ ॥
दोंवरि दोन्ही भुजा घेउनी आलों या काजा ॥
कीं कवळावें अंग तयांचें हृदयीं चौंहातीं ॥ ते० ॥ २ ॥
श्रीसद्गुरुच्या बोलें विश्वीं मजला ओळखिलें ॥
नित्य अनंत अनामय त्या मज स्वमनीं सांठविती ॥ ते० ॥ ३ ॥

२ अभंग.

माझे§ भक्त मज अनुसरले चित्तें । त्यांहूनि पंढियंतें मज आणीक नाहीं ॥१॥
व्यक्ती येणें मज तयांचिये आवडी । युगायुगीं प्रौढी होचि मिरवीं ॥ २ ॥
त्यांचेनी कृताथ असें मी पूर्णकाम । ते माझे परम प्राणसखे ॥ ३ ॥
ते माझे आश्रमी मी त्यांचा विश्राम । जिहीं रूप नाम केलें मज ॥ ४ ॥
मी त्यांचा सोयरा ते माझे सांगाती । करीं त्या एकांतीं सुखगोष्टी ॥ ५ ॥
जिहीं तनु-मन-प्राण लाविला मजकडे । मी तयां आवडे जीवाहूनी ॥ ६ ॥
ते माझे भाग्याचे अधिकारी विभागी । वैकुंठ त्यांलागीं वसतें केलें ॥ ७ ॥
त्यांचें गुजगौप्य मीचि एक जाणें । माझी प्रेमखूण कळली तयां ॥ ८ ॥
मनाची साउली करूनियां मातें । भोगिती आतां ते सर्वसुख ॥ ९ ॥
आपुलियाची किरणें विराजे गभस्ती । परी किरण न होती आन जेवीं ॥१०॥
तैसे माझे दास मजमाजी उदास । असती समरस दुजेनविण ॥ ११ ॥
मी तो भक्तरूप भक्त माझें स्वरूप । प्रभा आणि दीप जयापरी ॥ १२ ॥
हे खुण अनुभवी जाणती ते ज्ञानी । ज्यां नाहीं आयणी कासयाची ॥१३॥
त्यांचिया चरणींचें रज माझें नाम । जें सांडिलें रजतमें सत्वशीळ ॥१४॥
त्यांचे भेटीलागीं हृदय कळवळे । कैं दरवन डाळ निवती माझे ॥ १५ ॥

---

१ अत्यंत. § हा अभंग नामदेवकृत तीर्थावळींतील आहे.

४ ओंव्या.

आतां वंदीन सज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान ॥
जयांचेनि गुह्य ज्ञान । प्रगटे जनीं ॥ १ ॥
जे वस्तु परम दुर्लभ । जयेचा अलभ्य लाभ ॥
तेचि होये सुलभ । संतसंगेंकरूनी ॥ २ ॥
जेथें परीक्षावंत ठकले । नातरी डोळसचि अंध जाले ॥
पाहात असतांचि चुकले । निज वस्तूसी ॥ ३ ॥
जेथें आक्षेप आटले । जेथें प्रेत्न पस्तावले ॥
जेथें तर्क मंदावले । तार्किंतां निजवस्तूसी ॥ ४ ॥
वळे विवेकाची वेगडी । पडे शब्दाची बोबडी ॥
जेथें मनाची तांतडी । कामा नये ॥ ५ ॥
तेचि वस्तु संतसंगें । स्वानुभवें कळों लागे ॥
त्याचा महिमा वचनीं सांगे । ऐसा कवणु ॥ ६ ॥
संत आनंदाचें स्थळ । संत सुखचि केवळ ॥
नाना संतोषांचें मूळ । ते हे संत ॥ ७ ॥
संत विश्रांतीची विश्रांती । संत तृप्तीची निजतृप्ती ॥
नातरी भक्तीची फळश्रुती । ते हे संत ॥ ८ ॥
संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें भांडार ॥
नातरी बोलिजे माहेर । सायोज्यमुक्तीचें ॥ ९ ॥
जें त्रैलोक्याहून वेगळें । जें वेदश्रुतीसी नाकळे ॥
तेंचि जयांचेनि वोळे । परब्रह्म अंतरीं ॥ १० ॥
ऐसी संतांची महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा ॥
जयांचेनि मख्य परमात्मा । प्रगट होये ॥ ११ ॥

५ ओंव्या.

ऐका साधूचीं लक्षणें ॥

जेणें समाधान बाणे । साधकाआंगीं ॥ १ ॥
स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें कैंची उरेल कामना ॥
म्हणौनियां साधुजना । कामाचि नाहीं ॥ २ ॥
कल्पिला विषयो हातींचा जावा । तेणें गुणें क्रोध यावा ॥
साधुजनांचा अक्षै ठेवा । जाणार नाहीं ॥ ३ ॥
म्हणोनि ते क्रोधरहित । जाणती स्वस्वरूप संत ॥
नासिवंत हे पदार्थ । सांडूनियां ॥ ४ ॥
जेथें नाहीं दुसरी परी । क्रोध यावा कोणावरी ॥
क्रोधरहित चराचरीं । साधुजन वर्तती ॥ ५ ॥
आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद ॥
याकारणें वादवेवाद । तुटोनि गेला ॥ ६ ॥
साधु स्वरूप निर्विकार । तेथें कैंचा तिरस्कार ॥
आपला आपण मत्सर । कोणावरी करावा ॥ ७ ॥
साधु वस्तु अनायासें । याकारणें मत्सर नसे ॥
मदमत्सरांचें पिसें । साधुसी नाहीं ॥ ८ ॥
साधु स्वरूप स्वयंभ । तेथें कैंचा असेल दंभ ॥
जेथें द्वैताचा आरंभ । जालाची नाहीं ॥ ९ ॥
अवघें ब्रह्मांड त्याचें घर । पंचभूतिक हा जोजार ॥
मिथ्या जाणोनि सत्वर । त्याग केला ॥ १० ॥
याकारणें लोभ नसे । साधु सदा निर्लोभ असे ॥
जयाची वासना समरसे । शुद्ध स्वरूपीं ॥ ११ ॥
आपला आपण आघवा । शोक कोणाचा करावा ॥
म्हणोनि साधु तो जाणावा । शोकरहित ॥ १२ ॥

दृश्य सांडूनि नासिवंत । स्वरूप सेविलें शाश्वत ॥
याकारणें शोकरहित । साधु जाणावा ॥ १३ ॥
शोकें दुखवावी वृत्ती । तरी ते झाली निवृत्ती ॥
म्हणौनि साधु आदिअंतीं । शोकरहित ॥ १४ ॥
मोहें झळंबावें मन । तरी तें मनचि झालें उन्मन ॥
याकारणें साधुजन । मोहातीत ॥ १५ ॥
साधु वस्तु अद्वये । तेथें कैंचें वाटेल भये ॥
परब्रह्म तें निर्भये । तोचि साधू ॥ १६ ॥
याकारणें भयातीत । साधु निर्भय निवांत ॥
सकळांस मांडेल अंत । साधु अनंतरूपी ॥ १७ ॥
सत्यस्वरूपें अमर जाला । भये कैंचें वाटेल त्याला ॥
याकारणें साधुजनाला । भयेचि नाहीं ॥ १८ ॥
जेथें नाहीं द्वन्द्वभेद । आपला आपण अभेद ॥
तेथें कैंचा उठेल खेद । देहबुद्धीचा ॥ १९ ॥
बुद्धीनें नेमिलें निर्गुणा । त्यास कोणीच नेईना ॥
याकारणें साधुजना । खेदचि नाहीं ॥ २० ॥
आपण येकला ठाईचा । स्वार्थ करावा कोणाचा ॥
दृश्य नसतां स्वार्थाचा । ठावचि नाहीं ॥ २१ ॥
साधु आपणाचि येक । तेथें कैंचा दुःख शोक ॥
दुजेविण अविवेक । येणार नाहीं ॥ २२ ॥
आशा धरितां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची ॥
म्हणोन नैराश्यता साधूची । वोळखण ॥ २३ ॥
मृदुपणें जैसें गगन । तैसें साधूचें लक्षण ॥
याकारणें साधुवचन । कठीण नाहीं ॥ २४ ॥
स्वरूपाचा संयोगीं । स्वरूपाचि जाला योगी ॥
याकारणें वीतरागी । निरंतर ॥ २५ ॥

स्थिति बाणतां स्वरूपाची । चिंता सोडिली देहाची ॥
याकारणें होणाराची । चिंता नसे ॥ २६ ॥
स्वरूपीं लागतां बुद्धी । तुटे अवघी उपाधी ॥
याकारणें निरोपाधी । साधुजन ॥ २७ ॥
साधु स्वरूपींच राहे । तेथें संगाचि न साहे ॥
म्हणोनि साधु तो न पाहे । मानापमान ॥ २८ ॥
स्वरूपीं न साहे मळ । म्हणौन साधु तो निर्मळ ॥
साधु स्वरूपचि केवळ । म्हणोनियां ॥ २९ ॥
सकळ धर्मांमध्यें धर्म । स्वरूपीं राहाणें हा स्वधर्म ॥
हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें ॥ ३० ॥

६ अभंग.

तेचि संत तेचि संत । ज्यांचा हेतु विठ्ठलीं ॥ १ ॥
नेणती कांहीं टाणेटोणे । नामस्मरणेंवांचूनी ॥ २ ॥
काया वाचा आणि मनें । धाले चिंतनें डुल्लती ॥ ३ ॥
निळा म्हणे विरक्त देहीं । आठवचि नाहीं विषयांचा ॥ ४ ॥

७ अभंग.

वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ॥ १ ॥
नाहीं आणीक प्रमाण । तन धन तृण जन ॥ २ ॥
पडतां जड भारी । नेमा न टळे निर्धारीं ॥ ३ ॥
तुका म्हणे यातीं । हो कां तयाची भलती ॥ ४ ॥

८ अभंग.

भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाश निवारूनि ॥ १ ॥
विषय तो त्यांचा जाला नारायण † । नावडे जन धन माता पिता ॥२॥

† भक्तांचें विषयीं नाहीं चित्त । त्यांचा विषय तो मी भगवंत ॥
—ए. भा. ११.६६३.

निर्वाणीं गोविंद असे मागें पुढें । कांहींच सांकडें पडों नेदी ॥ ३ ॥
तुका म्हणे सत्य कर्मा व्हावें साह्य । घातलिया भय नरका जाणें ॥४॥

९ अभंग.

तेचि एक संत जाणा । नारायणा आवडती ॥ १ ॥
पांडुरंगावांचुनि कांहीं । न जाणे पाहीं दुसरें ॥ २ ॥
मुखीं नाम अमृतवाणी । धाले मनीं डुल्लती ॥ ३ ॥
सेना म्हणे पायीं माथा । त्यांच्या आतां ठेविला ॥ ४ ॥

१० अभंग.

शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥
मुखीं अमृताची वाणी । देह देवाचे कारणीं ॥ २ ॥
सर्वांग निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ॥ ३ ॥
तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती † ॥ ४ ॥

११ अभंग.

अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळां माळ असो नसो ॥ १ ॥
आत्माअनुभवीं चोखाळिल्या वाटा । त्याचे माथां जटा असो नसो ॥ २ ॥
परस्त्रीचे ठायीं जो कां नपुंसक । त्याच्या अंगा राख असो नसो ॥ ३ ॥
परद्रव्या अंध निंदेसी जो मूका । तोची संत देखा तुका म्हणे ॥ ४ ॥

१२ अभंग.

चंदनाचे हात पायही चंदन । परिसा नाहीं हीन कोण अंग ॥ १ ॥
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगें साकर अवघी गोड ॥ २ ॥
तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पाहतां अवगुण मिळेचिना ॥ ३ ॥

---

† वनवासामधील अरण्यांतली स्थिति आपल्या बहिणीस सांगतांना रामासंबंधानें सीता म्हणत्ये—जेव्हां राहीं वाटे चालतां मी मागें । मुरडोनी मागें विलोकिती ॥१॥ बाई काय सांगों स्वामींची ती दृष्टी । अमृताची वृष्टि मज होय ॥ २ ॥
—मोरोपंत (सीतागीत).

१३ अभंग.

गंगाजळा पाहीं पाठी पोट नाहीं । अवगुण तो कांहीं अमृतासी ॥ १ ॥
रवि दीप काळिमा काय जाणे हिरा । आणिका तिमिरा नाश तेणें ॥ २ ॥
कर्पूरकांडणीं काय कोंडा कणी । सिंधू मिळवणीं काय चाले[1] ॥ ३ ॥
परिसें[2] चिंतामणि आणिकांच्या गुणीं । पालटे लागोनि नव्हे तैसा ॥ ४ ॥
तुका म्हणे तैसे जाणा संतजन । सर्वत्र संपूर्ण गगन जैसें ॥ ५ ॥

१४ अभंग.

समुद्र क्षोभे वेळोवेळीं । योगिया क्षोभेना कोण्हाकाळीं ॥ १ ॥
समुद्रा भरतें पर्वसंबंधें । योगी परिपूण परमानंदें ॥ २ ॥
समुद्र सर्वदा तो क्षार । तैसा नव्हे योगीश्वर ॥ ३ ॥
समुद्रीं वरुषतां घन । जीवनीं मिळतसे जीवन ॥ ४ ॥
योगियांची योगस्थिति । सदा परमार्थ भक्ति ॥ ५ ॥
एका जनार्दनीं शरण । योगियांचें जें योगचिन्ह ॥ ६ ॥

१५ अभंग.

जन्मतां शरीर न जन्मों आपण । ऐसें जाणती पूर्ण तेची योगी ॥ १ ॥
वाढतां शरीर न वाढे आपण । ऐसें जाणे पूर्ण तोची योगी ॥ २ ॥
मरतां शरीर न मरे आपण । ऐसें जाणे पूर्ण तोची योगी ॥ ३ ॥
देशेंकाळेंवीण माझा मी आपण । ऐसें जाणे पूर्ण तोची योगी ॥ ४ ॥
केशव म्हणे सहजीं सहज मी आपण । ऐसें जाणे पूर्ण तोची योगी ॥ ५ ॥

१६ अभंग.

हिरा ठेवितां ऐरणीं । घांचे मारितां जो घणीं ॥ १ ॥
तोचि मोल पावे खरा । करणीचा[3] होय चुरा ॥ २ ॥

---

१ निरनिराळीं उदकें समुद्रास मिळतात तरी समुद्रपणांत (क्षारत्वादि गुणधर्मांत) कांहीं भेद पडतो काय ?—न. २ परिस आणि चिंतामणी हे दुसऱ्या कोणाच्याहि स्पर्शानें बदलत नाहींत. —जो. गा. ११९४. ३ टिके, न फुटे. ४ कृत्रिम हिऱ्याचा. बनावट हिऱ्याचा घणाच्या घावाबरोबर चुरा होतो.

मोहरा होय तोची अंगें । सूत न जळे ज्याच्या संगें ॥ ३ ॥
तुका म्हणे तोची संत । सोशी जगाचे आघात ॥ ४ ॥

१७ अभंग.

मस्तकीं साहावें टांकियांसी जाण । तेव्हां देवपण भोगावें गा ॥ १ ॥
आपुलिये स्तुति निंदा अथवा मान । टाकावा थुंकोन पैलीकडे ॥ २ ॥
सद्गुरुसेवन तेंचि अमृतपान । करूनी प्राशन बैसावें गा ॥ ३ ॥
आपुल्या मस्तकीं पडोत डोंगर । सुखाचें माहेर टाकूं नये ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां सांगूं तुला किती । जिण्याची फजिती करूं नये ॥ ५ ॥

१८ अभंग.

संत जेणें व्हावें । तेणें जगबोलणें सोसावें ॥ १ ॥
तरीच अंगीं थोरपण । जया नाहीं अभिमान ॥ २ ॥
थोरपण जेथें वसे । भूतदया तेथें असे ॥ ३ ॥
रागें निंदावें कोणासी । आपण ब्रह्म सर्वदेशीं ॥ ४ ॥
ऐसी सम दृष्टि करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ५ ॥

१९ अभंग.

देवाची पूजा हे भूतांचें पाळण । मत्सर तो सीण बहुतांचा ॥ १ ॥
रुसावें फुगावें आपुलियावरी । उरला तो हरी सकळही ॥ २ ॥
तुका म्हणे संतपण याचि नांवें । जरि होय जीव सकळांचा ॥ ३ ॥

२० अभंग.

तरी संत म्हणवावें । नेणे आपुलें परावें ॥ १ ॥
भूतमात्रीं हरीवीण । न पाहेचि दुजेपण ॥ २ ॥
प्रेम अंतरीं निःसीम । मुखीं ज्याचे रामनाम ॥ ३ ॥
तुका म्हणे देहभाव । संतीं सोडियेला गांव† ॥ ४ ॥

---

१ सर्पाच्या फडेंतील मणि. ह्याला सूत गुंडाळून तो अग्नींत टाकिला असतां सूत जळत नाहीं अशी आख्यायिका आहे. —नवनीत.

† १ देहभाव सर्व जाय । तेव्हां विदेहीसुख होय ॥ —जनाबाई.

२ देहीं वर्तमान असतां । देहबुद्धि नाहीं सर्वथा । त्यासीच बोलिजे जीवन्मुक्तता ।
—ए. भा. ११. ४५६.

११ अभंग.

नमस्कारी भूतें विसरोनि यातीं । तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥ १ ॥
परउपकारीं वेंचियेल्या शक्ती । तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥ २ ॥
द्वैताद्वैतभाव नाहीं जया चित्तीं । तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥ ३ ॥
जयाचिये वाचे नये निंदास्तुती । तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥ ४ ॥
उचित अनुचित जाणे धर्मनीती । दृढ भाव भक्ति मानव तो ॥ ५ ॥
तुकयाबंधु म्हणे वरकड ते येर । संसाराचे खर भारवाही ॥ ६ ॥

१२ अभंग.

दास झालों हरिदासांचा । बुद्धिकायमनेंवाचा ॥ १ ॥
तेथें प्रेमाचा सुकाळ । टाळमृदंगकल्लोळ ॥ २ ॥
नासे दुष्ट बुद्धि सकळ । समाधि हरिकीर्तनीं ॥ ३ ॥
ऐकतां हरिकथा । भक्ति लागे त्या अभक्तां ॥ ४ ॥
देखोनि कीर्तनाचा रंग । कैसा उभा पांडुरंग ॥ ५ ॥
हें सुख ब्रह्मादिकां । नाहीं नाहीं म्हणे तुका † ॥ ६ ॥

१३ अभंग.

चिंता नाहीं गांवीं विष्णुदासांचिये । घोष जयजयकार सदा ॥ १ ॥
नारायणा घरीं सांठविलें धन । अवघेचि वाण तया पोटीं †† ॥ २ ॥
सवंग सकळां पुरे धरणीवरी । सेवावया नर-नारी-बाळां ॥ ३ ॥
तुका म्हणे येणें आनंदी आनंदु । गोविंदें गोविंदु पिकविला ॥ ४ ॥

१४ अभंग.

भक्तीचें तें वर्म जयाचिये हातीं । तया घरीं शांति क्षमा दया ॥ १ ॥
अष्ट महासिद्धि वोळगती द्वारीं । न वजती दूरी दवडितां ॥ २ ॥

---

† सोलींव जें सुख अतिसुखाहूनी । उभें तें अंगणीं वैष्णवांच्या ॥ —तु.

†† सांठविला हरी । जींहीं हृदयमंदिरीं ॥ १ ॥ त्यांची सरली वेरझार ।
जाला सफळ व्यापार ॥ २ ॥ हरी आला हाता । मग कैंची भय चिंता ॥ ३ ॥—तु.

तेथें दुष्ट गुण न मिळे निःशेष । चैतन्याचा वास झाला माजी ॥ ३ ॥
संतुष्ट हें चित्त सदा सर्वकाळ । तुटली हळहळ त्रिगुणांची ॥ ४ ॥
तुका म्हणे त्याचा देव सर्व भार । चालवी कामार होउनीयां ॥ ५ ॥

२५ अभंग.

संतांचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ॥ १ ॥
तेथें मी राहीन होऊनि याचक । घालितील भीक तेचि मज ॥ २ ॥
संतांचिये गांवीं वरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥ ३ ॥
संतांचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्व काळ ॥ ४ ॥
संतांचा उदीम उपदेशाची पेंठ । प्रेमसुख साटीं घेती देती ॥ ५ ॥
तुका म्हणे तेथें आणिक नाहीं परी । म्हणोनि भिकारी झालों त्यांचा ॥ ६ ॥

२६ श्लोक.

परिचरितव्याः सन्तो यद्यपि कथयन्ति नो सदुपदेशम् ।
यास्तेषां स्वैरकथास्ता एव भवन्ति शास्त्राणि * ॥ १ ॥

२७ अभंग.

सदा संतांपाशीं जावें । त्यांचे जवळी बैसावें ॥ १ ॥
उपदेश ते न देती । तरी ऐकाव्या त्या गोष्टी ॥ २ ॥
तेचि उपदेश होती । त्यांहीं कष्ट नष्ट होती ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे संत । संगें करिती पसंत † ॥ ४ ॥

---

* अर्थासाठीं पुढील २८ वा अभंग पहा.

† *Cf.* We cannot look however imperfectly upon a great man without gaining something by him. He is the living light-fountain which it is good and pleasant to be near.

महानुभाव मनुष्याकडे सहज ओझरती जरी नजर गेली तरी त्यापासून आपणास थोडा तरी लाभ झाल्याशिवाय राहणार नाहीं. असा मनुष्य म्हणजे ज्ञानाची केवळ मूर्तीच होय. त्याचा सहवास केव्हांहि हृदयाल्हादक व उन्नतिकारक असतो.

—कार्लाइल् (हिरोज् १).

२८ अभंग.

घेसी तरी घेई संतांची हे भेटी । आणीक ते गोष्टी नको मना ॥ १ ॥
सर्वभावें त्यांचें देव भांडवल । आणीक ते बोल न बोलती ॥ २ ॥
करसील तो करीं संतांचा सांगात । आणीक ते मात नको मना ॥ ३ ॥
बैससील तरी बैस संतांमधीं । आणीक ते बुद्धि नको मना ॥ ४ ॥
जासी तरी जाई संतांचिया गांवा । होईल विसावा तेथें मना ॥ ५ ॥
तुका म्हणे संत सुखाचे सागर । मना निरंतर धणी घेई ॥ ६ ॥

२९ अभंग.

कांय वाणूं मी या संतांचे उपकार । मज निरंतर जागवीती ॥ १ ॥
काय द्यावें यांसीं घ्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥ २ ॥
सहज बोलणें हित उपदेश । धरूनि सायास शिकवीती ॥ ३ ॥
तुका म्हणे वत्स धेनुचिया चित्तीं । तैसे मज येती सांभाळीत ॥ ४ ॥

३० अभंग.

उदार तुम्ही संत । मायबाप कृपावंत ॥ १ ॥
केव्हडा केला उपकार । काय वाणूं मी पामर ॥ २ ॥
जड जीवां उद्धार केला । मार्ग दाविला सुपंथ ॥ ३ ॥
सेना म्हणे उतराई । होतां कांहीं दिसेना ॥ ४ ॥

३१ अभंग.

ब्रह्ममूर्ति संत जगा अवतरले । उद्धराया आले दीन जनां ॥ १ ॥
ब्रह्मादिक त्यांचें वंदिती पायवणी । नाम घेतां वदनीं दोष जाती ॥२॥
हो कां दुराचारी विषयीं आसक्त । संतकृपें त्वरित उद्धरतो ॥ ३ ॥
अखंडित नामा त्यांची वाट पाहे । निशिदिनीं ध्याये सत्संगती ॥ ४ ॥

३२ अभंग.

तुम्ही संत मायबाप कृपावंत । काय मी पतित कीर्ति वाणूं ॥ १ ॥
अवतार तुम्हां धराया कारण । उद्धराव्े जन जड जीव ॥ २ ॥

वाढवाया सुख भक्ति भाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे गुंण चंदनाचे अंगीं । तैसे तुम्ही जगीं संत जन ॥ ४ ॥

३३ अभंग.

काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥
थोरीव सांडिली आपुली परिसें । नेणे शिवों कैसें लोखंडासी ॥ २ ॥
जगाच्या कल्याणां संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारें† ॥ ३ ॥
तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ॥ ४ ॥

३४ अभंग.

जे कां रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले ॥ १ ॥
तोचि साधू ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त†† ॥ ३ ॥
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥
दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥
तुका म्हणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥

३५ अभंग.

दुसरियाचे दुःखें शिणे ज्याचें चित्त । तोचि एक संत ओळखावा ॥ १ ॥
तयासी पुसतां हरील तो शीण । दुःख घे हिरोन रोकडेंची ॥ २ ॥
परोपकार जया आलासे विभागी । शांती हे सर्वांगीं डोलतसे ॥ ३ ॥
बहेणि म्हणे नाहीं आपुलें पारिखें । वर्ततो विवेकें ज्ञानदृष्टी ॥ ४ ॥

---

† स्वार्थो यस्य पराथ एव स पुमानेकः सतामग्रणीः । परार्थ हाच ज्याचा स्वार्थ झाला तोच पुरुष साधूंमध्यें श्रेष्ठ होय. —भर्तृहरि २.

†† सज्जनस्य हृदयं नवनीतं यद्वदन्ति कवयस्तदलीकम् । अन्यदेहविलसत्परितापात्सज्जनो द्रवति नो नवनीतम् ॥ १ ॥ साधु लोकांचें हृदय लोण्याप्रमाणें (मृदु) असतें असें जें कवी म्हणतात तें खोटें आहे; कारण दुऱ्यासच्या शरीरास जाळणाऱ्या तापानें साधु द्रवतो पण लोणी कांहीं द्रवत नाहीं !

३६ अभंग.

धन्य ते संसारीं । दयावंत जे अंतरीं ॥ १ ॥
येथें उपकारासाठीं । आले; घर ज्यां वैकुंठीं ॥ २ ॥
लटिकें वचन । नाहीं; देहीं उदासीन ॥ ३ ॥
मधुरा वाणी ओठीं । तुका म्हणे वाव पोटीं ॥ ४ ॥

३७ अभंग.

ब्रह्मरसगोडी तयांसी फावली । वासना निमाली सकळ ज्यांची ॥ १ ॥
नाहीं त्या विटाळ अखंड सोंवळीं । उपाधिवेगळीं जाणिवेच्या ॥ २ ॥
मन हें निश्चळ झालें एके ठायीं । तया उणें काई निजसुखा ॥ ३ ॥
तींचि पुण्यवंतें परउपकारी । प्रबोधी त्या नारी नर लोकां ॥ ४ ॥
तुका म्हणे त्यांचे पायीं पायपोस । होऊनियां वास करिन तेथें ॥ ५ ॥

३८ अभंग.

भल्याचें कारण सांगावें स्वहित । जैसी कळे नीत आपणासी † ॥ १ ॥
परी आम्ही असों एकाचिये हातीं । नाचवितो चित्तीं त्याचे तैसें ॥ २ ॥
वाट सांगे त्याच्या पुण्या नाहीं पार । होती उपकार अगणित †† ॥ ३ ॥
तुका म्हणे तुम्ही बहु कृपावंत । आपुलें उचित केलें संतीं ॥ ४ ॥

३९ अभंग.

मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥ १ ॥
मेलों जित असों निजोनियां जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥२॥
भले तरी देऊं ×× ची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊं माथां ॥ ३ ॥
मायबापाहूनि बहु मायावंत । करूं घातपात शत्रुहूनि ॥ ४ ॥

---

† जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें । शाहाणे करूनि सोडावे । बहुत जन ॥ १ ॥ —दासबोध १९.१०.१४.

†† चुकल्या जनासि कोणी सांगुनि निजहितपथासि जो लावी । धनदेंहि उपकृतीशीं त्याच्या निजसंपदा न तोलावी ॥ १ ॥ —मोरोपंत.

अमृत तें काय गोड आम्हांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥ ५ ॥
तुका म्हणे आम्ही अवघेची गोड । ज्याचें पुरे कोड त्याचे परी ॥ ६ ॥

४० अभंग.

प्रेम देवाचें देणें । देहभाव जाय जेणें ॥
न धरावी मनें । शुद्धी देशकाळाची ॥ १ ॥
मुक्त लज्जाविरहित । भाग्यवंत हरिभक्त ॥
जाले वोसंडत । नामकीर्ति पवाडे ॥ २ ॥
जोडी जाली अविनाश । जन्मोनि जाले हरिचे दास ॥
त्यांस नव्हे गर्भवास । परब्रह्मीं सौरस ॥ ३ ॥
हेचि वाहाती संकल्प । पुण्य प्रसंगाचे जप ॥
तुका म्हणे पाप । गांवीं नाहीं हरिजनां ॥ ४ ॥

४१ अभंग.

तुका वेडा अविचार । करी बडबड फार ॥ १ ॥
नित्य वाचे हाचि छंद । राम कृष्ण हरि गोविंद ॥ २ ॥
धरी पांडुरंगीं भाव । आणिक नेणे दुजा देव ॥ ३ ॥
गुरुज्ञान सर्वी ठायीं । दुजें न विचारी कांहीं ॥ ४ ॥
बोल नाईके कोणाचे । कथे नागवाचि नाचे ॥ ५ ॥
संगउपचारें कांटाळे । सुखें भलते ठायीं लोळे ॥ ६ ॥
कांहीं उपदेशिलें नेणे । वाचे विठ्ठल विठ्ठल म्हणे ॥ ७ ॥
केला बहुतीं फजित । तरी हेंचि करी नित्य ॥ ८ ॥
अहो पंडित जन । तुका टाकावा थुंकोन ॥ ९ ॥

४२ अभंग.

वैष्णवांसंगतीं सुख वाटे जीवा । आणिक मी देवा कांहीं नेणें ॥ १ ॥
गायें नाचें उडें आपुलिया छंदें । मनाच्या आनंदें आवडीनें ॥ २ ॥

लाज भय शंका दुराविला मान । न कळे साधन यापरतें ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां आपुल्या सायासें । आम्हां जगदीशें सांभाळावें । ४ ॥

४३ अभंग.

नाचें टाळी पिटीं । प्रेमें अंग धरणीं लोटीं ॥ १ ॥
माझे सखे ते सज्जन । भोळे भाविक हरिजन ॥ २ ॥
न धरिती लाज । नाहीं जनासवें काज ॥ ३ ॥
तुका म्हणे दाटे । कंठ; नेत्रीं जळ लोटे ॥ ४ ॥

४४ अभंग.

नलगे चंदना सांगावा परिमळ । वनस्पतिमेळ हाकारूनी † ॥ १ ॥
अंतरींचें धांवे स्वभावें बाहेरी । धरितांही परी आवरेना ॥ २ ॥
सूर्य नाहीं जागें करीत या जना । प्रकाश किरणा कर म्हूणें ॥ ३ ॥
तुका म्हणे मेघ नाचवी मयूरें । लपवितां खरें येत नाहीं ॥ ४ ॥

४५ पद.

तो नर भला भला रे भला भला ।
प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला ॥ ध्रु० ॥
माता पिता गण गोत बायको । आपण नामरूपांत नायको ॥
श्रवणीं वेद पुराण आयको । गर्व जयाचा गेला ॥ तो नर० ॥ १ ॥
संतति संपति पुष्कळ भारी । चतुर्विद्येचा कारभारी ॥
परमार्थाची ध्वजा उभारी । संशय ज्याचा गेला ॥ तो नर० ॥२॥
अंतरिं ज्ञान विरक्ती धरितो । बाहेर सोंग संपादणि करितो ॥
जिवें जितें मोक्षासी वरितो । भक्तिस फार भुकेला ॥ तो नर०॥३॥

---

† न हि कस्तूरिकामोदः शपथेन प्रकाश्यते । कस्तूरीच्या सुवासाला शपथेचा पुरावा लागत नाही !

१ हाका मारून. २ हे किरणा, या जनां तूं प्रकाश कर म्हणून कांहीं सूर्य किरणांस जागें करीत नाहीं.

भजन पूजन सत्पात्रीं जाणें । शिवदिन याविण कांहिंच नेणे ॥
नादें उद्बोधार्थ सुखानें । केसरि गुरुचा चेला ॥ तो नर० ॥ ४ ॥

४७ अभंग.

नाहीं संतपण मिळत हें हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ॥ १ ॥
न ये मोल देतां धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ॥ २ ॥
तुका म्हणे मिळे जिवाचिये साठीं । नाहीं तरी गोष्टी बोलूं नये ॥ ३ ॥[1]

एकान्तवास.

१ अभंग.

वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षीही सुस्वरें आळवीती ॥ १ ॥
येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुण दोष अंगा येत ॥ २ ॥
आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करी ॥ ३ ॥
कथा कमंडलु देहउपचारा । जाणवितो वारा अवसर ॥ ४ ॥
हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची ॥ ५ ॥
तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुलाचि वाद आपणांसी ॥ ६ ॥

१ श्लोक.

शय्या शैलशिला, गृहं गिरिगुहा, वस्त्रं तरूणां त्वचः, ।
सारङ्गाः सुहृदो, ननु क्षितिरुहां वृत्तिः फलैः कोमलैः, ॥
येषां नैर्झरमम्बुपानमुचितं, रत्यै च विद्याङ्गना, ।
मन्ये ते परमेश्वराः शिरसि यैर्बद्धो न सेवाञ्जलिः* ॥ १ ॥

---

१ हरीला आपला जीव अर्पण करण्यांत तें संतपण मिळत असतें. अशी जर स्थिति नसेल तर संतपणाची गोष्ट बोलूंही नये. —जो. गा. ६७७.

* पर्वतावरील शिला हें ज्यांचें आंथरूण, डोंगरांतील गुहा हें ज्यांचें घर, झाडांच्या साली हें वस्त्र, हरिण हे मित्र, वृक्षांचीं सुंदर फळें हें खाणें, पिण्यास झऱ्याचें पाणी आणि उपभोगार्थ विद्यारूपी स्त्री असें असून ज्यांनीं (सेवक या नात्यानें धन्यास प्रणाम करण्यासाठीं) मस्तकावर हात जोडले नाहींत ते खरोखर धन्य होत. —भर्तृहरि ३१

३ श्लोक.

महीं रम्या शय्या, विपुलमुपधानं भुजलता, ।
वितानं चाकाशं, व्यजनमनुकूलोऽयमनिलः, ॥
स्फुरद्दीपश्चन्द्रः, सुमतिवनितासंगमुदितः, ।
सुखं शान्तः शेते मुनिरतनुभूतिर्नृप इव * ॥ १ ॥

प्रयाण.

१ अभंग.

सकळही माझी बोळवण करा । परतोनी घरा जावें तुम्हीं ॥ १ ॥
कर्मधर्में तुम्हां असावें कल्याण । घ्या माझें वचन आशीर्वाद ॥ २ ॥
वाढवूनी दिलों एकाचिये हातीं । सकळ निश्चिंती झाली तेथें ॥ ३ ॥
आतां मज जाणें प्राणेश्वरासवें । मी माझिया भावें अनुसरलों ॥ ४ ॥
वाढवितां लोभ होईल उशीर । अवघींच स्थिर करा ठायीं ॥ ५ ॥
धर्म अर्थ काम झाला एके ठायीं । मेळविला जिहीं हाता हात ॥ ६ ॥
तुका म्हणे तुम्हां आम्हां हेचि भेटी । उरल्या त्या गोष्टी बोलावया॥७॥

२ अभंग.

आम्ही जातों आपुल्या गांवा । आमचा रामराम घ्यावा ॥ १ ॥
तुमची आमची हेचि भेटी । येथुनियां जन्मतुटी ॥ २ ॥
आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ॥ ३ ॥
येतां निजधामीं कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ॥ ४ ॥
रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ॥ ५ ॥

---

* आकाशाच्या छतानें सुशोभित अशा भूमीवर हाताची भक्कम उशी करून, अनुकूल वायूच्या विंझण्यानें वारा घेत, निर्मल चंद्रदीपाच्या प्रकाशांत राजाप्रमाणें अपरिमित विभूतीनें (संपत्तीनें, पक्षीं भस्मानें) युक्त असा शांतचित्त मुनि सुमति-भार्येच्या संगानें आनंदभरित होत्साता स्वस्थपणें निद्रा घेतो. —भर्तृहरि ३.

३ अभंग.

आम्ही जातों तुम्हीं कृपा असों द्यावी । सकळां सांगावी विनंती माझी॥१॥
वाढ वेळ झाला उभा पांडुरंग । वैकुंठा श्रीरंग बोलावितो ॥ ॥ २ ॥
अंतकाळीं विठो आम्हांसी पावला । कुडीसहित झाला गुप्त तुका ॥ ३ ॥

संत आणि इतर.

१ अभंग.

वाइटानें भलें । हीनें दाविलें चांगलें ॥ १ ॥
एकाविण एका । कैंचें मोल होतें फुका ॥ २ ॥
विषें दाविलें अमृत । कडू गोड घातें हित ॥ ३ ॥
काळिमेनें ज्योती । दिवस कळों आला राती ॥ ४ ॥
उंचें नीच गारा । हिरा परिस मोहरा[1] ॥ ५ ॥
तुका म्हणे भले । ऐसे नष्टांनीं कळले ॥ ६ ॥

२ अभंग.

दह्याचिये अंगीं निघे ताक लोणी । एका मोलें दोन्ही मागों नये ॥ १ ॥
आकाशाचे पोटीं चंद्र तारांगणें । दोहोंशी समान पाहों नये ॥ २ ॥
पृथ्वीच्या पोटीं हिरा गारगोटी । दोहोंसी संसाटी करूं नये ॥ ३ ॥
तुका म्हणे तैसे संत आणि जन । दोहोंसी समान भजूं नये ॥ ४ ॥

३ अभंग.

तीर्थ जळ देखे पाषाण प्रतिमा । संत ते अधम माणसांऐसे ॥ १ ॥
अभाविक सदा सुतकी चांडाळ । सदा तळमळ चुकेचिना ॥ २ ॥
तुका म्हणे वरदळी ज्याची दृष्टी । देहबुद्धि कष्टी सदा दुःखी ॥ ३ ॥

---

१ गारा वगैरे नीच आहेत त्या योगानें हिरा, परिस, मोहरा यांस श्रेष्ठत्व येतें.

४ अभंग.

संतांचे संगतीं काय प्राप्त होतें । तें तुम्हां निरूतें सांगईन ॥ १ ॥
संसारींचें सार जया नाश नाहीं । तेंची पडे ठायीं संतसंगें ॥ २ ॥
संतसंगें कळे सर्व शास्त्रभाग । आणि ज्ञानयोग अप्रयासें ॥ ३ ॥
प्रयासें साधितां कधीं न ये हाता । तें लाभे तत्वतां साधूसंगें ॥ ४ ॥
झालीयानें कृपा संतसज्जनांची । मग विवेकाची वाट फूटे ॥ ५ ॥
पावीजेना देव संतसंगावीण । मार्ग हा कठीण विवेकाचा ॥ ६ ॥
आलीया रे साधू जाणावा कवणें । तयाचें लक्षण असंख्यात ॥ ७ ॥
असंख्यात परी वोळखीकारणें । साधू पूर्णपणें सारीखाची ॥ ८ ॥
सारखाची दीसे जनाचीया परी । परी तो अंतरीं वेगळाची ॥ ९ ॥
वेगळाचि ज्ञानें पूर्ण समाधानें । स्वस्वरूपीं मनें वस्ती केली ॥ १० ॥
वस्ती केली मनें निर्गुणीं सर्वदा । मीपणें आपदा तया नाहीं ॥ ११ ॥
तया नाहीं काम तया नाहीं क्रोध । तया नाहीं खेद स्वार्थबुद्धी ॥१२॥
दंभ हा लौकीक विवेकें सांडीला । दुरी वोसंडीला अहंकार ॥ १३ ॥
अहंकार नाहीं दुराशा अंतरीं । ममता ही दोरी मोकलीली ॥ १४ ॥
लोलंगता नसे ज्ञानें धालेपणें । ऐसीं हीं लक्षणें सज्जनाचीं ॥ १५ ॥
जयाचेनी ज्ञानें तरती अज्ञानें । साधुसंगतीनें समाधान ॥ १६ ॥
हरिभक्ति करी जन तारावया । स्वधर्मा वीलया जाऊं नेदी ॥ १७ ॥
जाऊं नेदी भक्ती जाऊं नेदी ज्ञान । अनुतापीं मन निरंतर ॥ १८ ॥
निरंतर भाव सगुणीं भजन । येणें बहु जन उद्धरती ॥ १९ ॥
आदरेंसी विधी करणें उपाधी । लोकांतें सद्बुद्धी लागावया ॥ २० ॥
लोकाचार करी तो जना उद्धरी । ज्ञाता अनाचारी कामा नये ॥२१॥
क्रियावंत साधू विरक्त विवेकी । तोचि तो लौकिकीं मान्य आहे ॥२२॥
उपेगासी येणें जना पूर्णपणें । तयाचीं लक्षणें निरूपीलीं ॥ २३ ॥
निरूपीलीं येणें लक्षणें जाणावा । साधू वोळखावा मुमुक्षूनें ॥ २४ ॥

असंत.

परद्रव्य परनारी । अभिलासूनि नाक धरी ॥ १ ॥
जळो तयाचा आचार । व्यर्थ भार वाहे खर ॥ २ ॥
सोवळ्याची स्फीती । क्रोधें विटाळला चित्तीं ॥ ३ ॥
तुका म्हणे सोंग । दावी बाहेरील रंग ॥ ४ ॥

१ अभंग.

नव्हती ते संत करितां कवित्व । संतांचे ते आप्त नव्हती संत ॥ १ ॥
येथें नाहीं वेश सरतें आडनांवें । निवडे घावडाव व्हावा अंगीं ॥ २ ॥
नव्हती ते संत धरितां भोपळा । करितां वाकळा प्रावरणासी ॥३ ॥
नव्हती ते संत करितां कीर्तन । सांगतां पुराणें नव्हती संत ॥ ४ ॥
नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्म आचरणें नव्हती संत ॥ ५ ॥
नव्हती संत करितां तप तीर्थाटण । सेविलिया वन नव्हती संत ॥ ६ ॥
नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणें । भस्मउधळणें नव्हती संत ॥ ७ ॥
तुका म्हणे नाहीं निरसला देह । तोंवरी हे अवघे संसारिक ॥ ८ ॥

२ अभंग.

काय बा करिसी सोंवळें ओंवळें । मन नाहीं निर्मळ वाउगोंचि ॥ १ ॥
काय बा करिसी पुस्तकाची मोट । घोकितां हृदयस्फोट हाता न ये ॥२॥
काय बा करिसी टाळ आणि मृदंग । जेथें पांडुरंग रंगला नाहीं ॥३॥
काय बा करिसी ज्ञानाचिया गोष्टी । करणी नाहीं पोटीं बोलण्याची॥४॥
काय बा करिसी दंभ लौकिकातें । हित नाहीं मात तुका म्हणे ॥ ५ ॥

३ अभंग.

शीण वाटतसे मना । नारायणा न पाहतां ॥ १ ॥
वायां आचार विचार । सदा मलीन अंतर ॥ २ ॥
सोंगाचें तें सोंग । दावी कथेचा रंग ॥ ३ ॥
परधनीं सदा मन । वरी दावितसे डोलून ॥ ४ ॥
ऐसे नर ते दुराचारी । म्हणे चोखियाची माहारी ॥ ५ ॥

४ अभंग.

टिळा टोपी उंच दावी । जगीं मी एक गोसावी ॥ १ ॥
अवघा वरपांग सारा । पोटीं विषयांचा थारा ॥ २ ॥
मुद्रा लाविती कोरोनी । मान व्हावयासी जनीं ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥ ४ ॥

५ अभंग.

तीर्थें केलीं व्रतें केलीं । चित्तीं वासना राहिली ॥ १ ॥
पृथ्वींतले देव केले । चित्त स्थिर नाहीं झालें ॥ २ ॥
नग्न मौनी जटाधारी । राख लाविली शरीरीं ॥ ३ ॥
करी पंचाग्निसाधन । ठेवी मस्तकीं तो प्राण ॥ ४ ॥
नर होउनि पशु झाले । तुका म्हणे वांयां गेले ॥ ५ ॥

६ अभंग.

लांब लांब जटा कांयं वाढवूनि । पावडें घेऊनि क्रोधें चाले ॥ १ ॥
खायाचा वोळसा शिव्या दे जनाला । ऐशा तापशाला बोध कैंचा॥२॥
सेवी भांग अफू तमाखू उदंड । परि तो अखंड भ्रांतीमाजी ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसा सर्वस्वें बुडाला । त्यासी अंतरला पांडुरंग ॥ ४ ॥

७ अभंग.

वरतें करोनियां तोंड । हाका मारितो प्रचंड ॥ १ ॥
राग आळवितो नाना । गातो काय तें कळेना ॥ २ ॥
आशा धरोनि मनीं । कांहीं देईल म्हणऊनि ॥ ३ ॥
पोटा एकासाठीं । तुका म्हणे जाले कष्टी ॥ ४ ॥

८ अभंग.

कान फाडूनियां मुद्रा ते घालिती । नाथ म्हणवीती जगामाजी ॥ १ ॥
घालोनियां फेरा मागती द्रव्यासी । परि शंकरासी नोळखती ॥ २ ॥
पोट भरावया शिकती उपाय । तुका म्हणे जाय नरक लोका ॥ ३ ॥

९ अभंग.

लावूनियां मुद्रा बांधोनियां कंठी । हिंडे पोटासाठीं देशोदेशीं ॥ १ ॥
नेसोनि कोपीन शुभ्रवर्ण जाणा । पाहातीं पक्कान्न क्षेत्रींचें तें ॥ २ ॥
तुका म्हणे ऐसे मावेचे मंईद । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं † ॥ ३ ॥

१० अभंग.

संतचिन्हें लेउनि अंगीं । भूषण मिरविती जगीं ॥ १ ॥
पडिले दुःखाचे सागरीं । वहावले ते भवपुरीं ॥ २ ॥
काम क्रोध लोभ चित्तीं । वरिवरि दाविती विरक्ती ॥ ३ ॥
आशापाशीं बांधोनि चित्त । म्हणती झालों आम्ही मुक्त ॥ ४ ॥
त्यांचे लागले संगती । जाली त्यांसी तेचि गति ॥ ५ ॥
तुका म्हणे शब्दज्ञानें । जग नाडियेलें तेणें ॥ ६ ॥

११ अभंग.

वांझेनें दाविलें गरुवारलक्षण । चिरगुटें घालून वाथयाला ॥ १ ॥
तेवीं शब्दज्ञानी करिती चावटी । ज्ञान पोटासाठीं विकूनियां ॥ २ ॥
बोलाचिच कढी बोलाचाचि भात । जेवूनियां तृप्त कोण झाला ॥ ३ ॥
कागदीं लिहितां नामाची साखर । चाटितां मधुर गोडी नेदी ॥ ४ ॥
तुका म्हणे जळो जळो ते महंती । नाहीं लाज चित्तीं आठवण ॥ ५ ॥

१२ अभंग.

नव्हे ब्रह्मज्ञान बोलतां सिद्ध । जंव हा आत्मबोध नाहीं चित्तीं ॥ १ ॥
काय करिसी वांयां लटिकाची पाल्हाळ । श्रम तो केवळ जाणिवेचा ॥ २ ॥
मीच देव ऐसें सांगसी या लोकां । विषयांच्या सुखा टोंकोनियां ॥ ३ ॥
अमृताची गोडी पुढिलां सांगसी । आपण उपवासी मरोनियां ॥ ४ ॥
तुका म्हणे जरि राहिली तळमळ । ब्रह्म तें केवळ सदोदित ॥ ५ ॥

---

† पोटासाठीं अवघें ढोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ —तुकाराम.

१३ अभंग.

मुखें सांगे ब्रह्मज्ञान । जन लोकाची कापितो मान ॥ १ ॥
ज्ञान सांगतो जनासी । नाहीं अनुभव आपणासी ॥ २ ॥
कथा करितो देवाची । अंतरीं आशा बहु लोभाची ॥ ३ ॥
तुका म्हणे तोाचि वेडा । त्याचें हाणूनि थोबाड फोडा ॥ ४ ॥

१४ अभंग.

दोन अभंग शिकला । म्हणे जाणें त्या ब्रह्माला ॥ १ ॥
संतां दाखवित ज्ञान । कळा कुसरी करून ॥ २ ॥
बहु दाखवी लाघव । अंतरीं निराळाचि भाव ॥ ३ ॥
तुका म्हणे कांहीं । त्याची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

१५ अभंग.

दुर्जनाचे घरीं पुस्तकांचे भार । शब्दांचे व्यवहार ज्ञान सांगे ॥ १ ॥
नको नको कधीं तयाशीं संबंध । न भेटे गोविंद कदाकाळीं ॥ २ ॥
तुका म्हणे मूर्ख वागवी पुस्तक । दारोदारीं भीक मागावया ॥ ३ ॥

१६ अभंग.

शिकल्या बोलाचे सांगतील वाद । अनुभवभेद नाहीं कोणा ॥ १ ॥
पंडित हे ज्ञानी करितील कथा । न मिळती अर्था निजसुखा ॥ २ ॥
तुका म्हणे जैसी लांचासाठीं ग्वाही । देतील हे नाहीं ठावी वस्तु ॥३॥

१७ अभंग.

नका दंतकथा येथें सांगो कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥ १ ॥
अनुभव येथें पाहिजे साचार । न चलती चार आम्हांपुढें ॥ २ ॥
वरी कोण मानी रसाळ बोलणें । नाहीं झालीं मनें ओळखी तों ॥३॥
निवडी वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ॥ ४ ॥
तुका म्हणे एथें पाहिजे जातीचें । येर गाबाळाचें काम नाहीं ॥ ५ ॥

१८ अभंग.

चातुर्याचे योगें कवित्व करिती । प्रासादिक रंग आणितां न ये ॥ १ ॥
संन्याशाचें सोंग संपादिलें सांग । वैराग्याचें अंग आणितां न ये ॥ २ ॥
चंद्र सूर्य चित्रें लिहिताती भिंती । प्रकाशाचें अंग लिहितां न ये ॥ ३ ॥
शिपायाचें सोंग आणितां येईल सांग । शूरत्वाचें अंग आणितां न ये ॥४॥
तुका म्हणे गाऊन नाचून करितील सीमा । पांडुरंगीं प्रेमा आणितां न ये ॥५॥

१९ अभंग.

भागवताचा भाव सांगवेल आव । करणी स्वभाव न ये न ये ॥ १ ॥
संतांची आकृति आणवेल युक्ति । कामक्रोधशांति न ये न ये ॥ २ ॥
अवताराचें सोंग आणवेल जाण । क्रिया तत्समान न ये न ये ॥ ३ ॥
तुका म्हणे विठ्ठलकृपेवांचुनी । बोलाऐसी करणी न ये न ये ॥ ४ ॥

२० अभंग.

थोर संत म्हणोनी पायां पाडी जन । गेलें संतपण नरकासी ॥ १ ॥
ढोंगियापें बापा कैंचा नारायण । भोंदियेले जन दांभिकत्वें ॥ २ ॥
बोलतसे भांड आपुलें भूषण । कवडीसाठीं प्राण देऊं पाहे ॥ ३ ॥
तीळभरी पुण्य नाहीं त्या पदरीं । तेथें कैंचा हरी पाखंड्यापैं ॥ ४ ॥
तुका म्हणे त्यानें केली विटंबना । चौऱ्याशीं यातना भोगावया ॥ ५ ॥

२१ अभंग.

गळां घालोनियां माळा । केला रामानंदीं टिळा ॥ १ ॥
टाळ मृदंगाचे घोळ । नित्य मांडिला गोंधळ ॥ २ ॥
परि नाहीं भक्तिप्रेम । मनीं नाहीं सीताराम ॥ ३ ॥
तुका म्हणे ढोंग केलें । संतपण वांयां गेलें ॥ ४ ॥

२२ अभंग.

जाऊनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरी वरी ॥ १ ॥
अंतरींचें शुद्ध कासयानें जालें । भूषण त्वां केलें आपणया ॥ २ ॥

वृंदावनफळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडेचिना ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया फुंदां तुम्ही ॥ ४ ॥

१३ अभंग.

आली सिंहस्थ पर्वणी । न्हाव्या भटा झाली धणी ॥ १ ॥
अंतरीं पापाच्या कोडी । वरिवरि बोडी डोईदाढी ॥ २ ॥
बोडिलें तें निघालें । काय पालटलें सांग वहिलें ॥ ३ ॥
पाप गेल्याची खूण । नाहीं पालटले अवगुण ॥ ४ ॥
भक्तिभावेंविण । तुका म्हणे अवघा सीण ॥ ५ ॥

१४ अभंग.

कासया पाषाण पूजीती पीतळ । अष्ट धातू खळ भावहीन ॥ १ ॥
भावची कारण भावची तारण । मोक्षाचें साधन बोलियेलें ॥ २ ॥
काय करिल जपमाळ कंठमाळा । करिसी वेळोवेळां विषयजप ॥ ३ ॥
काय करिसील पंडित होउनी । अक्षराभिमानी थोर होय ॥ ४ ॥
काय करिसील कुशल गायन । अंतरीं मळीन कुबुद्धि तों ॥ ५ ॥
तुका म्हणे भाव नाहीं करी सेवा । तेणें काय देवा योग्य होसी ॥ ६ ॥

१५ अभंग.

सोंगें छंदें कांहीं । देव जोडे ऐसें नाहीं ॥ १ ॥
सारा अवघें गाबाळ । डोळ्याआडील पडळ ॥ २ ॥
शुद्ध भावाविण । जो जो केला तो तो सीण ॥ ३ ॥
तुका म्हणे कळे । परि होताती अंधळे ॥ ४ ॥

१६ अभंग.

प्रेमाविण जें जें केलें । निरर्थक वांयां गेलें† ॥ १ ॥
मुखें करितो कीर्तन । मनीं विषयांचें ध्यान ॥ २ ॥

---

† प्रेमेंवीण श्रुतिस्मृतिज्ञान । प्रेमेंवीण ध्यानपूजन ॥ प्रेमेंवीण श्रवणकीर्तन । वृथा जाण नृपनाथा ॥ १ ॥ —ए. भा. २. ३३९.

ऐसें श्रवण कीर्तन । गेलें ओहळीं वाहोन ॥ ३ ॥
तुका म्हणे पांडुरंग । जाणतसे अंतरंग ॥ ४ ॥

२७ अभंग.

मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया ॥ १ ॥
तैसा भक्तिवाद काय । रंगवेगडीचा न्याय † ॥ २ ॥
वेठी धरल्या दावी भाव । मागें पळायाचा पाव ॥ ३ ॥
काजव्याच्या ज्योती । तुका म्हणे नलगे वाती ॥ ४ ॥

२८ अभंग.

जळो तैसा प्रेमरंग । जाय भुलोनि पतंग ॥ १ ॥
सासूसाठीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न ॥ २ ॥
मैंद मुखींचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ॥ ३ ॥
जैसी वृंदावनकांती । उत्तम धरूं नये हातीं ॥ ४ ॥
बक ध्यान करी । दावी सोंग मत्स्य मारी ॥ ५ ॥
तुका म्हणे सर्प डोले । तैसा कथेमाजी खुले ॥ ६ ॥

हृद्गत.

१ अभंग.

भोरप्यानें सोंग पालटिलें वरी । बक ध्यान धरी मत्स्या जैसें ॥ १ ॥
टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखों नेदी जगीं फांसे जैसे ॥ २ ॥
ढीवर या[1] मत्स्या चारा घाली जैसा । भीतरीलें फांसा कळों नेदी ॥ ३ ॥
खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी । कापावया[3] नळी तया साठीं ॥ ४ ॥
तुका म्हणे तैसा भला मी लोकांत । परि तूं कृपावंत पांडुरंगा ॥ ५ ॥

---

† न ये नेत्रां जळ । नाहीं अंतरीं कळवळ ॥ १ ॥ तीं हे चावटीचे बोल । जन रंजवणें फोल ॥ २ ॥ —तुकाराम.

१ अथवा (!). २ आंतील. ३ तयाची नळी म्हणजे मान कापावयासाठीं.

१ अभंग.

म्हणवितों दास ते नाहीं करणी । आंत वरी दोन्ही भिन्न भाव ॥ १ ॥
गातों नाचतों तें दाखवितों जना । प्रेम नारायणा नाहीं अंगीं ॥ २ ॥
पाविजे तें वर्म न कळेचि कांहीं । बुडालों या डोहीं दंभाचिया ॥ ३ ॥
भांडवल काळें हातोहातीं नेलें । माप या लागलें आयुष्यासी ॥ ४ ॥
तुका म्हणे वांयां गेलों ऐसा दिसें । होईल या हांसें लौकिकाचें ॥ ५ ॥

२ अभंग.

लाज वाटे मज मानिति हे लोक । हें तों नाहीं एक माझे अंगीं ॥१॥
मोजुनि झिजलों मापाचिया परी । जाळावी हे थोरी लाभाविण ॥२॥
कोमळ कंटक तीक्ष्ण अगरीं । पोंचट ते वरी अंगकांति ॥ ३ ॥
चित्रींचे ते लेप शृंगारिले निकें । जीवेंवीण फिकें रूप त्यांचें ॥ ४ ॥
तुका म्हणे दिसे वांयां गेलों देवा । अनुभव ठावा नाहीं तेणें ॥ ५ ॥

४ अभंग.

जन मानवलें वरी बाह्यात्कारीं । तैसा मी अंतरीं नाहीं जालों ॥ १ ॥
म्हणुनि पंढरिनाथा वाटतसे चिंता । प्रगट बोलतां लाज वाटे ॥ २ ॥
संतां ब्रह्मरूप जालें अवघें जन । ते माझे अवगुण न देखती ॥ ३ ॥
तुका म्हणे मी तों आपणासी ठावा । आहें देवा बरा जैसा तैसा ॥४॥

५ अभंग.

संत मानितील मज । तेणें वाटतसे लाज ॥ १ ॥
तुम्ही कृपा केली नाहीं । चित्त माझें मज ग्वाही ॥ २ ॥
गोंविलों थोरिवा । दुःख वाटतसे जीवा ॥ ३ ॥
तुका म्हणे माया । आवरा हे पंढरिराया ॥ ४ ॥

६ अभंग.

माझा देवा तुम्हीं केला अंगीकार । हें मज साचार कैसें कळे ॥ १ ॥
कां हो कांहीं माझ्या न ये अनुभवा । विचारितां देवा आहें तैसा ॥२॥

लौकिकाचा मज लाविसी आभार । शिरोरत्न भार दुःखाचा हा ॥३॥
तुका म्हणे नाहीं पालट अंतरीं । तेथें दिसे हरी ठकाठकी ॥ ४ ॥

७ अभंग.

बोलविसी तैसें आणीं अनुभवा । नाहीं तरी देवा विटंबना ॥ १ ॥
मिठेंविण काय करावें मिष्टान्न । शव जीवेंविण शृंगारिलें ॥ २ ॥
संपादणीविण विटंबिलें सोंग । गुणेंविण चांग रूप हीन ॥ ३ ॥
कन्यापुत्रेंवीण मंगळदायकें । वेचिलें हें फिकें द्रव्य तरी ॥ ४ ॥
तुका म्हणे तैसी होते मज परी । न देखें अंतरीं प्रेमभाव ॥ ५ ॥

८ अभंग.

कासया गा मज घातलें संसारीं । चित्त पायांवरी नाहीं तुझ्या ॥ १ ॥
कासया गा मज घातलें या जन्मा । नाहीं तुझा प्रेमा नित्य नवा ॥ २ ॥
नामाविण माझी वाचा अमंगळ । ऐसा कां चांडाळ निर्मियेलों ॥ ३ ॥
तुका म्हणे माझी जळो जळो काया । विठ्ठल सखयावांचूनियां ॥ ४ ॥

९ अभंग.

कासया गुणदोष पाहों आणिकांचे । मज काय त्यांचें उणें असे ॥ १ ॥
काय पापपुण्य पाहों आणिकांचें । मज काय त्यांचें उणें असे ॥ २ ॥
नष्ट दुष्टपण कवणाचें वाणूं । तयाहून अणु अधिक माझें ॥ ३ ॥
कुचर खोटा मज कोण असे आगळा । तों मी पाहों डोळां आपुलिये॥४॥
तुका म्हणे मी या भांडवलें पुरता । तुजसी पंढरिनाथा लावियेलें ॥ ५ ॥

१० अभंग.

चंदनाच्या वासें धरितील नाक । नावडे कनक न घडे हें ॥ १ ॥
साकरेची गोडी सारिखी सकळां । थोरा मोठ्यां बाळां धाकुटियां ॥ २ ॥
तुका म्हणे माझें चित्त शुद्ध होतें । तरि कां निंदिते जन मज ॥ ३ ॥

भाग २ रा.

संतमाहात्म्य. (अ.)

...संतांची महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा ॥
जयांचेनि मुख्य परमात्मा । प्रगट होये ॥ १ ॥

—दासबोध १.५.२६.

१ अभंग.

संतचरणरज लागतां सहज । वासनेचें बीज जळोन जाय ॥ १ ॥
मग रामनामीं उपजे आवडी । सुख घडोघडी वाढों लागे ॥ २ ॥
कंठीं प्रेम दाटे नयनीं नीर लोटे । हृदयीं प्रगटे नामरूप ॥ ३ ॥
तुका म्हणे साधन सुलभ गोमटें । परि उपतिष्ठे पूर्वपुण्यें ॥ ४ ॥

२ अभंग.

आलिंगन घडे । मोक्षसायुज्यता जोडे ॥ १ ॥
ऐसा संतांचा महिमा । जाली बोलायाची सीमा ॥ २ ॥
तीर्थें पर्व काळ । अवघीं पायांपें सकळ ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥ ४ ॥

३ अभंग.

पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्व काळ ॥ १ ॥
तयाच्या चिंतनें तरतील दोषी । जळतील रासी पातकांच्या ॥ २ ॥
देव इच्छी रज चरणींची माती । धांवत चालत मागें मागें ॥ ३ ॥
काय त्यां उरलें वेगळें आणीक । वैकुंठनायक जयां कंठीं ॥ ४ ॥
तुका म्हणे देव भक्तांचा संगम । तेथें ओघ नाम त्रिवेणीचा ॥ ५ ॥

४ अभंग.

धन्य त्याचें कूळ धन्य त्याचा वंश । जे कुळीं हरिदास अवतरला ॥ १ ॥

धन्य ते जननी धन्य तिची कुसी । जे हरिप्रियासी प्रसवली † ॥ २ ॥
धन्य ते संबंधी संतांचे सोईरे । संसर्गें उद्धरे कुळ त्यांचें ॥ ३ ॥
धन्य तो पैं ग्राम धन्य तो पैं देश । जेथें रहिवास वैष्णवांचा ॥ ४ ॥
धन्य त्यांचे सखे वैष्णवी सर्वदा । ते सर्व गोविंदा जिवलग ॥ ५ ॥
धन्य ते भाविक वंदिती हरिदास । तयां हृषीकेश वंदीतसे ॥ ६ ॥
धन्य ते निंदक निंदिती सज्जन । येणें भावें ध्यान घडे त्यांचें ॥ ७ ॥
धन्य दास दासी सज्जनसेवेसी । ते सुरवरांसी वंद्य होती ॥ ८ ॥
धन्य पशु श्वान वैष्णवां गृहींचे । कळिकाळ त्यांचे पाय वंदी ॥ ९ ॥
रामदास म्हणे तरीच धन्य होणें । जरी संग लाधणें सज्जनाचा ॥ १० ॥

५ अभंग.

सुख या संतसमागमें । नित्य दुणावे तुझिया नामें ॥
दहन होती सकळ कर्में । सर्व काळ प्रेमें डुल्लतसों ॥ १ ॥
म्हणोनी नाहीं कांहीं चिंता । तूंचि आमुचा मातापिता ॥
बहिणी बंधु आणि चुलता । आणिकां गोतां सर्वी ठायीं ॥ २ ॥
ऐसा हा कळला निर्धार । माझा तुज न पडे विसर ॥
अससी देऊनियां धीर । बाह्य अभ्यंतर मजजवळी ॥ ३ ॥
दुःख तें कैसैं न ये स्वप्नासी । मुक्ति मुक्ति जाल्या कामारी दासी ॥
त्यांचें वर्म तूं आम्हांपाशीं । सुखें राहिलासी प्रेमाचिया ॥ ४ ॥
जेथ तुझ्या कीर्तनाचा घोष । जळती पापें पळती दोष ॥
काय तें उणें आम्हां आनंदास । सेवूं ब्रह्मरस तुका म्हणे ॥ ५ ॥

६ अभंग.

पाप ताप दैन्य जाय उठाउठी । जालिया भेटी हरिदासांची ॥ १ ॥
ऐसें बळ नाहीं आणिकांचे अंगीं । तपें तीर्थें जगीं दानें व्रतें ॥ २ ॥

---

† धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं । तेहींच एक जन्म जनीं सार्थक केला ॥ १ ॥ —दासबोध ३.१०.२३.

चरणींचें रज वंदी शूळपाणी । नाचती किर्तनीं त्यांचे माथां ॥ ३ ॥
भव तरावया उत्तम हे नाव । भिजों नेदी पाव हात कांहीं ॥ ४ ॥
तुका म्हणे मन जालें समाधान । देखिल्या चरण वैष्णवांचे ॥ ५ ॥

७ अभंग.

आले संत पाय ठेविती मस्तकीं । इहीं उभयलोकीं सरता केलों ॥ १ ॥
वंदीन पाउलें लोळेन चरणीं । आजि इच्छाधणी फिटईल ॥ २ ॥
अवघीं पूर्वपुण्यें जालीं सानुकूळ । अवघेंचि मंगळ संतभेटी ॥ ३ ॥
तुका म्हणे कृतकृत्य झालें देवा । नेणें परि सेवा डोळां देखें ॥ ४ ॥

८ अभंग.

श्रीसंतांचिया माथा चरणावरी । साष्टांग हें करीं दंडवत ॥ १ ॥
विश्रांति पावलों सांभाळउत्तरीं । वाढलें अंतरीं प्रेमसुख ॥ २ ॥
डौरली ही काया कृपेच्या वोरसें । नव्हे अनारिसें उद्धरलों ॥ ३ ॥
तुका म्हणे मज न घडतां सेवा । पूर्वपुण्यठेवा वोढवला ॥ ४ ॥

९ अभंग.

आजी सोनियाचा दिवस । दृष्टी देखिलें संतांस ॥ १ ॥
जीवा सुख थोर झालें । माझें माहेर भेटलें ॥ २ ॥
अवघा निरसला शीण । संतचरण देखतां ॥ ३ ॥
आजी दिवाळी दसरा । सेना म्हणे आले घरा† ॥ ४ ॥

१० अभंग.

धन्य आजि दिन । जालें संतांचें दर्शन ॥ १ ॥
जाली पापा तापा तुटी ॥ दैन्य गेलें उठाउठी ॥ २ ॥
जालें समाधान । पायीं विसांवलें मन ॥ ३ ॥
तुका म्हणे आले घरा । तोचि दिवाळी दसरा ॥ ४ ॥

---

१ कीर्तनीं नाचती त्यांचे चरणींचें रज (धूळ) शूळपाणी (शंकर) माथां वंदी.

† साधु संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ॥ —तुकाराम.

११ अभंग.

संत भेटती आजी मज । तेणें जालों चतुर्भुज ॥
दोन्ही भूजा स्थूळीं सहज । दोन्ही सूक्ष्मीं वाढल्या ॥ १ ॥
आलिंगनीं सुख वाटे । प्रेम चिदानंदीं गोठे ॥
हर्षें ब्रह्मांड उतटे । समूळ उडे मीपण ॥ २ ॥
या संतांसी भेटतां । सरे संसाराची व्यथा ॥
पुढतापुढती माथा । अखंडित ठेवीन ॥ ३ ॥
या संतांचें देणें । कल्पतरूहून दुणें ॥
परिसापरीस अगाध देणें । चिंतामणि ठेंगणा ॥ ४ ॥
या संतांपरीस उदार । त्रिभुवनीं नाहीं थोर ॥
मायबाप सहोदर । इष्ट मित्र सोईरे ॥ ५ ॥
कृपाकटाक्षें न्याहाळिलें । आपुल्या पदीं बैसविलें ॥
बापरखुमादेवीवरें विठ्ठलें । भक्तां दिधलें वरदान ॥ ६ ॥

१२ अभंग.

अग्निमाजी गेलें । अग्नि होऊन तेंच ठेलें ॥ १ ॥
काय उरलें तया पण । मागील तें नाम गुण ॥ २ ॥
लोह लागे परिसा अंगीं । तोही भूषण जाला जगीं ॥ ३ ॥
सरिता ओहळ ओघा । गंगे मिळोनि झाल्या गंगा ॥ ४ ॥
चंदनाच्या वासें । तरु चंदन जाले स्पर्शें ॥ ५ ॥
तुका जडला संतांपायीं । दुजेपणा ठाव नाहीं ॥ ६ ॥

संतमाहात्म्य. (आ.)

संत होऊनियां संतांसी पाहावें ।

—गा. ४२७८.४.

१ अभंग.

भक्तांचा महिमा भक्तचि जाणती । दुर्लभ या गति आणीकांसी ॥ १ ॥
जाणोनि नेणते झाले तेणें सुखें । न बोलोनि मुखें बोलताती ॥ २ ॥
अभेदूनि भेद राखियेला अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ॥ ३ ॥
टाळ घोष कथा प्रेमाचा सुकाळ । मूढ लोकपाळ तरावया ॥ ४ ॥
तुका म्हणे हें तों आहे तयां ठावें । जिहीं एक्या भावें जाणीतलें ॥ ५ ॥

२ अभंग.

संतांचा महिमा बहु तो दुर्गम । शाब्दिकांचें काम नाहीं येथें ॥ १ ॥
बहु दुधड जरी झाली म्हैस गाय । तरी होईल काय कामधेनु ॥ २
तुका म्हणे अंगें व्हावें तें आपण । तरीच महिमान येईल कळों ॥ ३ ॥

३ अभंग.

जाणे त्याचें वर्म नेणे त्याचें कर्म । केल्याविण धर्म नेणवती ॥ १ ॥
मैथुनाचें सुख सांगितल्या शून्य । अनुभवाविण कळूं न ये ॥ २ ॥
तुका म्हणे जळो शाब्दिक हें ज्ञान । विठोबाची खूण विरळा जाणे ॥ ३ ॥

भाग २ रा.

संतपूजा. (अ)

माय वनीं धाल्या धाय । गर्भ आंवतणें न पाहे ॥ १ ॥
तैसें पूजितां वैष्णव । सुखें संतोषतो देव ॥ २ ॥

—तुकाराम.

सांडोनियां थोरपण । साधूसी लीन होआवें संपूर्ण ।
सांडोनियां देहाभिमान । त्यासी लोटांगण घालावें ॥ १ ॥
साधूपरता पूज्य पहा हो । जगीं नाहीं आन देवो ।
संतपूजनें देवाधिदेवो । स्वयमेवो संतुष्टे ॥ २ ॥

—ए. भा.३.३५५–५६.

१ अभंग.

देव तोचि संत संत तोच देव । येथें दुजा भाव नाहीं नाहीं ॥ १ ॥
देव नाम त्याचें संत नाम त्याचें । परब्रह्म साचें एकचि तें ॥ २ ॥
कोणी म्हणती देव कोणी म्हणती संत । परि ते भावातीत परब्रह्म ॥ ३ ॥
संताचे चरण सेवि नारायण । देव निरंजन संतचि तो ॥ ४ ॥

२ अभंग.

जे गाती अखंड विठ्ठलाचें गीत । त्यांचे पायीं चित्त ठेवीन मी ॥ १ ॥
जयांसी आवडे विठ्ठलाचें नाम । ते माझे परम प्राणसखे ॥ २ ॥
जयांसी विठ्ठल आवडे लोचनीं । त्यांचें पायवणी स्वीकारीन ॥ ३ ॥
विठ्ठलासी जिहीं दिला सर्व भाव । त्यांच्या पायीं ठाव मागईन ॥ ४ ॥
तुका म्हणे रज होईन चरणींचा । म्हणवितो त्यांच्या हरिचे दास ॥ ५ ॥

३ अभंग.

संतमारगीं चालती । त्यांची लागो मज माती ॥ १ ॥
काय करावीं साधनें । काय नव्हे एक तेणें ॥ २ ॥
शेष घेईन उच्छिष्ट । धाय धणीवरी पोट ॥ ३ ॥
तुका म्हणे संतांपायीं । जीव ठेविला निश्चयीं ॥ ४ ॥

४ अभंग.

संतांचिया पायीं हा माझा विश्वास । सर्वभावें दास जालों त्यांचा ॥१॥
तेचि माझें हित करिती सकळ । जेणें हा गोपाळ कृपा करी ॥ २ ॥
भागलिया मज वाहतील कडे । त्यांचियानें जोडे सर्व सुख ॥ ३ ॥
तुका म्हणे शेष घेईन आवडी । वचन न मोडीं बोलिलें ते[1] ॥ ४ ॥

५ अभंग.

कुळींचें दैवत ज्याचें पंढरीनाथ । होईन दासीसुत त्यांचे घरीं † ॥ १ ॥
शुद्ध यातिकुळवर्णा चाड नाहीं । करीं भलते ठायीं दास तुझा ॥ २ ॥
पंढरीसी कोणी जाती वारकरी । होईन त्यांचे घरीं पशुयाती ॥ ३ ॥
विठ्ठलचिंतन दिवसरात्रीं ध्यान । होईन पायतन त्याचे पायीं ॥ ४ ॥
तुळसीवृंदावन जयाचे अंगणीं । होईन केरसुणी त्याचे घरीं ॥ ५ ॥
तुका म्हणे हाचि भाव माझ्या चित्तीं । नाहीं आणिकां गती चाड मज ॥६॥

६ अभंग.

संतांच्या पादुका घेईन मोचे खांदीं । हातीं टाळ दिंडी नाचेन पुढें ॥ १ ॥
भजनविधी नेणें साधन उपाय । सकळ सिद्धी पाय हरिदासांचे ॥ २ ॥
ध्यान गति मति आसन समाधि । हरिनाम गोविंदीं प्रेमसुख ॥ ३ ॥
नेणता निर्लज्ज नेणें नादभेद । सुखें हा गोविंद गाऊं गीतीं ॥ ४ ॥
सर्व जोडी मज गोत आणि वित्त । तुका म्हणे संतमहंतपाय ॥ ५ ॥

७ अभंग.

त्यांचिया चरणा माझें दंडवत । ज्यांचें धनवित्त पांडुरंग ॥ १ ॥
येथें माझा जीव पावला विसांवा । म्हणऊनि हांवा भरलासे ॥ २ ॥
चरणींचें रज लावीन कपाळा । जीं पदें राउळा सोई जाती ॥ ३ ॥
आणिक तीं भाग्यें येथें कुरवंडी । करूनियां सांडीं इंद्राऐसीं ॥ ४ ॥

---

१ त्यांनीं (संतांनीं) बोललेलें.

† मज दास करीं त्यांचा । संत दासांच्या दासांचा ॥ —तुकाराम.

वैष्णवांचे घरीं देवाची वसती । विश्वास हा चित्तीं सत्यभावें ॥ ५ ॥
तुका म्हणे सखे हरिचे जे दास । आतां पुढें आस नाहीं दुजी ॥ ६ ॥

८ अभंग.

संत गाती हरिकीर्तनीं । त्यांचें घेईन पायवणी ॥ १ ॥
हेंचि तप तीर्थ माझें । आणीक मी नेणें दुजें ॥ २ ॥
काया कुरवंडी करीन । संत महंत ओंवाळीन ॥ ३ ॥
संत महंत माझी पूजा । अनभाव नाहीं दुजा ॥ ४ ॥
तुका म्हणे नेणें कांही । अवघें आहे संतांपायीं ॥ ५ ॥

९ अभंग.

संतांचे घरींचा दास मी कामारी । दारीं परोपरी लोळतसें ॥ १ ॥
चरणींचे रज लागती अंगास । तेणें बेताळीस उद्धरती ॥ २ ॥
उच्छिष्ट हें जमा करूनी पत्रावळी । घालीन कवळी मुखामाजी ॥ ३ ॥
तुका म्हणे मी आणीक विचार । नेणें हेंचि सार मानीतसें ॥ ४ ॥

१० अभंग.

बोले तैसा चाले । त्याचीं वंदीन पाऊलें ॥ १ ॥
अंगें झाडीन अंगण । त्याचें दासत्व करीन ॥ २ ॥
त्याचा होईन किंकर । उभा ठाकेन जोडोनि कर ॥ ३ ॥
तुका म्हणे देव । त्याचे चरणीं माझा भाव ॥ १ ॥

११ अभंग.

संत आले घरा । तों मी अभागी दातारा ॥ १ ॥
कासयानें पूजा करूं । चरण हृदयींच धरूं ॥ २ ॥
काया कुरवंडी । करून ओंवाळून सांडी ॥ ३ ॥
तुका म्हणे भावें । हात जोडीं असो ठावें ॥ ४ ॥

१२ अभंग.

संतांचिये माथा चरणांवरी माझा । देहीं भाव दूजा नाहीं नाहीं ॥ १ ॥
नामाचें चिंतन करिती सर्व काळ । ते माझे केवळ मायबाप ॥ २ ॥

मायबाप म्हणों तरि लाजिरवाणें । चुकविलें येणें संतजनीं ॥ ३ ॥
ज्या ज्या जन्मा यावें मायबाप दोनी । परी संत निर्वाणीं मिळतीना ॥ ४ ॥
येचि देहीं डोळां संतांसी देखिलें । एका जनार्दनीं वंदिले चरण त्याचे ॥ ५ ॥

१३ अभंग.

शुद्ध चर्या हेंचि संतांचें पूजन । लागतचि धन नाहीं वित्त ॥ १ ॥
सगुणाचे सोई सगुण विश्रांति । आपणचि येती चोजवीत ॥ २ ॥
कीर्तनींच वोळे कृपेचा वोरस । दुरीपणें वास संनिधता ॥ ३ ॥
तुका म्हणे वर्म सांगतों सवंगें । मन लावा लागें स्वहिताच्या ॥ ४ ॥

संतपूजा. (आ)

माउलीची चाली लेंकराचे ओढी । तयालागीं काढी प्राण प्रीती ॥ १ ॥
ऐसी बळिवंत आवडी जी देवा । संतमहानुभावा विनवितों ॥ २ ॥

१ अभंग.

लेंकुराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥ १ ॥
ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती ॥ २ ॥
पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें । तैसें तुम्हां संतां ओझें ॥ ४ ॥

२ अभंग.

जिचें पीडे बाळ । प्राण तियेचा विकळ ॥ १ ॥
ऐसा मातेचा स्वभाव । सूत्र दोरी एक जीव ॥ २ ॥
सुखाची विश्रांती । उमटे मातेचिये चित्तीं ॥ ३ ॥
तुका म्हणे संत । तुम्ही बहु कृपावंत ॥ ४ ॥

३ अभंग.

मातेचिये चित्तीं । अवघी बाळकाची व्याप्ति ॥ १ ॥
देह विसरे आपुला । जवळी घेतां सीण गेला ॥ २ ॥

दावी प्रेम भातें । आणि अंगावरी चढतें ॥ ३ ॥
तुका संतांपुढें । पायीं झोंबे लाडें कोडें ॥ ४ ॥

४ अभंग.

लेंकरा लेववी माता अळंकार । नाहीं अंत पार आवडीसी ॥ १ ॥
कृपेचें पोसणें तुमचें मी दीन । आजि संतजन मायबाप ॥ २ ॥
आरुषा उत्तरीं संतोषे माउली । कवळुनि घाली हृदयांत ॥ ३ ॥
पोटा आलें त्याचें नेणे गुणदोष । कल्याणचि आस असावी हे ॥ ४ ॥
मनाची ते चाली मोहाचिये सोई । ओघ गंगा काई परतों जाणे ॥ ५ ॥
तुका म्हणे कोठें उदार मेघां शक्ति । माझी तृषा किती चातकाची ॥ ६ ॥

५ अभंग.

जैसें तैसें बाळ मातेसी आवडे । बोलतां बोबडे शब्द गोड ॥ १ ॥
आपुले आवडी लेववी खाववी । पाहोनियां जीवीं सुख वाटे ॥ २ ॥
तुका म्हणे काय देऊं परिहार । काय ते आचार जाणतसें ॥ ३ ॥

६ अभंग.

मायेवरी सत्ता आवडीची बाळा । संकोचोनि लळा प्रतिपाळी ॥ १ ॥
अपराध माझे न मनावे मनीं । तुम्हीं संतजनीं मायबापीं ॥ २ ॥
आरुषा वचनीं लेंकुराची आळी । साहोनि कवळी मागुताली ॥ ३ ॥
तुका म्हणे अंगीं काय नाहीं सत्ता । परि निष्ठुरता उपजेना ॥ ४ ॥

७ अभंग.

आतां तुम्ही कृपावंत । साधु संत जिवलग ॥ १ ॥
गोमटें तें करा माझें । भार ओझें तुम्हांसी ॥ २ ॥
वंचिलें तें पायांपाशीं । नाहीं यासी वेगळें ॥ ३ ॥
तुका म्हणे सोडिल्या गांठी । दिली मिठी पायांसी ॥ ४ ॥

भाग ४ था.

संतनिंदा.

निंदा वसे ज्याचे चित्ता । त्यास गति नाहीं सर्वथा ॥
निंदा सकळ पापांचे माथां । दोष ईपरता असेना ॥ १ ॥

—ए. भा. ९.५०४.

१ अभंग.

संतांसी क्षोभवी कोण्याही प्रकारें । त्याचें नव्हे बरें उभयलोकीं ॥ १ ॥
देवाचा तो वैरी शत्रु दावेदार । पृथ्वीही थार नेदी तया ॥ २ ॥
संतांपाशीं ज्याचा नुरेची विश्वास । त्याचे जाले दोष बळिवंत ॥ ३ ॥
तुका म्हणे क्षीरें[1] वासराच्या अंगें । किंवा धांवे लागे विषमें मारूं ॥ ४ ॥

२ अभंग.

भुंकुनियां सुनें लागे हत्तीपाठीं । होऊनि हिंपुटी दुःख पावे ॥ १ ॥
काय त्या मशकें तयाचें करावें । आपुल्या स्वभावें पीडतसे ॥ २ ॥
मातलें बोकड विटवी पंचानना । घेतलें मरणा धरणें तेणें ॥ ३ ॥
तुका म्हणे संतां पीडितील खळ । घेती तोंड काळें करूनियां ॥ ४ ॥

३ अभंग.

संतांचे गुणदोष आणितां या मना । केलिया उगाणा सुकृताचा ॥ १ ॥
पिळोनियां पाहे पुष्पाचा परिमळ । चिरोनि केळी केळ गाढव तो ॥ २ ॥
तुका म्हणे गंगे अग्निसी विटाळ । लावी तो चांडाळ दुःख पावे ॥ ३ ॥

४ अभंग.

संतनिंदा ज्याचे घरीं । नव्हे घर ते यमपुरी ॥ १ ॥
त्याच्या पापा नाहीं जोडा । संगें जना होय पीडा ॥ २ ॥

---

१ वासरास पुढें करून तद्द्वारा गाईचें दुध हातीं लागतें; पण तसें न करतां जर दूध काढावयास गेलें तर ती रागानें दूध न देतां मारावयास धांवते. —जो. गा.

संतनिंदा आवडे ज्यासी । तो जिताची नर्कवासी ॥ ३ ॥
तुका म्हणे तो नष्ट । जाणा गाढव तो स्पष्ट ॥ ४ ॥

५ अभंग.

सेंतांचा अतिक्रम । देवपूजा तो अधर्म ॥ १ ॥
येती दगड तैसी वरी । मंत्रपुष्पें देवाशिरीं ॥ २ ॥
अतीतासी गाळी । देवा नैवेद्यासी पोळी ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । ताडण भेदकांची सेवा ॥ ४

भाग ५ वा.

गुरु.

तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् ।
शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम् ॥ १ ॥*

गुरुची आवश्यकता.

१ ओंव्या.

जयजयाजी सद्गुरु पूर्णकामा । परम पुरुषा आत्मयारामा ॥
अनिर्वाच्य तुमचा महिमा । वर्णिला न वचे ॥ १ ॥

---

१ आपल्या घरीं देवपूजा करीत असतांना संत आले तर त्यांचा आदरसत्कार न करितां, देवपूजा करीत राहणें हा अधर्म आहे. अशा वेळीं देवाच्या मस्तकावर वाहिलेली मंत्रपुष्पें हीं देवास दगडांच्या प्रहारांसारखीं लागतात. तिसऱ्या चरणांत वर्णिल्याप्रमाणें भेद करणारांची सेवा ही देवास ताडण म्हणजे प्रहारवत् लागतं.

करितां देवार्चन । घरा आले संतजन ॥ १ ॥ देव सारावे परते । संत पूजावे आरते ॥ २ ॥
—तुकाराम.

* आपलें खरें श्रेय जाणण्याची ज्यास इच्छा असेल त्यानें गुरूला शरण जावें. गुरु शब्दब्रह्मनिष्णात म्हणजे वेदपारंगत व परब्रह्मनिष्णात म्हणजे आत्मसाक्षात्कार झालेला आणि शान्तियुक्त असावा. —भागवत ११.३.२१.

जें वेदांस सांकडें । जें शब्दासि कानडें ॥
तें सत्शिष्यासि रोकडें । अलभ्य लाभे ॥ २ ॥

जें योगियाचें निजवर्म । जें शंकराचें निजधाम ॥
जें विश्रांतीचें निजविश्राम । परम गुह्य अगाध ॥ ३ ॥

तें ब्रह्म तुमचेनि योगें । स्वयें आपणचि होइजे अंगें ॥
दुर्घट संसाराचेनि पांगें । पांगिजेना सर्वथा ॥ ४ ॥

स्वधर्मकर्मीं पूज्य ब्राह्मण । परी ज्ञान नव्हे सद्गुरुविण ॥
ब्रह्मज्ञान नसतां सीण । जन्ममृत्य चुकेना ॥ ५ ॥

ज्ञानविरहित जें जें केलें । तें तें जन्मासि मूळ जालें ॥
म्हणौनि सद्गुरूचीं पाउलें । सुदृढ धरावीं ॥ ६ ॥

येज्ञादिकें कर्में केलीं । हृदईं फळाशा कल्पिली ॥
आपुले इच्छेनें घेतली । सूति जन्मार्ची ॥ ७ ॥

करूनि नाना सायास । केला चौदा विद्यांचा अभ्यास ॥
रिद्धीसिद्धी सावकाश । वोळल्या जरी ॥ ८ ॥

तरी सद्गुरुकृपेविरहित । सर्वथा न घडे स्वहित ॥
यमपुरीचा अनर्थ । चुकेना येणें ॥ ९ ॥

सद्गुरुचेनि अभयकरें । प्रगट होइजे ईश्वरें ॥
जन्मदुःखें अपारें । नासोनि जाती ॥ १० ॥

मागां जाले थोर थोर । संत महंत मुनेश्वर ॥
तयांसहि ज्ञानविचार । सद्गुरुचेनी ॥ ११ ॥

श्रीरामकृष्णादिकरूनी । अतितत्पर गुरुभजनीं ॥
सिद्ध साधु आणि सज्जनीं । गुरुदास्य केलें ॥ १२ ॥

असो जयासि मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा ॥
सद्गुरुविणें मोक्ष पावावा । हें कल्पांतीं न घडे ॥ १३ ॥

गुरुलक्षण.

१ ओंव्या. (१)

जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञानअंधार निरसी ॥
जीवात्मया परमात्मयासी । ऐक्यता करी ॥ १ ॥
बिघडले देव आणि भक्त । जीवशिवपणें द्वैत ॥
तयां देवभक्तां येकांत । करी तो सद्गुरु ॥ २ ॥
भवव्याघ्रें घालूनि उडी । गोवत्सांस ताडातोडी ॥
केली देखोनि सीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ॥ ३ ॥
वासनानदीमहापूरीं । प्राणी बुडतां ग्लानि करी ॥
तेथें उडी घालूनि तारी । तो सद्गुरु जाणावा ॥ ४ ॥
प्राणी मायाजाळीं पडिले । संसारदुःखें दुखवले ॥
ऐसे जेणें मुक्त केले । तो सद्गुरु जाणावा ॥ ५ ॥
गर्भवास अतिसांकडी । इच्छाबंधनाची बेडी ॥
ज्ञान देऊनि सीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ॥ ६ ॥
जीव येकदेशी बापुडें । तयासि ब्रह्माचि करी रोकडें ॥
फेडी संसारसांकडें । वचनमात्रें ॥ ७ ॥
शिष्यास न लाविती साधन । न करविती इंद्रियेंदमन ॥
ऐसे गुरु आडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावे ॥ ८ ॥
जो कोणी ज्ञान बोधी । समूळ आविद्या छेदी ॥
इंद्रियेंदमन प्रतिपादी । तोचि सद्गुरु जाणावा ॥ ९ ॥
मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाविजे विमळ ज्ञान ॥
निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिती ॥ १० ॥
याहिवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ ॥
विशेष आचारें निर्मळ । स्वधर्माविषईं ॥ ११ ॥
याहिवरी अध्यात्मश्रवण । हरिकथानिरूपण ॥
जेथें परमार्थविवरण । निरंतर ॥ १२ ॥

जेथें सारासारविचार । तेथें होय जगदुद्धार ॥
नवविध भक्तीचा आधार । बहुत जनांसी ॥ १३ ॥
म्हणोनि नवविधा भजन । जेथें प्रतिष्ठलें साधन ॥
हें सद्गुरूचें लक्षण । श्रोतीं वोळखावें ॥ १४ ॥
नाना सद्विद्येचे गुण । याहीवरी कृपाळूपण ॥
सद्गुरूचें हें लक्षण । जाणिजे श्रोतीं ॥ १५ ॥

३ ओंव्या. (१)

...जो कायावाचामनें । अति कृपाळू दीनाकारणें ॥
तोडी शिष्याचीं भवबंधनें । उठवी ठाणें अहंकाराचें ॥ १ ॥
जो शब्दज्ञानें पारंगतू । ब्रह्मानंदें सदा डुल्लतू ॥
शिष्य प्रबोधनीं समर्थू । यथोचितू निजभावें ॥ २ ॥
शिष्य देखावा पुत्रासमान । हें स्मृतिवाक्य असे प्रमाण ॥
दृष्टी देखों नेणे गौण । शिष्या देखे पूर्ण ब्रह्मत्वें ॥ ३ ॥
शिष्य सेवा करी निज भावार्थें । परी तो सेवक न म्हणे त्यातें ॥
ज्यासी भगवद्रूप सर्व भूतें । शिष्य वेगळा तेथें सेवकत्वें नुरे ॥ ४ ॥
ऐसा मी एक महायोगी । हेंही न मिरवी तो जगीं ॥
गुरुत्वाचा ताठा अंगीं । सर्वथा शिगीं लागों नेदी ॥ ५ ॥
आपुल्या योगक्षेमाचें सांकडें । स्वप्नींही न घाली शिष्याकडे ॥
शिष्यसंकट अतिगाढें । निवारी रोकडें निजांगें जो ॥ ६ ॥
मी एक अकर्ता निजात्मयोगी ! म्हणौनी विषयांतें न भोगी ॥
अथवा विषयो निःशेष त्यागी । हाही आग्रहो अंगीं असेना ॥ ७ ॥
तो विषय भोगी ना स्वयें त्यागी । तो अदृष्टाच्या निजविभागीं ॥
लावूनियां देहाच्या[1] अंगीं । परब्रह्मयोगीं विचरत ॥ ८ ॥

---

१ ' देवाच्या ' असा एकनाथमहाराजांचा मूळ पाठ असावा काय ?

देह दैवें पालखीमाजीं चढे । अथवा विष्ठेमाजीं पडे ॥
तें दोहींचें सुखदुःख त्याकडे । मी म्हणौनि पुढें कदा न रिघे ॥९॥
देहीं असोनि नाहीं अहंकृति । गेहीं असोनि नाहीं गृहासक्ती ॥
शेखीं लोकांमाजीं लौकिकस्थितीं । सुखें वर्ततो लोकांसरिसें ॥१०॥
त्यासी स्त्री म्हणे माझा भर्ता । पुत्र म्हणे माझा पिता ॥
शिष्य म्हणती गुरु तत्वतां । तो त्यांहूनि परता त्यांमाजीं वर्ते॥११॥

४ ओंव्या. (३)

जयजयाजी सद्गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा ॥
परम पुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधु ॥ १ ॥
तुझीयेन अभयकरें । अनावर माया हे ओसरे ॥
जैसें सूर्यप्रकाशें अंधारें । पळोन जाय ॥ २ ॥
आदित्यें अंधकार निवारे । परंतु मागुतें ब्रह्मांड भरे ॥
नीसी जालियानंतरें । पुन्हा काळोखें ॥ ३ ॥
तैसा नव्हे स्वामीराव । करी जन्ममृत्य वाव ॥
समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ॥ ४ ॥
सुवर्णाचें लोहो कांहीं । सर्वथा होणार नाहीं ॥
तैसा गुरुदास संदेहीं । पडोंचि नेणे सर्वथा ॥ ५ ॥
कां सरिता गंगेसी मिळाली । मिळणी होतां गंगा जाली ॥
मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ॥ ६ ॥
परी ते सरिता मिळणीमागें । वाहाळ मानिजेत जगें ॥
तैसा नोहे शिष्य वेगें । स्वामीच होये ॥ ७ ॥
परीस आपणा ऐसें करीना । सुवर्णें लोहो पालटेना ॥
उपदेश करी बहुत जनां । अंकित सद्गुरूचा ॥ ८ ॥
शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णें सुवर्ण करितां न ये ॥
म्हणौनि उपमा न साहे । सद्गुरूसी परिसाची ॥ ९ ॥

५ अभंग.

सद्गुरुवांचुनी सांपडेना सोय । धरावे ते पाय आधीं आधीं ॥ १ ॥
आपणासारिखे करिती तात्काळ । कांहीं काळवेळ न लगे त्यांशीं ॥ २ ॥
लोहपरिसाची न साहे उपमा । सद्गुरुमहिमा अगाधची ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें आंधळें हें जन । गेलें विसरून खऱ्या देवा ॥ ४ ॥

६ अभंग.

नमूं सद्गुरु अनंता । ज्याची देवावरी सत्ता ॥ १ ॥
त्याचें होतां अवलोकन । करी आपणासमान ॥ २ ॥
ते हे सद्गुरु जाणावे । काळ कांपे ज्यांच्या नांवें ॥ ३ ॥
तुका वर्णितो पवाडे । ऐसे गुरु भक्त थोडे ॥ ४ ॥

७ अभंग.

ॐकारस्वरूपा सद्गुरुसमर्था । अनाथाच्या नाथा तुज नमो ॥ १ ॥
गुरुराव स्वामी आतां स्वप्रकाश । ज्यापुढें उदास चंद्र रवी ॥ २ ॥
वेदां पडलें मौन शास्त्रें वेडावलीं । वाचा हे निमाली ते श्रीगुरु ॥ ३ ॥
श्रीगुरु जयासी पाहे कृपादृष्टी । तयासी हे सृष्टी पांडुरंग ॥ ४ ॥
प्रभुराज माझा स्वामी गुरुराव । देतो मज भाव शुद्ध भूमि ॥ ५ ॥
भूमि शुद्ध करी ज्ञानबीज पेरी । अद्वैत हे धरी मी तूं नेणें ॥ ६ ॥
मजलागीं माझी सद्गुरु माउली । कृपा करी साउली वर्णूं काय ॥ ७ ॥
एका जनार्दनीं गुरु परब्रह्म । तयाचें पैं नाम सदा मुखीं ॥ ८ ॥

८ अभंग.

सद्गुरुचे पाय जीवें न विसंबावे । मन वळवावें वृत्तिसहित ॥ १ ॥
डोळियाचे डोळे उघडले जेणें । आनंदाचें लेणें लेववीलें ॥ २ ॥

---

१ मुमुक्षूंस मोक्ष देण्यासाठीं गुरूचेंच रूप ईश्वराला घ्यावें लागतें, म्हणून ईश्वराहून गुरूच श्रेष्ठ आहे असें गुरुभक्त मानतो; वस्तुतः गुरु व देव दोन नाहींत.—प्रदीप पृ. ८९.

जैसा देवाचे ठायीं भावो । तैसाचि गुरुचरणीं सद्भावो । गुरुदेवांमाजीं पहा हो । भिन्नत्वभावो असेना ॥ १ ॥ —ए. भा. ३.५७७.

जन्ममरणांचें फेडिलें सांकडें । कैवल्याचि फुडें दाखविलें ॥ ३ ॥
मोहरले तरु पुष्पफळभारें । तेचि निर्विकार सनकादिक ॥ ४ ॥
नामा म्हणे स्वामी खेचर माउली । कृपेची साउली केली मज ॥ ५ ॥

९ अभंग.

सद्गुरुनायकें पूर्ण कृपा केली । निजवस्तु दाविली माझी मज ॥ १ ॥
माझें सुख मज दावियेलें डोळां । दिधली प्रेमकळा ज्ञानमुद्रा ॥ २ ॥
तया उतराई व्हावें कवण्या गुणें । जन्मा नाहीं येणें ऐसें केलें ॥ ३ ॥
डोळियांचा डोळा उघडिला जेणें । लेवविलें लेणें आनंदाचें ॥ ४ ॥
नामा म्हणे निकी सांपडली सोय । न विसंबें पाय खेचराचे ॥ ५ ॥

१० पद.

झालें बाई वेडी । दरबार गुरूचा झाडीं ॥ ध्रु० ॥
देहपीतांबर फाडिला । नवरत्नांचा हार काढिला ।
सद्गुरूचे गळां घातला । वासना सोडी ॥ दरबार० ॥ १ ॥
कल्पनाकांचोळी काढिली । त्रिगुणाची वेणि सोडिली ।
चारि देहांची मुक्ति साधिली । परी ती थोडी ॥ दरबार० ॥ २ ॥
वेडी झाल्यें सद्गुरुघरची । चिंता हारपली मनाची ।
सोय दाखविली स्वस्वरूपाची । लागली गोडी ॥ दरबार० ॥ ३ ॥
चिन्मयस्वरूप दाखवीलें । आपणांमध्यें मेळवीलें ।
पूर्णानंद गुरूनें केलें । पाय ना सोडीं ॥ दरबार० ॥ ४ ॥

११ अभंग.

श्रीगुरुसारिखा असतां पाठिराखा । इतरांचा लेखा कोण करी ॥ १ ॥
राजयाची कांता काय भीक मागे । मनाचिया जोगें सिद्धि पावे ॥ २ ॥
कल्पतरुतळवटीं जो कोणी बैसला । काय वाणी त्याला सांगिजो जी ॥ ३ ॥
ज्ञानदेव म्हणे तरलों तरलों । आतां उद्धरलों गुरुकृपें ॥ ४ ॥

प्रकरण ५ वें.

प्रपंच आणि परमार्थ.

तो नर भला भला रे भला भला ।
प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला ॥

भाग १ ला.

प्रपंच.

१ प्रपंच कीं परमार्थ ?

१ श्लोक.

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ १ ॥
कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ २ ॥
यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।
कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ३ ॥*

---

* (१) कोणी झाला तरी (कांहींना काहीं) कर्म केल्यावांचून क्षणभर देखील केव्हांहि रहात नाहीं. प्रकृतीचे गुण परतंत्र झालेल्या प्रत्येक इसमास (नेहमीं कांहींना कांहीं तरी) कर्म करण्यास लावीत असतात. (२) (हस्तपादादि) कर्मेंद्रियें आंवरून मनानें जो मूढ इंद्रियांच्या विषयांचें चिंतन करीत रहातो, त्याला मिथ्याचार म्हणजे दांभिक म्हणतात. (३) पण मनानें इंद्रियांचें नियमन करून, (केवळ) कर्मेंद्रियांनीं अनासक्तबुद्धीनें जो कर्मयोगाचा आरंभ करितो त्याची योग्यता हे अर्जुना ! विशेष आहे. —गी. ३.५–७.

२ श्लोक.

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ १ ॥
एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च ॥
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥ २ ॥
नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ॥
मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥ ३ ॥*

३ ओंव्या.

संसारीं असतां मुक्त । तोचि जाणावा संयुक्त ॥
अखंड पाहे युक्तायुक्त । विचारणा हे ॥ १ ॥
प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण ॥
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थीं खोटा ॥ २ ॥
म्हणौन सावधानपणें । प्रपंच परमार्थ चालवणें ॥
ऐसें न करितां भोगणें । नाना दुःखें ॥ ३ ॥
प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल ॥
प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ॥ ४ ॥
प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला † ॥
मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ॥ ५ ॥

---

* (१) यज्ञ, दान, तप आणि कर्म यांचा त्याग करूं नये; तीं (कर्में) केलींच पाहिजेत. यज्ञ, दान व तप हीं शहाण्या पुरुषांस (–हि) पावन म्हणजे चित्तशुद्धिकारक आहेत. (२) म्हणून हीं यज्ञदानादि कर्में सुद्धां आसक्ति न ठेवितां, फलाची आशा न धरितां, केलींच पाहिजेत, असें हे पार्था ! माझें निश्चित मत (असून तेंच) उत्तम आहे. (३) कारण जें कर्म (स्वधर्माप्रमाणें) नियत म्हणजे नेमलेलें त्याचा संन्यास म्हणजे त्याग करणें (कोणासहि) योग्य नाहीं. मोहामुळें केलेला त्याचा त्याग तामस म्हटला आहे. —गी. १८०५–७.

† शरीरयात्रापि च ते न प्रसिद्धयेदकर्मणः । कर्म न केलेंस तर (खायला न मिळतां) तुझा शरीरनिर्वाहसुद्धां चालावयाचा नाहीं. —गी. ३.८.

परमार्थ सांडूनि प्रपंच करिसी । तरी तूं यमयातना भोगिसी ॥
अंतीं परम कष्टी होसी । यमयातना भोगितां ॥ ६ ॥

४ ओंव्या.

नाना वेश नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम ॥
जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ॥ १ ॥
याकारणें गृहस्थाश्रम । सकळांमध्यें उत्तमोत्तम ॥
परंतु पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया ॥ २ ॥
जेथें शडकर्मे[1] चालती । विध्योक्त क्रिया आचरती ॥
वाग्माधुर्यें बोलती । प्राणिमात्रासी ॥ ३ ॥
सर्व प्रकारें नेमक । शास्त्रोक्त करणें कांहीं येक ॥
त्याहीमध्यें अलौकिक । भक्तिमार्ग ॥ ४ ॥
पुरश्चरणी कायाक्लेसी । दृढवृत्ती परमसायासी ॥
जगदीशावेगळें जयासी । थोर नाहीं ॥ ५ ॥
काया वाचा जीवें प्राणें । कष्टे भगवंताकारणें ॥
मनें घेतलें धरणें । भजनमार्गीं ॥ ६ ॥
वेडे संसार सोडुन गेले । तरी ते कष्टकष्टोंच मेले ॥
दोहींकडे अंतरले । इहलोक परत्रीं ॥ ७ ॥

५ अभंग.

असा घराश्रमीं लक्ष लावा ब्रह्मीं । निवटावें नामीं केशवाच्या ॥ १ ॥
संसाराचा धंदा सर्वही करावा । निजध्यास व्हावा भगवंताचा ॥ २ ॥
तुका म्हणे संतीं विवेक करावा । राग न धरावा बोलण्याचा ॥ ३ ॥

६ अभंग.

प्रथम भाव शुद्ध कर । अंगीं वैराग्याचा भर ॥
भक्ति पाहिजे शिरजोर । याहुनी योग कोणता ॥ १ ॥

---

१ अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा । दानं प्रतिग्रहश्चैव षट्कर्माण्यग्रजन्मनः ॥ १ ॥
—मनुस्मृति १०.७५.

नको त्यजूं स्त्रिया पोर । बांधीं सोपे माड्या घर ॥
आल्या अतिथा आदर । याहुनी धर्म कोणता ॥ २ ॥
करीं नामाचा गजर । जाणें संतांची कदर ॥
तुका म्हणे तोचि नर । ब्रह्मज्ञानी पुरता ॥ ३ ॥

७ अभंग.

प्रपंचीं असूनी परमार्थ साधावा । वाचे आठवावा रामकृष्ण ॥ १ ॥
उंच नीच कांहीं न पाहें सर्वथा । पुराणींच्या कथा पुराणींच ॥ २ ॥
घटिका आणि पळ साधीं उतावीळ । वाउगा तो काळ जाऊं नेदीं ॥ ३ ॥
सांवता म्हणे वाचे जपें नामावळी । हृदयकमळीं रामकृष्ण ॥ ४ ॥

---

२ प्रपंचांत कसें वागावें ? (अ.)

संसारा आलिया एक सुख आहे । आठवावे पाय विठोबाचे ॥ १ ॥
येणें होय सर्व संसार सुखाचा । नलगे दुःखाचा लेश कांहीं ॥ २ ॥

१ अभंग.

रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥ १ ॥
जीवाही आगोज पडती आघात । येऊनियां नित्य नित्य वारू ॥ २ ॥
तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें । अवघीयांचें काळें केलें तोंड ॥ ३ ॥

२ अभंग.

बाळया भोळया जना उपाय हा सोपा । मन्मथाच्या बापा शरण जावें ॥ १ ॥
सर्वस्वें आपुला भार त्याच्या माथां । घालोनियां व्यथा ओसरावी ॥ २ ॥
अहंतेचा नाश सर्वस्वीं करावा । कृष्ण ओळखावा सर्वी ठायीं ॥ ३ ॥
जैसें जैसें घडे संतोष सांकडें । तें तें देवाकडे समर्पावें ॥ ४ ॥
असत्य दांभिक सांडावी कामना । निंदा द्वेष मना नातळावीं ॥ ५ ॥
पोटा प्रावरणाची चिंता नाठवावी । प्रारब्धाचे गांवीं सर्व आहे ॥ ६ ॥

---

१ जिवावर अकस्मात् आघात होतात, त्यांचें निरंतर निवारण करावें लागतें. —जो.गा.

भोगावें सर्वही प्रारब्धाचें फळ । करावें अढळ अंतरासी ॥ ७ ॥
वैराग्याच्या बळें असावें उदास । कोण्या वैभवास भुलूं नये ॥ ८ ॥
स्वधर्मीं वर्ततां लज्जा ओसरावी । अधर्मीं धरावी लज्जा थोर ॥ ९ ॥
सर्वां ठायीं नाम गोविंदाचें घ्यावें । अंतरीं धरावें विरक्तीसी ॥ १० ॥
दयार्णवामाजी जातां याचि वाटे । अकस्मात भेटे स्वानंदासी ॥ ११ ॥

३ अभंग.

देवाचिये माथां घालूनियां भार । सांडी कलेवर ओंवाळूनि ॥ १ ॥
नाथिला हा छंद अभिमान अंगीं । निमित्याचें वेगीं सारीं ओझें ॥ २ ॥
करुणावचनीं लाहो एकसरें । नेदावें दुसरें आड येऊं ॥ ३ ॥
तुका म्हणे सांडीं लटिक्याचा संग । आनंद तो मग प्रगटेल ॥ ४ ॥

४ अभंग.

जाणोनि नेणतें करीं माझें मन । तुझी प्रेमखूण देऊनियां ॥ १ ॥
मग मीं व्यवहारीं असेन वर्तत । जेवीं जळाआंत पद्मपत्र ॥ २ ॥
ऐकोनि नाइकें निंदास्तुति कानीं । जैसा कां उन्मनी योगीराज ॥ ३ ॥
देखोनि न देखें प्रपंच हा दृष्टी । स्वप्नींचिया सृष्टि चेइल्या जेवीं ॥ ४ ॥
तुका म्हणे ऐसें जालियावांचून । करणें तें सीण वाटतसे ॥ ५ ॥

५ अभंग.

उडाली पक्षिणी गेली अंतराळीं । चित्त बाळाजवळी ठेवूनियां ॥ १ ॥
तैसें माझें मन राहो कां ईश्वरीं । मग सुखें संसारीं असेन कां ॥ २ ॥
धेनु चरे वनीं वत्स असे घरीं । चित्त वत्सावरी ठेवुनी फिरे ॥ ३ ॥
दुडीवरी दुडी सखियीं गोष्टी करी । चित्त दुडीवरी ठेवूनियां ॥ ४ ॥
विष्णुदास नामा विनवी परोपरी । हें प्रेम श्रीहरी द्यावें मज ॥ ५ ॥

६ अभंग.

पाण्या निघाली गुजरी । मन ठेविलें दों घागरीं ॥
चाले मोकळ्या पदरीं । परी लक्ष तेथें ॥ १ ॥

वावडी उडाली अंबरीं । हातीं धरोनियां दोरी ॥
दिसे दुरीच्या दुरी । परी लक्ष तेथें ॥ २ ॥
चोर चोरी करी । ठेवी वनांतरी ॥
वर्ततसे चराचरीं । परी लक्ष तेथें ॥ ३॥
व्यभिचारिणी नारी । घराश्रम करी ॥
परपुरुष जिव्हारीं । परी लक्ष तेथें ॥ ४ ॥
तुका म्हणे असो । भलतिये व्यापारीं ॥
लक्ष सर्वेश्वरीं । चुकों नेदीं † ॥ ५ ॥

७ ओंव्या.

..... जेवीं पर पुरुषीं लाऊन प्रीती ॥
जारिणी मंदिरीं रहाटती । लौकिकस्थितीसारिख्या ॥ १ ॥
चातक वसे भूमंडळीं । परी त्याचे लक्ष मेघमंडळी ॥
कमळिणी राहिल्या सरोवरीं । परी भास्करावरी मन त्यांचें ॥ २ ॥
कीं धेनु चरत असतां डोंगरीं । परी चित्त ठेविलें वत्सावरी ॥
कीं मन ठेवूनि द्रव्यावरी । कृपण बाजारीं हिंडतसे ॥ ३ ॥
नातरी चित्त ठेवूनि चोरीवर । सोनार घडिती अलंकार ॥
कीं दूरी असोन चकोर । रोहिणीवर लक्षिती ॥ ४ ॥
कीं कुंभ घेऊनि शिरावरी । मोकळ्या हातें चालती नारी ॥
लक्ष ठेवूनि दुडियेवरी । लोकाचारीं बोलत ॥ ५ ॥
कीं चित्त ठेवूनि पुष्पावर । मिलिंद आकाशीं देत गुंजार ॥
तेवीं बाह्यात्कारें करूनि संसार । अंतरीं श्रीधर असावा ॥ ६ ॥

८ अभंग.

आला भागासी तो करीं वेवसाव । परि राहो भाव तुझ्या पायीं ॥ १ ॥
काय चाले तुम्हीं बांधलें दातारा । वाहिलिया भारा उसंतितों ॥ २ ॥

---

† आता केशीराजा हेचि विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ देह असो माझा भलतिये ठायीं । चित्त तुझ्या पायीं असों द्यावें ॥ २ ॥ —तुकाराम.

शरीर तें करी शरीराचे धर्म । नको देऊं वर्म चुकों मना ॥ ३ ॥
चळण फिरवी ठाव बहुवस । न घडो आळस चिंतनाचा ॥ ४ ॥
इंद्रियें करोत आपुले व्यापार । आवडीसी थार देईं पायीं ॥ ५ ॥
तुका म्हणे नको देऊं काळाहातीं । येतों काकुळती म्हणऊनि ॥ ६ ॥

९ अभंग.

कायें करूनी करीं धंदा । चित्त गोविंदा तुझे पायीं ॥ १ ॥
ऐशा संकल्पाची संधि । माझे बुद्धि धीर देवा ॥ २ ॥
कुटुंबाचा तुम्हां भार । मज व्यवहार निमित्य ॥ ३ ॥
तुका म्हणे करितां काम । हृदयीं नाम धरीन ॥ ४ ॥

१० अभंग.

सुखीं संसारीं असावें । चित्त परब्रह्मीं ठेवावें ॥ १ ॥
पहा न्याय कमळिणीचा । सोस न करी जीवनाचा ॥ २ ॥
ताकामध्यें लोणी राहे । त्याचा मेळवणी कदा न होय ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याच परी । सुखें असावें संसारीं ॥ ४ ॥

११ अभंग.

ऐसें असावें संसारीं । जोंवरि प्राचीनाची दोरी ॥ १ ॥
पक्षी आंगणासी आले । आपुला चारा चरोनि गेले ॥ २ ॥
मुलीं घरचार मांडिला । खेळ मोडोनि टाकिला ॥ ३ ॥
वाटसरू वाटा आले । प्रातःकाळीं उठोनि गेले ॥ ४ ॥
मार्गीं बहुसाल भेटले । तेथें मन नाहीं गुंतलें ॥ ५ ॥
एका विनवी जनार्दना । ऐसें असतां भय कोणा ॥ ६ ॥

११ अभंग.

स्वयें घरदार प्रपंच मांडिला । मोडुनियां दिला बाळाहातीं ॥ १ ॥
तैसें सर्वीभूतीं असावें संसारीं । प्राचीनाची दोरी साक्ष आहे ॥ २ ॥
वाटसरु वस्ती येऊनि राहिला । प्रातःकाळीं गेला उठोनियां ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हां नाहीं प्रापंचिक । पंढरीनायक साह्य झाला ॥ ४ ॥

१३ अभंग.

सर्वस्वाचा त्याग तो सदा सोंवळा । न लिंपे विटाळा अग्नि जैसा ॥ १ ॥
सत्यवादी करी संसार सकळ । अलिप्त कमळ जळीं जैसें ॥ २ ॥
घडे ज्या उपकार भूतांची ते दया । आत्मस्थिती तया अंगीं वसे ॥ ३ ॥
न बोले गुणदोष नाइके जो कानीं । वर्तोनि तो जनीं जनार्दन ॥ ४ ॥
तुका म्हणे वर्म जाणितल्याविण । पावे करितां सीण सांडीमांडी ॥ ५ ॥

प्रपंचांत कसें वागावें ? (आ.)

१ श्लोक.

संसारीं असतां प्रवाहपतितद्वन्द्वांसि त्रासूं नको,
खेदाखेद मनांत आणुनि वनीं जाणें विचारूं नको ।
कर्णीं दुष्ट कठोर शब्द पडती तें दुःख मानूं नको,
भोगें दुःखसुखादि सारुनि निजानंदास भंगूं नको ॥ १ ॥
प्रारब्धीं सुखभोगयोग नसतां तें दैन्य मानूं नको,
इन्द्राची बहु संपदा गणुं नको, क्षुद्रार्थ वांछूं नको ।
देहाचें कृतकर्मदुःख आपुलें कोणास सांगूं नको,
भूलोकांत महा प्रसंग पडतां तूं सत्व सोडूं नको ॥ २ ॥
लाभीं हर्ष नको विषादहि नको, निंदाप्रशंसा नको,
हानीचा मनिं शोक तूं धरुं नको, देहीं अहंता नको ।
कोणाचें इतिकृत्य तें स्मरुं नको, माझें तुझें हें नको,
आप्तांसी ममता नको, गुरुपरब्रह्मासि सोडूं नको ॥ ३ ॥
माया मोह नको, सुसंग असतां सोडूनि जाऊं नको,
चिंताशोक नको, परार्थ करितां लोकांस लाजूं नको ।
वर्मोच्चार नको, जनांत बसतां गोष्टी भवाच्या नको,
चित्तीं राग नको अनावर, खरें वैराग्य सोडूं नको ॥ ४ ॥

नानाचार नको, कुकर्म करणें हे क्षुद्रबुद्धी नको,
मायाकल्पित वित्तवाजिकरि हे भोगार्थ वांछूं नको ।
कायक्लेश नको, जनीं मुढ अशा संगांत बैसूं नको,
जेथें जाउनि येत ना मुनि कदा † तें धाम सोडूं नको ॥ ५ ॥

१ अभंग.

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करी ॥ १ ॥
उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥ २ ॥
परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥ ३ ॥
भूतदया गायीपशूंचें पाळण । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥ ४ ॥
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचें ॥ ५ ॥
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परम-पद-बळ वैराग्याचें ॥ ६ ॥

२ अभंग.

पराविया नारी माउली समान । मानिलिया धन काय वेचे ॥ १ ॥
न करितां परनिंदा परद्रव्यअभिलाष। काय तुमचें यास वेचे सांगा ॥ २ ॥
बैसालिये ठायीं म्हणतां राम राम । काय होय श्रम ऐसें सांगा ॥ ३ ॥
संतांच्या वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेचे सांगा ॥४॥
खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेचे यास ऐसें सांगा ॥ ५ ॥
तुका म्हणे देव जोडे याजसाठीं । आणीक ते आटी न लगे कांहीं ॥६॥

४ अभंग.

पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणिक नाहीं जोडा दुजा यासी॥१॥
सत्य तोचि धर्म असत्य तें कर्म । आणिक हें वर्म नाहीं दुजें ॥ २ ॥
गति तेचि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विन्मुखता ॥ ३ ॥
संतांचा संग तोचि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळ ॥ ४ ॥
तुका म्हणे उघडें आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ॥ ५ ॥

---

† यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम । जेथें गेलें असतां परत येत नाहींत (असें) तें माझें परम स्थान होय. —गी. १५.६.

६. स्वहितसाधन.

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ *

१ अभंग.

मुंगीचिया घरा कोण जाय मूळ । देखोनियां गूळ धांव घाली ॥ १ ॥
याचकाविण काय खोळंबला दाता । तोचि धांवे हिता आपुलिया ॥ २ ॥
उदक अन्न काय म्हणे मज खाय । भुकेला तो जाय चोजवीत ॥ ३ ॥
व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा । दुःखाच्या परिहारा आपुलिया ॥४॥
तुका म्हणे जया आपुलें स्वहित । करणें तोचि प्रीत धरी कथे ॥ ५ ॥

२ अभंग.

लोहो परिसासीं रूसलें । सानेंपणासी मूकलें ॥ १ ॥
एथें कोणाचें काय गेलें । ज्याचें तेणें अनहित केलें ॥ २ ॥
गंगा आली आळशावरी । आळशी देखोनि पळे दुरी ॥ ३ ॥
गांवाखालील ओहळ । रागें गंगेसी न मिळे ॥ ४ ॥
तुका केशवाचा दास । गुरूसी न भजे शिष्य ॥ ५ ॥

३ अभंग.

तेलणीशीं रुसला वेडा । रागें कोरडें खातो भिडा ॥ १ ॥
आपुलें हित आपण पाही । संकोच तो न धरी कांहीं ॥ † ॥ २ ॥
नोडिलें लोकां टाकिला गोहो । बोडिलें डोकें सांडिला मोहो ॥ ३ ॥

---

* (मनुष्यानें) आपण होऊन आपला उद्धार करावा. आपण आपल्या स्वतःला कधींहि खचवूं नये. कारण (प्रत्येक मनुष्य) आपणच आपल्या स्वतःचा बंधु (म्हणजे मदत करणारा) किंवा आपणच आपला शत्रु (म्हटला आहे). —गी. ६.५.

† नव्हे जगीं कोणी मुकियाचा जाण । सार्थक लाजोन नव्हे हित ॥—गा. ६८३.

१ कोणी एक आचरट स्त्री दुसऱ्याला अपशकून करण्याच्या हेतूनें आपल्या जिवंत असलेल्या नवऱ्यास सोडून व आपल्या डोकीवरच्या केंसाचा मोह टाकून तिनें केस बोडून घेतले. —जो. गा. ३१.

शेजारणीच्या गेली रागें । कुतऱ्यांनीं घर भरिलें मागें ॥ ४ ॥
पिसारागें भाजिलें घर । नागवली तें नेणे फार ॥ ५ ॥
तुका म्हणे वांच्या रागें । फेडिलें सावलें देखिलें जगें ॥ ६ ॥

४ पद.

एथें कोणाचें काय बा गेलें । ज्याचें त्यानेंच अनहित केलें ॥ ध्रु० ॥
संतीं सांगितलें ऐकेना । स्वतां बुद्धिही असेना ॥
वृत्ति निबरली पिकेना । मूढ कोणाचें ऐकेना ॥ एथें० ॥ १ ॥
अन्य यातिचे संगती लागे । साधु जनांमध्यें न वागे ॥
केल्यावीण पराक्रम सांगे । जेथें सांगे तेथेंचि भीक मागे ॥ एथें० ॥ २ ॥
नीत टाकुनी अनीत चाले । भडभड भलतेंच बोले ॥
मंद होउनी उन्मत्त डोले । अखेर फार वाईट झालें ॥ एथें० ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं नेम । चित्तीं न धरी अधम ॥
सांग पडलासे भ्रम । अंतीं कुटील त्यासी यम ॥ एथें० ॥ ४ ॥

---

१ पिसवांच्या रागामुळें घर जाळून टाकलें. २ एका अमंगळ स्त्रीच्या लुगड्यांत अतिशय उवा झाल्या; त्यांच्या रागानें तिनें आपलें लुगडें फेडून टाकिलें त्यामुळें तिला सर्व लोकांनीं नागवें पाहिलें. —जो. गा. ३१.

ई. सदाचार.

या साधूंश्च खलान्करोति विदुषो मूर्खान् हितान्द्वेषिणः
प्रत्यक्षं कुरुते परोक्षममृतं हालाहलं तत्क्षणात् ।
तामाराधय सत्क्रियां भगवतीं भोक्तुं फलं वांछितं
हे साधो व्यसनैर्गुणेषु विपुलेष्वास्थां वृथा मा कृथाः ॥ १ ॥ *

१ अभंग.

नसावें ओशाळ । मग मानिती सकळ ॥ १ ॥
जाय तेथें पावे मान । चाले बोलिलें वचन ॥ २ ॥
राहों नेदी बाकी । दान ज्याचें त्यासी टाकी ॥ ३ ॥
व्हावा वाटे जना । तुका म्हणे साठीं गुणां ॥ ४ ॥

सत्य.

सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तोंचि परब्रह्म ।

—मुक्तेश्वर.

नानृतात्पातकं किंचिन्न सत्यात्सुकृतं परम् ** ।

२ अभंग.

सत्य बोले निरंतर । तोच पुण्याचा सागर ॥ १ ॥
देव त्यानें जिंकियेला † । तिहीं लोकीं मानवला ॥ २ ॥
तुका म्हणे जन्मुनियां । शांती सुख लाभे तया ॥ ३ ॥

---

* इष्ट फळ मिळविणें असेल तर हे भल्या माणसा ! जो दुर्जनांस सज्जन, मूर्खांस विद्वान्, देष्ट्यांना हितकर्ते व परोक्षाचें प्रत्यक्ष करितो व हालाहलाचें तत्क्षणींच अमृत बनवितो त्या भगवान् सदाचाराची आराधना कर. इतर अनेक गुण संपादन करण्याचा दीर्घ खटाटोप करण्याच्या भरीस तूं व्यर्थ पडूं नकोस. —भर्तृहरि २.

** सत्यायेवढें सुकृत नाहीं । असत्यायेवढें पाप नाहीं ॥—दा.बो.१०.१०.५४.

† खरें बोले तरी । फुकासाठीं जोडे हरी ॥ —तुकाराम.

काम, क्रोध आणि लोभ.

३ श्लोक.

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ १ ॥
एतैर्विमुक्तः कौंतेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ।
आचरत्यात्मनो श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥ २ ॥*

शांति.

दया क्षमा शांति । तेथें देवाची वसती ॥

४ ओंव्या. (१)

दाटूनि निश्चळ होणें । कां दांत चाऊनि साहणें ॥
ते शांति ऐसें कोण म्हणे । आक्रोशपणें साहातु ॥ १ ॥
शांति म्हणिजे ते ऐशी । सागरीं अक्षोभ्यता जैसी ॥
चढ वोहट नाहीं तिसी । सर्वदेशी सर्वदा ॥ २ ॥
नाना सरितांचे खळाळ । आणूनि घालिती समळें[2] जळ ॥
तो तिळभरी नव्हे डहुळ[3] । अतिनिर्मळ निजांगें ॥ ३ ॥

---

* काम, क्रोध व लोभ असें तीन प्रकारचें नरकाचें द्वार असून तें आपला नाश करणारें आहे. म्हणून या तिहींचाहि त्याग करावा. (२) हे कौंतेया, या तीन तमोद्वारांतून सुटला म्हणजे मनुष्य आपलें ज्यांत कल्याण तेंच आचरण करूं लागतो व नंतर उत्तम गतीला पोंचतो. — गी. १६.२१-२२.

१ शांति म्हणजे 'अनाक्रोश क्षमा.' 'इष्टानिष्ट वस्तूंच्या प्राप्तीनें हर्षामर्षन वाटणें हें शांतीचें खरें लक्षण.' असेंच व यांचें शब्दांत समुद्राचाच दृष्टांत देऊन ज्ञानेश्वरांनीं दिलेलें शांतिलक्षण (ज्ञा. १३.३४३–५३) जिज्ञासूंनीं अवश्य पहावें. २ मळ्युक्त. ३ गढूळ.

तैशी नानाभूतविषमता । स्वार्थविरोधें अंगीं आदळतां ॥
पालटू नव्हे ज्याच्या चित्ता । ते जाण सर्वथा निजशांति ॥ ४ ॥
ऐशी शांति ज्यासी देखा । तोचि सर्व भूतांचा सखा ॥
आवडता सर्व लोकां । सुहृद तो कां सर्वांचा ॥ ५ ॥

५ अभंग. (२)

शांतीपरतें नाहीं सुख । येर अवघेंचि दुःख ॥ १ ॥
म्हणउनी शांति धरा । उतराल पैल तीरा ॥ २ ॥
खवळलिया कामक्रोधीं । अंगीं भरती आधिव्याधी ॥ ३ ॥
तुका म्हणे त्रिविध ताप । मग जाती आपेंआप ॥ ४ ॥

क्षमा.

क्षमा वशीकृतिर्लोके क्षमया किं न सिद्धयति ॥ *

६ श्लोक (१)

क्षमाशस्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति ।
अतृणे पतितो वह्निः स्वयमेवोपशाम्यति ॥ १ ॥**

७ अभंग. (२)

धन्य तोचि प्राणी क्षमा ज्याचे अंगीं । न भंगे प्रसंगीं धैर्यबळ ॥ १ ॥
न म्हणे कोणासी उत्तम वाईट । महत्व वरिष्ठ नसे जेथें ॥ २ ॥
अंतरीं सबाह्य सारिखा निर्मळ । हृदय कोमळ गंगारूप ॥ ३ ॥
तुका ह्मणे काया कुरवंडीं तया । ठेवीन मी पायां मस्तक हें ॥ ४ ॥

८ अभंग. (३)

क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रति काय करी ॥ १ ॥
तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोनि आपसया ॥ २ ॥
तुका ह्मणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडित सुखरूप ॥ ३ ॥

---

* क्षमा हें जगांत वशीकरणाचें उत्कृष्ट साधन आहे; क्षमेनें काय साध्य होणार नाहीं ?

** अर्थासाठीं ' क्षमाशस्त्र जया ' हा खालील ११ वा अभंग पहा.

दया.

भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ॥

—गा. ३१२३. ३.

दया तिचें नांव भूतांचें पाळण । आणिक निर्दळण कंटकांचें ॥

९ ओंव्या. (१)

भूतांसी काठिणपण । देखतां निघों पाहे प्राण ॥
मा स्वयें करील आपण । हें सर्वथा जाण स्वप्नीं न घडे ॥ १ ॥
जेणें आपणासी होय दुःख । तें भूतांसी करीना निःशेख ॥
जेणें आपणासी होय सुखें । तें आवश्यक करी दीना ॥ २ ॥
सर्व भूतीं दया समान । कदा न बोले कठिणपण ॥
भूतांची पीडा निवारण । करोनि आपण सुखोपाय चिंती ॥ ३ ॥
जीवमात्रीं दुरुक्ती बोलतां । जिव्हेच्या घेऊं पाहे जीविता ॥
भूतीं दुष्टपण चाळितां । समूळ निज चित्ता निर्दाळूं पाहे ॥ ४ ॥
भूतांसी जेथ पीडा पावे । त्यातळीं जीव घालूं धांवे ॥
जीवापरीस भूतें सर्वें । दयागौरवें पढियंतीं ॥ ५ ॥
ऐसें तें कारुण्य पूर्ण । त्या नांव दया संपूर्ण ॥

१० ओंव्या. (२)

...दया ते ऐसी । पूर्ण चंद्रिका जैसी ॥
निवविता नें कडसी । सोनें थोर ॥ १ ॥
तैसें दुःखिताचें शिणणें । हिरतां सकणवेपणें ॥
उत्तमाधम नेणें । विवंचूं गा ॥ २ ॥
पैं जगीं जीवनासारिखें । वस्तु अंगवरी उपेखे ॥
परि जातें जीवित राखे । तृणाचेंही ॥ ३ ॥

---

१ जीवातळीं आंथुरितु । आपुला जीव ॥ —ज्ञा. १३.२५०. २ न परीक्षी. ३ लहान. ४ हरण. करितां. ५ सदयतेनें. ६ स्वतः शरीरानें. ७ नाश पावे.

तैसें पुढिलांचेनि तापें । कळवळलिये कृपे ॥
सर्वस्वेंसी दिधलें आपणपें । न्यूनाचि मानी ॥ ४ ॥
निम्नें भरलिया उणें । पाणी ढळोंचि नेणे ।
तेवि श्रांता तोषौनि जाणें । सामोरें पां ॥ ५ ॥
पैं पायीं कांटा नेहटे । तंव व्यथा जीवीं उमटे ।
तैसा पोळे संकटें । पुढिलांचेनि ॥ ६ ॥
कां पावो शीतळता लाहे । कीं ते डोळ्यांचिलागीं होये ।
तैसा परसुखें जाये । सुखावत जो ॥ ७ ॥
किंबहुना तृषितालागीं । पाणी आरोगियेलें असे जगीं ।
तैसें दुःखितांचां सेलेंभागीं । जिणें जयाचें ॥ ८ ॥
तो पुरुष वीरराया । मूर्तिमंत जाण दया ।
मी उदैजतांचि तया । करुणिया लाभें ॥ ९ ॥

नम्रता.

नम्र जाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ॥ १ ॥
हेंचि शूरत्वाचें अंग । हारी आणिला श्रीरंग ॥ २ ॥

११ अभंग. (१)

नीचपण बरवें देवा । न चले कोणाचाही हेवा ॥ १ ॥
महापूरें झाडें जाती । तेथें लोहाळे राहती ॥ २ ॥
येतां सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरी ॥ ३ ॥
तुका म्हणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ॥ ४ ॥

११ अभंग. (२)

लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥ १ ॥
ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ॥ २ ॥
ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ॥ ३ ॥
तुका म्हणे जाण । व्हावें लहानाहूनि लहान ॥ ४ ॥

---

१ सखल जागा. २ शिरतो, बोंचतो. ३ पाय. ४ उत्पन्न केलें. ५ बन्यासाठीं.

१३ अभंग. (३)

धाकुटचाचे मुखीं घांस घाली माता । वैरी करी सत्ता शहाणिया ॥ १ ॥
ऐसें जाणपणें पडिलें अंतर । वाढे तों तों थोर अंतराय † ॥ २ ॥
दोन्ही उभयतां आपणचि व्याली । आवडीची चाली भिन्न भिन्न ॥ ३ ॥
तुका ह्मणे अंगापासूनि निराळें । निवडिलें बळें; रडतें स्तनीं ॥ ४ ॥

अभिमान.

अहंकार खवळल्या जाण । करी आनंदाचें आच्छादन ॥
बुडे परमात्मस्फूर्तीचें स्फुरण । देहाचें मीपण वाढवी ॥ १ ॥

—ए. भा. १३.४३३.

१४ ओंव्या. (१)

अभिमानें उठे मत्सर । मत्सरें ये तिरस्कार ॥
पुढें क्रोधाचा विकार । प्रबळे बळें ॥ १ ॥
ऐसा अंतरीं नासला । काम क्रोधें खवळला ॥
अहंभावें पालटला । प्रत्यक्ष दिसे ॥ २ ॥
काम क्रोधें लिथाडला । तो कैसा म्हणावा भला ॥
अमृत सेवितांच पावला । मृत्य राहु ॥ ३ ॥
आतां असो हें बोलणें । अधिकारासारिखें घेणें ॥
परंतु अभिमान त्यागणें । हें उत्तमोत्तम ॥ ४ ॥

१५ अभंग. (२)

अभिमानासाठीं । वेचिती तपाचिया कोटी ॥ १ ॥
अभिमान दुर्वासासी । व्यर्थ शापिला अंबऋषी ॥ २ ॥

---

† जाणतें लेंकरूं । माता लागे धरूं ॥ —तुकाराम.

१ शहाणियावरी सत्ता करी ह्मणजे कामें सांगते. २ प्रेमाची पद्धत.

अभिमान ब्रह्मियासी । नेलें गोपवत्सांसी ॥ ३ ॥
अभिमानें नाडला पूर्ण । विश्वमित्र ऋषि जाण ॥ ४ ॥
एका जनार्दनीं शरण । समूळ सांडावा अभिमान ॥ ५ ॥

१६ अभंग. (३)

हीन माझी याती । वरी स्तुती केली संतीं ॥ १ ॥
अंगीं वसूं पाहे गर्व । माझें हरावया सर्व † ॥ २ ॥
मी एक जाणता । ऐसें वाटतसे चित्ता ॥ ३ ॥
राख राख गेलों वांयां । तुका म्हणे पंढरीराया ॥ ४ ॥

मधुर भाषण.

शिखीव केकामधुर प्रियवाक् कस्य न प्रियः । *

१७ ओंव्या. (१)

बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें ॥
आत्मवत् परावें तें । मानीत जावें ॥ १ ॥
कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें ॥
तरी मग वाईट बोलावें तें । काये निमित्य ॥ २ ॥
आपणासि चिमोटा घेतला । तेणें कासाविस जाला ॥
आपणावरून दुसऱ्याला । राखीत जावें ॥ ३ ॥
जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ॥
आपणास घात करी । कोणी येके प्रसंगीं ॥ ४ ॥
पेरिलें तें उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें ॥
तरी मग कर्कश बोलावें तें । काये निमित्य ॥ ५ ॥

---

† तुका म्हणे नरकीं घाली अभिमान । जरी होय ज्ञानगर्व ताठा ॥
—गा. २५२८.

* मधुरालापी मोराप्रमाणें गोड बोलणारा मनुष्य कोणास प्रिय होत नाही ?

१८ श्लोक. (१)

वाङ्माधुर्यान्नान्यदस्ति प्रियत्वं वाक्पारुष्याच्चोपकारोऽपि नष्टः ।
किं तद्द्रव्यं कोकिलेनोपनीतं को वा लोके गर्दभस्यापराधः ॥ १ ॥ *

दुसऱ्याशीं कसें वागावें ?

अवघीं रूपें तुझीं देवा । वंदूं भावें करूं सेवा ॥

—गा. ३५०६.२.

१९ अभंग. (१)

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥ १ ॥
कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ॥ ३ ॥

१० श्लोक. (२)

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ १ ॥ *

---

* मधुर शब्दापरतें प्रिय होण्यास साधन नाहीं; आणि ककश शब्दामुळें उपकारदेखील व्यर्थ होतो; कोकिळ पक्षानें असें कोणतें द्रव्य मनुष्यांस आणून दिलें आहे (कीं ज्याच्या योगानें तो सर्वांस इतका प्रिय झाला आहे) ? बरें, गर्दभाचा या जगांत अपराध तरी कोणता (कीं जेणेंकरून तो मनुष्यांचीं ओझीं मरेमर वाहून त्यांजवर उपकार करीत असतांहि तो कोणास दृष्टीस सुद्धां नकोसा झाला आहे) ?

१ एका देहाच्या अवयवांचे सुखदुःखादि भोग जसे एका अन्तरात्म्यालाच होतात तसें सर्व शरीरांचें सुखदुःख परमेश्वरालाच होतें; म्हणून कोणाचाहि मत्सर करूं नये. 'परमात्मा जो श्रीहरी । तो अंतर्यामीं सर्व शरीरीं । तेथ पराचा जो द्वेषु करी । तेणें द्वेषिला हरि निजात्मा ' ॥ १ ॥ —ए. भा. ५.२८१.

* (१) ज्याचा आत्मा योगयुक्त झाला त्याची दृष्टि सर्वत्र सम होऊन सर्व भूतांच्या ठायीं आपण आणि आपल्या ठायीं सर्व भूतें (आहेत) असें त्याला दिसूं

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ २ ॥
सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥ ३ ॥
आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ ४ ॥

२१ अभंग. (३)

वंदीन मी भूतें । आतां अवघींचि समस्तें ॥ १ ॥
तुमची करीन भावना † । पदोपदीं नारायणा ॥ २ ॥
गाळुनियां भेद । प्रमाण तो ऐसा वेद ॥ ३ ॥
तुका म्हणे मग । नव्हे दुजयाचा संग ॥ ४ ॥

लागतें. (२) मी (परमेश्वर परमात्मा) सर्व ठिकाणीं (आहें) असें जो पहातो, आणि माझ्या ठायीं सर्व अशी ज्याची दृष्टि झाली, त्याला मी कधीं अंतरत नाहीं, आणि तोही मला कधीं अंतरत नाहीं (३) एकत्वबुद्धि म्हणजे सर्वभूतात्मैक्यबुद्धि मनांत ठेवून सर्व भूतांत असणाऱ्या मला (परमेश्वराला) जो भजतो, तो (कर्म–) योगी सर्व प्रकारें वागत असतांहि मजमध्यें असतो. (४) हे अर्जुना ! सुख असो वा दुःख असो, आपल्याप्रमाणें इतरांना अशा (आत्मौपम्य–) दृष्टीनें जो सर्वत्र सारखें पाहूं लागला तो (कर्म–) योगी परम म्हणजे उत्कृष्ट मानिला जातो.–गी.६.२९–३२.

† *Cf.* 'Bending before men is a reverence done to this Revelation in the Flesh. We touch Heaven when we lay our hand on a human body !'—Novalis (vide Carlyle's Heroes and Heroworship by Macmechan p. 12.)

निंदकाशीं कसें वागावें ?

मनुष्यें जर तितकी खटपट करितील तर वाईट दिसणाऱ्या गोष्टीपासूनहि कांहीं तरी चांगलें काढून घेतां येईल. आपले शेजारी जर वाईट असले तर आपणास दररोज लवकर निजून उठलें पाहिजे. यामुळें आपली शरीरप्रकृति निरोगी होऊन आपणास व्यवस्थितपणानें व काटकसरीनें राहण्याची संवय लागेल. अशा रीतीनें घाणेरीच्या झाडापासूनहि आपणास मध काढतां येईल व प्रत्यक्ष सैतानापासून सद्बोध शिकतां येईल.*

१२ पद. (१)

निंदक कामाचा । गडी आत्मारामाचा ॥ निंदक० ॥ ध्रु० ॥
निंदक आमुची गंगा । आमुचें पातक नेतो भंगा ॥ निंदक० ॥ १ ॥
निंदक आमुची काशी । आमुचें अवघें पाप नाशी ॥ निंदक० ॥ २ ॥
निंदक आमुचा सखा । आमुचीं वस्त्रें धुतो फुका ॥ निंदक० ॥ ३ ॥
निंदक आमुचा गुरु । एका जनार्दनीं म्हणे थोरू ॥ निंदक० ॥ ४ ॥

१३ अभंग. (२)

निंदक तो परउपकारी । काय वर्णूं त्याची थोरी ॥
जो रजकाहुनि भला परि । सर्व गुणें आगळा ॥ १ ॥
नेघे मोल धुतो फुका । पाप वरच्यावरी देखा ॥
करीतसे साधका । शुद्ध सार ते तिहीं लोकीं ॥ २ ॥
मुखसंवदणी सांगातें । अवघें सांटविलें तेथें ॥
जिव्हा साधण निरुतें । दोष काढी जन्माचे ॥ ३ ॥

---

* शेक्स्पिअरकृत हेन्रि दि फिफ्थ् ४. १ ओळी ४–७ व ११–१२ वरून.

१४ गद्य.

सत्यं § वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः । सत्यान्न प्रमदितव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यम् । कुशलान्न प्रमदितव्यम् । भत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् ॥ १ ॥ देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् । मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव । यान्यनवद्यानि कार्याणि तानि सेवितव्यानि नो इतराणि । यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वया उपास्यानि ॥ २ ॥ नो इतराणि । अथ यदि ते कर्मविचिकित्सा वृत्तविचिकित्सा वा स्यात् ॥ ३ ॥ ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः । युक्ता अयुक्ता अलूक्षा धर्मकामाः स्युः । यथा ते तत्र वर्तेरन् तथा तत्र वर्तेथाः । *

यत्नशिक्षा.

१५ ओंव्या.

लहान थोर काम कांहीं । केल्यावेगळें होत नाहीं ।
करंट्या सावध पाहीं । सदैव होसी ॥ १ ॥

---

§ हा गुरूचा शिष्याला उपदेश आहे.

* खरें बोल. धर्माप्रमाणें वाग. स्वाध्यायाचे कामीं कधींहि हेळसांड करूं नकोस. सत्य सोडूं नकोस. धर्म सोडूं नकोस. कुशल आणि अभ्युदय यांचे बाबतींत कसूर करूं नकोस. शिकणें व शिकविणें यांमध्यें कसूर करूं नकोस. देव आणि पितर यांसंबंधीं आपलें कर्तव्य बजावण्याचे कामीं कसूर करूं नकोस. आईला देवाप्रमाणें (पूज्य) मान. बापाला देवाप्रमाणें (पूज्य) मान. गुरूला देवाप्रमाणें (पूज्य) मान. अतिथीला देवाप्रमाणें (पूज्य) मान. जीं कर्में वंद्य आहेत तीं करीत जा; दुसरीं करूं नकोस. आमचें जें योग्य आचरण आहे त्याप्रमाणें वागत जा. आमचीं जीं अनुचित कर्में असतील त्याप्रमाणें वागूं नकोस. तुला कर्मानुष्ठानाविषयीं अथवा आपल्या वर्तनाविषयीं शंका आली तर तेथें विचारवान्, दयाळु, धर्मनिष्ठ असे जे ब्राह्मण असतील ते जसें वागतील तसें वागत जा. मग ते ब्राह्मण नियुक्त अधिकारी असोत वा नसोत.—तैत्तिरीयोपनिषत् १.११.

अंतरीं नाहीं सावधानता । येत्न ठाकेना पुरता ।
सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैंची ॥ २ ॥
म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपें जोडावा ।
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥ ३ ॥
नेमस्त नेटकें पुसावें । विशद करून सांगावें ॥
प्रत्ययेंविण बोलावें । तेंचि पाप ॥ ४ ॥
सावधानता असावी । नीतिमर्यादा राखावी ॥
जनास माने ऐसी करावी । क्रियासिद्धि ॥ ५ ॥
आलियाचें समाधान । हरिकथानिरूपण ॥
सर्वदा प्रसंग पाहोन । वर्तत जावें ॥ ६ ॥
जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें ॥
मग महंतलीला स्वभावें । आंगीं बाणे ॥ ७ ॥

चातुर्यलक्षण.

२६ ओंव्या. (१)

रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहजगुणास न चले उपाये ॥
कांहीं तरी धरावी सोये । आगंतुक गुणांची ॥ १ ॥
अवगुण सोडितां जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती ॥
कुविद्या सांडून सिकती । शाहाणे विद्या ॥ २ ॥
मूर्खपण सांडितां जातें । शाहाणपण सिकतां येतें ॥
कारबार करितां उमजतें । सकळ कांहीं ॥ ३ ॥
ऐसी प्रचित येते मना । तरी कां स्वाहित कराना ॥
सन्मार्गें चालतां जना । सज्जना माने ॥ ४ ॥
आपण दुसऱ्यास करावें । तें उसिणें सर्वेंचि घ्यावें ॥
जना कष्टवितां कष्टावें । लागेल बहु ॥ ५ ॥

न्यायें वर्तेल तो शाहाणा । अन्याइ तो दैन्यवाणा ॥
नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ॥ ६ ॥
समाधानें समाधान वाढे । मित्रिनें मित्रि जोडे ॥
मोडितां क्षणमात्रें मोडे । बरेपण ॥ ७ ॥
अहो कांहो अरे कांरे । जनीं ऐकिजेतें किं रे ॥
कळत असतांच कां रे । निकामीपण ॥ ८ ॥
चातुर्यें श्रुंघारे अंतर । वस्त्रें श्रुंघारे शरीर ॥
दोहिमधें कोण थोर । बरें पाहा ॥ ९ ॥
बाह्याकार श्रुंघारिलें । तेणें लोकांच्या हातासि काये आलें ॥
चातुर्यें बहुतांसी राखिलें । नाना प्रकारें ॥ १० ॥
तनें मनें झिजावें । तेणें भले म्हणोन घ्यावें ॥
उगेंचि कल्पितां सिणावें । लागेल पुढें ॥ ११ ॥
लोकीं कार्यभाग आडे । तो कार्यभाग जेथें घडे ॥
लोक सहजचि वोढे । कामासाठीं ॥ १२ ॥
म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें । तेणें आपण सुखी व्हावें ॥
दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें । लागेल स्वयें ॥ १३ ॥
हें तों प्रगटचि आहे । पाहिल्याविण कामा न ये ॥
समजणें हा उपाये । प्राणीमात्रासी ॥ १४ ॥
समजले आणी वर्तले । तेचि भाग्यपुरुष जाले ॥
यावेगळे उरले । ते करंटे पुरुष ॥ १५ ॥
आळसें कार्यभाग नासतो । साक्षेप होत होत होतो ॥
दिसते गोष्टी कळेना तो । शाहाणा कैसा ॥ १६ ॥
आपणास शाहाणें करूं नेणे । आपलें हित आपण नेणे ॥
जनीं मैत्रि राखों नेणे । वैर करी ॥ १७ ॥
ऐसे प्रकारींचे जन । त्यांस म्हणावें अज्ञान ॥
तयांपासीं समाधान । कोण पावे ॥ १८ ॥

आपण येकायेकीं येकला । सृष्टींत भांडत चालिला ॥
बहुतांमध्यें येकलेल्या । येश कैंचें ॥ १९ ॥
बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचे अंतरीं भरावें ॥
उत्तम गुणीं विवरावें । प्राणीमात्रासी ॥ २० ॥
शाहाणे करावे जन । पतित करावे पावन ॥
सृष्टिमध्यें भगवद्भजन । वाढवावें ॥ २१ ॥

२७ ओंव्या. (२)

उदंडाचें उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययें पाहावें ॥
खरें खोटें निवडावें । अंतर्यामीं ॥ १ ॥
कोणासी नव्हे म्हणों नये । समजावे अपाये उपाये ॥
प्रत्यये घ्यावा बहुत काये । बोलोनियां ॥ २ ॥
माणुस हेंकाड आणी कच्चें । मान्य करावें तयाचें ॥
येणें प्रकारें बहुतांचें । अंतर राखावें ॥ ३ ॥
वेडें करावें शाहाणें । तरीच जिणें श्लाघ्यवाणें ॥
उगेंच वादांग वाढवणें । हें मूर्खपण ॥ ४ ॥
जो दुसऱ्याच्या हितावरी । तो विपट कंहींच न करी ॥
मानत मानत विवरी । अंतर तयाचें ॥ ५ ॥
हेंकाडास हेंकाड मिळाला । तेथें गल्बलाचि जाला ॥
कळहो उठतां च्यातुर्याला । । ठाव कैंचा ॥ ६ ॥
धके चपेटे सोसावे । नीच शब्द साहात जावे ॥
पस्तावोन परावे । आपले होतीं ॥ ७ ॥
प्रसंग जाणोनि बोलावें । जाणपण कांहींच न घ्यावें ॥
लीनता धरून जावें । जेथतेथें ॥ ८ ॥
जैसें जयास पाहिजे । तैसें तयास दीजे ॥
तरी मग श्रेष्ठचि होइजे । सकळां मान्य ॥ ९ ॥
ऐसीं चातुर्याचीं लक्षणें । चातुर्यें दिग्विजये करणें ॥
मग तयास काये उणें । जेथतेथें ॥ १० ॥

मूर्खलक्षण.

२८ ओंव्या

समर्थावरी अहंता । अंतरीं मानी समता ॥
सामर्थ्येंविण करी सत्ता । तो येक मूर्ख ॥ १ ॥
आपली आपण करी स्तुती । स्वदेशीं भोगी विपत्ति ॥
सांगे वडिलांची कीर्ती । तो येक मूर्ख ॥ २ ॥
अकारण हास्य करी । विवेक सांगतां न धरी ॥
जो बहुतांचा वैरी । तो येक मूर्ख ॥ ३ ॥
आपुलीं धरूनियां दुरी । पराव्यासी करी मीत्री ॥
परन्यून बोले रात्रीं । तो येक मूर्ख ॥ ४ ॥
बहूत जागते जन । तयांमध्यें करी शयन ॥
परस्थळीं बहु भोजन । करी तो येक मूर्ख ॥ ५ ॥
धरून परावी आस । प्रेत्न सांडी सावकाश † ॥
निसुगाईचा संतोष । मानी तो येक मूर्ख ॥ ६ ॥
नायेके त्यासी सिकवी । वडिलांसीं जाणीव दावी ॥
जो आरजास गोवी । तो येक मूर्ख ॥ ७ ॥
येकायेकीं येकसरा । जाला विषईं निलाजिरा ॥
मर्यादा सांडून सैरा । वर्ते तो येक मूर्ख ॥ ८ ॥
औषध ने घे असोन वेथा । पथ्य न करी सर्वथा ॥
न मिळे आलिया पदार्था । तो येक मूर्ख ॥ ९ ॥
संगेंविण विदेश करी । वोळखीविण संग धरी ॥
उडी घाली महापुरीं । तो येक मूर्ख ॥ १० ॥
आपणास जेथें मान । तेथें अखंड करी गमन ॥
रक्षूं नेणे मानाभिमान । तो येक मूर्ख ॥ ११ ॥

---

† जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला । जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ १ ॥ —दा. बो. १९.९.१६

विचार न करितां कारण । दंड करी अपराधेंविण ॥
स्वल्पासाठीं जो कृपण । तो येक मूर्ख ॥ १२ ॥
घरींच्यावरी खाय दाढा । बाहेरी दीन बापुडा ॥
ऐसा जो कां मूढ वेडा । तो येक मूर्ख ॥ १३ ॥
नीच यातीसीं सांगात । परांगनेसीं येकांत ॥
मार्गें जाय खात खात । तो येक मूर्ख ॥ १४ ॥
स्वयें नेणे परोपकार । उपकाराचा अनोपकार ॥
करी थोडें बोलें फार । तो येक मूर्ख ॥ १५ ॥
विद्या वैभव ना धन । पुरुषार्थ सामर्थ्य ना मान ॥
कोरडाच वाहे अभिमान । तो येक मूर्ख ॥ १६ ॥
दंत चक्षु आणी घ्राण । पाणी वसन आणी चरण ॥
सर्वकाळ जयाचे मळिण । तो येक मूर्ख ॥ १७ ॥
जिवलगांस परम खेदी । सुखाचा शब्द तोहि नेदी ॥
नीच जनास वंदी । तो येक मूर्ख ॥ १८ ॥
जैसें जैसें करावें । तैसें तैसें पावावें ॥
हें जयास नेणवे । तो येक मूर्ख ॥ १९ ॥
परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख ॥
गेले वस्तूचा करी शोक । तो येक मूर्ख ॥ २० ॥
आदरेंविण बोलणें । न पुसतां साक्ष देणें ॥
निंद्य वस्तु अंगिकारणें । तो येक मूर्ख ॥ २१ ॥
तुक तोडून बोले । मार्ग सांडून चाले ॥
कुकर्मी मित्र केले । तो येक मूर्ख ॥ २२ ॥
पत्य राखों नेणे कदा । विनोद करी सर्वदा ॥
हासतां खिजे पेटे द्वन्द्वा । तो येक मूर्ख ॥ २३ ॥

तस्करासी वोळखी सांगे । देखिली वस्तु तेचि मागे ॥
आपलें आन्हीत करी रागें । तो येक मूर्ख ॥ २४ ॥
सांडूनियां जगदीशा । मनुष्याचा मानी भर्वसा ॥
सार्थकेंविण वेची वयसा । तो येक मूर्ख ॥ २५ ॥
संसारदुःखाचेनि गुणें । देवास गाळी देणें ॥
मैत्राचें बोले उणें । तो येक मूर्ख ॥ २६ ॥
अल्प अन्याय क्षमा न करी । सर्वकाळ धारकीं धरी ॥
जो विस्वासघात करी । तो येक मूर्ख ॥ २७ ॥
अनीतीनें द्रव्य जोडी । धर्म नीती न्याय सोडी ॥
संगतीचें मनुष्य तोडी । तो येक मुर्ख ॥ २८ ॥
दोघे बोलत असती जेथें । तिसरा जाऊन बैसे तेथें ॥
डोई खाजवी दोहीं हातें । तो येक मुर्ख ॥ २९ ॥
कळह पाहात उभा राहे । तोडविना कौतुक पाहे ॥
खरें अस्तां खोटें साहे । तो येक मूर्ख ॥ ३० ॥
लक्ष्मी आलियावरी । जो मागील वोळखी न धरी ॥
देवीं ब्राह्मणीं सत्ता करी । तो येक मूर्ख ॥ ३१ ॥
आपलें काज होयें तंवरी । बहुसाल नम्रता धरी ॥
पुढिलांचें कार्य न करी । तो येक मूर्ख ॥ ३२ ॥
अक्षरें गाळून वाची । कां ते घाली पदरिचीं ॥
नीघा न करी पुस्तकाची । तो येक मूर्ख ॥ ३३ ॥
आपण वाचीना कधीं । कोणास वाचावया नेदी ॥
बांधोन ठेवी बंदी । तो येक मूर्ख ॥ ३४ ॥

उत्तमलक्षण.

२९ ओव्या.

वाट पुसिल्याविण जाऊं नये । फळ वोळखिल्याविण खाऊं नये ॥
पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकीं ॥ १ ॥
अति वाद करूं नये । पोटीं कपट धरूं नये ॥
शोधिल्याविण करूं नये । कुळहीन कांता ॥ २ ॥
विचारेंविण बोलों नये । विवंचनेविण चालों नये ॥
मर्यादेविण हालों नये । कांहीं येक ॥ ३ ॥
प्रीतीविण रुसों नये । चोरास वोळखी पुसों नये ॥
रात्रीं पंथ क्रमूं नये । येकायेकीं ॥ ४ ॥
जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये ॥
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥ ५ ॥
निंदा द्वेष करूं नये । असत्संग धरूं नये ॥
द्रव्यदारा हरूं नये । बळात्कारें ॥ ६ ॥
वक्तयास खोदूं नये । ऐक्यतेसी फोडूं नये ॥
विद्याअभ्यास सोडूं नये । कांहीं केल्या ॥ ७ ॥
तोंडाळासीं भांडों नये । वाचाळासीं तंडों नये ॥
संतसंग खंडूं नये । अंतर्यामीं ॥ ८ ॥
अति क्रोध करूं नये । जिवलगांस खेदूं नये ॥
मनीं वीट मानूं नये । सिकवणेचा ॥ ९ ॥
क्षणक्षणा रुसों नये । लटिका पुरुषार्थ बोलों नये ॥
केल्याविण सांगों नये । आपला पराक्रमु † ॥ १० ॥

---

† ब्रुवते हि फलेन साधवो न तु कण्ठेन निजोपयोगिताम् । सत्पुरुष आपली उपयुक्तता मुखानें बोलून न दाखवितां, कार्य करून त्याच्या फलद्वारानें ती व्यक्त करितात. —श्रीहर्ष (नैषधीयचरित २.४८).

बोलिला बोल विसरों नये । प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये ॥
केल्याविण निखंदूं नये । पुढिलांसी कदा ॥ ११ ॥
आळसें सुख मानूं नये । चाहाडी मनास आणूं नये ॥
शोधिल्याविण करूं नये । कार्य कांहीं ॥ १२ ॥
सुखा आंग देऊं नये । प्रेत्न पुरुषें सांडूं नये ॥
कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ॥ १३ ॥
सभेमध्यें लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये ॥
पैज होड घालूं नये । कांहीं केल्या ॥ १४ ॥
बहुत चिंता करूं नये । निसुगपणें राहों नये ॥
परस्त्रीतें पाहों नये । पापबुद्धी ॥ १५ ॥
कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये ॥
परपीडा करूं नये । विस्वासघात ॥ १६ ॥
शोच्येंविण असों नये । मळिण वस्त्र नेसों नये ॥
जाणारास पुसों नये । कोठें जातोस म्हणौनी ॥ १७ ॥
व्यापकपण सांडूं नये । पराधेन होऊं नये ॥
आपलें वोझें घालूं नये । कोणीयेकासी ॥ १८ ॥
पत्रेंविण पर्वत करूं नये । हीनाचें रुण घेऊं नये ॥
गोहीविण जाऊं नये । राजद्वारा ॥ १९ ॥
लटिकी जाऊज़ू घेऊं नये । सभेस लटिकें करूं नये ॥
आदर नस्तां बोलों नये । स्वाभाविक ॥ २० ॥
आपल्याची गोही देऊं नये । आपली कीर्ती वर्णूं नये ॥
आपलें आपण हांसों नये । गोष्टी सांगोनी ॥ २१ ॥
धूम्रपान घेऊं नये । उन्मत्त द्रव्यं सेऊं नये ॥
बहुचकोंसीं करूं नये । मैत्री कदा ॥ २२ ॥

---

१ दस्तऐवजाशिवाय. २ देणें घेणें वगैरे व्यापार. ३ बातमी. ४ मादक पदार्थ (भांग वगैरे). ५ वाचाळ, बोचक, बडबड्या.

कामेंविण राहों नये । नीच उत्तर साहों नये ॥
आसुर्दे अन्न सेऊं नये । वडिलांचेंही ॥ २३ ॥
तोंडी सीवी असों नये । दुसऱ्यास देखोन हांसों नये ॥
उर्णें अंगीं संचारों नये । कुळवंताचे ॥ २४ ॥
देखिली वस्तु चोरूं नये । बहुत कृपण होऊं नये ।
जिवलगांसी करूं नये । कलह कदा ॥ २५ ॥
येकाचा घात करूं नये । लटिकी गोही देऊं नये ॥
अप्रमाण वर्तों नये । कदाकाळीं ॥ २६ ॥
चाहाडी चोरी धरूं नये । परद्वार करूं नये ॥
मागें उर्णें बोलों नये । कोणीयेकाचें ॥ २७ ॥
समई यावा चुकों नये । सत्वगुण सांडुं नये ॥
वैरियांस दंडूं नये । शरण आलियां ॥ २८ ॥
अल्पधनें माजों नये । हरिभक्तीस लाजों नये ।
मर्यादेविण चालों नये । पवित्र जनीं ॥ २९ ॥
मूर्खासीं समंध पडों नये । अंधारीं हात घालूं नये ॥
दुश्चितपणें विसरों नये । वस्तु आपुली ॥ ३० ॥
हरिकथा सांडूं नये । निरूपण तोडूं नये ॥
परमार्थास मोडूं नये । प्रपंचबळें ॥ ३१ ॥
देवाचा नवस बुडऊं नये । आपला धर्म उडवूं नये ॥
भलते भरीं भरों नये । विचारेंविण ॥ ३२ ॥
सभा देखोन गळों नये । समई उत्तर टळों नये ॥
धिःकारितां चळों नये । धारिष्ट आपुलें ॥ ३३ ॥
अपकीर्ति ते सांडावी । सद्कीर्ति वाढवावी ॥
विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ॥ ३४ ॥

पढतमूर्खलक्षण.

३० ओंव्या.

मागां सांगितलीं लक्षणें । मूर्खाआंगीं चातुर्य बाणे ॥
आतां ऐका शाहाणे । असोनि मूर्ख ॥ १ ॥
तया नांव पढतमूर्ख । श्रोतीं न मानावें दुःख ॥
अवगुण त्यागितां सुख । प्राप्त होये ॥ २ ॥
बहुश्रुत आणी वित्पन्न । प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान ॥
दुराशा आणी अभिमान । धरी तो येक पढतमूर्ख ॥ ३ ॥
मुक्तक्रिया प्रतिपादी । सगुण भक्ति उच्छेदी ॥
स्वधर्म आणी साधन निंदी । तो येक पढतमूर्ख ॥ ४ ॥
आपलेन ज्ञातेपणें । सकळांस शब्द ठेवणें ॥
प्राणीमात्राचें पाहे उणें । तो येक पढतमूर्ख ॥ ५ ॥
समूळ ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण ॥
गुण सांगतां अवगुण । पाहे तो येक पढतमूर्ख ॥ ६ ॥
जाणपणें भरीं भरे । आला क्रोध नावरे ॥
क्रिया शब्दास अंतरे । तो येक पढतमूर्ख ॥ ७ ॥
श्रोता बहुश्रुतपणें । वक्तयास आणी उणें ॥
वाचाळपणाचेनि गुणें । तो येक पढतमूर्ख ॥ ८ ॥
दोष ठेवी पुढिलांसी । तेचि स्वयें आपणापासीं ॥
ऐसें कळेना जयासी । तो येक पढतमूर्ख ॥ ९ ॥
अभ्यासाचेनि गुणें । सकळ विद्या जाणे ॥
जनास निवऊं नेणे । तो येक पढतमूर्ख ॥ १० ॥
भरोन वैभवाचे भरी । जीवमात्रांस तुछय करी ॥
पाषांड मत थावरी । तो येक पढतमूर्ख ॥ ११ ॥

श्रवण होतां अभ्यांतरीं । गुणदोषाची चाळणा करी ॥
परभूषणें मत्सरी । तो येक पढतमूर्ख ॥ १२ ॥
नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य ना भजन ॥
क्रियेवीण ब्रह्मज्ञान । बोले तो येक पढतमूर्ख ॥ १३ ॥
न मनी तीर्थ न मनी क्षेत्र । न मनी वेद न मनी शास्त्र ॥
पवित्र कुळीं जो अपवित्र । तो येक पढतमूर्ख ॥ १४ ॥
मागें येक पुढें येक । ऐसा जयाचा दंडक ॥
बोले येक करी येक । तो येक पढतमूर्ख ॥ १५ ॥
प्रपंचविशीं सादर । परमार्थी ज्याचा अनादर ॥
जाणपणें घे अंधार । तो येक पढतमूर्ख ॥ १६ ॥
येथार्थ सांडून वचन । जो रक्षून बोले मन ॥
ज्याचें जिणें पराधेन । तो येक पढतमूर्ख ॥ १७ ॥
रात्रंदिवस करी श्रवण । न संडी आपले अवगुण ॥
स्वहित आपलें आपण । नेणे तो येक पढतमूर्ख ॥ १८ ॥
निरूपणीं भले भले । श्रोते येऊन बैसले ॥
क्षुद्रें लक्षुनी बोले । तो येक पढतमूर्ख ॥ १९ ॥
ज्ञान बोलोन करी स्वार्थ । कृपणाऐसा सांची अर्थ ॥
अर्थासाठीं लावी परमार्थ । तो येक पढतमूर्ख ॥ २० ॥
वर्तल्यावीण सिकवी । ब्रह्मज्ञान लावणी लावी ॥
पराधेन गोसावी । तो येक पढतमूर्ख ॥ २१ ॥
भक्तिमार्ग अवघा मोडे । आपणामधें उपंढर पडे ॥
ऐसिये कर्मीं पवाडे । तो येक पढतमूर्ख ॥ २२ ॥

३१ ओंव्या.

उत्तमपुरुषलक्षण.

आपण यथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वांटणें ॥
परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे ॥ १ ॥
तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनांस सांगावें ॥
तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ॥ २ ॥
उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे ॥
वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥ ३ ॥
शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें ॥
उणें पडों नेदावें । कोणियेकाचें ॥ ४ ॥
आडलें जाकसलें जाणावें । यथाशक्ति कामास यावें ॥
मृदुवचनें बोलत जावें । कोणीयेकासी ॥ ५ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुःखवावें । परसंतोषें सुखी व्हावें ॥
प्राणीमात्रांस मेळऊन घ्यावें । बऱ्या शब्दें ॥ ६ ॥
बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे ॥
आपल्यापरीस व्हावे । पारखे जन ॥ ७ ॥
दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसारचि वर्तावें ॥
लोकांस परीक्षित जावें । नाना प्रकारें ॥ ८ ॥
नेमकचि बोलावें । तत्काळचि प्रतिवचन द्यावें ॥
कदापी रागास न यावें । क्षमारूपें ॥ ९ ॥
आलस्य अवघाचि दवडावा । येत्न उदंडाचि करावा ॥
शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ॥ १० ॥
उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा ॥
सावधपणें करीत जावा । संसार आपला † ॥ ११ ॥

† सावध सदा असावें संसारीं स्वहितकृत्य लक्षावें । — मोरोपंत (ब्रह्मोत्तरखंड).

मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावें ॥
मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ॥ १२ ॥
नेमकपणें वर्तो लागला । तो बहुतांस कळों आला ॥
सर्व आर्जवी तयाला । काये उणें ॥ १३ ॥
ऐसा उत्तम गुणी विशेष । तयास म्हणावें पुरुष ॥
जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होये ॥ १४ ॥
स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोसित जावें ॥
झिजोन कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें ॥ १५ ॥
कीर्ती पाहों जातां सुख नाहीं । सुख पाहातां कीर्ती नाहीं ॥
विचारेंविण कोठेंचि नाहीं । समाधान ॥ १६ ॥
परांतरास न लावावा ढका । कदापि पडों नेदावा चुका ॥
क्षमासीळ तयाच्या तुका । हानी नाहीं ॥ १७ ॥
आपलें अथवा परावें । कार्य अवघेंच करावें ॥
प्रसंगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे ॥ १८ ॥
आपल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ॥
परंतु कष्टी करावें । हे राक्षेसी क्रिया ॥ १९ ॥
दंभ दर्प अभिमान । क्रोध आणी कठिण वचन ॥
हें अज्ञानाचें लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें ॥ २० ॥
बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ॥
तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ २१ ॥

११ ओंव्या.

सदैवलक्षण.

कोणाचें मनोगत तोडीना । भल्यांची संगती सोडीना ॥
सदैवलक्षण अनुमाना । आणून ठेवी ॥ १ ॥

तो सकळ जनासी व्हावा । जेथें तेथें नित्य नवा ॥
मूर्खपणें अनुमानगोवा । कांहींच नाहीं ॥ २ ॥
नाना उत्तम गुण सत्पात्र । तेचि मनुष्य जगमित्र ॥
प्रगट कीर्ती स्वतंत्र । पराधेन नाहीं ॥ ३ ॥
राखे सकळांचें अंतर । उद्दंड करी पाठांतर ॥
नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ॥ ४ ॥
नम्रपणें पुसों जाणे । नेमस्त अर्थ सांगों जाणे ॥
बोलाऐसें वर्तों जाणे । उत्तम क्रिया ॥ ५ ॥
जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न शके त्यासी ॥
धगधगीत पुण्यरासी । महापुरुष ॥ ६ ॥
तो परोपकार करितचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ॥
मग काय उणें तयाला । भूमंडळीं ॥ ७ ॥
बहुत जन वास पाहे । वेळेसी तत्काळ उभा राहे ॥
उणें कोणाचें न साहे । तया पुरुषासी ॥ ८ ॥
सकळांसीं नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें ॥
अखंड कोणीयेकाचें उणें । पडोंचि नेदी ॥ ९ ॥
आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहान थोर ॥
तैसाचि करी परोपकार । मनापासुनी ॥ १० ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे ॥
अवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ॥ ११ ॥
उदंड मुलें नाना परी । वडिलांचें मन अवघ्यांवरी ॥
तैसी अवघ्यांची चिंता करी । महापुरुष ॥ १२ ॥
न्याय नीति भजन मर्यादा । काळ सार्थक करी सदा ॥
दरिद्रपणाची आपदा । तेथें कैंची ॥ १३ ॥
उत्तमगुणें शृंगारला । तो बहुतांमधें शोभला ॥
प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड जैसा ॥ १४ ॥

३३ श्लोक.

प्रदानं प्रच्छनं गृहमुपगते संभ्रमविधिः
प्रियं कृत्वा मौनं सदसि कथनं नाप्युपकृतेः ।
अनुत्सेको लक्ष्म्यां निरभिभवसाराः परकथाः
सतां केनोद्दिष्टं विषममसिधाराव्रतमिदम् ॥ १ ॥*

३४ पद.

नीति सांगतों ऐका एक । दास सभेचा सेवक ॥
मन टाळूं नये एक । कोणी एक कोणी एक ॥ ध्रु० ॥
सांडावरून जाऊं नये । लांच खाऊं नये ॥
चोहोट्यांत राहूं नये । कोणी एक० ॥ १ ॥
अक्रीत घेऊं नये । इमान सोडूं नये ॥
बेमान होऊं नये । कोणी एक० ॥ २ ॥
सज्जनाशीं विटूं नये । नीचासवें बाटूं नये ॥
तस्कराशीं पुसूं नये । कोणी एक० ॥ ३ ॥
भक्तिमार्ग खंडूं नये । कुभांड्यासी तंडूं नये ॥
खळासंगें भांडूं नये । कोणी एक० ॥ ४ ॥
सत्पुरुषासी छळूं नये । सिवेचा गुंडा ढाळूं नये ॥
केला नेम टाळूं नये । कोणी एक० ॥ ५ ॥
सद्गुरुसेवा सोडूं नये । कुळधर्मासी मोडूं नये ॥
पापद्रव्य जोडूं नये । कोणी एक० ॥ ६ ॥

---

* बोभाट न करितां दान करणें, कोणी घरीं आला असतां त्याचा सत्कार करणें, दुसऱ्याचें हित केलें असतांही त्याची वाच्यता न करणें, उपकार केला असेल तो चौघांत बोलून न दाखविणें, संपत्तीचा गर्व न वाहणें, व ज्यांत कोणाचाही उपमर्द नाहीं अशा दुसऱ्याच्या चांगल्या गोष्टी बोलणें, असें हें तरवारीच्या धारेप्रमाणें अत्यंत कठिण व्रत सज्जनांस कोणीं उपदेशिलें ? (कोणीही नाहीं. हा त्यांचा स्वभावच आहे.) —भर्तृहरि २.

संपत्ति आलिया माजूं नये । अभिमानें फुगूं नये ॥
सभा देखुन लाजूं नये । कोणी एक० ॥ ७ ॥
असत्य वाद करूं नये । खोटा संग धरूं नये ॥
भोचकासी मैत्री करूं नये । कोणी एक० ॥ ८ ॥
भलते भरीं पडूं नये । अनाचार करूं नये ॥
कपट मनीं धरूं नये । कोणी एक० ॥ ९ ॥
जन्मा आलिया स्वभावें । कांहीं सार्थक करावें ॥
ऐसें मनीं विचारावें । कोणी एक० ॥ १० ॥
एका जनार्दनीं भावें । संतचरणीं लीन व्हावें ॥
सदा हरिनाम उच्चारावें । कोणी एक० ॥ ११ ॥

३५ फटका.

बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडुं नको ।
संसारामधिं ऐस आपुला उगाच भटकत फिरूं नको ॥
चल सालसपण धरुनि निखालस बोला खोट्या बोलुं नको ।
अंगिं नम्रता सदा असावी राग कुणावर धरूं नको ॥
नास्तिकपणांत शिरुनि जनाचा बोल आपणा घेउं नको ।
भली भलाई कर कांहीं पण अधर्ममार्गीं शिरूं नको ॥
मायबापांवर रुसूं नको ।
दूर एकला बसूं नको ।
व्यवहारामधें फसूं नको ।
कधीं रिकामा असूं नको ।
परी उलाढाली भलभलत्या पोटासाठीं करूं नको ॥ १ ॥
वर्म काढुनी शरमायाला उणें कुणाला बोलुं नको ।
बुडवाया दुसऱ्याचा ठेवा करूनि हेवा झटूं नको ॥
मी मोठा शाहणा धनाढ्यहि गर्वभार हा वाहुं नको ।
एकाहून एक चढी जगामधिं थोरपणाला मिरवूं नको ॥

हिमायतीच्या बळें गरिबगुरिबांला तूं गुरकावुं नको ।
दों दिवसांची जाइल सत्ता अपेश माथां घेउं नको ॥
बहुत कर्जबाजारी होउनि बोज आपला दवडुं नको ।
स्नेह्यासाठीं पदरमोड कर परंतु जामिन होउं नको ॥
विडा पैजेचा उचलुं नको ।
उणी तराजू तोलुं नको ।
गहाण कुणाचें डुलवुं नको ।
असल्यावर भीक मागूं नको ।
नसल्यावर सांगणें कशाला, गांव तुझा भिड धरूं नको ॥ २ ॥
उगीच निंदा स्तुती कुणाची स्वहितासाठीं करूं नको ।
बरी सुशामत शहाण्याची ही मूर्खाची ती मैत्रि नको ॥
कष्टाची बरि भाजि भाकरी तुपसाकरेची चोरि नको ।
आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढती पाहुं नको ॥
दिली स्थिती देवानें तींतच मानीं सुख कधिं विटूं नको ।
असल्या गांठीं धनसंचय कर सत्कार्यीं व्यय हटूं नको ॥
आतां तुज ही गोष्ट सांगतों सत्कर्मा ओसरूं नको ।
सत्कीर्तीनौबदिचा डंका वाजे, मग शंकाच नको ॥
सुविचारा कातरूं नको ।
सत्संगत अंतरूं नको ।
द्वैताला अनुसरूं नको ।
हरिभजना विस्मरूं नको ।
गावयास अनंतफंदिचे फटके मागें सरूं नको ॥ ३ ॥

३६ पद.

अरे कान्हा अरे कृष्णा मनरंजन मोहना ॥ ध्रु० ॥
संत आले घरा म्हणुन काय बोलशील वाहवा ॥

ऊंस गोड झाला म्हणुन काय मुळासहित खावा ॥
प्रीतीचा पाहुणा झाला म्हणुन काय फार दिवस रहावा ॥ अरे०॥१॥
देव अंगीं आला म्हणुन काय भलतेंच बोलावें ॥
चंदन शीतळ झालें म्हणुन काय उगाळून प्यावें ॥
वडील रागें भरले म्हणुन काय जिवेंच मारावें ॥
भगवीं वस्त्रें केलीं म्हणुन काय जगासि नाडावें ॥ अरे० ॥ २ ॥
आग्या विंचू झाला म्हणुन काय कंठिंच कवळावा ॥
फुकाचा हत्ती झाला म्हणुन काय भलत्यांनीं घ्यावा ॥
फुकट हिरा झाला म्हणुन काय कथलिला जोडावा ॥
नित्य व्याज खातो म्हणुन काय मुद्दल बुडवावा ॥ अरे० ॥ ३ ॥
सोन्याचि सुरी झाली म्हणुन काय उरींच मारावी † ॥
मखमल पैजार झाली म्हणुन काय शिरींच बांधावी ॥ अरे० ॥ ४ ॥
गुरू सोयरा झाला म्हणुन काय अजिबाद बुडवावा ॥
नित्य देव भेटले म्हणुन काय जगासि दावावा ॥
घरचा दिवा झाला म्हणुन काय आड्याशिं खोवावा ॥
एका जनार्दन म्हणे हरी हा गुप्तचि ओळखावा ॥ अरे० ॥ ५ ॥

३७ पद.

नेदी चित्ता शांती ऐशी विद्या काशाला ॥
नेघे हरिचें नाम ऐशी जिव्हा काशाला ॥ ध्रु० ॥
अप्रिय बोलति पतिला ऐशी बाइल काशाला ॥
बाइलिला जो व्यर्थ गांजितो तो पति काशाला ॥
हृदयीं कृत्रिम अशांशीं ती मैत्री काशाला ॥
मनचा खोटा फिरोनि शिणला तीर्थें काशाला ॥ नेदी० ॥ १ ॥

---

† चंदनाचा शूळ सोनियाची बेडी । सुख नेदी फोडी प्राण नाशी ॥—गा.२५२०.

भावाविरहित नर जो त्याला दैवत काशाला ॥
एक धड ना भाराभर त्या चिंध्या काशाला ॥
एक गुणी ना दुर्गुणि बेटे शंभर काशाला ॥
आदर न करी त्याच्या घरचें भोजन काशाला † ॥ नेदी० ॥२॥

गर्वें ताठुनि जाय तयाशीं भाषण काशाला ॥
अभाग्याचें समर्थाशीं वैर काशाला ॥
करणी नसतां ज्ञान व्यर्थ बडबड काशाला ॥
हृदयीं षड्रिपु वसती त्याला जपतप काशाला ॥ नेदी० ॥ ३ ॥

गुरुपदिं निष्ठा न धरी ऐसा शिष्या काशाला ॥
शिष्याला जो वाइट चिंती तो गुरु काशाला ॥
वाद्या अथवा भेद्या ऐसा सेवक काशाला ॥
प्रबोध निर्मळ न करी ऐसा स्वामी काशाला ॥ नेदी० ॥ ४ ॥

प्रीत धरीना सहोदराची ऐसा सोदर काशाला ॥
पोट भरेना जेथें ऐसा देश काशाला ॥
हरि कवि बोले सद्गुरुवचनीं संसृतिपाशाला ॥
छेदीना तो मानव जन्मा आला काशाला ॥ नेदी० ॥ ५ ॥

---

† १ मानेन तृप्तिर्न तु भोजनेन, ज्ञानेन मुक्तिर्न तु मुण्डनेन ।

२ संप्रीतिभोज्यान्यन्नानि आपद्भोज्यानि वा पुनः । प्रेम असेल किंवा आपत्ति असेल तरच एकानें दुसऱ्याचें अन्न भक्षण करावें.—महाभारत, उद्योगपर्व ९१.२६.

भाग २ रा.

इन्द्रियें.

इन्द्रियकर्तव्य.

जिव्हे कीर्तय केशवं मुररिपुं, चेतो भज श्रीधरं,
पाणिद्वन्द्व समर्चयाच्युतकथां श्रोत्रद्वयं त्वं शृणु ।
कृष्णं लोकय लोचनद्वय, हरेर्गच्छांघ्रियुग्मालयं,
जिघ्र घ्राण मुकुंदपादतुलसीं, मूर्धन्नमाधोक्षजम् ॥ १ ॥ *

१ अभंग.

घेईं घेईं माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥
तुम्ही घ्या रे डोळे सुख । पाहा विठोबाचें मुख ॥ २ ॥
तुम्ही आइका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥ ३ ॥
मना तेथें धांव घेईं । राहीं विठोबाचे पायीं ॥ ४ ॥
तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ॥ ५ ॥

२ अभंग.

येणें मुखें तुझें वर्णीं गुण नाम । तेंचि मज प्रेम देईं देवा ॥ १ ॥
डोळे भरूनियां पाहें तुझें मुख । तेंचि मज सुख देईं देवा ॥ २ ॥
कान भरोनियां ऐकें तुझी कीर्ती । ते मज विश्रांती देईं देवा ॥ ३ ॥
वाहें रंगीं टाळी नाचेन उदास । हें देईं हातांस पायां सुख ॥ ४ ॥
तुका म्हणे माझा सकळ देहभाव । आणीक नको ठाव चिंतूं यासी॥५॥

---

* जिव्हे, मुरमर्दन केशवाचें कीर्तन कर; चित्ता, श्रीहरीला भज; हातांनो, तुम्ही अर्चन करा; कानांनो, तुम्ही अच्युतकथा श्रवण करा; नेत्रांनो, तुम्ही कृष्णाला पहा; नासिके, मुकुंदाच्या पायावरील तुळसीचा वास घे; हे शीर्षा, अधोक्षजाला नमन कर.

३ अभंग.

ध्याइन तुझें रूप गाइन तुझें नाम । आणीक न करीं काम जिह्वामुखें ॥१॥
पाहिन तुझे पाय ठेवीन मी डोई । पृथक तें कांहीं न करीं आन ॥ २ ॥
तुझेचि गुणवाद आइकेन कानीं । आणिकांची वाणी पुरे आतां ॥ ३ ॥
करिन सेवा करें, चालेन मी पायीं । आणीक न वजें ठायीं तुजविण ॥४॥
तुका म्हणे जीव ठेवीन मी पायीं । आणीक तें कांहीं देऊं कवणा ॥ ५ ॥

४ अभंग.

तुजविण वाणीं आणिकांची थोरी । तरी माझी हरी जिह्वा झडो ॥ १ ॥
तुजविण चित्ता आवडे आणीक । तरी हा मस्तक भंगो माझा ॥ २ ॥
नेत्रीं आणिकांसी पाहीन आवडी । जातु तेचि घडी चांडाळ हे ॥ ३ ॥
कथामृतपात न करिती श्रवण । काय प्रयोजन मग यांचें ॥ ४ ॥
तुका म्हणे काय वांचून कारण । तुज एक क्षण विसंबतां ॥ ५ ॥

५ अभंग.

पापाची वासना नको दावूं डोळां । त्याहूनि अंधळा बराच मी ॥ १ ॥
निंदेचें श्रवण नको माझे कानीं । बधिर करोनि ठेवीं देवा ॥ २ ॥
अपवित्र वाणी न यो माझे मुखा । त्याजहुनी मुका बराच मी ॥ ३ ॥
नको मज कधीं परस्त्रीसंगती । जनांतून माती उठतां भली ॥ ४ ॥
तुका म्हणे मज अवघ्याचा कांटाळा । तूं एक गोपाळा आवडसी ॥५॥

६ अभंग.

जरी माझी कोणी कापितील मान । तरी नको आन वदों जिव्हे ॥१॥
सकळां इंद्रियां हे माझी विनंती । नका होऊं परतीं पांडुरंगा ॥ २ ॥
आणिकांची मात नाइकावी कानीं । आणिका नयनीं न पहावें ॥ ३ ॥
चित्ता तुवां पायीं रहावें अखंडित । होउनी निश्चित एकविध ॥ ४ ॥
चला हात पाय हेंचि काम करा । माझ्या नमस्कारा विठोबासी ॥ ५ ॥
तुका म्हणे तुम्हां भय काय करी । आमुचा कैवारी नारायण ॥ ६ ॥

इन्द्रियदमन.

इन्द्रियाणां प्रसंगेन दोषमृच्छत्यसंशयम् ।
संनियम्य तु तान्येव ततः सिद्धिं नियच्छति ॥ *

१ अभंग.

इंद्रियांसी लाड देणेंचि ओंगळ । घातक केवळ परमार्थासी ॥ १ ॥
व्याघ्रासी संसर्ग सर्पासी खेळणें । इंद्रियां पाळणें तैशापरी ॥ २ ॥
म्हणोनी भल्यानें दमोनी चालावें । लोलुप्य न व्हावें इंद्रियांसी ॥ ३ ॥
तुका म्हणे धोका चौऱ्याशींचा घ्यावा । विषयाच्या भावा आतळितां ॥४॥

२ अभंग.

चोरासंगतीनें गेला । वाटे जातां नागवला ॥ १ ॥
तैसी सांडोनियां भक्ती । धरी विषयाची संगती ॥ २ ॥
अग्नीसवें खेळे । न जळला तरी पोळे ॥ ३ ॥
विश्वासला चोरा । जनी म्हणे घाला खरा ॥ ४ ॥

३ अभंग.

विषयाचें सुख नको नको मना † । पहा त्या रावणा काय झालें ॥ १ ॥
इन्द्रा पडलीं भगें चंद्र झाला काळा । म्हणोनी कंटाळा विषयांचा ॥ २ ॥

---

* इन्द्रियांची विषयांच्या ठिकाणीं आसक्ति (प्रसंग) ठेवल्यानें मनुष्य निःसंशय पतन पावतो; पण त्याच इन्द्रियांचें नियमन करून नंतर सिद्धि प्राप्त करून घेतो. —मनुस्मृति २.९३.

† एथें हेंहि सांगणें जरूर आहे कीं, इंद्रियांना विषयांचें फक्त सेवन करूं न दिल्यानें कार्यभाग होणार नाहीं, कारण इंद्रियांना विषयसुखसेवनापासून बळेंच खेंचून धरल्यानें जरी प्रत्यक्ष भोग न घडला तरी इंद्रियांची विषयसुखाची लालसा किंवा गोडी सुटत नाहीं असा गीतेचा सिद्धान्त असून (गी. २.५९), 'नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें । वैराग्य वाउगें देशत्यागें' ॥ असें तुकोबांनींहि म्हटलें आहे. व

मोहनीचे संगें भस्मासुर मेला । वालीप्राण गेला रामबाणीं ॥ ३ ॥
येवढ्यासाठीं तुका येतो काकुळती । नको यातायाती गर्भवास ॥ ४ ॥

४ पद. (थट्टा)

अशी ही थट्टा । भल्याभल्यांसि लाविला बट्टा ॥
ब्रह्मदेव त्रैलोक्याला शोधी । थट्टेनें हारविली बुद्धी ॥
केली नारदाची नारदी । अशी ही थट्टा ॥ भल्या० ॥ १ ॥
थट्टा दुर्योधनानें केली । पांचाळी सभेमाजि गांजिली ॥
गदाघायें मांडी फोडिली । अशी ही थट्टा ॥ भल्या० ॥ २ ॥

' वनेषु दोषाः प्रभवन्ति रागिणां...निवृत्तरागस्य गृहं तपोवनम् । ' या वचनाचें तात्पर्यहि तेंच आहे. त्याचप्रमाणें—

न तथैतानि शक्यन्ते संनियन्तुमसेवया ।
विषयेषु प्रजुष्टानि यथा ज्ञानेन नित्यशः ॥ १ ॥

' विषयसुखलंपट अशा या इंद्रियांचें केवळ विषयोपभोगाच्या त्यागानें संयमन होणें शक्य नाहीं; तें नित्य ज्ञानानें (म्हणजे नेहमीं विवेकानें अंगीं वैराग्य बाणल्यानेंच) होणें शक्य आहे ' असें मनुस्मृतींतहि म्हटलें आहे (म. स्मृ. २. ९६). म्हणून ज्ञानानें इंद्रियांची विषयासक्ति नाहींशी करून विषयविचारांस मनांत अयोग्य अवकाश देतां कामा नये कारण—

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ १ ॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ॥
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ २ ॥

' विषयांचें चिंतन करणाऱ्या पुरुषाच्या मनामध्यें त्या विषयांची सलगी उत्पन्न होत्ये. या सलगीपासून पुढें काम म्हणजे सदर विषय आपल्याला पाहिजेत ही वासना उत्पन्न होत्ये आणि (काम तृप्त होण्यास अडथळा आला म्हणजे) क्रोधाचा उद्भव होतो. क्रोधापासून संमोह म्हणजे मूढता किंवा अविवेक होतो, संमोहापासून स्मृतिभ्रम, स्मृतिभ्रंशापासून बुद्धिनाश, आणि बुद्धिनाशामुळें त्या पुरुषाचा सर्वस्वी नाश होतो ' (गी. २.६२-६३).

थट्टा गेली शंभोपाशीं । कलंक लाविला चंद्रासी ॥
भगें पाडिलीं इन्द्रासी । बरी नव्हे थट्टा ॥ भल्या० ॥ ३ ॥
थट्टेनें मेला दुर्योधन । भस्मासुर गेला भस्म होऊन ॥
वाळीही मुकला आपल्या प्राणा । अशी ही थट्टा ॥ भल्या० ॥४॥
थट्टा रावणानें केली । नगरी सोन्याची बुडविली ॥
थट्टा त्याची त्यास भोंवली । बरी नव्हे थट्टा ॥ भल्या० ॥ ५ ॥
अरण्यांत होता भृगुऋषी । थट्टा गेली त्याचेपाशीं ॥
भुलवुनी आणिला अयोध्येसी । बरी नव्हे थट्टा ॥ भल्या० ॥ ६ ॥
विराट राजाचा मेहुणा । नाम तयाचें कीचक जाणा ॥
त्यानें घेतलें बहुतांचे प्राणा । बरी नव्हे थट्टा ॥ भल्या० ॥ ७ ॥
थट्टेपासून सुटले चौघे जण । शुक भीष्म आणि हनुमान ॥
चौथा कार्तिकस्वामी जाण । अशी ही थट्टा ॥ भल्या० ॥ ८ ॥
एका जनार्दन म्हणे सर्वांला । थट्टेला भिऊन तुम्ही चाला ॥
नाहीं तर नेईल नरककुंडाला । अशी ही थट्टा ॥ भल्या० ॥ ९ ॥

मन.

मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः ।
बन्धाय विषयासंगि मोक्षे निर्विषयं स्मृतम् ॥ *

१ अभंग.

गति अधोगति मनाची हे युक्ती । मन लावा एकांतीं साधुसंगें ॥ १ ॥
जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें † ॥ २ ॥

---

* मनुष्यांस (कर्मांचा) बंध किंवा मोक्ष घडण्यास मन हेंच कारण आहे; मन विषयासक्त झालें म्हणजे बंध, आणि निर्विषय म्हणजे निष्काम किंवा निःसंग झालें म्हणजे मोक्ष प्राप्त होतो असें म्हटलें आहे. —मैत्र्युपनिषत् ६.३४.

† मन हें ओढाळ गुरू परधनपरकामिनीकडे धांवे । यास्तव विवेकपाशीं कंठीं वैराग्यकाष्ठ बांधावें ॥ १ ॥ —मोरोपंत.

मान अपमान मनाचें लक्षण । लाविलिया ध्यान तेंचि करी ॥ ३ ॥
तुका म्हणे मन उतरी भवसिंधु । मन करी बंधु चौ-याशींचा ॥ ४ ॥

१ अभंग.

हृदयस्थ असोनि कां रे फिरसी वांयां । दीप आणि छाया जयापरी ॥१॥
आत्मतीर्थीं सुस्नात झालिया मन । आणिक साधन दुजें नाहीं ॥ २ ॥
साधन तें मन करीं आपुले आधीन । यापरतें कारण आन नाहीं ॥ ३ ॥
एका जनार्दनीं मनासीं आवरीं । मग तूं संसारीं धन्य होसी ॥ ४ ॥

२ अभंग.

होऊं नको कांहीं या मनाआधीन । नाइकें वचन याचें कांहीं॥ १ ॥
हटियाची गोष्टी मोडून टाकावी । सोई ही धरावी विठोबाची ॥ २ ॥
आपुले आधीन करूनियां ठेवा । नाहीं तरी जीवा घातक हें ॥ ३ ॥
तुका म्हणे जाले जे मनाआधीन । तयांसी बंधन यम करी ॥ ४ ॥

४ अभंग.

मनासी लावावी स्वरूपाची गोडी । इतर आवडी सोडवावी ॥ १ ॥
पळ पळ नाम विठोबाचें ध्यावें । कोठेंही नसावें आसक्तता ॥ २ ॥
अहंकार आदि वैरी हे सकळ । गुरुकृपाबळें आवरावे ॥ ३ ॥
तुका म्हणे मने उफराटें होय । तरीच अपाय मावळेती ॥ ४ ॥

---

१ ' मन ' हें 'नम' होईल तर; मनुष्य ईश्वरास (भावपूर्वक) नमन करील तर.

चित्तशुद्धि. (अ)

चित समाधानें[1]। तरी विष वाटे सोनें ॥ १ ॥
मनाच्या तळमळें । चंदनेंही अंग पोळे ॥ २ ॥

१ अभंग.

मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण ॥
मोक्ष अथवा बंधन । सुखें[2] समाधान इच्छा तें ॥ १ ॥
मनें प्रतिमा स्थापिली । मनें मना पूजा केली ॥
मनें इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ॥ २ ॥
मन गुरु आणि शिष्य । करी आपुलेंचि दास्य ॥
प्रसन्न आपआपणास । गति अथवा अधोगति ॥ ३ ॥
साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात ॥
नाहीं नाहीं आन दैवत । तुका म्हणे दुसरें ॥ ४ ॥

२ अभंग.

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ॥ १ ॥
विष तें अमृत, आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥ २ ॥
दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥ ३ ॥
आवडेल जीवां जीवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ॥ ४ ॥
तुका म्हणे कृपा केली नारायणें । जाणिजेते येणें अनुभवें ॥ ५ ॥

३ अभंग.

निर्वैर व्हावें सर्व भूतांसवें । साधन बरवें होंचि एक ॥ १ ॥
तरीच अंगीकार करील नारायण । बडबड तो सीण येणेंविण ॥२॥
सोइरें पिशुन समानचि घडे । चित्त पर ओढे उपकारीं ॥ ३ ॥
तुका म्हणे चित्त झालिया निर्मळ । तरिच सकळ केलें होय ॥ ४ ॥

४ अभंग.

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥

---

१ समाधान पावे. २ जे सुख किंवा समाधान इच्छा (इच्छीतसां) ते मन प्रसन्न करा.

सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥
हित तें करावें देवाचें चिंतन । करूंनियां मन एकविध ॥ ३ ॥
तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥ ४ ॥

५ अभंग.

बैसोनि निवांत शुद्ध करीं चित्त । तया सुखा अंत पार नाहीं ॥ १ ॥
येऊनि अंतरीं राहील गोपाळ । सायासाचें फळ बैसलिया ॥ २ ॥
राम कृष्ण हरि मुकुंद मुरारी । मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य । जरी होइल भाव एकविध ॥ ४ ॥

६ अभंग.

ज्यासी करणें चित्तशुद्धि । कर्मे आचरावीं आधीं ॥ १ ॥
तरीच होय मनःशुद्धि । सहज तुटती आधिव्याधी ॥ २ ॥
चित्ताची स्थिरता । होय उपासने तत्वतां ॥ ३ ॥
चित्त झालिया निश्चळ । सहज राहील तळमळ ॥ ४ ॥
एका जनार्दनीं मन । होय ब्रह्मरूप जाण ॥ ५ ॥

चित्तशुद्धि. (आ)

निजदोषावृतमनसामतिसुन्दरमेव भाति विपरीतम् ।
पश्यति पित्तोपहतः शशिशुभ्रं शंखमपि पीतम् ॥ *

१ अभंग.

आंधळ्यासि जन अवघेचि आंधळे । आपणासि डोळे दृष्टी नाहीं ॥ १ ॥
रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न † । तोंडासि कारण चवी नाहीं ॥ २ ॥
तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटें ॥ ३ ॥

---

* ज्यांचीं मनें स्वतःच्या दोषांनीं ग्रस्त झालीं आहेत त्यांना अत्यंत सुंदर वस्तूसुद्धां उलट भासत्ये; ज्याला कावीळ झाली आहे त्याला चंद्रासारखा शुभ्र असा शंख सुद्धां पिंवळा दिसतो. —काव्यप्रकाश १० १०९.

† अंगीं ज्वर तया नावडे साकर । जन तो इतर गोडी जाणे ॥ —तुकाराम.

२ अभंग.

दर्पणासी बुजे । नखटें तोंड लपवी लाजे ॥ १ ॥
गुण ज्याचे जो अंतरीं । तोचि त्यासी पीडा करी ॥ २ ॥
चोरा रुचे निशी । देखोनियां विटे शशी ॥ ३ ॥
तुका म्हणे जन । देवा असे भाग्यहीन ॥ ४ ॥

३ अभंग.

पतिव्रतेची कीर्ती वाखाणितां । सिंदळीच्या माथां तिडिक उठे ॥ १ ॥
आमुचें तों आहे सहज बोलणें । नाहीं विचारून केलें कोणीं ॥ २ ॥
अंगें उणें त्याच्या बैसे टाळक्यांत । तेणें ठिणग्या बहुत गाळीतसे ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हीं काय करणें त्यासी । ढका खावंदासी लागतसे ॥ ४ ॥

४ अभंग.

याचि नांवें दोष । राहे अंतरीं किल्मिष ॥ १ ॥
मनाअंगीं पुण्य पाप । शुभ उत्तम संकल्प ॥ २ ॥
बीजाऐसीं फळें । उत्तम कीं अमंगळें ॥ ३ ॥
तुका म्हणे चित्त । शुद्ध करावें हें हित ॥ ४ ॥

मनास उपदेश.

१ अभंग.

श्रीराम सखा ऐसा धरीं भाव । मीपणाचा ठाव पुसीं मना ॥ १ ॥
शरण निरंतर म्हण तूं गोविंदा । वाचे लावीं धंदा नारायण ॥ २ ॥
यापरि सोपान नाहीं रे साधन । वाहतसें आण तुझी मना ॥ ३ ॥
नको कांहीं करूं आळस अंतरीं । जपें निरंतरीं रघुपती ॥ ४ ॥
तुका म्हणे मोठा लाभ नरदेहीं । देहींच विदेही होती नामें ॥ ५ ॥

२ अभंग.

रिकामें तूं नको मना । राहों क्षणोक्षणही ॥ १ ॥
वेळोवेळां पारायण । नारायण हें करीं ॥ २ ॥
भ्रमणांच्या मोडीं वाटा । न भरें फाटा आडरानें ॥ ३ ॥
तुका म्हणे माझ्या जीवें । हेंचि घ्यावें धणीवरी ॥ ४ ॥

३ अभंग.

चित्ता ऐसी नको देऊं आठवण । देवाचे चरण अंतरे ते ॥ १ ॥
आलिया वचनें रामनामध्वनि । ऐकावीं कानीं ऐसीं गोडें ॥ २ ॥
मत्सराचा ठाव शरीरीं नसावा । लाभेंविण जीवा दुःख देता ॥ ३ ॥
तुका म्हणे राहे अंतर शीतळ । शांतीचें तें बळ क्षमा अंगीं ॥ ४ ॥

४ अभंग.

देवाचिये पायीं देईं मना बुडी । नको धांवों वोढी इंद्रियांचे ॥ १ ॥
सर्व सुखें तेथें होती एक वेळे । न सरती काळें कल्पांतींही ॥ २ ॥
जाणें येणें खुंटे धांव वेरझार । नलगे डोंगर उसंतावे ॥ ३ ॥
सांगणें तें तुज इतुलेंचि आतां । मानीं धन कांता विषतुल्य ॥ ४ ॥
तुका म्हणे तुझे होती उपकार । उतरों हा पार भवसिंधु ॥ ५ ॥

५ अभंग.

न करीं रे मना कांहींच कल्पना । चिंतीं या चरणां विठोबाच्या ॥ १ ॥
येथें सुखाचिया अमुपचि रासी । पुढें कल्पनेसी ठाव नाहीं ॥ २ ॥
सुखाचें वोतिलें साजिरें श्रीमुख । शोक मोह दुःख पाहातां नासे ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें होईल विसांवा । तुटतील हांवा पुढिलिया ॥ ४ ॥

६ मनाचे श्लोक.

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ।
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें । जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ॥ १ ॥
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा । पुढें वैखरी राम आधीं वदावा ॥
सदाचार हा थोर सांडूं नये तो । जनीं तोचि तो मानवीं धन्य होतो ॥ २ ॥

मना वासना दुष्ट कामा नये रे । मना सर्वथा पापबुद्धी नको रे ॥
मना धर्मता नीति सोडूं नको हो । मना अंतरीं सार वीचार राहो ॥ ३ ॥
मना पापसंकल्प सोडूनि द्यावा । मना सत्यसंकल्प जीवीं धरावा ।
मना कल्पना ते नको वीषयांची । विकारें घडे हो जनीं सर्व छी छी ॥४॥
नको रे मना क्रोध हा खेदकारी । नको रे मना काम नानाविकारी ॥
नको रे मदा सर्वदा अंगिकारु । नको रे मना मच्छरु दंभ भारु ॥ ५ ॥
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें । मना बोलणें नीच सोसीत जावें ।
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावें । मना सर्व लोकांसि रे नीववावें ॥ ६ ॥
देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी । मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावें । परी अंतरीं सज्जना नीववावें ॥ ७ ॥
जनीं सर्वसूखी असा कोण आहे । विचारें मना तूंचि शोधूनि पाहें ॥
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें । तयासारिखें भोगणें प्राप्त जालें ॥ ८ ॥
मना मानसीं दुःख आणूं नको रे । मना सर्वथा शोक चिंता नको रे ।
विवेकें देहेबुद्धि सोडूनि द्यावी । विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ॥ ९ ॥
जिवा कर्मयोगें जनीं जन्म जाला । परी सेवटीं काळमूखीं निमाला ।
महा थोर ते मृत्यपंथेंचि गेले । कितीयेक ते जन्मले आणि मेले ॥ १० ॥
मरे येक त्याचा दुजा शोक वाहे । अकरमात तोही पुढें जात आहे ।
पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्यातें । म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतें ॥११॥
मना सर्वथा सत्य सांडूं नको रे । मना सर्वथा मिथ्य भांडूं नको रे ।
मना सत्य तें सत्य वाचे वदावें । मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें ॥१२॥
समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ।
जयाची लिळा वर्णिती लोक तिन्ही । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥१३॥
असे हो जया अंतरीं भाव जैसा । वसे हो तया अंतरीं देव तैसा ।
अनन्यास रक्षीतसे च्यापपाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ १४ ॥
सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ।
सुखानंद आनंद कैवल्यदानी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ १५ ॥

सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा । उडी घालितो संकटीं स्वामि तैसा ।
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥१६॥
मना जे घडी राघवेंवीण गेली । जनीं आपुली ते तुवां हानि केली ॥
रघुनायेकावीण तो सीण आहे । जनीं दक्ष तो लक्ष लाऊनि पाहे ॥ १७॥
सदा देहकाजीं झिजे देह ज्याचा । सदा रामनामें वदे नित्य वाचा ॥
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥१८॥
सदा बोलण्यासारिखें चालताहे । अनेकीं सदा येक देवासि पाहे ॥
सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥१९॥
सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं । सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ॥
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥२०॥
दिनाचा दयाळु मनाचा मवाळु । स्नेहाळु कृपाळु जनीं दासपाळु ॥
तया अंतरीं क्रोध संताप कैंचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥२१॥
अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना । अती काम त्या राम चित्तीं असेना ॥
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा । अती वीषई सर्वदा दैन्यवाणा ॥२२॥
अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं । तया पामरा बाधिजे सर्व कांहीं ॥
महाराज तो स्वामि कैवल्यदाता । वृथा वाहणें देहेसंसारचिंता ॥ २३ ॥
जयाचेनि नामें महा दोष जाती । जयाचेनि नामें गती पाविजेती ॥
जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ २४ ॥
न वेचे कदा ग्रंथिचे अर्थ कांहीं । मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं ॥
महा घोर संसारशत्रु जिणावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥२५ ॥
बहू चांगलें नाम या राघवाचें । अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ॥
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें । जिवां मानवां हेंचि कैवल्य साचें ॥ २६॥
अजामेळ पापी वदे पुत्र कामें । तया मुक्ति नारायणाचेनि नामें ॥
शुकाकारणें कुंटणी रामवाणी । मुखें बोलतां ख्याती जाली पुराणीं ॥२७॥
जया नावडे राम त्या येम जाची । विकल्पें उठे तर्क त्या नर्क छी छी ॥
म्हणोनी अती आदरें नाम ध्यावें । मुखें बोलतां दोष जाती स्वभावें ॥२८॥

मुखीं राम विश्राम तेथेंचि आहे । सदानंद आनंद सेऊनि राहे ॥
तयावीण तो सीण संदेहकारी । निजधाम हें नाम शोकापहारी ॥ २९ ॥
मुखीं राम त्या काम बाधूं शकेना । गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना ॥
हरीभक्त तो शक्त कामास मारी । जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी ॥३०॥
जनीं भोजनीं नाम वाचे वदावें । अती आदरें गद्य घोषें म्हणावें ॥
हरीचिंतनें अन्न सेवीत जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥ ३१ ॥
हरीकीर्तनें प्रीति रामीं धरावी । देहेबुद्धि नीरूपणीं वीसरावी ॥
परद्रव्य आणीक कांता परावी । यदर्थीं मना सांडि जीवीं करावी ॥ ३२ ॥
जगीं धन्य तो रामसूखें निवाला । कथा ऐकतां सर्व तल्लीन जाला ॥
देहेभावना रामबोधें उडाली । मनोवासना रामरूपीं बुडाली ॥ ३३ ॥
यथासांग रे कर्म तेंही घडेना । घडे धर्म तों पुण्य गांठीं पडेना ॥
दया पाहतां सर्व भूतीं असेना । फुकाचें मुखीं नाम तेंही वसेना ॥ ३४ ॥
फुकाचें मुखीं बोलतां काय वेचे । दिसेंदीस अभ्यंतरी गर्व सांचे ॥
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे । विचारें तुझा तूंचि शोधून पाहें ॥ ३५ ॥
तुटे वाद संवाद तेथें करावा । विवेकें अहंभाव हा पालटावा ॥
जनीं बोलण्यासारिखें आचरावें । क्रियापालटें भक्तिपंथेंचि जावें ॥ ३६ ॥
विचारून बोले विवंचूनि चाले । तयाचेनि संतप्त तेही निवाले ॥
बरें शोधिल्यावीण बोलों नको हो । जनीं चालणें शुद्ध नेमस्त राहो ॥३७॥
नसे गर्व आंगीं सदा वीतरागी । क्षमा शांति भोगी दयादक्ष योगी ॥
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा । यहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥३८॥
धरीं रे मना संगती सज्जनाची । जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची ॥
बळें भाव सद्बुद्धि सन्मार्ग लागे । महा क्रूर तो काळ विक्राळ भंगे ॥ ३९ ॥
नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्वज्ञानें । समाधान कांहीं नव्हे तानमानें ॥
नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें । समाधान ते सज्जनाचेनि योगें ॥ ४० ॥
देहेभान हें ज्ञानशस्त्रें खुडावें । विदेहीपणें भक्तिमार्गेंचि जावें ॥
विरक्तीबळें निंद्य सर्वें तजावें । परी संग सोडूनि सूखें रहावें ॥ ४१ ॥

दिसे लोचनीं तें नसे कल्पकोडी । अकस्मात आकारलें काळ मोडी ॥
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे । मना संत आनंत शोधूनि पाहें ॥ ४२ ॥
फुटेना तुटेना चळेना ढळेना । सदा संचलें मीपणें तें कळेना ॥
तया येकरूपासि दूजें न साहे । मना संत आनंत शोधूनि पाहें ॥ ४३ ॥
निराकार आधार ब्रह्मादिकांचा । जया सांगतां सीणली वेदवाचा ॥
विवेकें तदाकार होऊनि राहें । मना संत आनंत शोधूनि पाहें ॥ ४४ ॥
जेणें माक्षिका भक्षिली जाणिवेची । तया भोजनाची रुची प्राप्ति केंची ॥
अहंभाव ज्या मानसींचा विरेना । तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ॥४५॥
सदा सर्वदा राम सन्निध आहे । मना सज्जना सत्य शोधून पाहें ॥
अखंडीत भेटी रघुराजयोगु । मना सांडिरे मीपणाचा वियोगू ॥ ४६ ॥
वसे हृदयीं देव तो कोण कैसा । पुसे आदरें साधकु प्रेष्ण ऐसा ॥
देहे टाकितां देव कोठें रहातो । परी मागुता टाव कोठें पहातो ॥ ४७ ॥
वसे हृदयीं देव तो जाण ऐसा । नभाचे परी व्यापकु जाण तैसा ॥
सदा संचला येत ना जात कांहीं । तयावीण कोठें रिता ठाव नाहीं ॥४८॥
मही निर्मिली देव तो वोळखावा । जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा ॥
तया निर्गुणालागि गूणीं पहावें । परी संग सोडूनि सूखें रहावें ॥ ४९ ॥
देहेबुद्धिचा निश्चयो ज्या टळेना । तया ज्ञान कल्पांतकाळीं कळेना ॥
परब्रह्म तें मीपणें आकळेना । मनीं शून्य अज्ञान हें मावळेना ॥ ५० ॥
मना ना कळेना ढळे रूप ज्याचें । दुजेवीण तें ध्यान सर्वोत्तमाचें ॥
तया स्त्रूण ते हीण दृष्टांत पाहे । तेथें संग निःसंग दोनी न साहे ॥ ५१ ॥
नव्हे जाणता नेणता देवराणा । न ये वर्णितां वेदशास्त्रां पुराणां ॥
नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा । श्रुती नेणती नेणती अंत त्याचा ॥५२॥
नभीं वावरे जो अणुरेणु कांहीं । रिता ठाव या राघवेंवीण नाहीं ॥
तया पाहतां पाहतां तेंचि जालें । तेंथें लक्ष आलक्ष सर्वें बुडालें ॥ ५३ ॥
नभासारिखें रूप या राघवाचें । मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें ।
तया पाहतां देहबुद्धी उरेना । सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना ॥ ५४ ॥

नभें व्यापिलें सर्व सृष्टीस आहे । रघूनायेका ऊपमा ते न साहे ॥
दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावें । तया व्यापकु व्यर्थ कैसें म्हणावें॥५५॥
कळे आकळे रूप तें ज्ञान होतां । तेथें आटली सर्वसाक्षी अवस्था ॥
मना उन्मनी शब्द कुंठीत राहे । तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहे॥ ५६॥
कदा वोळखीमाजि दूजें दिसेना । मनीं मानसीं द्वैत कांहीं वसेना ॥
बहूतां दिसां आपुली भेटि जाली । विदेहीपणें सर्व काया निवाली॥५७॥
मना गूज रे तूज हें प्राप्त जालें । परी अंतरीं पाहिजे येत्न केले ॥
सदा श्रवणें पाविजे निश्चयासी । धरीं सज्जनसंगती धन्य होसी ॥ ५८ ॥

भाग ३ रा.

सुखदुःखविवेक. §

अ. संचित.

पूर्वी केलें जें संचित । तें तें भोगावें निश्चित ॥ १ ॥
दास म्हणे पूर्वरेखा । प्राप्त न टळे ब्रह्मादिकां ॥ २ ॥
भोगणें तें फळ संचिताचें ।

१ अभंग.

भोग तो न घडे संचितावांचूनि । करावें तें मनीं समाधान ॥ १ ॥
म्हणऊनि मनीं मानूं नये खेदु । म्हणावा गोविंदु वेळोवेळां ॥ २ ॥
आणिकां रुसावें नलगे बहुतां । आपुल्या संचितावांचूनियां ॥ ३ ॥
तुका म्हणे भार घातलियावरी । होईल कैवारी नारायण ॥ ४ ॥

§ हें नांव व या भागाच्या उत्तरार्धातील शेवटचा तरंग थोड्या शब्दभेदानें गीता-रहस्यांतून घेतला आहे. इतर कांहीं ठिकाणींहि थोडथोडी शब्दरचना व शक्य तेवढे इतर ग्रन्थांचे उल्लेख त्याच ग्रन्थावरून घेतले आहेत.

२ अभंग.

पापी तो नाठवी आपुल्या संचिता । ठेवी भगवंतावरी बोल † ॥ १ ॥
भेईना करितां पापाचे डोंगर । दुर्जन पामर दुराचारी ॥ २ ॥
नाठवी तो खळ आपुली करणी । देवासी निंदोनी बोलतसे † ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याच्या तोंडा लागो कांटी । नाहीं जगजेठी जया चित्तीं॥४॥

३ अभंग.

भार घाली देवा । नलगे देश डोई घ्यावा ॥ १ ॥
देह प्रारब्धाआधीन । सोसें अधिक वाढे सीण ॥ २ ॥
व्यवसाय निमित्त । फळ देतसे संचित ॥ ३ ॥
तुका म्हणे फिरे । भोवंडीनें दम जिरे ॥ ४ ॥

४ अभंग.

समुद्र हा पिता बंधु हा चंद्रमा । भगिनी ते रमा शंखाची या § ॥ १ ॥

---

† १ विषमां हि दशां प्राप्य दैवं गर्हयते नरः । आत्मनः कर्मदोषांश्च नैव जानात्यपंडितः ॥ १ ॥ कठिण दशा प्राप्त झाली म्हणजे मनुष्य दैवास बोल लावतो पण स्वतःचीं दुष्ट कर्में तो मूर्ख लक्षांतच आणीत नाहीं.

२ प्रायेण नीचा व्यसनेषु मग्ना निन्दन्ति दैवं न तु दुष्कृतं स्वम् ।

—महाभारत, कर्णपर्व ९८.२.

§ या अभंगांत शंखाचें उदाहरण देऊन, जें जें लिहिलें संचितीं । तें तें न चुके कल्पांतीं । असें (खालील ६ वा अभंग पहा) तुकोबांनीं सडेतोड सांगितलें आहे म्हणून हताश होण्याचें कारण नाहीं. कारण कर्माच्या पाशांतून कायमचें मुक्त होण्यास एक मार्ग आहे व तो मनुष्याच्या ताब्यांतला आहे. कसा तो पहा. कर्मभोगाचा विचार करितांना संचितापैकीं भोगण्यास सुरुवात झालेलें म्हणजे प्रारब्ध (आरंभ झालेलें), आणि सुरुवात न झालेलें म्हणजे अनारब्ध असे संचिताचे दोन वर्ग होतात. कोणीहि मनुष्यानें आजच्या क्षणापर्यंत केलेलें जें कर्म—मग तें या जन्मांत केलेलें असो वा पूर्वीच्या जन्मांत केलेलें असो—तें सर्व त्याचें 'संचित' म्हणजे 'साठविलेलें' कर्म असें म्हणतात. संचित हें एकंदर भोग्य होय. पैकीं ज्या

मेहुणा जयाचा द्वारकेचा हरी । शंख दारोदारीं भीक मागे ॥ २ ॥
दृष्ट हें जाणावें आपुलें स्वहित । तुका ह्मणे रीत ऐसी आहे ॥ ३ ॥

कर्मांचीं फळें भोगण्यास सुरुवात होऊन हल्लींचा देह किंवा जन्म मिळाला, म्हणजे संचितापैकीं जीं कर्में प्रारब्ध झालीं तीं भोगिल्याखेरीज सुटका नाहीं—'प्रारब्धकर्मणां भोगादेव क्षयः।' हातचा बाण एकदां सुटला म्हणजे तो ज्याप्रमाणें परत घेतां येत नाहीं, शेवटपर्यंत गेला पाहिजे, किंवा कुंभाराच्या चाकास एकदां गति मिळाली म्हणजे तें ज्याप्रमाणें सदर गति संपेपर्यंत फिरत रहातें, तद्वत् 'प्रारब्ध' म्हणजे ज्यांचीं फलें भोगण्यास सुरुवात झाली त्या कर्मांची अवस्था होय. जें सुरू झालें तें संपलें पाहिजे; एरवीं त्यांतून सुटका नाहीं. पण अनारब्धकार्यकर्मांची गोष्ट तशी नाहीं. ज्ञानानें या सर्व कर्मांचा अजीबात नाश करितां येतो. प्रारब्धकार्य व अनारब्धकार्य यांमध्यें जो हा महत्त्वाचा भेद आहे त्यामुळें ज्ञानी पुरुषास ज्ञानोत्तरहि नैसर्गिक रीत्या मरण येईपर्यंत, म्हणजे देहाच्या जन्माबरोबर प्रारब्ध झालेलीं कर्में संपेपर्यंत, शांतपणें वाट पहावी लागत्ये. तसें न करितां हट्टानें देहत्याग करील तर ज्ञानानें त्याच्या अनारब्धकर्मांचा जरी क्षय झाला असला तरी त्याच्या हट्टामुळें ज्या देहारंभक प्रारब्ध कर्मांचा भोग अपुरा राहिला तीं भोगण्यास त्याला पुनः जन्म घ्यावा लागेल, व मग अर्थातच मोक्ष अंतरेल. याखेरीज हट्टानें आत्महत्या करणें हें एक नवेंच कर्म उत्पन्न होऊन त्याचीं फलें भोगण्यासहि नवा जन्म घेणें जरूर होतें. म्हणून मोक्षेच्छु मनुष्यानें ब्रह्मज्ञान झालें तरी, देहाच्या जन्माबरोबर भोगण्यास सुरुवात झालेलीं हीं प्रारब्धकर्में निसर्गतः देहपतन होईपर्यंत भोगूनच संपविलीं पाहिजेत.

आतां कर्मांच्या बंधांतून सुटका कशी करून घ्यावयाची हा प्रश्न आहे. कर्मांच्या कैचीतून अजीबात सुटून त्याच्या बुडाशीं जें अमृत व अविनाशी तत्व आहे त्यांत मिळून जाण्याचा व जन्ममरणाची कटकट कायमची दूर करण्याचा म्हणजे मोक्ष मिळविण्याचा अध्यात्मशास्त्राप्रमाणें ज्ञान हा एकच मार्ग आहे. ज्ञान म्हणजे व्यवहारज्ञान अगर नामरूपात्मक सृष्टिशास्त्राचें ज्ञान असा अर्थ नसून, ब्रह्मात्मैक्यज्ञान असा याठिकाणीं अर्थ आहे. यासच विद्या असेंहि म्हणतात. भगवद्गीतेंत—

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।

'ज्ञानरूप अग्नीनें सर्व कर्में भस्म होतात' (गी. ४.३७), असें भगवंतांनीं

५ अभंग.

प्रारब्धेंचि जोडे धन । प्रारब्धेंचि वाढे मान ॥ १ ॥
सोस करिसी वांयां । भज मना पंढरीराया ॥ २ ॥

अर्जुनास सांगितलें असून, महाभारतांतहि—

बीजान्यग्न्युपदग्धानि न रोहंति यथा पुनः ।
ज्ञानदग्धैस्तथा क्लेशैर्नात्मा संपद्यते पुनः ॥

'भाजलेलें बीं ज्याप्रमाणें रुजत नाहीं त्याप्रमाणें ज्ञानानें (कर्मांचे) क्लेश दग्ध झाले म्हणजे ते आत्म्यास पुनः प्राप्त होत नाहींत,' असा सिद्धांत दिला आहे (शांति. २११.१७). उपनिषदांतूनहि याचप्रमाणें 'य एवं वेदाहं ब्रह्मास्मीति स इदं सर्वं भवति' (बृ० १.४.१०),—मीच ब्रह्म आहें असें जो जाणितो तो अमृत ब्रह्म होतो; ज्याप्रमाणें कमलाच्या पानाला पाणी चिकटत नाहीं त्याप्रमाणें ज्याला हें ब्रह्मज्ञान झालें त्याला पापात्मक कर्में चिकटत नाहींत (छां ४. १४.३); 'ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति' (मुंडक ३.२.९)—ब्रह्म जाणतो तो ब्रह्मच होतो; सर्व आत्ममय आहे हें ज्यानें जाणिलें त्याला पापात्मक कर्माचा लेप लागत नाहीं (बृ. ४.४.२३); 'ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः' (श्वे० ५.१३; ६.१३) —परमेश्वराचें ज्ञान झाल्यावर सर्व पाशांतून मुक्त होतो; 'क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे' (मुं. २.२.८)—परब्रह्माचें ज्ञान झाल्यावर त्याच्या सर्व कर्माचा क्षय होतो; 'विद्ययामृतमश्नुते' (इशा. ११. मैत्र्यु. ७. ९)—विद्येनें अमृतत्व प्राप्त होतें; 'तमेव विदित्वाऽतिमृत्युमेति नान्यः पंथा विद्यतेऽयनाय' (श्वे. ३. ८)—परमेश्वराला जाणिलें म्हणजे अमर होतो, याखेरीज मोक्ष-प्राप्तीचा मार्ग नाहीं;—याप्रमाणें ज्ञानाची महती प्रतिपादन करणारीं अनेक वचनें आहेत. मात्र या ठिकाणीं 'ज्ञान' म्हणजे नुसतें शब्दिक ज्ञान असा अर्थ नसून, ज्ञान म्हणजे "मानसिक ज्ञान प्रथम होऊन इंद्रियांचा जय केल्यावर ब्रह्मीभूत होण्याची अवस्था किंवा ब्राह्मी स्थिति" एवढा सर्व अर्थ दर वेळीं विवक्षित आहे हें विसरतां कामा नये. ज्याप्रमाणें अग्नि केव्हांहि उत्पन्न केला तरी केला तरी तो दहन करण्याचा आपला धर्म सोडीत नाहीं तद्वत् ब्रह्मात्मैक्यज्ञान कोणत्याहि कालीं होवो, तें झाल्याबरोबर त्याचा कर्मक्षयरूप परिणाम घडून येण्यास कालावधीची अपेक्षा

प्रारब्धेंचि होय सुख । प्रारब्धेंचि पावे दुःख ॥ ३ ॥
प्रारब्धेंचि भरे पोट । तुका करीना बोभाट ॥ ४ ॥

रहात नाहीं. ज्ञान झालें कीं, तत्क्षणींच कर्मक्षय होत असतो. तथापि मरणापूर्वी एका कालीं ब्रह्मज्ञान होऊन अनारब्ध संचिताचा जरी क्षय झाला असला तरी प्रारब्ध नष्ट होत नाहीं. म्हणून हें ब्रह्मज्ञान जर शेवटपर्यंत एकसारखें कायम न राहील तर, मरण येईपर्यंत मध्यंतरीं प्रारब्धकर्मानुसार जीं बरीं वाईट कर्में घडतील तीं सर्व सकाम होऊन त्यांचें फल भोगण्यास पुनः जन्म घेणें चुकणार नाहीं. जो पुरा जीवन्मुक्त झाला त्याला ही भीति रहात नाहीं; पण ज्याच्या अंगीं ब्रह्मज्ञान पूर्णपणें बाणलें नाहीं अशा मनुष्याचें तें ज्ञान जर कदाचित् शेवटपर्यंत टिकलें नाहीं तर त्याला पुनः जन्म घेणें टळत नाहीं. म्हणून मरणकालीं पूर्ण ब्रह्मात्मैक्यज्ञानाचा अनुभव जरूर घडलेला असला पाहिजे, एरवीं मोक्षप्राप्ति शक्य नाहीं. मरणसमयीं हें ब्रह्मज्ञान आवश्यक असण्याचें कारण उघड आहे. कारण सबंध आयुष्यभर भोगलेलें प्रारब्धकर्म जरी सकाम घडलेलें असलें तरी त्याचीं फळें एकंदर संचितांतच जाऊन मिळतात. आतां प्रारब्धकार्यकर्माचीं फळें त्यांतच मिळणें शक्य नसल्यानें तीं अनारब्धकार्यकर्मांतच मिळालीं पाहिजेत; आणि आयुष्याच्या शेवटच्या क्षणीं झालेलें ब्रह्मज्ञान सर्व अनारब्धकार्यकर्माचा एकदम अजीबात नाश करतें व देहारंभक प्रारब्धकार्यकर्म देहाच्या अंतीं आपोआपच भोगून संपतें. म्हणून त्याला कोणतेंच कर्म भोगावयाचें राहात नाहीं. अशा तऱ्हेनें मनुष्य कर्मपाशांतून कायमचा मुक्त होतो व मोक्ष पावतो. उलट पक्षीं आयुष्याच्या शेवटच्या क्षणीं जरी ब्रह्मज्ञानाचा अनुभव नसेल तर त्या वेळीं झालेलें प्रारब्धकर्म सकाम होऊन त्याचीं फळें भोगण्यासाठीं पुनः जन्म घेणें प्राप्त होतें व अर्थातच मोक्ष दुरावतो. म्हणून मोक्षप्राप्तीकरितां मरणसमयीं ब्रह्मज्ञानाचा अनुभव जरूर घडलेला असला पाहिजे.

हें ब्रह्मज्ञान पांतजलयोग, अध्यात्मविचार इत्यादि मार्गांनीं किंवा सुलभरीत्या भक्तिमार्गानें प्राप्त होतें.

पण या ब्रह्मात्मैक्यज्ञानाच्या प्राप्तीसाठीं जो प्रयत्न करावा लागतो तो करणें ही गोष्ट मनुष्याचे ताब्यांतली आहे काय ? किंवा नामरूपात्मक प्रकृति खेंचील तिकडे त्याला गेलें पाहिजे ? हा प्रश्न शिल्लक राहातोच. 'प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं

६ अभंग.

जें जें लिहिलें संचितीं । तें तें न चुके कल्पांतीं ॥ १ ॥
होणार तें होत आहे । व्यर्थ चिंता करूनी काय ॥ २॥

करिष्यति । ' (गी. ३.३३)--निग्रह काय करणार ? प्राणिमात्र आपापल्या प्रकृतिच्या वळणावर जातात; 'मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति'—तुझा निश्चय फुकट आहे; तुला नको आहे तिकडे तुझी प्रकृति तुला खेंचील;—असें भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें असून (गी. १८.५९ व २.६०), कर्मविपाकप्रक्रियेचा निष्कर्षहि तसाच आहे. कारण मनुष्याच्या मनांतील सर्व प्रेरणा पूर्वकर्मामुळेंच उत्पन्न होतात असें मानिल्यावर, एका कर्मांतून दुसऱ्या कर्मांत याप्रमाणें त्यास सदैव भवचक्रांतच राहिलें पाहिजे असें अनुमान करावें लागतें. आणि हें जर खरें तर ज्ञान प्राप्त करून घेण्यास कोणीहि स्वतंत्र नाहीं अशी आपत्ति प्राप्त होते. अध्यात्मशास्त्राचें या प्रश्नास असें उत्तर आहे कीं, नामरूपात्मक सर्व सृष्टीला आधारभूत जें तत्त्व तेंच मनुष्याच्या जड देहांतहि आत्मरूपानें खेळत असल्यामुळें, मनुष्याच्या कृत्यांचा जो विचार करावयाचा तो देह व आत्मा या दोन्ही बाजूंनीं करावा लागतो. पैकीं आत्मरूपी ब्रह्म मूळांत एकलें एकच असल्यामुळें तें कधींच परतंत्र असूं शकत नाहीं. कारण एक दुसऱ्याच्या ताब्यांत जाण्यास एक आणि दुसरा हा भेद नेहमीं कायम राहिला पाहिजे. प्रकृत स्थलीं नामरूपात्मक कर्म हाच काय तो दुसरा पदार्थ आहे. पण हें कर्म अनित्य व मूळांत परब्रह्माचीच लीला असल्यामुळें परब्रह्माच्या एका भागावर जरी त्याचें पांघरूण असलें तरी परब्रह्माला तें कधींच गुलाम करूं शकत नाहीं हें निर्विवाद आहे; शिवाय जो आत्मा कर्मसृष्टींतील व्यापारांचें एकीकरण करून सृष्टिज्ञान उत्पन्न करितो तो कर्मसृष्टीहून भिन्न म्हणजे ब्रह्मसृष्टींतलाच असला पाहिजे हें उघड आहे. म्हणून परब्रह्म आणि मूळांत त्याचाच अंश जो शारीर आत्मा हे दोन्ही मूळचेच स्वतंत्र म्हणजे कर्मात्मक प्रकृतीच्या सत्तेबाहेरच्या मुलखांतले आहेत असें निष्पन्न होतें. पैकीं परमात्मा अनंत व सर्वव्यापी असून नेहमींच शुद्ध मुक्तावस्थेंत असतो, यापलीकडे त्याचें ज्ञान मनुष्याच्या बुद्धीस होऊं शकत नाहीं. पण या परमात्म्याचा अंश जो जीवात्मा तो मूळांत शुद्ध, मुक्तस्वभाव, निर्गुण व अकर्ता असला तरी देह व बुद्ध्यादि इन्द्रियें यांच्या कोंडींत सांपडला असल्यामुळें तो मनुष्याच्या मनांत जें स्फुरण उत्पन्न

लाभ अथवा हानी । येते घरासी चालोनी ॥ ३ ॥
तुका म्हणे स्वस्त मनें । करा देवाचें चिंतन ॥ ४ ॥

करितो त्याचें प्रत्यक्षानुभवरूपी ज्ञान आपणांस होऊं शकतें. मोकळ्या वाफेंत कांहीं जोर नसतांहि ती एखाद्या भांड्यांत कोंडली म्हणजे मग त्याचा वाफेचा भांड्यावर ज्याप्रमाणें दाब बसूं लागतो, त्या न्यायानें अनादिपूर्वकर्मार्जित जड देह व इंद्रियें यांनीं परमात्म्याचा अंशभूत जीव (गी. १५. ७.), कोंडला गेला म्हणजे या कोंडींतून त्याची सुटका करून देणारीं (किंवा मोक्षानुकूल) कर्में करण्यास देहेन्द्रियांची प्रवृत्ति होऊं लागत्ये; व यालाच व्यावहारिक दृष्ट्या 'आत्म्याची स्वतंत्र प्रवृत्ति' असें म्हणतात. 'व्यावहारिकदृष्ट्या' म्हणण्याचें कारण असें कीं, शुद्ध मुक्तावस्थेंत किंवा 'तात्विक दृष्ट्या' आत्मा हा निरिच्छ व अकर्ता असून सर्व कर्तृत्व प्रकृतीचें आहे (गी. १३.२९). पण ही प्रकृति आपण होऊनच मोक्षनुकूल कर्में करित्ये असें वेदान्ती म्हणत नाहींत. कारण तसें मानिलें तर जड प्रकृति आंधळेपणानें अज्ञान्यांसहि मुक्त करूं शकेल असें प्राप्त होतें. आणि मूळांत जो आत्मा अकर्ता तो स्वतंत्ररीत्या म्हणजे निमित्तावांचून आपल्या नैसर्गिक गुणांनींच प्रवर्तक बनतो असेंहि म्हणतां येत नाहीं. म्हणून आत्मा मूळांत जरी अकर्ता आहे तरी कोंडीच्या निमित्तामुळें तो तितक्यापुरता दर्शनीं प्रेरक बनतो, आणि कोणत्याहि निमित्तानें त्याचे ठायीं एकदां हें आगंतुक प्रेरकत्व आलें म्हणजे तें कर्माच्या कायद्याहून भिन्न म्हणजे स्वतंत्र असतें, अशा शब्दांनीं आत्मस्वातंत्र्याचा हा सिद्धान्त सांगावा लागतो. स्वतंत्र ह्मणजे निर्निमित्तक नव्हे, आणि आत्मा आपल्या मूळ शुद्धावस्थेंत कर्ताहि असत नाहीं. पण दर वेळीं ही लांबलचक कर्मकथा सांगत न बसतां यासच थोडक्यांत आत्म्याची स्वतंत्र प्रवृत्ति किंवा प्रेरणा असें म्हणण्याची वहिवाट आहे.

सारांश (१) एकंदर संचितापैकीं ज्या कर्मांचीं फळें भोगण्यास सुरुवात होऊन हल्लींचा देह किंवा जन्म मिळाला तीं देहारंभक प्रारब्धकार्यकर्में निसर्गतः देहपतन होईपर्यंत भोगूनच संपविलीं पाहिजेत. (२) अनारब्धकार्यकर्मांचा मात्र ब्रह्मज्ञानानें एकदम अजीबात नाश होतो. व देहेन्द्रियांच्या कोंडींत सांपडलेल्या जीवात्म्याचे

सुखदुःखविवेक. (आ)

सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम् । *

—गीता ६.२१.

प्राणिमात्रास सुख हें हवें असतें व दुःख नको असतें—दुःखादुद्विजते सर्वः सर्वस्य सुखमीप्सितम् । (शांतिपर्व १३९. ६१), अशी स्थिति असल्यामुळें, या जगांतील प्रत्येक मनुष्य सुख कसें मिळेल किंवा प्राप्त झालेल्या सुखाची वृद्धि कशी होईल, आणि दुःख कसें टळेल अथवा कमी होईल, यासाठीं सदैव धडपड करीत असतो. आणि असें करण्यांत त्याचा बिलकुल दोष नाहीं; कारण प्रत्येक मनुष्यानें आपल्या दुःखाचें अत्यंत निवारण करून अत्यंत सुखप्राप्ति करून घेणें हेंच त्याला श्रेयस्कर आहे. पण आपलें खरें सुख कशांत आहे हें समजत नसल्यामुळें, सुख मिळेल या आशेनें मनुष्य भलत्याच गोष्टींच्या नादीं लागून हें अमोलिक आयुष्य फुकट घालवीत असतो. त्यामुळें साहजिकच मृगजळाकडे आतुर आशेनें धांव घेणाऱ्या तृषार्त हरिणांस जसें कधींच पाणी मिळत नाहीं त्याप्रमाणें

ठिकाणीं मोक्षानुकूल कर्मांचें प्रेरकत्व उत्पन्न होत असल्यामुळें कर्मपाशांतून कायमचें मुक्त होण्यास रामबाण औषध असें ब्रह्मात्मैक्यज्ञान प्राप्त करून घेणें ही मनुष्याच्या ताब्यांतील गोष्ट आहे. आतां हें ब्रह्मज्ञान उक्त अंतःकरणप्रेरणेनुसार नेटानें व निश्चयानें प्रयत्न करून अध्यात्मविचार, भक्तिमार्ग इत्यादिपैकीं कोणत्याहि इष्ट व सोईच्या मार्गानें ज्याचें त्यानें स्वावलंबनपूर्वक दीर्घोद्योगानें प्राप्त करून घेतलें पाहिजे हें उघड आहे. मात्र पूर्वकर्मानुसार प्राप्त झालेल्या देहाच्या अशुद्ध प्रकृतिस्वभावामुळें हें ब्रह्मज्ञान मनुष्यास एकाच जन्मांत प्राप्त होईल असें नाहीं. पण कांहीं झालें तरी आज नाहीं तर उद्यां, या जन्मीं नाहीं तर पुढच्या जन्मीं, ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेणें स्वतःच्या प्रयत्नाधीन असल्यामुळें, व हा प्रयत्न करण्यास जीवात्मा मूळांत स्वतंत्र असल्यामुळें, कर्मांच्या फेऱ्यांतून आपली कायमची सुटणूक करून घेणें ही मनुष्याच्या ताब्यांतील गोष्ट आहे असें सिद्ध होतें. —गीतारहस्य पृ.२६९–२८६ वरून.

* जें केवळ बुद्धीनेंच ग्राह्य असून इंद्रियातीत असतें तेंच आत्यंतिक सुख होय.

याला अखेरपर्यंत खऱ्या सुखाची प्राप्ति कधींच होत नाहीं. व अशा तऱ्हेनें सुखासाठीं धडपडत असतां मृत्यूनें जरी त्याजवर अकस्मात् घाला घातला, तरी त्यानें दुसरा सावध न होतां पुनः तोच कित्ता गिरवीत असतो ! म्हणून सुखदुःखांचें वास्तविक स्वरूप काय व त्यांचा परस्परांशीं संबंध कसा असतो, तसेंच खरें सुख कोणतें व तें कसें प्राप्त करून घ्यावयाचें याचा विचार करणें जरूर आहे.

*
* *

१. सुख पाहिजे असेल तर अगोदर दुःख भोगिलें पाहिजे. दुःख ही सुखाची किंमत आहे व ती नेहमीं अगोदर द्यावी लागत्ये. सुखाची उधार विक्री कधींहि होत नाहीं. ज्या मानानें सुख कमीजास्त पाहिजे असेल त्या मानानें दुःखरूप मूल्य दिलें पाहिजे. विश्वविद्यालयाच्या परीक्षेंत नुसतें उत्तीर्णच व्हावयाचें असेल तर त्या मानानें अभ्यास बस्स आहे. पण पाहिला वर्ग मिळविणें असेल तर बराच अधिक अभ्यास करणें अवश्य आहे व त्यांतहि पहिला नंबर पटकाविण्याची इच्छा असल्यास त्याहूनहि अधिक मेहनत घेणें जरूर आहे. पण ज्याप्रमाणें अगोदर परीक्षेंत उत्तीर्ण झाल्याबद्दल दाखला द्या, मागाहून नियोजित अभ्यास करीन असें म्हणून चालत नाहीं, त्याचप्रमाणें आधीं सुख भोगूं दे मागाहून त्याबद्दल दुःख भोगीन असें म्हटल्यास चालणार नाहीं. **अगोदर** दुःख भोगल्याविना कोणास कधींहि सुख मिळावयाचें नाहीं. महिनाअखेर पगार पाहिजे असेल तर **अगोदर** तीस दिवस नोकरी केली पाहिजे; धान्याची सुबत्ता व्हावयास पाहिजे असेल तर **अगोदर** शेतांत राबलें पाहिजे; व्याकरणशास्त्रांत पारंगत व्हावेसें वाटत असेल तर **अगोदर** बारा वर्षें अध्ययन केलें पाहिजे; ब्रह्मपदाची अपेक्षा असेल तर **अगोदर** लोखंडाचे चणे पचविले पाहिजेत; आणि देवपणा प्राप्त करून घेण्याची महत्वाकांक्षा असेल तर **अगोदर** टांकीचे घाव सोसले पाहिजेत. सारांश सुख पाहिजे असेल तर **अगोदर** दुःख भोगलें पाहिजे. म्हणूनच

श्रीसमर्थांनीं

आधीं कष्टाचें दुःख सोसिती । ते पुढें सुखाचें फळ भोगिती ॥
जिहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ॥

असें म्हटलें आहे (दा. बो. १८. ७. ५ व १८. ७. १६); व—

सुखं सुखेनेह न जातु लभ्यं दुःखेन साध्वी लभते सुखानि ।

'सुखानें सुख कधींहि मिळत नाहीं; सुखें प्राप्त होण्यास अगोदर दुःख किंवा कष्ट सोसावे लागतात' (म. भा. वन. २३३. ४), असा द्रौपदीनें सत्यभामेस उपदेश केला आहे. † याच आशयानें एक आधुनिक महाराष्ट्र कवि § म्हणतो—

दुःखावांचुनि सौख्यलाभ घडणें दुष्प्राप्य आहे जनां,
आहे दुःखचि सौख्यमूल; दिसते ही ईश्वरी योजना ।
बोलें बालक बोबड्या रिझवितें मातेस नानापरी,
वाहावा नव मास गर्भ उदरीं लागे तयाचा परी ॥

***

२. या जगांत कोणासहि नेहमीं सुख मिळणें शक्य नाहीं—सुखं दुःखमिहोभयम् । असा महाभारतांत सिद्धांत दिला आहे(शांति.१९०.१४); आणि त्याला अनुसरूनच श्रीसमर्थांनीं 'जनीं सर्वसूखी असा कोण आहे । विचारें मना तूंचि शोधून पाहें' । असा आपला अनुभव सांगितला आहे.

शिवाय कोणासहि नेहमींच जर अखंड किंवा दुःख भोगल्याविना सुख मिळेल तर, 'अतिपरिचयादवज्ञा' किंवा 'सुलभं वस्तु सर्वस्य न यात्यादरणीयताम् ।' —'सुलभपणें वस्तु प्राप्त झाल्यास तिचें कोणासहि महत्व वाटत नाहीं,' या न्यायानें त्याची किंमत राहणार नाहीं. उन्हानें

† "ज्या जगांत आपण आलों आहों तें इतकें चमत्कारिक आहे कीं त्यांतल्या नुसत्या चांगल्या गोष्टींचीच अपेक्षा करायला निरंतर नुसत्या दुःखांत दिवस काढावे लागतील." —एकच प्याला पृ. २.

§ हा कवि कोण ?

तापलेल्या मनुष्यालाच वृक्षाच्या सावलींतील विश्रांतीची गोडी कळते, तृषाक्रांतालाच पाण्याची किंमत समजत्ये आणि अंधकार पडल्यानंतर दिव्याची उपयुक्तता लक्षांत येते. त्याचप्रमाणें दुःख भोगल्यानंतरच्या सुखाची गोडी कांहीं विशेष असत्ये. कारण नित्यसुखोपभोगानें सुखाचा अनुभव घेणाऱ्या इंद्रियशक्तीची तीव्रताहि मंदावत्ये—

प्रायेण श्रीमतां लोके भोक्तुं शक्तिर्न विद्यते।
काष्ठान्यपि हि जीर्यन्ते दरिद्राणां च सर्वशः॥

'श्रीमंतांना सुग्रास अन्न सेवन करण्याचीहि प्रायः शक्ति नसत्ये; आणि गरिबाला लांकडें देखील सबंध पचनीं पडतात' † (म. भा. शांति २८. २९), हा अनुभव प्रसिद्ध आहे.

* * *

३ पुष्कळ लोकांना असें वाटतें कीं, ज्यांच्यापाशीं मुबलक पैसा असतो ते सर्व प्रकारें सुखी असतात. अर्थात् श्रीमंतींत लोळणारे राजेर-

१ यदेवोपनतं दुःखात्सुखं तद्रसवत्तरम्। निर्वाणाय तरुच्छाया तप्तस्य हि विशेषतः॥१॥

'दुःखानंतर प्राप्त झालेल्या सुखाची माधुरी कांहीं विशेष आहे; उन्हानें तापलेल्या मनुष्याला झाडाची सावली विशेष सुखप्रद होत्ये.'—कालिदास (विक्रमोर्वशीय ३. २१).

२ सुखं हि दुःखान्यनुभूय शोभते घनांधकारेष्विव दीपदर्शनम्।

—शूद्रक (मृच्छकटिक १.१०).

भोगून दुःखें सुख शोभतें जनीं। घनांधकारांत दिवा जसा वनीं॥

—परशुराम बल्लाळ गोडबोले.

† *Cf.*

Weariness
Can snore upon the flint, when resty sloth
Finds the down pillow hard.

'थकलेभागलेल्यांना दगडावर सुद्धां गाढ झोंप येत्ये; पण एकसारखी विश्रांति घेत बसलेल्या आळशांना परांची नरम गादीसुद्धां अंगास खुपत्ये.'

—शेक्स्पिअर् (सिम्बेलाइन् ३. ६).

जवाडे हे नेहमीं सुखांतच लोळत असले पाहिजेत; पण हां निव्वळ भ्रम आहे. याच्या उलट मात्र बहुधा खरें असतें. ज्यांच्यापाशीं बिलकुल संपत्ति नाहीं असे लोकच प्रायः सुखी असतात. "इराणच्या बादशहाची अशी गोष्ट सांगतात कीं, एकदां त्याला मुळींच करमेनासें झाल्यामुळें त्यानें आपल्या पदरच्या ज्योतिषांस सुखप्राप्तीचा उपाय विचारला. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, एकादा पूर्ण सुखी मनुष्य शोधून त्याचा अंगरखा अंगांत घालावा, म्हणजे सुख मिळेल. त्यावरून पूर्ण सुखी मनुष्याचा तपास सुरू झाला. प्रथम सर्व राजवाडा धुंडाळला. नंतर देशांतील सर्व संपन्न लोकांमध्यें चौकशी केली, पण कांहीं केल्यानें तशा प्रकारचा मनुष्यच मिळेना. शेवटीं शोधतां शोधतां एक मजूर भेटला. तो पूर्ण सुखी अशा संज्ञेस पात्र होता. पण इतका शोध करून शेवटीं जी वस्तु हवी होती ती मिळाली नाहींच! कारण तो मजूर बिचारा बोलून चालून दिगंबर पडला, मग त्याचा अंगरखा कोठून मिळणार?" (जी. क. पृ. ३४२). राजे लोकांचें वैभव व भपका हीं बाहेरून सुंदर दिसणाऱ्या पण आंतून अंगास खुपणाऱ्या आंगरख्याप्रमाणें असतात. बाहेरून स्पृहणीय दिसणाऱ्या त्यांच्या मुकुटांची आंतील बाजू नेहमीं कंटकावृत असते. झेनॉफन् म्हणतो "माझ्या स्वतःच्या अनुभवावरून मला पक्कें कळून चुकलें आहे कीं, राजे लोकांनीं बाहेरून कितीहि डौल केला तरी त्यांच्या नशिबीं मोठा वांटा दुःखाचा व लहान वांटा सुखाचा हें ठरलेलें आहे" (जी. क. पृ. ३४३). कारण ज्या मानानें संपत्ति व वैभव अधिक त्या मानानें काळजी व संकटें अधिक असतात. "स्वतःच्या संपत्तीमुळेंच ज्यांना विश्रांति, स्वास्थ्य आणि शांति ठाऊक नाहीं, असे किती तरी लोक आहेत!" (जी. क. पृ. ३३९). यावरून हें लक्ष्यांत येईल कीं, "वैभव आणि सुख हीं सदैव एकत्र असतात हा समज अगदीं चुकीचा आहे. उलट असें आढळून येतें कीं, लक्ष्मी आणि सर-

स्वती जशा क्वचित् एकत्र सांपडतात त्याचप्रमाणें वैभव आणि सुख ह्यांचीहि गोष्ट आहे. एकाद्या मनुष्यास संपत्ति, अधिकार, पदवी, दीर्घ आयुष्य इत्यादि गोष्टी अनुकूल असतील; आणि असें असतांहि त्याला खऱ्या सुखाची ओळख दिसेल नसण्याचा संभव आहे." (जी. क. पृ. ३३५). कारण सुख हें कोणत्याहि बाह्य गोष्टीनें मिळणारें नसून तें नेहमीं मनुष्याच्या मनावरच अवलंबून असतें.†

***

४ सर्व प्रकारचा सुखदुःखानुभव अखेर मनावरच अवलंबून असल्यामुळें, मनोनिग्रहानें सुखदुःखानुभवाचाहि निग्रह होणें अशक्य नाहीं असें ओघानेंच सिद्ध होतें. याच अभिप्रायानें—

सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् ।
एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ॥

'परक्यांच्या (बाह्य वस्तूंच्या) जें कांहीं ताब्यांत असतें तें सर्व दुःख, आणि स्वतःच्या (मनाच्या) ताब्यांत जें असतें तें सुख हें सुखदुःखांचें संक्षिप्त लक्षण होय' असें मनूनें म्हटलें आहे (म. स्मृ. ४. १६०).

***

५ विषयोपभोगाची केव्हांहि पूर्ति होणें अशक्य असल्यामुळें (तरंग १०), प्रत्येक मनुष्यास मी दुःखी आहें असेंच नेहमीं वाटत असतें. मनुष्यमात्राची ही स्थिति लक्षांत घेऊनच—

सुखाद् बहुतरं दुःखं जीविते नाऽत्र संशय : ।

'या जीवितामध्यें म्हणजे संसारांत सुखापेक्षां दुःखच अधिक आहे,' असें महाभारतांत म्हटलें आहे (शांति २०५.६; ३३०.१६), व तुकोबांनींहि त्याच अभिप्रायानें

सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥

---

† *Cf.* Vain, very vain my weary search to find
That bliss which only centres in the mind.
—Goldsmith (Traveller 423–24).

असें या संसाराचें वर्णन केलें आहे. आणि विचार केला तर सुखापेक्षां दुखाचीच वास्तविक जरूरी आहे असें समजून येईल. ज्या मनुष्यानें कधींहि दुःख भोगलें नाहीं तो मुळमुळीत स्वभावाचा बनेल. त्याच्यामध्यें ताठपणा येणार नाहीं. ज्या खलाशानें शांत हवेच्या वेळीं, कोणताहि धोका नाहीं अशा ठिकाणींच नौका हांकारली व ज्यानें तुफान, अकस्मात् बुडास भोंक पडणें, एकाएकीं इंजिन् बिघडणें वगैरे कसलाहि प्रसंग अनुभविला नाहीं त्याच्या अंगीं धैर्य, प्रसंगावधान इत्यादि गुण येणें किंवा त्यांचा विकास होणें शक्य नाहीं. लहानसा वारा सुटल्याबरोबर तो गर्भगळित होऊन जाईल. महानुभाव बुकर टी. वॉशिंग्टन् हा लहानपणापासून दुःखाच्या भट्टींतून तावूनसुलाखून बाहेर न पडता तर पुढील महत्कृत्यें त्याच्या हातून खास झालीं नसतीं. दुःखें हीं मनुष्याचीं हितकर्तीं आहेत. प्रत्येक दुःखाचा प्रसंग हा मनुष्याला एकेक नवीन धडा शिकवीत असतो. म्हणूनच—

जीवन्तु मे शत्रुगणाः सदैव येषां प्रसादात्सुविचक्षणोऽहम् ।
ये ये यथा मां प्रतिबाधयन्ति ते ते तथा मां प्रतिबोधयान्ति ॥ १ ॥

'माझे शत्रु जसजसा मला बाध करितात तसतसा ते मला वस्तुतः बोधच करितात; त्यांच्या या कृपेमुळेंच मी शहाणा झालों आहें; त्या सर्वांना उदंड आयुष्य असो,' असें एका कवीनें मार्मिकपणें म्हटलें आहे. मनुष्याच्या अंगच्या गुणांचा व शक्तींचा विकास होण्यास दुःखें व संकटें यांचा फार उपयोग होत असतो. सुभाषितकार म्हणतात—

काकुत्स्थस्य दशाननो न कृतवान्दारापहारं यदि
क्काम्भोधिः क्व च सेतुबन्धघटना क्वोत्तीर्य लङ्काजयः ।
पार्थस्यापि पराभवं यदि रिपुर्नाधात्क तादृक्तपो
नीयन्ते रिपुभिः समुन्नतिपदं प्रायः परं मानिनः ॥ १ ॥

रामचंद्राच्या अंगीं पितृभक्ति, सत्यप्रतिज्ञता, प्रजावात्सल्य, पराक्रम

इत्यादि अनेक लोकोत्तर गुण होते खरे; पण कैकेयीनें त्याला वनवासास घालविलें व वनांत असतां रावणानें त्याची पत्नी सीता इला पळवून नेलें या दोन गोष्टींमुळेंच मुख्यतः त्याच्या गुणांस व कर्तृत्वशक्तीस विशेष तेज चढलें, व अफाट महासागरावर सेतु बांधणें व पुढील भयंकर रणसंग्रामांत रावणकुलाचा निःपात करणें या गोष्टी त्याच्या हातून होऊन त्याची कीर्ति अजरामर झाली. तसेंच कौरवांनीं कपटद्यूतानें पांडवांचें सर्वस्व हरण केलें, त्यांच्या साध्वी स्त्रीची भर सभेंत विटंबना केली व त्यांना वनवासास घालविलें यामुळेंच अर्जुनानें एवढें उग्र तप केलें व सर्व दिव्य अस्त्रें व अनेक कला संपादन करून आपलें सामर्थ्य शेंकडों पटीनें वाढविलें (वनपर्व अ. ३७–४३). सारांश शत्रूंनीं दिलेलीं दुःखें हीं तेजस्वी पुरुषांच्या उन्नतीसच कारणीभूत होत असतात. मनुष्यावर दुःखाचा प्रसंग गुदरला म्हणजे त्यांतून पार पडण्याकरितां कोणते उपाय योजिले पाहिजेत याचा तो आपलें मन एकाग्र करून विचार करूं लागतो व अशा प्रकारच्या विचारापासून त्याच्या अंतःकरणांत प्रकाश पडून त्याचें सत्याचें ज्ञान वाढतें. मनुष्यस्वभाव असा आहे कीं, स्वतःवर अगदीं बेतल्याशिवाय तो मन लावून आस्थेनें विचार करीत नाहीं; मग दुसऱ्याच्या दुःखानें जागृत होऊन विचार करण्याची गोष्टच नको. व अशा प्रकारचा विचार नाहीं म्हणजे कांहीं नाहीं. म्हणून आपणास मनःपूर्वक विचार करावयास लावण्यास दुःखाच्या अंकुशाची वारंवार जरूरी असत्ये. हे प्रसंग मनुष्यास दुःखद वाटतात पण कडू औषधाप्रमाणें ते हितपरिणामी असतात. दुःखाच्या वेळीं मनुष्याच्या मनाच्या सर्व वृत्ती परमेश्वराकडे सहज लागतात तशा त्या इतर वेळीं दृढप्रयत्नानेंहि लागत नाहींत याचा सर्वांस अनुभव आहे. दुःखाच्या वेळीं सर्व वृत्ती परमेश्वराकडे लागून अनिर्वाच्य असा आनंद अनुभवास आल्यामुळें " देवा मला नेहमीं दुःखांतच ठेव; कारण तेणेंकरून

माझें मन तुजकडे ' एका भावें ' लागतें " असें एकानें देवापाशीं मागणें मागितलें आहे. यावरून दुःखाचे प्रसंग बोधप्रद कसे होतात हें नीट लक्षांत येईल.† ईश्वरनिष्ठा, आत्मविश्वास, धैर्य, उद्योग इत्यादि गुण दुःखप्रसंगामुळेंच विशेषतः आपल्या अंगीं बाणतात. म्हणून आपली दानत बनण्याकरितां सुखापेक्षां दुःखप्रसंगाचीच विशेष जरूरी आहे, असें दिसून येईल.

***

६ निर्भेळ सुख किंवा निर्मिश्र दुःख असें या जगांत कोठेंहि नाहीं. प्रत्येक ठिकाणीं आणि प्रत्येक अवस्थेमध्यें सुखदुःखांचें मिश्रण असतें. कोठलेंहि सुख आपणास पाहिजे असेल तर तत्संलग्न दुःख भोगण्यास आपण तयार असलें पाहिजे, व तें दुःख भोगण्यास आपली तयारी नसेल तर त्या सुखाचीहि आशा आपण सोडली पाहिजे.†† गुलाबाचें फुल पाहिजे असेल तर गुलाबाचे कांटे सोसले पाहिजत; व कांटे अंगास लागावयास नको असतील तर फुलाची इच्छा करणें व्यर्थ होय. तसेंच स्त्रीसुखाची इच्छा असेल तर तदनुषंगानें येणारीं दुःखें व जबाबदाऱ्या पतकरल्या पाहिजेत. तसें न करतां वैवाहिक सुखाची अपेक्षा करणें निर्बुद्धपणाचें होय.

***

† " लोखंड चांगलें तापवून ठोकून पुष्कळ वेळ तें भट्टींत ठेविलें, तर तें उत्तम पोलाद होतें. नंतर त्या पोलादाची पाहिजे तशी लवणारी तरवार बनवितां येते. त्याप्रमाणें दुःखाच्या भट्टींत मनुष्य चांगला तप्त झाला पाहिजे आणि जगाच्या छळाचे घाव त्यानें सोशिले पाहिजेत, तरच तो अंतःकरणानें पवित्र आणि भगवत्पदीं लीन होईल. " —रा. बो. व. ३००.

†† " संसारांत सुखदुःखांचें मिश्रण अभिन्नस्वरूपाचें आहे. काळोखाची एक रात्र काढून टाकली तर तिच्याबरोबर प्रकाशपूर्ण दिवसाकडेही डोळेझांक करावयाला पाहिजे. दुःखाचा एक अंश टाळण्यासाठीं त्यांच्याशीं संलग्न असलेल्या सुखांशालाहि दूर करावें लागतें, हा ईश्वराच्या घरचा निष्ठुर न्याय आहे." —एकच प्याला पृ. १०९.

७ आंग्ल कवि कीट्स् हा 'सुख संपलें कीं दुःख आलें' (तरंग १२), या सिद्धान्ताच्या पुढें जाऊन असें म्हणतो कीं, 'सुख आलें कीं लागलीच परत फिरण्याचा रामराम करण्यासाठीं त्याचा हात मस्तकाकडे वळत असतो' !* याच आशयानें एक महाराष्ट्र कवि म्हणतो—

लवकर आतां होणार असे शाळेला सुट्टी ।
म्हणुनि हरिख बालांचा मुळिं नच सामावे पोटीं ॥
बंद होउनी शाळा सुटिला प्रारंभाचि झाला ।
तोंच मनामधिं 'संपणार ती' विचार हा ठेला ॥
बहुत दिसांनीं प्रिय पति येतां अति मोदे बाला ।
परत पतीच्या जाण्याचा झणिं विचार मनिं आला ॥
इह संसारीं सुखारंभ तो झाला नच झाला ।
तोंच तयावरि अवचित येई दुःखाचा घाला † ॥

'इतकेंच काय ? प्रत्यक्ष सुखाच्या मंदिरामध्येंच प्रच्छन्न दुःख सार्वभौम राजासिंहासनावर विराजमान झालेलें असतें; सुख हें दुःखमय असतें.' कीट्सचा समकालीन इंग्रेज कवि शेले यानें तोच सिद्धान्त काव्यपूर्ण

---

* And Joy, whose hand is ever at his lips
Bidding adiew; and aching Pleasure nigh,
Turning to poison while the bee-mouth sips:
Ay, in the very temple of Delight
Veil'd Melancholy has her sovran shrine.
—Ode on Melancholy.

† *Cf.* Our birth is nothing but our death begun.
—Edward Young.

मनुज जगामधिं येतां म्हणती जन्म तया झाला ।
विचार करितां, प्रारंभचि तो त्याच्या मरणाला ॥

स्वच्छ भाषेंत असा सांगितला आहे कीं, 'आमचीं अत्यंत मधुर गाणीं म्हटलीं म्हणजे अत्यंत दुःखद विचारांचींच होत.' *

***

८ आपण सर्वस्वी दुःखी व दुसरा मनुष्य 'सर्वसुखी' असें आपणास वाटतें. याचें कारण एवढेंच कीं, त्याच्या बाह्य स्थितीवरून तो सुखी असला पाहिजे असा आपला ग्रह होतो; परंतु 'सोनें न तें सर्वहि जें चकाके' हें अर्थपूर्ण वचन आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. बाह्य देखाव्यानें हुरळून न जातां जर आपण आंत दृष्टि फेंकली तर आपला समज चुकीचा आहे हें तेव्हांच कळून येईल, व त्या मनुष्याची स्थिति किती दुःखमय व कष्टप्रद आहे याची नीट कल्पना होईल व असें झालें म्हणजे आपली स्थिति त्या मानानें पुष्कळ बरी असें वाटूं लागतें. पाश्चात्य पंडित डॉ. जॉन्सन् याच्या रासेलसनामक प्रसिद्ध कादंबरीचें हेंच सार आहे.

***

९ मनुष्य आपणास सुखें किती आहेत याचा विचारच करीत नाहीं.† आपणास ** हें सुख नाहीं तें सुख नाहीं हाच विचार रात्रंदिवस त्याच्या मनांत घोळत असतो. अमक्याच्या इतकी सुंदर स्त्री आपणास नाहीं, तमक्याच्याइतके जिव्हाळ्याचे स्नेही आपणास नाहींत; रामरावांइतकी आपणास विद्या नाहीं, श्यामरावांइतकी आपणास संपत्ति नाहीं; काशीनाथपंतांइतका आपला चेहरा रुबाबदार नाहीं, द्वारकानाथपंतांइतकें आपलें

---

* Our sweetest songs are those that tell of saddest thoughts. —To a Skylark.

† *Cf.* Those who have the most of happiness, think the least about it. —Thackeray.

** When in disgrace...या शेक्स्पिअरकृत सॉनेट्वरून.

शरीर बळकट नाहीं; प्रभाकरांइतका आपला कंठ सुस्वर नाहीं, विभाकरांइतका आपला हात चित्रकलाकुशल नाहीं; मोरोपंतांइतकें आपणास मातृसुख नाहीं, केरोपंतांइतकें आपणास पितृसुख नाहीं—अशा दुःखकारक विचारांपुढें आपणास देवानें एकंदर किती सुखें दिलीं आहेत हा विचार मनुष्याच्या मनास शिवत देखील नाहींत. पण आपणास सर्वथैव दुर्भागी करणाऱ्या अशा प्रकारच्या विचारांत मनुष्य निमग्न असतां जर कदाचित् स्वतःस लाभलेल्या सुखांकडे त्याचें लक्ष गेलें तर देवानें आपणास इतकीं सुखें दिलीं असतां आपण मूर्खपणानें त्याला दोष दिल्याबद्दल मनास पस्तावा होऊन ईश्वराविषयींच्या कृतज्ञतेनें अंतःकरण भरून येतें व कोणाशींहि आपल्या स्थितीची अदलाबदल करण्यास मनुष्य तयार होत नाहीं.

***

१० मनुज नित्य असे सुखी 'व्हावयाचा'।
नाहिं कधिंही तो परी सुखी साचा ॥ *

मनुष्य कधींहि सुखी नसतो; तो सुखी व्हावयाचा असतो. सुख हें नेहमीं पुढें असतें. त्याला पकडण्याकरितां मनुष्य सारखा धांवत असतो व तें तितक्याच वेगानें पुढें पळत असतें. पलीकडील डोंगरावर गेलें म्हणजे आकाशाला हात पोंचेल असें लहान मुलांस वाटतें. परंतु तथें गेलें म्हणजे तेथून कांहीं हात पोंचणें शक्य नाहीं असें आढळून येतें व त्याच्यापलीकडील डोंगरावरून आकाशाला हात पोंचेल असें वाटूं लागतें; पण तेथें गेल्यानंतर पूर्वीप्रमाणेंच अनुभव येतो. याप्रमाणें कितीहि डोंगर पालथे घातले तरी आकाश 'पुढील' डोंगरासच टेंकलेलें राहणार ! तीच गोष्ट सुखाची. जी गरज आज तीव्रतेनें भासत्ये ती भागली म्हणजे आपण पूर्णपणें सुखी होऊं असें मनुष्यास वाटतें; परंतु ती भागली कीं लागलीच

* Man never *is* but always *to be* blest.
—Pope (Essay on Man, Espistle 1, 96).

दुसरी दत्त म्हणून पुढें उभी ! व ही नवीन गरज भागल्यास मात्र आपण खास सुखी होऊं असें नंतर वाटावयास लागतें; परंतु ती भागल्याबरोबर तत्क्षणींच—ती भागल्याबद्दल आनंद मानण्यास मनुष्याच्या मनास क्षणाचाहि अवकाश न देतां—तितक्याच किंबहुना अधिक तीव्रतेनें भासणारी तिसरी गरज मनुष्याचें मन पूर्णपणें व्यापून बसत्ये ! !

एको वष्टि शतं, शती दशशतं, लक्षं सहस्राधिशो,
लक्षेशः क्षितिपालतां, क्षितिपतिश्चक्रेशतां वांछति,
चक्रेशः पुनरिन्द्रतां, सुरपतिर्ब्राह्मं पदं वांछति,
ब्रह्मा शैवपदं, शिवो हरिपदं, आशावधिं को गतः ॥ १ ॥

या श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें मनुष्याच्या इच्छेची धांव नेहमींच पुढें असल्यामुळें प्राप्त झालेल्या सुखाबद्दल आनंद मानण्यास देखील त्यास अवसर मिळत नाहीं. एक इच्छा सफल झाल्याबरोबर तत्क्षणींच पुढची केव्हां सफल होणार अशी उत्कंठा लागून राहत्ये. ती फलद्रूप झाली कीं त्याच्या पुढची. व मारुतीच्या शेंपटाप्रमाणें आशेचा कधींहि शेवट होत नसल्यामुळें, मनुष्याच्या कपाळाचें दुःख कधींहि सुटत नाहीं !

म्हणून सतत वाढत जाणाऱ्या या सुखतृष्णेस योग्य लगाम घालून, आपण शक्य तो उद्योग केल्यानंतर जी स्थिति प्राप्त होईल तींत संतुष्ट राहण्याची संवय मनास लावली पाहिजे. अशा तऱ्हेनें संतोषाचें ठाणें अंतःकरणांत बसलें कीं तेथें सुखहि आलेंच म्हणून समजावें.

***

११ सुख हा प्रवासी नित्य प्रवास करणारा असून तो एका जागीं कधींच स्थिर रहात नाहीं. आज मुक्काम या गांवीं तर उद्यां पुढील गांवीं, आणि परवां त्याच्या पुढील गांवीं ! याप्रमाणें तो सारखा फिरत असतो. बाळपणीं मातेच्या पदराखालीं तिच्या हृदयाशीं बिलगून राहण्यांत मनुष्यास जें अवर्णनीय सुख वाटतें त्यापुढें त्रिभुवनांतील सर्व सुखें त्याला

तुच्छ वाटतात. पण बाल्यावस्था संपून तारुण्यावस्था प्राप्त झाली कीं सुखाचा मोर्चा मातेकडून तरूणीकडे वळलाच म्हणून समजाव ! † बालस्तावन्मात्रासक्तस्तरुणस्तावत्तरुणीरक्तः ।

***

१२ कोणालाहि सदा सर्वकाळ सुख मिळणें शक्य नाहीं. ज्याप्रमाणें दिवसामागून रात्र व रात्रीनंतर दिवस हा नियम अबाधित आहे, त्याप्रमाणें सुखानंतर दुःख व दुःखानंतर सुख हा क्रम ठरलेला आहे.—

सुखस्यानन्तरं दुःखं दुखस्यानन्तरं सुखम् ।
चक्रवत्परिवर्तन्ते दुःखानि च सुखानि च ॥

' सुखानंतर दुःख व दुःखानंतर सुख येत असतें; सुखदुःखें चक्राप्रमाणें खालीं वर होत असतात ' असें महाभारतांत (वन २६०.४१; शांति २५.२३) म्हटलें असून,—

कस्यैकान्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा ।
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ॥

' नेहमींच सुख किंवा नेहमींच दुःख कोणाच्या वांट्याला आलें आहे ? सुखदुःखाची दशा चाकाच्या धांवेप्रमाणें एकसारखी खालीं वर होत असत्ये ' असा कालिदासानें सिद्धान्त दिला आहे (मेघदूत ११४). आणि तुकोबांच्या खालील अभंगांतहि त्याचाच अनुवाद आहे—

कईं वाहावें जीवन । कईं पलंगीं शयन ॥ १ ॥
जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ॥ २ ॥
कईं भोज्य नानापरी । कईं कोरड्या भाकरी ॥ ३ ॥
कईं बैसावें वाहनीं । कईं पायीं अनवाणी ॥ ४ ॥
कईं उत्तम प्रावर्णें । कईं वसनें तींही जीर्णें ॥ ५ ॥

---

† रामतीर्थ, भाग ४ था, ' सुखाचा इतिहास ' पृ. ३-५ पहा.

कईं सकळ संपत्ति । कईं भोगणें विपत्ति ॥ ६ ॥
कईं सज्जनासीं संग । कईं दुर्जनासी योग ॥ ७ ॥
तुका म्हणे जाण । सुख दुःख तें समान ॥ ८ ॥

याप्रमाणें सुखदुःखें हीं दिनरात्रीप्रमाणें एकापाठीमागून एक येणारच हें निश्चित असल्यामुळें—

सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाऽप्रियम् ।
प्राप्तं प्राप्तमुपासीत हृदयेनापराजितः ॥

'सुख असो वा दुःख असो, प्रिय असो वा अप्रिय असो, जें ज्या वेळीं प्राप्त होईल तें त्यावेळीं मनाचा हिरमोड होऊं न देतां सेवीत जावें' (म. भा. शांति. २५. २६), असा व्यासांनीं युधिष्ठिरास उपदेश केला आहे व भगवद्गीतेंतहि—

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्यचाप्रियम् ।

'सुख प्राप्त झालें असतां फुरफुरून जाऊं नये आणि दुःखानें खिन्न होऊं नये,' असें पांचव्या अध्यायांत (५.२०) सांगितलें असून,—

यःसर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।
नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥

'शुभाशुभ प्राप्त झालें असतां जो नेहमीं निःसंग असून त्याचें अभिनंदन किंवा द्वेष करीत नाहीं तोच स्थितप्रज्ञ होय' (गी. २. ५७), या श्लोकांत पर्यायानें तोच उपदेश केलेला आहे. शेखमहंमद यानेंहि तोच उपदेश प्राकृत भाषेंत सुरस व परिणामकारक रीतीनें केला आहे—

हरि ठेविल तैसें रहावें । देवावर कां रुसावें ॥ ध्रु० ॥
कोणे दिवशीं बैसावें हत्तीवर । कोणे दिवशीं पायांच चाकर ॥
पुढें धांवावें । हरि ठेविल० ॥ १ ॥
कोणे दिवशीं पांघरावी घोंगडी । थंडींत मरावें ॥ हरि० ॥ २ ॥
कोणे दिवशीं खावी तुपसाखर । कोणे दिवशीं मिठासंगें भाकर ॥
खाउनी उगेंच बैसावें । हरि ठेविल ० ॥ ३ ॥

कोणे दिवशीं शिपायगिरि ही बरी । कोणे दिवशीं अब्रू जाइल खरी ।
कोणे दिवशीं हत्यार ठेवून घरीं । उगेंच बैसावें ॥ हरि ठेविल० ॥ ४ ॥
कोणे दिवशीं होइल गुरुची कृपा । कोणे दिवशीं चुकतील यमाच्या खेपा ।
सेक महंमद म्हणे रे बापा । विठ्ठला यावें ॥ हरि ठेविल० ॥ ५ ॥

त्याचप्रमाणें तुकोबाहि खालील पद्यांत तेंच सांगतात—

स्वस्थ बसावें । हरि ठेविल तैसें रहावें ॥ ॥ ध्रु० ॥
कोणे दिवशीं भोजनासि पक्कान्नें । कोणे दिवशीं खाया मिळति न अन्नें ।
कोणे दिवशीं नवरंगी पिकलीं पानें । बहु विडे खावे ॥ हरि० ॥ १ ॥
कोणे दिवशीं दारू हवया उडती । कोणे दिवशीं तास मशाला झडती ।
कोणे दिवशीं दिव्यांत ना बत्ती । गडप निजावें ॥ हरि० ॥ २ ॥
कोणे दिवशीं हौदा गज अंबारी । कोणे दिवशीं चळचळाट दरबारीं ।
कोणे दिवशीं पायीं निघाली स्वारी । तिडकत जावें ॥ हरि० ॥ ३ ॥
कोणे दिवशीं शाल दुशाला महालीं । कोणे दिवशीं शेज नवी पलंगीं ॥
कोणे दिवशीं बाज मोडकी खालीं । स्वस्थ निजावें ॥ हरि० ॥ ४ ॥
कोणे दिवशीं माळ बुक्याची गर्दी । कोणे दिवशीं भजन प्रेमानंदीं ।
कोणे दिवशीं आपआपणा छंदीं । तुकयानें गावें ॥ हरि० ॥ ५ ॥

अन्यत्रहि तुकोबांनीं स्वोदाहरणपूर्वक तोच उपदेश केला असून (धर्म पृ. १७६–७७, अभंग १–५), कविशिरोमणी रवीन्द्रनाथ टागोर यांनींहि 'माझें सगळें सामर्थ्य **प्रेमपुरःसर** तुझ्या इच्छेप्रमाणेंच कामीं लावण्याचें सामर्थ्य मला दे'* (गी. अं. ३६), असें देवापाशीं मागणें मागितलें आहे. सारांश परमेश्वराच्या इच्छेप्रमाणें जी स्थिति प्राप्त होईल—मग ती कशीहि असो—तींत समाधानानें राहाणें, काया-वाचामनासहित जीव भगवंताच्या हातीं देऊन ता दयाघन प्रेममूर्ती

१ रणधुरंधराग्रणी नेपोलियन् बोनापार्ट्.

* Give me the strength to surrender my strength to thy will with love.

प्रभू जिकडे नेईल तिकडे आनंदानें प्रेमपूर्ण अंतःकरणानें बिनदिक्कत जाणें—देहभाव त्याला समर्पण करून आपली इच्छा त्याच्या इच्छेशीं विलीन–एकरूप करणें हेंच मनुष्य जन्माचें परम साध्य होय.†

*
* *

१३ "मनुष्य साधारणपणें सुख तेव्हांच विसरून जातो, पण दुःखासंबंधानें मात्र राईचा डोंगर करितो. जरा कोठें खरचटलें तर त्याला वाटतें कीं, आपणास मर्मस्थानींच जखम झाली आहे" (जी. क. पृ. ३४०). या प्रवृत्तीमुळें एखादें क्षुल्लक दुःख प्राप्त होतांच मनुष्य भिऊन जाऊन त्याचा अगदीं दास बनतो व त्या लहानशा दुःखाचा आवेग त्याला असह्य होऊन तो अगदीं विह्वल होऊन जातो. व संसारांत कांहीं ना कांहीं दुःख हें नेहमीं असल्यामुळें तो सदा सर्वकाळ कष्टी व दुःखी असतो. अशा प्रकारें लहानसहान दुःखांमुळें विव्हळ करणारी मनोदुर्बलता हीच सर्व दुःखांची जननी आहे. या मनोदौर्बल्यामुळें दुःख शतपट भयंकर होतें. प्रतिपक्षाला आपली भित्रेपणाची वृत्ति दिसली कीं, त्यास दुप्पट बळ आलेंच. तोच नियम एथेंहि लागू पडतो. म्हणून संकट प्राप्त झालें असतां नामर्दाप्रमाणें दुःख करीत बसूं नये. 'दुःखाचें मनानें चिंतन करीत न बसणें हेंच दुःखनिवारणाचें वस्ताद औषध होतें'–भैषज्यमेतद् दुःखस्य यदेतन्नानुचिंतयेत् । (शांति. २०५.२), असा महाभारतकारांचा सिद्धान्त आहे. म्हणून जरा कांहीं लहानसहान दुःख विंवा अडचण प्राप्त होतांच शोकाकुल होण्याची प्रवृत्ति नष्ट करून टाकली पाहिजे. " कांहीं लोकांस उगाच कुरकुर करण्याची संवय असते. त्यांना जरी इन्द्रभुवनांत नेऊन ठेविलें तरी तेथें देखील कांहीं कमीपणा काढून ते रडत

---

† जेव्हां अहंकार नाहींसा होईल आणि आमची इच्छा परमेश्वरांत लीन होऊन जाईल, तेव्हांच मोक्ष मिळेल. —रा. बो. व. ६०१.

बसतील. कांहीं लोकांचा स्वभाव ह्याच्या अगदीं उलट असतो. ते कोठेंहि असले तरी त्यांना आनंदच होत असतो." (जी. क. पृ. ३३७). लहानसहान दुःखदायक प्रसंगामुळें दुःख करीत बसणारा मनुष्य नेहमीं दुःखी व कष्टी असतो तर दुःखांना उपहासपूर्वक तुच्छतेनें लाथाडणारा माणूस कधींच सर्वस्वी दुःखवश होत नाहीं.* यामुळें दोघां मनुष्याची स्थिति सारखी असतां एक नेहमीं उल्हासी व प्रसन्नचित्त तर दुसरा सदा सर्वकाळ कष्टी व खिन्नहृदय अशीं उदाहरणें आढळून येतात. दुःख प्राप्त होतांच घाबरून हताश होण्याची मनुष्याच्या मनास संवय लागली म्हणजे त्याच्या दुःखास पारावार नाहीं. कारण 'वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ.' म्हणूनच—

न पृथग्जनवच्छुचो वशं वशिनामुत्तम गन्तुमर्हसि ।
द्रुमसानुमतां किमन्तरं यदि वायौ द्वितयेऽपि ते चलाः ॥

'एखाद्या सामान्य मनुष्याप्रमाणें दुःखवश होणें तुझ्या सारख्या दान्त पुरुषाला शोभत नाहीं; वाऱ्याच्या वेळीं वृक्षांप्रमाणें पर्वतहि जर हालूं लागले तर त्या दोहोंमध्यें फरक तो काय उरला ?' असा रघुवंशांत पत्नीच्या मृत्यूनें शोकविव्हल झालेल्या अजास उपदेश केलेला असून (रघु. ८.९०), आपल्या आप्तेष्टांची आपल्या हातांनीं कत्तल करावी लागणार या विचारानें शोकाकुल झालेल्या अर्जुनास भगवान् श्रीकृष्णांनीं, अशा प्रकारचा मनाचा दुबळेपणा धीर पुरुष कधींहि बाळगीत नाहींत, हा दुष्कीर्तिकारक व अधोगतीला नेणारा आहे असें सांगून,—

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥

---

* .....gnarling sorrow hath less power to bite
The man that mocks at it and sets it light.
—Shakespeare (King Richard II. 1. 3).

'हे पार्था! असा नामर्द होऊं नकोस! हें तुझ्यासारख्या वीराला शोभत नाहीं! अरे हें अतःकरणाचें क्षुद्र दुबळेपण फेंकून दे; ऊठ! युद्धास उभा रहा' (गी. २.३), असा उपदेश केला आहे; व धृति आणि उत्साह हे गुण सात्विक कर्त्यास आवश्यक आहेत असें पुढें सांगितलें आहे (गी. १८. २६). म्हणून या उपदेशानुसार दुःखाखालीं दडपून न जातां वीराप्रमाणें धैर्यानें प्रसंगास तोंड देऊन मनाची वृत्ति समाधानी राखली पाहिजे. अशी वृत्ति ठेवणें कठिण आहे हें खरें; पण त्याला तोड म्हणजे अधिक प्रयत्न करणें हींच होय. निश्चयाच्या दृढ अभ्यासला काय असाध्य आहे? असाध्य तें साध्य करितां सायास। कारण अभ्यास तुका म्हणे। म्हणून दृढप्रयत्नपूर्वक अशी संवय मनास लाविली पाहिजे. केवढेंहि दुःख प्राप्त झालें तरी आपली मान अणुमात्रहि खालीं करावयाची नाहीं किंवा आपल्या चित्ताची शांतवृत्ति यत्किंचितहि ढळूं द्यावयाची नाहीं अशा वीर्यशाली स्थितीला मन पोंचलें म्हणजे जो आनंद होतो त्यामुळें ती स्थिति प्राप्त करून घेण्यास शतपट अधिक प्रयास पडते तरी ते कांहींच नव्हत असें वाटूं लागतें. कारण अशा उच्च पायरीप्रत मन पोंचलें म्हणजे तें कसल्याहि स्थितींत असलें तरी दिव्य सुखाचाच उपभोग घेईल. †

***

१४ जेवणावरून रुसून गेलेल्या हट्टी मुलास समजावून आणण्याचा जों जों प्रयत्न करावा तों तों तें अधिकच हट्ट करूं लागतें व कांहीं केल्या समजुतीस म्हणून येत नाहीं. अशा वेळीं उत्तम मार्ग म्हणजे त्याच्या रुसण्यास आपण महत्व देत नाहीं असें दाखवून त्यास तेथें सोडून देऊन दुसरीकडे जाऊन आपल्या कामास लागणें हा होय. असें केलें म्हणजे थोड्या वेळानें तें मूल आपणच येऊन केव्हांच जेऊन जातें!

† *Cf.* The mind is its own place, and in itself
Can make a Heaven of Hell, a Hell of Heaven.
—Milton (Paradise Lost, Book I., 254–55).

सुखाची गोष्टहि कांहींशी अशीच आहे. 'त्याजविषयीं फाजील चौकसपणा दाखविल्यास तें दूर पळतें' (जी. क. पृ. ३३६). म्हणून त्याची बिलकुल पर्वा किंवा अपेक्षा न करतां, आपलें कार्य ईश्वरार्पणपूर्वक करण्यांत पूर्णपणें गढून जावें, म्हणजे सुख न बोलावतां पायांपाशीं धांवून येतें. " आत्मसंयमनानें जितकें सुख मिळतें तितकें आपल्या सुखोपभोगाच्या इच्छा पुरविण्याच्या खटपटीस लागल्यानें कधींहि मिळणार नाहीं" (जी. क. पृ. ३४५). "सुखाविषयीं अत्यंत आतुर न होणें हेंच सुखप्राप्तीचें साधन आहे" (जी. क. पृ. ३३६). फ्रँक्लिन् तर स्वच्छ असें म्हणतो कीं, "सुखांचा त्याग करावा, म्हणजे तीं आपल्या मागोमाग आलींच म्हणून समजावें " (जी. क पृ. ३३६). त्याचप्रमाणें तुकारामबावांनींहि

भोगें घडे त्याग । त्यागें अंगा येती भोग ॥

असें सुखाचें 'उफराटें वर्म' असल्याचें आपल्या अभंग-वाणीनें सांगितलें आहे.

***

१५. स्वतः सुखाची पर्वा न करितां, दुसऱ्यास सुखी करण्यांतच खरें सुख आहे. " आंधळे, बहिरे, मुके, पांगळे, रोगी, थोटे, म्हातारेकोतारे अशा अनाथांस आश्रय देऊन सनाथ करावें. या सत्कर्मापासून जो आनंद आहे तो इतरांस कळावयाचा नाहीं. ज्यानें तीं कामें केलीं असतील, त्यासच तो पुसावा. " " अशक्तांना मदत केली असतां मदत देणाराच अधिक सशक्त होतो" (आत्मोद्धार पृ. १३१), व " जे लोक दुसऱ्याकरितां फार मेहनत घेतात तेच सर्वांपेक्षां अधिक सुखी असतात," (आत्मो. पृ. ५८) हें तत्त्व महाशय बुकर टी. वॉशिंग्टन् यांस पूर्णपणें पटलेलें असल्यामुळें, दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची संधि मिळालेली पाहून त्यांना फार आनंद होत असे (आत्मो. पृ. ६६). विद्यार्थ्यांना उपदेश करितांना

ते नेहमीं असें सांगत कीं, " मी जसजसा मोठा व वृद्ध होत चाललों आहें, तसतशी माझी अधिकाधिक खात्री पटत चालली आहे कीं, जिच्याकरितां आम्हीं जगावें आणि प्रसंग पडल्यास प्राणहि वेचावे, अशी एकच गोष्ट आहे; आणि ती म्हटली म्हणजे ' दुसऱ्या कोणालाहि अधिक उपयुक्त आणि सुखी करण्याचा सुयोग अथवा संधि मिळणें ' ही होय " (आत्मो. पृ. १८०). याच आशयानें स्वामी विवेकानन्द म्हणतात, " माझ्या प्रयत्नानें एका जीवाला जरी मोक्षमार्गांत साह्य झालें, तरी माझ्या श्रमांचें सार्थक झालें असेंच मी समजेन " (मं. वि. पृ. १०३७). तात्पर्य दुसऱ्यास सुखी करण्यापासून होणाऱ्या मानसिक सुखापुढें इतर सुखें तुच्छ होत —

अपहृत्यार्तिमार्तानां सुखं यदुपजायते ।
तस्य स्वर्गोऽपवर्गो वा कलां नार्हति षोडशीम् ॥

' दुःखार्त मनुष्यांचें दुःख दूर केल्यानें जें सुख प्राप्त होतें, त्याच्या स्वर्ग किंवा मोक्ष पासंगासहि पुरणार नाहींत ! ' याच कारणामुळें, " मनुष्यजातीचे जे तारक असतात ते ईश्वराचें दर्शन घेतात, आणि त्या दिव्यानंदाचा वांटा इतरांस द्यावा हा हेतु मनांत धरून, प्राप्त झालेलें निर्वाणपद टाकून देतात, आणि अज्ञान मानवजातीला शिक्षण देऊन ध्येयाप्रत नेण्यासाठीं पुनर्जन्माचे कष्टहि आनंदानें सोसतात" (रा. बो. व. २८०).

***

१६. शारीरिक सुख आणि मानसिक सुख या दोन प्रकारच्या सुखांचा विचार करितां शरीराचे किंवा इंद्रियांचे व्यापारांपेक्षां मनासच अधिक महत्व द्यावें लागतें. शारीरिक म्हणजे आधिभौतिक सुखापेक्षां मानसिक सुखाची योग्यता अधिक असा जो सिद्धान्त ज्ञानी पुरुष करितात तो आपल्या ज्ञानाच्या घमेंडीनें करीत नसून, त्यांतच श्रेष्ठ मनुष्य जन्माची खरी थोरवी म्हणजे सार्थकता आहे, असें प्रसिद्ध आधिभौतिकवादी मिल्ल

यानेंहि आपल्या उपयुक्तावादावरील ग्रन्थांत प्रांजलपणें कबूल केलें आहे. कुत्रीं, डुकरें, बैल वगैरेंसहि मनुष्याप्रमाणेंच इन्द्रियसुखाची गोडी असत्ये, आणि विषयोपभोग एवढेंच काय तें या जगांत खरें सुख अशी जर मनुष्याची समजूत असती, तर मनुष्य पशु होण्यासहि राजी झाला असता. पण पशूचें सर्व विषयसुख नित्य मिळावयाचें असलें तरीहि ज्या-अर्थी पशु होण्यास कोणी राजी होत नाहीं, त्या अर्थी पशूपेक्षां मनुष्यामध्यें कांहीं तरी विशेष आहे असें उघड होतें. हा विशेष कोणता हें पाहूं गेलें म्हणजे मन आणि बुद्धि यांच्या द्वारें स्वतःचें व बाह्यसृष्टीचें ज्यास ज्ञान होतें त्या आत्म्याच्या स्वरूपाचा विचार करावा लागतो; आणि एकदां हा विचार सुरु झाला म्हणजे पशु आणि मनुष्य या दोघांना सारखेंच साध्य जें विषयोपभोगसुख त्यापेक्षां मनाच्या आणि बुद्धीच्या अत्यंत उदात्त व्यापारांत व शुद्धावस्थेंत जें सुख तेंच मनुष्याचें श्रेष्ठ किंवा अत्यंत सुख असें ओघानेंच प्राप्त होतें. हें परम सुख आत्मविचारांत मग्न झालेल्या बुद्धीलाच मिळणें शक्य असतें; व याचमुळें भगवद्गीतेंत सुखाचे सात्विक, राजस आणि तामस असे तीन भेद केल्यावर त्यांपैकीं 'तत्सुखं सात्विक प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम्' ।—आत्मनिष्ठ (म्हणजे सर्वांभूतीं एकच आत्मा असें आत्म्याचें खरें स्वरूप ओळखून त्यांतच रत झालेल्या) बुद्धीच्या प्रसन्नतेनें जें आध्यात्मिक सुख प्राप्त होतें तेंच सात्विक म्हणजे श्रेष्ठ—असें प्रथम सांगून (गी. १८.३७), नंतर इंद्रियें व इंद्रियांचे विषय यांपासून होणाऱ्या आधिभौतिक सुखाची पायरी या खालची म्हणजे राजस (गी. १८.३८), आणि चित्ताला मोह पाडणाऱ्या व निद्रा किंवा आलस्य यांपासून प्राप्त होणाऱ्या सुखांची योग्यता तामस म्हणजे सर्वांत कनिष्ठ होय (गी. १८.३९), असें वर्णन केलें आहे. या भागाच्या आंरभीं दिलेल्या गीतेंतील श्लोकाचें तात्पर्य हेंच असून या परम सुखाचा अनुभव एकदां आला म्हणजे पुढें कितीहि मोठें दुःख

प्राप्त झालें तरी त्यानें ही स्थिति हालत नाहीं—यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते । (गी. ६.२२), असें गीताच सांगत आहे. हें आत्यंतिक सुख स्वर्गीच्याहि विषयसुखांत नसून तें मिळण्यास आपली बुद्धि प्रथम प्रसन्न झाली पाहिजे. बुद्धि प्रसन्न झाली म्हणजे मनुष्याच्या सर्व दुःखांचा नाश होतो—प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते । असें गीतेंतच सांगितलें असून (गी. २.६५), मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचें कारण ॥ या तुकोबांच्या उपदेशाचा रोंखहि तोच आहे. बुद्धि कशी प्रसन्न ठेवावी याचा विचार न करितां केवळ विषयोपभोगांतच जो गढून जातो त्याचें सुख क्षणिक किंवा अनित्य असतें. त्याला आत्यंतिक सुख मिळणें केव्हांहि शक्य नाहीं. कारण जें इन्द्रियसुख आज आहे तें उद्यां नाहीं इतकेंच नव्हे, तर जी गोष्ट आपल्या इन्द्रियांस आज सुखकारक वाटत्ये तीच कांहीं कारणामुळें उद्यां दुःखकारक होत्ये. उदाहरणार्थ, उन्हाळ्यांत जें थंड पाणी गोड वाटतें तेंच थंडीच्या दिवसांत नकोसें होतें. बरें; इतकें करूनहि सुखेच्छेची पूर्ण तृप्ति होत्ये असेंहि नाहीं. कारण विषयवासना सतत एकसारखी वाढत जात असल्यामुळें (तरंग १०), दररोज नवीं नवीं सुखें मिळालीं तरी विषयसुखाची इच्छा पूर्णपणें तृप्त होणें कधींच शक्य नाहीं. ययाति राजाच्या सुप्रसिद्ध गोष्टीवरून याची सत्यता नीट लक्षांत येईल. ययाति राजा शुक्राचार्यांच्या शापानें म्हातारा झाल्यावर तें म्हातारपण दुसऱ्याला देऊन त्याऐवजीं त्याचें तारुण्य घेण्याची शुक्राचार्यांनीं दयाळू होऊन त्याला सवलत दिली होती. तेव्हां आपला कनिष्ठ मुलगा जो पुरु त्याचें तारुण्य घेऊन ययातीनें एक हजार वर्षें एकसारखा विषयोपभोग घेतल्यावर, पृथ्वींतील सर्व पदार्थ एका मनुष्याचीहि सुखवासना तृप्त करण्यास अपुरे आहेत असें त्याच्या अनुभवास आलें आणि—

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥

' सुखांच्या उपभोगानें विषयवासनेची तृप्ति कधींहि होत नाहीं; हवन-

द्रव्यानें जसा अग्नि, त्याप्रमाणें उपभोगानें विषयवासना अधिकाधिकच वाढत जात्ये ' असे त्याच्या तोंडांतून उद्गार निघाले असें महाभारताच्या आदिपर्वांत व्यासांनीं वर्णिलें आहे (आदि. ७५.४९). त्याचप्रमाणें मांधाता नामक पौराणिक राजाच्या मुखांतून मरतेसमयीं—

न कहापणवस्सेन तित्ति कामेसु विज्जति ।
अपि दिब्बेसु कामेसु रतिं सो नाधिगच्छति ॥

' कार्षापण नामक नाण्याचा पाऊस पडला तरी कामाची तित्ति म्हणजे तृप्ति होत नाहीं आणि स्वर्गांतलीं सुखें मिळालीं तरी कामी पुरुषाची कामेच्छा तृप्त होत नाहीं,' असे उद्गार निघाले असें बौद्ध ग्रन्थांत वर्णन आहे (धम्मपद १८६,१८७). सुखसाधनें कितीहि मुबलक असलीं तरी इन्द्रियांची खवखव सतत वाढत्या प्रमाणावर असल्यामुळें, केवळ सुखोपभोगानें सुखेच्छा कधींहि तृप्त होणें शक्य नाहीं, तिला दुसरा कांहीं तरी आळा घालावा लागतो हें यांतील बीज आहे. धर्मशास्त्रावरील आमच्या सर्व ग्रन्थकारांचें या बाबतींत ऐकमत्य असून कामोपभोगास प्रत्येकानें कांहीं मर्यादा घातलीच पाहिजे असें त्यांचें सर्वांस पहिलें सांगणें आहे.

सर्व सुखांमध्यें जें इन्द्रियातीत बुद्धिगम्य सुख किंवा आनंद तेंच श्रेष्ठ सुख होय हा आमच्या धर्मशास्त्रकारांचा सर्वमान्य सिद्धान्त वर दिलाच आहे. हें नित्य सुख आत्मवश असल्यामुळें, सर्वांस प्राप्त होण्यासारखें आहे व सर्वांनीं तें संपादन करण्याचा प्रयत्न करावा असा आमच्या शास्त्रकारांचा अभिप्राय आहे. पशुधर्माखेरीज मनुष्याचें जें कांहीं विशिष्ट सुख तें हेंच होय; व हा आत्मानंद सर्व सुखांत नित्य, स्वतंत्र व श्रेष्ठ आहे. तसेंच तो आत्मवश म्हणजे बाह्य वस्तूंची अपेक्षा न ठेवितां, किंवा दुसऱ्याचें सुख कमी न करितां, आपल्या स्वतःच्याच प्रयत्नानें प्राप्त करून घेतां येण्यासारखा असून, जसजसें वर चढत जावें तसतसें या सुखाचें स्वरूप अधिकाधिक उज्ज्वल, शुद्ध व निर्भेळ होत जातें.

भाग ४ था.

प्रपंचवर्णन आणि परमार्थसाधन.

धनानि भूमौ, पशवश्च गोष्ठे, भार्या गृहद्वारि जनः स्मशाने ।
देहश्चितायां, परलोकमार्गे कर्मानुगो गच्छति जीव एकः * ॥ १ ॥
काळ चोर घिरट्या बहु घाली, पामरा तुज कशी निज आली ॥
जाग जाग स्वरुपीं लवलाह्या । जातसे वय अमोलिक वायां ॥ २ ॥

१ श्लोक.

यावद्वित्तोपार्जनसक्तस्तावन्निजपरिवारो रक्तः ।
पश्चाद्धावति जर्जरदेहे, वार्तां पृच्छति कोऽपि न गेहे ॥ १ ॥ **

२ अभंग.

धनवंतालागीं । सर्वमान्यता हे जगीं ॥ १ ॥
माता पिता बंधु जन । सर्व मानिती वचन ॥ २ ॥
जंव चाले मोठा धंदा । तंव बहिण म्हणे दादा ॥ ३ ॥
सदा शृंगारभूषणें । कांता लवे बहुमानें ॥ ४ ॥
तुका म्हणे धन । भाग्य अशाश्वत जाण ॥ ५ ॥

३ पद.

सब पैसेके भाई । दिलेका साथी नहिं कोई ॥ ध्रु० ॥
खाने पिनेको पैसा होयगा तो जोरू बदरी करे ।
एकदिन खाने नहि मिलता तो फिरके जबाब करे ॥ सब० ॥ १ ॥

---

* व्रजांत धेनू, धन तें निधानीं, । स्त्री मंदिरीं, बंधुजन स्मशानीं ॥ चितेंत काया, परलोकपंथें । जीवासवें कर्मचि एक जातें ॥—द. ना. नाबर (जी. क. पृ. ३०).

** जोंवरी वित्तोपार्जन करितो, तोंवरि निज परिवारहि भजतो । आल्यावरि जर्जरता देहीं, कोणी मग त्या न पुसे गेहीं ॥ —सडेकरकृत 'ज्ञानसिंधु' पृ. ७४.

१ अंतःकरणाचा, जीवाचा. २ बायको.

जबलग अपने पल्लव पैसा तबलग लोक सलाम करे।
अपना पैसा निकल गया तो कोइ नहिं मिठा बोले ॥ सब० ॥ २ ॥
भाऊबंद और बहीन साले झूटा सबहि पसारा।
कौन किसीका नहिं रे प्यारे कहता दास कबीरा ॥ सब० ॥ ३ ॥

४ ओंव्या.

कोण समयो येईल कैसा । याचा न कळे किं भर्वसा ॥
जैसे पक्षी दाही दिशा । उडोन जाती ॥ १ ॥
तैसें वैभव हें सकळ । कोण जाणे कैसी वेळ ॥
पुत्रकळत्रादि सकळ । विघडोन जाती ॥ २ ॥
पाहिली घडी नव्हे आपुली । वयसा तरी निघोन गेली ॥
देह पडतांच ठेविली । आहे नीच योनी ॥ ३ ॥
स्वान शुकरादिक नीच याती । भोगणें घडे विपत्ती ॥
तेथें कांहीं उत्तम गती । पाविजेत नाहीं ॥ ४ ॥
मागां गर्भवासीं आटाटी । भोगितां जालासि रे हिंपुटी ॥
तेथुनियां थोरा कष्टी । सुटलासि दैवें ॥ ५ ॥
दुःख भोगिलें आपुल्या जीवें । तेथें कैंचिं होतीं सवें ॥
तैसेंचि पुढें येकलें जावें । लागेल बापा ॥ ६ ॥
कैंची माता कैंचा पिता । कैंची बहिण कैंचा भ्राता ॥
कैंचीं सुहृदें कैंची वनिता । पुत्र कळत्रादिक ॥ ७ ॥
हे तूं जाण मावेचीं । आवघीं सोइरीं सुखाचीं ॥
हे तुझ्या सुखदुःखाचीं । सांगाती नव्हेती ॥ ८ ॥
येच क्षणीं मरोन जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी ॥
माझें माझें म्हणतोसी । म्हणौनियां ॥ ९ ॥
तुवां भोगिल्या पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें किती ॥
स्त्री कन्या पुत्र होती । लक्षानलक्ष ॥ १० ॥

कर्मयोगें सकळ मिळालीं । येके स्थळीं जन्मास आलीं ॥
ते तुवां आपुलीं मानिलीं । कैसीं रे पढतमूर्खा ॥ ११ ॥
तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतराचा कोण विचार ॥
आतां येक भगवंत साचार । धरीं भावार्थबळें ॥ १२ ॥

५ अभंग.

कोणी नाहीं रे कोणाचें । अवघें सुखसंपत्तीचें ॥ १ ॥
जैसा वसतो बाजार । तैसा देहाचा विचार ॥ २ ॥
क्षण आहे क्षण नाहीं । काळ प्राण नेतो घाई ॥ ३ ॥
तुका म्हणे सावध असा । प्रभुनामीं सदा वसा ॥ ४ ॥

६ अभंग.

सोइरे धाइरे दिल्याघेतल्याचे । अंत हे काळींचे नाहीं कोणी ॥ १ ॥
सरव्या गोत्र बहिणी सुखाचे सांगाती । मोकलुनी देती अंतकाळीं ॥ २ ॥
आपुलें शरीर आपणा पारिखें । परावीं होतील नवल काई ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां सोड यांची आस । धरींरे या कास पांडुरंगा ॥ ४ ॥

७ अभंग.

जन हें सुखाचें दिल्याघेतल्याचें । अंत हें काळींचें नाहीं कोणी ॥ १ ॥
जाल्या हीन शक्ती नाकडोळे गळती । सांडोनियां पळती रांडापोरें ॥ २ ॥
बाइल म्हणे स्वर मरता तरी बरें । नासिलें हें घर थुंकोनियां ॥ ३ ॥
तुका म्हणे माझीं नव्हतील कोणी । तुज चक्रपाणी वांचूनियां ॥ ४ ॥

८ अभंग.

सुखाचे सांगाती सर्वही मिळती । दुःख होतां जाती निघोनियां ॥ १ ॥
जाती निघोनियां संकटाचे वेळे । सुख होतां मिळे समुदाय ॥ २ ॥
समुदाय सर्व देहाचे संबंधी । तुटली उपाधि रामदासीं ॥ ३ ॥

९ अभंग.

बरें जालीयाचे अवघे सांगाती । वाइटाचे अंतीं कोणी नाहीं † ॥ १ ॥
नोहे मातापिता नोहे कांता सुत । इतरांची मात काय सांगों ॥ २ ॥
तुका म्हणे जन दुतोंडी सावज । सांपडे सहज तिकडे धरी ॥ ३ ॥

१० पद.

बा तुझा चालता काळ । खायाला मिळती सकळ ॥ ध्रु० ॥
हे कोण बायकोचे साले । तुपावेगळा घांस न गिळे ॥
तांदुळ रांधियेले मोकळे । केलें बेंबीचें ऊखळ ॥ बा तुझा० ॥ १ ॥
हे कोण बायकोचे मामे । घरांत वागती रिकामे ॥
साखर शाल्योदन खाणें । भोजनभाऊ केवळ ॥ बा तुझा० ॥ २ ॥
बहिणी सासू घरासि येती । फराळाच्या पंक्ति बैसती ॥
नातीं कोरकोरून काढिती । सर्व मायेचा गोंधळ ॥ बा तुझा० ॥ ३ ॥
अमृतराय म्हणे रे मूर्खा । किती भुललासी मायेच्या सुखा ॥
अंतीं जासि एकटा नरका । भज सद्गुरु दयाळ ॥ बा तुझा० ॥ ४ ॥

११ अभंग.

प्राण जाई देहांतून । पुत्र पुसे कोठें धन ॥ १ ॥
कोणा उधार दिलासी । तो सांग आम्हांपाशीं ॥ २ ॥
त्याची खुंटलीसे वाणी । धन पुसती छळुनी ॥ ३ ॥
तुका म्हणे जन । धनासाठीं देती प्राण ॥ ४ ॥

१२ अभंग.

स्त्रिया पुत्र कलत्र हे तंव मायावंत । शेवटींचा अंत न पवे कोणी ॥ १ ॥
यमाचिये हातीं बांधोनियां देती । भूषणेंही घेती काढूनियां ॥ २ ॥
ऐसिया चोरांचा कैसा हा विश्वास । धरिली तुझी कास तुका म्हणे ॥ ३ ॥

---

† कठिण समय येतां कोण कामास येतो ।
—रघुनाथपंडित (नलदमयंतीस्वयंवराख्यान ४०).

१३ पद.

प्राण्या राम भजावा रे । मनिं हा गर्व नसावा रे ॥ ध्रु० ॥
कानिं चौकडा धोतरजोडा । बसाया खासा घोडा ॥
यमरायाचें येइल बोलावणें । शेवटिं जाशिल उघडा ॥ प्राण्या० ॥१॥
उंच उंच लुगडीं बाळ्याबुगडी । मीपणाची फुगडी ॥
यमरायाचें येइल बोलावणें । स्मशानिं काया उघडी ॥ प्राण्या० ॥२॥
उदीम मोठा कधिं नाहिं तोटा । बहुत केल्या खटपटा ॥
मेल्यामागें सर्व राहिलें । मुखांत माती लोटा ॥ प्राण्या० ॥ ३ ॥
माय बाप बहीण भाऊ । अवघाच भरला थाट ॥
मेल्यामागें सर्व राहिले । बायको लावी पाट ॥ प्राण्या० ॥ ४ ॥
हांडा भांडा दौलत झेंडा । खायाला उन उन मांडा ॥
मडक्यामध्यें पाणि तापतें । भोंवत्या रडती रांडा ॥ प्राण्या० ॥ ५ ॥
दास तुका म्हणे समजा नि उमजा । येथेंच तुमचा गमजा ॥
मेल्यामागें सर्व राहिलें । लुटतिल बुरजा बुरजा ॥ प्राण्या० ॥ ६ ॥

१४ पद.

सबसे रामभजन कर लेना । एक दिन जाना रे भाई ॥ ध्रु० ॥
सोना पेरो रूपा पेरो । पेरो पितलकी तार ॥
रुपया गजका रेशम पेरो । नहिं जीवनकी आस ॥ एक० ॥ १ ॥
माता रोवे आसु मासू । बेहेन रोवे बार मास ॥
घरकी तिरिया तिन दिन रोवे । धुंडे दुसरा यार ॥ एक० ॥ २ ॥
वाडीबिचमां बगला बनाया । रचा कमलका फूल ॥
दो घडीका देना लेना । अक्कल हो गई भूल ॥ एक० ॥ ३ ॥
कोन मिलेगा मनका मेला । कोन मिलेगा दरदी ॥
अंतरजामा तूट गया फिर । कोन सियेगा दरजी ॥ एक० ॥ ४ ॥
बनया तेरा बेपारीनो । बणीज करे बेपार ॥
बिना धडा बिन तागडीनो । तोला जो संसार ॥ एक० ॥ ५ ॥

कवडी कवडी माया जोडी । रुपया लाख करोड ॥
जब आवे यमजिका तडाखा । चलो लंगोटी छोड ॥ एक० ॥ ६ ॥
देशदेशसे बैद बुलाया । लाया जडाबुट्टी ॥
जडाबुट्टी तो कुछ नहिं चाले । नारायण घरकी टुट्टी ॥ एक०॥७॥
मट्टी ओढन मट्टी पेरन । मट्टीच मिल गये भोग ॥
कबीरसाहेब तो ऐसा बोले । उपर चल गये लोग ॥ एक० ॥ ८ ॥

१५ पद.

भाई हुशार रहना बे । खुदाका नाम जपना बे ॥ ध्रु० ॥
दो दिनकी है जानिजबानी । तुज अल्लानें दीयी ॥
रामभजनबिन खाक होयगा । दिया कालकी फांसी ॥ भाई० ॥ १ ॥
भांत भांतके कपडे पेहना । सुरत बनायी खाशी ।
रामनामबिन मुक्त न होवे । मत करना मगरोरी ॥ भाई० ॥ २ ॥
चोपचापके पगरी बांधी । खावे पानका बीडा ।
जब जमजीकी गांठ पडेगी । जायगा नंगा उघडा ॥ भाई० ॥ ३ ॥
कहत कबीरा सुन गव्हारा । मत करना बे तोरा ।
रामभजन तो करते रहना । क्या करे काल बिचारा ॥ भाई० ॥ ४ ॥

१६ पद.

इस तनधनकी कौन बढाई । देखत नयनोंमें मट्टी मिलाई ॥ ध्रु० ॥
अपने खातर मेहेल बनाया । आपहि जाकर जंगल सोया ॥ इस०॥ १ ॥
हाड जले जैसी लकडीकी मोली । बाल जले जैसी घासकी पोली ॥ इस० ॥ २॥
कहत कबीरा सुन भाई गुनियां । आप मुवे पिछे डुब गयी दुनिया ॥ इस०॥३॥

१७ अभंग.

किती पाहसी दर्पणीं । अंतीं जाशील सर्पणीं ।। १ ॥
नाहाल्या पलंग सुपती । अंतीं गोंवऱ्या संगती ॥ २ ॥
कानीं कुडक्या हातीं मुदी । अंतीं यम घेइल शुद्धी ॥ ३ ॥
तुका म्हणे हेंचि खरें । अंतीं हरिनाम सोईरें ॥ ४ ॥

१८ अभंग.

व्यर्थ मायाजाळीं गुंतोनी राहसी । हित गमावीसी आपुलें तें ॥ १ ॥
गृह दारा सुत नव्हेत अंतींचीं । मग इतरांची काय आशा ॥ २ ॥
सर्व हें सांडोनी जाशील बा झणीं । काळ तो बांधोनी नेई तुज ॥ ३ ॥
तेथें सोडविता नसे तुज कोणी । एका चक्रपाणीवांचोनियां ॥ ४ ॥
नको गुंतूं गळीं मायिकासी टाळीं । स्वहित सांभाळीं भिक्षु म्हणे ॥ ५ ॥

१९ अभंग.

नको नको मना गुंतूं मायाजाळीं । काळ आला जवळी ग्रासावया ॥ १ ॥
काळाची हे उडी पडेल बा जेव्हां । सोडविना तेव्हां मायबाप । २ ॥
सोडविना बंधु पाठीची बहीण । शेजेची कामीन दूर राहे ॥ ३ ॥
सोडविना राजा देशींचा चौधरी । आणीक सोइरीं भलीं भलीं ॥ ४ ॥
तुका म्हणे तुला सोडवीना कोणी । एका चक्रपाणीवांचूनियां † ॥ ५ ॥

२० अभंग.

जरा कर्णमूळीं सांगों आली गोष्टी । मृत्याचिये भेटी जवळी आली ॥ १ ॥
आतां माझ्या मना होईं सावधान । ॐ पुण्याची जाण कार्यसिद्धि ॥ २ ॥
शेवटील घडी बुडतां नलगे वेळ । साधावा तो काळ जवळी आला ॥ ३ ॥
तुका म्हणे चिंतीं कुळींची देवता । वारावा भोंवता शब्द मिथ्या ॥ ४ ॥

२१ पद.

ध्या हरिच्या नामा । लिहितां कशास ओनामा ॥ ध्रु० ॥
सांगतों ऐका एक वर्म । पहावे भागवतीं धर्म ॥
दुःखसें प्राप्त होय शर्म । यत्न त्या कशास रे परम ॥
न पावे हरिवांचुनि क्षेमा । लिहितां कशास ओनामा ॥ १ ॥

---

† पांडुरंगावांचुनी दुजा कोण सखा । निर्वाणींचा देखा मायबाप । —वंका.

शरण सद्गुरुला जावें । हरिभजनीं नच लाजावें ॥
हरिचें सगुण रूप ध्यावें । निर्मळ भावें पूजावें ॥
सांडुन हृदयांतिल कामा । लिहितां कशास० ॥ २ ॥
गृह धन सुत यांची ममता । धरुनी व्यर्थचि कां श्रमतां ॥
हृदयीं वागवुनी समता । हरिचें चरणांबुज नमितां ॥
नेइल हरि तो निजधामा । लिहितां कशास० ॥ ३ ॥

२२ पद.

तूं तो राम सुमर जग लढवा दे ॥ ध्रु० ॥
कोरा कागद काली शाई, लिखत पढत वाकु पढवा दे ॥ तूं० ॥ १ ॥
चंडी भैरवी शितला देवी, फतर पुजत वाकु पुजवा दे ॥ तूं तो० ॥२॥
हत्ती चालत है अपने गतमों, कुतर भुकत वाकु भुकवा दे ॥ तूं० ॥ ३ ॥
कहत कबीरा सुन भाई साधु, नरक पचत वाकु पचवा दे ॥ तूं० ॥४॥

२३ श्लोक.

बालस्तावत्क्रीडासक्तस्तरुणस्तावत्तरुणीरक्तः ।
वृद्धस्तावच्चिंतामग्नः परे ब्रह्मणि कोऽपि न लग्नः * ॥ १ ॥

२४ पद.

अब तुम कब सुमरो गे राम ॥ ध्रु० ॥
गर्भपनोंमें हात जुरायो, निकल गया बैमान ॥ अब० ॥ १ ॥
बालपनोंमें खेल गुमायो, तारुनपनोंमें काम ॥ अब० ॥ २ ॥
हात पाव जब कांपन लागे । निकल गयो अवसान ॥ अब० ॥ ३ ॥
कहत कबीरा सुन भाई साधु । पास घोडा मैदान ॥ अब० ॥ ४ ॥

---

* बाल तोंवरी क्रीडनिं दंग । तरुण तोंवरी अनंगरंग । वृद्धपणीं मग चिंतादीन । ब्रह्मपदीं नच कोणी लीन ॥ —लक्ष्मण गणेशशास्त्री लेले (संमोहखंडन १०).

१५ ओंव्या.

बाळपण गेलें खेळतांची वांयां । तरुणत्व माया संसाराची ॥ १ ॥
स्त्रिया पुत्र धन सुखावरी मन । नाठवे साधन स्वहिताचें ॥ २ ॥
वृद्धपणीं मिथ्या मोह माया भ्रांती । आठवेना चित्तीं नारायण ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हीं सोडिला संसार । तुझी आशा थोर केली देवा ॥४॥

१६ श्लोक.

यावत्स्वस्थोऽप्ययं देहो यावन्मृत्युश्च दूरतः ।
तावदात्महितं कुर्यात्प्राणान्ते किं करिष्यति ॥ १ ॥ *

१७ अभंग.

काळ जातो क्षणक्षणा । मूळ येईल मरणा ॥ १ ॥
कांहीं धांवाधांव करीं । जंव तो आहे मृत्यु दुरी ॥ २ ॥
देह आहे जाईजिणें । भुललासी कोण्या गुणें ॥ ३ ॥
मायाजाळीं गुंतलें मन । परि हें दुःखासी कारण ॥ ४ ॥
सत्य वाटतें सकळ । परि हें जातां नाहीं वेळ ॥ ५ ॥
रामीरामदास म्हणे । आतां होईं सावधान ॥ ६ ॥

१८ पद.

भज रे गोविंदा गोविंदा । सच्चिदानंदकंदा ॥
सावध होईं रे मतिमंदा । न करीं आणिक छंदा ॥ ध्रु० ॥
मोहें भुललासी भुललासी । माझें माझें म्हणसी ॥
क्लेशें मेळविल्या धनराशी । अंतीं टाकुन जाशी ॥ भज० ॥ १ ॥
गृह सुत धन दारा धनदारा । मिथ्या मोह पसारा ॥
अंतीं जाशिल रे झरारा । करिं कां पूर्ण विचारा ॥ भज० ॥ २ ॥

---

* जोंपर्यंत हा देह सुस्थितींत आहे आणि जोंपर्यंत मृत्यु दूर आहे तोंच आत्महित साधावें; अन्तकालीं काय करणार ?

आयुष्य जातें रे घडिघडी । तुज विषयांची गोडी ॥
काळ पाडिल रे मुरकुंडी । तैं तुज कोण सोडी ॥ भज० ॥ ३ ॥
विसरुनि भगवंता भगवंता । करशिल घरची चिंता ॥
काळ नेइल रे अवचिता । तंव तूं पडशिल भ्रांता ॥ भज० ॥ ४ ॥
गुंडा केशवीं स्थिर राहे । तरीच तूझी सोय ॥
पाया लागलिया पैं पाहे । अंतीं मोक्षा लाहे ॥ भज० ॥ ५ ॥

२९ अभंग.

देह तंव असे भोगाचे आधीन । याचें सुख सीण क्षणभंगुर ॥ १ ॥
अविनाश जोडी देवापायीं भाव । कल्याणाचा ठाव सकळही ॥ २ ॥
क्षणभंगुर हा येथील पसारा । आलिया आकारा अवघें नासे ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें सकळ विश्रांती । आठवावा चित्तीं नारायण † ॥ ४ ॥

३० अभंग.

क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥ १ ॥
नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ॥ २ ॥
संतसमागमीं धरूनि आवडी । करावी तांतडी परमार्थीं ॥ ३ ॥
तुका म्हणे इहलोकींच्या वेव्हारें । नये डोळे धुरें भरूनि राहों ॥ ४ ॥

३१ पद.

बा किती घालिसी संसृतिचा पिंगा । या मानवदेहीं भज रे श्रीरंगा ॥ ध्रु० ॥
लक्ष चौऱ्याशीं फेरा फिरोनि सारा । बा आलासि येथें नरतनु संसारा ॥
हे पुत्र कोणाचे कन्या आणि दारा । हीं काय मिळविलीं भंवतालीं बारा ॥
अविवेक सुटला तुफान हा वारा । बा कसा उतरसी भवसिंधू पारा ॥
स्त्री म्हणसिल माझी परि ते परावी ।
बा सन्मति आतां कधिं त्वां धरावी ।
ही विषयवासना मनिंची दुरावी ।
यासाठिं सांगतों धरिं सज्जनसंगा । हो सावध नाहिं तरी काळ करिल दंगा ॥ १ ॥

† जयास वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनी लागावें ॥—दा.बो.३.१०.६३.

या जगीं पसरली श्रीहरिची माया । तूं म्हणसी माझीं तनु धन सुत जाया ॥
भ्रांतिनें तपेलें पहासि बुडवाया । ही तुला मिळेल पुन्हा कोठुन काया ॥
बा आशा मनशा मिळोनि आया बाया । बा तुला पहाती सफई बुडवाया ॥

ही रांड दुराशा नको रे धनाची ।
धरिं लज्जा कांहीं आपुल्या मनाची ।
दुर्दशा प्रपंचामधिं रे जनाची ।

बा लोभ देहिंचा बाहेर सुखसंगा । हा आंतून लागला काळभिरड भुंगा ॥ २ ॥
परिणाम आपुला होइल हा कैसा । ज्यासि कळेना तो नर पशु जैसा ॥
हा काम लोभ तुज स्त्रीचा मनिं ऐसा । वांचुनि म्हणती मंचकीं या बैसा ॥
हीं हाडें उगाळुनि देसि जिला पैसा । ती तुला मानिते निजसेवक जैसा ॥

बा मुक्ति तुझीया घरची बुडाली ।
ही विवेकसन्मति सगळी दडाली ।
बा साधुजनामध्यें पत रे उडाली ।

मृगमद टाकुनि करिं घेसी हिंगा । कविराय चतुर परि कली पडला बिंगा ॥
बा किती घालिसी संसृतिचा पिंगा । या मानवदेहीं भज रे श्रीरंगा ॥ ३ ॥

३२ लावणी.

नरजन्मामधिं नरा करुनि घे नरनारायण गडी ।
तरिच सार्थक मानवकुडी ॥ ध्रु० ॥

बा चौऱ्यांशीं लक्ष वेळ संसार पडला गळां ।
चिंतेचा पिकला मळा ॥

दारधनाचा लोभ टाकुनी झडकर हो वेगळा ।
हा कसा उकलिशी पिळा ॥

धनानिमित्तें जनांपुढें तूं दाविसि नाना कळा ।
किति तुला मुलांचा लळा ॥

तूं पडूं नको याचे भरीं ।
तुझ्या हें खापर फुटतें शिरीं ।
तुला मी गोष्ट सांगतों खरी ।
आतां कर तांतडी । ही पुन्हा नये बा घडी ॥ नरजन्मा० ॥ १ ॥
निपट बावळा या विषयाच्या मागें लागसी कसा ।
कां होसि बा वेडापिसा ॥
वयोधनाची किति चंचळ गति कां धरिशी भरंवसा ।
हें सकळ मनाला पुसा ॥
उदरासाठीं दुर्धनिकांच्या पुढें पसरिशी पसा ।
किति उगाळशिल कोळसा ॥
हें तुला शिकविलें कुणीं ।
दयाळू नरनारायण धणी ।
अजूनि तरि करिं ही घोकणी ।
विषवल्लीची जडी । तूं म्हणशिल साखर खडी ॥ नरज० ॥ २ ॥
नवस कामना करुनि मनामधिं म्हणशिल पुरुषोत्तमा ।
दे संतत विपुला रमा ॥
विषयवासना तुला तुटेना मानसिं या संभ्रमा ।
काय पुढें बोलशील अधमा ॥
किती प्रपंचामधें फिरुनियां पावसि विफल श्रमा ।
कां न करिशी भजनोत्तमा ॥
हें कसें तुला भावलें ।
करावी अचळा दारा मुलें ।
मिळेना पुढती हें बाहुलें ।
कविरायाची घडी । दाविल भवार्णवाची थडी ॥ नरज० ॥ ३ ॥

३३ लावणी.

भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयीं बुधा ॥
धरिसि तरि हरिचा सेवक सुधा ॥ ध्रु० ॥

चराचरीं गुरु तरावयाला नरा शिरावरि हरि ।
जरा तरि समज धरीं अंतरीं ॥
हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरीं ।
मठाची उठाठेव कां करीं ॥
वनांत अथवा जनांत हो कां मनांत भलत्या परी ।
हरीचें नांव भवांबुधि-तरी ॥
काय गळ्यांत घालुनी तुळशीचीं लांकडें ।
हीं काय भवाला दुर करितिल माकडें ।
बाहेर मिरविशी आंत हरिशिं वांकडें ।
अशा भक्तिच्या रसासहित तूं कसा म्हणविशी बुधा ॥ धरिसि० ॥१॥
जाळ गळ्यामधिं माळ कशाला व्याळकाम कोपला ।
आंतुनि; बाहेर म्हणविशि भला ॥
वित्त पहातां पित्त येतसे, 'चित्त पाहिजे मला' ।
असें हरि म्हणतो नुमजे तुला ॥
दांभिक वर संभावित अभ्यंतरीं नाहिंस बिंबला ।
बहिर्मुख[1] नर नरका लाधला ॥
तूं पोटासाठीं करिं खटपट भलतिशी ।
परि भक्तिरसाविण हरि भेटेल काय तुसी ।
काय ध्यान धरुनियां गोमुखिला जाळिसी ।
स्वार्थसुखें परमार्थ बुडविला अनर्थ केला सुधा ॥ धरिशि त० ॥२॥
टिळाटोपिवर शिळा पडो या बिळांत करिशी जपा ।
तथापि न होय हरीची कृपा ॥
दर्भमुष्टिच्या गर्भिं धरुनियां निर्भर पशुच्या वपा[2] ।
जाळिशी तिळा तांदुळा तुपा ॥
दंडकमंडलु बंड माजविशि मुंड मुंडशी तपा ।
न सार्थक लटक्या साऱ्या गपा ॥

---

१ ज्याचीं इन्द्रियें विषयांवर लुब्ध आहेत असा.—नवनीत. २ चरबी.

ही बार बार तलवार येइल काय पुन्हा ।
ह्या दुर्लभ नरदेहांत ठेविशी कुन्हा ।
भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा ।
वर्म कळेना धर्म घडेना कर्म चित्त न द्विधा ।
सदा हरि कविरायावर फिदा ॥ भला जन्म हा तुला० ॥ ३ ॥

३४ पद.

नरदेहामधिं येउन नर हो साधन ऐसें करा ।
जेणें भवसागर तरुनि सुखें व्हावें पैलतिरा ॥ ध्रु० ॥
संसारार्णविं भिजा गड्यांनो संसारार्णविं भिजा ।
परंतु परमार्थसाधनातें साधा यांतच मजा ॥
मदमत्सरमीपणासहित द्या तमोगुणाला रजा ।
भाव न ठेवुनी दुजा ॥ गड्यांनो संसारा० ॥
अकपट होउनि थोरलहानां समदृष्टीनें पुजा ।
अन्यायपथें न जा ॥ गड्यांनो संसारा० ॥
सदसद्विचार करुनी लोकीं सत्कीर्तीनें सजा ।
कोणा नच द्या इजा ॥ गड्यांनो संसारा० ॥
परि आश्रय दुःखितांस द्याया तनमनधनें झिजा ।
संकटसमयीं धजा ॥ गड्यांनो संसारा० ॥
सत्य वचन राखण्यास न ढळा कथितों ह्या हितगुजा ।
व्हा सावध नच निजा ॥ गड्यांनो संसारा० ॥
पळ घटका प्रहर दिवस यांहीं आयुष्य होतें वजा ।
जगदीशाला भजा ॥ गड्यांनो संसारा० ॥
अनंतफंदी म्हणे तोचि मग तारिल देउनि करा ॥ नरदेहा० ॥ १ ॥

३५ राममंत्राचे श्लोक.

तुला ही तनू मानवी प्राप्त झाली । बहूजन्मपुण्यें फळालागिं आली ॥
तिला तूं कसा गोंविसी वीषमारे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १ ॥

खुळे हस्तपादादि हे मग्न होती । दिठी मंद होवोनियां कर्ण जाती ॥
तनू कंप, सर्वांगिं होती कळा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ २ ॥
कफें कंठ हा रोध होईल जेव्हां । अकस्मात तो प्राण जाईल तेव्हां ॥
तुला कोण तेथें सखे सोयरे रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३ ॥
तुला येम पाशीं करी बद्ध जेव्हां । कसा कोण तो सोडवी सांग तेव्हां ॥
यमाला कदापी दया ते न ये रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४ ॥
तुझें बाल्य तारुण्य गेलें निघोनी । कळेना कसें लोक जाती मरोनी ।
करीसी मुलांची स्वहस्तें क्रिया रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ५ ॥
नसे सत्य कांहीं दिसे दो दिसांचें । तुला लूटिती चोरटे लोक साचे ।
स्त्रिया पुत्र कामा न येती तुला रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ६ ॥
अधोमूख विष्ठेमध्यें मायपोटीं । पचे पिंड हा सोसुनी दुःखकोटी ।
स्मरेना कसें लाज नाहीं तुला रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ७ ॥
मदें डोलसी बोलसी साधुवृंदा । कसें हीत तूं नेणसी बुद्धिमंदा ।
रिकामाचि तूं गुंतसी वाउगा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ८ ॥
कशी जन्मुनी माय त्वां वांझ केली । कशी लाज वंशा कुळा लावियेली ॥
भुमीभार घोडा पशु हा खरा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ९ ॥
दुराशा नको रे परस्त्रीधनाची । नको तूं करूं नीच सेवा जनाची ।
पराधीन कैसा भला दीससी रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १० ॥
कदापी घडेना व्रतें यज्ञ दानें । नसे द्रव्य गांठीं करावें जयानें ।
घडेना घडे यद्यपी कां फुका रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ११ ॥
रवी जे घडी हाणितो काळ जेव्हां । श्रुती शब्द हे गर्जती तास तेव्हां ।
नको चाउटी वाउगी या जनांशीं । हरीचिंतनीं ध्यान लावीं मनासीं ।
अमोलीक हा काळ जातो वृथा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥१२॥

खंड २ रा समाप्त.

मागणें.



१ अभंग.

देवा माझें मन लागो तुझे चरणीं । संसारव्यसनीं पडों नेदीं ॥ १ ॥
नामस्मरण घडो संतसमागम । वाउगाचि भ्रम नको देवा ॥ २ ॥
पायीं तीर्थयात्रा मुखीं रामनाम । हाचि माझा नेम सिद्धी नेई ॥ ३ ॥
आणिक मागणें नाहीं नाहीं देवा । एका जनार्दनीं सेवा दृढ घेई ॥ ४ ॥

२ पद.

देवा नलगे तुमचें कांहीं हो ।
चंचळ हें मन निश्चळ होउनि विनटो तुमचे पायीं हो ॥ ध्रु० ॥
नलगे गृह धन सुत दारा मज इंद्रपदादि कदाहीं हो ।
तव पदपंकजभजनेंविण मज सर्वहि ते आपदा ही हो ॥ १ ॥
देशी वर जरि तरि तूं आतां याचि स्वरूपें राहीं हो ।
यावच्चन्द्रदिवाकर येथुनि कोठेंही नव जाई हो ॥ २ ॥
दर्शनमात्रें जड मूढ पापी निजपदवी त्यां देई हो ।
शिवतनय तव दीन तयाचे हृदयमंदिरा येई हो ॥ ३ ॥

३ अभंग.

हेंचि देवापें मागत । चरणसेवा अंखाडित ॥ १ ॥
जन्म हो कां भलत्या याती । परी न चुको हरिभक्ति ॥ २ ॥
नामा म्हणे कमळापती । हेंचि द्यावें पुढतापुढतीं ॥ ३ ॥

४ अभंग.

हेंचि सुख पुढें मागतों आगळें । आनंदाची फळें सेवादान ॥ १ ॥
जन्मजन्मांतरीं तुझाचि अंकिला । करूनि विठ्ठला दास ठेवीं ॥ २ ॥
दुजा भाव आड येऊं नेदीं चित्ता । करावा अनंता नास त्याचा ॥ ३ ॥
अभय देऊनि करावें सादर । क्षण तो विसर पडों नेदीं ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही जे जे इच्छा करूं । ते ते कल्पतरू पुरविसी † ॥ ५ ॥

---

† मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोन जातें । कृपा केलिया रघुनाथें । चिंतित येते ॥ १ ॥ —दा. बो. ६.७.३०.

५ अभंग.

नर नारी बाळें अवघा नारायण । ऐसें माझें मन करीं देवा ॥ १ ॥
न यो काम क्रोध द्वेष निंदा द्वंद्व । अवघा गोविंद निःसंदेह ॥ २ ॥
असावें म्यां सदा विषयीं विरक्त । काया वाचा चित्त तुझे पायीं ॥ ३ ॥
करोनियां साह्य पुरवीं मनोरथ । व्हावें कृपावंत तुका म्हणे ॥ ४ ॥

६ अभंग.

नको विद्या वयसा आयुष्य फारसें । नाहीं मज पिसें मुक्तीचेंहि ॥ १ ॥
रामकृष्ण म्हणतां जावो माझा प्राण । हेंचि कृपादान मागतसें § ॥ २ ॥
नको धन मान न वाढो संतान । मुखीं नारायण प्राण जावा ॥ ३ ॥
तुका म्हणे दीन काकुलती येतों । तुज निरवितों पांडुरंगा ॥ ४ ॥

७ पद.

तुजविण रे भगवान । कोठेंचि मन हें न जडो ॥ ध्रु० ॥
मिथ्या ऐसें दिसोनि सकळिक । विषयसुख नावडो ॥
प्रारब्धास्तव जें जें समयीं । घडेल तें सुखिं घडो ॥ तुज० ॥ १ ॥
योगलक्षण निजधैर्यबळें । जड जीव मोहांत न सांपडो ॥
आयुष्य सरल्यावर मग केव्हां । देह पडेल तेथें पडो ॥ तुज० ॥ २ ॥
वैराग्यज्ञानें प्रचंड होउनि । अखंडित वाक्य कडकडो ॥
प्रपंचरहाटीं वर्तत असतां । कोणिकडे न अडो ॥ तुज० ॥ ३ ॥

---

§ खालील गीतेच्या सिद्धान्तावरून तुकोबांच्या सदरील मागण्यांतील मर्म लक्षांत येईल—

अंतकाले च मामेव स्मरन् मुक्त्वा कलेवरम् ।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥ १ ॥
यं यं वाऽपि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम् ।
तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥ २ ॥

(१) जो अंतकाळीं माझेंच स्मरण करीत देह सोडितो तो माझ्या स्वरूपाला येऊन पोंचतो यांत संशय नाहीं. (२) अथवा हे कौंतेया, सदा म्हणजे जन्मभर त्यांतच रंगून गेल्यामुळें मनुष्य ज्या ज्या भावाचें स्मरण करीत अखेरीस देह सोडितो, त्या त्याच (भावाला) तो (पुढें) जाऊन पोंचतो (गी. ८.५-६).

म्हणे सोहिरा विपरित बुद्धी । कुसंग हा विघडो ॥
निमिष साधुनि कैवल्यब्रह्मिंचें । मोक्षद्वार उघडो ॥ तुज० ॥ ४ ॥

८ पद.

अनलस मी तुज नित्य भजावें ॥ ध्रु० ॥
नित्य भजावें, नित्य नमावें, नित्य शरण तुज जावें ॥ अन० ॥१॥
नित्य सुखाचा लाभ पदीं तव, सत्वर हें उमजावें ॥ अन० ॥ २ ॥
भक्तिलतेचें देवा माझ्या चित्तीं बीज रुजावें ॥ अन० ॥ ३ ॥

९ अभंग.

हेंचि व्हावी माझी आस । जन्मोजन्मीं तुझा दास ॥ १ ॥
पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदीं हरी ॥ २ ॥
संतसंग सर्व काळ । अखंड प्रेमाचा सुकाळ ॥ ३ ॥
चंद्रभागे स्नान । मागे हेंचि तुका दान ॥ ४ ॥

१० श्लोक.

सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो ।
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ॥
संद्घ्रिकमळीं दडो, मुरडितां हटानें अडो ।
वियोग घडतां रडो मन भवच्चरित्रीं जडो ॥ १ ॥
न निश्चय कधीं ढळो, कुजनविघ्नबाधा टळो ।
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्तमार्गीं वळो ॥
स्वतत्त्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो ।
पुन्हा न मन हें मळो, दुरित आत्मबोधें जळो ॥ २ ॥

११ पद.

श्रीरंगा, दे मजला सत्संगा । आलों शरण तुला ॥ ध्रु० ॥
रघुनाथा, आवडो तव गुणगाथा ॥ आलों० ॥ १ ॥
गोविंदा, सोडविं विषयच्छंदा ॥ आलों० ॥ २ ॥
स्वानंदा, विसरविं विषयच्छंदा ॥ आलों० ॥ ३ ॥
श्रीकृष्णा, दूर करीं धनतृष्णा ॥ आलों० ॥ ४ ॥

रघुराया, आवरिं आपुली माया ॥ आलों० ॥ ५ ॥
गोपाळा, उघडीं चिन्मयडोळा ॥ आलों० ॥ ६ ॥
श्रीरामा, दे मज भजनप्रेमा ॥ आलों० ॥ ७ ॥
घनश्यामा, नेईं मज निजधामा ॥ आलों० ॥ ८ ॥
भगवंता, तारीं विठ्ठलपंत ॥ आलों ० ॥ ९ ॥

१२ अभंग.

इतुलें करीं देवा ऐकें हें वचन । समूळ अभिमान जाळीं माझा ॥ १ ॥
इतुलें करीं देवा ऐकें हे गोष्टी । सर्व समदृष्टी तुज देखें ॥ २ ॥
इतुलें करीं देवा विनवितों तुज । संतचरणरज वंदीं माथां ॥ ३ ॥
इतुलें करीं देवा ऐकें हे मात । हृदयीं पंढरीनाथ दिवसरात्रीं ॥ ४ ॥
भलतिया भावें तारीं पंढरीनाथा । तुका म्हणे आतां शरण आलों ॥ ५ ॥

१३ पद.

इतुकें दे मजला दे मजला । मागतसें हरि तुजला ॥ ध्रु० ॥
संतसमागमजोडी । माझी मीपण-वाट मोडीं ॥ इतुकें० ॥ १ ॥
संतसमागम अर्चा । सारासारज्ञानचर्चा ॥ इतुकें० ॥ २ ॥
संत घराप्रति येती । भक्तीभावें पुजीन त्यांसी ॥ इतुकें० ॥ ३ ॥
भगवद्भजनीं जागो । तुझिये स्वरूपीं लक्ष लागो ॥ इतुकें० ॥ ४ ॥
हेंचि मागणें मागें । भावें केशव चरणा लागे ॥ इतुकें० ॥ ५ ॥

१४ पद.

पोटापुरतें देई । मागणें लयि नाहीं लयि नाहीं ॥ ध्रु० ॥
पोळी साजुक अथवा शिळी । देवा देइं भुकेच्या वेळीं ॥मागणें०॥१॥
वस्त्र नव अथवा जुन । देवा देईं अंग भरून ॥ मागणें० ॥ २ ॥
देवा कळणा अथवा कोंडा । आम्हां देइं भुकेच्या तोंडा ॥ मागणें० ॥३॥
तुका म्हणे आतां । नका करूं पायापरता ॥ मागणें लयि० ॥ ४ ॥

१५ अभंग.

चित्तीं तुझे पाय डोळां रूपाचें ध्यान । अखंड मुखीं नाम तुमचे वर्णावे गुण ॥१॥
हेंचि एक तुम्हां देवा मागणें दातारा । उचित तें करा भाव जाणूनी खरा ॥२॥

खुंटलें जाणीव माझें बोलणें आतां । कळों यावी तैसी करा बाळाची चिंता॥३॥
तुका म्हणे आतां नको देऊं अंतर । न कळे पुढें काय बोलूं विचार ॥ ४ ॥

१६ अभंग.

आतां मागतों तें ऐक नारायणा । भावपूर्वक मनापासूनियां ॥ १ ॥
असों दे मोकळी जिव्हा जरि गाइल गुण । नाहीं तरी खिळून टाकीं परती॥२॥
मातेचिया परी देखती परनारी । ठेवीं नेत्र तरी नाहीं तरी नको ॥ ३ ॥
तरी बरें कांटाळा करिती निंदास्तुतीचा । नाहीं तरी कांनाचाही देख प्रेत्न ॥ ४॥
सकळ इंद्रियांचा निग्रह करूनि एक । राखावीं पृथक तोडोनि भ्रम ॥ ५ ॥
तुकयाबंधु म्हणे तेचि वाट प्राणां । पडतां नारायणा विसर तुझा ॥ ६ ॥

१७ अभंग.

माझें प्रेम तुझे पायीं । राहे ऐसें करीं कांहीं ॥ १ ॥
मागणें तें हेंचि मागों । आणिका न लागों छंदासी ॥ २ ॥
काया वाचा आणि मन । केलें समर्पण तव चरणीं ॥ ३ ॥
हाचि माझा निर्धार । म्हणे नरहरी सोनार ॥ ४ ॥

१८ अभंग.

काय मागावें कवणासी । ज्यासी मागों ते मजपासीं ॥ १ ॥
जरी मागों पद इंद्राचें । तरी शाश्वत नाहीं त्याचें ॥ २ ॥
जरी मागों ध्रुवपद । तरी त्यासी येथील छंद ॥ ३ ॥
स्वर्गभोग मागों पूर्ण । पुण्य सरल्या मागुती येणें ॥ ४ ॥
आयुष्य मागों चिरंजीव । जीवा मरण नाहीं स्वभावें ॥ ५ ॥
तुका म्हणे एक मागें । एकपणा नाहीं भंग ॥ ६ ॥

१९ अभंग.

शेवटींची विनवणी । संतजनीं परिसावी ॥ १ ॥
विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हांसी ॥ २ ॥
पुढें फार बोलों काई । अवघें पायीं विदित ॥ ३ ॥
तुका म्हणे पडिलों पायां । करा छाया कृपेची ४ ॥

विज्ञप्ति.

संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें । काय म्यां गव्हारें जाणावें हें ॥ १ ॥
तुका म्हणे मज बोलवितो देव । अर्थ गुह्य भाव तोचि जाणे ॥ २ ॥

१ अभंग.

कांहीं बोलिलों बोबडें । मायबापा तुम्हांपुढें ॥
सलगी लाडें कोडें । मज क्षमा करावी ॥ १ ॥
काय जाणावा महिमा । तुमचा म्यां पुरुषोत्तमा ॥
आवडीनें सीमा । सांडविली मजहातीं ॥ २ ॥
घडे अवज्ञा सख्यत्वें । बाळें बापासी न भ्यावें ॥
काय म्यां सांगावें । आहे ठावें तुम्हांसी ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । प्रेम लोभ न सांडावा ॥
पाळिला पाळावा । लळा पुढती आगळा ॥ ४ ॥

२ अभंग.

बोलिलीं लेंकुरें । वेडीं वांकुडीं उत्तरें ॥ १ ॥
करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ॥ २ ॥
नाहीं विचारिला । अधिकार म्यां आपुला ॥ ३ ॥
तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पायांपें किंकरा ॥ ४ ॥

३ अभंग.

पायांच्या प्रसादें । कांहीं बोलिलों विनोदें ॥ १ ॥
मज क्षमा करणें संतीं । नव्हे अंगभूत युक्ति ॥ २ ॥
नव्हे हा उपदेश । तुमचें बडबडिलों शेष ॥ ३ ॥
तुमचे कृपेचें पोसणें । जन्मोजन्मीं तुका म्हणे ॥ ४ ॥

४ अभंग.

बोलिलों जैसें बोलविलें देवें । माझें तुम्हां ठावें जातिकुळ ॥ १ ॥
करा क्षमा कांहीं नका धरूं कोप । संत मायबाप दीनावरी ॥ २ ॥
वाचेचा चाळक झाला दावी वर्म । उचित ते धर्म मजपुढें ॥ ३ ॥
तुका म्हणे घडे अपराध नेणतां । द्यावा मज आतां ठाव पायीं ॥ ४ ॥

५ अभंग.

नेणें अर्थ कांहीं नव्हती माझे बोल । विनवितों कोपाल संत झणीं ॥ १ ॥
नव्हती माझे बोल बोले पांडुरंग । असे अंगसंगें व्यापूनियां ॥ २ ॥
मज मूढा शक्ति कैंचा हा विचार । निगमादिकां पार बोलावया ॥ ३ ॥
रामकृष्ण हरी मुकुंद मुरारी । बोबड्या उत्तरीं हेंचि ध्यान ॥ ४ ॥
तुका म्हणे गुरुकृपेचा आधार । पांडुरंगें भार घेतला माझा ॥ ५ ॥

६ अभंग.

बोलविलें जेणें । तोचि त्याचें गुह्य जाणे ॥ १ ॥
मी तों काबाडाचा धनी । जेवूं मागावें थिंकोनी ॥ २ ॥
मजुराच्या हातें । माप केलें झालें रितें ॥ ३ ॥
झाला पुरविता । पांडुरंग माझा पिता ॥ ४ ॥
मायबापासवें । बाळें कौतुकें खेळावें ॥ ५ ॥
जैसा करिती धंदा । तैसा पडोनियां छंदा ॥ ६ ॥
त्याच्या साच गाई म्हैसी । येणें खेळावें मातीशीं ॥ ७ ॥
तुका म्हणे बोल । माझा बोलतो विठ्ठल ॥ ८ ॥

७ अभंग.

करविली तैसी केली कटकट । वांकडें कीं नीट देव जाणे ॥ १ ॥
कोणाकारणें हें जालेंसें निर्माण । देवाचें कारण देव जाणे ॥ २ ॥
तुका म्हणे मी या अभिमानावेगळा । घालूनी गोपाळा भार असें ॥ ३ ॥

प्रार्थना.

१ अभंग.

आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा । माझिया सकळां हरिच्या दासां ॥ १ ॥
कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं । ही संतमंडळी सुखी असो ॥ २ ॥
अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासां भाविकांसी ॥ ३ ॥
नामा म्हणे तयां असावें कल्याण । ज्यां मुखीं निधान पांडुरंग ॥ ४ ॥

२ श्लोक.

सर्वे सन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखभाग्भवेत् ॥ १ ॥ *

३ ओंव्या.

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ॥
तोषौनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १ ॥
जे खळांची वंकटै[2] सांडो । तयां सत्कर्मीं रति वाढो ॥
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ २ ॥
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ॥
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥
वर्षतें सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांचीं मांदियाळी[3] ॥
अनवरत[4] भूतळीं । भेटतु भूतां ॥ ४ ॥
चलां[5] कल्पतरूचे आरव[6] । चेतना[7]चिंतामणीचे गांव ॥
बोलते जे अर्णव । पीयूषाचे[8] ॥ ५ ॥
चंद्रमे जे अलांछन[9] । मार्तंड[10] जे तापहीन ॥
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥
किंबहुना सर्वसुखीं । पूर्णा होऊनि तिहीं लोकीं ॥
भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥ ७ ॥

॥ ॐ तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु ॥

॥ शान्तिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु ॥

---

* सर्व सुखी असोत; सर्वांस आरोग्य असो; सर्वांचें कल्याण होवो; कोणालाहि दुःख प्राप्त न होवो.

१ ग्रंथरूप यज्ञानें. २ वक्रदृष्टि. ३ मेळे, समुदाय ४ एकसारखे. ५ चालत्या. ६ अंकुर. ७ चैतन्ययुक्त, सजीव. ८ अमृताचे, ९ डाग नसलेले. १० सूर्य.

पद्यांची वर्णानुक्रमणिका.



टीप—पहिल्या खंडांतील पद्यें प्रारंभीं दिलेल्या विषयानुक्रमणिकेवरून सहज सांपडण्यासारखीं असल्यामुळें, खालील यादींत दिलीं नाहींत. पहिला आंकडा पृष्ठाचा असून, मधल्या ओळीपुढील आंकडा अनुक्रमाचा आहे. ज्याच्या पुढें एकच आंकडा आहे तें पद्य प्रकरणाच्या किंवा भाग–पोटभागाच्या प्रारंभीं, तळीं टीपेंत, किंवा गद्य भागांत मिळेल.

अ.

ॐकारस्वरूपा सद्गुरु ... २५४।७
अखंड वाचे नाम ... १९६।१०
अगा करुणाकरा ... १२४।१५
अंगीकार ज्याचा ... ९५।२
अंगीं ज्वर तया ... ३०४
अग्निकुंडामाजी घातला ... १६१।१
अग्निमाजी गेलें ... २४१।१२
अणुमाजी राम ... ४६।२
अतर्क्य महिमा...३५।१... केका२७
अंतरशुद्धीचें कारण ... १९३
अंतरींचा भाव ... १५३।४०
अंतरींची घेतो गोडी ... ८४।१
अंतरींचें ध्यान ... ५४।१
अंतरीं निर्मळ ... २१५।११
अद्वैतीं तों नाहीं ... १७१।१
अधीरा माझ्या मना ... १६७।६
अध्यापनमध्ययनं ... २५८
अनन्य शरण रिघा ... ९२।२
अनन्याश्चिंतयन्तो मां ... १६२।१
अनलस मी तुज ...३५।८...पाळंदे.
अनाथाचा नाथ ... १३९।९
अनुदिनिं अनुतापें ... १३६।१
अन्नाच्या परिमळें ... ९३।१
अपहृत्यार्तिमार्तानां ... ३३८
अपि चेत्सुदुराचारो ... ९४
अब तुम कब ... ... ३४९।२४
अभिमानासाठीं ... ... २७२।१५
अभिमानें २७२।१४...दा.बो.१.१.२३.
अरे कान्हा अरे ... ... २९४।३६
अर्जुना इतर ... ... ८५।६
अवघाचि संसार... ... १०१।५
अवघीं रूपें तुझीं ... २७४
अवघेंचि त्रैलोक्य ... १४८।१६
अवघे ते दैवाचे ... ... ५६।१७
अवघें पोटासाठीं. २३१. गा. २६२५.२
अवघ्या पातकांची ... १३६।१५
अशी ही थट्टा ... ... ३००।४
असंख्य दिसती ३८।१२... पाळंदे.
असा घराश्रमीं ... २५८।५
असा धरिं छंद ... ... ९२।२
असाल तेथें नामाचें ... २००।३
अहंकार खवळल्या ... २७२
अहो येतां जातां ...२००।५...वामन.
अज्ञान बाळक ... ... १७५।३

आ.

आकल्प आयुष्य ... ३६१।१
आकाशअंत...१८२।२...ना.सु.१.१.५
आकाशात्पतितं तोयं ... ५०।१
आगी लागो तया ... ७५।१२
आजिवरी तुम्हां ... ... १४२।४
आजी सोनियाचा ... २४०।९
आडलिया जना ... ... ४२।१०
आणीक कोणापुढें ... १२७।२९
आणीक दुसरें ... ८३।६
आतां आम्हां भय ... १५१।३०
आतां आम्हां हेंचि ... १५१।३३
आतां केशीराजा ... २६१
आतां तरी पुढें ... ... ३०३।४
आतां तुज कळेल... ... १३५।१४
आतां तुम्ही कृपा... ... २४७।७
आतां देवा ऐसा... ... ११४।५
आतां नव्हे गोड ... ... १५०।२७
आतां मागतों तें... ... ३६१।१६
आतां माझ्या भावा ... ८१।१
आतां मी सवर्था ... १४९।२३
आतां वंदीन.२११।४...दा.बो.१.५.१
आतां विश्वा.३६४।३...ज्ञा.१८.१७९४
आतां सर्वभावें ... ... २०१।२
आतां होईं माझे... ... ११३।१
आत्मस्थिती मज नको ... ७२।२
आदि वर्तमान ... ... ११९।६
आंधळ्यासी जन... ... ३०४।१
आधिल्या भ्रतारें... ... १४२।३
आधीं कष्टाचें ३२०
आनंदरस हा ... ... १५५।५
आनंदाच्या कोटी ... १४८।१८
आपणचि एक दुजा ... १४५
आपण यथेष्ट२८९।३१.दा.बो.१२.१०.१
आपुलिया बळें... ... ४३।१३
आपुलें मरण ... ... १५४।२
आपुल्या माहेरा ... १००।१
आंबेकेळद्राक्षघड्डू ... १८३।४
आम्ही जातों आपुल्या ... २२६।२
आम्ही पातकांची राशी ... १३५।१३
आम्ही बळवंताच्या दासी... १५७।७
आम्ही मेलों तेव्हां ... १५५।४
आम्ही हरिचे हरिचे ... १५७।४
आला भागासी तो ... २६१।८
आलिंगन घेंड ... ... २३८।२
आलिया भोगासी ... १६०।२
आली सिंहस्थ पर्वणी ... २३४।२३
आलें देवाचीया मना ... ४९।२
आले संत पाय ... ... २४०।७
आवडीनें भावें ... ... १६६।३
आवडे हें रूप ... ... ९८।४
आळवितां कंठ ... ... १२३।१०

इ.

इतुकें दे मजला ... ३६०।१३
इतुलें करीं देवा ... ३६०।१२
इन्द्रियाणां प्रसंगेन ... २९९
इन्द्रियांसी लाड ... ... २९९।१

इन्द्रियें कोंडितां ६४।१...ए.भा.२.२९३
इस तनधनकी ... ... ३४७।१६

उ.

उंच नीच कांहीं... ... ८८।११
उजळलें भाग्य आतां ... १४४।२
उडाली पक्षिणी ... ... २६०।५
उत्तम जन्मा येउनि ... ११६।१
उदंडाचें उ.१८०।२७.दा. बो.१५.६.११
उदार कृपाळ ... ... १६३।४
उदार तुम्ही संत ... २२०।३०
उदासीन हे वृत्ति ... १३९।३
उद्धरेदात्मनात्मानं ... २६५
उपासासेवटीं अन्नासवें ... ११३।२
उपेक्षितां माये कोठें ... १२४।१६

ए.

एक धरिला चित्तीं ... १५३।४१
एकपणें पाहतां सृष्टी ... १७९।१
एक भाव चित्तीं ... १६६
एकविध आम्ही न ... ८३।९
एकं सद्विप्रा बहुधा ... ५०
एका जीवें आतां ... १४३।१३
एथें कोणाचें काय ... २६६।४
एवढा संकोच तरि ... १२१।३
ऐका ऐका वचन ... १८४।८
ऐका महिमा आवडीची ... ८९।१५
ऐका साधूचीं २१२।५दा.बो.८.९.२३.
ऐसी विठाई माउली ... ४२।७
ऐश्वर्यस्य...४०...विष्णुपुराण६.५.७४.
ऐसा सर्व भाव... ... ८४।१०
ऐसें असावें संसारीं ... २६२।११
ऐसें भाग्य कई ... ... ११६।१४

क.

कई ऐसी दशा ... ... ११४।६
कठिण समय येतां ... ३४५
कथं विना रोमहर्षं ... ९६
कथा सुख करी ... ... १९५।५
कथा हें भूषण ... ... ९५।४
कन्या सासुऱ्यासी जाये ... १०६।३
कर कटावरी ... ... १११।२२
करविली तैसी ... ... ३६३।७
करावी ते पूजा ... ... ५६।७
करितां देवार्चन २४९
करूं याची कथा ... ... १५८।१२
कर्तव्य कर्म पहिलें ... ५८
कर्ता एक देव तेणें ... ४७।२
कल्याणानां निधानं ... १८२
कवणापाशीं भांडों ... १३२।२
कवतुकवाणी बोलतसें ... १०२।२
कळेल हें तैसें ... ... ५६।८
कळों आली माव रे ... ८६।८
कां गा न येसी ... ... १२८।३२
कां जी आम्हां होतें ... १३२।३
कान फाडूनियां ... ... २३०।८
काम क्रोध आम्ही ... १४८।१९
कामिनीसी जैसा... ... ८०।८
काय करावे ते ... ... ७४।११
काय तुझें वेचे मज ... १०५।९

काय तुमची यास ... १०४।७
काय ते विरक्ति... ... २०२।३
काय न करी विश्वं ... ७९
काय नव्हे केलें ... ... १८५।१६
काय पाहतोसी ... ... १२६।२१
काय बा करिसी ... २२९।२
काय मागावें ... ... ३६१।१८
काय माझा आतां ... १२५।१७
काय वाणूं मी या ... २२०।२९
काय वाणूं आतां न ... २२१।३३
काया वाचा आणि ... २०३
काया वाचा मन ... १७६
काया-वाचा-मनें झाला... १५९
कायें करूनी करीं वंदा ... २६२।९
कायेन वाचा मन ... ६३।२
कां रे नाठविसी ... ... १६९।१२
कां वो रामराये... ... १०२।१
कासया गा मज घातलें... २३७।८
कासया गुणदोष... ... २३७।९
कासया पाषाण पूजीती ... २३४।२४
कांहीं बोलिलों बोबडें ... ३२१।१
काळ चोर ...३४२...वामन.
काळ जातो ... ... ३५०।२७
काळ वेळ नसे ... ... २००।३
किती पाहू ... ... ३४७।१७
कीर्तन ऐकावया... ... ११०।१७
कुमुदिनी काय जाणे ... १९२।१
कुरंगी पाडस ... ... १२४।१४
कुळींचें दैवत ज्याचें ... २४४।५
कृपावंत किती ... ... १६२।२
कृपाळू म्हणोनि बोलती ... १२०।१९
कृष्ण गातां गीतीं ... २०४।७
कृष्ण माझी माता ... १७४।७
केला अंगीकार ... ... १४९।२२
केला मातीचा पशुपती ... ५१।१
केला राम धणी... ... १५२।३६
कैसी करूं तुझी सेवा ... ११७।२
कैसी समचरणांची ... १४५।६
कैसें करूं ध्यान कैसा ... ११८।३
कोटी जन्म घेइन देवा ... ७३।४
कोठें गुंतलासी ... ... १२५।१९
कोठें गुंतलासी ... ... १२५।२०
कोण आम्हां पुसे ... १२१।२
कोण समयो. ३४३।४दा.बो.३.१०.३९.
कोणाचें मनोगत ... २९०।३२
कोणी नाहीं रे ... ३४४।५
कोणी निंदा कोणी वंदा... १७७।६

ख.

खरें बोले तरी ... २६७

ग.

गंगा गेली सिंधूपासीं ... ९३३।२
गंगाजळा पाहीं पाठी ... २१६।१३
गति अधोगति मनाची ... ३०१।१
गर्भी असतां बाळा ... १६९।१४
गळां घालोनियां माळा ... २३३।२१
गाऊं नाचूं परमानंदें ... १९७।१७

गाऊं नेणें कळाकुसरी ... ५७।११
गातो एका ध्यातो एका ... १८०।३
गायनाचे रंगीं ... ... १८६।२१
गावोनियां मधुर हें ... १८६
गुरुकृपा-अंजन ... ४६।३
गोड नांवें क्षीर ... ६६।६
गोडपणें जैसा गूळ ... १८१।७
गोणाई राजाई दोघी ... ११९
गोविंद गोविंद ... ... २०४।५
गोविंदा तूं जळ मी ... १७२।४

घ.

घडि घडि घडि ... ... १२७।२७
घेईं घेईं माझे वाचे ... २९७।१
घेतां नाम विठोबाचें ... १९७।१४
घेसी तरी घेईं ... २२०।२८
घोंटवीन लाळ ... ६९।१
घ्या हरिच्या ... ३४८।२१

च.

चक्रवाक पक्षी वियोगें ... १०६।२
चंदनाचा शूळ ... २९५
चंदनाचे हात पायही ... २१५।१२
चंदनाच्या वासें ... २३७।१०
चला पंढरीस जाऊं ... १०१।७
चातुर्याचे योगें ... २३३।१८
चाल घरा उभा राहें ... १०४।६
चाले हें शरीर ... ... ४८।३
चिंतन चित्ताला ... २०३।२
चिंतनासी नलगे ... १९९।१
चित्त शुद्ध तरी शत्रु ... ३०३।२
चित्त समाधाने ... ३०३
चिंता ऐसी नको ... ३०६।३
चिंता नाहीं गांवीं ... २१८।२३
चिंता सर्वांची हरिला ... १६८।११
चित्तीं तुझे पाय ... ... ३६०।१५
चुकल्या जनासि कोणी ... २२२
चोरासंगतीनें गेला ... २९९।२

ज.

जगत्रीजीवना अगा ... १३१।१०
जडजीवातें उद्धरी ... १९७।१८
जननी हे जाणे ... ... १७७।३
जन मानवलें वरी ... २३६।४
जन हें सुखाचें ... ... ३४४।७
जन्मतां शरीर न ... २१६।१५
जन्ममरणांची कायसी ... १५९।१३
जन्ममरणांची विसरलों ... १५१।२९
जन्मा आलों त्याचें ... १४९।२४
जन्मा येऊनि कां रे ... १९१।१
जन्मोजन्मीं आम्हीं ... ८३।८
जप तप कर्म क्रिया ... ६८।१०
जप तप ध्यान नलगे ... २०२।४
जय जयाजी स. २४९।१.दा.बो. ५.१.१.
जय जयाजी२५३।४...दा.बो. १.४.८.
जयांचा ईश्वरीं जिव्हाळा ... ७४
जयास वाटे ३५१
जरा कर्णमूळीं ... ... ३४८।२०
जरि बोबडें पित्याचें ... १०३
जरि हे आड येती ... १२२
जरी असे दुराचारी ... ९४।१
जरी झाला वेदशास्त्र ... ६६
जरी माझी कोणी ... २९८।६

जळो ते जाणीव ... ८०।१२
जळो तैसा प्रेमरंग ... २३५।२८
जाऊं देवाचिया गांवा ... १०२।८
जाऊनियां तीर्था ... २३३।२२
जाणतें लेंकरूं २७२
जाणे त्याचें वर्म... ... २४२।३
जाणे भक्तीचा जिव्हाळा... ७४।१०
जाणों हरिचे पाय ... ७१।१०
जाणोनि नेणतें करीं ... २६०।४
जातिहीन चोखामेळा ... ९०।१६
जाली होती काया ... १५४।४३
जालें पीक आम्हां ... १४९।२१
जिचें पीडे बाळ... ... २४६।२
जितुकें काहीं आपणासी... २२२
जिव्हा रस चाखी ... ४७।१
जिहे कीर्तय केशवं ... २९७
जीवन्तु मे शत्रुगणाः ... ३२४
जीवाचा शिव जाहला ... १५३।३८
जे कां रंजले गांजले ... २२१।३४
जे गाती अखंड... ... २४३।२
जे जे कांहीं मज... ... १२३।११
जें जें जेथें पावे... ६२ ...तुकाराम.
जें जें लिहिलें ... ... ३१६।६
जेणें घडे नारायणीं ... ७७।१
जेणें तुज जालें रूप ... १७२।२
जेणें माझें चित्त ... ... ११६।१३
जेथें जातों तेथें तूं ... १६३।५
जेथें देखें तेथें उभा ... १४८।१७
जेवीं पर पुरुषीं.२६१।७ भ. वि. १०.४४
जेव्हां राहीं वाटे... ... २१५
जैशी अभिरुचि ७१
जैसा देवाचे ठायीं ... २५४
जैसें तैसें बाळ मातेसी ... २४७।५
जैसें तैसें राहे ... ... १७५।२
जो कायावाचामनें.२५२।३ए भा.३.२९७.
जोडोनियां कर ११६
जोडोनियां धन उत्तम ... २६४।२
जो तुम तोडो पिया ... १७२।५
जो दुसऱ्यावरी २८१
जो ब्रह्मज्ञान ...२५१।२ दा.बो.५.२.९
जो भक्तांचा विसांवा ... ४१।६
जो शुष्क काष्ठ स्वयें ... १०२
जो श्रुति स्मृति...६७।७ए.भा. २.३२९
जो सर्वां भूतांचे...२०५।१ज्ञा.१२.१४४
ज्याचा सखा हरी ... १६४।८
ज्याचे गर्जतां पवाडे ... १९५।७
ज्याचें जया ध्यान ... २०३।३
ज्यांनीं बिट्ठलमात्रा ... १९९।२४
ज्यासी करणें ... ... ३०४।६

झ.

झणिं दृष्टि लागे ... ९९।६
झाला प्रेतरूप ... ... १५५।३
झाली संध्या ... ... १४६।९
झालें बाई वेडी ... ... २५५।१०

ट.

टिळा टोपी ... ... २३०।४

ठ.

ठेवा जाणीव गुंडून ... ९४।३

त.

तत्सुखं सात्विकं यत् ... ३३९
तरिच जन्मा यावें ... ७६।१५
तरी संत म्हणवावें ... २१७।२०
तस्माद्गुरुं प्रपद्येत ... २४९
तीर्थ जळ देखे ... २२७।३
तीर्थें केलीं व्रतें ... २३०।५
तुका म्हणे आम्ही ... १६५
तुका म्हणे गाई ... १०५
तुका म्हणे नरकीं ... २७३
तुका म्हणे पुन्हा ... ९९
तुका म्हणे व्हावें ... ४१३
तुका म्हणे सर्व भाव ... ११४
तुका वेडा अविचार ... २२३।४१
तुजऐसा कोण उदा ... ८५।५
तुज करितां नोहे ... ७७
तुज पाहतां सामोरी ... ९९।८
तुज पाहावें हे ... ... ११९।८
तुज मज नाहीं भेद ... १८०।६
तुज मागणें तें देवा ... ७३।६
तुज म्हणतील कृपेचा ... १२४।१३
तुजलागीं झाला जीव ... १०६।४
तुज वर्णी ऐसा ३५
तुजविण आम्हां कोण ... १२४।१२
तुजविण मज कोण ... ११२।२४
तुजविण रे भगवान ... ३५८।७
तुजविण वाणी ... ... २९८।४
तुझा दास ऐसें म्हणती ... १३०।४
तुझा दास मज म्हणती ... १३०।८
तुझा म्हणवून ... ... १३३।१
तुझा विसर नको... ... ११५।१२
तुझा शरणागत ... ... १२९।३
तुझिया सत्तेनें ... ... ४८।४
तुझी नाहीं केली सेवा ... ३६।३
तुझे दारींचा कुतरा ... १२६।२३
तुझे पाय माझे ... ... ४८।५
तुझें प्रेम माझ्या... ... १०५।१०
तुझ्या नामाची आवडी ... २०२।६
तुटे भवरोग ... ... १९६।१२
तुम्ही संत मायबाप ... २२०।३२
तुला ही तनू ... ... ३५५।३५
तूं तो राम ... ... ३४९।२२
तूं माउलीहून ... ... ४१।४
तूं माझा मायबाप ... १३५।१२
तूं माझा यजमान ... १६९।१३
तूं माझी माउली तूं ... १२६।२५
तूं माझी माउली मी ... १७६।६
तेंचि एक संत ... ... २१५।९
तेंचि संत तेंचि संत ... २१४।६
तेणें तुझी काय १६६
तेथें नाहीं रीघ १५८
ते मज निरवधि... ... २१०।२
तें मन निष्ठुर कां ... १२९।३४
तेलणीशीं रुसला वेडा ... २६५।३
तैसा हृदयामध्यें मी राम... ४४
तैसे नव्हों आम्ही ... १६०।१७
तो नर भला भला रे ... २२४।४५
त्यांचिया चरणा माझें ... २४४।७
त्रिविधं नरकस्येदं ... २६८।६
त्रैलोक्य पाळितां ... १६८।९

त्रैविद्या मां ... ... ६७।८
त्वमेव माता ... ... १७३।१
त्वरें धांवोनियां ... ... १०३।४

थ.

थोर ती पाहिजे... ... ७९।७
थोर संत म्हणोनी ... २३३।२०

द.

दया तिचें नांव २७०
दया ते ऐसी...२७०।१०ज्ञा.१६.१५४
दयाब्द वळशील... ३७।१० केका२०
दया क्षमा शांति ...२६८...तुकाराम.
दर्पणासी बुजे ... ... ३०५।२
दर्शनासी कां गा... ... १११।२१
दह्याचिये अंगीं ... ... २२७।२
दाखविं तव दिव्य ... १०७।७
दाटूनि निश्चळ...२६८।४ए.भा.७.१३५
दास झालों हरिदासांचा... २१८।२२
दासाची संपत्ती ... ... १७३।३
दासां दुःख देखों ... १६३
दासां सर्व काळ... ... १५८।११
दिक्कालाद्यनवच्छिन्ना ... ३५
दिला जीवभाव ... ... १७८।८
दीननाथा तुझीं ... ... ४३।११
दुःखावांचुनि सौख्यलाभ... ३२०
दुजा ऐसा कोण ... ... १४३।११
दुर्जनाचे घरीं ... ... २३२।१५
दुर्बुद्धि ते मना ... ... ७१।११
दुष्ट आचरण ... ... १३५।११
दुसरियाचे दुःखें ... ... २२१।३५
देई प्रेम मजला ... ... ७१।९
देखोनियां तुझ्या ... ९८।३
देव अंतरींच राहे... .. ४७।७
देव आमचा आमचा ... ४२।९
देव कैंचा तया ... १२१... तुकाराम.
देव कोणासी. ३९।१ दा.बो. ८.१.१६
देव जवळी अंतरीं ... ४५।६
देव तोचि संत ... २४३।१
देव पाहूं जातां ... १४५।७
देवपूजे ठेवितां भावो ... १८१
देव भक्तालागीं ... ६१।७
देव भावाचा लंपट ... ८४।३
देव माझा मी ... १४४।४
देव राखे तया ... १६५।१०
देव सखा आतां ... १६५
देव सखा जरी ... १६५।९
देव सर्वां ठायीं वसे ... ४६।५
देवा ऐकें हे ... १९२।२
देवाचिये पायीं ... ३०६।४
देवाचिये माथां ... २६०।३
देवाची जतन ...१६१...तुकाराम
देवाची पूजा हे ... २१७।१९
देवा नलगे तुमचें ... ३५७।२
देवा माझें मन ... ३५७।१
देवास वोळखों जातां ... १४५
देवासी अवतार ... १७२।३
देह जावो अथवा ... ८१।१३
देह तंव असे ... ३५१।२९
देहबुद्धया तु दासोऽहं ... १७१
देहभाव आम्ही ... १७७।२
देहभाव सर्व जाय ... २१७

देहीं असोनियां देव ... ४४।२
देहींच देव असुनी ... ४५।३
देहीं वर्तमान असतां ... २१७
दोघे सारिखे सारिखे ... ५१।५
दोन अभंग शिकला ... २३२।१४

ध.

धनवंतालागीं ... ३४२।२
धनानि भूमौ ... ३४२
धन्य तयांची जननी ... २३९
धन्य ते संसारीं ... २२२।३६
धन्य तोचि ... २६९।७
धन्य त्याचें कूळ ... २३८।४
धन्य दिवस आजी ... १४४।३
धन्य धन्य तोचि ... १९०।३५
धन्य मी मानीन ... १५०।२५
धाकुटयाचे मुखीं ... २७२।१३
धांव घालीं आई ... १०८।१०
धांव धांव गरुडध्वजा ... १०९।११
धांव पाव सांवळे ... १२८।३३
धांव रे रामराया ... १०८।८
धांव विभो करुणाकर ... १२९।३५
धीर तो कारण एकविध ... ८२।३
धीर तो कारण ... ... १६५।११
ध्याइन तुझें रूप... ... २९८।३
ध्यायतो विषयान्पुंसः ... ३००

न.

न करावी चिंता... ... १६६।२
न करितां वेद...६५।३ए. भा.२.३१०
न करीं उदास ... ... १२७।२८
न करी स्मरण त्याचें ... २०३।१
न करीं रे मना कांहींच ... ३०६।५
न कहापणवस्सेन ... ३४१
न कळतां काय करावा ... ११३।४
न कळतां पद १८८
न कळे जी भक्ती काय... ११८।४
नका दंतकथा येथें ... २३२।१७
नको ऐसें जालें अन्न ... १५०।२६
नको गा मोकलूं दीना ... १२८।३१
नको तुझें ज्ञान नको ... ७३।५
नको नको मना... ... ३४८।१९
नको ब्रह्मज्ञान ... ... ७२।१
नको विद्या वसया ... ३५८।६
नको विसरूं तूं येई ... १०७।६
नको सांडूं अन्न नको ... ६५।२
न जातु कामः ३४०
न तथैतानि शक्यन्ते ... ३०७
न देखें न बोलें... ... १४२।५
न पृथग्जनवत् ... ३३५
न बोलतां तुम्हां... ... १४२।९
न मनावें तैसें गुरूचें ... ७७।२
नमस्कारी भूतें ... ... २१८।२१
न मिळो खावया न ... ७२।१२
नमूं सद्गुरु अनंता ... २५४।६
नम्र जाला भूतां ...२७१...तुकाराम.
न ये जरी तुज मधुर ... ५५।४
न ये नेत्रां जळ... ... २३५
नरजन्मामधिं नरा ... ३५२।३२
नरदेहामधिं येउन ... ३५५।३४
नरदेहा यावें ... ... ७५।१४
नर नारी बाळें ... ... ३५८।५
न राहे रसना ... ... १४२।७

न लगती मज ... ... १०९।१४
न लगे चंदना ... ... २२४।४४
नलगे देशकाळ ... ... ५५।३
नलगे पाहावें ... ... ५६।९
नलगे मायेसी ... ... १७४।१
नलगे हें मज ... ... ११२।२६
नव्हतीं ते संत ... ... २२९।१०
नव्हे जगीं कोणी... ... २६५
नव्हे ब्रह्मज्ञान २९९
नसावें ओशाळ ... ... २६७।१
नसे ठावा ब्रह्मा ... ३८।१५ ...वामन.
नसे भक्ति ना ... ... १३९।२
नहि कश्चित्क्षणमपि ... २५६।१
न हि कस्तूरिकामोदः ... २२४
नाचें टाळी पिटीं ... २२४।४३
नाना जीव ... ३८।१४ पाळंदे.
नाना वेश... २५८।४ दा.बो.१४.७.१.
नाम आठवितां ... ९७।४
नाम उच्चारितां ... १९६।११
नाम गोड नाम ... १८४।१०
नाम घेतां उठाउठी ... १८४।१०
नाम घेतां कंठ ... १९८।२१
नाम घेतां नलगे ... १८८।२८
नाम घेतां मन निवे ... १४७।१५
नाम घेतां वांयां ... १९७।१६
नाम दूषी त्याचें ... १८९।३२
नामधारक हो कां ... १८८।२९
नाम फुकट चोखट ... १८८।२६
नाम फुकाचें फुकाचें ... १८७।२५
नाम मुखीं गातां ... १९८।२२
नाम मुखीं सदा ... १९४।४
नामसंकीर्तन साधन ... १८७।२२
नाम साराचेंही सार ... १८५।१२
नामाचा प्रताप न ... १८२।१
नामाचिया बळें न ... १९४।३
नामाची आवडी... ... १८३।७
नामें दोष जळती ... १९७।१५
नारायण जोडे एक ... ८१
नाशवंत देह नासेल ... १९१।२
नाहीं काष्ठाचा गुमान ... ७८
नाहीं संतपण मिळत ... २२५।४६
नाहीं सुख मज ... ... ११२।२५
निजदोषावृतमन ... ३०४
निजल्यानें गातां उभा ... १८६।१७
नित्य उठोनियां खाव ... १६७।७
नित्य नेम प्रातःकाळीं १९९।१दा.बो.४.३.३
नित्य वा मनासी ... १३३।४
निंदक कामाचा... ... २७६।२२
निंदक तो परउपकारी ... २७६।२३
निंदा वसे ज्याचे चित्ता... २४८
निंदी कोणी मारी ... १७९।१०
निरधनको धन राम ... १८३।६
निर्वाणीं गोविंद... ... १६२
निर्वैर व्हावें सर्व... ... ३०३।३
निष्ठावंत भाव ... ... ७९।५
निःस्वो वष्टि शतं ३३०
नीचपण बरवें ... ... २७१।११
नीति सांगतों ऐका ... २९२।३४
नेणें अर्थ कांहीं ... ... ३६३।५
नेणें गाणें कंठ ... ... ५७।१०

नेणें बा विश्वकर्त्या ३७।८... पाळंदे.
नेदी चित्ता शांती ऐशी ... २९५।३७
नेदी दुःख देखों ... १६३
न्यावयासी मूळ... ... १०९।१३

प.

पडतां जड भारी ... १६०।३
पंढरिये माझें माहेर ... १००।४
पंढरीची वाट पाहें ... ११०।१९
पंढरीस जावें जीवन्मुक्त... १०१।६
पढियंतें आम्हीं तुजपाशीं १७०।१७
पतितपावन बीद ... १३०।७
पतितपावना अगा ... १२०।११
पतिव्रता नेणे आणिकाची ८२।४
पतिव्रतेची कीर्ती ... ३०५।३
पतिव्रते जैसा भ्रतार ... ८३।५
पतीतपावन नाम ... १०४।८
पतीतपावना जानकी जीवना १३३।६
पतीतपावना जानकीजीवना १३४।७
पत्रं पुष्पं फलं तोयं ... ८५
पय दधि घृत आणि ... १७९
परतलें मन लागलेंसे ... १४६।१०
परद्रव्य परनारी... ... २२९
परपुरुषाचें सुख... ... १४१
परमात्मा जो श्रीहरी ... २७४
परविया नारी माउली ... २६४।३
परि आतां माझी ... १३०।५
परिचरितव्याः ... २१९।२६...भर्तृ.२
पर्वतावरूनी लोटिला ... १६२।३
पवित्र तो देह वाणी ... २३८।३
पहा ते पांडव... ... ८१।१४
पक्षीयांचे घरीं नाहीं ... १६८।१०
पांडुरंगा कांहीं ... ७३।३
पांडुरंगावांचुनी दुजा ... ३४८
पाण्या निघाली गुजरी ... २६०।६
पाप ताप दैन्य... ... २३९।६
पापाची वासना ... २९८।५
पापी तो नाठवी ... ३१२।२
पाषाण देव पाषाण ... ७८
पाहतां श्रीमुख ... १४६।११
पाहूं जातां नारायणा ... १४५।५
पाळिलों पोसिलों ... १६४।७
पुण्य परउपकार ... २६४।४
पूर्वी केलें जें संचित ... ३११
पृथ्वी ध्यासी तरी ... २०३।४
पोटापुरतें काम ... ७२।१३
प्रपंचीं असूनी परमार्थ ... २५९।७
प्रथम भाव शुद्ध... ... २५८।६
प्रदानं प्रच्छनं ... ... २९२।३३
प्रभुविण संकट ... ४३।१२ पाळंदे.
प्रभूविण कोण कोणाचा ... ४८।६
प्रभो प्रणतवत्सला ३७७ पाळंदे.
प्राण जाई देहांतून ... ३४५।११
प्राण्या राम भजावा रे ... ३४६।१३
प्रायेण नीचा व्यसनेषु ... ३१२
प्रायेण श्रीमतां लोके ... ३२१
प्रारब्ध क्रियमाण ... १७९।११
प्रारब्धेंचि जोडे धन ... ३१४
प्रीतिचिया बोला नाहीं ... ५५।५
प्रेम-अमृतें रसना ... ९७।५
प्रेम देवाचें देणें ... ... २२३।४०

प्रेम न ये सांगतां ... ९६।१
प्रेमसूत्र दोरी ... ... १७७।४
प्रेमावीण जें जें केलें ... २३४।२६
प्रेमेंविण श्रुतिस्मृतिज्ञान ... २३४

फ.

फिरवीली पळी पायसांत... ४५।५

ब.

बरवें ऐसें आलें ... १४४।१
बरा देवा कुणबी ... ६१।५
बरी थोराची चाकरी ... १५६।२
बरें जालियाचे अवघे ... ३४५।९
बरें झालें देवा... ... ६०।४
बरें बोलतां सुख ... २७३।१७
बळियाचे अंकित ... १५७।६
बळिवंत आम्ही... ... १५९।१४
बहु उतावीळ भक्तीचिया १४७।१४
बहुतांच्या आम्ही न ... १४२।८
बा कितो घालिसी ... ३५१।३१
बा तुझा चालता काळ ... ३४५।१०
बाप भेला न कळतां ... ६१।६
बाल तोंवरी क्रीडनिं ... ३४९
बालस्तावत्क्रीडासक्तः ... ३४९।२३
बाळक जाणेना मातेसी ... १७६।७
बाळ काय जाणे ... १७४
बाळपण गेलें खेळतांचि... ३५०।२५
बाळ बापा म्हणे काका ... ५५।६
बाळ्या भोळ्या जना ... २५९।२
बिकट वाट वहिवाट ... २९३।३५
बीजान्यग्न्युपदग्धानि ... ३१४
बुद्धिचा जनिता लक्षुमीचा १९४।२
ब्रुवते हि फलेन साधवो ... २८४
बैसलोंसे द्वारीं ... ... ९०।१८
बैसोनि निवांत शुद्ध ... ३०४।५
बैसोनि निश्चळ करीं ... १६६।४
बोलविलें जेणें..... ३६३।६
बोलविसी तैसें आणीं ... २३७।७
बोलावा विठ्ठल पाहावा ... ८३।७
बोलिलों जैसें बोलविलें ... ३६२।४
बोलूं ऐसे बोल ... ... १५२।३५
बोले तैसा चाले... ... २४५।१०
ब्रह्ममूर्ति संत जगा ... २२०।३१
ब्रह्मरसगोडी तयांसी ... २२२।३७

भ.

भगवंत भावाचा८६।९ दा.बो.३.१०.१०
भक्त ऐसे जाणा जे ... २१४।८
भक्तांचा महिमा भक्तचि... २४२।१
भक्तांचीया काजासाठीं ... ८९।१४
भक्तांचें विषयीं नाहीं ... २१४
भक्तांसमागमें सर्वभावें ... ७९।४
भक्तासाठीं तो जगजेठीं ... ८८।१३
भक्तासाठीं रूपें धरी ... ८८।१२
भक्तिऋण घेतलें माझें ... ९०।१७
भक्तिप्रेमसुख नेणवे ... ७४।९
भक्तिप्रेमाविण ज्ञान ... ६६।५
भक्तिसुखें जे मातले ... १५७।५
भक्तीं आकळिला ... ९०।१९
भक्तीचें तें वर्म ... २१८।२४
भक्त्या मामभिजानाति... १७१
भज भज भवजलधिमाजि ९३।५
भज रे गोविंदा ... ३५०।२८
भजें मी विश्वेशा...३७९... पाळंदे.

भरत अपनी जननी ... ७७
भला जन्म हा तुला ... ३५३।३३
भल्याचें कारण सांगावें ... २२२।३८
भवरोगासी वोखद ... १८४।९
भवसिंधूचें काय कोडें ... १६४।६
भवाब्धिपतिता ३८।११ पाळंदे.
भ्रमाचिये सर्पे ... १२२।६
भाई हुशार रहना बे ... ३४७।१५
भागल्याचें तारूं सिफल्याची ४१।५
भागवताचा भाव ... २३३।१९
भाग्य पुरुषाची देखिली ९४।२
भाग्यवंत म्हणों तया ... ७६।१६
भार घाली देवा ... ३१२।३
भाव तैसें फळ ... ८७।१०
भाव तोचि देव ... ७८।१
भाव देवाचें उचित ... ७८।२
भाव धरा रे ... ९१।२०
भाव नाहीं भक्ती नाहीं ... ११९।९
भावभक्ती अंगीं ... ९६।१
भावाचिया बळें ... १५४।४२
भावापुढें बळ ... १५६।१
भावाविण माझा विठ्ठल ... ८५।४
भावे हि विद्यते ... ९३
भिंगुरटी कीटकीतें ... २०४
भुंकुनियां सुनें लागे ... २४८।२
भू-जल-तेज-समीर ... ४५।१
भूतदया ज्याचे मनीं ... २७०
भूतांसी कठिणप.२७०।९ए.भा.३.३६०
भेटीची आवडी ... ११०।१५
भेटीलागीं जीवा ... १०६।५
भेटीलागीं पंढरिनाथा ... ११०।१६
भोग तो न घडे ... ३११।१
भोगें घडे त्याग ... ३३७
भोजनाच्छादने ... १६६।१
भोरप्यानें सोंग पालटिलें २३५।१
भोळे भक्त भाव धरिती ९१।२१
भ्रमाचिये सर्पें डंखियेलें १२२।६

म.

मऊ मेणाहून आम्ही ... २२२।३९
मज दास करीं त्यांचा ... २४४
मद्भक्ता यत्र गायन्ति ... ९७
मधुरा उत्तरासवें ... ७९।६
मन एव मनुष्याणां ... ३०१
मन करा रे प्रसन्न ... ३०३।१
मन माझें चपळ न ... १३३।१५
मन-वाचातीत तुझें ... ६९।१३
मन हें ओढाळ गुरूं ... ३०१
मनामार्गे मन लावूं ... १५१।३१
मना सज्जना भक्ति ... ३०६।६
मनासी लावावी ... ३०२।४
मनीं भाव असे कांहीं ... ८६।७
मनोमय पूजा ... ५४।२
ममता तुटेना मज ... १२०।१०
मरणाही आधीं राहिलें ... १४३।१४
मर्जी देवाची देवाची ... ४९।१
मस्तकीं साहावें टांकियांसी २१७।१७
मही रम्या शय्या ... २२६।३
माउलीची चाली लेंक.... २४६ तुकाराम
माउलीसी सांगे कोण ... ४०।३
मागता भिकारी झालों ... ११५।१०
मागां सांगितलीं २८७।३० दा.बो.२.१०.१
मार्गे पुढें नाहीं ... १८०।५

मागें पुढें ब्रह्म दाटे ... ४४।१
माझा घात पात ... १७७।५
माझा देवा तुम्हीं ... २३६।६
माझिये जातीचें ... १२३।९
माझी कोण गती ... १२२।४
माझी विठ्ठल माउली ... १७५।४
माझें चित्त तुझे पायीं ... ११५।९
माझे भक्त मज ... २१०।३
माझे मज कळों येती ... १३५।१०
माझें मन पाहें कसून ... ८०।११
माझे मनोरथ पूर्ण ... १२७।२६
माझे हातीं आहे ...१२१...तुकाराम
माझ्या कनवाळू ... १३४।८
माझ्या बोबडीया बोला ... ५७।१२
माझ्या विठोबाचा ... १६३।३
माता कापी गळा ... १३२।१
माता रामो मत्पिता ... १७३।२
मातेचिये चित्तीं ... २४६।३
मातेविण बाळा ... १०५।१
मानेन तृप्तिर्न तु ... २९६
माय वनीं घाल्या धाय... २४३
मायें मोकलिलें ... १३३।३
मायेवरी सत्ता आवडीची २४७।६
मां हि पार्थ व्यपाश्रित्य... ९५
मी अवगुणी अन्यायी ... ११५।११
मी खरा पतित ... १२९।१
मी तुझ्या पायींचा ... १७३।६
मी तों दीनाहूनी दीन ... १२९।२
मी माझी कल्पना ... १५३।३९
मुखीं विठ्ठलाचें नाम ... १६४.
मुखें सांगे ब्रह्मज्ञान ... २३२।१३
मुंगीचिया घरा ... २६५।१।
मृगाचिये अंगीं ... ४५।४
मोलें घातलें रडाया ... २३५।२७
मोक्ष तुमचा देवा ... ७४।८
मोक्षपदें तुच्छ केलीं ... ७०।५
मोक्षाचें आम्हांस नाहीं ... ७०।३
म्हणवितों दास ... २३६।२
म्हणौनि धन्य ते ... १४४

य.

यत्करोषि यदश्नासि ... ६३।३
यथार्थवादें तुज ... ३९।१६.
यदेवोपनतं दुःखात् ... ३२१
यद्गत्वा न निवर्तन्ते ... २६४
यमधर्म सांगे दूतां ... १५८।१०.
यः सर्वत्रानभिस्नेहः ... ३३२.
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं २५७।२
याचि नांवें दोष ३०५।४
याजसाठीं केला होता ... १५४।१
यातिकूळ माझें गेलें ... १४१।२
यातीमतिहीन रूपें ... १४७।१३
या प्रीतिरविवेकानां...७१।८पांडवगीता.
या रे नाचों अवघे ... १५२।३४
यालागीं आवडी ... १८७।२६.
यावत्स्वस्थोऽप्ययं देहो ... ३५०।२६.
यावद्वित्तोपार्जनसक्तः ... ३४२।१
या साधूंश्च खलान्करोति... २६७.
युगाऐसें पळ तुजविण ... १०३।४
येई गा विठ्ठला येई गा... १३१।११
येई गे विठ्ठले अनाथाचे नाथे ११४।७
येई गे विठ्ठले विश्व ... १२१।१
ये गा महाविष्णु अनंत ... १२७।३०

येणें मुखें तुझें वर्णी ... २९७।२
येथुनि पाहे तेथवरी ... १८०।४
येप्यन्यदेवताभक्ताः ... ५०।२
योगियां दुर्लभ तो ... १४६।८
यो मे गर्भगतस्यापि ... १६९ १५

र.

राजस सुकुमार मदनाचा ९८।१
रात्री दिवस आम्हां युद्धाचा २५९।१
राम आकाशीं पाताळीं ... ४६।४
रामकृष्ण नरहरे स्वामिन्... १३४।९
रामकृष्ण हे गोविंदा ... ८२।२
रामनाम तुम भज ले ... ६८।९
रामनाम वेदोवाणी ... १९६।१३
रामनामाचे पवाडे ... १९८।१९
राम म्हणतां कामक्रोधांचें १९८।२०
राम म्हणतां तेरे ... १९५।९
राम म्हणतां रामचि ... २०४।६
राम म्हणे ग्रासोग्रासीं ... ६३।४
रिकामें तूं नको मना ... ३०६।२
रूपनाम घेसी आपुल्या... ८६
रूप पाहतां लोचनीं ... ९८।५
रूप लावण्य अभ्या२७८।२६दा.बो.१४.६.१
रूपीं गुंतले लोचन ... ९९।७

ल.

लवकर आतां होणार ... ३२७
लवण मेळवितां जळें ... १८१।८
लहान थोर २७७।२५ दा.बो. १२.९.६
लहानपण दे गा देवा ... २७१।१२
लागोनियां पायां विनवितों १९१।३
लाज वाटे पुढें तोंड . ... १२०।१३
लाज वाटे मज मानिति ... २३६।३
लांब लांब जटा काय ... २३०।६
लावूनियां मुद्रा बांधोनियां २३१।९
लेंकरा लेववी माता अळंकार २४७।४
लेंकुराचें हित ... २४६।१
लोहो परिसासीं रूसलें... २६५।२

व.

वदनिं कवळ घेतां ६४।५...वामन.
वंदीन मी भूतें ... २७५।२१
वरतें करोनियां तोंड ... २३०।७
वर्णावे ते किती ... ८४।२
वर्णाश्रम करिसी चोख ... ६।१२
वर्णू महिमा ऐसी ... ३५।२
वाइटानें भलें ... २२७।१
वाङ्माधुर्यान्यान्यदस्ति ... २७४।१८
वाचा निर्मलया सुधा ... ३६।४
वाचे विठ्ठल नाहीं ... १९०।३४
वांझेनें दाविलें गव्हवार... २३१।११
वाट पाहें हरि ... १११।२०
वाट पुसल्याविण २८४।२९ दा. बो. २.२.२
वाटीभर विष दिलें ... १६१।२
वाटुली पाहतां शिणले ... ११८।१८
वांयां जातों देवा ... ११८।५
वाळो जन मज ... १४१।१
विठोबाचें नाम ज्याचे ... १९०
विठोबाच्या गांवा जाईन १००।२
विठ्ठल आमचें जीवन ... १७४।५
विठ्ठल गीतीं विठ्ठल ... २०४।८
विठ्ठल नामाचा नाहीं ज्या... १८९।३३
विठ्ठल सोयरा सज्जन ... १००।३
विठ्ठलाचें नाम ध्यावें ... १९०।३७
विश्वास धरूनि राहिलों... ११९।७

विषमप्यमृतं क्वचित् ... १६२
विषमां हि दशां ... ३१२
विषयाचें सुख नको ... २९९।३
विष्णुमय जग वैष्णवांचा... २७४।१९
विसरलें कूळ आपुला ... १४१।६
वीर विठ्ठलाचे गाढे ... १५६।३
वृक्षवल्ली आम्हां सोयरीं ... २२५।१
वेडें वांकडें गाईन ... १३१।१२
वेद अनंत बोलला ... ७५।१३
वेदाध्ययन करिसी तरी ... ६८।११
वैष्णव तो जया... ... २१४।७
वैष्णवांसंगतीं सुख ... २२३।४२
व्यर्थ मायाजाळीं गुंतोनी... ३४८।१८
व्यभिचारिणी गणिका ... ९५।३
व्रजांत धेनू धन तें ... ३४२

श.

शय्या शैलशिला गृहं ... २२५।२
शरण शरण नारायणा ... १२६।२४
शरीरयात्रापि च ते ... २५७
शरीर विनटलें सेवे ... १५१।३२
शांति आणि क्षमा हे ... ७३।७
शांतीपरतें नाहीं सुख ... २६।५
शास्त्रांचें जें सार ... १४९।२०
शिकल्या बोलाचे सांगतील २३२।१६
शिखीव केकामधुरः ... २७३
शिव आणि विष्णु ... ५०।३
शीण वाटतसे जीवा ... २२९।३
शीतळ साउली ... १७५।५
शुद्ध चर्या हेंचि ... २४६।१३
शुद्ध ज्याचा भाव ... ९१
शुद्ध बीजापोटीं ... २१५।१०
शेवटींची विनवणी ... ३६१।१९
श्रमपरिहारा ... १७८।७
श्रवणं कीर्तनं विष्णोः ... ७४
श्रीगुरुसारिखा असतां ... २५५।४१
श्रीरंगा दे मजला ... ३५९।११
श्रीराम सखा ऐसा ... ३०५।१
श्रीसंतांचिया माथा ... २४०।८

स.

सकळ गुणें संपन्न ... ४०।२
सकळ देवांचा जनिता ... १५३।३७
सकळ भूषणांचें ... १८५।१३
सकळही माझी ... २२६।१
संकल्पिला तूज ... १७८।९
सज्जनस्य हृदयं ... २२१
संत आले घरा ... २४५।११
संत गाती हरि ... २४५।८
संतचरणरज लागतां ... २३८।१
संताचिहें लेउनि ... २३१।१०
संत जेणें व्हावें ... २१७।१८
संतनिंदा ज्याचे घरीं ... २४८।४
संत भेटती आ ... २४१।११
संत मानितील मज ... २३६।५
संत मारगीं चालती ... २४३।३
संत होऊनियां ... २४२
संतांचा अतिक्रम ... २४९।५
संतांचा महिमा ... २४२।२
संतांचिया पायीं ... २४४।४
संतांचिये गांवीं ... २१९।२५
संतांचिये माथा ... २४५।१२
संतांचीं उच्छिष्टें ... ३६२
संतांचे गुणदोष... ... २४८।३

संतांचे घरींचा ... ... २४५।९
संतांचे संगती ... ... २२८।४
संतांच्या पादुका ... २४४।६
संतांसी क्षोभवी... ... २४८।१
सत्य आठवितां देव ... ९३।६
सत्य बोले निरंतर ... २६७।२
सत्यं वद ... २७७।२४
सत्य संकल्पाचा ... ७९।३
सत्यायेवढें सुकृत ... २६७
सदा माझे डोळां ... ११४।८
सदा संतापाशीं ... २१९।२७
सदैव अपराध...३६।५... केका १७
सद्गदीत कंठ दाटो ... ९७।२
सद्गुरुचे पाय ... ... २५४।८
सद्गुरुनायकें पूर्ण ... २५५।९
सद्गुरुवांचुनी ... ... २५४।५
संध्या कर्म ... ... १८८।२७
संप्रीतिभोज्यान्यन्नानि ... २९६
सब पैसेके भाई... ... ३४७।३
सबसे रामभजन ... ३४६।१४
समर्थाचें बाळ ... १३०।६
समर्थावरी...२८१।२८दा.बो.२.१.११
समाधान साधूजनाचेनि... १४०।४
समुद्र सरिता ३८।१३ ... पाळंदे.
समुद्र हा पिता ... ... ३१२।४
समुद्र क्षोभे वेळोवेळीं ... २१६।१४
सरलें आतां नाहीं ... ४२।८
सर्व भावें आलों ... १२६।२२
सर्वभूतस्थमात्मानं ... २७४।२०
सर्वविशीं माझा ... १२३।८
सर्व सुखा अधिकारी ... १८५।१५
सर्वस्वाचा त्याग ... २६३।१३
संवसारतापें तापलों ... १२२।५
संसार म्हणिजे महापूर ... १६४
संसारा आलिया ... २५९
संसाराचें ओझें... ... १७६
संसारीं असतां प्र. ... २६३।१
संसारीं अस २५७।३ दा. बो.१२.१.८
संसारसोहळे भोगितां ... १६०।१
साकरेचें नाम ... ... ७०।४
सांगणें नलगे १६६
सांगड बांधा रे ... ९१।१
सांग पांडुरंगा... ... ११३।२
सांठविला हरी ... २१८
सांडूनियां सर्व... ... ८०।९
सांडोनियां थोरपण ... २४३
सातां दिवसांचा ... ८०।१०
साधनांचें सार ... १८४।११
साधु संत येती ... २४०
सावध सदा असावें ... २८९
सुख पाहतां जवापाडें ... ३२३
सुखमात्यन्तिकं य ... ३१८
सुख या संतसमागमें ... २३९।५
सुखं वा यदि वा ... ३३२
सुखं सुखेनेह ... ३२०
सुखं हि दुःखान्य ... ३२१
सुखस्यानन्तरं दुःखं ... ३३१
सुखाचे सांगाती ... ३४४।८
सुखाचिये पेठे ... ... १८७।२४
सुखीं संसारीं ... ... २६२।१०
सुंदर तें ध्यान ... ... ९८।२
सुसंगति सदा ३५९।१०...केका ११८
सेवा ते आवडी ... १८६।१८

सोइरे धाइरे दिल्या ... ३४४।६
सोंगें छंदें कांहीं ... २३४।२५
सोन्याचे पर्वत ... ... ६९।२
सोपें वर्म आम्हां... ... १८६।१९
सोलींव जें सुख २१८
स्त्रिया पुत्र कलत्र ... ३४१।१२
स्त्री पुत्रादिकीं राहिला ... १२२।७
स्थिरावली वृत्ती ... १४७।१२
स्वकर्मफलनिर्दिष्टां...७१।७. पांडवगीता.
स्वरूपाचे ठायीं ... १९८।२३
स्वस्थ बसावें ३३३
स्वयें घरदार ... ... २६२।१२
स्वार्थो यस्य परार्थ ... २२१
स्मरण करितां राम ... १९५।६
स्मरण देवाचें...१९३।१ दा. बो.४.३.२

ह.

हरि असे देहीं ... ... ४६।६
हरिगुण गावत ... ... १८६।२०
हरिचिया भक्ता ... ... १५९।१६
हरिच्या दासां भये ... १५७।८
हरि ठेविल तैसें ... ३३२
हरि बोला देतां ... २०.।४
हरिभक्ति करी ... ... ७६।१८
हरि म्हणतां गति ... १९५।८
हरि रे वाढ वेळ... ... ९७।३
हरिहरां भेद ... ... ५०।४
हरि होउनि ... ... १७९।२.
हांकेसरिसी उडी ... १६१।४.
हाचि नेम आतां ... १४३।१०
हाचि परमानंद ... १५०।२८.
हाचि माझा नेम ... १११।२३
हासों रुसों आतां ... १४३।१२
हित तेंचि एक ... २०१
हिरा ठेवितां ऐरणीं ... २१६।१६
हीन माझी याती... ... २७३।१६
हृदयस्थ असोनी ... २०
हृदयीं चिंतितां ... १७३
हेचि थोर भक्ति ... १७६।१
हेंचि दान दे गा ... ७०।६
हेंचि देवापें मागत ... ३५७।३
हेंचि माझें तप ... ... २०१।१
हेचि व्हावी माझी ... ३५७।४
हेंचि सर्व सुख ... ... १८५।१४
हेंचि सुख पुढें ... ... ३५७।४
हैतुक अथवा ६२।१...ए.भा.२.३४६.
होऊं नको ... ... ३०२।३
होईल थोरपणें ११२
हो कां दुराचारी ... १८९।३०
हो कां नर अथवा ... १८९।३१

क्ष.

क्षणहि तुमची ... ३७६ पाळंदे.
क्षणक्षणां जीवा ... १०९।१२
क्षणक्षणां हाचि करावा ... ३५१।३०
क्षमा वशीकृतिर्लोके ... २६९
क्षमाशस्त्रं करे यस्य ... २६९।६
क्षमाशस्त्र जया ... ... २६९।८
क्षीरसागरांत असती ... १२५।१८
क्षुधार्थी अन्नें ... १०८।९

ज्ञ.

ज्ञानवैराग्य काबड ... ९२।४
ज्ञानियांचे घरीं. ... ६६।४

कठिण शब्दांचा कोश.

अ.

अंकित–ताबेदार.
अघमर्षण–पापनाशक स्तोत्रें म्हणणें वगैरे.
अचपळ–चपळ, चंचळ, अस्थिर.
अंतराय–विघ्न.
अतिथि–पाहुणा.
अतुर्बळी–अतिबलाढ्य.
अंदर–आंत.
अधिष्ठान–स्थान, ठिकाण.
अध्ययन–शिकणें.
अध्यापन–शिकविणें.
अध्यास–ध्यास, तीव्र ध्यान.
अनर्गळ–निष्प्रतिबंध; स्वच्छंदी.
अनारिसें–अन्य, वेगळें.
अनुताप–पश्चात्ताप, दुःख.
अनुदिनीं–दररोज.
अभ्यंतर–अंतरंग, मन.
अलंकार–दागिना.
अवचट–अकस्मात्.
अवसान–खंड, खळ, थांबणें.
अष्टभोग–सुगंध, वनिता, वस्त्र, गायन, तांबूल, भोजन, शय्या व द्रव्य.
असंग–निःसंग, आसक्तिरहित.
अहंभाव–अहंकार, गर्व.
अहिक्य–ऐक्य, जूट.
अहोरात्र–रात्रंदिवस.

आ.

आगमोक्त–वेदोक्त, वेदांत सांगितलेले.
आगोज–मोठा.
आटाटी–दगदग, श्रम.
आटी–श्रम, खटपट.
आथिले–संपन्न, थोर.
आतुडणें– सांपडणें, प्राप्त होणें.
आन–अन्य, निराळें, भिन्न.
आपंगणें–प्रेमानें जवळ घेणें, सांभाळणें.
आपसया–आपोआप.
आयणी–इच्छा.
आरज–आर्य, श्रेष्ठ.
आयुध–हत्यार, शस्त्र.
आराइणें–अनुकूल असणें.
आरुष–आर्ष, अडाणी, छांदिष्ट.
आर्त–उत्कट इच्छा.
आवर्त–भोंवरा.
आळी–१ हट्ट, छंद, नाद. २ कीड.

इ.

इच्छावस–इच्छेप्रमाणें, मनाप्रमाणें.
ईशान–ईश्वर.

उ.

उगलें–उगाच, निमूटपणें.
उगाणा–सर्व दोष व पापें आपणावर घेऊन केलेली मुक्तता; गजना; झाडा.

उच्छिष्ट–उष्टें.
उतराई–ऋणमुक्त.
उदयाचल=सूर्य ज्याच्या आडून वर येतो तो पर्वत; उदयगिरि.
उन्मळित–ताठ उघडलेले.
उपंडर–भेद, अव्यवस्था.
उपाधि–बाह्य उपचार.
उपाव–उपाय.
उपेक्षणें–हयगय करणें.
उबग–कंटाळा, त्रास, उद्वेग.
उभड–उमाळा.
उमोप–पुष्कळ.
उरी–शिल्लक, बाकी.
ऊर्मी–तरंग, लाट.
उसंतणें–आटोपणें, शेवटास नेणें.

ए.

एकीसवा–एकीकडे.

ओ.

ओळखण–ओळखण्याची खूण.
ओसरणें–कमी होणें, मागें हटणें.

क.

कईवाड–कारस्थान, युक्ति, तजवीज.
कटीं–कंबरेला.
कडसणी–विचार.
कदर–गुणांची पारख.
कदान्न–वाईट अन्न.
करंटा–भाग्यहीन, दरिद्री.
कर्दम–चिखल.
कलेवर–शरीर.
कल्लोळ–मोठी लाट.
कव–मिठी.
कवण–करुणा.
कवळ–घांस.
कुश्चिळ–कुश्चळ, घाणेरें, मलिन.
कसाई–खाटीक.
कळा–कला, कौशल्य, चातुर्य.
कळाकुसरी–कौशल्य, चातुर्य.
कांचोळी–चोळी.
काज–काम.
कानडें–गुह्य.
कापडी–कापडाची कावड घेऊन तीर्थ-यात्रा करणारा मनुष्य; यात्रेकरू.
कामारी–काम करणारा, सेवक.
कामिनी–स्त्री.
कामुक–लुब्ध, आसक्त, लंपट.
काया–शरीर.
काष्ठ–लांकूड.
कासाविस–व्याकुळ, घाबरा.
किंकर–सेवक, चाकर.
कुडी–१ शरीर, देह.–२ वाईट.
कुडें–खोटें, वक्र, हेवेखोर, वाईट.
कुन्हा–चुरस, द्वेष, मत्सर.
कुंभ–घागर.
कुरंग–हरिणी.
कुश्चळ, कुश्चिळ } कुत्सित, घाणेरें, मलिन.
कुष्ट–कोड.
कुक्षी–कडेवर.

कैवल्य–मोक्ष, मुक्ति.
कैवाड–कारस्थान, तजवीज, युक्ति.
कोटिगा–कोडगा.
कोड–कौतुक, आवड.
कोडें–आवडीनें.
कोंपीण–कौपीन; लंगोटी.
कोंवसा–आधार, आश्रय, कैवारी.

ख.

ख–आकाश.
खगनिकर–पक्ष्यांचा समुदाय.
खंत } –१ खेद, खिन्नता, काळजीनें
खंती } झुरणें. २ उत्कट इच्छा.
खाणी–खाण.
खाणोरीं–काळीजखाऊ.
खोले–उघडा.
खोळ–गुह्य.

ग.

गंगाधर–गंगेला मस्तकावर धारण करणारा; शंकर.
गजमुख–हत्तीच्या तोंडाचा; गणपति.
गभस्ति–सूर्य.
गात्र–अवयव.
गुमान–पर्वा, खातर.
गृह–घर.
गोजिरें–सुंदर, देखणें.
गोप–गाई पाळणारा; गुराखी.
गोंवणें–गुंतविणें, अडकवणें.
गोवळ–गाई वळणारा; गुराखी; कृष्ण.
गोंवा–गुंता.
ग्वाही } –साक्ष.
गोही }

घ.

घन–मेघ.
घ्राण–नाक.

च.

चकई–चक्रवाकी.
चंद्रमौळी–शंकर.
चपेटा–झपाटा, चपाटा.
चाकाटणें–चकित होणें.
चांग–चांगला.
चाड–आवड, इच्छा, गरज.
चेइणें–चेतणें, जागृत होणें.
चोखडें–चोख, शुद्ध.
चोज–आवड, कौतुक, नवल.
चोजवणें–चकित करणें, समजविणें.

ज.

जंगम–हालणारें.
जननी–आई.
जंबुक–कोल्हा.
जरा–म्हातारपण.
जल–पाणी.
जलधर–मेघ.
जल्पणें–पोकळ बढाया मारणें, बडबडणें.
जहां–जेथें.
जाचणी–जाच, छळ, त्रास.

जाणीव–ज्ञानाचा अहंकार, ज्ञान.
जाया–स्त्री, बायको.
जिह्वा–जीभ.
जिव्हार–अंतःकरण, मर्म, बीज.
जीवन–पाणी.

झ.

झडी–झडप.
झणिं–लवकर, कदाचित्, खरोखर.
झांगडझेंगा–भांडण, तंटेबखेडे.

ठ.

ठसा–छाप, शिक्का.
ठाव–ठिकाण, जागा, स्थान.
ठेवा–पूर्वकर्म, प्राक्तन.

ड.

डंखणें–दंश करणें, चावणें.
डौरली–सजली, शोभली.

ढ.

ढका–धक्का.

त

तरंग–वितर्क, हेलकावे.
तस्कर–चोर.
तितिक्षा–शांति, क्षमा, सहिष्णुता.
तिमिर–काळोख.
तिरासा–गादी.
तुक–महत्त्व, वजन, योग्यता.
तृषा–तहान.
तृषाक्रांत–तहानेलेला.
तेरा–तुझा.
तोडर–तोडा, वाळा.
त्रिपुटी–ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान; ध्येय, ध्याता, ध्यान.
त्रिविध ताप–कायिक, वाचिक, मानसिक.
त्रिवेणी–गंगा, यमुना, सरस्वती.

थ.

थडी–तीर.
थिंकणें–खेद–दुःख करणें.

द.

दग्ध–जळलेलें.
दंडक–वर्तनक्रम.
दंडणें–सजणें, शोभणें.
दध्योदन–दहींपोहे.
दंभ–ढोंग.
दयाब्द–दयेचा मेघ.
दयार्णव–दयेचा सागर.
दर्पण–आरसा.
दर्वी–पळी.
दशांगुलें–दहा आंगळें म्हणजे अनंत.
दसोडी–दशी, चिंधी.
दाटणी–दाटी, गर्दी, गडबड.
दातार–दाता, धनी.
दारा–बायको.
दिठी–दृष्टि.
द्विज–१ ब्राह्मण. २ पक्षी.
द्विजगण–पक्ष्यांचा समुदाय.
दुडी–घागर.
दुधड–दुधाळु, पुष्कळ दूध देणारी.

दुरित–पाप.
द्रुम–वृक्ष, झाड.
दुश्चित–दुःखी, खिन्न.
दृष्टि–डोळे.
देवाईल–देवालय, देऊळ.
द्वैत–दुजेपणा, भेद.
द्योतिली–प्रकाशिली, उपदेशिली.

ध.

धड–शरीर.
धणी–तृप्ति, पूर्ति, इच्छा.
धणीभरी–पोटभर, इच्छातृप्त.
धाम–शरीर, घर.
धालेपण–तृप्ति.
धांवणें–आश्रयासाठीं ज्याकडे धावावयाचें तो; आश्रय; आधार.
धीर–अपेक्षा, जरूरी.

न.

नभा–आकाशास.
न भीं–भिऊं नको.
नवनीत–लोणी.
नवलाहो–नवलाई, नवल.
नागबंदी–नागाकृति कटिभूषण.
नागवण–फसवणूक.
नाड–नड, अडचण, विघ्न.
नातुडे–न आतुडे, न सांपडे.
नाथणें–पीडा देणें, खोड मोडणें.
नाभीं–बेंबींत.
नाव–होडी.
निका–१ खरा, योग्य. २ शुद्ध, चांगला.
निखंदणें–तोडून बोलणें.
निखिल–सर्व.
निडळ–निटिल, कपाळ.
निपट–सर्वस्वीं, अगदीं.
निंबलोण–दृष्ट काढण्यासाठीं कडू निंबाचीं पानें, मीठ इत्यादि पदार्थ ओंवाळून टाकणें.
निमणें–संपणें, लय पावणें.
निरवणें–आपलें काम दुसऱ्यावर सोंपविणें, हवालणें.
निरसणें–नाहींसें करणें, निस्तारणें.
निरुतें–खरें, निश्चित.
निरोधनें–कोंडून धरल्यानें.
निर्वाण–१ प्रयत्नांची शिकस्त. २ अंत, शेवट.
निवृत्ति–परिहार, नाश.
निवेदणें–सांगणें.
निशिदिनीं–रात्रंदिवस.
निशी–रात्र.
निसुगाई–आळस, निरुद्योगीपणा.
नीर–पाणी.
नीस–निवड, पृथक्करण.
नेटी–नेटकी, बळकट.
नेत्र–डोळा.

प.

पंकज–कमळ.
पंकजपाणि–कमलहस्त.

पंचानन–सिंह, वाघ.
पडिभर–१ आसक्त. २ अधिकपणा.
पढियंतें–प्रिय, आवडतें.
पढिये–आवडे.
पतित–पातकी.
पंथ–मार्ग, वाट.
पद्मनाभ–१ विष्णु. २ कृष्ण.
परपुरुष–१ (पतिखेरीज) दुसरा पुरुष, जार; पक्षीं, परम पुरुष–परमेश्वर.
परवडी–चातुर्य, प्रकार.
परिमळ–सुवास.
परिसणें–ऐकणें.
परी–प्रकार.
पर्णिली–(परिणय–विवाह) विवाहिली.
पवाडे–प्रवृत्त होतो.
पशुपति–शंकर.
पांगविणें–दुर्बळ करणें.
पांगिला–अंकित, ताबेदार, ओशाळा.
पाचारणें–बोलावणें.
पांचाळी–द्रौपदी.
पांजरा–अस्थिपंजर, रोडलेला.
पाटोळा–रेशमी वस्त्र.
पाडेवार–महार.
पायवणी–पायांचें तीर्थ.
पायस–खीर, दूध.
पायो–पी, सेवन कर.
पारणें–उपास सोडणें, समाधान.
पालव–पल्लव, पदर.
पावपलकमें–पाव पळांत, निमिषमात्रांत.
पाषाण–दगड.
पियमिलन–प्रियमीलन, प्रियाशीं भेट.
पिसा–वेडा.
पिसुण–पिशुन; दुष्ट, चहाडखोर.
पेचपाड–छक्केपंजे, डावपेंच, युक्त्या.
प्रचित–प्रतीति, अनुभव.
प्रक्षालणें–धुणें.

फ.

फणिवर–सर्पराज.
फिदा–अनुरक्त, आशक, खुष.
फुडें–योग्य, खरें.
फुंदणें–डौल–गर्व करणें.

ब.

बडिवार–मोठेपणा, कीर्ति.
बराडी–आशाळभूत, हावरा.
बहुवस–पुष्कळ काळपर्यंत.
बहुसाल–पुष्कळ.
बाहणें–हांक मारणें, बोलावणें.
बाहीं–हातांनीं.
बाह्या–हात.
बुझावणें–समजावणें.
बुंथी–घुंगट, बुरखा.
बेर–वेळ.
बोभाईणें–हांक मारणें.
बोहरी–जोडप्यानें; (वधुवरें–वोहरें).
बोळवीं–घालवीं, नाहींशी कर.
ब्रीद–बाणा, शील.

ब्रीदावळी–ब्रीदांची माळ.

भ.

भई–झाली.
भरोवरी–श्रम, सायास.
भव–संसार.
भवदव–संसाराग्नि.
भाक–भाषा, प्रतिज्ञा, आश्वासन.
भातुकें–खाऊ, खाद्य.
भिल्लीण–शबरी.
भीतरीं–आंत.
भुक्ति–जेवण.
भू–पृथ्वी.
भूषण–अलंकार, दागिना.
भृकुटी–भिंवई.
भृंग–भुंगा.
भ्रतार–नवरा.
भ्रमर–भुंगा, कुंभारीण.

म.

मगरुरी–गर्व.
मटीका–मातीचा.
मंडण–अलंकार, दागिना.
मंथन–(ताक) घुसळणें.
मवाळ–मृदु, मऊ, कोमल.
मशक–माशी, चिलट.
महानुभाव–उदार मनाचे, श्रेष्ठ.
मळ–घाण, पाप.
माज–मध्य, कंबर.
मांदियाळी–समुदाय, मेळा.
मांदी–समुदाय, मेळा, मंडळी.
मानवले–संतुष्ट झाले.
मार्तंड–सूर्य.
माव– माया, कपट.
माहेर–मागृह–माघर–आईचें घर.
मित्र–सूर्य.
मिरविली–थाटानें खोंविली.
मीन–मासा.
मुद्रांकित–शिक्का असलेला.
मुशारा–पगार, वेतन.
मूळ–माहेरचें बोलावणें.
मृग–हरिण.
मेदिनी–पृथ्वी.
मैंद–मईद, ढोंगी.
मोकलणें–१ उपेक्षा करणें. २ सोडणें.
म्हणियारा–म्हटलेलें-सांगितलेलें करणारा; ताबेदार, नोकर.

य.

यम–अवश्य कर्तव्य असे धार्मिक विधि.
याति–जाति, जात.
यादव–यदुकुलोत्पन्न (श्रीकृष्ण).
येर–इतर, दुसरा.
येरयेरां–एकमेकांस.
योगमुद्रा–हठयोगांतील आसनें वगैरे.

र.

रंक–दासानुदास.
रंगावली–रांगोळी.
रजक–परीट, धोबी.

रजनी–रात्र.
रसना–जीभ.
राई–मोहरी.
राउळ–देऊळ.
रातणें–रमणें, रिझणें.
रुचिर–सुंदर.
रुंडमाला–मुंडक्यांची माळ.
रुळे–लोळे.
रूपडें–रूप, स्वरूप.
रोधणें–बंद करणें, अडविणें.
रोम–केश.

ल.

लंड–निगरगट्ट.
लंपट–अतिशय आसक्त.
लवण–मीठ.
लवलाही–लवकर.
लामवेगें–अति त्वरेनें.
लागें–लागीं, साठीं.
लाघव–कुशलता.
लाचावणें–गोडावणें, चटावणें.
लाहीन–लाभेन, मिळवीन.
लाहो–छंद, लाभ.
लिंबुर–बाजरीचीं कणसें.
लेखणें–मानणें, आदर करणें.
लेखा–पर्वा.
लोचन–डोळा.
लोलंगता–लोभीपणा.
लोहो–लोह, लोखंड.
लौकिक–लोकापवाद.

व.

वंचणें–खर्चणें.
वजणें–(व्रज्) जाणें.
वमन–वान्ति, ओकलेलें.
वयस–वय, आयुष्याचीं गेलेलीं वर्षें.
वरदळ–बाहेरील दिखाऊ डौल.
वरपांग–वरवर, बाह्यात्कारी.
वरो–वरव, पुष्कळ.
वर्जिता–निवारण करणारा.
वर्म–खूण, गुह्य.
वहां–तेथें.
वहिली–सुंदर, चांगली.
वागु (घु) रा–पाश, जाळें.
वांचईल–फुकट जाईल.
वाड–विपुल, पुष्कळ.
वाढ–वृद्ध, मोठा.
वानणें–स्तविणें, स्तुति करणें.
वारावार–आवराआवर.
वारिकें–वर बसणारें, स्वार.
वाली–धनी, कैवारी, रक्षणकर्ता.
वास–वाट, मार्गप्रतीक्षा.
वासणें–वेंगाडणें.
वाळणें–वाळींत टाकणें.
विग्रह–१ भांडण. २ देह.
विचरणें–हिंडणें, भटकणें.
विणें–प्रसवणें, जन्म देणें.

विनटणें–तल्लीन होणें.
विपट–वैषम्य.
विमल–स्वच्छ, शुद्ध.
विरंची–ब्रह्मदेव
विश्वनाथ–हर, शंकर.
विहित–शास्त्रोक्त, योग्य.
वेशी–घर.
वैखरी–वाणी, वाचा.
वैदिक–वेदोक्त, वेदांत सांगितलेलीं.
वोखटें–वाईट.
वोडवणें–पुढें करणें.
वोरस–स्नेहाचा पान्हा.
वोरसणें–पान्हा सोडणें.
वोस–व्यर्थ, निरर्थक.
वोसंडिला–टाकला.
वोळलीं–प्राप्त झालीं.
वोळगणें–सेवा करणें.
वोळसा–फेरा.
वोळे–वळे, अनुकूळ होतो.
व्याघ्रांबर–वाघाचें चामडें.

श.

शकटांतक–शकटासुरनाशक; कृष्ण.
शब्दब्रह्म–वेद.
शर्वरी–रात्र.
शशी–चंद्र.
शिशु–अपत्य, मूल.
शेजे–जवळ, शेजारीं.
शैलबाळी–पर्वताची मुलगी; पार्वती.
शैव–शिवभक्त.
श्रवण–कान.
श्वान–कुत्रा.
श्रौत–श्रुतिविहित, वेदोक्त.

ष.

षडरिदमन–कामक्रोधादि सहा शत्रूंचें दमन.
षड्रिपु–काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, हे सहा रिपु म्हणजे शत्रु.

स.

संग–आसक्ति.
संतान–संतति, वंशवृक्ष.
सदन–घर.
संदेह–संशय, शंका.
संबोखणें–समजावणें, तृप्त करणें.
समवेत–सह, बरोबर.
समीर–वारा.
सरिता–नदी.
संवदणी–सौंदणी, डोण, कुंडी.
संवरित–वेष्टित, आच्छादित.
संवसाटी–बरोबरी.
साउलें–वस्त्र, लुगडें.
सांकडें–संकट.
साजरा–शोभिवंत, सुंदर.
सांडी–त्याग, अव्हेर.
सारस–एकजातीचा पक्षी.

साक्षेप–प्रयत्न.
सिंधु–सागर, समुद्र.
सीण–थकवा, ग्लानि.
सीस–शीर्ष, डोकें.
सुकृत–पुण्य.
सुखाड–सुख, गोडी.
सुत–मुलगा.
सुना–व्यर्थ.
सुनें–कुत्रें.
सुमन–फूल.
सुमनहार–फुलांच्या माळा.
सूकर–डुकर.
सूति–जन्म, संतति.
सोनसळा–जरतारी पीतांबर.
सोपान–जिना.
सोवत–झोंपत.
सोस–हाव, प्रबळ इच्छा.
सोहळा–१ आर्त, इच्छा.–२ उत्सव. मौज.
सौंगडे–सोबती, खेळगडी.
सौरस–आसक्ति.
स्कंद–खांदा.
स्मार्त–स्मृतींत सांगितलेलीं.
स्रवणें–पाझरणें.

ह.

हरपणें–हरवणें, नष्ट होणें.
हवन–आहुति, यज्ञ.
हळहळ–चित्ताची अस्वस्थता, हुरहुर.
हाटीं–बाजारांत.
हातवटी–कुशलता, योग्यता.
हांवभरी–हांवरें, आशायुक्त.
हिंपुटी–खिन्न, कष्टी, दुःखी.
हेलावणें–हलणें; हेलकावे खाणें.
हेळा–सत्वर.
हैतुक–हेतुपूर्वक केलेलीं.
होकर–होऊन.
होट–ओष्ठ, ओठ.
होड–वाईट प्रतिज्ञा, पैज.

क्ष.

क्षीर–दुध.
क्षुधित–भुकेलेला.
क्षुधा–भूक.
क्षेत्र–शेत.
क्षेम–आलिंगन.